# इस्लामची जीवनपद्धती

जफर शरीफ लिखित कानून-इ-इस्लाम
या ग्रंथाचा अनुवाद

अनुवादक : प्रा. अ. प. सूर्यवंशी

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई

## अनुक्रमणिका

# इस्लामची जीवनपद्धती

## अनुक्रमणिका

# इस्लामची जीवनपद्धती

जफर शरीफ लिखित
‘कानून-इ-इस्लाम’
या ग्रंथाचा अनुवाद

अनुवादक
प्रा. अ. प. सूर्यवंशी

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई

## अनुक्रमणिका

**प्रथमावृत्ती**
**१९७६, शके १८९८**

© महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ
सचिवालय, मुंबई

**प्रकाशक**
सचिव
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ
सचिवालय, मुंबई

**मुद्रक**
व्यवस्थापक
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय
मुंबई

## अनुक्रमणिका

# निवेदन

आधुनिक शास्त्रे, ज्ञानविज्ञाने, तंत्र आणि अभियांत्रिकी इत्यादी क्षेत्रांत त्याचप्रमाणे भारतीय प्राचीन संस्कृती, इतिहास, कला इत्यादी विषयांत मराठी भाषेला विद्यापीठाच्या स्तरावर ज्ञानदान करण्याचे सामर्थ्य यावे हा उद्देश लक्षात घेऊन साहित्य संस्कृति मंडळाने वाङ्मय-निर्मितीचा विविध कार्यक्रम हाती घेतला आहे. मराठी विश्वकोश, मराठी भाषेचा महाकोश, मराठी वाङ्मयकोश, विज्ञानमाला, भाषांतरमाला, आंतरभारती-विश्वभारती, महाराष्ट्रेतिहास इत्यादी योजना या कार्यक्रमात अंतर्भूत केल्या आहेत.

२. मराठी भाषेला विद्यापीठीय भाषेचे प्रगल्भ स्वरूप व दर्जा येण्याकरिता मराठीत विज्ञान, तत्त्वज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि तंत्रविज्ञान या विषयांवरील संशोधनात्मक व अद्ययावत माहितीने युक्त अशा ग्रंथांची रचना मोठ्या प्रमाणावर होण्याची आवश्यकता आहे. शिक्षणाच्या प्रसाराने मराठी भाषेचा विकास होईल, ही गोष्ट तर निर्विवादच आहे. पण मराठी भाषेचा विकास होण्यास आणखीही एक साधन आहे आणि ते साधन म्हणजे मराठी भाषेत निर्माण होणारे उत्कृष्ट वाङ्मय हे होय. जीवनाच्या भाषेतच ज्ञान व संस्कृती यांचे अधिष्ठान तयार व्हावे लागते. जोपर्यंत माणसे परकीय भाषेच्याच आश्रयाने शिक्षण घेतात, कामे करतात व विचार व्यक्त करतात, तोपर्यंत शिक्षण सकस बनत नाही, संशोधनाला परावलंबित्व रहाते व विचाराला अस्सलपणा येत नाही, एवढेच नव्हे तर वेगाने वाढणाऱ्या ज्ञानविज्ञानापासून सर्वसामान्य माणसे वंचित राहतात.

३. संस्कृत व अन्य भारतीय भाषांतील आणि त्याचप्रमाणे इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, रशियन, ग्रीक, लॅटीन इत्यादी पश्चिमी भाषांतील अभिजात ग्रंथांचे व उच्च साहित्यामधील विशेष निवडक पुस्तकांचे भाषांतर किंवा सारांश, अनुवाद अथवा विशिष्ट विस्तृत ग्रंथाचा आवश्यक तेवढा परिचय करून देणे हा मंडळाच्या भाषांतरमालेचा उद्देश आहे.

४. भाषांतर योजनेतील पहिला कार्यक्रम मंडळाने आखून, ज्यांना अग्रकम दिला पाहिजे अशा पाश्चात्त्य व भारतीय भाषांतील सुमारे ३०० पुस्तके निवडली आहेत. होमर, व्हर्जिल एस्किलस्, ॲरिस्टोफेनीस्, युरिपिडिस्, प्लेटो, ॲरिस्टॉटल्, थॉमस् ॲक्वाइनस्, न्यूटन, डार्विन, रुसो, कांट, हेगल्, जॉन स्टुअर्ट मिल, गटे, शेक्सपीअर, टॉल्स्टॉय्, दोस्तएव्स्की, कॅसिरेर्, गॉर्डन व्ही. चाइल्ड् इत्यादिकांचा या भाषांतरमालेत समावेश केला आहे. संस्कृतमधील वेद, उपनिषदे, महाभारत, रामायण, भरताचे नाट्यशास्त्र, संगीत रत्नाकर, ध्वन्यालोक, प्राकृतातील गाथासप्तशती, त्रिपीटकातील निवडक भाग इत्यादिकांचाही या भाषांतरमालेत समावेश केला आहे.

५. मंडळाच्या भाषांतरयोजनेखाली मंडळाने आतापर्यंत अनेक अभिजात ग्रंथांची भाषांतरे प्रकाशित केली आहेत. जॉन स्टुअर्ट मिलचे “On Liberty”, रूसोचे “Social Contract”, एम. एन. रॉयची “Reason, Romanticism and Revolution” व “Letters from Jail”, स्तानिस्लाव्स्कीचे “An Actor Prepares”, तुर्गेनिव्चे “Fathers & Sons”, रायश्नेबाखचे “Rise of Scientific Philosophy”, गन्नर मिर्दाल्चे “Economic Theory & Underdeveloped Regions”, कै. पां. वा. काणे यांचे “History of Dharmashastra”, बर्ट्रान्ड रसेलचे “Religion & Science”, कोपलँडचे “Music & Imagination”, तेर्

अनुक्रमणिका

झागीचे “Theoretical Soil Mechanics”, विशाखदत्ताचे “मुद्राराक्षसम्”, भरतमुनीचे “भरतनाट्यशास्त्र” (अध्याय ६ व ७ आणि अध्याय १८ व १९), निकोलाय् मनुचीचे “Storia-do-Mogor”, ऑ. से. पिगू लिखित “Socialism Vs. Capitalism” इत्यादी अनेक पुस्तकांची भाषांतरे व सारानुवाद प्रकाशित झाले आहेत, होत आहेत.

६. जफर शरीफ लिखित “कानून-इ-इस्लाम” या ग्रंथाचा मराठी अनुवाद प्रा. अ. प. सूर्यवंशी, नांदेड यांनी केला असून तो “इस्लामची जीवनपद्धती” या शीर्षकाने मंडळाच्या भाषांतरमालेत प्रकाशित करण्यास मंडळास आनंद होत आहे.

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

मुंबई, २४ ज्येष्ठ, शके १८९८ — अध्यक्ष
१४ जून १९७६ — महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ

## अनुक्रमणिका

# प्रास्ताविक

जफर शरीफ या लेखकाने 'कानून-इ-इस्लाम' हे पुस्तक इ.स. १८३२ मध्ये लिहिले. त्यात आवश्यक भर घालून डॉ. हेरक्लॉटने त्याचा इंग्रजी अनुवाद केला. यात विलियम क्रूकने भर घालून व नवरचना करून त्याचा नवा अवतार घडविला, ऑक्सफोर्ड विद्यापीठ प्रेसमध्ये १९२१ साली छापल्या गेलेल्या आवृत्तीचा हा मराठी अनुवाद आहे.

मूळ उर्दू ग्रंथ उपलब्ध नाही. पहिली आवृत्ती भारतात कुठेही उपलब्ध होऊ शकली नाही. फर्ग्युसन कॉलेजच्या ग्रंथालयात उपलब्ध असणारी क्रूकच्या १९२१ सालच्या आवृत्तीची दुर्मिळ प्रत अनुवादासाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल मी फर्ग्युसन कॉलेज, पुणे व प्रा. अ. भि. शहा यांचा ऋणी आहे.

सदर ग्रंथातील जफर शरीफचा भाग कोणता, डॉ. हेरक्लॉट आणि विलियम क्रूक यांचा भाग कोणता, हे सांगणे अतिशय कठीण आहे. पण एकूण मिळून मुस्लीम समाजाविषयी अतिशय विपुल माहिती या ग्रंथात आलेली आहे हे खरे आहे. एक संदर्भ ग्रंथ म्हणून या ग्रंथाला फार मोठे महत्त्व आहे आणि ही माहिती जनतेसमोर येणे अतिशय उपयोगी ठरेल अशी आमची कल्पना आहे, म्हणूनच हे कार्य मी अंगावर घेतले. अनुवाद करताना बहुतेक ठिकाणी संपूर्ण माहिती अनुवादिलेली आहे. काही माहिती युरोपच्या रहिवाशांना तपशिलाने सांगणे महत्त्वाचे होते पण भारतीयांच्या दृष्टीने त्या बाबी नित्यपरिचित अशा आहेत, काही तपशील केवळ पुनरुक्त स्वरूपाचा आहे. अशा सर्व ठिकाणी संक्षेप केलेला आहे, मात्र कुठेही मूळचे मूद्दे सुटू दिलेले नाहीत. उदाहरणार्थ, मुसलमान आंब्याची वगैरे लोणची घालतात इतकेच म्हटले आहे; आंबे घेतात, त्यांचे तुकडे करतात, त्यात तिखटमीठ घालतात असा पानभर तपशील गाळलेला आहे.

सदर ग्रंथाचा अनुवाद करण्यासाठी मुस्लीमधर्म, परंपरा, चालीरीती, यांच्याविषयी व उर्दूभाषेविषयी विपुल माहिती असणे आवश्यक होते. याबाबत आरंभापासून शेवटपर्यंत गुरुवर्य प्रा. नरहर कुरुंदकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्याबद्दल वाटणारे ऋण शब्दांनी व्यक्त करण्यापेक्षा ते तसेच अव्यक्त ठेवणे बरे. सदर अनुवाद अधिक उपयुक्त व निर्दोष होण्यासाठी प्रा. अ. भि. शहा यांचेही अमोल मार्गदर्शन लाभले त्याबद्दल त्यांचे आभार मानणे हे माझे कर्तव्यच आहे. भाषांतरातील उणिवा अर्थातच माझ्या आहेत.

सदर ग्रंथाच्या अनुवादाचे कार्य महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाने माझ्यावर सोपविले आणि मला हा अत्यंत मौलिक माहितीने भरलेला ग्रंथ मराठीत आणण्याची संधी उपलब्ध करून दिली, त्याबद्दल मंडळाचा अतिशय आभारी आहे.

**अ. प. सूर्यवंशी**

अनुक्रमणिका

# इस्लामची जीवनपद्धती

**भारतीय मुसलमानांच्या चालीरीती,**
त्यांच्यात असणारे जन्मापासून मृत्यूपर्यंतचे विविध
विधी आणि समारंभ यांचा संपूर्ण व यथातथ्य वृत्तान्त

लेखक : **जफर शरीफ**
दक्षिणेतील रहिवासी

**जी. ए. हेरक्लॉट,** एम.डी.
सर्जन यांनी मद्रास येथे आपल्या
मार्गदर्शनाखाली लिहून घेतले व
भाषांतर केले

**विलियम क्रूक,** सी.आय.ई.
सन्माननीय डी.एससी. ऑक्झॉन., सन्माननीय
लिट्.डी., डब्लीन रॉयल अँथ्रोपॉलॉजिकल
सोसायटीचा फेलो, आय.सी.एस. सेवेतील
माजी अधिकारी यांनी नवीन माहितीची
भर घालून, सुधारणा करून, पुनर्रचना करून
ही नवी आवृत्ती सिद्ध केली

**हम्फ्रे मिलफोर्ड**
ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस
१९२१

## अनुक्रमणिका

## प्रथमावृत्तीची अर्पणपत्रिका

माननीय चेअरमन, डेप्युटी चेअरमन आणि
ईस्ट इंडिया कंपनीचे कोर्ट ऑफ डायरेक्टर्स
यांना हा ग्रंथ समर्पित करण्यात येत आहे.
कारण ब्रिटिशांच्या प्रजाजनांपैकी एक महत्त्वाचा
आणि ज्याच्याविषयी कुतूहल आहे असा जो
प्रजाजन वर्ग, त्यांच्याविषयीचा हा ग्रंथ
कंपनीच्या उदार व दयाळू आश्रयाखालीच
प्रकाशित करण्यात आला. त्यांच्या परवानगीने
त्यांनाच तो आदरभावाने अर्पण असो

कंपनीचा अत्यंत आज्ञाधारक व नम्र सेवक
जी. ए. हेरक्लॉट

## अनुक्रमणिका

## जफर शरीफची प्रस्तावना

बिस्मिल्लाह रहिमान ओ रहीम-परमेश्वराच्या नावाने, जो दयाळू आणि सर्वश्रेष्ठ आहे-हे ईश्वरा, तुझ्या शुभाशीर्वादाने या लेखनाचा विकास होवो व दयाळू परमेश्वराच्या कृपेने हे लेखनकार्य पूर्ण होवो.

ज्या सर्वश्रेष्ठ अल्लाने द्रव्याच्या एका छोट्या कणापासून बुध्दिमान आणि बुध्दिहीन, सजीव आणि निर्जीव असे हे वैविध्यपूर्ण जग निर्माण केले त्या परमेश्वराच्या अगाध लीलेचा विजय असो. आणि सर्व स्तुती त्याच्याच नावे असो. विजय असो प्रेषित महंमदाचा, त्याला माझे सहस्त्र प्रणाम. ईश्वरी कृपेचा वरदहस्त असणाऱ्या प्रेषित महंमद मुस्तफाला नमन असो, धन्यवाद असो, कारण त्याच्या कृपेने ईश्वरी संदेश शुद्ध स्वरूपात पृथ्वीवर आला. त्याच्या सर्व सहकाऱ्यांना नमन असो. मर्त्य माणूस या सर्वांची स्तुतीसुद्धा करण्यास पुरेसा पात्र नाही.

माझे नाव जफर शरीफ ऊर्फ लाला मियाँ. कुरेश टोळीतील, नागोर या ठिकाणी जन्मलेले मरहूम अली शरीफ हे माझे वडील. त्यांना परमेश्वरी कृपेचा लाभ झाला. प्रभू त्यांची कबर नित्य प्रकाशमान ठेवो. आणि त्यांचा जीवात्मा निष्कलंक असो. मी नित्य रहाणारा उप्प यल्लूर या गावचा (सध्याचे वेल्लूर). फार दिवसांपासून माझ्या भाग्ययोगामुळे उदात्त मनाच्या, श्रेष्ठ योग्यतेच्या व ज्ञानी इंग्रज गृहस्थांशी सहवास आला. त्यांचे दैव असेच सदैव भरभराटीत असो. या थोर पुरुषांच्या पंखाखाली माझा आत्मा आणि माझे शरीर या दोहोंचेही चांगलेच पोषण झाले. कारण मी या ठिकाणी भाषांचा अध्यापक होतो.

अंतर्भेदी खोल दृष्टीच्या या ज्ञानी इंग्रज पुरुषांनी गाढ जिज्ञासेने माझ्या वागणुकीचे निरीक्षण केले. मुसलमानांच्या विषयी एक तपशीलवार पुस्तक, त्यांच्या चालीरीतींची माहिती देणारे असे, जर दख्खनी उर्दूतून लिहिले तर ते अतिशय उपयोगी ठरेल, युरोपियनांना ज्ञान व आनंद देणारे ठरेल, असे थोर इंग्रजांचे म्हणणे पडले. खरे म्हणजे थोरांच्या अपेक्षांची पूर्ती यापूर्वीच व्हायला हवी होती. पण सेवकाला ग्रंथ लिहिण्याइतका अवधी मिळण्यास उशीर झाला. भव्यतेचे आदर्श, माणुसकीची खाण, सौजन्याचे कारंजे, ज्ञानाचे भांडार, गुणज्ञ आणि रसज्ञ, तत्त्वज्ञानात आपल्या युगातील प्लेटो, वैद्यकात दुसरे गॅलन, आपल्या युगातील हिप्पोक्रेटस असे जे सद्‌गुणसंपन्न डॉ. हेरक्लॉटसाहेब यांची इच्छा या पामराकडून उशिरा का होईना पण पूर्ण होत आहे. माझ्या क्षुल्लक आणि तुच्छ शक्तीचा यथामति वापर करून विविध प्रकरणे पाडून हे 'कानून-इ-इस्लाम' नावाचे पुस्तक मी पूर्ण करीत आहे.

अनेक हिंदुस्थानी लेखकांनी यासारख्या विषयावर मधूनमधून लिहिण्याचा प्रयत्न केला पण येथल्या इतका विस्तृत वृत्तान्त इतरत्र कुठेही नाही.मी कुराण आणि हदीस यांच्यासहच स्थानिक चालीरीतींचाही माझ्या लिखाणात उल्लेख केलेला आहे. कोणत्याही उदार इंग्रजाला मुसलमानांच्या कोणत्याही धार्मिक रूढी आणि समारंभाविषयी अज्ञान राहू नये असा माझा प्रयत्न आहे.

मी स्वतः धर्मग्रंथाचा फार मोठा तज्ज्ञ नाही. माझे ज्ञान अगदी जुजबी व प्राथमिक आहे याची मला जाणीव असली तरी दक्षिणेतील मुसलमानांच्या चालीरीतींविषयी पुष्कळच माहिती मला आहे अशी माझी समजूत असल्यामुळेच मी या लेखनाला प्रवृत्त झालो. हा ग्रंथ मी अशिक्षितांनाही कळेल इतक्या सोप्या भाषेत

अनुक्रमणिका

लिहिलेला आहे. लेखणीवर प्रभुत्व असणाऱ्यांनी, शैलीचे अधिपती असणाऱ्यांनी या ग्रंथातील उणिवा दुर्लक्षित कराव्या आणि सहानुभूतीपूर्वक या लिखाणाचा स्वीकार करावा अशी विनंती आहे.

हे पुस्तक १२४३ हिजरीमध्ये, त्यानुसार इ.स. १८३२ मध्ये पूर्ण झाले.

## अनुक्रमणिका

## डॉ. हेरक्लॉट यांची प्रस्तावना

एखाद्या राष्ट्रातील रहिवाश्यांच्या सामाजिक चालीरीती, त्यांच्यातील रूढी व रूढ धामिर्क विधी यांविषयी शोधकांना नेहमीच कुतूहल वाटत आलेले आहे, म्हणून हाच उद्देश मनात ठेवून संशोधक प्रवाशांनी दूरदूरच्या प्रदेशांत सफरी काढल्या आणि प्राचीन चालीरीतींचे संशोधन करणाऱ्यांनी सर्वत्र आपले शोधकार्य चालू ठेवले. प्रवासातील श्रम, प्रतिकूल हवामान किंवा एखाद्या प्रदेशातील रहिवाशांचा रानटीपणा शोधकांना आपल्या हेतूपासून परावृत्त करू शकला नाही. या अभ्यासात एकाकीपणे करावे लागणारे परिश्रम, साधनसामुग्रीचा दुर्मिळपणा किंवा काळाच्या अंतरामुळे पसरलेले धुके जिज्ञासूंना नाउमेद करू शकलेले नाही. माणसाची साहसी पावले अमेरिकेच्या अंधाऱ्या जंगलात, आफ्रिकेतील वाळवंटात ज्याप्रमाणे शिरली त्याचप्रमाणे हिमालयातील अनेक शिखरांवरही पोचली. संशोधकांच्या जहाजांनी समुद्र पालथे घातले. मंद एस्किमोच्यापासून खेळाडू ओटाहिंटाच्यापर्यंत आणि न्युझिलंडच्या नरभक्षक टोळीवाल्यांच्या प्रदेशापर्यंत संशोधकांना त्यांची जिज्ञासा खेचीत घेऊन गेली. अचेतन आणि अप्रबुद्ध निसर्ग या जिज्ञासू निरीक्षणातून वगळला गेलेला नव्हता हे जरी खरे असले तरी कवीच्या शब्दांत सांगायचे तर, मानवजातीचा योग्य अभ्यास म्हणजे माणूस होय.

जर इतर अनेक टोळ्यांचा अभ्यास हा आपला विषय होऊ शकतो तर मग भारतीय मुसलमानांचा अभ्यास हा निश्चितच महत्त्वपूर्ण अभ्यास मानावा लागेल. विजेत्यांच्या नजिकच्या गेल्या पिढीत त्यांचा समावेश करावा लागेल. भारताच्या विशाल प्रदेशावर अनेक शतके ब्रिटिशांच्यापूर्वी मुसलमानांच्या सत्तेचे वर्चस्व हाते. आमच्यापूर्वी भारताचे सत्ताधारी असलेले आणि आता आमचेच प्रजाजन असलेले असे जे भारतीय मुसलमान, त्यांच्याविषयी आम्हाला कुतूहल असणे स्वाभाविक आहे. हा अभ्यास केवळ तात्त्विक जिज्ञासापूर्तीचाच भाग आहे असे नाही. या देशावर राज्यकारभार करताना आमचा या मंडळींशी प्रजाजन, सैनिक व सरकारी अधिकारी या नात्याने दैनंदिन संबंध येत राहणार आहे. म्हणून या अभ्यासाची व्यावहारिक उपयुक्तता फार मोठी आहे. एकूण शासकीय व्यवहारालाच या अभ्यासाचे मोलाचे सहाय्य होणार आहे.

या प्रकारच्या अभ्यासाची उपयुक्तता अतिशय उघड असूनसुद्धा असा अभ्यास आजवर फारसा झालेला नाही याचे मला अत्यंत आश्चर्य वाटते. अशा स्वरूपाचे कार्य यापूर्वीच हाती घ्यायला हवे होते पण ते आजवर होऊ शकले नाही. हिंदूंचा इतिहास, धर्म, चालीरीती, श्रद्धा याविषयी विपुल माहिती देणारी मूल्यवान पुस्तके जनतेसमोर आहेत. मिल्लचे 'हिस्ट्री ऑफ ब्रिटिश इंडिया', मूरचे 'हिंदू पंथ' यांसारखी पुस्तके आज सर्वांच्या समोर आहेत. परंतु भारतीय मुसलमानांच्याबद्दल पद्धतशीर माहितीने भरलेले असे कोणतेही पुस्तक माझ्या माहितीप्रमाणे अजून उपलब्ध नाही. हिंदूंशी तुलना करता मुस्लीम धर्म व समाजपद्धती सोपी आहे. या धर्माचा अतीव साधेपणाच त्याचे महत्त्वाचे सामर्थ्य असल्यामुळे इस्लामचे अनुयायी सहसा धर्मांतरास प्रवृत्त होत नाहीत. कदाचित यामुळेच त्यांच्याकडे ख्रिस्ती मिशनऱ्यांचे लक्ष कमी प्रमाणात गेले असावे. कदाचित काही युरोपियनांनी असल्या प्रकारचा ग्रंथ लिहिण्यासाठी आवश्यक असणारी तपशीलवार माहिती गोळाही केली असती, पण ज्या शहाण्या व ज्ञानी देशी विद्वानांशी युरोपियनांचा संबंध येतो ती जाणती मंडळी आपल्या देशबांधवांच्या विषयीची माहिती तपशीलवारपणे सांगण्यास फारसे उत्सुक नसत.

अनुक्रमणिका

या प्रश्नाकडे दुर्लक्ष होण्याची कारणे कोणतीही असोत, त्यांची चर्चा करण्यापेक्षा असे पुस्तक प्रकाशित करण्यामागे आमचा हेतू कोणता याचे स्पष्टीकरण करणे मला अधिक महत्त्वाचे वाटते. या लिखाणाचा हेतू भारतातील, विशेषतः दक्षिणेतील प्रेषितांचे म्हणजे महंमदाचे अनुयायी असणारे मुसलमान कसे वागतात आणि जगतात, याविषयी माहिती देण्याचा आहे. कुराण आणि हदीस या ग्रंथांनी जी जबाबदारी सर्वच मुसलमानांच्यावर टाकलेली आहे, त्याखेरीज इतर कशाचे अनुकरण मुसलमान करतात, कोणत्या रूढी पाळतात याचा तपशीलवार वृत्तान्त देणे हा या लेखनाचा हेतू आहे. येथे मुसलमानांच्या म्हणून ज्या रूढी व चालीरीती वर्णन केलेल्या आहेत त्या मोठ्या प्रमाणात त्यांनी हिंदूंच्यापासून उचललेल्या आहेत असे दिसून येईल. अर्थातच हा अभ्यास रूढी आणि चालीरीती दोन्हींचाही आहे, दोन्हींनाही हे विधान लागू पडेल.

ज्यांना भारताविषयी थोडेसे ज्ञान आहे त्यांना, गैरसमज होऊ नये म्हणून काही बाबी सांगणे आवश्यक आहे. या पुस्तकात वर्णन करण्यात आलेल्या पुष्कळशा रूढी फक्त दक्षिणेतच अस्तित्वात आहेत. काही रूढी तर विशिष्ट भागातच आढळतात, त्या पूर्ण दक्षिणेत आढळत नाहीत. प्रत्येक ठिकाणचा थोडा थोडा फरक लक्षात घेतला तरी स्थूलपणे देशाच्या सर्व भागातील मुसलमानांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात सारखेपणा आढळून येतो हेही विसरता येणार नाही.

या पुस्तकाच्या मूळ लेखकाने आपल्या देशबांधवांचा परिचय करून देताना पुढील पद्धत स्वीकारलेली आहे. तो एखाद्या व्यक्तीचा त्याच्या जन्मापासून किंवा त्याही पूर्वीपासून, धर्म, रूढी, चालीरीती, शुभाशुभ शकून इत्यादी दृष्टीने आढावा घेत समाजाचे वर्णन करीत आहे. हे सारे धार्मिक विधी गर्भवतीच्या सातव्या महिन्यापासून म्हणजे जन्मापूर्वी दोन अडीच महिने आरंभ होणारे आहेत. मूल जसजसे मोठे होत जाते तसतसे निरनिराळे विधी आणि समारंभ पार पडत असतात. खरोखर या विधींना आणि समारंभांना अंत नाही असे म्हटले तरी चालेल. विवाहापर्यंत हे सारे वर्णन लेखक करतो आणि त्यानंतर क्रमाने धार्मिक सण, उपवास इत्यादींचे वर्णन करतो. या पौर्वात्य लेखकाने मांडलेल्या काही कल्पनांच्याकडे पाहून इंग्रज वाचकांना हसूही येण्याचा संभव आहे. पण भारतीयांच्याबरोबर माझे जे संबंध आले त्यात या लेखकाच्यासारख्या आधुनिक पद्धतीने विचार करणारा व आधुनिक पद्धतीने युरोपियनांच्यासाठी विचार मांडणारा मला दुसरा कोणी आढळला नाही. हा गृहस्थ म्हणजे या ग्रंथाचा मूळ लेखक अतिशय ज्ञानपिपासू आहे. त्याची माहिती सूक्ष्म आणि व्यापक आहे. तो कुशल वैद्यही आहे. त्याची आकलनशक्तीही चांगली आहे. म्हणूनच इतकी तरी तपशीलवार माहिती त्याच्याकडून मिळवता आली.

हे भाषांतर करताना मी शक्यतो मूळाशी एकनिष्ठ राहण्याचा प्रयत्न केला आहे. मूळ ग्रंथ दख्खनी उर्दूत आहे. हा ग्रंथ जसाच्या तसा प्रकाशित करण्याचा माझा हेतू असल्यामुळे मी जी इतर माहिती दिलेली आहे, ती स्पष्टपणे वेगळ्या परिशिष्टात दिलेली आहे. नातीगोती, वजने व मापे, स्त्रीपुरुषांचे पोशाख, स्त्रियांचे अलंकार, वाद्ये, दारूकाम, खेळ इत्यादी माहिती ही अशी परिशिष्टात दिलेली आढळून येईल. (या पुस्तकाची मूळ हिंदुस्थानी प्रत प्रकाशित झाली नाही आणि हरवली गेली-क्रूक) भारतीय भाषांशी अपरिचित असलेल्या वाचकांच्यासाठी उर्दू शब्दांची एक सूची ग्रंथाच्या शेवटी दिलेली आहे व हे शब्द ओळखू यावेत म्हणून ग्रंथभर तिरप्यापद्धतीने छापलेले आहेत.

अनुक्रमणिका

सदर पुस्तक प्रकाशानला जात असताना मला दोन अति आधुनिक पुस्तके पाहण्याचा योग आला. यांपैकी श्रीमती मीर हसन अली यांचे ‘ऑबझर्व्हेशन ऑन मुसलमानस् ऑफ् इंडिया’ हे पुस्तक पुष्कळ नवी माहिती देणारे आहे. त्याचप्रमाणे फ्रेंच अध्यापक गार्से द तासी यांचे ‘मेमॉयर्स सर ले पर्टिक्युलॅरिटिज द ला रिलिजन मुसलमाने दां इन्डे’ हे पुस्तकही पुष्कळच माहिती देणारे आहे. हे आमचे पुस्तक छापले जात असताना वर उल्लेखिलेली जी दोन पुस्तके पाहण्यात आली त्यातून महत्त्वाची वाटलेली माहिती टीपा म्हणून जोडलेली आहे.

या पुस्तकाचा लेखक जफर शरीफ हा सुन्नी किंवा परंपरावादी मुसलमान आहे. तरीही त्याने शियांच्याविषयी पुष्कळच सहानुभूतीने लेखन केलेले दिसते. शिया व सुन्नी मुसलमान यांच्यातील परस्पर द्वेष विचारात घेता काही ठिकाणी लेखकाने थोडी परस्परविरोधी व विसंगत मते दिलेली आहेत हे लक्षात आले तरीही त्याने खूपच समजूतदारपणा व औदार्य दाखविले आहे असे म्हणण्यास हरकत नाही. एकंदरीने पाहता परिशिष्ट, आम्ही दिलेल्या टीपा आणि मूळ लेखकाचे लिखाण या बाबी एकत्र केल्या तर मुस्लीम समाजाचे चित्र पुष्कळ विस्तृतपणे उपलब्ध होते असे म्हणण्यास हरकत नाही.

अनुक्रमणिका

# विलियम क्रूक यांची प्रस्तावना

या पुस्तकाची पहिली आवृत्ती इ.स. १८३२ मध्ये प्रकाशित झाली. तेव्हापासून आजतागायत या पुस्तकाची कीर्ती भारतीय मुसलमानांच्या श्रद्धा व चालीरीती ह्यांची अधिकृत माहिती पुरविणारे पुस्तक म्हणून स्थिर राहिलेली आहे. सर रिचर्ड बर्टन यांच्या सारख्या तज्ज्ञानेसुद्धा या पुस्तकाचा एक उत्तम पुस्तक म्हणून आपल्या अरेबियन नाइटस्च्या ख्यातनाम भाषांतरात गौरवाने उल्लेख केलेला आहे. बर्टन यांच्या मते या पुस्तकातील फलज्योतिष्याबद्दलची माहिती विशेषच उपयुक्त आहे. सदर पुस्तकाची सुधारीत दुसरी आवृत्ती काढण्याची त्यांनी सूचनाही दिली आहे. भारतातील इस्लाम या विषयावर ह्यानंतर ज्या लेखकांनी लिखाण केलेले आहे, त्यांनी पुष्कळशी माहिती या पुस्तकातूनच घेतलेली आहे. या पुस्तकातील कौटुंबिक विधी, सण, जादूटोणा या विषयींची माहिती मानववंशशास्त्रज्ञांना महत्त्वाची वाटेल.

या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीत मूळ लेखक जफर शरीफ आणि भाषांतरकार हेरक्लॉट यांच्याबद्दल काहीच माहिती दिलेली नाही. इंडिया ऑफिसात केलेल्या चौकशीवरून आणि हैद्राबाद व मद्रास येथील रेसिडेन्सींनी केलेल्या तपासावरून व इतर सर्व मार्गांनी मिळून जी माहिती गोळा करू शकलो तिचे थोडक्यात स्वरूप पुढीलप्रमाणे आहे : जफर शरीफ उर्फ लाला मियाँ हा सामान्य कुळातील मुसलमान होता. तो विशेष प्रसिद्ध नव्हता. त्याच्याबद्दलची कौटुंबिक आणि व्यावसायिक माहिती आता फारशी मिळण्याजोगी नाही. तो मद्रास सरकारच्या सेवेत असणाऱ्या अधिकाऱ्यांना अरबी, फारसी व उर्दूभाषा शिकविणारा एक मुनशी होता. हा व्यवसाय करीत असतानाच मद्रास एस्टाब्लिशमेंटचा सिव्हील सर्जन जी. ए. हेरक्लॉट, एम.डी. यांची जफर शरीफवर मर्जी बसली. हेरक्लॉटच्या प्रेरणेने जफर शरीफने सदर पुस्तक लिहिले. या पुस्तकाची प्रत त्याने आपल्या आश्रयदात्याच्या स्वाधीन केली. मद्रास प्रांतातील कृष्णा जिल्ह्यातील यल्लूर या गावचा जफर शरीफ रहिवासी होता. त्याला परंपरागत मुस्लीम वैद्यक म्हणजे युनानी वैद्यक चांगले अवगत होते. तो कुशल वैद्यही होता असे दिसते. तो दक्षिणेतील सुन्नी मुसलमान होता.

सुन्नी असूनही त्याने शियांच्याविषयी असहिष्णुता दाखविलेली नाही. दक्षिणेत शियांचा प्रभाव बराच मोठा आहे. विजापूरच्या आदिलशाही घराण्याचे अर्धे सभासद शिया तर अर्धे सुन्नी होते. आदिलशाही राजवटीत विविध मुस्लीम गट, ख्रिश्चन व हिंदू यांच्याबद्दल परस्पर सहिष्णुतेचे धोरण स्वीकारले जात असे. जफर शरीफचा त्याच्या इतर समकालीनांच्याप्रमाणे जादू व चेटूक यावर विश्वास होता. पण युरोपियनांशी संबंध आल्यामुळे त्याला मर्यादा पडल्या होत्या. इस्लामचा इतिहास आणि वाङ्मय याचा लेखक माहितगार दिसतो. तारतम्य बाळगून पण निःसंकोचपणे, प्रामाणिकपणे आणि श्रद्धेने ही माहिती त्याने नोंदवलेली आहे.

या पुस्तकाचे प्रथम संपादक व भाषांतरकर्ते डॉ. हेरक्लॉट यांच्याबद्दल काही माहिती उपलब्ध आहे. त्यांचे पूर्वज डच असून ते बंगालमधील डच वखारीत स्थायिक झालेले होते. आजच्या हुगळी नगरपालिकेत समाविष्ट असलेले चिनसुरा हे गाव त्या काळी डच वखारीचे गाव होते. सतराव्या शतकात पूर्वार्धापासून इ.स १८२५ पर्यंत तेथे डचांची व्यापारी वखार होती. यानंतरच्या काळात ब्रिटीशांनी आपल्या ताब्यातील सुमात्रा डचांना दिले आणि डच वसाहती ग्रेटब्रिटनच्या स्वाधीन करण्यात आल्या.

अनुक्रमणिका

हेरक्लॉटबद्दलची उपलब्ध माहिती प्रामुख्याने त्यांनी दिलेल्या निवेदनावर आधारलेली आहे. मद्रास येथे सर्जन म्हणून नेमणूक झाल्यानंतर शपथेवर जे निवेदन त्यांनी दिले आहे त्यावरून असे कळते की, त्यांच्या वडिलांचे नाव ग्रेगरी हेरक्लॉट व आईचे नाव कॅरोलीन कॅथरीन असे होते. चिनसुरा या ठिकाणी त्यांचा जन्म २८ फेब्रुवारी १७९० मध्ये झाला. यापूर्वीच दोन वर्षे त्यांचे वडील भारतात आले होते व इ.स. १८२५ पर्यंत ते डच सरकारच्या सेवेत होते. नंतर त्यांची ईस्ट इंडिया कंपनीत ब्रिटीश सेवेत कमिशनरांचे सहायक म्हणून नेमणूक झाली. स्वतः डॉ. जी. ए. हेरक्लॉट यांचे वैद्यकीय शिक्षण इंग्लंडला झाले होते. १८१८ साली हे शिक्षण पूर्ण होऊन त्यांना प्रमाणपत्र मिळालेले दिसते. १८१९ मध्ये मद्रास येथे हेरक्लॉट येऊन पोचले व १९ व्या देशी पायदलाच्या पहिल्या पलटणीशी प्रथम आणि त्यानंतर दहाव्या पलटणीशी त्यांचा संबंध आला. डॉ. हेरक्लॉट इ.स. १८२६ पर्यंत या नोकरीत होते. बहुधा यानंतरच जफर शरीफकडून हे पुस्तक त्यांनी लिहून घेतले. पुस्तकाचे भाषांतर करीत असतानाच हेरक्लॉट इंग्लंडला आले व इ.स. १८३२ मध्ये त्यांनी सदर पुस्तक इंग्लंड येथे प्रकाशित केले. या पुस्तकाला लागलेला सर्व पैसा किंवा बहुतेक सर्व पैसा ईस्ट इंडिया कंपनीने पुरविलेला दिसतो. अल्पवयातच डॉ. हेरक्लॉट ८ जुलै १८३४ मध्ये मद्रास राज्याच्या चिंगलेपूत जिल्ह्यातील वालाजाबाद येथे मरण पावले.

जफर शरीफने लिहिलेले आणि हेरक्लॉटने भाषांतरित केलेले सदर पुस्तक इ. डब्ल्यू. लेन यांच्या ‘द मॅनर्स अँड कस्टम्स ऑफ मॉडर्न इजिप्शियन्स’ या पुस्तकापूर्वी तीन वर्षे अगोदर प्रकाशित झालेले आहे, हा एक लक्षणीय योगायोग आहे. लेनने मात्र सदर पुस्तकाचा उल्लेख केलेला दिसत नाही.

जफर शरीफच्या मूळ पुस्तकात मुस्लिमांच्या श्रद्धा व आचार याच बाबी विस्ताराने सांगितलेल्या होत्या. या माहितीत डॉ. हेरक्लॉटने अन्न, खेळ खाद्यपदार्थ, वजने व मापे, पोषाख, अलंकार इत्यादी माहिती परिशिष्ट रूपाने जोडलेली आहे. ही माहिती वेगवेगळ्या ठिकाणी विखुरलेली असल्यामुळे व ती सलग पाहणे कठीण असल्यामुळे या पुस्तकाची उपयोगिता पुष्कळच कमी झालेली होती. फेरमांडणी करून मी या आवृत्तीत माहितीचा सलगपणा आणलेला आहे, त्यामुळे उपयुक्तता वाढेल असे वाटते.

हे पुस्तक टॉडच्या ‘ॲनल्स ऑफ राजस्तान’ आणि स्लीमनच्या ‘रॅम्बल्स अँड रिकलेक्शन्स’ या पुस्तकांच्यासारखे प्रथम श्रेणीचे पुस्तक नाही. एक तर ते भाषांतरीत आहे. दुसरे म्हणजे भाषांतरसुद्धा फारसे सफाईदार नाही. हिंदुस्थानातील मुसलमानांच्या अभ्यासकांना ते अधिक उपयुक्त ठरावे यासाठी अंशतः पुनर्लेखन व संपूर्णतः फेरमांडणी करणे मला आवश्यक वाटले. परिशिष्ट व सूचीमधील महत्त्वाचा भाग पुस्तकाच्या शरीरात समाविष्ट करणे, कौटुंबिक माहिती व धार्मिक माहिती वेगळी करणे, इतस्ततः विखुरलेली माहिती एकत्र गोळा करणे या सगळ्याच बाबी मला कराव्या लागल्या आहेत. या ग्रंथातील पुष्कळ शब्द इ.स. १८८४ साली प्रकाशित झालेल्या श्री. जे. टी प्लॅटस् यांच्या कोशात सापडतात. तेथे त्यांचे अर्थ अधिक नेमकेपणाने आलेले आहेत. मूळ ग्रंथाच्या संक्षेपात व पुनर्रचनेत कोणताही महत्त्वाचा भाग वगळला जाऊ नये याची मी काळजी घेतली आहे. मूळातील पौर्वात्य वातावरणही शक्यतोवर तसेच ठेवलेले आहे. संक्षेपामुळे जी जागा उपलब्ध झाली तिचा वापर मी ठिकठिकाणी नवी उपयुक्त माहिती समाविष्ट करण्यासाठी केला आहे.

अनुक्रमणिका

या पुस्तकाच्या संदर्भात अजून एक बाब लक्षात घेण्याजोगी आहे. मुळात हे पुस्तक दक्षिणेतील एका रहिवाशाने लिहिलेले आहे. त्यामुळे त्यात प्रामुख्याने दक्षिणेतील धर्मश्रद्धा व रूढी यावरच भर होता. पण सदर ग्रंथाची मुद्रणप्रत तयार करताना डॉ. हेरक्लॉट यांनी श्रीमती मीर हसन अली यांच्या ‘ ऑब्झर्व्हेशन्स ऑन द मुसलमान्स ऑफ इंडिया’ व श्री. एम. गार्से द तासी यांच्या ‘मेमॉयर्स सर ले पर्टिक्युलॅरिटीज द ला रिलिजन मुसलमान दां इन्डे’ या पुस्तकातून उपलब्ध झालेली माहिती पूरक म्हणून समाविष्ट केली. आणि यामुळे भारतातील इस्लामची माहिती एकत्रित लक्षात येईल अशी आशा त्यांनी व्यक्त केली होती. दक्षिणेतील मुसलमानांचा जफर शरीफने दिलेला वृत्तांत कौतुकास्पद आहे हे सर्वमान्य आहे. भाषांतरकाराने दिलेल्या माहितीमुळे अधिक माहिती मिळते हेही खरे आहे. पण यामुळे भारतीय साम्राज्यातील सर्व मुसलमानांचे प्रातिनिधिक चित्र स्पष्ट होत नाहीच. या पुस्तकात प्रथमच भारतीय मुसलमानांची माहिती मोठ्या प्रमाणावर एकत्र आलेली आहे, पण त्या माहितीत अजून विपुल प्रमाणात माहिती समाविष्ट करण्याची गरज आहे. या माहितीचा विस्तार मी जोडलेल्या निवडक संदर्भग्रंथांच्या यादीतील ग्रंथांमधून सापडू शकेल. उदाहरणार्थ, मूळच्या ग्रंथात पूर्व, पश्चिम आणि मध्यभारत, पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत आणि बलुचिस्तान येथील मुसलमानांच्याविषयी जवळजवळ काहीच माहिती नव्हती. या भागातील रहिवाशांच्यावर इस्लामचा परिणाम फारच थोडा झालेला आहे. परंपरागत धर्म व परंपरागत श्रद्धा यावर भर देणाऱ्या टोळ्या आजही आहेत. याकडे दुर्लक्ष करणारा कोणताही वृत्तांत भारतातील इस्लामचा समाधानकारक वृत्तांत मानता येत नाही. विशेषतः दक्षिणेतील माहिती देताना मी त्या चालीरीतींचे हिंदु धर्मातील आधारही पाहण्याचा प्रयत्न केला आहे.

स्थानिक मुस्लीम पाळीत असलेल्या पुष्कळ चालीरीतींमागील तत्त्वांचा मी नुसता उल्लेखच केलेला आहे. या प्रश्नाची तपशीलवार चर्चा करणाऱ्या ग्रंथांचा अधूनमधून संदर्भ म्हणून मी उल्लेख केला आहे. ज्या ठिकाणी कुराणच्या संदर्भाचा प्रश्न आहे तेथे साल ऐवजी रॉडवेलचा आधार मी प्रामुख्याने घेतला आहे. उर्दू शब्द रोमन लिपीत लिहिताना मी प्लॅटस् व ह्युजेस यांनी स्वीकारलेल्या प्रसिद्ध व परिचित अशा पद्धतींचा वापर केलेला आहे.

या जमा केलेल्या माहितीवरून सध्या असलेले भ्रम मोठ्या प्रमाणात दूर होण्यास प्रथमतःच मदत होईल असे मला वाटते. हिंदूंच्या रूढी, चालीरीती व श्रद्धा यांची तपासणी जेवढ्या बारकाईने आजवर झालेली आहे तसा अभ्यास मुसलमानांच्या बाबतीत झालेला नाही. ईश्वरी ग्रंथ कुराण आणि प्रेषिताची शिकवण समाविष्ट असलेले हादीस यांच्यामुळे सर्व मुस्लीम समाजात एकसंघपणा निर्माण झालेला आहे व इस्लाममध्ये कोणत्याही बदलाला अवकाशच नाही असा जो गैरसमज पसरलेला आहे तो दूर होण्यास या ग्रंथाची मदत होईल. उलट भारतातील इस्लाम तत्त्व व आचार याबाबत आपण सुसंघटीत रचना आहोत असे मानले जावे याबद्दल आढ्यता बाळगीत नाही. आणि भारतीय साम्राज्यात मुस्लिमांच्या चालीरीतीत आश्चर्यकारक तफावत दिसते. जुने धर्म व नवे धर्म या दोहोंच्या संघर्ष व संपर्काचा हा परिणाम आहे. या दृष्टीने धर्माचा तौलनिक अभ्यास करणाऱ्या जिज्ञासूंना पुष्कळशी माहिती सदर ग्रंथात मिळेल. तसेच या बाबींच्याकडे आजवर जे लक्ष पुरविण्यात आले त्यापेक्षा अधिक लक्ष पुरविणे आवश्यक आहे हेही पटेल. सदर ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणात मी, धर्म आणि त्यानंतर येणारे समाजशास्त्र यांच्या वृत्तांताचा अभ्यास करण्यासाठी आवश्यक असणारी माहिती संक्षेपाने दिली आहे.

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

निवेदन ........ ५

प्रास्ताविक ........ ७

जफर शरीफची प्रस्तावना ........ १०

डॉ. हेरक्लॉट यांची प्रस्तावना ........ १२

विलियम क्रूक यांची प्रस्तावना ........ १५

मुसलमान : सामान्य परिचय ........ २१

जन्म ........ ३१

जन्मोत्तर विधी ........ ४२

धर्मदीक्षा, वाढदिवस ........ ४७

सुन्ता ........ ५०

वाढ व शिक्षण ........ ५२

यौवनप्राप्ती ........ ५४

विवाह ........ ५६

मृत्यू ........ ७५

इस्लामची मूलतत्त्वे ........ ८६

प्रार्थना ........ ९६

नवस व देवोपहार: काही भारतीय मुस्लीम संत ........ १०१

धार्मिक इमारती व भक्तीची इतर साधने ........ १०७

मोहरमचा सण ........ १११

तेरह तेजी व आखरी चहारशम्बा सण ........ १३३

बारह वफात ; नवे वर्ष आणि वसंतोत्सव ........ १३५

पीर-इ-दस्तगीर यांचा उत्सव ........ १३८
संत जिंदा शाह मदार यांचा उत्सव ........ १४०
संत कादिरवलीसाहेब यांचा उत्सव ........ १४१
संत रजब सालार व संत सय्यद जलालुद्दीन, प्रेषितांचे स्वर्गारोहण; गूगा ........ १४३
शब-इ-बरातचा सण ........ १४५
रमजानचा सण ........ १४७
बंदा नवाज, ........ १५०
[बंदा नवाज, बंदा-परवर म्हणजे 'आपल्या सेवकांची प्रेमाने काळजी घेणारा, पोशिंदा'.] ........ १५०
गेसू दराजचा दीपोत्सव ........ १५०
ईद-उल-फितर उत्सव ........ १५१
बकर-ईद ........ १५३
जादू ........ १५५
ताईत आणि मंत्रतंत्र ........ १६५
जादूच्या पद्धती ........ १७३
जादूच्या साहाय्याने चोरांचा शोध ........ १७९
प्रवास : शुभाशुभ दिवस ........ १८१
सुफी पंथ व गुढवाद ........ १८७
पोषाख व शरीराची निगा ........ १९३
अलंकार ........ १९९
अन्न व पेय ........ २०१
मादक व उत्तेजक पदार्थ ........ २०४
खेळ ........ २०६

समारोप ............................................................................................ २०७

संदर्भ ग्रंथांची यादी........................................................................................... २०८

सूची-शब्दसंग्रह ..................................................................................... २१३

**प्रकरण पहिले**

# मुसलमान : सामान्य परिचय

इ.स. १९११ च्या भारतातील जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येत मुसलमानांची संख्या ६ कोटी ६० लक्ष किंवा भारतीय ब्रिटिश साम्राज्याच्या एकपंचमांश हिश्श्यापेक्षा अधिक होती. सर्व जगातील मुसलमानांची एकूण लोकसंख्या २२ कोटी असल्याचा अंदाज आहे. म्हणजे हिंदुस्थानातील मुसलमान एकूण मुस्लीम जगताच्या जवळजवळ तिसऱ्या हिश्श्याइतके आहेत. केवळ संख्येचा विचार केल्यास ग्रेट ब्रिटन ही जगातील सर्वश्रेष्ठ मुस्लीम शक्ती आहे. भारतीय प्रांतांच्यापैकी वायव्य सरहद्द प्रांत हा निर्णायक मुस्लीम बहुसंख्येचा प्रांत आहे. पंजाब आणि बंगाल या प्रांतांत मुसलमानांचे प्रमाण ५० टक्के आहे. हे प्रमाण मुंबई प्रांतात ५ मध्ये १, आग्रा व अवध या संयुक्त प्रांतात ७ मध्ये १ असे आहे. अशा रीतीने सध्या दिसणारी इस्लामची विभागणी ही मुसलमानांच्या उत्तर व पश्चिमेकडील विजयामुळे झालेली आहे. पश्चिम आशियातील इस्लामच्या मध्यवर्ती केंद्रापेक्षा भारतात मुसलमानांची संख्या अधिक आहे. या सर्वसामान्य नियमाला पूर्व बंगालमधील इस्लामची शक्ती व वाढता प्रभाव हा लक्षणीय अपवाद आहे. 'देशाच्या या भागात मुसलमान हे मुख्यतः पूर्व व उत्तरेकडील जिल्ह्यात आढळून येतात. बंगालच्या पठाण राजांच्या काळात (इ.स. १३३८ ते १५३९) या प्रदेशात जोमदार व यशस्वी प्रचार होता. या भागातील नागरिक धर्माने पूर्णपणे कधीही हिंदू नव्हते. मुसलमानांच्या प्रथम आक्रमणाच्या वेळी त्यांच्यापैकी बहुतेकांनी बहुधा अधःपतीत व हिणकस स्वरूपातील बौद्धधर्म अधिक पसंत केलेला होता. हे लोक हिंदूच्या दृष्टीने तिरस्कृत व घाणेरडे होते. मुस्लीम मुल्लांनी सर्व माणसे परमेश्वराच्या दृष्टीने समान आहेत अशी घोषणा केल्यावर या लोकांना मुल्लांच्या धर्मोपदेशाकडे आस्थेने वळावेसे वाटले. अर्थातच उपदेशाच्या बरोबर सत्तीचाही भाग कमी अधिक प्रमाणात यात होता.' [जनगणना अहवाल, भारत, १·१२८; बंगाल १९०१, १·१५६; तळटीप; १९११, १·२०२ तळटीपा.] बंगालमध्ये सध्या २ कोटी ४० लक्ष म्हणजे हिंदुस्थानातील एकूण मुसलमानांच्या ३६ टक्के मुसलमान आहेत.

दक्षिण हिंदुस्थानात चौदाव्या शतकाच्या आरंभी अलाउद्दीन खलजीपासून मुसलमानांच्या विजयाचा आरंभ झाला. पण राजधानीपासून इतक्या दूर अंतरावर असलेल्या विस्तृत प्रदेशावर नियंत्रण ठेवणे दिल्लीच्या राज्यकर्त्यांना अशक्य होते. यामुळे दक्षिणेत मुसलमानांची पाच राज्ये अस्तित्वात आली. दक्षिणेतील मुस्लीमविजय उशिरा आला, मूळ केंद्रापासून तुटला याचेही परिणाम झालेले आहेत. दिल्लीच्या मुस्लीम केंद्राखाली पुन्हा दक्षिण एकत्रित करण्याचा पहिला गंभीर प्रयत्न अकबराने केला. मोगलांची सत्ता वाढवण्याचे हे धोरण पुढे शहाजहानपर्यंत मंदपणे चालू होते. औरंगजेबाने हे धोरण गतिमान व सर्वसामर्थ्याने कार्यान्वित केले. त्याच्या परिणामी दक्षिणेत असलेल्या मुस्लीम सत्ता कोलमडल्या, पण मोगलांचा ताबा दीर्घकाळ टिकला नाही. अठराव्या शतकाच्या आरंभीच मराठ्यांच्या वाढत्या सत्तेसमोर मोगलांना नमावे लागले याचाही परिणाम दक्षिणेवर झालेला आहे. प्रचंड हिंदु लोकसंख्येच्या केंद्रभागी असलेली ही मुस्लीम राज्ये म्हणजे इस्लामी जगाच्या सरहद्दीवरील ठाणी होती. या भागात मुसलमानांची संख्या अल्प असल्यामुळे या दक्षिणेतील राजांना हिंदु प्रजेबाबत सहिष्णुतेचे व उदार धोरण स्वीकारणे भाग पडले. अशा प्रकारचे सध्या महत्त्वाचे असलेले दक्षिणेतील एक मुस्लीमराज्य म्हणजे हैद्राबाद हे होय. ८६ टक्के हिंदू व १० टक्के मुसलमान असे प्रमाण असलेल्या भागावर निजाम राज्य करतो. मद्रास प्रांतात तर मुसलमानांचे प्रमाण ६ टक्केच आहे. प्रचंड हिंदु

अनुक्रमणिका

लोकसंख्येच्या सहवासात असल्यामुळे असे दिसते की, दक्षिणेतील मुसलमानांत मूळ पूर्वधर्मातील निसर्गपूजन, भूतप्रेत-पिशाच पूजन पुष्कळ प्रमाणात शिल्लक आहे. उर्दूत लिहिलेल्या या पुस्तकातील मूळरूपात यांच्या विपुल नोंदी आहेत.

हिंदू लोकसंख्येच्या तुलनेत विचार केला तर इस्लामचा प्रचार सतत होत असला तरी त्याची गती मंद आहे. याबद्दलची विश्वसनीय आकडेवारी उपलब्ध आहे. [एकूण लोकसंख्येत मुसलमानांचे प्रमाण १९११ साली एका लाखात २१३ होते. हे प्रमाण १८८१ मध्ये १९७ होते. १९०१-११ या काळात मुसलमानांच्यामध्ये ६·७ टक्के झाली तर हिंदूंमध्ये ५ टक्के वाढ झाली. (जनगणना अहवाल, भारत १·१२८ तळटीप)] आरंभीच्या काळात धर्मांतर घडवून आणण्यासाठी विशिष्ट कर आणि सक्ती याचा वापर होत असे. विशेषतः औरंगजेबाच्या काळात जिझिया हा कर काफिरांच्यावर लादण्यात आला. अलीकडे मात्र प्रत्यक्ष असा प्रचार क्वचितच होतो. इस्लामचा प्रचार मुख्यतः इतर कारणांवर अवलंबून आहे. एकतर मध्य आशियातील मर्दानी जमातीशी संबंध आल्यामुळे व त्यांच्या सकस आहारामुळे-ज्यात सामान्यपणे कोणत्या तरी स्वरूपात मांस असते-मुसलमान लोक हिंदूंच्या मानाने अधिक सशक्त असतात पण मुख्य कारण असे दिसते की, मुसलमानांच्या सामाजिक रूढी त्यांचे जननप्रमाण हिंदूंच्यापेक्षा अधिक असण्यास अनुकूल अशा आहेत. मुसलमान सामान्यपणे शहरात राहतो त्यामुळे हिंदु शेतकऱ्यांच्या इतकी मुसलमानांना दुष्काळाची भीती नसते. त्यांच्यात विवाहविषयक बंधने कमी आहेत. त्यांच्यात अल्पवयात कमी लग्ने होतात. शिवाय विधवांना पुनर्विवाहाची मोकळीक आहे. त्यामुळे जननक्षम वयात मुस्लीम स्त्रियांचे प्रमाण हिंदु स्त्रियांपेक्षा अधिक असते. अलीकडच्या काळात मुसलमानांच्या संख्यावाढीची ही कारणे आहेत.

दिल्ली किंवा आग्रा यांसारख्या प्रसिद्ध मुस्लीम राजधान्यांमध्ये बहुसंख्य लोकसंख्या मुस्लीम आढळत नाही. कारण या विभागात मुसलमानांना जाट व रजपुतांच्यासारख्या कडव्या रूढीवादी आणि ब्राह्मण वर्चस्व असलेल्या समर्थ हिंदु जमातींशी सामना द्यावा लागला. स्वाभाविकच त्यामुळे धर्मांतरास फार मोठा अडथळा निर्माण झाला. दक्षिण बिहार, पाटणा, मोंघीर ही मुसलमानांची जुनी केंद्रे होती. पण या ठिकाणांच्यापेक्षा बंगाल, हिंदू व ब्राह्मण वर्चस्व असलेल्या उत्तर बिहारमध्ये मुसलमानांची संख्या अधिक आहे. अवधमध्ये आपणांस पुष्कळ मुस्लीम जमाती अशा आढळतात की, ज्या आपल्या मुस्लीम राज्यकर्त्यांनी एखाद्या यशस्वी वीराला किंवा पीर म्हणजे सत्पुरुषाला पडीत किंवा सरकारजमा अशा इनाम दिलेल्या जमिनी आपले मूळ असल्याचे सांगतात. दक्षिण हिंदुस्थानातील मुसलमानांचा मोठा भाग हा हीन जमातींमधून प्राचीन किंवा अर्वाचीन काळात इस्लाममध्ये आलेला आहे.

जरी संघटित असा इस्लामचा प्रसार मर्यादित प्रमाणात झाला आहे, पण अलीकडील धार्मिक ग्रंथांचे प्रकाशन व त्यांचा प्रसार, धर्मोपदेशक व त्यांचा प्रचार, शाळा व महाविद्यालये यांची स्थापना यांमुळे मुस्लीम समाजात चैतन्य निर्माण झालेले दिसते. वहाबी या इस्लामच्या निष्ठावंत कडव्या संप्रदायाचा संघटित धर्मप्रचार हा अपवादात्मक समजावा लागेल. पण त्यांच्यातीलही लढाऊ गटाचे सामर्थ्य संपत आल्यासारखे दिसते. बंगालमधील वहाबी आता स्वतःला वहाबी न म्हणवता अहले हदीस म्हणवतात. हे अहले हदीस सुन्नींच्या चार इमामांपैकी एकाही इमामाच्या शिकवणीचा स्वीकार करीत नाहीत. सुन्नी लोकांच्याप्रमाणे प्रार्थनेच्या वेळी बेंबीजवळ हातांची जुळणी न करता हे लोक प्रथम दोन्ही हात वर करतात व नंतर हातांची छातीशी घडी करतात. त्यामुळेच त्यांना 'रफियादीन' असेही म्हणतात. हे अहले हदीस "रूढिवादी मुसलमानांच्या कट्टर विरोधी आहेत ; रूढिवादी मुसलमान व त्यांच्या मशिदी आणि हिंदू व त्यांची देवळे यांच्यात फार मोठा फरक

आहे असे त्यांना वाटत नाही. शक्य झाल्यास रूढिवाद्यांच्या मशिदींचा ताबा घेणे आपले कर्तव्य आहे असे यांना वाटते. हा आपला हक्क बजावण्यासाठी पुष्कळ वेळा अहले हदीस न्यायालयातही गेले आहेत. नमाजच्या वेळी ते 'आमेन' हा शब्द मोठ्याने उच्चारतात. लग्न समारंभात गाणे बजावणे, वाद्य वाजविणे, मृतांना गोड पदार्थ वाहणे, संतांच्या कबरींना पूजनीय मानणे या बाबी यांच्यासाठी वर्ज्य आहेत. यांच्यातील काहींचे तर असे मत आहे की वाद्य व संगीताने विवाह अवैध ठरतो. मदिना येथील प्रेषिताच्या कबरीच्या दर्शनार्थ जाणाऱ्या यात्रेकरूंच्याकडे ते तुच्छतेने पाहतात. त्यांच्यापैकी काहीजण आपल्या हजच्या यात्रेत फक्त मक्केचे दर्शन घेऊन आल्याचे कळते." [जनगणना अहवाल, बंगाल १९११, १·२४८.] मुस्लीम समाजात धर्मांतर निश्चितपणे आढळते. पण हे धर्मांतर सामाजिक कारणांमुळे आहे. हिंदूंमधील बहिष्कृत समाज-जे अस्पृश्य म्हणून ओळखले जातात-त्यांना कडक ब्राह्मणी आधिपत्य मानणारे आपणाला तिरस्कृत मानतात असे वाटू लागले आहे. इस्लामने त्यांना धर्म स्वीकारानंतर समानतेची वागणूक दिली जाईल असे सांगितल्यामुळे त्यांनी इस्लामचा स्वीकार केला. हिंदुधर्मातून काढून टाकले गेलेल्यांनी इस्लामचा स्वीकार केल्यामुळे ही संख्या वाढली. त्यांच्यासमोर इस्लाम किंवा ख्रिश्चन धर्माचा स्वीकार असा पर्याय होता. अस्पृश्यांवर अशी धर्मांतर करण्याची पाळी येऊ नये म्हणून हिंदु धर्मातील काही उदारमतवादी मंडळींनी अलीकडे अस्पृश्योद्धाराचे कार्य हाती घेतले आहे ; पण अजून तरी त्यांना फारसे यश आलेले नाही.

महंमदबिन कासीमने इ.स. ७१२ मध्ये सिंधवर स्वारी केली तेव्हापासून इस्लामचा भारताशी संबंध आला. परंतु या अरब चळवळीचा जोर ती सिंधूच्या खोऱ्यात आल्यावर संपला. इ.स. ९९९ ते १०५० च्या दरम्यान महंमूद गझनीने हिंदुस्थानावर देवळे व मूर्ती फोडण्याच्या हेतूने स्वाऱ्या केल्या. हिंदुस्थान जिंकणे हा महमूद गझनीचा हेतू नव्हता. हिंदुस्थान जिंकण्याच्या हेतूने महंमद घोरीने इ.स. ११९१ मध्ये स्वारी केली. पृथ्वीराज चौहानने त्याच्याशी सामना दिला. पण महंमद घोरीने पुढचे वर्षीच्या लढाईत त्याला ठार मारले. महंमद घोरीच्या स्वाऱ्या त्याचा सेनापती कुतुबुद्दीन याने व्यापक केल्या. इ.स. १२०६ पर्यंत महंमदाच्या अनुयायांच्या ताब्यात पेशावरपासून बंगालच्या उपसागरापर्यंतचा उत्तर हिंदुस्थान आला. तेव्हापासून इ.स. १५२६ पर्यंत दिल्लीवर गुलाम, खलजी, तुगलग, सय्यद व लोदी या घराण्यांतील चौतीस राजांनी राज्य केले. परंतु त्यांचे उत्तर हिंदुस्थानातील आसन डळमळीत होते. तशातच मध्य अशियातील मोगल टोळ्या हिंदुस्थानवर सतत हल्ले करीत होत्या. तैमूरलंगरने इ.स. १३९८ मध्ये तुगलग राजांचा पराभव करून संपूर्ण दिल्ली शहर लुटले. सय्यद व लोदी राजे हे परकीय आक्रमकांच्या स्वाऱ्या व अंतर्गत लाथाळ्यांमुळे खिळखिळे झालेल्या राज्यावर आले. अशा अवस्थेत इ.स. १५२६ मध्ये पानिपत येथे बाबराने इब्राहीम लोदीचा पराभव करून मोगल साम्राज्याची स्थापना केली.

बाबराचा मुलगा हुमायून शूर होता. पण तो बाबराइतका धाडसी नव्हता, त्याला अफूचे व्यसन होते. शेरशहा सुरीने मोगलांच्या विरुद्ध देशी मुसलमानांचे नेतृत्त्व केले. त्याने हुमायूनचे भारतातील राज्य व्यापले तेव्हा हुमायूनला इराणमध्ये आश्रय घ्यावा लागला. शेरशहाच्या मृत्यूनंतर इ.स. १५५५ मध्ये हुमायूनने आपले गेलेले राज्य परत मिळविले. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा वडील मुलगा अकबर (इ.स. १५५६-१६०५) हा गादीवर आला.

अनुक्रमणिका

मोगल साम्राज्याची स्थापना, भरभराट व विनाश कसा झाला याविषयी येथे विस्ताराने लिहिण्याची गरज नाही. थोडक्यात सांगायचे म्हणजे अकबर, जहांगीर, शहाजहान व औरंगजेब या चार मोगल सम्राटांनी इ.स. १५५६ ते १७०७ या काळात राज्य केले. अकबराने नवा प्रदेश जिंकणे, जिंकलेल्या प्रदेशावर ताबा ठेवणे, करवसुली इत्यादी बाबींवर आपले लक्ष केंद्रित केले होते. त्याने रूढिवादी इस्लामचा त्याग करून दिनेइलाही या नव्या धर्माची स्थापना करण्याचे लक्ष्य ठरविले. त्याने हिंदु प्रजाजनांना सहानुभूतीने आपलेसे केले आणि मुस्लिमांचा कडवेपणा कमी केला. जहांगीर व शहाजहानच्या काळात मोगल साम्राज्याचे वैभव टिकले; दरबारातील समारंभ थाटामाटाने साजरे होत होते, आणि सुंदर इमारती बांधण्यात आल्या हे खरे असले तरी प्रशासन मात्र कार्यक्षम नव्हते. या काळात हिंदूंचा छळ होत नव्हता असे नाही परंतु राजकन्यांबरोबर शाही विवाहामुळे गुलाम प्रजाजनांबरोबर सलोखा स्थापन करण्यात येत असे. याचा परिणाम असा झाला की, काबूल व मध्य अशियातून येणाऱ्या लोकांचा नव्या सैन्यभरतीत खंड पडल्यामुळे जे नुकसान होत असे ते, लढवय्या रजपुतांच्या मोगल सिंहासनावरील निष्ठेमुळे भरून निघत असे. औरंगजेबाने इतर धर्मीयांशी सलोखा करण्याचे धोरण सोडून दिले आणि हिंदूंची देवळे व मूर्ती फोडण्याचा सपाटा लावला. इस्लामेतरांवर जिझियासारखा कर लादला. या गोष्टीमुळे मोगलांपासून राजपूत दुरावले आणि दक्षिणेत मराठा सत्तेचा उदय झाला. इ.स. १७०७ मध्ये औरंगजेबाचा मृत्यू झाला. इ.स. १७५७ मधील प्लासीच्या लढाईपर्यंत मोगल साम्राज्य कसेबसे तग धरून होते. प्लासीच्या लढाईनंतर बंगालमध्ये ब्रिटिशांची सत्ता स्थापन झाली आणि त्याबरोबरच मोगल साम्राज्याचा शेवट झाला.

या धावत्या ऐतिहासिक आढाव्यावरून हिंदुस्थानातील सध्याची इस्लामची स्थिती लक्षात येण्यासारखी आहे. आपले पूर्वज एके काळी या भूमीचे राजे होते असे मुसलमान मानतात. इस्लामचा जो काही प्रभाव शिल्लक आहे त्याचे मुख्य कारण हेच आहे. प्रशासनातील त्यांच्या कौशल्यामुळे ते ब्रिटिश सरकारचे अधिकारी म्हणून कार्यक्षम ठरतात. हिंदुस्थानातील मुसलमानांत देशी जमाती व वायव्य सरहद्द प्रांतापलीकडील प्रदेशातून आलेले लोक यांच्या रक्ताचे मिश्रण आहे. मूळच्या, वंशाने शुद्ध असणाऱ्या मुसलमानांचीही वांशिक शुद्धता हिंदूंबरोबरच्या विवाहामुळे हळूहळू कमी झाली. मुसलमानांमधील काही घराणी आम्ही वांशिक शुद्धता राखली असा दावा करीत असली तरी बहुसंख्य मुसलमान, त्यातल्या त्यात बंगाल व दक्षिण हिंदुस्थानमधील मुसलमान वंशाने वस्तुतः चक्क हिंदू आहेत.

परकीय मुसलमान व देशी मुसलमान यांच्या सतत एकीकरणाचा कोणता परिणाम झाला आहे हे या पुस्तकातील दक्षिण हिंदुस्थानातील रूढींचे विवेचन करताना सांगितले आहे. इराण, अरबस्थान व इजिप्त येथील परंपरागत इस्लामच्या रुढींमध्ये आणि हिंदुस्थानातील इस्लामच्या रूढींमध्ये अनेक महत्त्वाचे फरक आहेत. हिंदुस्थानातील जादूटोण्याच्या पद्धती प्रामुख्याने कुराण, शरियत किंवा प्रेषित व धर्मगुरूंनी सांगितलेली जीवनपद्धती व हदीसमधील सुन्नत यास चिकटलेल्या आहेत. इस्लामचा स्वीकार केलेले उत्तर हिंदुस्थानातील राजपूत, जाट व इतर जमातींचे लोक रूढ इस्लामबरोबरच विवाह, मृत्यू व वारसा याबाबतीत हिंदुधर्माचे अनुसरण करतात. ते संकटकाळी स्थानिक ग्रामदेवतांची भक्ती करतात. हे झाले हिंदूधर्माचा प्रभाव असलेल्या प्रदेशाबाबत. पण वायव्य सरहद्द प्रांतात हिंदुधर्माचा प्रभाव जवळजवळ नाही तरीही तेथील प्राचीन सर्वात्मवादाला आत्मसात करण्यात इस्लामला मोठ्या प्रमाणात अपयश आले आहे. ब्राहूई, बलुची व अफगाण टोळ्यांतील लोकांना त्यांच्या धर्माच्या फक्त ढोबळ बाबींचे ज्ञान आहे. धर्माच्या बाबतीत या टोळीवाल्यांचा

विश्वास परमेश्वर, प्रेषित, मृतोत्थान व अखेरचा दिवस यापुरताच मर्यादित आहे. त्याला कुराण असल्याचे माहीत आहे पण अरबी भाषेचे ज्ञान नाही आणि कुराणचा अर्थ सांगणारे ज्ञाते यांची उणीव असल्यामुळे कुराणमध्ये काय आहे याची त्याला कल्पना नाही. प्रत्येक गोष्ट अपरिहार्यपणे घडते हे त्याला माहीत आहे पण परमेश्वराकडून पूर्वनियोजितपणे यांपैकी किती घडते असे त्याला वाटते ते सांगणे कठीण आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे त्याचे वागणे इस्लामला सोडून असते. भक्ती करण्यायोग्य एकटा परमेश्वरच आहे असे तो दररोज म्हणत असला तरी न चुकता संत किंवा संतांच्या कबरीची भक्ती करतो. खरे म्हणजे तो संतावर सद्गुणांचा आरोप करतो. संत आपत्ती टाळू शकतात, रोग बरा करू शकतात, त्यांच्या आशीर्वादाने निपुत्रिकांना मुले होतात, शिकाऱ्यांना शिकार मिळते ; इतकेच नव्हे तर ते मृताच्या अवस्था सुधारू शकतात अशी त्याची श्रद्धा असते. त्यामागील मुख्य भावना अशी दिसते की, माणूस फार पापी असल्यामुळे तो सरळ परमेश्वराजवळ येऊ शकत नाही म्हणून सत्पुरुषाची मध्यस्थी मिळविली पाहिजे. संतांच्या कबरी पाहिल्यास तेथे दगड, झाडाला बांधलेले केस, वन्य प्राण्यांची शिंगे, घंट्या इत्यादी क्षुल्लक गोष्टी दिसतात. या वस्तू भक्तांनी नवस फेडण्याकरिता कबरीजवळ ठेवलेल्या असतात. एखाद्या स्त्रीस नवसाने मूल झाल्यास ती नवस फेडण्याकरिता संताच्या कबरीजवळ जाते. तेथे ती नवस बोलल्याप्रमाणे मुलाचे जावळ काढते, मुलाचे कपडे वाहते. असे करण्यामागील तिचा हेतू त्या साधू किंवा साध्वीला मुलाचा आशीर्वाद लाभावा हा असतो. आणखी शिकार मिळावी म्हणून शिकारी आपण मारलेल्या हरणाची शिंगे कबरीला वाहतो. आजारी लोक कबरीजवळील वस्तू आपल्या शरीराच्या वेदना होणाऱ्या भागाला घासतात, त्यामुळे आपले दु:ख नाहीसे होईल अशी त्यांची श्रद्धा असते. [जनगणना अहवाल, बलुचिस्तान, १९०१, १·३९.]

बंगालमध्ये अलीकडील काळात मूर्तिपूजेविरुद्ध जी चळवळ झाली तिच्यापूर्वी खालच्या वर्गातील मुसलमान लोक दुर्गापूजा व इतर हिंदू-सणांमध्ये भाग घेत असत. आजही ते शुभाशुभ दिवस, शकुन-अपशकुन, लग्नाची तिथी हिंदू पंडितांना विचारून ठरवितात. साथीच्या रोगाच्या वेळी ते सीतलादेवी आणि रक्षाकाली यांसारख्या हिंदूदेवतांची भक्ती करतात. बिहारमध्ये मुसलमान सूर्यदेवतेची उपासना करतात व त्यांच्यापैकी काहीजण तर हिंदूंच्या देवळात दर्शनाला जातात. संत व पीर यांची मोठ्या प्रमाणावरील भक्ती हीच मूळ इस्लामपासूनची महत्त्वाची च्युती होय. [जनगणना अहवाल, भारत १९११, १·१७६ तळटीपा.] मध्यप्रांतातील अहीर मुसलमान हिंदु पद्धतीने लग्न लावतात व शेवटी काझीला बोलावतात, काझी इस्लामी प्रार्थना म्हणतो आणि मेहेरच्या रकमेची नोंद करून ठेवतो. [रसेल, २·२८८.] काही मुसलमानांनी ज्याप्रमाणे हिंदुधर्मातील काही रूढी व देवतांची उपासना उचलली आहे त्याप्रमाणे काही हिंदूंनीही इस्लाममधील रूढी व संतांची उपासना उचललेली दिसते. बिहारमधील कुर्मी नावाचे हिंदु शेतकरी मोहरमचा सण साजरा करतात व रमजानच्या वेळी उपवास करतात. [रिस्ले, ट्राइब्स अँड कास्ट्स ऑफ बेंगाल, १·५३४] मद्रासमधील लंबाडी लोक लग्नात आपल्या जमातीतील विधींबरोबर मुस्लीम विधिही करतात. [थर्स्टन, कास्ट्स अँड ट्राईब्स, ४·२३१ तळटीप.] मद्रास राज्यातील तंजोर जिल्ह्यात कादिरवलीसाहेबांची कबर आहे. या कबरीच्या दर्शनाला अनेक हिंदू स्त्रिया जातात. नागोर मशिदीला हिंदु राजघराण्यातील स्त्रिया मोठ्या भेटी पाठवतात. उत्तर हिंदुस्थानात संत सालार मसूदच्या (त्यांना गाझी मियाँ असेही म्हणतात) असंख्य भक्तांत बहुसंख्य हिंदू आहेत. मोहरममधील ताबुताच्या मिरवणुकीत अनेक ठिकाणी बरेच हिंदू भाग घेतात. हिंदू लोकांच्यामध्ये या श्रद्धांच्या झालेल्या सरमिसळीचे कारण हिंदुधर्माच्या वैशिष्ट्यात सापडते. ते वैशिष्ट्य म्हणजे हिंदुधर्म कोणत्याही संताची भक्ती करतो, इतकेच नव्हे तर हिंदुबरोबर एखाद्यास युद्धात वीरगती प्राप्त झाली असेल तर त्याचीही भक्ती करतो ; ज्याची श्रेष्ठ शक्तींबरोबरची वकिली

परिणामकारक मानली जाते. परंतु हे असेसुद्धा दर्शविते की दोन्ही धर्मांतील खालच्या वर्गातील लोकात जवळीक आहे.

मूळ इस्लाम आपल्या भक्तात जातिभेद मानीत नाही, तत्त्वतः सगळे मुसलमान बांधव आहेत असे तो मानतो. अरबी व इराणी वंशांतील काही कुटुंबांत जातिबाह्य लग्ने करू नयेत असा नियम असला तरी इतर जमातीबरोबर विवाह करण्यास कोणतीही आडकाठी नाही. परंतु हिंदुधर्मातून इस्लाममध्ये आलेल्या लोकांच्या मनावर जातिअंतर्गत व जातिबाह्य विवाहाच्या कायद्यांचा अजूनही प्रभाव आहे. ते आपल्या जमातीबाहेरच्या लोकांबरोबर खाणेपिणे वर्ज्य करतात. [विशेषतः बंगालमध्ये जे आपला वंश अरब किंवा परदेशी असल्याचा दावा करतात-जे अशरफ या नावाने ओळखले जातात-ते आणि स्थानिक धर्मांतरित किंवा सामान्य लोक (अज्लाफ) यांच्यामधील फरक काळजीपूर्वक ओळखला जातो.]

हिंदुस्थानातील मुसलमान मुख्यतः चार गटात विभागलेले आहेत. ते गट म्हणजे सय्यद, शेख, मोगल, पठाण हे होत.

सय्यद या शब्दाचा अर्थ मालक असा आहे. सय्यद हे लोक पीरजादा 'संताचे वारस' म्हणूनही ओळखले जातात. ते मुस्लीम सैन्याबरोबर हिंदुस्थानात धर्मशिक्षक, शिपाई म्हणून आले. आपण प्रेषिताची कन्या फातिमा हिच्या कुळाचे आहोत असे त्यांचे म्हणणे आहे. ते पुढील गोष्ट सांगतात—देवदूत जॅब्रियल जेव्हा परमेश्वरी संदेश घेऊन आला तेव्हा त्याने मुहंमद, अली फातिमा, हसन आणि हुसेन या पंजतन-इ-पाकवर म्हणजे 'पाच पवित्रांवर' एक चादर पांघरली आणि तो म्हणाला, 'हे महंमदा! परमेश्वराची तुझ्यावर कृपा आहे. तू व तुझ्याबरोबरच्या चौघांची संतती यापुढे सय्यद होईल, अशी परमेश्वराची आज्ञा आहे.' सध्याच्या सय्यदांपैकी कितीजण खऱ्या परकीय वंशाशी संबंधित आहेत हे सांगणे कठीण आहे. पण त्यांची संख्या कदाचित थोडी असावी. कारण 'गेल्या वर्षी मी जुलाहा (विणकर) होतो, या वर्षी मी शेख आहे आणि किंमती वाढल्या तर मी पुढच्या वर्षी सय्यद होईन' अशी एक म्हण आहे. शेतकरी म्हणून सय्यद लोक आळशी व उधळे आहेत. ईशचिंतन आणि वैराग्य हेच गुण त्यांच्यात प्रामुख्याने दिसतात ही ईश्वरभक्ती सूफी मताचा परिणाम आहे. काहीजण सूफी मताचा उगम ख्रिश्चन धर्मात शोधतात. सय्यदांपैकी पुष्कळजण श्रीमंत कुटुंबात पीर किंवा आध्यात्मिक गुरू म्हणून अधिकाऱ्याच्या जागा मिळवतात. आपला उदरनिर्वाह ते भिक्षा व देणग्यांवर चालवतात. त्यांच्यातील पुरुष आपल्या नावामागे सय्यद किंवा मीर म्हणजे अमीर 'नेता' किंवा नावाच्या शेवटी शाह 'राजकुमार' असा शब्द लावतात, तर स्त्रिया बेगम 'सभ्य स्त्री' असा शब्द लावतात. इ.स. १९११ च्या जनगणनेसार सय्यदांची संख्या १५ लक्ष असून ते ब्रह्मदेश वगळता सर्व भारतभर विखुरलेले होते.

शेख म्हणजे पूज्य नेता. शेख या संज्ञेत फक्त शुद्ध अरब वंशाच्या लोकांचा समावेश करावयास पाहिजे. हे नाव विशेषकरून कुरेश टोळीच्या तीन शाखांना लावण्यात येते, ज्यांमधून प्रेषित हे उदयाला आले. त्या तीन शाखा म्हणजे सिद्दीकी, फारूकी आणि अब्बासी या होत. सिद्दीकी शाखेचे लोक हे सिद्दीक या नावाने ओळखल्या जाणाऱ्या पहिला खलिफा अबुबकर यांचे आपण वंशज आहोत असे सांगतात. फारूकी ही शाखा दुसरा खलिफा उमर-अल-फारूक यांना तर अब्बासी ही शाखा प्रेषितांचा चुलता अब्बास यांना आपला मूळ पुरुष मानते. परंतु सध्या शेख हे नाव सन्मानदर्शक उपाधी म्हणून लावले जात आहे. हिंदुधर्मातून इस्लाममध्ये आलेले लोक स्वतःला सामान्यत्वे शेख म्हणवतात. इ.स. १९११ च्या जनगणनेनुसार शेख लोकांची संख्या ३ कोटी २० लक्ष होती. याचा अर्थ असा आहे की, बहुसंख्य मुसलमानांचा समावेश या जमातीत आहे.

अनुक्रमणिका

मोगल हे नाव मोगल वंशाच्या लोकांना लावतात. या वंशाने चंगीझखानानंतर हिंदुस्थानवर स्वाऱ्या केल्या. बाबराने हिंदुस्थानात मोगल साम्राज्याची स्थापना केली. सध्या मोगल हे नाव सर्वसाधारणपणे बाबराचे अनुयायी किंवा त्यांच्या वारसांच्या प्रेरणेने हिंदुस्थानात आलेले लोक यांना लावण्यात येते. त्यांच्यात इराणी आणि चुगताई असे दोन गट आहेत. बाबर हा चुगताई होता. बर्नियरच्या मते औरंगजेबाच्या काळी मोगल हे नाव 'गोरे लोक, परदेशातील लोक आणि मुसलमान' यांना लावण्यात येत होते. पंजाबमधील मोगल बहुधा मध्य आशियन वंशाचे असावेत, अर्थात त्यांच्यात इतर रक्ताचे मिश्रण नाही असे नाही. परंतु शेख या नावाप्रमाणेच, शेती करणाऱ्या ठराविक जमातीचे लोक आणि अलीकडील काळातील धर्मांतरित हे स्वतःला मोगल हे नाव लावतात. गुजरातमधील बहुतेक मोगल शिया पंथाचे आहेत ; इराणी मोगलांचा तेथे वेगळा समाज आहे. त्यांची म्हणजे इराणी मोगलांची प्रार्थनास्थाने वेगळी आहेत आणि ते फक्त आपल्या समाजांतर्गत विवाह करतात. त्यांनी गुजरातमधील मुसलमानांच्या मानाने फार थोड्या हिंदुरुढींचा स्वीकार केला आहे. मोगल पुरुष हे आपल्या नावामागे मिर्झा, अमीरजादा तर स्त्रिया खानम् ही उपाधी लावतात. त्यांची संख्या १९११ च्या जनगणनेनुसार ३ लक्ष ५० हजार होती. आणि ते हिंदुस्थानभर सर्वत्र आढळतात.

पुश्त भाषा बोलणाऱ्या लोकांना पशताना किंवा पखताना म्हणतात. पठाण हे नाव पशताना किंवा पखतानाचा अपभ्रंश आहे. ही भाषा तशी वायव्य सरहद्द प्रांतापलीकडील प्रदेश आणि सिंधुनदीच्या पलीकडील प्रदेशात डेराइस्माईलखानपर्यंत बोलली जाते. पण पठाण हे नाव विशेष करून वायव्य सरहद्दीवरील टोळ्यांतील लोकाना लावण्यात येते. ही संज्ञा चुकीने इ.स. १२०६ ते १४५० या काळातील दिल्लीच्या सुलतानांना लावण्यात आली. खरे म्हणजे बहलोल लोदी (इ.स. १४५०-८९) हा पहिला पठाण किंवा अफगाण सुलतान होता. दिल्लीचे इतर पठाण राज्यकर्ते म्हणजे शेरशहासुरी व त्याचे कुटुंबीय हे होते. पठाण विशेषतः दुराणी शाखेचे लोक हे हिब्रू वंशाचे आहेत असे म्हटले जाते. पण तिचे मूळ शुद्धपणे वाङ्मयीन आहे. ह्या व्युत्पत्तीचा मागमूस जहांगीरच्या काळात खानजहान लोदीने संकलित केलेल्या 'मखजन-इ-अफगानी'या ग्रंथात लागू शकतो. अतिप्राचीन काळातल्याप्रमाणे सध्या पठाण नावाखाली भटक्या व्यापाऱ्यांच्या टोळ्या खिंडी खुल्या झाल्या म्हणजे हिंदुस्थानात येत असतात.

कमी महत्त्वाच्या मुस्लीम गटांपैकी पुढीलांचा उल्लेख केला पाहिजे. एक म्हणजे नवायत. नवायत म्हणजे इस्लाममध्ये 'नव्याने आलेले लोक' अशी समजूत आहे. परंतु, हे नाव अरबी कुरेश टोळीच्या नाईत या शाखेवरून आले असण्याचा अधिक संभव आहे. त्यांच्याबद्दल असे म्हटले जाते की, त्यांना आठव्या शतकामध्ये इराकमधून हाकून लावण्यात आले व ते दक्षिण हिंदुस्थानात आले. पश्चिम किनारपट्टीत राहणाऱ्या नवायतांनी हिंदुस्थानी लोकांबरोबर बेटीव्यवहार करणे टाळून आपल्या रक्ताची शुद्धता राखली आहे. काही काळपर्यंत तर त्यांनी वरिष्ठ वर्गीय कुटुंबाशीही सख्य करण्याचे नाकारले होते.

लबाई हे नाव अरब या शब्दाचे अपभ्रंश रूप आहे असे म्हणतात. मद्रास राज्यातील तंजोर व मदुरा या जिल्ह्यांतील व्यापार व पानमळे करणाऱ्या वर्गाला लबाई म्हणतात. ते धर्मांतरित हिंदू किंवा द्रवीड असून त्यांच्यात अरब रक्ताचेही काही प्रमाणात मिश्रण आहे. ते आपले मूळ नवायताप्रमाणेच असल्याचा दावा करतात. पण नवायतांच्या मते लबाई हे त्यांच्या घरगुती गुलामांच्या वंशाचे आहेत.

मोपला हे नाव खरे म्हणजे माप्पीळ्ळा असे आहे. ही सन्मानदर्शक उपाधी आहे आणि तिचा अर्थ 'श्रेष्ठ मुले' असा असल्याचे म्हणतात. पश्चिम किनाऱ्यावर मोपलांची मिश्र रक्ताची जमात आहे. या जमातीत मलबारमधील गुलामांची टोळ्या धर्मांतर करून सतत भरती होतात. मोपला लोकांत शिया व सुन्नी या दोन्ही शाखा आहेत. ते अधूनमधून धर्मवेडाने झपाटले जातात. अशा झपाटलेपणात त्यांनी आपल्या हिंदुबांधवांवर हल्ले केले आहेत, इतकेच नव्हे तर ब्रिटिश फौजांबरोबर लढण्याचेही धाडस केले आहे.

गुजरात आणि मध्य व पश्चिम हिंदुस्थानातील बोहरा हे इस्माईलिया पंथाचे आहेत. ते मूसा-अस्-सादिकच्या ऐवजी इस्माईल-इब्न-जफरला खरा इमाम मानतात. ते अस्तित्व-अनास्तित्व, बुद्धी-बुद्धीहीनता, शक्ती-असमर्थता या गुणांचा संबंध परमेश्वराशी जोडण्याचे नाकारतात. नावे आणि गुणदेखील परमेश्वराने निर्माण केले अशी त्यांची श्रद्धा आहे. सध्या बोहरा लोकांत शिया व सुन्नी या दोन्ही शाखांचे लोक आहेत. शहरात व्यापार करणारे बोहरा सुन्नी तर खेड्यातील शेती करणारे बोहरा शिया आहेत. अकराव्या शतकातील अन्हीलवाडच्या राजांनी ज्या धर्मप्रचारकांचे आपुलकीने स्वागत केले ते धर्मप्रचारक आपले मूळ पुरुष आहेत असे शिया शाखेचे बोहरा मानतात. बोहरा लोकात सुन्नी शाखेची स्थापना स्थानिक मुसलमान राजांच्या प्रभावामुळे झाली. शिया बोहरांचे नेते आगाखान हे आहेत. आगाखान यांना मुसलमानांत, त्यातल्या त्यात पश्चिम हिंदुस्थानातील मुसलमानांत फार मान आहे. आगाखान हे आगाशाह हसन अली यांचे वारस आहेत. आगाशाह हसन अली हे मूळ इराणचे. ते इ.स. १८४५ मध्ये हिंदुस्थानात आले आणि या जमातीचे नेते म्हणून मान्यता पावले.

खाजा किंवा खोजा जमातीचे लोकसुद्धा आगाखान यांना आपले नेते मानतात. खाजा या शब्दाचा अर्थ 'सन्माननीय धर्मांतरित' असा आहे. हसन-इब्न-अस्सबाह यांनी फिदाई किंवा फिदवाई या नावाखाली जी तथाकथित असासीन, हशानीन यांची म्हणजे हाशीश व गांजाचे सेवन करणाऱ्यांची संघटना स्थापन केली होती त्यापासून खोजा आले असावेत असे म्हणतात. हसन-इब्न-अस्सबाह यांचा मृत्यू इ.स. ११२४ मध्ये इराणमध्ये अलमूत या ठिकाणी झाला. त्यांचे मूळपुरुष 'पर्वतातील साधू' या नावाने मध्ययुगातील अनेक दंतकथांचे विषय होते.

मोलेसलाम यांनी आपले नाव मौला-इ-इस्लाम यावरून घेतले असे म्हणतात. ते मूळचे राजपूत आहेत. त्यांनी अहमदाबादच्या प्रसिद्ध महंमद बेगडाच्या काळात (इ.स. १४५९-१५१३) इस्लामचा स्वीकार केला. त्यांची लग्ने वरिष्ठवर्गीय मुसलमानांशी होतात परंतु मुख्य पुरुषाचा मुलगा राजपूत मुलीबरोबर विवाह करू शकतो असे म्हटले जाते. ते लग्नविधीसाठी काझी व मौलवी आणि भाट, चारण व ब्राह्मणपुजारी यांना बोलावतात. [फॉर्बिस, रासमाला, २६४; बी. जी. ९, पार्ट २, ६८]

मोमना लोक आपले नाव मुमीन म्हणजे श्रद्धावंत यावरून सांगतात. ते रुढिवादी शिया मुसलमान आहेत. ते मूळचे गुजरातमधील हिंदू होते. इस्माईलिया धर्मप्रचारकांनी त्यांना इस्लाममध्ये आणले परंतु अहमदाबादमधील मोमनालोक काही वेळा स्वतःला हिंदू नावे लावतात आणि लग्न लावण्यासाठी ब्राह्मण व काझीला बोलावतात. त्यांच्या स्त्रिया कुटुंबातील एखाद्याचा मृत्यू झाल्यास हिंदूप्रमाणे शोक करतात.

मुसलमानांमध्ये सुन्नी व शिया हे दोन मुख्य पंथ आहेत. सुन्नी या शब्दाचा अर्थ 'ईश्वराने आखून दिलेल्या मार्गाने जाणारा, परंपरेनुसार वागणारा' असा आहे तर शिया या शब्दाचा अर्थ 'अनुयायी' म्हणजे प्रेषिताचे चुलत भावंड व जावई अली यांचे अनुयायी असा आहे. शिया लोक अलीला पहिला न्याय्य इमाम मानतात. ईश्वराने प्रकाशित केलेले व पापापासून आरक्षित (मासूम) असे अली हे सत्पुरुष होते असे ते मानतात. आणि त्यामुळे सुन्नी लोक मानीत असलेल्या अबुबकर, उमर आणि उस्मान या पहिल्या तीन खलिफांना ते मानीत नाहीत. म्हणून सुन्नींना चार यारी म्हणजे चार खलिफा मानणारे तर शियांना तीन यारी म्हणजे तीन खलिफा मानणारे असे म्हणतात. शियांना इमामिया असेही म्हणतात. तर सुन्नी हे शियांना राफिजी म्हणजे 'सत्य सोडून दिलेले' असे म्हणतात. शियांच्या बारा इसमांची यादी अलीपासून सुरू होते आणि महंमद-अल-अस्करी या इमाम माहिदीच्या नावाने संपते. महंमद-अल-अस्करी हे सध्या जगातून अदृश्य आहेत, पण प्रलयकाली ते प्रकट होतील अशी समजूत आहे. शिया लोकांच्या धार्मिक जीवनात परंपरा, श्रद्धा, चालीरीती यांना फार महत्त्व असते. या परंपरा, श्रद्धा इत्यादींचे उगमस्थान अली, फातिमा आणि त्यांची मुले हसन व हुसेन हे आहे. हे चौघे आणि प्रेषित मिळून 'पवित्र पाच' होतात. अलीला ते प्रेषित, धर्मगुरू व ईश्वररुपही मानतात. या दोन पंथांत असलेले मतभेद अंशतः धार्मिक व अंशतः सामाजिक स्वरूपाचे आहेत. सुन्नी लोक यात्रेसाठी मक्का, मदिना या पवित्र शहरी जातात तर शिया लोक करबला किंवा मश्शद-उल-हुसेन या हौतात्म्याचे स्थळ असलेल्या ठिकाणी जातात. हे ठिकाण बगदादच्या नैऋत्येस ५० मैल व युफ्राटीस नदीच्या पश्चिमेस सहा मैलांवर आहे. शिया लोक मुश्ताहीद म्हणजे धर्माचे भाष्य करण्यास अधिकारी असलेले विद्वान यांना मानतात. सुन्नींच्या मते इस्लामच्या सध्याच्या अवस्थेत मुश्ताहीदची नेमणूक केली जाऊ शकत नाही. शिया लोक मोहरमचा सण साजरा करतात आणि या सणात फक्त विशेष कडवे नसलेले सुन्नी भाग घेतात. शियांचे काही पंथ 'अहलूल किताब' -'ईश्वरी पुस्तक असलेल्या लोकां' मध्ये 'मग' या अग्निपूजकांचा समावेश करतात. शिया लोक आत्मरक्षणाचे तत्त्व (तकिया) मान्य करतात. म्हणजे छळ, गांजणूक टाळण्यासाठी आपल्या धार्मिक समजुती कमी करणे अगर नाकारणे समर्थनीय आहे असे त्यांचे म्हणणे आहे. [याच्या पुष्ट्यर्थ ते कुराणमधील (३, २७) हा उतारा उद्धृत करतात. त्याचा अर्थ पुढीलप्रमाणे लावण्यात येतो. 'तुमच्या अंतःकरणात जे आहे ते तुम्ही लपवा अगर प्रकट करा, परमेश्वर ते जाणतो.'] प्रार्थनेतील फरकाबाबत हे नमूद केले पाहिजे की, शिया प्रार्थनेला बोलावताना (बाँग) किंवा अझॉला 'सत्कार्यासाठी या, सत्कार्यासाठी या' हे अधिक शब्द लावतात आणि 'अल्लाशिवाय दुसरा ईश्वर नाही' हे शेवटचे वाक्य दोनदा उच्चारतात; सुन्नी हे वाक्य एकदाच उच्चारतात. प्रार्थनेसाठी उभे असताना शिया लोक आपले हात बेंबी किंवा छातीवर ठेवीत नाहीत तर शरीराच्या दोन्ही बाजूला ठेवतात. ते सामान्यत्वे आशीर्वचन (सुभान) वगळतात आणि प्रणिपात करताना (तकबिर-इ-रुक) 'आणि अल्लाच्या स्तुतीसह' हे अधिक शब्द लावतात. कलमामध्ये ते महंमदासह अलीही रसूल आहे असे म्हणतात. [पंजाबच्या शियांच्या समजुतीसाठी, रोज, १·५७४ तळटीपा. मुलाहिदा, काफीर' किंवा चिरागकुश यांच्या आधारांसाठी, इलियास-रोज, २·२७९.]

उत्तर हिंदुस्थानमध्ये शिया व सुन्नी यांचे संबंध मित्रत्त्वाचे नसले तरी परस्परांत सहिष्णुता दिसते. शियांच्या मोहरमच्या सणांना सामान्यत्वे विरोध होत नाही. आणि सुन्नी केव्हा केव्हा गौणत्वाने का असेना, या मिरवणुकांत भाग घेतात. परंतु इतर ठिकाणी मात्र तंग वातावरण निर्माण झाल्याची आणि प्रासंगिक संघर्ष घडल्याची उदाहरणे आहेत. इ.स. १७०९ मध्ये लाहोरमध्ये खुतब्याच्या प्रार्थनेत 'अली परमेश्वराचा संत आणि प्रेषिताचा वारस आहे' अशी वाढ करावी अशी आज्ञा शियांनी काढली होती. त्यामुळे लाहोरमध्ये गंभीर अडथळे निर्माण झाले होते. इ.स. १८७२ मध्ये शिया व सुन्नी यांच्यात मुंबई शहरात मोठे दंगे झाले होते आणि पुन्हा इ.स.

१९०४ मध्ये मोहरमच्या काळात दंगे झाले. ताबूत काढणे व बुडविणे याच्या नकारात हे दंगे कळसाला पोचले. दक्षिण हिंदुस्थानात सुन्नी आणि गैर-इ-माहिदी या पंथाचे लोक यांच्यात संघर्ष झाले.

सुन्नी लोकांच्यामध्ये धर्मशास्त्राचा अर्थ लावण्याचा चार परंपरागत विचारधारा आहेत: (१) हनीफी. या विचारधारणेची स्थापना अबू हनीफ यांनी केली. या विाचारधारेचे अनुयायी तुर्कस्तान, मध्य आशिया व उत्तर हिंदुस्थानमध्ये आहेत. ही विचारधारा धर्मशास्त्राचा अर्थ लावताना धर्मतज्ज्ञांच्या तर्कबुद्धीला बरेच प्राधान्य देते. तिला 'धर्म व राज्य यांचा रूक्ष पक्ष, धर्माधर्मविवेचकत्वाची पद्धत असे म्हटले जाते. ही विचारधारा शास्त्रीय पद्धतीने नियमांचा एक संच निर्माण करण्याचा प्रयत्न करते की जो धर्मशास्त्राच्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देतो.' [जनगणना अहवाल, पंजाब १८९१, १·१८९; मॅक्डोनाल्ड ९५.] (२) शाफीई. ही विचारधारा इनाम मुहंमद इब्न इद्रिस-अस् शाफीई यांनी स्थापन केली. त्यांचा जन्म इ.स. ७६७ मध्ये झाला. ते धर्मशास्त्राच्या इतिहासातील श्रेष्ठ व्यक्तींच्यापैकी एक होते. (३) मालिकी. ही विचारधारा इमाम मालिक यांनी स्थापन केली. तिचे हिंदुस्थानात फार थोडे अनुयायी आहेत. या विचारधारेचे अनुयायी मुख्यतः उत्तर आफ्रिकेत आहेत. (४) हम्बली. इब्न हम्बलच्या (इ.स. ७८०-८५५) अनुयायांना हम्बली म्हणतात. हिंदुस्थानात ही विचारधारा फारशी परिचित नाही, पण अरबी वहाबींना तिच्याबद्दल आपुलकी आहे.

धर्मग्रंथ, परंपरा आणि धर्मज्ञांचे निर्णय यावरून इस्लाम ही बाह्यतः सुसंघटित संस्था आहे असे दिसते, पण सर्व हिंदुस्थानभर तत्त्व, धार्मिक विधी, सामाजिक आचार याबाबतीत पुष्कळच फरक दिसतात. हिंदुस्थानातील बहुसंख्य मुस्लीम गट इस्लामच्या मध्यवर्ती केंद्रापासून एकाकी पडल्यामुळे आणि इस्लामच्या पुष्कळशा अनुयायांनी आपल्याबरोबर आपल्या मूळ धर्मातील रूढी व तत्त्वे आणल्यामुळे हे फरक पडलेले आहेत. हिंदुस्थानमध्ये असलेल्या इस्लामचे जे स्वरूप आहे त्यामुळे हे फरक असणे स्वाभाविक आहे, कारण हिंदुधर्माप्रमाणे इस्लाममध्ये कोणी धर्मगुरु नाही, धर्मसभा नाहीत किंवा धर्मसमारंभ नाहीत. शिवाय पाश्चात्य इस्लामला जशी कैरो किंवा अरबस्तानातील पवित्र शहरे ही केंद्रे आहेत, जसे ख्रिस्ती धर्माला रोम किंवा कँटरबरी आहेत, तसे हिंदुस्थानमध्ये इस्लामला मोठे केंद्र नाही. श्रद्धा व आचारातली तळमळ ही सामान्यतः विशिष्ट वर्गाच्या भक्तांपुरती व विशिष्ट प्रसंगापुरती मर्यादित आहे. खेड्यातील मुसलमान शुक्रवारच्या प्रार्थना सोडल्यास प्रार्थना क्वचितच म्हणतो. आणि या प्रार्थनांसाठीसुद्धा ज्या ठिकाणी हिंदुधर्माचा प्रभाव जास्त आहे त्या ठिकाणी मशिदी नसतात. मोहरमच्या सणात धार्मिक उत्साह ओसंडून वाहतो पण हा सण शियांसाठी दुःखाचा व आत्मग्लानीचा असतो. रमजान हा उपवासाचा असतो. यावेळी रात्रीच्या विशिष्ट प्रार्थना मोठ्या भक्तीने म्हटल्या जातात. वरिष्ठ वर्गाच्या लोकांमध्ये पीर किंवा मुर्शीद, शिक्षक व धार्मिक गुरु नेमण्याची पद्धत आहे. यांच्यापैकी काहीजण आपल्या शिकवणुकीप्रमाणे आचरण करीत नसले तरी या पद्धतीमुळे धर्मशास्त्राचे काळजीपूर्वक पालन होते आणि धार्मिक जीवनास चालना मिळते. या कौटुंबिक गुरुंच्या संघटनेची सविस्तर माहिती सदर पुस्तकात दिली आहे.

## प्रकरण दुसरे

# जन्म

हिंदू समाजात आपणाला मुलगा असावा अशी प्रबळ इच्छा असते, कारण मुलाने उत्तरक्रिया केली तरच पितृलोकप्राप्ती होऊ शकते अशी त्याची समजूत आहे. मुसलमान समाजात या कारणासाठी नसली तरी आपणाला मुलगा असावा अशी उत्कट इच्छा असतेच. आपल्या पश्चात आपणास मुलगा असावा असे प्रत्येकास वाटते कारण मुलगी हे परक्याचे धन असते. [ब्रे, १. अरबांनी मुलीच्या जन्माला हरकत घेतली, 'आणि ते मुलींचा संबंध परमेश्वराशी जोडतात. त्याचा गौरव असो! परंतु ते त्यांची अपेक्षा करीत नाहीत. (कुराण, १६, ५९). अर्थात त्यांच्यात बालहत्येचा पुरावा नाही. विशिष्ट हिंदु जमातीमध्ये बालहत्येची रूढी सामान्य आहे. (जनगणना अहवाल, भारत, १९११. १·२१५ तळटीपा). पंजाब टेकड्यामधील गक्कारांच्यामध्ये ही रूढी तुरळक दिसते किंवा तिचे मूळ परदेशी आहे (फेरिश्ता, १·१८३.)] मुस्लीम समाजात मूल होत नसेल तर अनेक उपाय करून पाहतात. भूतबाधेमुळे वांझपणा येतो अशी एक समजूत आहे. गुजरातमध्ये काही भूतबाधा काढणारे मांत्रिक आपल्या याचकाला विलायची, लवंग, किंवा खडीसाखरेचे खडे मंत्रून खाण्यासाठी देतात. या मंतरलेल्या वस्तूंमुळे मूल होते अशी समजूत आहे. काही मांत्रिक दोरी घालतात. स्त्रीस गर्भधारणा झाल्यावर मुलगा व्हावा म्हणूनही काही उपाय करतात. काही मृत संतांच्याबाबत त्यांच्या आशीर्वादामुळे मूल होते अशी पण समजूत आहे. अपत्यविहीन स्त्रीने संताच्या कबरीवरील चांदव्याला दोऱ्याच्या गाठी बांधल्यास तिला हमखास मूल होते अशी समजूत आहे. फत्तेपूर सिक्री येथे शेख सलीम चिस्ती यांची कबर आहे. या चिस्तींच्या आशीर्वादाने आपणाला मुलगा झाला अशी अकबराची श्रद्धा होती. आजही मूल नसलेल्या हिंदू व मुसलमान स्त्रिया मूल व्हावे म्हणून त्यांच्या कबरीच्या दर्शनाला येतात आणि कबरीच्या सभोवती असलेल्या सुंदर पडद्याला दोरे किंवा चिंध्या बांधतात. अहमदाबादमध्ये शेख आलम यांची कबर आहे. या कबरीच्या आवारात असलेल्या एका झाडाला विशिष्ट प्रकारचे फळ येते. अपत्यविहीन स्त्रीने किंवा पुरुषाने ते फळ खाल्ल्यास मूल होते अशी समजूत आहे. हे फळ खाल्ल्यानंतर मूल झाले तर काही वर्षे या संताच्या उरुसाच्या वेळी तेथे जाऊन त्या झाडाच्या मुळाशी दूध घातले पाहिजे असे म्हणतात. आँझा येथील मीराँसाहेबाच्या कबरीजवळ असलेल्या झाडाची पाने खाल्ल्यानेही मूल होते असे म्हणतात. बलुची लोक काठीचे एक टोक भिंतीला टेकवून व दुसरे हातात धरून त्या काठीखालून अपत्यप्राप्तीची इच्छा असलेल्या स्त्रीला तीनदा जाण्यास सांगतात. किंवा तिला शाह वसावाच्या कबरीच्या दर्शनाला जाऊन कबरीवरील झाडाला आलिंगन देण्यास सांगतात. यामुळे मूल होते असा त्यांचा समज आहे. पुढील उपाय केल्यानेही मूल होते अशी समजूत आहे: (१) अपत्यविहीन स्त्रीस मंतरलेला कागद देतात. व तो गुलाबपाण्यात बुडवून ते पाणी प्यावयाचे किंवा तो मंतरलेला कागद गळ्यात बांधावयाचा असतो. (२) दिवाळीच्या रात्री सात विहिरींच्या पाण्याने स्नान करणे, जेव्हा भुते दूरवर असतात. (३) त्या स्त्रीस शिव्या देऊन भुतास घाबरविण्याचाही एक उपाय आहे. (४) मंतरलेल्या साखळीने त्या स्त्रीस मारणे. (५) भाकरीच्या तुकड्यावर ७३ ही बेरीज येईल अशा संख्या लिहून तो तुकडा काळ्या कुत्र्यास खावयास देणे. (६) शेजाऱ्याची झोपडी, मनाई दूर करण्यासाठी जाळणे. ब्राहूई लोकात मूल व्हावे म्हणून स्त्रीवर सुन्ता नावाची विधी करतात. पण जर दोष पुरुषाचा आहे असे अनुमान केले आणि तो दूर करण्यास अपयश आले तर मुल्ला ताईत देतो. आणि हाही उपाय फसला तर सर्व दोष जिनवर (भुतावर) ठेवतात.

अनुक्रमणिका

जेव्हा स्त्री गरोदर राहते तेव्हा तिची विशेष काळजी घेतली जाते. तिचे खाण्याबद्दलचे डोहाळे पुरविले पाहिजेत. नाहीतर गर्भपात होतो असे म्हणतात. त्या स्त्रीनेही भूतबाधा होऊ नये म्हणून विविध प्रकारची काळजी घ्यावयाची असते. गुजरातमध्ये स्त्रिया गर्भारपणात कमरेला रेशमी दोर बांधतात. आणि त्या दोऱ्याला गर्भधारणेला किती महिने झाले हे दर्शविणाऱ्या प्रत्येक महिन्याला एक याप्रमाणे गाठी बांधतात. नवव्या महिन्यात या गाठी सोडतात. त्या दोऱ्यावर धूप ठेवून त्या जाळतात आणि पाण्यात फेकून देतात. दिवाळी ही विशेष घातक वेळ असते. कारण या वेळेला आजूबाजूला भूते असण्याची शक्यता असते असे म्हणतात. त्या गरोदर स्त्रीने लग्नमंडपात जाऊ नये, मृत्यू किंवा इतर घरगुती समारंभाप्रसंगी उपस्थित राहू नये, तिने, तिच्या पतीने किंवा तिच्या नातलगांनी ग्रहणकालात काही खाऊ नये अशी बंधने लादण्यात येतात. ग्रहणकालात एखाद्या वस्तूची घडी केली किंवा ती तोडली, उदाहरणार्थ नागवेलीचे पाने, तर जन्माला येणाऱ्या मुलाचे कान मुडपलेले असतील किंवा ओठ तुटलेले असतील आणि नातलगांपैकी एखाद्याने धूम्रपान केल्यास मुलाच्या छातीत सतत घरघर राहील असे म्हणतात. ग्रहणकाळात मित्रांनी प्रार्थना म्हणाव्या, कुराणाचे पठन करावे, बिछान्यावर धान्य ठेवून ते मित्रांना देऊन टाकावे असे म्हणतात. गरोदरपणी स्त्रीने भूतबाधा होऊ नये यासाठी दागिने घालू नये, काजळ, मेंदी, दारसिना लावू नये. तसेच नारळ किंवा भूमिगत मुळांना स्पर्श करू नये. कारण त्यामुळे बाळंत होताना त्रास होतो असे म्हणतात. यांपैकी पुष्कळशी बंधने हिंदूंसारखीच आहेत. किंवा ही हिंदुंकडून उचललेली आहेत.

मुलगा होणार की मुलगी हे, अनुभवी सुइणींची समिती त्या गर्भार स्त्रीची परीक्षा करून सांगते. बलुची लोक एक वेगळा उपाय करतात. ते साप मारून, स्त्रीस त्या मृत सापावर पाय ठेवण्यास सांगतात. नंतर तो साप हवेत फेकतात. साप उलटा पडल्यास मुलगा व सुलटा पडल्यास मुलगी होते असे मानतात. बडोद्यामध्ये, त्या स्त्रीचे स्तन पिळून दुधाचे काही थेंब काढतात आणि जर ते दूध पातळ असेल तर मुलगा होणार असे अपेक्षितात.

दक्षिण हिंदुस्थानात, पहिल्या गर्भधारणेच्या वेळी, गर्भधारणा झाली हे इतरांना सांगण्यापूर्वी त्या स्त्रीची व तिच्या पतीची विविध प्रकारच्या फळांनी ओटी भरतात. तिची आई तिला कपडे पाठविते. मित्रांना मेजवानी देतात. 'सटमासा' म्हणजे सातव्या महिन्यातील विधी हिंदूकडून उचललेला आहे. सातव्या महिन्यात त्या स्त्रीस माहेरी आणतात. तिला नव्या कपड्यांचा आहेर करतात. तिच्या अंगाला चंदनगंध लावतात. किंवा गुलाबपाणी शिंपडतात. रात्रभर तिच्या सोबत बसतात. आणि गाणे बजावणे करून भुताला पिटाळून लावतात. पिवळ्या रंगाच्या कपड्यावर तिचे थोडे दूध पिळतात. कपड्यावर पांढरा डाग राहिल्यास मुलगी आणि पिवळा राहिल्यास मुलगा होतो असे मानतात. नवव्या महिन्यात मित्रमंडळीला बोलावतात. आणि तिला आतापर्यंत मनाई असलेले दागिने व कपडे वापरण्याची परवानगी देतात. नंतर फातिमा बिबीचा कुंभविधी (सहनक) येतो. हा विधी म्हणजे अनेक लहान भांड्यात अन्न शिजवून त्यावर प्रेषिताचा कन्या फातिमा यांच्या नावाने फातिहा [फातिहा 'आरंभ' हा कुराणला जोडलेला उपोद्घात. कदाचित् प्रेषितांच्या आयुष्यक्रमात उशिरा रचण्यात आला. त्यात ख्रिश्चन व ज्यू यांच्याविषयी वाद्ग्रस्त संदर्भ आहेत. ('ज्यांनी राग ओढवून घेतला ते वाममार्गाला लागोत') कारण त्यांचे ज्यूविषयीचे शत्रुत्व त्यांच्या स्थलांतरापर्यंत सुरू झाले नव्हते आणि ख्रिश्चनाबद्दल नंतर काही वर्षांनी सुरू झाले. आठव्या महिन्यातला जन्म अशुभ असतो आणि त्याचा संबंध तिच्या खोलीत मांजराने प्रवेश केल्याशी जोडतात. म्हणून मुलाचे वय मोजताना आठ मोजत नाहीत. त्याला 'अनगिनत' न मोजलेला असे म्हणतात. (रोझ्. १·७३८ तळटीप).] म्हणतात. आणि हे अन्न सद्गुणावरून निवडलेल्या स्त्रियांना देण्यात येते. पूर्वीप्रमाणे रात्रभर जागरण करतात. गुजरातमध्ये निष्कलंक स्त्रियांना, दिव्य म्हणून भिजवलेला चुना खावयास देतात. कारण त्यामुळे निष्कलंक स्त्रियांचे तोंड भाजत नाही असे समजले जाते. या अन्नावर पुरुषाची इतकेच नव्हे तर एखाद्या मुलाचीही दृष्टी

पडणार नाही याची दक्षता घेतात. उत्तर हिंदुस्थानमध्ये असे विधी गर्भधारणा झाल्याचे जाहीर झाल्यापासून चार महिने आणि पाच दिवस फक्त पहिल्या खेपेस आणि नवव्या महिन्यातसुद्धा करतात. स्त्रीची नखे काढून एका चांदीच्या डबीत ठेवतात व ती डबी न्हाव्याच्या बायकोला देतात. तिला सुवासिनीच्या हातानेच कपडे नेसवले पाहिजेत. ब्राहुई समाजात सातव्या महिन्यात प्रतिपदेच्या दिवशी सात प्रकारचे धान्य शिजवून नातलगांना वाटतात. नातलग त्याबद्दल भेटवस्तू देतात. या विधीनंतर रात्रभर जागरण करतात.

पहिले बाळंतपण स्त्रीच्या माहेरी करण्याची सर्वसाधारण प्रथा आहे. [हिंदूंमध्येही ही प्रथा आहे. (डुबीस, हिंदू मॅनर्स, ३३८; बी. जी. २९·८५; थर्स्टन, कास्ट्स, ६·१०१; रसेल, २·४३४. प्रथम जन्मलेल्या मुलांच्या विशेष शक्तींबाबत रोज्, १·७४२ तळटीप.] तिच्यासाठी स्वतंत्र खोली देतात व तीमध्ये मातेचे व बाळाचे जिनपासून रक्षण व्हावे म्हणून विस्तव ठेवतात. हिंदू मधल्याप्रमाणे बाळंतपणाला मदत व्हावी म्हणून अनेक तोडगे करतात. मुलांची एक रांग विहिरीतून पाणी काढते. ज्या वेगाने ते भांडे एकाने दुसऱ्याजवळ याप्रमाणे दिले जाते तितकी बाळंत होण्यास मदत होते. कुंभाराच्या चाकावरील माती—जिला वेगाचा गुण प्राप्त झालेला असतो-पाण्यात मिसळून ते पाणी तिला प्यावयास देतात. अकबराचा चौकोनी रुपया-ज्यावर सम्राटाच्या नावाबरोबर प्रेषिताच्या चार सहकाऱ्यांची नावे असतात-पाण्यात बुडवून ते पाणी तिला पिण्यास देतात. परंतु कोणतेही ब्रिटिश नाणे किंवा धर्मातीत नाणे या प्रकारे वापरले जाऊ शकत नाही. बाळंतपण सुलभ व्हावे यासाठी शाळकरी मुलांना सुटी देतात. किंवा सत्पुरुषाचा करगोटा पाण्यात बुडवून ते पाणी तिला पिण्यास देतात. बाळंत होताना तिला जमिनीवर अंथरलेल्या दुलईवर उत्तर दिशेस डोके आणि दक्षिणेकडे पाय करून निजवतात. बाळंत होताना तिला मृत्यू आल्यास तिचे डोके मक्केकडे असावे. कारण याच अवस्थेत मुसलमानांना दफन करण्यात येते. किंवा ती अंथरुणाला धरून जमिनीवर उकिडवी बसते आणि सुईण तिची पाठ चोळते आणि तिच्या पोटावर झाडूने दाबते. ब्राहूई लोकांमध्ये स्त्रीला बाळंत होताना वाळूवर निजवतात. ते लोक मुलगा पालथा व मुलगी सोयसी जन्मते असे मानतात. तिला सुईण (दाई, जनाई किंवा चांभारीण) मदत करते, जी आरोग्याच्या बाबतीत घ्यावयाच्या दक्षतेबाबत इतकी अज्ञानी आणि निष्काळजी असते की एखादी सामान्य कृतीही मातेच्या मृत्यूला कारणीभूत होते. बाळंत होण्यास उशीर लागला तर गरिबांना दान देतात. प्रार्थना म्हणतात. तिच्या मांडीवर ताईत लटकवतात, ज्यात सत्पुरुषाची दाढी बुडविली आहे असे पाणी तिला देतात. मंतरलेले खापर तिच्या पोटावर ठेवतात. पठाणांच्या मध्ये बाळंतपण सुलभ व्हावे म्हणून सुईण, त्या स्त्रीस तिच्या नवऱ्याने हातपाय धुतलेले पाणी पिण्यास देते. बाळंतिणीसाठी एक वेगळी खोली असते. बाळ-बाळंतिणीचे भुताखेतापासून रक्षण व्हावे म्हणून खोलीत विस्तव ठेवतात.

स्त्री बाळंत झाल्यावर तिला ताबडतोब तांब्याचा तुकडा खाण्यास देतात. यामुळे वार (गर्भावरण) बाहेर पडण्यास मदत होते. दाई सुरीने मुलाची नाळ कापते. ती नंतर तो एक नाळ तांब्याच्या भांड्यात ठेवते, त्या भांड्यात तांब्याचे नाणे आणि नागवेलीचे पान ठेवून ते भांडे त्या खोलीच्या एखाद्या कोपऱ्यात किंवा थंड ठिकाणी पुरते. नाळ ओलसरपणामुळे वाढतो. व त्यामुळे मुलास बाळसे येते अशी समजूत आहे. नाळ कापण्यासाठी वापरलेली सुरी दुसऱ्या कामासाठी न वापरली पाहिजे. ती बाळंतिणीच्या बाजूला चाळीस दिवसपर्यंत ठेवतात. नंतर तीवर काजळ जमा करून ते काजळ मुलाला लावतात. पंजाबमध्ये नाळ ठेवलेले भांडे घरातच पुरतात आणि भूतबाधा होऊ नये म्हणून त्यावर नागवेलीचे पान, दगडी कोळसा इत्यादी ठेवतात. तसेच तो नाळ नष्ट व्हावा म्हणून तो पुरलेल्या जागेवर सहा दिवसपर्यंत विस्तव ठेवतात. ब्राहूई लोक कुत्र्याला सापडणार नाही

अनुक्रमणिका

अशा ठिकाणी नाळ पुरतात. कारण तो कुत्र्याने खाल्ला तर मूल किरकिरे होते अशी त्यांची समजूत आहे. बलुची लोक कुत्र्याने किंवा मांजराने नाळ खाल्ल्यास बाळंतिणीचे दूध आटते असे मानतात. म्हणून ते नाळ घरातच पुरतात व सावधगिरीचा उपाय म्हणून त्यावर तांदूळ, काकवी टाकतात. या उपायामुळे पुन्हा गर्भधारणा होते, असेही ते मानतात. शाही घराण्यामध्ये नाळ दोऱ्याने कापीत असत व एका पिशवीत ठेवीत, जी मुलाच्या उशाला ठेवीत. त्या पिशवीवर विशिष्ट मंत्र-वचने लिहीत असत.

वार (गर्भावरण) बाहेर पडताच बाळंतिणीला बाजेवर निजवतात आणि थंडीची बाधा होऊ नये म्हणून हिंग देतात. तिच्या डोक्याला रुमाल बांधतात. पोट घट्ट आवळून बांधतात. खोलीत ऊब राहावी म्हणून विस्तव ठेवतात. बाळ-बाळंतिणीला भुताची बाधा होऊ नये म्हणून बिछान्याच्या बाजूस लिंबू, निंबाच्या झाडाची पान, सुरी इत्यादी ठेवतात. नंतर बोळ टाकून तिला पानाचा विडा खावयास देतात. गुजरातमध्ये दाई मुलगा झाला असेल तर मुलगी झाली किंवा मुलगा एका डोळ्याने आंधळा आहे असे सांगते. असे करताना तिचा हेतू भुताला फसविणे हा असतो. मुलगी झाली असल्यास मात्र ती खरेच सांगते. कारण मुलीवर भुताची वक्रदृष्टी पडत नाही अशी समजूत आहे. उत्तर हिंदुस्थानमध्ये मुलगा झाल्यास दाई घरच्या मंडळीस ‘तुम्ही सुदैवी होवोत’ किंवा मुलगी झाल्यास ‘ती तुम्हांला भाग्याची ठरो’ असे म्हणते. मुलगा झाल्यास त्याचा पिता घराच्या छतावरून बंदुकीची फैर झाडतो. त्यावरून इतरांना पुत्रजन्म झाल्याचे कळते. पण वास्तविक पाहता त्याचा हेतू भुतास घाबरविणे हा असतो. आणि तो लोखंडी जाळीवर तीन वेळा काठीही मारतो ती याच हेतूने. बाळंतिणीची आवश्यक ती काळजी घेतल्यानंतर दाई मुलाला पाण्यात कढीचे पीठ मिसळून त्या पाण्याने स्नान घालते. बाळंतिणीच्या मैत्रिणी किंवा इतर स्त्रिया त्या पाण्याच्या भांड्यात पैसे टाकतात. ते पैसे दाई घेते. दाईला बाळंतिणीचे कपडे आणि तिने वापरलेला बिछानाही नंतर मिळतो. हिंदूमध्ये ज्याप्रमाणे दूर्वांनी बाळंतिणीचे स्तन पुसतात त्याप्रमाणे पंजाबमध्ये दाई बाळंतिणीचे स्तन पाण्याने धुते. त्यानंतर पुन्हा एकदा कुटुंबातील एखादी स्त्री बाळंतिणीचे स्तन धुते. दुसऱ्या दिवशी घराच्या दारावर हिरवी पाने-डहाळे बांधते. यानंतर मुलाला अंगावर पाजण्यात येते.

दक्षिण हिंदुस्थानमध्ये बाळंतिणीस पहिले चाळीस दिवसपर्यंत पिण्यासाठी देण्यात येणारे पाणी उकळलेले असते. या पाण्यात घोड्याचा नाल किंवा लोखंडाचा तुकडा तापवून बुडवतात. इराण मधल्या पद्धतीप्रमाणे काही ठिकाणी पहिले तीन दिवस बाळंतिणीस खाण्यापिण्यासाठी काहीच देत नाहीत. तर काहीजण अजवानी म्हणजे अजवान, साखर व पीठ मिसळून तयार केलेला पदार्थ देतात. नंतर तूप साखर-पोळी आणि त्यानंतर साधी पोळी देतात. पुष्कळ लोक बाळंतिणीस काही दिवस सुंठवडा व नंतर काळे मिरे टाकून केलेला जुन्या तांदुळाचा भात देतात. दहाव्या दिवसापासून बाळंतिणीला नेहमीप्रमाणे अन्न देतात. पंजाबमध्ये बाळंतिणीस तूप, साखर-पोळी देतात. आणि ती जितके दिवस मुलाला अंगावर पाजते तितके दिवस हेच अन्न चालू ठेवतात. यामुळे मातेचा दूध पुरवठा वाढतो असे म्हटले जाते. जन्मानंतर दाई मुलाला घुटी, मधाचे पाणी देते व दुसऱ्या दिवशी बडिशेप व कडधान्याचा काढा व सौम्य गोड मिठाई देते.

मूल जन्माला आल्यानंतर त्याला स्नान घालताना किंवा घराबाहेर नेताना पहिले चाळीस दिवस नाळ कापण्यासाठी वापरलेली सुरी बरोबर नेतात. आणि मुलाला बाळंतिणीच्या खोलीत आणल्यावर ती सुरी मातेच्या बाजूला ठेवतात. हीच सुरी चाळिसाव्या दिवशीच्या विधीच्या वेळी (चिल्ला) बकरा किंवा कोंबडा बळी

देण्यासाठी वापरतात. काही कुटुंबांत बाळंतीण चाळीस दिवसपर्यंत डोक्याला तेल लावीत नाही, डोके विंचरीत नाही, पण डोक्याला रुमाल बांधते. काही कुटुंबांत बाळंतिणीस पहिले चाळीस दिवस, सहाव्या दिवशीच्या स्नानासाठी, चाळिसाव्या दिवशी आणि पुढे वर्णन करण्यात आलेल्या तारे मोजण्याच्या प्रसंगाव्यतिरिक्त खोलीबाहेर जाऊ देत नाहीत. या काळात एखादी बाहेरील व्यक्ती घरात आल्यास त्या व्यक्तीला आपल्याबरोबर आलेली भूतबाधा घालविण्यासाठी विस्तवावर ऊद टाकावा लागतो. बाहेरच्या व्यक्तीबरोबर आलेली भूतबाधा घरात येऊ नये म्हणून काही लोक दरवाजाबाहेर काजळ जमवलेली लोखंडी वस्तू किंवा झाडू चाळीस दिवस पर्यंत ठेवतात. या काळात घरात कुत्रा किंवा मांजर येऊ नये, इतकेच नव्हे तर मांजराचे नावही उच्चारले जाऊ नये याची दक्षता घेतात. परंतु प्रेषित महंमद यांनी मात्र “मांजरे अपवित्र नसतात, ती आपल्याभोवती पहारा ठेवतात” असे म्हटले आहे! [ह्यूजेस, ४९]

मुलास स्नान घातल्यानंतर व कपड्याने लपेटल्यानंतर त्याला मित्रांजवळ देतात आणि मुलाच्या उजव्या कानात अझाँ किंवा बांग आणि डाव्या कानात कलमा म्हणण्यात येतो. हे काम सामान्यपणे धर्मोपदेशक (खातिब) किंवा एखादा लहान मुलगा करतो. त्यास ‘अल्लाहू अकबर’! ‘परमेश्वर श्रेष्ठ आहे’ हे म्हणण्याबद्दल बक्षीस देतात. श्रीमंत लोकांत, मुलाला पहिल्यांदा पाजण्यापूर्वी एखादा पूज्य गृहस्थ (मशाइक) किंवा कुटुंबाचा आध्यात्मिक गुरू (मुर्शीद) मधाचा थेंब किंवा खारीक अथवा द्राक्ष चावून मुलास चाटवतो. यामागे त्यांचा हेतू मुलास त्या सत्पुरुषाचा शहाणपणा प्राप्त व्हावा हा असतो. यानंतर फातिहा म्हणतात आणि नागवेलीच्या पानावर साखर वाटतात. मित्रांना मूल जन्मल्याचे कळल्यावर ते त्या घरी येतात आणि येताना प्रत्येकजण आपल्याबरोबर हिरव्या गवताच्या काड्या आणतो. त्यांच्यापैकी एकजण त्या काड्या नवजात मुलाच्या पित्याच्या डोक्यावर ठेवतो आणि त्याचे अभिनंदन करतो. पिता त्यांना त्याबद्दल काही बक्षीस देतो. नंतर सगळेजण त्यांच्यापैकी एखाद्याच्या घरी किंवा जवळच्या बागेत जमतात आणि मिळालेल्या बक्षिसावर मौजमजा करतात.

वायव्य सरहद्दीवर मुलाच्या डोक्याला आकार देण्याची प्रथा आहे [ही बौद्ध यात्रेकरूंनी सांगितली आहे. (बील, सी-यू-की, १·१९, २·३०६; वॅटर्स, ऑन युआॅन चॉग १·५९, २·२९२).]. ब्राहूई लोक मुलाचे डोके व इतर अवयव यांवर दाब देऊन त्यांना आकार देतात. मुलाचे तोंड एका बोटाच्या दोन सांध्यांमधील अंतरापेक्षा रुंद असल्यास ते योग्य तो आकार येईपर्यंत कडीने दाबतात. तसेच ओठ पातळ व्हावे म्हणून ते चोळतात आणि नाक ढेंबरे होऊ नये म्हणून ते दाबतात. मुलीच्या बाबतीत डोक्यावरील समोरचे केस मागे दाबतात. त्याचबरोबर तिच्या हातापायांना योग्य आकार यावा म्हणून तेल चोळतात. बहावलपूर संस्थानात कवटीच्या मागच्या भागाला गोल आकार देण्यासाठी कपाच्या आकाराचे मडके वापरतात. [मलिक महंमददीन, बहावलपूर गॅझेटियर, ९६.]

दाया चार प्रकारच्या असतात : दाई जनाई किंवा चांभारीण म्हणजे सुईण; दाई दूध पिलाई किंवा अन्ना म्हणजे मुलाला स्वतःच्या अंगावर पाजणारी; दाई खिलाई, छोछा म्हणजे संगोपन करणारी आणि दाई असील, मामा, आया, म्हणजे बाळंतिणीची सेवा करणारी. मुलाचे पालनपोषण करणाऱ्या दाईला मोगल लोकात ‘अंका’ असे नाव आहे. तिच्या नवऱ्याला ‘कोका’ किंवा ‘कोकलताश’ आणि तिच्या पुरुष नातलगास ‘अत्क’ म्हणतात. [इलियट-डाऊसन, ५·२३१; स्मिथ अकबर, २०; आईन् १·३२३.] ‘मुसलमान’ समाजात दाई ही मुलाचे अडीच वर्षे संगोपन करते कारण धर्मशास्त्राप्रमाणे ती तोपर्यंतच पालनपोषणकर्ती समजली जाते. परंतु या काळात दुसऱ्या एखाद्या स्त्रीने

मुलाचे संगोपन केल्यास तिला पालनपोषणकर्ती आई म्हणत नाही. मुसलमान समाजात मुले तीन चार वर्षांची होईपर्यंतही आपल्या आईच्या अंगावर पितात असे दिसते. पण कित्येक, स्त्रिया मुलांना अंगावर क्वचितच पाजतात. कारण पाजल्यामुळे आपणाला अशक्तपणा येईल आणि शरीरसौष्ठव बिघडेल असे त्यांना वाटते.

मुलास सकाळी व संध्याकाळी स्नान घालून उदाचा धूर देतात आणि अपरिचिताची सावली पडू नये म्हणून त्याच्या गळ्यात पाचोलीची पाने आणि हिंग बांधतात [सावलीच्या संकटासाठी, फ्रेझर, जी. बी., टॅबू अँड पेरिल्स ऑफ द सोल, २२५. पंजाबमध्ये स्त्रिया रविवारी भुताच्या, पिशाचाच्या सावलीपासून विश्रांती मिळविण्यासाठी बिबी पुरानीवालीच्या दर्ग्यात जातात. रोझ, १·५९३] मुलाला स्नान घातल्यानंतर प्रत्येक वेळी दाई लाल किंवा पिवळा रंग, हळद आणि त्यात कोळशाचे तुकडे टाकून या सर्व वस्तू मुलावरून तीन वेळा ओवाळून टाकते; किंवा ती फक्त मुलावरून पाणी ओवाळून ते आपल्या पायावर टाकते; या तिच्या कृतीचा अर्थ मुलाचे अमंगळ माझ्यावर येवो हा असतो. म्हणून 'मुलाची सर्व संकटे दाईवर गेली' असे म्हणण्याचा प्रघात आहे.

मुलाचे नाव ठेवण्याचा विधी ते जन्मल्याच्या अगर आठवड्याच्या दिवशी करतात. पण सामान्यपणे जन्म झाला त्या दिवशी करतात. कारण काही कुटुंबांत नामकरणाच्या आधी बाळंतिणीस पिण्यासाठी पाणीही देत नाही, यावेळी मिठाईवर फातिहा म्हणतात आणि ती मिठाई दाईबरोबर मित्रमंडळींच्या घरी पाठवितात. दाई वाजंत्री बरोबर घेऊन मिठाई वाटण्याचे काम करते. याबद्दल तिला बक्षिशी देतात. हिंदु रूढीप्रमाणे, गुजरातमध्ये या विधीच्या वेळी बाळंतीण-मातेस खिडकीजवळ नेतात आणि तिला सात तारे मोजण्यास सांगतात.

मुसलमानांच्यामध्ये जी वडिलाची तीच मुलाची जाती असते. बाप जर सय्यद जमातीचा असेल तर मुलाच्या नावाची सुरुवात सय्यद किंवा मीरने होते. उदाहरणार्थ सय्यद अली, मीर अहमद, पण उत्तर आयुष्यात ही जातीवाचक सन्मानदर्शक नावे लावण्याचे सोडून देतात. अशा वेळी तो कोणत्या जमातीचा आहे हे त्याला विचारल्याशिवाय कळत नाही. धर्मशास्त्र मुलास 'प्रेषिताच्या नावावरून हाक मारा' असे म्हणते. परमेश्वरास आवडणारी नावे पुढीलप्रमाणे आहेत : अब्दुल्ला (परमेश्वराचा सेवक), अब्दूल रहमान (दयाळू परमेश्वराचा सेवक), हरिथ (शेतकरी), हमाम (उद्योगी), तर हब (युद्ध) व मुर्‍रा (कडवटपणा) [मिश्कत, २·४२१, अरबी नावासाठी पहा ईआरई. ९·१३७ तळटीपा.] ही अतिवाईट नावे आहेत. परंतु आधुनिक काळातील भारतीय मुसलमानास हे नियम लागू नाहीत.

मुलाचा बाप शेख असेल तर त्याच्या नावाच्या आरंभी किंवा शेवटी पुढीलपैकी उपाधी लावतात : ख्वाजा (थोर पुरुष), गुलाम (सेवक), महंमद, दीन (धर्म), अली (प्रेषित महंमदाचा जावई), बक्श (दिलेला), अब्द (सेवक). उदाहरणार्थ ख्वाजा युसूफ, गुलाम नबी, महंमद हुसेन, शमसुद्दीन, हसन बक्श, रझा अली, शेख महंमद, अब्दुल कादिर, ही नावे शेख जमातीतच असतात असे नाही कारण सय्यदसुद्धा हीच नावे लावतात.

बाप मोगल असेल तर मुलाच्या नावाच्या आरंभी किंवा शेवटी मिर्झा, अमीरजादा (श्रीमंताचा मुलगा) किंवा आगा (मुख्य) अशी उपाधी लावतात. उदाहरणार्थ मिर्झा अहमद, इस्माईल बेग, आगा जफर. इराणच्या शाही घराण्यात मिर्झा ही उपाधी नावाच्या शेवटी लावतात. सय्यद जमातीचे लोक आपणास मीर हा किताब

अनुक्रमणिका

लावतात. पठाण जमातीत खान (श्रेष्ठ मालक) किंवा खानसाहेब उपाधी नावाच्या शेवटी हमखासपणे असते. उदाहरणार्थ बहादूरखान (शूर मालक) परंतु 'सय्यद' आणि 'शेख' हे आपल्या नावाच्या शेवटी 'खान' शब्द लावीत असल्याचे आढळत असले तरी, उदाहरणार्थ गुलाम अहमदखान, हे किताब त्यांच्या मालकांनी त्यांना सन्मान म्हणून दिलेले असतात.

या नियमांना पुढील अपवाद आहेत. बाप 'शेख' व आई 'सय्यद' असेल तर मुलाच्या नावाच्या आरंभी किंवा शेवटी शरीफ (विख्यात) हा शब्द लावतात. उदाहणार्थ जफर शरीफ किंवा शरीफ जफर. काही लोक तर आपल्या कुटुंबातील सर्वांना हा शब्द लावतात. उदाहरणार्थ जफर शरीफ वल्द अली शरीफ, अली शरीफ वल्द शरीफ हमीद. बहुसंख्य उदाहरणांत आई सय्यद व बाप शेख असेल तर शरीफ हा शब्द लावीत नाहीत. अशा उदाहरणात ते स्वतःस शेख अहमद किंवा असेच एखादे नाव लावतात आणि आपण शेख जमातीचे असल्याचे सांगतात. काही ठिकाणी अशीच परिस्थिती असेल तर ख्वाजा हेही नाव लावतात. म्हणजे मुलास ख्वाजाजादा (थोर पुरुषाचा मुलगा) असे म्हणतात; पीर किंवा मुर्शीद यांसारख्या आध्यात्मिक गुरूंना ख्वाजा म्हणतात. शिवाय काहीजण मग ते कोणत्याही जमातीचे असोत, आपल्या नावांना साहेब (मालक), मियाँ (महाराज), जान (जीवन) असेही शब्द लावतात. उदाहरणार्थ दाऊद साहेब, अम्मू जान, परंतु ही कोणत्याही समाजातील मान्य अशी पद्धत नव्हे. आईवडील आपल्या मुलांना प्रेमळपणे या नावांनी हाक मारतात. ही मुले मोठी झाली म्हणजे त्यांना याच नावाने ओळखले जाते आणि त्यांची खरी नांवे बहुधा विसरली जातात.

मुलीच्या नावांच्या आरंभी किंवा शेवटी खालीलपैकी उपाधी लावतात. सय्यद जमातीमध्ये स्त्रियांना बेगम (सभ्य स्त्री), बिबी (श्रीमती), निस्सा (स्त्री), शाह (राणी) या नावांनी हाक मारतात. शेख जमातीतील मुलींना फक्त माँ (आई), बिबी (बेगम हा दर्जा न प्राप्त झालेल्या मुली) या उपाधी लावतात. मोगल व पठाणांतही हाच नियम आहे. मोगल स्त्रियांच्या नावाच्या आरंभी खानम् (सभ्य स्त्री) असा शब्द लावतात. पण अनौरस मुलींना 'बाई' म्हणतात. श्रीमंत लोक 'गायिकांच्या' मुली ठेवतात आणि त्यांना 'बाई' म्हणतात. या मुली जेव्हा आपल्या मालकाच्या विशेष मर्जीच्या होतात तेव्हा त्यांना बेगम म्हणण्यात येते. पूर्वीच्या काळी ज्या गुलाम मुलींबरोबर त्यांचे मालक संग करीत त्या मुलींना प्रथम बिबी, नंतर बाई आणि नंतर बेगम या नावांची हाक मारीत. मुसलमानांमध्ये नर्तिका दोन प्रकारच्या असतात. एक नटनी व दुसरी कंचनी. कंचनी ही बहुधा हिंदू असते. कसबी किंवा हारजाई म्हणजे वेश्या स्त्री. कसबीला कँवर आणि हारजाईला बक्श म्हणतात.

मुसलमान समाजात बापाची नावे मुलांना ठेवण्याची पद्धत नाही. मुलांची नावे ठेवताना पुढीलपैकी एखादी पद्धत अवलंबितात : (१) मुलाचे नाव एकतर कुटुंबातील एखाद्या व्यक्तीचे जसे आई किंवा वडील यांच्या वडिलाचे म्हणजे आजोबाचे किंवा कुटुंबाच्या रक्षणकर्त्या संताचे नाव ठेवतात. उत्तर हिंदुस्थानात मुलाचे नाव दोन तीन पिढ्यांच्या आतील पूर्वजाचे नसले पाहिजे अशी दक्षता घेतात. वस्तुतः ही पद्धत मुलाचे नाव नात्यातील किंवा कुटुंबातील एखाद्या व्यक्तीचे ठेवावे या नियमाच्या विरोधी जाणारी आहे. [ एन.आय.एन.क्यू. १·११६. सिरीयन मुसलमानांमध्ये मुलाला नातेवाईकाच्या नावाने हाक मारणे पुढील म्हणण्याबरोबर आहे, 'तू लवकर मरो आणि हे मूल तुझे वारस सिद्ध होवो.'] या नावाशिवाय आलम (वैयक्तिक नाव), कनयत (संबंध), लकब (सन्मानदर्शक), अलामत शाही (उपाधी), अन्वान (सन्मान), अन्साब (परंपरा) व तकल्लुस (टोपण नाव) ही वेगळी असतात. (२) आठ दहा धर्मज्ञ खालील तक्त्यात पाहून, मुलाच्या नावाचे आद्याक्षर निश्चित करतात. ते कुराणातील कोणतेही पान (फाल) उघडतात व त्या पानावर आरंभीचे जे अक्षर असेल त्या अक्षराने सुरुवात होणारे एखादे नाव मुलाला ठेवतात.

[याला 'इश्तिकारा' म्हणतात आणि हे सिराझ येथील हाफीझच्या दर्ग्यात हाफीझचा ग्रंथ पाहून केले जाते.] नाव ठेवताना फलज्योतिष्याचा विचारही नेहमी करतात. अकबराचा जन्म शब्बान महिन्यातील पौर्णिमेला झाला होता म्हणून त्याचे नाव फलज्योतिष्यदृष्ट्या बद्रुद्दीन (धर्माचा पूर्ण चंद्र) असे ठेवले होते. परंतु त्याला कुणी खुनशी मांत्रिकाने चेटूक करू नये म्हणून त्याच्या नातलगांनी त्याचा अधिकृत जन्म दिवस रजाब महिन्यातील पाचवी तारीख असा ठरविला आणि त्यानुसार त्याचे पूवीचे नाव अयोग्य म्हणून जलालुद्दीन (धर्माची शोभा) असे नवे नाव ठेवले. (३) काही चिठ्ठयांवर वेगवेगळी नावे लिहून त्या एका वाटीत ठेवतात व वाटीवर रुमाल झाकतात. नंतर वाटी हलवून चिठ्ठ्या जमिनीवर टाकतात आणि एका लहान मुलास त्यांपैकी एखादी चिठी उचलण्यास सांगतात. चिठीवर जे नाव असेल ते त्या मुलाचे नाव ठेवतात. (४) मूल जन्मले त्यावेळी जो ग्रह प्रभावी असेल त्या ग्रहाच्या आरंभीचे किंवा शेवटचे अक्षर घेऊन त्या अक्षराने सुरू होणारे एखादे नाव ठेवतात. ग्रह सात आहेत: शम्स (सूर्य), कमर (चंद्र), झुहाल किंवा कैवान (शनि), झोरा (शुक्र), उतारिद (बुध), मिरिख (मंगळ), मुश्तारी (गुरु). या ग्रहांचा अमंल चोवीस तास असतो असे मानतात. पुढील पानावरील तक्त्यावरून कोणत्या वेळी कोणता ग्रह असतो हे कळते.

उदाहरणार्थ, मूल जर रविवारी सकाळी ६ ते ७ च्या दरम्यान जन्मले असेल तर तक्त्यावरून शम्स म्हणजे सूर्य हा ग्रह यावेळी प्रभावी दिसतो. म्हणजे मुलाचे नाव एकतर 'श' किंवा 'स' या अक्षराने सुरू झाले पाहिजे.

हा तक्ता तीन गोष्टींसाठी वापरतात: (१) वर सांगितलेल्या मुलाचे नाव ठेवण्यासाठी. (२) एखादे विशिष्ट कार्य सुरू करण्यासाठी कोणता दिवस किंवा वेळ शुभ अगर अशुभ आहे हे पाहण्यासाठी. उदाहरणार्थ ज्यावेळी शनी प्रभावी असतो त्यावेळी कोणत्याही शुभकार्याचा आरंभ करू नये कारण शनी हा स्वर्गीय खोजा (षंढ नोकर) असल्यामुळे लाभदायक नसतो असे मानतात. सूर्य हा स्वयंपाकी म्हणून उदासीन; शुक्र हा वेश्या म्हणून लाभदायक; बुध हा शिक्षक म्हणून लाभदायक; चंद्र हा दूत म्हणून उदासीन; मंगळ हा प्रशासक म्हणून अलाभदायक आणि गुरू हा न्यायाधीश म्हणून लाभदायक असतो असे मुसलमान मानतात. [एका फलज्योतिषाने राई दाहिरला सांगितले की, त्याच्या अरब शत्रूंना विजय मिळेल. कारण शुक्र हा त्यांच्या मागे व तुझ्यासमोर आहे. म्हणून दाहिरने शुक्राची सोन्याची प्रतिमा करून ती आपल्या मागे राहावी व आपणाला विजय मिळावा म्हणून खोगिराच्या पट्ट्याला घट्ट बांधली. परंतु दाहिर पराभूत झाला व मारला गेला. (इलियट-डाऊसन १,१७१). जीमध्ये बाबरने राणा संगाच्या नेतृत्त्वाखालील राजपूतांचा पराभव केला त्या इ.स. १५२७ मधील कन्वा किंवा सिक्रीच्या लढाईपूर्वी एका फलज्योतिषाने बाबराला सांगितले की, मंगळ दर दिवशी सायंकाळी पश्चिमेस दिसतो आणि जो कोणी त्या दिशेने जाईल त्याचा पराभव होईल. जेव्हा हे भविष्य खोटे सिद्ध झाले तेव्हा बाबरने त्या फलज्योतिषाला बक्षीस दिले पण त्याला राज्य सोडून जाण्यास भाग पाडले. (फेरिश्ता, २·५४, तळटीप, ५९).] (३) मूल जन्मले त्यावेळी कोणता ग्रह प्रभावी होता हे पाहून त्यावरून त्याचे भविष्य सांगण्यासाठी उदाहरणार्थ एखादे मूल रविवारी दुपारी १२-३० ते १२-४५ या दरम्यान जन्मले असेल तर मुसलमानांच्या पंचांगाप्रमाणे ही वेळ रविवारी रात्रीची असते कारण ते आपला दिवस सायंकाळी ६ ते सकाळी ६ म्हणजे सामान्यतः सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत मोजतात. वर सांगितलेल्या वेळी शुक्र प्रभावी असतो. त्याचा परिणाम मुलावर होणार त्यामुळे मुलाचा कल संगीत, चांगला पोशाख, सुगंधी वस्तू यांकडे असणार असे मानतात.

मानव जातीवर ग्रहांचे शुभ किंवा अशुभ असे अनेक परिणाम होतात. त्यांपैकी काही उदाहरणे सांगता येतील. **सूर्याचे स्वभाव** :- सूर्य हा ग्रह ज्या व्यक्तीच्या जन्म वेळी प्रभावी असतो ती व्यक्ती श्रीमंत, समंजस चिडखोर, उदार होईल. तिला पुष्कळ संपत्ती प्राप्त होईल, तिच्या शब्दाला मान असेल, काळ्या व लाल रंगाच्या कपड्यांची तिला आवड असेल. ती विलासी, दारुडी, कुचेष्टाखोर, पवित्र कार्याची आवड नसलेली, दरसाल

आजारी पडणारी असेल. तिचा जन्म तिच्या आईवडिलांसाठी अशुभ ठरेल. ती दीर्घायुष्यी असेल. **शुक्राचे स्वभाव :-** शुक्र ग्रहाचा प्रभाव असताना जन्मलेली व्यक्ती संगीत, गाणे म्हणणे, कपडे, मिष्टान्न यांची विशेष आवड असणारी असेल. ती सुंदर, विलासी, चतुर, मनमिळाऊ, चांगला पोशाख करून इतरांच्या नजरेत भरण्याचा प्रयत्न करणारी, दुसऱ्यांना लुबाडून स्वतः श्रीमंत होण्याचा सतत प्रयत्न करणारी, आपली गुपिते इतरांना न सांगणारी, अत्तरांची आवड असणारी, गोड आवाजाची, मधुर-भाषिणी, वादपटू असेल. ती आपले आईवडील इतकेच नव्हे तर बहीणभाऊ यांनाही मदत करील.

**जन्मनावे ठेवण्यासाठी मार्गदर्शक तक्ता**

| वेळ | शनिवारचा दिवस किंवा बुधवारची रात्र | शुक्रवारचा दिवस किंवा मंगळवारची रात्र | गुरुवारचा दिवस किंवा सोमवारची रात्र | बुधवारचा दिवस किंवा रविवारची रात्र | मंगळवार चा दिवस किंवा शनिवारची रात्र | सोमवारचा दिवस किंवा शुक्रवारची रात्र | रविवारचा दिवस किंवा गुरुवारची रात्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सकाळी ६ ते ७ | शनी | शुक्र | गुरु | बुध | मंगळ | चंद्र | सूर्य |
| सकाळी ७ ते ८ | गुरु | बुध | मंगळ | चंद्र | सूर्य | शनी | शुक्र |
| सकाळी ८ ते ९ | मंगळ | चंद्र | सूर्य | शनी | शुक्र | गुरु | बुध |
| सकाळी ९ ते १० | सूर्य | शनी | शुक्र | गुरु | बुध | मंगळ | चंद्र |
| सकाळी १० ते ११ | शुक्र | गुरु | बुध | मंगळ | चंद्र | सूर्य | शनी |
| सकाळी ११ ते १२ | बुध | मंगळ | चंद्र | सूर्य | शनी | शुक्र | गुरु |
| दुपारी १२ ते १ | चंद्र | सूर्य | शनी | शुक्र | गुरु | बुध | मंगळ |
| दुपारी १ ते २ | शनी | शुक्र | गुरु | बुध | मंगळ | चंद्र | सूर्य |
| दुपारी २ ते ३ | गुरु | बुध | मंगळ | चंद्र | सूर्य | शनी | शुक्र |
| दुपारी ३ ते ४ | मंगळ | चंद्र | सूर्य | शनी | शुक्र | गुरु | बुध |
| दुपारी ४ ते ५ | सूर्य | शनी | शुक्र | गुरु | बुध | मंगळ | चंद्र |
| सायंकाळी ५ ते ६ | शुक्र | गुरु | बुध | मंगळ | चंद्र | सूर्य | शनी |

अनुक्रमणिका

**टीप.**— सकाळी ६ ते ७ याचा अर्थ सकाळप्रमाणेच सायंकाळी ६ ते ७ असा घ्यायचा. त्याचप्रमाणे दुपारी १ ते २ याचा अर्थ रात्री १ ते २ असा घ्यायचा. दिवसाच्या बारा तासांचे ग्रहमान दिलेले आहे. तसेच रात्रीच्या बारा तासांचे ग्रहमान समजावयाचे.

**बुधाचे स्वभाव :-** बुध हा ग्रह प्रभावी असताना जन्मलेला माणूस ज्ञानी व शहाणा, चांगला लेखक, विविध शास्त्रांचा ज्ञाता, कुशल चित्रकार, चांगली स्मरणशक्ती असलेला, इतकेच नव्हे तर हाफिझ असेल- कुराण मुखोद्‌गत असणाऱ्या माणसाला हाफिज म्हणतात. [औरंगजेब व शाही कुटुंबातील काही स्त्रिया यांना कुराण तोंडपाठ होते (जदूनाथ सरकार, लाइफ ऑफ औरंगजेब, १·८).] तो कवी, श्रीमंत, कलातज्ज्ञ, गणिती, कुशाग्र बुद्धीचा असेल. त्याची मैत्री व सहवास अनेकांना फायद्याचा ठरेल. त्याची इच्छा प्रमाण मानणारे अनेक लोक त्याच्याभोवती असतील. तो त्याच्या मर्जीतल्या लोकांच्या उपयोगी पडणारा असेल पण ज्याच्यावर त्याची गैरमर्जी होईल त्याचे दर्शनसुद्धा टाळणारा असेल. **चंद्राचे स्वभाव :-** ज्या माणसाच्या जन्मवेळी चंद्र हा ग्रह प्रभावी असेल तो जुगारी, देखणा, दारुड्या, खूप प्रवास करणारा, खोटेपणाची आवड असलेला, बाष्कळ बडबड करणारा, थोर लोकांच्या समूहात प्रसिद्ध असणारा, दर सहा महिन्यांला अशक्तपणा व थंडीपडशामुळे आजारी पडणारा, पाण्याला घाबरणारा, प्रवासात जीव धोक्यात असणारा, आणि आईवडील व मित्रांसाठी भाग्यवान ठरणारा असेल. **शनीचे स्वभाव :-** शनीचा प्रभाव असताना जन्मलेला माणूस रंगाने काळा, दीर्घायुषी, किरकोळ प्रकृतीचा, स्तुतिपाठक, वाईट स्वभावाचा, मोठ्या आवाजाचा, शूर शिपाई, विसराळू, उदार, हेकट, डंख धरणारा, निर्दय. उतावळा असेल. **गुरूचे स्वभाव :-** गुरु ग्रहावर जन्माला आलेला माणूस देखणा, खादाड, शास्त्रांचा ज्ञाता, विद्वान, न्यायाधीश, हाफिज, राजकारणतज्ज्ञ असेल. त्याला शत्रू अनेक असतील पण त्याला कुणीही इजा करू शकणार नाही. शिवाय तो आपल्या शत्रूवर नेहमी विजय मिळवील. हस्तकला, चित्रकला, लेखनकला यात तो अद्वितीय असेल. तो समंजस, उदार, दृढनिश्चयी, नाजुक प्रकृतीचा व हाती घेतलेली कामे तडीस नेणारा असेल. **मंगळाचे स्वभाव:-** मंगळ या ग्रहाचा प्रभाव असताना जन्मलेला माणूस दयाळू, कला व शास्त्रात निपुण असलेला, ज्ञानप्राप्तीची तळमळ असलेला, पांढरा पोशाख व अत्तरांची आवड असलेला, जुलमी, तांबूस रंगाचा, तापट स्वभावाचा, दुसऱ्यांचे पैसे लुबाडून स्वतः श्रीमंत होऊ इच्छिणारा व महत्त्वाकांक्षी असा असेल.

मुलाचे नाव खालील यादीतून निवडण्यात येते. रविवारी दिवसा किंवा रात्री जन्मलेले मूल मुलगा असेल तर त्याचे नाव इब्राहीम, सुलेमान, दाऊद, मुसा, अयूब, हाशिम (पवित्र भोजनोत्सवात भाग घेणारा), इम्रान (दीर्घायुषी), आणि मुलगी असेल तर तिचे नाव हलिया (नम्र), हबिबा (मैत्रीण), झैनब (सुगंध), खादिजा ठेवण्यात येते. सोमवारी जन्मलेला मुलगा असेल तर त्याचे नाव मुहंमद (अतिस्तुतिपात्र), अहमद (बहुस्तुतिपात्र), महमूद (स्तुतिपात्र), कासिम (विभागलेला), कादिर (प्रभावशाली) ठेवतात आणि मुलगी असेल तर तिचे नाव फातिमा, अम्मा (सुरक्षितता), हमिदा (स्तुतिपात्र), रफिया (श्रेष्ठ), रुकिया (मोहक), झरिना (सोनेरी) ठेवण्यात येते. मंगळवारी जन्मलेल्या मुलाचे नाव इस्माईल, इसाक, अबुबकर, इलियास, यासिन ठेवतात तर मुलीचे नाव हनिफा (खरी मुस्लीम), आयशा ('प्राण' प्रेषितांच्या पत्नीचे नाव आयशा होते), शरीफा (स्तुतिपात्र), सकिना (रहिवासी) ठेवतात. बुधवारी जन्मलेल्या मुलाचे नाव उस्मान (साप), अली (श्रेष्ठ), हरुन, हसन (सुंदर), हुसेन (सुंदरबाळ), उमर (विकत घेतलेला) आणि मुलीचे नाव रबीई (वासंतिका), अझिझा (अत्युत्कृष्ट), जमिला (सुंदर), फाझिला (अत्युत्कृष्ट), नज्म (तारका) खुर्शीद (सूर्य),

अनुक्रमणिका

सितारा (तारका) ठेवतात. गुरुवारी, जन्मलेला मुलगा असेल तर युसूफ, हमीद (स्तुतिपात्र), मुस्तफा, मूर्ताजा (निवडलेला), सज्जाद (भक्त), बाकिर (विद्वान), अस्करी (शिपाई), रझा (समाधानी), जफर (ओहळ), मुहंमद गौस (संत) आणि मुलगी असेल तर मारिया, अस्या (वाहते पाणी), झुलखा ('घसरलेली'- पॉटीफची पत्नी), खैरॉं (सुखी), वाजिदा (शोधिका), वासिला (लाडकी,) गफूर (क्षमाशील), मरुफ (सुप्रसिद्ध) असे नाव ठेवतात. शुक्रवारी जन्माला आलेल्या मुलाचे नाव ईसा, अन्वर (तेजस्वी), नूर (चमकदार), हैदर (सिंह), अक्राम (सन्मान), आदम, सुल्तान (बादशहा), हबीबुल्ला (परमेश्वराचा मित्र), हाफिझुल्ला (परमेश्वराने संरक्षण केलेला), करिमुल्ला (परमेश्वराची कृपा असलेला), रहमतुल्ला (परमेश्वराची दया असलेला), अलीमुल्ला (परमेश्वराचे ज्ञान असलेला), कुंदरतुल्ला (परमेश्वराची शक्ती), अब्दुल्ला (परमेश्वराचा सेवक) यांपैकी एक ठेवतात. आणि मुलीचे नाव माह (लाडकी), झोरा (शुक्र), महबुबा (लाडकी), अमीरा (राजकुमारी), रतन (रत्न), बानू (सभ्य स्त्री), खातून (सभ्य स्त्री), निस्सा (स्त्री), हव्वा आरिफा (धर्मनिष्ठ), मामा (आई) यापैकी एखादे ठेवतात. शनिवारी जन्मलेल्या मुलाचे नाव अब्दुल कादिर (सर्व शक्तिमान परमेश्वराचा सेवक), अब्दुल वहहाब (सर्व उदार परमेश्वराचा सेवक), अब्दुल रझाक (अन्नदात्या परमेश्वराचा सेवक), अब्दुल करीम (सर्व सुंदर परमेश्वराचा सेवक), अब्दुल शकूर (वर देणाऱ्या परमेश्वराचा सेवक), अब्दुल लतिफ (दयाळू परमेश्वराचा सेवक), शमसुद्दीन (धर्माचा सूर्य), निझामुद्दीन (धर्माचा शास्ता), सिराजुद्दीन (धर्माचा सूर्य), मुहर्‌रम (सन्मान पात्र), सीद्दिक (सत्यवचनी) यांपैकी एखादे ठेवतात आणि मुलीचे नाव नाजुक (कोमल), ममुला (सांप्रदायिक), लतिफा (नम्र), बिलकीस (शिबाची राणी) यांपैकी एखादे ठेवतात.

खालच्या जमातीतील मुसलमान आपल्या मुलामुलींची नावे मानभंग, निराशा, अशुद्धता निदर्शक ठेवतात. यामागे त्यांना भूतबाधा होऊ नये किंवा इतरांची दृष्ट लागू नये असा हेतू असतो. अशापैकी काही नावे नथू (नाक टोचलेला), भिकारी, दुःखी, काकी (कावळा), कुबडा ही आहेत.

## प्रकरण तिसरे

# जन्मोत्तर विधी

मूल जन्मल्यानंतर 'पट्टी' नावाचा विधी करतात. इतर घरच्या स्त्रिया जमतात आणि बाळंतिणीचे केस विंचरून त्यांचा मधोमध भांग पाडतात. स्त्रीस अंतर्गत अडथळ्यापासून मुक्त करण्याची ही बहुधा जादूची पद्धत असावी [गरोदर स्त्रीचा भांग पाडणे कदाचित बाळंतपण सुलभ व्हावे यासाठी असते. परंतु इतर बाबतीत, तासातून नांगर जसा शिरतो त्याप्रमाणे हा सुपीकतेचा मंत्र असू शकतो. याची सीमन्तोन्नयन या हिंदु विधीशी तुलना केली जाऊ शकते. (ईआरई ३·४७१, २·६५०; मोनियर-विलियम्स, ब्राह्मणीझम अँड हिंदूइझम ४ थी आवृत्ती, ३५७).]. नंतर बाळाला व मातेला लाल रंगाची वस्त्रे लेववितात. मातेच्या डोक्याला रुमाल बांधतात. आई व मूल यांच्या डोक्यावर चांदवा धरतात आणि दोघांच्याही डोळ्यांत काजळ घालतात. सुंठवडा घालून केलेल्या वड्या व विड्याची पाने यांनी बाळंतिणीची ओटी भरतात. निमंत्रित स्त्रिया तिच्या तोंडाला हळद लावतात व भेटवस्तू देतात (रक्तानी, रुक्सताना) लखनौमधील शिया चौथ्या दिवशी आनंदाप्रीत्यर्थ पाहुण्यांना मेजवानी देतात [श्रीमती मीर हसन अली, २१२].

मुलाच्या जन्मापासून सहाव्या दिवसापर्यंत कुटुंबास जितकी ऐपत असेल तितकी मौज करतात. सहाव्या दिवशी छट्टी म्हणजे सटवीचा विधी करतात. पुष्कळदा हा विधी सातव्या किंवा नवव्या दिवशी करतात आणि घरात पुष्कळ मृत्यू झाले असले तर हा विधी तिसऱ्या दिवशी करतात. बाळंतपणानंतर मातेला येणारा ज्वर आणि नाळ कापल्यामुळे आणि आरोग्याची नीट व्यवस्था नसल्यामुळे मुलाला होणारा धनुर्वात हे सामान्यपणे सहाव्या किंवा सातव्या दिवशी आढळतात. हा सटवीचा प्रताप आहे अशी समजूत असल्यामुळे सटवीचा विधी सहाव्या दिवशी करतात. या विधीच्या दिवशी सुईण सगळे घर पांढरी माती किंवा शेणाने सारवते. या विधीत पुरुष भाग घेत नाहीत. मैत्रिणी बाळंतिणीस नहाण्यासाठी शिकेकाई, रिठा इत्यादी वस्तू, तसेच काजळ, विडा इत्यादी पाठवितात. बाळास स्नान घातल्यानंतर त्यास सत्पुरुषाने वापरलेल्या कापडाचा सदरा घालतात. ह्यामागे मूल दीर्घायुषी व्हावे असा हेतू असतो. केव्हा केव्हा सुईण जर वृद्ध असेल तर ती आपल्या स्वतःच्या जुन्या कापडाचा सदरा करून मुलास घालते. अकबराला प्रथम घातलेले कपडे सय्यद अली शिराझी या साधुपुरुषाने वापरलेल्या कापडाचे होते. या दिवशी उसने आणलेले कपडे घालण्याची पद्धत आहे. असे कपडे धोबी पुरवितो.

नंतर मातेला बिछान्यावर बसवून स्नान घालतात. यात सुगंधी पानांचा काढा असतो. सुइणीला बक्षीस देतात. यावेळी उपस्थित असणाऱ्यांना वरण, भात, बकऱ्याचे काळीज (कलेजी) याचे जेवण देतात. तसेच अनुपस्थित असणाऱ्या मित्रांना या जेवणाचा काही भाग पाठवतात. आणि रात्रभर करमणुकीचे कार्यक्रम करतात. हा विधी फक्त पहिल्या मुलाच्या वेळीच करतात असे नव्हे तर सर्वच मुलांच्या वेळी करतात. रात्रीच्या जेवणातून थाळीभर अन्न बाजूला काढून ठेवतात कारण पाहिलेल्या प्रत्येक वस्तूची त्याला हाव सुटू नये. मूल मोठेपणी हावरे निघाल्यास त्याची थाळी नीट भरली नव्हती असे म्हणतात. थाळीमध्ये मध्य भागी पिठाचा दिवा करून त्यात चार वाती लावतात. मित्रमंडळी थाळीमध्ये पैसा, दोन पैसे टाकतात. दिवा रात्रभर जळता राहील याची दक्षता घेतात. या अन्नाला सटवीचे जेवण (छटी का भांडा, रातजागा) असे म्हणतात. कारण सटवी त्या

अनुक्रमणिका

रात्री येऊन मुलाचे भविष्य लिहिते अशी समजूत आहे. सटवीचा विधी सामान्यपणे खालच्या वर्गातील लोक करतात. तर वरच्या वर्गाचे लोक त्याएवजी 'अकिका' नावाचा विधी करतात.

उत्तर हिंदुस्थानमध्ये छटीच्या विधीच्या दिवशी मैत्रिणी जमतात. बाळंतिणीस गरम पाण्याने स्नान घालतात. तिचे नातलग तिला भेटी पाठवतात. बाळ व मातेला कपडे घातल्यावर त्यांना बाळंतिणीच्या खोलीबाहेर (जच्चा किंवा जचखाना) आणतात. यावेळी मातेच्या हातात कुराण असते व तिचे डोळे मिटलेले असतात. जेव्हा ती खोलीबाहेर येते तेव्हा ती डोळे उघडते आणि सात वेळा आकाशाकडे पाहते. ती खोलीबाहेर असताना दुसऱ्या एका लहान मुलाला तिच्या अंथरुणावर क्षणभर बसवितात. पुन्हा मुलगा व्हावा यासाठी ही जादूची करामत आहे. बाहेर जाण्यापूर्वी तो मुलगा बक्षीस मागतो, त्याला बक्षीस देतात. जादूच्या प्रयोगात नेहमी वापरतात तसे सात प्रकारच्या धान्याचे अन्न त्या मातेपुढे ठेवतात. हे अन्न मातेने खाण्यापूर्वी सात सुवासिनी त्या ताटातून प्रत्येकी एक घास घेतात. न्हावीण आणि माळीण नातलगांच्या घरावर हिरव्या पानांचे तोरण बांधतात. याबद्दल ते त्यांना बक्षीस देतात. पंजाबमध्ये बाळंतपणानंतर पहिले सहा दिवस मातेला एकटे सोडीत नाहीत. याचे कारण मूल तिच्या अंगाखाली चिरडू नये हे असल्याचे सांगतात. पण तिला अनिष्ट शक्तीपासून वाचविण्यासाठी हे केले जात असण्याची अधिक शक्यता आहे. याच कारणासाठी त्या खोलीत सतत दिवा जळत ठेवतात. बेहमाता, बिधीमाता म्हणजे दैवीशक्ती. ती जन्माचे वेळी मुलाचे भविष्य नोंदवते, तिने अग्नी मागितला असता तो नाकारणे हे फार भयानक पाप आहे असे मानतात. याबाबत एका फकिराची गोष्ट सांगतात-त्याने दैवी शक्तीला अग्नी देण्यासाठी नकार दिल्यामळे त्याचे काजव्यात रूपांतर झाले [जेआरएआय ३७,२४०. ही जैनांचीसुद्धा समजूत आहे, एस. स्टिव्हन्सन, दि हार्ट ऑफ जैनिझम, १९३ तळटीप.]. ब्राहूई लोक मूल जन्मल्यानंतर घरात कोणत्याही शक्तीचा प्रवेश होऊ नये म्हणून चारही भिंतींवर निळ्या रंगाची निशाणी रंगवतात. तर काहीजण चेटकिणींना प्रतिबंध करण्यासाठी घराभोवती पिंपळाची व अंजिराच्या झाडाची पाने ठेवतात आणि मुलाच्या उशालगतच्या जमिनीत सुरी खुपसतात. ती सुरी तेथे चाळीस दिवसपर्यंत ठेवली पाहिजे. मातेला खोलीबाहेर जावयाचे असल्यास संरक्षक म्हणून ती सुरी न्यावी लागते.

सेमेटिक लोकांप्रमाणे बाळंतिणीच्या अशुद्धतेचा काळ चाळीस दिवसांचा मानतात [फ्रेझर, जी. बी., टॅबू अँड दि पेरिल्स ऑफ् दि सोल, १४७ तळटीपा; लेव्ह १२·१ तळटीपा, इक्झॉड २४·१५; ३४·२६ अँड क.].या काळात तिला प्रार्थना म्हणता येत नाहीत, कुराणाला स्पर्श करता येत नाही, तसेच मशिदीत प्रवेश करता येत नाही. मुळात ही बंधने रक्तस्राव संपूर्णतः थांबेपर्यंत पाळावयाची असत. पंजाबमध्ये बाळंतीण, मुलाच्या नाकाचा आकार बिघडू नये म्हणून त्याला बसून पाजते. दक्षिण हिंदुस्थानात चाळिसाव्या, तसेच सहाव्या, बाराव्या आणि तेराव्या दिवशी मित्रमंडळी मुलाला भेटी, विशेषतः कुराणातील वचने लिहिलेले ताईत देतात. उत्तर हिंदुस्थानमध्ये या भेटी सामान्यपणे सहाव्या दिवशी देतात. पंजाबमध्ये जे घरी स्त्रियांना पडद्यात ठेवीत नाहीत त्या घरातील बाळंतीण मूल एक महिना दहा दिवसांचे झाल्यावर एके दिवशी आंघोळ करून, नवे कपडे लेवून उकडलेल्या अन्नाचे दोन भांडे आपल्या डोक्यावर ठेवून एखाद्या विहिरीवर जाते आणि ते अन्न ख्वाजा खिजर या जलसंतांना अर्पण करते. नंतर ते भांडे पाण्यान भरून ती घरी नेते. [रोझ, १·५६५. ही हिंदूंची मान्य पद्धत आहे.] गुजरातमध्ये गवताच्या लहान नावाने या संतांच्या नावे पाण्यात सोडतात. दक्षिण हिंदुस्थानात चाळिसाव्या दिवशी मौजमजा करतात. हिजड्यांना नाचगाण्याबद्दल पैसे देतात. ते गावभर 'मुलगा कोठे झाला आहे' असे ओरडत फिरतात. जर मुलगी झाली तर मात्र फारच थोडे पैसे देतात किंवा मुळीच देत नाहीत. त्यांना पैसे न दिल्यास ते पित्याला

शिव्याशाप देतात. सायंकाळी पुरुषमित्रांना मेजवानी देतात. या मेजवानीच्या अन्नावर मुहंमद मुस्तफाच्या नावाने फातिहा म्हणतात. काही लोक मातेला मोकळ्या हवेत नेऊन तिला काही तारे मोजण्यास सांगतात व यानंतर हवेत काही बाण सोडीत असतात.

परंपरेप्रमाणे मुलाच्या जन्माबद्दल बळी देण्याचा आणि केस काढण्याचा विधी एकत्र मूल जन्मल्यानंतर सातव्या, चौदाव्या, एकविसाव्या, अठ्ठाविसाव्या अगर पस्तिसाव्या दिवशी करतात. तेव्हा त्याचे केस काढतात व केसाच्या वजनाइतकी चांदी दान करून टाकतात. प्रेषितांनी त्यांना वृद्धपणी मुलगा झाल्यावर असेच केले होते. [मिश्कत, २·५१५. मुईर, लाइफ, ४१२.] दक्षिण हिंदुस्थानात सहाव्या, चाळिसाव्या अगर एखाद्या सोयीच्या दिवशी अकिका नावाचा विधी करतात. [अकिकाचा योग्य अर्थ नवजात बालकाचे केस असा आहे. पण मेटोनिमीने ही संज्ञा केस वाहणे याला लावली आहे. क्षौराबाबत पहा-ईआरई. ६·५३८.] म्हणजे मुलगा झाला असल्यास दोन आणि मुलगी झाली असेल तर एक बकरा बळी देतात. बळी द्यावयाचा बकरा एक वर्ष वयाच्या वरचा, निरोगी (सही उल अझा) असावा लागतो. तो एक किंवा दोन डोळ्यांनी आंधळा किंवा लंगडा नाही याची दक्षता घेतात. त्याची कातडी इतकी काळजीपूर्वक सोलली पाहिजे की तीवर थोडेही मांस राहू नये. त्याचप्रमाणे त्याचे कोणतेही हाड मोडणार नाही अशा रीतीने मांस कापतात. हे मांस चांगले शिजवतात आणि त्यावर पुढील आशीर्वचन म्हणतात, हे 'परमेश्वरा, माझ्या मुलासाठी मी हा जीवासाठी जीव, रक्तासाठी रक्त, हाडासाठी हाड, केसासाठी केस आणि कातडीसाठी कातडी प्रदान करतो. परमेश्वराच्या नावाने हा बकरा मी बळी देतो.' नंतर हे मांस इतर पदार्थासह मित्रमंडळींना वाटतात पण ज्या व्यक्तीच्या नावाने बळी देण्यात येत आहे त्याचे आईवडील व आजाआजी मात्र खात नाहीत. बळी दिलेल्या बकऱ्याची कातडी, हाडे इत्यादी अवयव जमिनीत पुरतात. त्यांचा कोणासच उपयोग करू देत नाहीत. गुजरातमध्ये अकिका हा विधी मुलाच्या जन्मानंतर सातव्या, चौदाव्या किंवा एकविसाव्या दिवशी करतात. यावेळी मुलाचे केस काढतात आणि बकरा बळी देतात. न्हावी मुलाचे केस काढतो आणि वर सांगितल्याप्रमाणे आशीर्वचन म्हणून बकऱ्याच्या मानेवरून सुरी फिरवितो. मुलाचे केस व नखे अर्ध्याकच्च्या भाकरीवर ठेवून नदीत फेकून देतात. बकऱ्याची हाडे पुरतात. मांस व कातडीचे तीन भाग करून यांपैकी एक दान म्हणून, एक मित्रमंडळीला आणि उरलेला नातेवाईकांना देतात. मुलाचे आईवडील व आजाआजी यांना मात्र यांपैकी काहीही घेता येत नाही.

दक्षिण हिंदुस्थानात अकिकानंतर एखाद्या दिवशी केस काढण्याचा विधी करतात. बहुसंख्य लोक हे दोन्ही विधी एकत्र करीत असले तरी गरीब फक्त केस काढण्याचा विधी करतात. आणि फार गरीब असणारे लोक तर केस काढण्याचा विधीही चाळिसाव्या दिवशीच्या विधीबरोबर करतात. श्रीमंत लोक चांदीचा मुलामा दिलेल्या वस्तऱ्याने केस काढतात व पाण्यासाठीही चांदीची वाटी वापरतात. नंतर या दोन्ही वस्तू न्हाव्यास देतात. शिवाय त्यास इतर बक्षीस देतात. मुंडन केल्यानंतर श्रीमंत लोक मुलाच्या डोक्याला केशर, तर गरीब चंदन घासतात. केसाच्या वजनाइतकी चांदी फकिरांना देतात. केस नंतर फडक्यात बांधून पुरतात अगर पाण्यात फेकून देतात. श्रीमंत लोक यावेळी ख्वाजा खिजरच्या नावे बळी देतात आणि केस ओढ्यातील पाण्यावर तरंगू देतात. काही लोक केस काढताना मुलाच्या डोक्यावर एका संताच्या नावे शेंडी (चोंटी) ठेवतात. या शेंडीचे पावित्र्य नष्ट होणार नाही याची दक्षता घेतात. काहीजण मुलाचे मुंडन या संताच्या दरग्यात करीपर्यंत हा विधी पुढे ढकलतात. सिंधमध्ये मुलाचे केस अकिका विधीत बळी दिलेल्या बकऱ्याच्या हाडावर ठेवून स्मशानात किंवा घराच्या उंबरठ्याजवळ पुरतात. यामागे एक श्रद्धा आहे. ती म्हणजे कियामतच्या दिवशी

कातडीचे घटक घोड्याचा आकार धारण करतात आणि हा घोडा मुलाचा आत्मा मृत्यूच्या पुलावरून स्वर्गात घेऊन जातो. [बर्टन, सिंध, २५९.] बलूची लोक मुलाची सुन्ता करण्याअगोदर त्याचे केस काढतात. ते मुलाचे केस संत सखी सरवार यांच्या दरग्यात काढतात. यावेळी तेथील सेवकांना (मुजाविर) केसाच्या वजनाइतकी चांदी देतात.

चाळिसाव्या दिवशी किंवा त्यापूर्वी मुलाला लाकडाच्या पाळण्यात (गहवारा) निजवून झोके देतात. झोका जितका उंच जाईल तितके मूल उंच वाढते अशी समजूत आहे. हा विधी सांयकाळी करतात. यावेळी मैत्रिणी पाळण्याच्या पायाला चंदन घासतात व लाल रंगाचे दोरे बांधतात. पाळण्याच्या प्रत्येक कोपऱ्यात एक नारळ ठेवतात. त्याबरोबर जमिनीवर चण्याच्या भाकरी व विडे ठेवतात आणि अंगाई गीत गाताना त्या वस्तू मिळविण्याचा प्रयत्न करतात. त्यांनतर रात्रभर त्या स्त्रिया गायन नृत्यादी करमणुकीचे कार्यक्रम करतात.

मूल चार महिन्यांचे झाल्यावर ते टाळ्या वाजवू लागते. तेव्हा ते लाडू बांधते आहे असे म्हणतात (लड्डू बंधना) म्हणून यावेळी लाडू करतात, त्यावर प्रेषित महंमदाच्या नावाने फातिहा म्हणतात आणि नातलगांना बोलावून त्यांना लाडू देतात.

मूल सात महिन्यांचे झाल्यावर सांजा करतात (फिरनी). त्यावर मुहंमद मूर्तजाच्या नावाने फातिहा म्हणतात. बोटाच्या चिमटीत थोडा सांजा घेऊन मुलास चाखतात. यामागे मुलाची पिण्याची सवय तुटावी असा हेतू असतो. पण परंपरा मात्र मुलाला दोन ते अडीच वर्षे पाजले पाहिजे असे सांगते! परंतु हा काळ तीन ते चार वर्षेपर्यंत वाढवतात. गुजरातमध्ये या विधीस ‘बोटन’ (बोटा-मांसाचा तुकडा) किंवा ‘नमकचसी’ म्हणतात. कारण मुलाचा पिता यावेळी रुपयाच्या नाण्यावर थोडा दूधभात व मांसाचा तुकडा घेऊन मुलास चोखण्यासाठी देतो. ब्राहूई जमातीत दीड वर्षानंतर मुलाची व दोन वर्षानंतर मुलीची पिण्याची सवय तोडतात. मूल किती दिवस पिण्यासाठी आईला झटल हे पाहण्यासाठी ते एका भांड्यात पुष्कळ खारका ठेवून मुलास, तुला हव्या तितक्या घे असे सांगतात. त्याने किती खारका घेतल्या हे मोजतात व तितके दिवस ते पिण्यासाठी झटेल असे मानतात. [ब्रे, २४ तळटीप. मुलाला भरवण्याच्या समारंभासाठी पहा आर. स्मिथ, किनशिप, १५४; क्रॉले, १३६. अन्न प्रसन्न या हिंदुविधींबरोबर तुलना करा. मोनियर विलीयम्स, ब्राह्मणीझम अँड हिंदुइझम, ४ थी आवृत्ती, ३५८ तळटीप.]

दात येऊ लागण्याला दाँत निकलना किंवा घुंगनी म्हणतात कारण जेव्हा पहिला दात दिसतो तेव्हा घुंगनी नावाचा साखरेच्या पाकातला पदार्थ करतात व त्यावर फातिहा म्हणून वाटून टाकतात. हा विधी मुलाचा मामा करतो. उत्तर हिंदुस्थानमध्ये असा समज आहे की, मुलाचे दैव मामाच्या दैवाशी बांधले जाते. ज्या मुलाला प्रथम वरचा दात येतो ते मूल दुर्दैवी असा समज आहे. त्यामुळे त्याचे दुर्दैव टळावे म्हणून एक उपाय करतात. तो म्हणजे एका ताटात तांदूळ, तांब्याची नाणी, कापडाचा तुकडा व चार खिळे ठेवून गावाच्या वेशीबाहेर जातात. तेथे मुलाचा मामा जमिनीत चार खिळे ठोकून चौरस आकार करतो व ते ताट मुलाच्या दाताला लावून त्या चौरसात ठेवतो. या ठिकाणी बाळाला त्याची मावशी घेऊन आलेली असते. ती एका बाजूला तोंड झाकून बसते. आपला भाऊ काय करतो हे तिला पाहू देत नाहीत. या विधीनंतर मुलाचा मामा मूकपणे घरी जातो.

मूल टाळ्या वाजवू लागले व रांगू लागले (रेंगना) म्हणजे एक विधी करतात. यावेळी मुरमुऱ्याचे लाडू करून मित्रमंडळींना देतात आणि रात्रभर नाचगाणे हा कार्यक्रम करतात. ब्राहूई समाजात मूल चालायला शिकू

लागले म्हणजे मित्रमंडळींना बोलावतात व जमलेल्या मंडळींमध्ये पोळीचा तुकडा फेकून तो मुलाला उचलण्यास सांगतात. मुलाने तो उचलल्यावर त्याचा थोडा भाग प्रत्येकाला देतात. नंतर मित्रमंडळीला मेजवानी देतात. तुर्कस्तानमध्ये मूल चालू लागल्यावर त्याचा पिता, आजा किंवा त्याचे पालन करणारा अन्य कोणी आपल्या पटक्याने मुलाला मारून खाली पाडतात. अकबर चालू लागल्यावर ही तुर्की रुढी पाळली होती. [स्मिथ, अकबर, २१.] हे मुलाचे दैवी प्रकोपापासून रक्षण करण्यासाठी लावण्याच्या वनस्पती (इस्पंद,सिपंद) इतके चांगले आहे अशी समजूत आहे.

मुलगी एक-दोन वर्षांची झाली म्हणजे सोनाराकडून तिचे कान टोचून घेतात. एखाद्या वेळी न्हाव्याकडूनही कान टोचून घेतात. कान टोचल्याबद्दल त्याला खोबरेवाटीचे दोन तुकडे देतात व त्याच्या गळ्याला चंदन घासतात. मुलगी दोन-तीन वर्षांची होईपर्यंत तिच्या उजव्या कानाला तेरा आणि डाव्या कानाला बारा छिद्रं असलेली दिसतात. काहीजण कानाच्या पाळ्याच्या आजूबाजूलाही टोचतात परंतु दक्षिणेमध्ये बहुसंख्य लोक कानाला इतकी छिद्रे पाडणे रानटीपणाचे मानतात. [कान टोचण्याच्या सुरक्षात्मक प्रभावासाठी पहा-फ्रेझर, फोकलोअर ओटी., ३·१६५ तळटीपा हिंदुविधीसाठी-डुबीस, १५९; जनगणना अहवाल १९११, बेंगाल १·४४८, काश्मीर, १·१४४; मध्यप्रांत, १·१५७.]

अनुक्रमणिका

## प्रकरण चौथे

# धर्मदीक्षा, वाढदिवस

मुलगा किंवा मुलगी चार वर्षे चार महिने चार दिवसांची झाल्यावर ‘बिस्मिल्ला’ नावाचा विधी करतात. [ईआरई. २·६६६ तळटीपा.] या विधीच्या वेळीच मुलीची पहिल्यांदा वेणी (पलगुंडन, पहलूगुंडन) घालतात. म्हणून स्त्रिया वेणीला फार पवित्र मानतात. शपथ घ्यावयाची झाल्यास पुरुष जसे दाढीला हात लावतात त्याप्रमाणे स्त्रिया वेणीला हात लावून शपथ घेतात. बिस्मिल्ला विधीपूर्वी दोन तीन दिवस मुलास दररोज आपादमस्तक पिवळ्या रंगाचे कपडे घालतात. त्याला एका खोलीत चांदव्याखाली बसवतात. सुवासिनी प्रत्येक दिवशी सकाळी व संध्याकाळी त्याच्या अंगाला सुगंधी द्रव्ये लावतात. त्यावेळी वाजंत्री लावतात. या दोन तीन दिवसांच्या काळात मुलाला बाहेर हिंडू फिरू देत नाहीत. या विधीच्या या भागाला दक्षिण हिंदुस्थानात एका ठिकाणी बसणे (मन्जा बैठना) असे म्हणतात. बिस्मिल्ला या मुख्य विधीच्या आधले दिवशी पाहुणे मंडळींना निमंत्रण देतात. स्त्रियांना त्यांच्या घरी वेलदोडे पाठवून व पुरुषांना पत्र पाठवून निमंत्रण देण्याची पुढीलप्रमाणे पद्धत आहे: ‘मित्रांच्या उपकारकर्त्याला अभिवादन. या गरिबाच्या घरी त्याच्या मुलाला (मुलगी असेल तर तिला) या सायंकाळी परमेश्वराच्या नावाचा उच्चार शिकवावयाचा आहे (बिस्मिल्ला-ख्वॉनी). मी अशी विनंती करतो की, या समारंभात भाग घेऊन आपल्या उपस्थितीने समारंभाला शोभा आणावी व काही तरी खावे. असे केल्याने आपण माझ्यावर विशेष कृपा कराल. [ईआरई. २·६६६ तळटीपा.] विधीच्या दिवशी मुलास दुपारी स्नान घालतात. त्याच्या अंगावरील पूर्वीचा सुगंधी द्रव्याचा लेप पुसून काढतात. नंतर त्याला जरीचे कपडे घालतात. त्याला भेट म्हणून आलेला चांदी सोन्याचा ताईत त्याच्या गळ्यात घालतात व त्यांच्या अंगाला अत्तर लावतात. त्याच्या गळ्यात फुलांचा हार घालतात. मनगटाला गजरे बांधतात. तसेच कपाळाला सेहरा (सोन्याची तार) बांधतात. त्याला त्यानंतर कुटुंबाचा गुरू किंवा पूज्य विभूतीसमोर बसवतात. त्याच्या बाजूला मिठाईने भरलेले तबक ठेवतात. त्यात चांदी किंवा सोन्याचा वर्ख लावलेले दोन मोठे लाडू असतात. त्याशिवाय सोने, चांदीचा पत्रा, दौत, टाक या वस्तू असतात, या वस्तू विधीनंतर गुरूला देतात. धर्मगुरू या अन्नावर फातिहा म्हणतो व स्वत:च्या टाकाने त्या पत्र्यावर ‘दयाळू, कृपाळू परमेश्वराच्या नावे’ असे लिहितो. हे लिहिताना शाईऐवजी चंदन वापरतात. नंतर धर्मगरू मुलास पत्र्यावर लिहिलेले चाटण्यास सांगतो, त्याला लालूच म्हणून त्याच्या हाती ते मोठे लाडू देतो. कुराणचे पहिले प्रकरण लाल मिन्याच्या कागदावर लिहावे असाही नियम आहे. पण ज्यांची ऐपत आहे असे लोक चांदी किंवा सोन्याच्या पत्र्यावर लिहितात आणि मुलाच्या हाती देऊन त्याला प्रथम ‘दयाळू, कृपाळू परमेश्वराच्या नावाने’ हे शब्द, नंतर ९६ व्या प्रकरणाच्या आरंभीचे पुढील शब्द उच्चरण्यास सांगतात : “हे परमेश्वरा! रक्ताच्या एका थेंबापासून तू माणूस निर्माण केलास. तुझ स्मरण असो, हे परमेश्वरा, तू कृपाळू आहेस. जे मला ज्ञात नाही तेही तू शिकविले आहेस. लेखणीचा उपयोग शिकवला आहेस. प्रेषिताला ज्ञात झालेले हे कुराणातील पहिले वाक्य आहे म्हणून ते फार महत्त्वाचे मानतात. व म्हणूनच ते मुलांना शिकवितात. उत्तर हिंदुस्थानमध्ये हे शब्द चांदीच्या पाटीवर कोरतात मुलगा हे शब्द उच्चारल्या नंतर ती पाटी धर्मगुरूजवळ देतो. नंतर गुरूला भेटवस्तू देतात. त्यानंतर मुलगा आपल्या जागेवरून उठतो व प्रथम धर्मगुरू आणि नंतर उपस्थितांना नमस्कार करतो. या विधीत ज्या अन्नावर फातिहा म्हणण्यात आला ते अन्न व इतर पदार्थ पाहुण्यांना वाढतात. दुसऱ्या दिवशी पाहुण्या स्त्रियांना भेटवस्तू देऊन मेण्यातून घरी पाठवतात. ह्या विधीनंतर मुलास शाळेत घालतात. गुजरातमध्ये या विधीनंतर मुलाला संताच्या कबरीच्या दर्शनाला पाठवतात.

आणि तो परत आल्यावर सगळ्या स्त्रिया त्याची इडापिडा टळो म्हणून त्याच्या अंगावरून हात फिरवून त्याच्या कानशिलावर बोटे मोडतात (बलाएँ लेना).

कौटुंबिक विधीसाठी निमंत्रणे देण्याच्या पद्धतीला फार महत्त्व आहे. दक्षिण हिंदुस्थानात पुरुषांना पत्रे पाठवून व स्त्रियांना विलायची पाठवून निमंत्रण देण्याची पद्धत आहे. स्त्रियांना निमंत्रण देण्यासाठी, जिला बाजारात जाण्याची सवय आहे अशा एखाद्या स्त्रीची दूती म्हणून नेमणूक करतात. निमंत्रण देण्यासाठी ती स्त्री चांगले कपडे लेवून जाते. ती एका तबकात चंदन, विडे, गूळ, विलायची ठेवते व त्यावर गुलाबी कागद झाकते. नंतर ती सवाद्य निमंत्रण देण्यास निघते. ज्या स्त्रीला निमंत्रण द्यावयाचे असते तिच्या घरी जाऊन अत्यादराने नमस्कार करते. आणि पुढीलप्रमाणे निरोप कळविते. ‘अमुक अमुक स्त्री (तिचे नाव घेऊन) आपणास शुभेच्छा पाठवते, आलिंगन देते आणि कळविते की, उद्या तिच्या घरी होणाऱ्या समारंभ प्रसंगी तिच्या मैत्रिणींनी आपल्या उपस्थितीने गरिबाच्या घरी पायधूळ झाडावी व त्यामुळे घराला फुलांचा बगीचा बनवावा. म्हणून तुम्ही निश्चित या आणि तास दोन तास राहून आपल्या सहवासाने तिच्या नम्र घराचा सन्मान करा.’ त्या स्त्रीने निमंत्रण स्वीकारले तर ही दूती त्या स्त्रीच्या मानेला, छातीला चंदन घासते आणि तिच्या वाट्याचा गूळ व विलायची तिच्या तोंडात घालते. किंवा नागवेलीच्या पानावर देते. त्या स्त्रीने निमंत्रणाचा स्वीकार न केल्यास तिच्या मानेला चंदन घासते व विडा देते पण गूळ व विलायची देत नाही. निमंत्रण देणारी ही दूती शेवटी घरी परत आल्यावर ज्या स्त्रियांनी निमंत्रण स्वीकारले त्यांची नावे यजमानणीस सांगते. या स्त्रियांना दुसऱ्या दिवशी आणण्यासाठी डोली (मेणा) पाठविण्यात येते. यजमानीण गरीब असल्यास ती मोलकरणीच्या हाती या स्त्रियांना सूर्योदयापूर्वी थोडा वेळ आधी बोलावून घेते.

जेव्हा निमंत्रित स्त्रिया येतात तेव्हा यजमानीण स्वतः दरवाजापर्यंत जाऊन स्वागत करते आणि त्यांना घरात आणून सतरंजीवर बसवते. समारंभ विशेष महत्त्वाचा नसल्यास मोलकरणीच्या हाती केवळ तोंडी निमंत्रण देतात.

पाहुण्यांनी प्रसंगाला शोभेशी भेट आणावी अशी अपेक्षा असते. आधी वर्णन केलेल्या छटी (सटवी) किंवा चाळिसाव्या दिवशीच्या विधीच्या वेळी पाहुणे सामान्यपणे गळ्यातला हार (हन्सली), कडे, टोपी, साडी, चोळी, विड्याची पाने, सुपारी, चंदन, फुले, इत्यादी वस्तू देतात. बिस्मिल्ला विधीच्या वेळी लाल दोऱ्यांत ओवलेला सोने किंवा चांदीचा ताईत, चोळीसाठी मखमलचे कापड, विडे, फुले, चंदन, मिठाई या वस्तू देतात. लग्नप्रसंगी शाल, मखमलचे कापड, साडी, चोळी, पटका, मिठाई इत्यादी वस्तू आणतात किंवा केवळ विडे, केळी व नारळच आणतात. श्रीमंत लोक भेटवस्तू वाजत गाजत आणतात. गरीब लोकांना मूल्यवान भेटी देता आल्या नाहीत तरी ते निदान चोळीचे कापड, मिठाई, विडे, फुले, चंदन या वस्तू देतात. आणि जर कोणी कोणतीच वस्तू आणली नसेल तर मूल किंवा यजमानिणीच्या हातात रुपया दोन रुपये ठेवावे अशी अपेक्षा असते.

वाढदिवस मोठ्या आनंदाने साजरा करतात. वाढदिवसाला नातलगांना निमंत्रित करतात. मुलास कुटुंबप्रमुखाइतके आयुष्य लाभावे म्हणून मेजवानीच्या अन्नावर प्रेषित व पिता नूह (नोआ) यांच्या नावाने फातिहा म्हणतात. नंतर एखादी वृद्ध स्त्री लाल किंवा पिवळ्या दोऱ्याला एक गाठ मारते. या गाठीला मूळचे

मुसलमान ‘वर्षगाठ’ तर धर्मांतरित हिंदू ‘जन्मगाठ’ म्हणतात. मुलाची आई हा दोरा सुरक्षित ठेवते व पुढच्या वाढदिवसाच्या वेळी काढते. मुलीच्या वाढदिवशी तिच्या गळसरीत एक चांदीची कडी वाढवितात. गळसरीतील कड्यावरून तिच्या वयाची कल्पना येते. पाहुणे मंडळींना ह्या प्रसंगी मेजवानी देतात. त्यांच्या मनोरंजनासाठी मनोरंजनपर कार्यक्रम करतात. ही पद्धत हिंदुकडून उचललेली आहे असा समज आहे. आणि बहुधा अकबराने आपल्या जनानखान्यातील हिंदु स्त्रियांकडून ही पद्धत स्वीकारली असे म्हणतात. अकबराने आपल्या वाढदिवशी आपली तुला सोने व इतर मूल्यवान वस्तुंनी करविली होती. या वस्तू नंतर गरिबांना वाटून टाकण्यात आल्या. औरंगजेबाच्या वेळी राजपुत्र व राजकन्या यांच्या वाढदिवशी पिवळ्या दोऱ्याला गाठ मारीत असत. दक्षिणेत यासारख्या प्रसंगी लोक दारू पितात असे (मूळ लेखक) जफर शरीफ यांचे म्हणणे आहे. ‘जरी जनात स्त्रिया तसेच पुरुष फक्त पाणी, शरबत किंवा दूध पितात तरी कुराणात निषिद्ध मानले असले तरी खाजगीत मादक पेये सामान्यपणे घेतात. स्वतःची सुटका करून घेण्यासाठी ते फळाचा म्हणजे द्राक्षाचा रस पिण्यात काहीच अपाय नाही असे म्हणतात.’

**प्रकरण पाचवे**

## सुन्ता

सामान्यपणे सात ते चौदा या वयात मुलाची सुन्ता (खतना, सुन्नत, सिंधमध्ये सथ्र, तोहारु) करतात. परंतु जन्मानंतर सात दिवसांनी हा विधी करणे धर्मशास्त्राला धरून आहे. अकबराने बारा वर्षे होण्याआधी मुलाची सुन्ता करण्यास मनाई केली होती व त्यानंतरही तो विधी मुलाची इच्छा असल्यास करावा असे म्हटले होते [आईन, १·२०७.].

ह्या विधीच्या दोन-तीन दिवस अगोदर मुलाच्या अंगाला हळद लावतात व या काळात त्याला घराबाहेर जाऊ देत नाहीत. दक्षिण हिंदुस्थानात याला एके ठिकाणी बसविणे (मन्जा बैठना) म्हणतात. ज्या दिवशी हा विधी करावयाचा असतो त्या दिवशी मित्रमंडळीला बोलावतात. मुलास पिवळ्या रंगाचे कपडे घालतात व त्याच्या गळ्यात फुलांचा हार आणि हाताला गजरे बांधतात. त्याच्या दाताला दारसिना लावतात. पुरुषाच्या दाताला दारसिना लावण्याचा हा त्याच्या आयुष्यातील एकमेव प्रसंग असतो. यानंतर मुलाची गावात मिरवणूक काढतात. काही लोक हा विधी झाल्यानंतर मिरवणूक काढतात व नंतर मेजवानी देतात. या विधीच्या वेळी मुलास एका पालथ्या मडक्यावर किंवा एका खुर्चीवर लाल रुमाल टाकून बसवतात. शस्त्रक्रिया करण्यापूर्वी काही तास अगोदर मुलाला गांजाची भूल देतात. प्रत्यक्ष शस्त्रक्रिया करताना काहीजण मुलाला घट्ट धरून ठेवतात व न्हावी तीक्ष्ण वस्तऱ्याने शस्त्रक्रिया करतो. मुलाचे चित्त शस्त्रक्रियेपासून विचलित व्हावे म्हणून त्यास न्हाव्यास मारण्यास सांगतात. एकजण विडा चावून लाल थुंकी जखमेवर टाकतो आणि रक्तस्राव झाला नाही, हा थुंकीचा रंग आहे असे मुलास पटवतो. ही शस्त्रक्रिया चालू असताना ब्राहूई माता आपल्या डोक्यावर जातं ठेवून उभी राहते तर नात्यातील स्त्री डोक्यावर कुराण घेऊन उभी राहते. मरी नावाच्या जमातीत मुलाची माता यावेळी डोक्यावर जात्याची वरची पाळू ठेवून उभी राहते व इतर स्त्रिया तिच्या भोवती उभ्या राहून गाणी म्हणतात. जात्यावर लाल माती, तांदूळ टाकलेले असतात. शिवाय एका फडक्यात लोखंडी कडी, हिरवा मणी, लाल कापडाचा तुकडा ठेवून त्याची लाल दोऱ्याने बांधलेली पुरचुंडी ठेवतात. सिंधमध्ये मुलाची माता यावेळी आपल्या डोक्यावर दगड ठेवून उभी राहते आणि एखादा पुरुष नातलग त्या दगडावर पाणी ओततो. काही वेळा मुलाचा बाप डोक्यावर कुराण ठेवून पाण्यात उभा राहतो. यामागे शस्त्रक्रिया करताना मुलाला सामर्थ्य प्राप्त व्हावे असा उद्देश असल्याचे दिसते. शस्त्रक्रिया झाल्यानंतर कापल्या गेलेल्या कातड्याची फार काळजी घेतात. कारण मुलाला चेटूक होण्याची भीती असते असे म्हणतात. वायव्य सरहद्द प्रांतातील पठाण लोक ती कातडी घरात ओलसर जागी पुरतात. यामागे कातडी वाढून मुलाला सामर्थ्य प्राप्त होईल असा विश्वास असावा, असे दिसते. पंजाबच्या काही भागातील लोक ही कातडी घराच्या छतावर फेकून देतात किंवा एखाद्या काडीला बांधतात. दिल्लीमंध्ये ही कातडी मोराच्या पंखाला बांधून ते पंख मुलाच्या पायाला बांधतात. त्यामुळे मुलाला चेटूक होत नाही, असे म्हणतात. ब्राहूई जमातीतील काही लोक ही कातडी मुलाला संतती व्हावी या उद्देशाने हिरव्या झाडाखाली पुरतात किंवा जखमेच्या वेदना कमी व्हाव्या म्हणून ओलसर ठिकाणी पुरतात.

शस्त्रक्रियेनंतर न्हावी जखमेवर पट्टी बांधतो. ही जखम सामान्यपणे एखाद्या आठवड्यात बरी होते. ह्या विधीच्या वेळी मुलाच्या शेजारी ज्या तांदूळ आदी वस्तू ठेवलेल्या असतात त्या नंतर न्हाव्याला देतात. पण

अनुक्रमणिका

मुलाला खुर्चीवर बसवले असेल तर खुर्ची मात्र देत नाहीत. सिंधमध्ये न्हाव्याला द्यावयाचे बक्षीस मुलाच्या पायाखाली ठेवतात. न्हावी ते घेतो. या विधीसाठी जमलेली मित्रमंडळी मुलाच्या डोक्यावरून पैसे ओवाळून न्हाव्याच्या ताटात टाकतात.

काही लोक सुन्ता करताना एका मुलाची करीत नाहीत तर त्याचबरोबर दुसऱ्या एका मुलाचीही करतात. कारण ज्यांची सुन्ता करावयाची त्या मुलांची संख्या सम असावी नाही तर सुन्ता निषिद्ध होते असे म्हणतात. म्हणून एक किंवा तीन मुलांची सुन्ता करावयाची असेल तर एखाद्या गरिबाच्या मुलाचीही करतात. आणि असा एखादा मुलगा उपलब्ध झाला नाही तर त्याऐवजी बदन्याच्या तोटीत विडा ठेवतात व न्हावी ती तोटी कापतो. शस्त्रक्रियेच्या वेळी मुलास लघवी आली तर चांगली, कारण त्यामुळे लघवीचा मार्ग मोकळा होतो असे म्हणतात. कुत्रा, मांजर, विटाळशी स्त्री यांसारख्या अपवित्र वस्तूंचा मुलाला स्पर्श होणार नाही याची दक्षता घेतात. मुलाला मुंग्यांचा उपसर्ग पोचू नये म्हणून त्याच्या बिछान्याभोवती धूर करतात किंवा बाजेचे ठावे पाण्याने भरलेल्या वाटीत ठेवतात. मुलाच्या मनगट, मान किंवा बोटाला निळ्या दोऱ्याने मोराचा पंख, तांब्याची अंगठी (छल्ला) बांधतात तसेच सुरक्षात्मक म्हणून ऊद जाळतात.

पंजाबमधील काही जमातींत, वायव्य सरहद्दीवरील प्रदेशात व त्याही पलीकडील प्रदेशात स्त्रियांची सुन्ता करतात. परंतु या प्रकरणाच्या स्वरूपावरून त्याबाबतीत पुरावा गोळा करणे कठीण आहे. काही मुसलमान जाट या उद्देशाने स्त्रियांची सुन्ता करीत नाहीत तर केवळ धार्मिक कृत्य म्हणून करतात [ब्रे, तळटीप, जनगणना अहवाल बलुचिस्तान, १९११, १·६१, १०७. पंजाबमधील केहाल टोळीतील लोक तरुण पत्नीची, जर ती लग्नानंतर पहिल्या सहा महिन्यात गरोदर न राहिल्यास, सुन्ता करतात.]. ब्राहूई लोक वांझपणाचा शाप दूर करण्यासाठी स्त्रीची सुन्ता करतात. बहावलपूर संस्थानात व बलुचिस्तानमधील मरी जमातीतही ही रूढी आहे. या रूढीच्या खरेपणाविषयी मतभेद आहेत. ही रूढी बहुधा इजिप्त आणि सुदानमधून पूर्वेकडे आली असावी असे दिसते.

अनुक्रमणिका

**प्रकरण सहावे**

## वाढ व शिक्षण

बलुचिस्तानमध्ये मुलाला तो तीन वर्षांचा झाल्यावर तर मुलीला दोन ते चार वर्षे या वयात विजार घालतात. मुलाचा पहिला दात पडल्यावर त्याला येणारा नवा दात शुभ्र व सरळ असावा म्हणून मीठ व कडू तेलाने त्याचे तोंड धुतात. 'हे कावळ्या! तुझे दात काळे व माझे पांढरे, हे कावळ्या! तुझे दात वाकडे, माझे सरळ आहेत असे उड्या मारून, ओरडून म्हण, असे त्याला सांगतात. [ब्रे, ३१ तळटीप हिंदुलोक जेव्हा मुलाचे दात पडतात तेव्हा ते छतावर फेकतात-जेथे उंदीर व घुशींचा उपद्रव नसतो. हे या आशेने करतात की नवे दात या प्राण्यांसारखे शुभ्र व योग्य आकाराचे होतील.]

मुलाने अगर मुलीने आरंभापासून शेवटपर्यंत कुराणचे वाचन पूर्ण केल्यावर त्याचे कौशल्य दाखविण्यासाठी व गुरुला दक्षिणा देण्यासाठी, मागे मुलाचे नाव निवडण्यासाठी दिलेल्या तक्त्यावरून, शुभ दिवस निश्चित करतात. मित्रांना निमंत्रित करतात व आता कुराण वाचण्यायोग्य झालेल्या मुलाला (कुराण ख्वॉन) उत्तम कपडे घालतात व त्याच्या हातात कुराण देऊन त्याला पुरुषांच्या खोलीत बसवतात. गुरुला देण्यासाठी आहेराचा पोशाख (खिलत) व इतर वस्तू बाजूला काढून ठेवलेल्या असतात. त्या मुलाला कुराणचे पहिले प्रकरण, दुसऱ्या, छत्तिसाव्या आणि पंचावन्नाव्या प्रकरणांचा काही भाग वाचावयास सांगतात. नंतर गुरू अन्नावर प्रेषिताच्या नावाने फातिहा म्हणतो व मुलास त्या अन्नाचा वास घेण्यास सांगतो. त्यानंतर तो मुलाला, 'पवित्र कुराण शिकविताना मला झालेल्या त्रासाबद्दल मी तुला क्षमा करतो आणि मी शिकविलेले कुराणचे ज्ञान तुला आनंदाने अर्पण करतो' असे म्हणतो. कुराणातील सगळा आशय अन्नावर पडल्यामुळे ते पवित्र झालेले असते. हे अन्न नंतर मित्रमंडळींना वाटतात व गुरुला दक्षिणा देतात.

ह्या समारंभाव्यतिरिक्त लग्न, मेजवानी यांसारख्या प्रसंगीही गुरुला दक्षिणा देतात. (मूळ लेखक) जफर शरीफ म्हणतो की, गुरुला पित्याइतका मान देतात. कारण मुलाला जन्मदाता पिता, गुरू, सासरा आणि धर्मगुरू (मूर्शद) असे चार बाप असतात, असे मानतात. शिवाय प्रेषितांनी असे आश्वासन दिले आहे की, एखाद्याने परमेश्वराला पापक्षालनासाठी प्रार्थना केली तर (दुवा-ए-मसूर) मुलाचे आईवडील व गुरू यांच्यासाठी परमेश्वर ती प्रार्थना ऐकतो. शाळेत जाणाऱ्या मुलांच्यासाठी गुरू सोनेरी कागदावर (जर-इ-फिशान) ईदी (ईदची प्रार्थना) किंवा मुलाला आशीर्वाद लिहून देतो. व तो कागद आपल्या आईवडिलांना वाचून दाखवा असे सांगतो. मुलाचे आईवडील या मोबदल्यात गुरुला भेटवस्तू पाठवतात. अशा भेटवस्तू आखिरी-चार शंबा, शबेबरात, रमजान व बकरी ईद या सणांच्या वेळी देतात. उत्तर हिंदुस्थानातील मुस्लीम शाळांमधील विद्यार्थी शुक्रवारच्या सुटीच्या दिवशी आपल्या गुरुला दिवाबत्तीसाठी (चिरागी) पैसे देतात. संताच्या कबरीजवळ जो दिवा लावतात त्याच्या दिवाबत्तीसाठी खर्च करण्यात येणाऱ्या पैशाला व जुगारअड्डयाचा मालक आपल्या जागेसाठी जी दलाली घेतो त्या पैशालाही 'चिरागी' असेच नाव आहे.

कुराणाचे तीस विभाग (जझ, सिपारे) आहेत. प्रत्येक विभागाच्या आरंभी व शेवटी गुरुला दक्षिणा देण्याची पद्धत आहे. याला 'हदिया' म्हणतात. त्यातही चार प्रसंग विशेष महत्त्वाचे आहेत. ते म्हणजे पाव, अर्धा, तीन चतुर्थांश व संपूर्ण कुराण यांची समाप्ती हे होत. यातही संपूर्ण कुराणच्या समाप्तीचा प्रसंग सगळ्यात

अनुक्रमणिका

महत्त्वाचा आहे असे मानतात. शिवाय मुलगा जेव्हा नवे पुस्तक शिकायला आरंभ करतो तेव्हाही गुरुला भेटवस्तू, मिठाई, पान, पैसे देण्याची पद्धत आहे. यावेळी शिक्षक मुलाने आणलेल्या भेटवस्तूवर फातिहा म्हणतो आणि मुलाच्या व क्वचित स्वतःच्याही गळ्याला चंदन घासतो किंवा या वस्तू हातात घेऊन त्यांचा वास घेतो व आशीर्वचन (दुरूद) म्हणतो. नंतर मुलाला पुस्तक वाचायला सांगतो आणि त्यानंतर अर्ध्या दिवसाची सुटी देतो. मुलांची संख्या जास्त असल्यास प्रत्येक वेळी अर्ध्या दिवसाची सुटी देण्यापेक्षा गुरुवार या नेहमीच्या अर्ध्या दिवसाच्या सुटीच्या दिवशी दोन किंवा अधिक मुलांच्या भेटवस्तू एकाच वेळी फातिहा म्हणून तो स्वीकारतो.

थोडक्यात म्हणजे गुरुला वंदन करण्याची प्रत्येक संधी साधतात. कारण त्याच्या पवित्र मुखातून बाहेर पडलेले आशीर्वादाचे शब्द शंभर पुस्तके वाचून मिळणाऱ्या ज्ञानाइतक्या मोलाचे असतात असे मानतात. गुरूने एखाद्याला शाप दिला तर शंभर पुस्तके वाचली तरी त्याचा काही उपयोग होत नाही असे म्हणतात. इतकेच नव्हे तर धर्मशास्त्र, परमेश्वर व त्याचा प्रेषित यांची शिकवण आणि धर्माच्या तत्त्वाचे स्पष्टीकरण गुरू करीत असल्यामुळे तेवढ्या हद्दीपर्यंत तरी तो जन्मदात्यापेक्षा मोठा नसला तरी बरोबरीचा असतो असे मानतात. आईवडील लौकिक अर्थाने मुलाची फक्त शारीरिक वाढ करतात तर गुरू त्याची आत्मिक वाढ करतो.

अनुक्रमणिका

**प्रकरण सातवे**

# यौवनप्राप्ती

मुलीस जेव्हा प्रथम रजोदर्शन होते तेव्हा ती वयात आली असे म्हणतात (बालिग होना). या काळात तिला स्नान करता येत नाही. तसेच वडीलधाऱ्यांच्यामध्ये मिसळता येत नाही. मासिक पाळीला विटाळ येणे (हैझ आना), नहाण्याची वेळ येणे (निहान आना), डोके मलीन होणे (सिर मैला होना), प्रार्थना करण्यासाठी शूचिर्भूत नसणे (बेनमाजी आना), अपवित्र होणे (नापाक होना) असे म्हणतात. मुली सामान्यपणे बाराव्या वर्षी वयात येतात. आणि चाळीस किंवा काही स्त्रियांच्याबाबत पंचेचाळीस वर्षेपर्यंत त्यांचा हा विटाळ चालू राहतो [श्रीमती मीर हसन अली, १८५ एन. चिव्हर्स, मेडिकल ज्युरीसप्रुडन्स इन इंडिया, ६७१.]. दक्षिण गुजरातमध्ये मुलगी वयात येताच गुप्तपणे 'ओढनी उडाना' हा समारंभ उरकून टाकतात. बलुची माता आपल्या मुलीचे स्तन मोठे होऊ नयेत व त्यात दूध साठू नये म्हणून ते राख व मीठ यांनी चोळते. आणि मुलीला जेव्हा प्रथम रजोदर्शन होते तेव्हा तीन दगड त्रिकोणी ठेवून त्यावरून मुलीस उडी मारण्यास सांगते. याचा उद्देश तीन दिवसांपेक्षा अधिक विटाळ राहू नये हा असतो. जास्तीत जास्त पाच किंवा सहा दिवस विटाळ असतो. दक्षिण हिंदुस्थानमध्ये मुलगी वयात आल्यावर घरातल्या व शेजारच्या सात किंवा नऊ सुवासिनी दुपारी जमतात व यांपैकी प्रत्येकजण मुलीच्या अंगाला सुगंधी द्रव्य (चिक्सा) लावते, गळ्यात फुलांचा हार घालते व सुगंधी तेल (फुलेल का तेल) चोळते. यानंतर या मुलीला एका खोलीत बसवतात. सुवासिनी थोडा वेळ गाणी म्हणतात व आपापल्या घरी जातात. सात दिवसपर्यंत मुलीला त्या खोलीबाहेर जाऊ देत नाहीत, कोणत्याही प्रकारचे काम करू देत नाहीत किंवा स्नान करू देत नाहीत. या काळात तिला जेवायला फक्त खिचडी देतात. मासे, मांस, मीठ, आम्ल पदार्थ वर्ज्य असतात. सातव्या दिवशी मुलीला न्हाऊ घालण्यासाठी सुवासिनींना बोलावतात. आधी त्या सुवासिनींची ओटी भरतात. नंतर त्या सुवासिनी मुलीच्या डोक्यावर चांदव्यासारखा लाल कपडा धरतात. साधा किंवा नक्षीदार बदना घेऊन त्याच्या गळ्याला दोऱ्याने नागेलीची पाने बांधतात. नंतर प्रत्येक सुवाशीण त्या बदन्याने मुलीच्या डोक्यावर दोन वेळेस पाणी टाकते. त्या दिवशी सायंकाळी मेजवानी देतात. मुलीला बांगड्या घालतात व नवे कपडे लेववतात. भुताखेतापासून मुलीचे रक्षण व्हावे म्हणून रात्रभर जागरण करतात. मुलीचे लग्न झाले असेल पण फलशोभन झाले नसेल-हे अगदी संभवनीय आहे, कारण मुसलमान समाजात मुलगी वयात आल्याशिवाय तिचे लग्न करीत नाहीत-तर तिचा पती यावेळी तिला आपल्या घरी नेतो व विवाहाची परिपूर्ती करतो. यावेळी मुलीच्या नवऱ्याला नव्या कपड्यांचा आहेर करतात. व दोघांनाही फुलांचे हार घालतात. परंतु खालच्या वर्गातील लोकच फक्त याची जाहीर वाच्यता करतात.

मुलास जेव्हा वयाच्या बाराव्या, तेराव्या, चौदाव्या किंवा पंधराव्या वर्षी, किंवा काही म्हणतात त्याप्रमाणे अठराव्या वर्षी स्वप्नदोषाचा अनुभव येतो तेव्हा प्रार्थना, उपवास, दान, धार्मिक स्थळांची यात्रा याबाबतीत धर्माची कर्तव्ये स्वीकारली पाहिजेत (मुलीसाठीही हा नियम आहे). या काळापूर्वी म्हणजे किशोरावस्थेत त्यांची सत् अगर असत् कृत्ये यांची जबाबदारी त्यांच्या आईवडिलांवर असते. पण यानंतर त्यांच्या कृतींबाबत ते जबाबदार असतात. जेव्हा मुलाला स्वप्नदोष झाल्याचा अनुभव येतो त्याने त्यानंतर दुसरे दिवशी सकाळी स्नान केलेच पाहिजे. कारण स्नान करून जोपर्यंत तो शुचिर्भूत होत नाही तोपर्यंत त्याला जेवणे, प्रार्थना करणे, कुराणाला स्पर्श करणे, मशिदीत जाणे या गोष्टी निषिद्ध असतात. स्वप्नदोष (इहतिलाम), संभोग (जिमा),

अनुक्रमणिका

मासिक पाळी (हैझ), बाळंत होणे इत्यादीनंतरही स्नान करावेच लागते. कारण त्याशिवाय वर सांगितलेल्या गोष्टी करणे निषिद्ध असते. पहिल्या व दुसऱ्या प्रकाराने आलेल्या अशुद्धतेनंतर करावयाचे स्नान दुसरे दिवशी सकाळी ९ ते १० पर्यंत लांबणीवर टाकू शकतो. स्वप्नदोषानंतर करावे लागणाऱ्या स्नानाचा नियम अकबराने रद्द केला. बाळंतिणीस स्राव चालू असेपर्यंत स्नान लांबणीवर टाकता येते. पण काही अडाणी स्त्रियांनी बाळंतिणीच्या स्नानासाठी चाळिसावा दिवस निश्चित केला आहे. स्नान पुढीलप्रमाणे करतात. तो मुलगा अगोदर अंगावर थोडे पाणी घेतो व यावेळी म्हणावयाच्या प्रार्थना म्हणतो. नंतर तो तोंडात पाणी घेऊन खळखळून तीन वेळा चूळ भरतो व नंतर सर्वांगावरून पाणी घेऊन स्नान करतो आणि अरबी भाषेतील पुढील वाक्य म्हणतो. 'ह्या स्नानाने प्रार्थनेसाठी माझे शरीर पवित्र व्हावे, त्यातील घाण, मालिन्य निघून जावे अशी माझी इच्छा आहे'. काही अडाणी लोक या पद्धतीने स्नान न करता क्रमाने डोके, उजवा खांदा, डावा खांदा यावर तीन तीन तांबे पाणी घेतात, नंतर हातात थोडे पाणी घेऊन आशीर्वचन म्हणून अगर न म्हणताच ते पाणी कपड्यावर शिंपडतात व कपडे शुद्ध झाले असे म्हणतात. स्नानासाठी पाणी शुद्ध व भरपूर असले पाहिजे, त्यात सर्वांग भिजले पाहिजे असा नियम आहे. म्हणूनच अरब लोक स्नान करताना पाण्यात बुडी मारतात.
[आयबीड.४·१५३ खरे सांगायचे तर वाहत्या पाण्यात स्नान केले पाहिजे, आणि म्हणून मुसलमान यासाठी बदना वापरतात.]

अनुक्रमणिका

## प्रकरण आठवे

# विवाह

प्रत्येक मुसलमानाने लग्न केले पाहिजे अशी प्रेषितांची आज्ञा होती आणि ब्रह्मचर्याचा त्यांनी धिक्कार केला होता. पण पुष्कळदा दारिद्र्य व इतर कारणांमुळे अनेकांना लग्न करणे जमत नाही. मुस्लीम समाजात 'अविवाहितांचे प्रमाण विवाहित व विधुरांपेक्षा जास्त आहे. शेकडा ५३ पुरुष अविवाहित, ४३ विवाहित व ४ विधुर आढळतात. तर शेकडा ३८ स्त्रिया अविवाहित, ४७ विवाहित व १५ विधवा आढळतात. अल्पवयीन मुलामुलींच्या लग्नातील प्रमाणात फारच लक्षणीय फरक आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात ५ वर्षांखालील विवाहित मुस्लीम मुलींचे प्रमाण हिंदु मुलींच्या $\frac{१}{४}$ पेक्षा फारसे जास्त नाही. ५ ते १० या वयातील हेच प्रमाण निम्मे असल्याचे दिसते. १५ ते २० या वयातील विवाहित मुस्लीम व हिंदु मुलींचे प्रमाण मात्र सारखेच आहे. पण वयाच्या २० वर्षांनंतर ज्यांचा विवाह झाला अशा दोन्ही समाजांतील मुलींमध्ये मुस्लीम मुलींची संख्या तुलनेने अधिक आहे. मुस्लीम समाजात सर्व वयांतील विधवांचे प्रमाण हिंदु विधवांपेक्षा कमी असते पण त्यातही तरुण विधवांचे प्रमाण फारच कमी असते. त्याचे कारण मुस्लीम विधवांना तरुण हिंदु विधवांपेक्षा अधिक सुलभपणे पुनर्विवाह करता येतो. मुसलमानांमध्ये विधवांच्या पुनर्विवाहाच्या विरोधी बऱ्याच जमातींत, विशेषतः स्थानिक धर्मांतरित जमातींत पूर्वग्रह अस्तित्वात आहे [जनगणना अहवाल, भारत, १९११, १·२६६].

आई, आजी, सख्खी किंवा सावत्र बहीण, भाची, पुतणी, मावशी, आत्या यांच्या बरोबर विवाह करणे वर्ज्य आहे. त्याचप्रमाणे सासू, दूधबहिणी, नाती, पत्नी हयात असेल तर तिला घटस्फोट दिल्याशिवाय मेहुणी, जिचा प्रथम पती हयात असून घटस्फोटाला तीन महिने उलटले नाहीत किंवा जी विधवा असल्यास जिच्या वैधव्याला चार महिने दहा दिवस उलटले नाहीत अशी स्त्री आणि ज्यू व ख्रिश्चन सोडून अन्य धर्माची म्हणजे अनेकेश्वरवादी स्त्री यांच्याशी लग्न करणे वर्ज्य आहे.

'पुरुषाने पहिले लग्न आपल्याच जमातीच्या व सामाजिक दृष्ट्या आपल्या दर्जाच्या कुमारिकेशी करावे असे मानतात. यानंतरच्या विवाहाबाबत मात्र त्याच्यावर कोणतेही बंधन नसते. जवळच्या नातलगाबरोबर विवाह करणे वर्ज्य असले तरी चुलतभावंड, आतेभावंड, मामेभावंड यांच्याशी लग्न करणे अधिक चांगले असे मानतात. आणि हे न जमल्यास ज्या घराण्याशी पूर्वीचा लग्नसंबंध आहे त्या घराण्यातील व्यक्तीबरोबर लग्न करणे पसंत करतात. चुलत भावंड, आते भावंड, मामे भावंड यांच्याशी विवाह करण्यामागे कुटुंबात परक्या रक्ताचा प्रवेश होऊ नये आणि नवदांपत्याला वारस म्हणून मिळालेली संपत्ती कुटुंबातच राहावी असा हेतू आहे असे म्हटले जाते.' [जनगणना अहवाल, भारत, १९११, १·२५२. बर्टन, पिलिग्रिमेज, २·८४ नियम हे जीवशास्त्रीय नव्हे तर सामाजिक योग्यतेवर अवलंबून असतात, ईआरई. ४·३०; ८·४२५ तळटीप. चुलत, मामे आदी भावंडांच्या परस्परातील लग्नासाठी पहा—रिव्हर्स, जेआरएएस. १८९७ पृष्ठ ६४ तळटीपा; फेझर, फोकलोअर इन ओटी. २·९९ तळटीपा.]

लग्न सामान्यतः हुंडा पद्धतीने किंवा करार पद्धतीने (मेहर, सद्गा नूल) होते. 'करार' म्हणजे धर्माच्या कायद्याने पत्नीचा सन्मान राखण्याबद्दल पतीवर लादलेली अट. स्त्रीस विकत घेऊन लग्न करण्याची पद्धत नाही. पण गुजरातमधील खोजा जमातीत नवऱ्या मुलाचा बाप आपल्या व्याह्याला सव्वा पाच रुपये देतो. हे पैसे नंतर अन्न छत्राला (जमियतखाना) देण्यात येतात. अरब लोकातही हीच पद्धत रूढ आहे. काही जमातींत

जसे-ब्राहूई जमातीत दोन जावा एकाच वेळी गरोदर असल्यास त्या एकीला मुलगा व दुसरीला मुलगी झाल्यास त्यांचे लग्न करण्याचे कबूल करतात. त्याप्रमाणे काही उदाहरणे आढळतात. शिया लोकांना अल्प मुदतीचा विवाह मान्य आहे (निका-इ-मुवक्कत). प्रेषितांनी नंतर काही विशिष्ट परिस्थितीत अशा प्रकारच्या विवाहाला मान्यता दिली असली तरी आरंभी वर्ज्य मानले होते. [कुराण, ४·२८; मिश्कत, २·८८, ९० ऑईन; १·१७४; साल, ८४; ब्राऊनो, ए इअर, ४६२; इब्न खाल्दून, ४·३७, हार्टलँड, प्रिमिटिव्ह पॅटरनिटी, २·६; ईआरई=३·८१५ फिरोझ शाह बहमनीने (इ.स. १३९७-१४२२) या मुद्द्यावर मतभेद उपस्थित केला. सुन्नी सत्पुरुषांनी त्याचा कायदेशीरपणा अमान्य केला. शियांनी ह्यास प्रेषित व पहिल्या खलिफाच्या काळात मान्यता होती असे समर्थन केले. तसेच हा जरी दुसऱ्या खलिफाने रद्द केला तरी तो कायदेशीर होता असे समर्थन केले. राजाने शियांची विचारसरणी मान्य केली आणि आपल्या जनानखान्यात एका दिवसात तीनशे स्त्रिया स्वीकारल्या (फेरिश्ता, २·३६४ तळटीप).] वधू पक्षाने, नवरा मुलगा लग्नसमयी वधूगृही आला असता त्याला खरा किंवा खोटा विरोध केल्यामुळे तो वधूला तिच्या घरून नेतो व तिच्याशी विवाह लावतो, या विवाहाला ढोबळमानाने ‘जबरदस्तीचा विवाह’ असे म्हणतात. पण हे बरोबर नाही. अशी उदाहरणे पठाण, खत्तक, वजिरी या जमातींत आढळतात. वजिरीमध्ये या विरोधाच्या वेळी तलवारीची खणाखणी होते. दिल्लीच्या शाही घराण्यात नवरा मुलगा विवाहासाठी वधूगृही आल्यावर त्याला खोटा खोटा विरोध करावा असा नियम होता. खोटा प्रतिकार करण्याची ही पद्धत बहुधा अनिष्ट शक्तींना परावृत्त करण्यासाठी रूढ झाली असावी असे दिसते.

अनुरूप, सुंदर, श्रीमंत अशी वधू शोधण्यासाठी तीन-चार स्त्रियांना मध्यस्थ म्हणून पाठवतात आणि ह्या कार्यात त्यांना यश मिळाल्यास त्याना इनाम देतात. वधू शोधताना तिचे कूळ, दर्जा, वैयक्तिक योग्यता यांना विशेष प्राधान्य दिले जाते. वधू तरुण असावी, वरापेक्षा बांध्याने लहान असावी, वरापेक्षा ती सांपत्तिक व सामाजिक दर्जाने कमी असावी या बाबी विचारात घेतात. तसेच ती सावळी व काळेभोर केस असलेली असावी कारण या गोष्टी तिच्या अंगचा नम्रपणा व सद्‌गुण दर्शवितात असे मानतात. लाल फिक्कट वर्णाची स्त्री कामासक्त असते असे मानतात. त्यामुळे अशी स्त्री वधू म्हणून पसंत करीत नाहीत. ह्या मध्यस्थ स्त्रिया किरकोळ वस्तूंची विक्री करण्याच्या निमित्ताने घराघरांतून फिरतात व योग्य मुलीची माहिती काढून आणतात. आप्त किंवा ओळखीच्या कुटुंबातील एखाद्या मुलीची वधू म्हणून निवड करावयाची असल्यास मध्यस्थ स्त्रियांची गरज नसते. अशा वेळी दोन्ही कुटुंबांतील वृद्ध स्त्रिया वाटाघाटीचे काम करतात.

धर्माच्या कायद्याप्रमाणे लग्नसमयी मुलगा वयात आलेला व मुलगी बारा वर्षांची असावी. सिंधमध्ये मुलगा व मुलगी अनुक्रमे पंधरा व बारा वर्षांची झाल्यावर त्यांचे लग्न करतात. गुजरातमध्ये लग्नसमयी मुलाचे वय १६ ते १८ च्या दरम्यान व मुलीचे वय १० ते १५ च्या दरम्यान असते. उत्तर हिंदुस्थानमध्ये मुलाचे १८ व्या वर्षी व मुलीचे १३/१४ व्या वर्षी लग्न करतात. अकबराने १६ वर्षांखालील मुलांच्या व १४ वर्षांखालील मुलींच्या लग्नाला मनाई केली होती.

जेव्हा उपवधू व उपवर यांच्या कुटुंबसंबंध, वंश, धर्म, रूढी या बाबी जुळणाऱ्या असतात व दोन्ही पक्षांना हा संबंध मान्य असतो तेव्हा फलज्योतिष्यांना त्यांचे वैवाहिक आयुष्य कसे असेल याबद्दल भविष्य विचारतात. आणि नंतर संबंध पक्का करतात. हे भविष्य फलज्योतिषी व मुल्ला संबंधितांच्या जन्मकुंडल्यांवरून सांगतात. उदाहरणार्थ जर एखाद्या व्यक्तीचे नाव पुढील सातपैकी एखाद्या अरबी अक्षराने सुरू होत असेल तर त्याच्या स्वभावाचे घटक पुढीलप्रमाणे असतात. पृथ्वी, बे, वॉव, ये, स्वाद, हे, झ्वॉद, नून ; आप, झाल, हे, ऐन, रे, खे,

घैन; वायू, जे, काफ, से, झे; तेज, अलिफ, हे, तोय, सीन, दाल. काही फलज्योतिषी व्यक्तीच्या नावाच्या आद्याक्षरावरून पुढील पानावरील तक्त्याधारे तिच्या देहस्वभावाची वैशिष्ट्ये सांगतात.

वधूवरांच्या वैवाहिक जीवनाचे भविष्य पाहण्यासाठी पुढील पद्धतीचा अवलंब करतात. प्रथमतः व्यक्तीच्या नावाच्या अरबी आद्याक्षरावरून पृथ्वी, आप, तेज व वायू यांपैकी कोणते घटक महाभूत आहे हे पाहतात व दोघांच्या स्वभावाची घटक महाभूते जुळत असल्यास त्यांचे वैवाहिक जीवन सुखाचे होईल असे भविष्य असल्याचे मानतात. उदाहरणार्थ एखाद्या मुलाचे नाव जफर असेल तर त्याच्या नावाचे अरबी आद्याक्षर 'जीम' व त्याच्या स्वभावाचे घटक महाभूत पृथ्वी असते. आणि मुलीचे नाव बानु बिबी असेल तर तिच्या नावाचे आद्याक्षर बे म्हणजे तिच्या स्वभावाचे घटक महाभूत पृथ्वी. म्हणजे जफर व बानू बिबी यांचे स्वभाव घटक जुळतात व म्हणून त्यांचे वैवाहिक जीवन सुखी होईल असे सर्वसाधारणपणे मानतात. अधिक तपशिलाने सांगायचे तर वधूवर दोघांचाही स्वभावघटक 'पृथ्वी' असेल तर त्यांचे दीर्घकाळ पटेल पण नेहमीच पटेल असे नाही. दोघांचाही स्वभावघटक 'आप' असेल तर त्यांचे अल्पकाळ पटेल व त्यांचे प्रेम लवकरच ओसरू लागेल. जर दोघांचाही स्वभावघटक 'वायू' असेल तर दोघांचाही कल भांडणाकडे राहील. पण ते आपले मतभेद मिटवून घेतील. जर दोघांचाही स्वभाव घटक 'तेज' असेल तर त्यांची नेहमी भाडणे होतील पण ती थोडक्यात संपतील असे मानतात. जर वराचा स्वभाव घटक 'पृथ्वी' व वधूचा 'आप' असेल तर त्यांच्यात सलोखा राहील, वधू आज्ञाधारक असेल; जर वराचा 'आप' हा स्वभाव घटक असेल व वधूचा 'पृथ्वी' असेल तर त्यांचे पटेल पण घरावर सत्ता वधूची असेल; जर वराचा 'पृथ्वी' व वधूचा वायू असेल तर ते नेहमीच भांडतील. पण आपले मतभेद मिटवतील. वधूचे वरावर स्वामित्व राहील; जर वराचा 'पृथ्वी' व वधूचा 'तेज' असेल तर त्यांचे परस्परांवर प्रेम असणार नाही आणि वधू वरावर अधिकार गाजवील; जर वराचा 'तेज' व वधूचा 'वायू' असेल तर त्यांचे परस्परांवर उत्कट प्रेम राहील असे नाही पण ते सुखी होतील आणि वर वधूच्या आज्ञेत राहील; जर वराचा 'वायू' व वधूचा 'आप' असेल तर ते सुखी होतील आणि घरात वराचा अधिकार असेल; जर वराचा 'आप' व वधूचा 'तेज' असेल तर त्यांचे पटणार नाही, वराचा अधिकार चालेल; जर वराचा 'वायू' व वधूचा 'तेज' असेल तर त्यांचे पटणार नाही, घरात वधूचा अधिकार राहील; जर वराचा 'तेज' व वधूचा 'वायू' हा स्वभावघटक असेल तर त्यांचे परस्परांवर प्रेम असेल, घरात अधिकार वराचा राहील पण तो वधूला प्रेमळपणे वागवील असे मानतात.

अनुक्रमणिका

**लग्नावर प्रभाव टाकणाऱ्या राशिचक्र व ग्रहांची चिन्हे**

| राशिचक्राची चिन्हे | | | ग्रह | लिंग | अरबी मूळाक्षरांची अठ्ठावीस अक्षरे | चार महाभूते |
|---|---|---|---|---|---|---|
| अरबी | हिंदुस्थानी | मराठी | | | | |
| हमल | मेष | मेष | मंगळ | पुरुष | अलिफ, लाम, ऐन, ये | तेज |
| सऊर | सान्त्र | वृषभ | शुक्र | स्त्री | बे, वॉव | पृथ्वी |
| जौझा | हमजाद | मिथुन | बुध | पुरुष | काफ, काफ | वायू |
| सरातान | खेकडा | कर्क | चंद्र | स्त्री | है, हमजा | आप |
| असद | शेर | सिंह | सूर्य | पुरुष | मीम् | तेज |
| सुम्बला | कन्या | कन्या | बुध | स्त्री | गैन | पृथ्वी |
| मीझॉ | तराजू | तूळ | शुक्र | पुरुष | रे,टे, तोय | वायू |
| अकराब | बिच्चू | वृश्चिक | मंगळ | स्त्री | जाल, जोय, नून, झे, ज्वाद | आप |
| काऊस | कमानदार | धनू | गुरु | पुरुष | फे | तेज |
| जदी | मेंढा | मकर | शनि | स्त्री | खे, जीम् | पृथ्वी |
| दाल्ब | डोल | कुंभ | शनि | पुरुष | स्वाद, से, सीन, शीन | वायू |
| हूट | मछली | मीन | गुरु | स्त्री | दाल | आप |

काहीजण विवाह निश्चित करण्यापूर्वी कुटुंबातील किंवा कवि हाफीजच्या ग्रंथातील कोणत्याही श्लोकाधारे शकुन पाहतात. किंवा डोळे मिटून परमेश्वराची प्रार्थना करतात व त्याचा या संबंधाबाबत काय कौल आहे तो अजमावण्याचाही प्रयत्न करतात. मुलीकडील मंडळींकडून लग्नाचा प्रस्ताव आल्यावर मुलाचा बाप अनेक चिठ्ठ्यांवर 'होय', 'नाही' असे लिहून त्या प्रार्थनेसाठी बसावयाच्या चटईखाली ठेवतो, प्रार्थना करतो आणि नंतर प्रथम एक व नंतर दुसरी अशा कोणत्याही दोन चिठ्ठ्या उचलतो. दोन्ही चिठ्ठ्यांवर 'होय' असेल तर लग्नाचा प्रस्ताव स्वीकारतो.

दक्षिणेत व दक्षिण हिंदुस्थानमध्ये, फलज्योतिष्याने वधूवरांचे वैवाहिक जीवन सुखाचे असेल असे सांगितल्यावर वरपक्षाकडील स्त्रिया वधूगृही जातात व आम्ही साखरभाताचे जेवण (शक्कर भात) जेवण्यास आलो असे सांगतात. वधूपक्षाला हा संबंध मान्य असल्यास 'गोड' उत्तर देतात व नसल्यास तो विषय तेथेच संपतो. पण एकाच भेटीत विवाह ठरतो असे नाही. अनेक भेटींतील वाटाघाटी सुरळीत झाल्या तर 'खारे पान', साखरपुडा (शकराना) किंवा 'मंगनी' साठी तारीख निश्चित करतात. हे तीन विधी नेहमीच करतात असे नाही. यातील पहिला कमी खर्चाचा म्हणून गरीब लोक करतात, दुसरा मध्यम वर्गाचे लोक करतात, तिसरा अत्यंत खर्चाचा कारण यावेळी मूल्यवान भेटवस्तू द्याव्या लागतात. साखरपुड्याच्या दिवशी किंवा त्यानंतरच्या एखाद्या खास करमणुकीच्या कार्यक्रमाचे वेळी वरपक्षाला मिष्टान्नाचे जेवण देतात. पण यापूर्वी त्यांना पेय, विडे, तंबाखू इतकेच नव्हे तर पाणीही न देण्याची रुढी आहे.

अनुक्रमणिका

वाङ्‌निश्चयात अनेक विधींचा समावेश असतो. दक्षिणेत प्रथम ‘खारे पान’ वाटण्याचा विधी असतो. वरपक्षाकडील काहीजण वधूगृही जाऊन विडे वाटतात. वधूपक्षाची मंडळीही त्या प्रत्येकजणाला विडा देतात. यावेळी भेटवस्तू देत नाहीत. स्त्रिया या विधीला ‘पान घेणे’ म्हणतात. विड्यात गूढशक्ती असते व विडा उचलून शपथ घेणे हे कुराणाला हात लावून शपथ घेण्याच्या बरोबरीचे आहे असे मानतात. अर्थात हा काही धर्माच्या कायद्याचा भाग नाही. भारतीय मुस्लिमांनी सुरू केलेली ही नवी पद्धत आहे. या वाङनिश्चयाचे उल्लंघन झाल्यास भांडणे होतात. पण वधूवरांपैकी एखाद्याच्या वंश किंवा चारित्र्यात काही आक्षेपार्ह आढळल्यास काझी हा वाङ् निश्चय अवैध ठरवू शकतो.

साखरपुडा (शकराना) या विधीच्या वेळी वरपक्षाची मंडळी वधूसाठी पोशाख, बांगड्या, सुगंधी द्रव्ये व फुले या वस्तू घेऊन वधूगृही येते. वधूचा जो प्रथम नातेवाईक त्यांचे स्वागत करतो तो वरपक्षाकडील “कराराचा विडा” (कौल विडा) स्वीकारतो. नंतर तिच्या मैत्रिणी पुढील घोषणा करतात. “ ‘अ’ चा मुलगा ‘ब’ ह्याचा ‘क’ ची मुलगी ‘ड’ हिच्याशी वाङ्‌निश्चय झाला आहे. ह्या विवाहाला तुमची मान्यता आहे किंवा नाही असे मित्रांसमोर जाहीर करा.” तो ‘होय’ असे उत्तर देतो. अशी प्रश्नोत्तरे तीन वेळा होतात. नंतर ‘सदिच्छेची प्रार्थना’ (नियते खैर का फातिहा) म्हणजे कुराणच्या पहिल्या प्रकरणाचे पठन करतात. त्यानंतर ११० वे प्रकरण म्हणतात. ‘जेव्हा परमेश्वराच्या मदतीने विजय मिळेल आणि जेव्हा परमेश्वराच्या धर्मात लोक टोळ्यांनी प्रवेश करताना तू पाहशील तेव्हा तू परमेश्वराची प्रार्थना कर कारण तो तुझ्यावर दया करील’. हे विधी काझी, धर्मोपदेशक (खातिब), नायब काझी, धर्मगुरू (मशाइक) किंवा मुल्ला करतात. काही वेळा विडा देऊन हा विधी करीत नाहीत, तर फक्त फातिहा म्हणतात आणि फातिहा म्हणणारा माणूस वधूवरांच्या नावांचा उच्चार करून ‘मी तुमचा वाङ्‌निश्चय करतो’ असे म्हणतो. यानंतर साखरपान वाटतात आणि वरपक्षाकडून आलेल्या भेटवस्तू वधूला देतात. यावेळी वधू नम्रपणे खाली मान घालून, डोळे मिटून व तोंड झाकून बसलेली असते. नंतर वरपक्षाच्या स्त्रिया वधूच्या डोक्याला सुगंधी तेल लावतात, वराने दिलेल्या लाल दोऱ्याने तिचे केस बांधतात आणि तिला अलंकार घालतात. घरातील एखादी वृद्ध स्त्री इतर स्त्रियांना वधूचे मुखावलोकन करवते. प्रत्येक स्त्री वधूचे मुखावलोकन करते व तिला अंगठी किंवा पैसे देते आणि तिची इडापिडा टळो म्हणून बोटे मोडते (बलाएँ लेना). या वाङ्‌निश्चयाच्या विधीला साखरपुडा (शकराना), ‘मंगनी’, ‘शरबत पिणे’ (शरबत खोरी) किंवा हिरवी वेल (हारी बेल) असेही म्हणतात.

तथापि काही ठिकाणी मंगनीचा खास विधी असतो. यावेळी वधूला मौल्यवान भेटवस्तू (चरवाहा) देतात. या विधीसाठी नवरा मुलगा मिरवणुकीने वधूगृही येतो. मिरवणुकीबरोबर वाजंत्री असतात. भेटवस्तूंची तबके घेतलेली काही माणसे असतात. ही मिरवणूक दुपारी निघते. मिरवणुकीत नर्तिकांचा ताफाही असतो. त्यांचे अधूनमधून नृत्य होते. यावेळी थोडा वेळ मिरवणूक थांबते. अशा पद्धतीने वरपक्षाकडील मंडळी वधूगृही येते. वधूचे घर वराच्या घराच्यापासून फार अंतरावर असल्यास तो यावेळी जात नाही. पण वरपक्षाची मंडळी मिरवणुकीने भेटवस्तू नेतात. वधूगृही आल्यावर ही मंडळी थोडा वेळ विश्रांती घेते. नंतर ‘कराराचा विडा’ देण्यात येतो. त्यानंतर भेटवस्तूंची तबके वधूच्या खोलीत पाठवितात. यावेळी पाहुणे मंडळी आपल्या स्वतःतर्फेही काही भेटवस्तू त्या तबकात ठेवतात. या विधीच्या वेळी नवरा मुलगा हजर असल्यास त्याला पिवळ्या, लाल, किंवा हिरव्या रंगाच्या कापडाचा आहेर करतात. आहेराच्या कपड्याचा रंग काळा किंवा पांढरा नसतो. कारण काळे कापड दुःखाचे व पांढरे प्रेतावर टाकण्याचे प्रतीक असते. गुजरातमध्ये वाङ्‌निश्चयाच्या

दिवशी दोन्ही पक्षांचे नातलग वधूगृही परस्परांना भेटतात. यावेळी वरपक्षाकडील लोक मिरवणुकीने भेटवस्तू घेऊन येतात. वाङ्‌निश्चयानंतर पाहुणे मंडळींना शरबत देण्यात येते. उत्तर हिंदुस्थानमध्ये भेटवस्तूंच्या अदलाबदलीला ‘साचक’ म्हणतात.

‘मंगनी’ या विधीनंतर दहा-पंधरा दिवसांनी वधूपक्षाकडील मंडळी वराकडून ज्या तबकांमध्ये भेटवस्तू आल्या होत्या ती तबके त्यात अन्नपदार्थ घालून वराकडे परत पाठवते. नवरा मुलगा व त्याची मित्रमंडळी या अन्नपदार्थाचे सेवन करतात.

दक्षिणेत वाङ्‌निश्चयानंतर काही कारणामुळे लग्न लांबणीवर पडल्यास उंबरठा तुडविणे (ढालीज खुंदलना) या नावाचा विधी करतात. म्हणजे नवरा मुलगा शिजवलेले अन्नपदार्थ घेऊन सवाद्य वधूगृही जातो. तेथे त्याला ‘नमस्कारासाठी भेट’ (सलामी) देतात. यानंतर तो आपल्या सासूला नमस्कार करतो. फलशोभन होण्यापूर्वी नवऱ्या मुलाने वधूगृही जाणे किंवा तिच्या घरचे अन्न खाणे बरोबर नाही असे मानतात. परंतु या विधीनंतर नवरा मुलगा वधूच्या कुटुंबाचा सदस्य होतो आणि त्याला तिच्या घरचा मीठ असलेला कोणताही पदार्थ खाता येतो. यामुळे हा विधी करतात.

काही ठिकाणी वाङ्‌निश्चयानंतर एक-दोन दिवसांनी वराकडून वधूकडे अन्न व पानपुडा पाठवतात. वधूकडूनही त्यानंतर वराकडे एक-दोन दिवसांत परतभेट पाठवतात. याला ‘मिठाची चव घेणे’ (नमकचसी) असे म्हणतात. यानंतर नवऱ्या मुलाला वधूगृही कोणताही क्षारयुक्त, आम्लयुक्त पदार्थ खाता येतो. वराकडून वधूला याशिवायही अनेक भेटवस्तू पाठवतात. म्हणजे मोहरमच्या वेळी रंगीत दोऱ्याची गळसरी, सुगंधी द्रव्य, वेलदोडा, इत्यादी, आखरी-चार-शम्बाच्या वेळी मिठाई, शबॉं या सणाच्या वेळी अन्न व दारुकाम, रमजानला शेवया व मिठाई, ईद-इ-कुरबानीच्या वेळी बकरी व थोडे पैसे या भेटवस्तू वधूगृही पाठवतात. ग्रहणाच्या काळात वधू-पक्षाकडून वराकडे रदबदलीच्या वस्तू (सदगा) बकऱ्यासह पाठविण्यात येतात. हा बकरा ग्रहण संपेपर्यंत वराच्या बाजेच्या पायाला बांधतात.

प्रतिष्ठित लोकांमध्ये लग्न होईपर्यंत वधूवरांना परस्परांच्या सहवासात येऊ देत नाहीत. परंतु उत्तर व पश्चिम सरहद्दीवरील काही मुसलमान वाङ्‌निश्चय हा विवाहाच्या बरोबरीचा असतो असे मानतात. त्यामुळे तेथे वधूवरांना विवाहापूर्वी समागम करता येतो. सिंध प्रांतात ‘शहाणे आईबाप वाङ्‌निश्चयानंतर वधूवरांची एकत्र भेट टाळण्यासाठी शक्य ते सर्व उपाय करतात. परंतु वर हा वधूकडील पुरुषमंडळींना व वधू ही वराकडील स्त्रियांना भेटू शकते. उच्चवर्गीय लोक विवाहपूर्व संबंध लाजिरवाणा मानतात. पण त्यांच्यामध्येही काही ‘घोटाळे’ घडतात. अफगाणिस्तान व मध्य आशियातील काही ठिकाणी वधू आपल्या बापाला चोरून वराला भेटण्याचा प्रयत्न करीत असेल तर तिची आई त्याकडे कानाडोळा करते. सिंधमधील ‘मोहाना’सारखे खालच्या वर्गातील लोक विवाहापूर्वी वराला वधूशी कुलंगडे करण्याचा अधिकार आहे असे मानतात. त्यांच्यापैकी काहीजणांची, वधू वयात येईपर्यंत तिच्या आईशी संबंध करण्यास हरकत नाही येथपर्यंत मजल जाते.’ बानू नावाच्या जमातीत वर विवाहापूर्वी वधूला चोरून भेटतो पण तो जर असा पकडला गेला तर त्याला तीन दिवस डांबून ठेवतात व दर दिवशी रात्री अविवाहित मुली त्याने ‘मला सोडून द्या’ असे म्हणेपर्यंत त्याला ओढताण करून त्रस्त करतात.

साध्या लग्नाला ‘ब्याह’ व थाटामाटाच्या लग्नाला ‘शादी’ असे म्हणतात. लग्नविधीला ‘निका’ म्हणतात. पण उत्तर हिंदुस्थानमध्ये विधवेबरोबरच्या लग्नाला निका म्हणतात.

उत्तर हिंदुस्थानमध्ये विवाह समारंभाची सुरुवात दोन्ही पक्षांनी परस्परांना भेटवस्तू देऊन करावी (साचक) असे मानतात आणि या दिवसापासून नियोजित जोडप्याला नवरा, नवरी (दुल्हा, दुल्हन) असे म्हणतात. दुसरा दिवस हा वधूवरांना ‘मेंदी लावण्याचा दिवस’ (मेहंदी, हीनाबंदी) असतो. या दिवशी दोघांच्याही अंगाला मेंदीबरोबरच हळद व केशरही चोळतात. विवाहारंभीचा उपचार म्हणून आणि अनिष्ट शक्तीपासून वधूवरांचे रक्षण व्हावे व त्यांची जननक्षमता वाढावी यासाठी या वस्तू त्यांच्या अंगाला चोळीत असावेत असे दिसते. हिंदु लोकांतही विवाहापूर्वी वधूवरांना हळद लावतात. भारतीय मुसलमानांनी हा विधी बहुधा हिंदूनकडून उचलला असावा. वधूवरांना हळद लावताना आधी वराला व नंतर वधूला लावतात. पण वराला हळद लावण्याच्याही अगोदर कुटुंबातील लोक गुप्तपणे तिला सुगंधी द्रव्य लावतात. याला ‘चोर हळद’ म्हणतात. वराला हळद लावण्याचे काम कुटुंबाचा न्हावी करतो. नंतर वधूला हळद लावण्यात येते. यावेळी इतर स्त्रियांना बोलावतात. त्यांना जेऊ घालतात. त्यांच्या पोळ्या व पानांनी ओट्या भरतात. यानंतर वधूला लाल रंगाच्या चांदव्याखाली बसवतात. तिच्या आसनासमोर एक चटई टाकतात. त्या चटईवर लाल रंगाचा रुमाल टाकतात. जमलेल्या स्त्रिया गाणी म्हणतात व ‘चौक भरणे’ नावाचा विधी करतात. [पंजाबमध्ये जेव्हा स्त्रिया संताला नवस बोलतात व त्यांच्या इच्छा पूर्ण होतात तेव्हा त्या त्याच्या दर्ग्यात जातात आणि दिवस व रात्रभर तेथे बसतात. हा विधी ‘चौकी भरना’ या नावाने ओळखला जातो. (रोझ १·६४३).] म्हणजे चटईवर अंथरलेल्या रुमालावर तांदळाचा चौक भरतात. वधूच्या पायाखाली लाल दोरा गुंडाळलेली चंदनाची पाटी ठेवतात. याचे कारण चौक तुडविणे अशुभ आहे असे मानतात. यावेळी वधूची बहीण वधूचे कान धरून तिच्यामागे उभी राहते नंतर काही सुवासिनी वधूची खारका, खोबऱ्याचा तुकडा, फुले यांनी ओटी भरतात व प्रथम तिच्या तोंडाला व त्यानंतर शरीराला व कपड्यांना हळद लावतात. वधूला हळद लावल्यानंतर जमलेल्या स्त्रिया गाणी म्हणतात, नृत्य करतात. दक्षिणेत, वराला हळद लावण्यापूर्वी वराची ओटी भरतात.

वधूला हळद लावल्यानंतर तिला वेगळ्या खोलीत एकाच जागी बसवतात. तिला कोणतेही काम करू देत नाहीत. तिला जेवणात फक्त वरण, भात, भाकरी, साखर या वस्तू देतात. तिच्या अंगाला उदाचा धूप देतात. त्यामुळे तिचे शरीर सुगंधमय व त्वचा मुलायम होते.

काही लोक वधूवरांवरचे अरिष्ट जावे म्हणून एक तोडगा करतात. एका मातीच्या मडक्यात मूठभर तांदूळ टाकून त्यात डाळिंबाची फांदी वाकवून ठेवतात. तीवर लाल रंगाचे कापड आच्छादितात. तसेच फुले व चांदीची गळसरीही त्या फांदीवर ठेवतात. मडक्याच्या सभोवती अन्नपदार्थ व फळे ठेवतात. डाळिंबाची फांदी वाकवून ठेवण्यामागे वधूची नम्रपणे बसण्याची पद्धत सूचित केलेली असते. नंतर सर्वजण रात्रभर संत गाझी सालार मसूद यांच्या महद्‌कृत्यांची गाणी म्हणतात. काहीजण तर यावेळी या संताच्या युद्धाचे व हौतात्म्याचे देखावे रंगवलेले पडदेही लावतात. दुसरे दिवशी सकाळी वर ते मडके आपल्या खांद्यावर घेऊन नदीकाठी येतो. त्याबरोबर फकीरही असतात. नंतर मडक्यावर फातिहा म्हणतात व मडक्याबरोबर अरिष्ट जावे म्हणून ते पाण्यावर सोडून देतात. त्या दिवशी सायंकाळी वराला पुन्हा हळद लावतात आणि बांबूच्या लाकडाची लहान नाव करून ती फुलांनी सजवतात. नावेत फळे, फुले टाकतात, त्यावर केशराने रंगवलेला कपडा झाकतात. नावेच्या टोकावर दिवा लावतात. हा दिवा पिठाचा केलेला असतो. ही नाव व अन्न घेऊन नदीकाठी किंवा पाणी

अनुक्रमणिका

असलेल्या एखाद्या ठिकाणी जातात. तेथे गेल्यावर ख्वाजा खिजर यांच्या नावाने फातिहा म्हणतात. ज्याने नाव तयार केलेली असते तो माणूस ते अन्न गरिबांना वाटून टाकतो. नंतर ती नाव पाण्यावर सोडून देतात. घरी परत आल्यावर मित्रांना मेजवानी देतात व वराला पुन्हा एकदा हळद लावतात.

नंतर संत शाह मदार यांचा भंडारा करतात. म्हणजे एक पाय कापतात आणि मदारी फकिरांना त्या मांसाचा व गव्हाच्या पिठाचा ‘चकोली’, ‘सुत्री’ नावाचा पदार्थ करण्यास सांगतात. नंतर या अन्नावर या संताच्या नावे फातिहा म्हणतात. हे अंन्न आपणाला मिळावे यासाठी हे फकीर धडपडतात. या भंडाऱ्याचे वेळी वर गुलाबी किंवा पिवळ्या रंगाचा पोशाख घालतो.

वराला हळद लागल्यानंतर त्याला काही गोष्टी वर्ज्य असतात. त्यापैकी एक म्हणजे त्याला बाजारात जाता येत नाही. कारण तो गेल्यास त्याला चेटूक होण्याची भीती असते. वराला हळद लागल्यानंतर त्याला वधूतर्फे दररोज विविध प्रकारची पक्वान्ने, चंदनमिश्रीत सरबत, दात घासण्याची काडी या वस्तू पाठवतात. पहिल्या दिवशी मिठाई पाठवतात. यामागे वधूवरांना दीर्घकाळ वैवाहिक सौख्य लाभावे हा हेतू असतो. वराकडे या वस्तू घेऊन येणाऱ्या स्त्रिया त्याचे तोंड धुणे, जेवण व तांबुलभक्षण होईपर्यंत तेथेच थांबतात. या दक्षिणेत प्रचलित असणाऱ्या रूढी आहेत.

सिंधमध्ये न्हावीण वधूला दररोज गोडे तेल व गव्हाचे किंवा हरबऱ्याचे पीठ (पिठी) चोळून न्हाऊ घालते. वधूचे हात, पाय व केस मेंदीने रंगवतात. तिच्या ओठाला अक्रोडची साल व गालाला लाखाचे पीठ घासतात आणि डोळ्यांत काजळ घालतात. तिची वेणी घालतात, तिच्या अंगाला सुगंधी द्रव्य चोळतात. कशिदा काढलेल्या कपड्यात गुंडाळून एक कस्तुरीचा तुकडा तिच्याजवळ देतात. तिच्या तोंडावर गोंदतात. बंगश पठाण लोकांत लग्नापूर्वी तीन दिवस आधी वधूच्या अंगावरील दागिने काढून घेऊन तिला ऐका खोलीत कोंडून ठेवतात. दुसऱ्या दिवशी रात्री स्त्रिया तिच्या हातातले कार्य केसात अडकून पडेल या भीतीने तिचे केस मोकळे सोडतात. पंजाबमधील पठाणांमध्ये वधूवरांना लग्नापूर्वी सात दिवस कोणतेही काम करू देत नाहीत, त्यांच्या अंगाला दररोज सुगंधी द्रव्ये चोळतात. संयुक्त प्रांतात वधूवरांना या काळात, बहुधा भूतबाधा होऊ नये म्हणून मळके कपडे घालण्यास देतात.

वधूवरांच्या अंगाला लावण्यात येणाऱ्या द्रव्यांची अदलाबदल करण्याची पद्धत सर्वसामान्य आहे. यामागे वधूवरांचे वैवाहिक सौख्य वाढावे हा हेतू असावा असे दिसते आणि ही रूढी बहुधा हिंदूनकडून उचललेली असावी असे वाटते.

वधूपक्ष वराला व वरपक्ष वधूला लग्नाचा पोशाख देतो. या पोशाखाचे माप घेण्याचे काम (पॉंव मिन्नत, पॉंव मेज) शिंपी किंवा कुटुंबातील एखादी वृद्ध स्त्री करते. याबद्दल त्यांना बक्षीस देतात. या कपड्याचे माप घेण्याच्या क्रियेला केवळ उपचार या पलीकडे अधिक महत्त्व नसते.

दक्षिणेत हिंदूप्रमाणे विवाहापूर्वी दोन्ही घरी मांडव घालतात. हिंदूप्रमाणेच मांडवात उजव्या बाजूच्या कोपऱ्यात सुवासिनीकरवी सहा किंवा सात कळसाचे माठ (कलस का माठ, झोल का घडा) ठेवतात. चार

सुवासिनी या माठांत पाणी, दही इत्यादी टाकून त्यांच्या तोंडावर लाल रंगाचा कपडा झाकतात. या माठांच्या बाजूला धान्यही रुजवतात. कळसाच्या माठाची स्थापना झाल्यावर दोन्ही घरी अन्न शिजवून त्यावर प्रेषित, संत पूर्वज व कुटुंबातील सवाष्ण असताना मरण पावलेल्या स्त्रिया यांच्या नावाने फातिहा म्हणतात. हे अन्न नंतर दिवसभर उपवास केलेल्या निवडक अशा पतिव्रता स्त्रियांना देतात. या स्त्रियांना स्त्रीगुणांचा आदर्श असलेल्या 'फातिमा बिबी यांच्या अन्नाचे सेवन करणाऱ्या स्त्रिया' असे म्हणतात. ज्या अन्नावर फातिहा म्हटलेला नसतो ते इतर स्त्रियांना वाटून टाकतात. काहीजण फातिहा म्हटलेल्या अन्नाबरोबरच खाण्याचा ओला चुना भरलेला लाल रंगाचा माठ ठेवतात. या निवडक स्त्रिया चुन्यात एक-दोन वेळा आपली बोटे बुडवून ती चाटतात व नंतर ते अन्न खातात. याला पातिव्रत्य परीक्षा असे म्हणतात. स्त्रियांसाठी वेगळा मंडप असतो तो उभारल्यावर फातिहा म्हणण्यापूर्वी किंवा नंतर चटईवर लाल रंगाचा कपडा अंथरून व जात्याच्या खुंट्याला लाल दोरा बांधून सुवासिनी हळद दळतात. वधूगृही हळद दळणाऱ्या सुवासिनींची संख्या नऊ तर वराच्या घरी सात असते. या हळदीपैकी थोडी थोडी हळद दळणाऱ्या सुवासिनींच्या पदरात बांधतात, थोडी पाण्याच्या माठात टाकतात व उरलेली वधूवरांना लावतात. याला हळद दळणे (चक्की नावारी) असे म्हणतात [हिंदू करतात त्यासारखा विधी (बीजी ९ पार्ट १·१६३) हा लखनौचे मुसलमान करतात. ते वधूवरांना लावण्यात येणारी हळद ज्या मुसळाने कुटावयाची असते त्याला नाडा बांधतात. कदाचित हा कसाचा मंत्र असावा (श्रीमती मीर हसन अली, २०७).]. दक्षिण हिंदुस्थानमध्ये असणाऱ्या या विधींपैकी काही विधी उत्तर हिंदुस्थानात अगर अन्य मुस्लीम राष्ट्रांत पाळीत नसल्याचे दिसते. हे विधी हिंदूंकडून उचललेले असून यांना, विशेषतः स्त्रिया कुराण किंवा हदीस यापेक्षा जास्त महत्त्व देतात.

वधूवरांना हळद लागल्यानंतर वरपक्षाची मंडळी वधूसाठी दागिने, कपडे, अन्न घेऊन वाजत गाजत वधूगृही (बारी, साचक) जातात. यावेळी स्त्रियाही मिरवणुकीच्या मागोमाग जातात पण बुरख्यात असतात. वधूगृही आल्यानंतर या भेटवस्तू वधूकडील स्त्रियांच्या स्वाधीन करण्यात येतात. यावेळी श्रीमंत लोक पाहुण्यांना जेवण देतात. काहीजण या भेटवस्तूबरोबर मेहरचीही रक्कम पाठवतात. संध्याकाळी वधूपक्ष वरपक्षाकडे अन्न पाठवतो. याला 'रंगबारी' म्हणतात.

वधूपक्षाकडून वराला देण्याच्या वस्तू (जहेज, दहेज) म्हणजे आहेराचा पोशाख, सोहागपुडा या होत. या पुड्यात म्हणजे पेटीत जायफळ, जायपत्री, कपडे इत्यादी वस्तू असतात. ही पेटी कागदात गुंडाळून व त्यावर लाल दोरा बांधून देतात. याशिवाय वराला देण्यात येणाऱ्या वस्तू म्हणजे वधूचे अलंकार, चांदवा, पलंग, अंथरण्यापांघरण्याच्या वस्तू, नमाज पडण्यासाठी चटई, स्वयंपाकाची भांडी, पिकदाणी, पालखी, गुरेढोरे या होत. जुन्या काळी या वस्तूबरोबरच गुलाम स्त्रियांना दासी म्हणून पाठवीत असत. ब्राहूई समाजातील श्रीमंत लोक वराला दासी, सर्व प्रकारचे अलंकार, गृहसजावटीसाठी फर्निचर, स्वयंपाकासाठी लागणारी सर्व भांडी इत्यादी अनेक वस्तू देतात. आपणाला वधूपक्षाकडील कमीच वस्तू मिळाल्या अशी कुरकूर वरपक्ष करतो. या वस्तू वराला वधूपक्षाकडून मिळाल्या तरी त्यावर मालकी मात्र जिवंत असेपर्यंत वधूची असते. तिच्या मृत्यूनंतर या वस्तूंची मालकी मुले असल्यास मुलांकडे व नसल्यास अगदी जवळच्या नातलगाकडे जाते. वराने कबूल केलेल्या मेहर शिवायच्या या वधूच्या मालकीच्या वस्तू असतात. शिया जमातीतील स्त्रिया जेव्हा आपल्या पतीच्या पैशाने पवित्र स्थळांची यात्रा करतात तेव्हा त्यांचा मेहरवरचा हक्क संपतो.

ज्या रात्री वराची वरात (शबगस्त) निघावयाची असते त्या दिवशी दुपारी वराची बहीण नवे कपडे परिधान करते व कळसाच्या माठांच्या तोंडाला बांधलेला कपडा फाडते व त्यातील थोडे दही स्वतः चाखून

पाहते व उरलेले इतरांना वाटून टाकते. या विधीला ‘झोल फोडना’ असे म्हणतात. असाच विधी वधूगृही वधूची बहीण करते. हे माठ न धुता तसेच ठेवतात.

वराच्या वरातीसाठी निमंत्रित केलेले स्त्रीपुरुष वरच्या घरी जेव्हा येतात तेव्हा स्त्रीपुरुषांना वेगवेगळ्या खोल्यांत जेऊ घालतात. यानंतर ह्या स्त्रिया वधूगृही जातात व लाल रंगाच्या रुमालावर साधारणतः शेरभर तांदूळ घेऊन वधूसहित सगळ्याजणी मुसळाने तांदूळ कांडल्याचा आविर्भाव करतात. मुसळाला पानाचा विडा बांधलेला असतो. सगळ्याजणी गाणी म्हणत हा तांदूळ कांडण्याचा विधी करतात. याला ‘पत का चावल चरवाना’ असे म्हणतात.

यानंतर वराच्या घरी ‘तेल चरवाना’ या नावाचा विधी करतात. म्हणजे स्त्रिया तेलाची सात रिकामी भांडी घेतात. त्यावर बाणांचे चिन्ह काढतात. या भांड्यांना लाल दोऱ्याने विडे व पोळी (सुफली) बांधतात. नंतर त्यात थोडे गोडे तेल टाकून ती भांडी, खडीसाखरेचे खडे व दारसिना एका टोपलीत ठेवतात. नंतर वराच्या दाताला दारसिना घासतात. त्याच्या तोंडात खडीसाखरेचा खडा देतात. व त्याच्या डोक्याला तेल लावतात. हा विधी झाल्यानंतर या स्त्रिया ही तेलाची भांडी, दारसिना, वराने उष्टावलेला खडीसाखरेचा खडा एका तबकात ठेवून व त्यावर लाल कपडा झाकून वाजत गाजत वधूगृही जातात. त्या वधूगृही आल्यावर वधूला मांडवात आणतात. प्रथम एखादी सुवाशीण वधूच्या दाताला दारसिना घासते. व तिला चूळ भरण्यास सांगते. यामागे बहुधा वधूला पतिप्रेम व दाससिना लावणाऱ्या त्या स्त्रीसारखे दीर्घायुष्य व सौख्य लाभावे ही अपेक्षा असावी. नंतर सर्व स्त्रिया वधूच्या अंगाला थोडे तेल चोळतात. त्यानंतर तिच्याउजव्या बाजूला चार व डाव्या बाजूला तीन अशी भांडी ठेवतात. वधूच्या तोंडात वराने उष्टावलेला खडीसाखरेचा खडा देतात व तिच्यावरचे संकट टळावे या हेतूने तिच्या अंगावरून तीन वेळा ती भांडी एकमेकींना देतात. फातिमा बिबी स्वतः दारसिना वापरीत असत. त्यामुळे स्त्रियांच्या दृष्टीने त्याचे महत्त्व व पावित्र्य फार आहे असे मानतात. गुजरातमधील मुसलमान स्त्रिया मासिक पाळीच्या काळात दारसिना लावीत नाहीत. मुलाला तरी लग्नापूर्वी एकदा म्हणजे सुन्त्याच्या वेळी दारसिना लावता येतो. पण मुलींना मात्र लग्नाच्या दिवसापर्यंत तो लावता येत नाही. स्त्रियांच्या दाताचा काळा रंग हा त्या विवाहित असल्याचे चिन्ह असते. दक्षिणेतील काही जमातींतील स्त्रिया या ‘पत का चावल चरवाना’ व ‘तेल चरवाना’ या विधींना एवढे महत्त्व देतात की, ज्या मुलींच्या लग्नाच्या वेळी हे विधी करण्यात येत नाहीत त्यांना चांगल्या मानीत नाहीत.

वराच्या वरातीला ‘रात्रीची वरात’ (शबगस्त) अथवा ‘दिवसाच्या वरातीचा उदय’ (सरगस्त) असे म्हणतात. या वरातीनंतर प्रत्यक्ष विवाह समारंभ होतो. अशी वरात निघण्यापूर्वी, ‘तेल चरवाना’ हा विधी झाल्यानंतर वराची हजामत करतात. व त्याला स्नान घालतात. आणि हजामत न केल्यास त्याचे केस उदाच्या धुपाने सुगंधित करतात. नंतर ज्याची पत्नी हयात आहे असा कुटुंबातील एखादा वृद्ध गृहस्थ वराला पटका बांधतो. या मागे वधूवरांना वृद्ध पतीपत्नीप्रमाणे दीर्घायुष्य व सौख्य लाभावे हा हेतू असतो. त्यानंतर वर वधूकडून आलेला आहेराचा पोशाख करतो, डोळ्यांत सुरमा घालतो, दाताला दारसिना लावतो, तोंडात पानाचा विडा ठेवतो. वराच्या गळ्यात फुलाचे हार, डोक्यावर ‘सेहरा’ व पुन्हा त्यावर भुताखेताची दृष्ट लागू नये म्हणून बाह्य आच्छादन (मिक्ना), अशा रीतीने वराला सजवून त्याला घोड्यावर किंवा अंबारीत बसवतात व त्यानंतर वरात निघते. वरातीबरोबर वाजंत्री, नर्तिका असतात. अधूनमधून वरात थांबते, यावेळी फटाके

वाजवतात, नर्तिका नृत्य करतात. वरात प्रथम मशिदीजवळ थांबते. वर मशिदीत जाऊन दोन प्रणिपाताची प्रार्थना व आभाराची प्रार्थना म्हणतो व तेथून वरात वधूगृही जाते. वरातीबरोबर रंगीत कागदाच्या बनवलेल्या शोभेच्या वस्तूही असतात.

वराची वरात जेव्हा वधूगृही येते तेव्हा वर घोड्यावरून उतरण्याच्या अगोदर, दक्षिण हिंदुस्थानामध्ये वधूचा भाऊ त्याला, वैवाहिक आयुष्य गोड होवो म्हणून गरम दूध किंवा शरबत देतो. नंतर नारळ फोडतात, लिंबू कापून त्याच्यावरून ओवाळून चार दिशांना फेकतात. यानंतर वर घोड्यावरून खाली उतरतो. यावेळी शोभेच्या वस्तू विकणारे लोक आपल्या वस्तू विकत घ्याव्या यासाठी आग्रह धरतात. या रुखवताच्या वस्तू एकतर विकत घेतात किंवा उसन्या असतात. 'काकण सोडण्याच्या' दिवसापर्यंत या वस्तू ठेवाव्या लागतात. रुखवत घेण्या न घेण्याचा हा गोंधळ संपल्यानंतर वधूपक्षाकडील मंडळी, विशेषतः वधूचा भाऊ व नातलग, दाराला बांबूचा तट्टा लावून वराचा मार्ग रोखण्याचा खोटा प्रयत्न करतात.वर त्यांना बक्षीस देतो तेव्हाच त्याचा मार्ग मोकळा करतात. ही अडवणूक चालू असताना वरपक्षाकडील मंडळी वधूपक्षाला 'राजाच्या घोडेस्वाराच्या मिरवणुकीला अडविण्याचे धाडस करणारे तुम्ही कोण?' असे विचारतात. यावेळी वधूपक्षाकडील मंडळी उत्तरादाखल 'रात्रीच्या वेळी बरेच चोर हिंडत असतात, बहुधा तुम्ही त्यांच्यापैकीच आहात' असे म्हणतात. ह्याव्यतिरिक्त खोटा असा सशस्त्र प्रतिकारही होतो व या प्रकारात एखादा दुसरा माणूस जखमीही होतो. हा प्रकार संपल्यानंतर वराला घोड्यावरून खाली उतरवतात व कोणाच्या तरी पाठकुळी बसवून घरात नेतात. यामागे बहुधा दरवाजातून वाकून जाऊन त्याचा मान राखण्याचा हेतू असावा. गुजरातमध्ये वर दारातून प्रवेश करीत असताना वधू त्याच्या अंगावर एखाद्या खिडकीतून तांदूळ फेकते. इतर ठिकाणी यावेळी वधूच्या हातात फुले, साखर, तांदूळ देऊन तिला पडद्याआड उभी करतात व वर दरवाजातून आत येत असताना पडद्याआडून या वस्तू तीन वेळा त्याच्या अंगावर फेकण्यास सांगतात. यानंतर वराला पुरुषाच्या खोलीमध्ये नेऊन बसवतात.

दक्षिणमध्ये वर वधूगृही आला तेव्हाची वेळ शुभ असल्यास ताबडतोब लग्न लावतात आणि ही शुभ वेळ नसेल तर चार तासांनंतर किंवा नंतरच्या शुभ वेळी लग्न लावतात. असे घडणार असल्यास पाहुणेमंडळी आपापल्या घरी जातात व त्यांना ठराविक वेळी पुन्हा बोलावतात. वराला लग्नासंबंधी काही आक्षेप असेल तर तो या वेळेपर्यंतच घेतो. व त्याने लग्नाला विरोध दर्शविला तर लग्न मोडू शकते.

लग्न लावण्यास सामान्यत्वे काझी किंवा त्याचा प्रतिनिधी येतो. आणि वराच्या काही मैत्रिणींना डोलीतून आणतात. काझी वरातर्फे दोन प्रौढ गृहस्थांची साक्षीदार (वकील) म्हणून नियुक्ती करतो आणि त्यांना वधूपक्षाशी सल्लामसलत करून 'मेहर' ची रक्कम कळविण्यास व लग्न लावण्याची अनुज्ञा घेण्यास सांगतो. यानंतर वराकडील साक्षीदार व वधूपक्षाची मंडळी मेहरबद्दल वाटाघाटी करतात. वधूपक्षाची मंडळी यावेळी वराच्या साक्षीदाराची थट्टामस्करी करतात. व अव्वाच्या सव्वा अशी मेहरची रक्कम सांगतात. नंतर ते परत येऊन काझीला मेहरची रक्कम सांगतात. यावेळी काझी त्यांना खरे सांगता की लाच घेऊन खोटे सांगता, असे विचारतो. त्यानंतर साक्षीदार विनोदाने म्हणतात की वधूचा प्रतिनिधी पडद्याआड मात्र गेला होता पण त्याने लाच घेतली की नाही याबद्दल आपणास काही माहीत नाही.

धार्मिक कायद्याप्रमाणे 'मेहर' चे दोन भाग असतात. एक म्हणजे 'मुअज्ज़ल' म्हणजे करार करते वेळी द्यावयाची रक्कम आणि दुसरा 'मुवाज्ज़ल' म्हणजे करार संपुष्टात आल्यानंतर द्यावयाची रक्कम. 'मुअज्ज़ल' मेहर लग्नाच्या वेळी देतातच असे नाही पण ती वराच्या सद्वर्तनाची हमी असते. कारण त्याच्या चुकीमुळे घटस्फोट झाल्यास त्याला ती रक्कम द्यावीच लागते. मेहर ठरविते वेळीच, घटस्फोट घेतल्यास विवाहापूर्वी वधूच्या अंगावर घातलेल्या दागिन्यांची मालकी वधूवरांपैकी कोणाची हेही ठरवितात. प्रेषित आणि अकबरासारखे राजे यांना जास्त रकमेचा करार पसंत नव्हते कारण देण्याची वेळ आल्यास क्वचितच ते पाळले जातात. पण एक गोष्ट मात्र खरी आहे, ती म्हणजे जास्त रकमेच्या मेहरमुळे पती अविचाराने घटस्फोट घेण्याची शक्यता कमी असते. ब्राहूई समाजात, कुटुंबात जी प्रथा असेल त्यानुसार वधूपक्ष मेहरची मागणी करतो. पण सामान्यत्वे वराला वधूच्या आईला वधूच्या संगोपनाचा खर्च (शिरपाली) व वधूच्या पित्याला वधूची किंमत म्हणून काही पैसे द्यावे लागतात. पठाण जमातीत वधूचे आईवडील वधूच्या दागिने व कपड्यांचा खर्च भागेल इतकेच पैसे मागतात. परंतु आजकाल गरीब लोक मुलीची किंमत म्हणूनच अधिक पैसे मिळविण्याचा प्रयत्न करतात.

मेहर निश्चित झाल्यावर काझी वराला तो मान्य आहे का असे विचारतो. आणि त्याने मान्यता दिल्यावर काझी आतापर्यंत वराच्या तोंडावर असलेला 'सेहरा' काढतो व त्याला पाण्याने तीन वेळा चूळ भरण्यास सांगतो. नंतर काझी वराला किबला किंवा मक्केकडे तोंड करून बसवितो व प्रथम 'मी परमेश्वराची क्षमायाचना करतो' असे आणि त्यानंतर कुराणातील 'म्हणा' या अक्षराने सुरू होणारी १०९, ११२, ११३, ११४, ही चार प्रकरणे त्याच्याकडून वदवून घेतो; खरे म्हणजे या चार प्रकरणांत विवाहाबाबत काहीही सांगितलेले नाही; पण संक्षिप्तपणामुळे त्यांची निवड झाली असावी. यानंतर काझी वराला धर्माची पाच पोट-कलमे व पुढील कलमे म्हणायला सांगतो. ही धर्माच्यावरील निष्ठेची कलमे म्हणजे (सिफत-इ-इमान) परमेश्वरावर विश्वास, त्याच्या दूतावर विश्वास, धर्मग्रंथावर विश्वास, प्रेषितावर विश्वास,पुनरुत्थान व न्यायदानाच्या दिवसावर विश्वास ही होत. शेवटी काझी वराकडून 'स्तुती प्रार्थना' (दुवा-इ-कनूत) म्हणून घेतो. वर अशिक्षित असल्यास काझी त्याला ह्या बाबी 'हिंदुस्तानी' भाषेत समजावून सांगतो. नंतर काझी त्याला विवाहाचा करार (निका की सीग, अक्द-इ-निका) उच्चारायला सांगतो व त्याला अर्थ समजावून सांगतो. यानंतर काझी वधूच्या साक्षीदाराला (वकील) वराशी हस्तांदोलन करून 'अमक्याची अमुक ही तिचा साक्षीदार व इतर दोन साक्षीदार यांच्या साक्षीने तुमच्याशी विवाहबद्ध होऊ इच्छिते व असा करार तिने केलेला आहे, हे तुम्हांला मान्य आहे काय' असे त्याला विचारा असे सांगतो. वधूच्या साक्षीदाराने असे विचारल्यावर वर तीन वेळा 'मी मनःपूर्वक अमुक वधूबरोबर लग्न करू इच्छितो व तिने केलेला अमुक करार मला मान्य आहे' असे म्हणतो. त्याने असे म्हटले म्हणजे लग्न लागले असे म्हणतात. पंजाबमध्ये हिंदुधर्मांतरित लोक याऐवजी गाठ पाडण्याचा हिंदूचा विधी करून लग्न लावतात. बलुची जमातीतही गाठ पाडून लग्न लावतात. पण वधूवरांच्या पदराची गाठ पाडीत नाहीत तर वर व वधूच्या जागी दुसऱ्या एखाद्या मुलीची गाठ पाडतात. त्यानंतर ते 'जोडपे' ओढ्यावर किंवा नदीवर जाते आणि तेथे वर आपल्या हातात तलवार घेऊन तीवर तीन वेळा पाणी टाकतो. हे पाणी खाली पडू देत नाहीत; त्या खाली घागर ठेवतात. हे झाल्यावर वधूच्या ऐवजी जिच्याशी गाठ बांधली त्या मुलीला गाठ सोडून मोकळे करतात. लग्न (निका) लावण्याचा विधी चालू असताना काझीसमोर एक तबक ठेवतात. या तबकात खडीसाखर, बदाम, विड्याची पाने, खारका व काही ठिकाणी चंदनलेप, तांदूळ व दोन पदरांची काळ्या मण्यांची पोत ठेवतात. याच तबकात काझींची फी म्हणून सव्वा दोन रुपये व त्याच्यासाठी पोशाखही ठेवतात.

अनुक्रमणिका

गुजरातमध्ये लग्न लावण्याबद्दल काझीला पाच रुपये व एक शाल देतात आणि वधूच्या गल्लीतील मशिदीच्या मुख्याधिकाऱ्यास सव्वा रुपया देतात.

मुहंमदाच्या काळी काझीला इतर धार्मिक अधिकाराबरोबरच मुलकी व फौजदारी स्वरूपाच्या गुन्ह्याबद्दलही न्याय देण्याचा अधिकार असे. पण सध्या त्याच्याकडे हा अधिकार नाही. धर्माच्या कायद्याप्रमाणे लग्न लावणे हे काझीचे कर्तव्यच आहे. त्यामुळे त्याला लग्न लावण्याबद्दल पैसे मागण्याचा काहीही अधिकार नाही. पूर्वीचे राजे काझींना केवळ खालील गोष्टींची कार्यवाही करण्याकरिता देणग्या, इनाम जमिनी, पगार देत असत. ईस्ट इंडिया कंपनीने व ब्रिटिश सरकारनेही कृपाळू होऊन या देणग्या, इनाम जमिनी इत्यादी तशाच चालू ठेवल्या-निका लावणे, मुलांना इस्लामचे शिक्षण देणे, निराधार गरिबांना दफन करणे, मशिदीत दिवसातून पाच वेळा होणाऱ्या प्रार्थना सांगणे, मशिदीचा मुख्याधिकारी (मुतवली), धर्मोपदेशक (खातिब) नेमणे; मशिदीच्या साफसफाईचे काम करणारा (मुजाविर), प्रार्थनेसाठी लोकांना बोलावणारा (मुअज्जिन) यांची नेमणूक करणे, काझीला या सगळ्या लोकांचा खर्च आपल्या इनामाच्या उत्पन्नातून किंवा लोकांनी दिलेल्या देणग्यांमधून करावा लागे. काझीने आपल्या कर्तव्यात कसूर केली तर राज्यकर्ता त्याला बडतर्फ करून दुसऱ्या माणसाची काझी म्हणून नियुक्ती करू शकतो. कारण काझीच्या पदाचे मुख्य कामच परमेश्वराच्या सेवकांना त्रास न पडू देणे हे आहे. काझी जर लग्न लावण्याबद्दल जबर फी घेऊ लागला तर त्या पदाचा उद्देशच संपतो. परंतु मुस्लीम राज्यात सामान्यत्वे राज्यकर्ताच मशिदीचा अधिकारीवर्ग नेमतो. त्यांना राजाकडून पगार मिळतो. त्यामुळे ते काझीचे सेवक नसतात. स्वाभाविकच काझी आपला चरितार्थ चालावा यासाठी लग्नाची दक्षिणा मागतो. काझीची नेमणूक अज्ञ लोकांची धर्मकृत्ये करण्यासाठी केलेली असते. विद्वान म्हणजे धर्म जाणणारे लोक स्वतःच लग्न, मृत्यू इत्यादी प्रसंगीचे विधी करू शकतात. आणि याबाबतीत त्यांच्यावर ईश्वर किंवा प्रेषित यांची काहीही मनाई नाही.

लग्न (निका) लागल्यानंतर काझी वधूवरांच्या वतीने पुढील प्रार्थना म्हणतो- 'हे परमेश्वरा, आदम व हव्वा, इब्राहीम व सरह, युसूफ व झुलेखा, मुसा व सफुरा, आदरणीय मुहमद व आयशा, अलि-उल-मर्तजा व फातिमा-तुजुहरा यांच्यासारखे वधूवरांना परस्परांबद्दल प्रेम बहाल कर.' नंतर तो खडीसाखर व काळी पोत वधूची आई किंवा एखाद्या स्त्रिच्या हाती देऊन तिला, वधूला अमक्याचा अमुक ह्याच्याशी तुझे लग्न झाले आहे व अमुक मेहर तुझ्यासाठी ठरविण्यात आला आहे असे समज, हे सांगण्यास सांगतो. त्याचप्रमाणे विवाहाचे चिन्ह म्हणून काळी पोत घालण्यास व सुखी वैवाहिक आयुष्याचे प्रतीक म्हणून खडीसाखर खाण्यास सांग असे म्हणतो. हे ऐकल्यानंतर वधू रडते किंवा ती रडते असे गृहीत धरतात. पुरुषांच्या बैठकीत वर सर्वांना गळाभेट देऊन अभिवादन करतोच, उपस्थित पुरुषमंडळी त्यांचे अभिनंदन करतात. वर जरी गुलामापैकी असला तरी ह्या प्रसंगी त्याला गळाभेट घेऊ देतात. काझी गेल्यानंतर भूताखेतांना पांगवण्यासाठी कर्कश वाद्ये वाजवतात. पाहुणेमंडळींना मेजवानी देतात.

या मेजवानीसाठी वरासहित वरपक्षाच्या मंडळीला एका खोलीत आणतात. यावेळी वरासाठी लाल कपड्याच्या पायघड्या घालतात. व वरपक्षाच्या मंडळीच्या डोक्यावर लाल वस्त्राचा चांदवा धरतात. त्यांना चंदनलेप लावतात व त्यांची थोडी थट्टामस्करीही करतात. त्यांना विडे व शरबत देतात. शरबत देण्यापूर्वी वरपक्षाच्या मंडळीला हात धुण्यासाठी पाणी देतात. यावेळी वरपक्षाची मंडळी पातेल्यात हात धुताना त्यात

रुपया आठ आणे टाकतात. हे पैसे नोकर घेतात; पण काही वेळा यजमान ते पैसे ठेवून घेतो. यानंतर जेवणासाठी चादर (दस्तरखान) अंथरतात. या दस्तरखानवर अन्नपदार्थ ठेवून पाहुणेमंडळींना वाढतात. जेवणाच्या सुरुवातीस वराचा मेहुणा स्वतः वराचे हात धुतो व नंतर त्याच्या तोंडात एक दोन घास घालतो. यानंतर वर स्वतःच्या हाताने जेवतो, पाहुणेमंडळी जेवतात. जेवण झाल्यावर पाहुण्यांना सुपारी, पुष्पगुच्छ देतात, अत्तर लावतात. त्यानंतर वराचे अगदी जवळचे नातलग सोडून बाकीचे पाहुणे आपापल्या घरी जातात.

कुराण आणि हदीसच्या नियमाप्रमाणे विवाह पुढील तीन गोष्टींवर अवलंबून असतो:- दोन्ही पक्षांची संमती, दोन साक्षीदारांच्या साक्षी आणि मेहर. यांपैकी एखाद्या गोष्टीची उणीव असेल तर विवाह अवैध ठरतो. श्रीमंत लोक विवाह कराराची (मेहर) रक्कम सगळी किंवा तिचा तिसरा हिस्सा लग्नाच्या वेळीच देतात. तर गरीब लोक हप्त्यांनी देतात. ही रक्कम ईश्वरी आज्ञेने ठरविली असल्यामुळे ती दागिने, कपडे किंवा इतर कोणत्या तरी स्वरूपात द्यावीच लागते किंवा त्यातील काही भाग पुन्हा परत मिळावा म्हणून वधूपक्षाचे मन वळवावे लागते. वराला ही सूट मिळाली नाही किंवा ही मागणी त्याने रद्द करवून घेतली नाही तर ही रक्कम देण्याची जबाबदारी त्याची असते. ही रक्कम फेडण्यापूर्वी त्याला मृत्यू आल्यास ही रक्कम त्याच्या बापाला किंवा मुलाला फेडावी लागते. आणि जर पत्नी मरण पावली तर वधूच्या नातेवाईकांना ती रक्कम मागण्याचा किंवा प्रसंगी कायद्याने वसूल करण्याचा अधिकार असतो. परंतु पत्नीने आपण होऊन घटस्फोट घेतला असेल तर मात्र तिचा मेहरवरचा अधिकार संपुष्टात येतो नवऱ्याला तिला घटस्फोट द्यावयाचा असेल तर त्याला आधी ही रक्कम द्यावी लागते.

नंतर दुपारच्या वेळी वराला पुरुषांच्या खोलीमधून स्त्रियांच्या खोलीत आणतात. पण तो येण्यापूर्वी वधूच्या मैत्रिणी वधूचा साजशृंगार करतात. आणि मोलकरीण वधूच्या डोक्याला सेहरा बांधून तिला पलंगावर बसविते. वर स्त्रियांच्या खोलीत आल्यावर त्याला वधूच्या समोर पलंगावर बसवितात व दोघांमध्ये लाल कपड्याचा अंतरपाट धरतात. मोलकरीण वधूच्या हातात लाल दोरा व थोडे तांदूळ देऊन ते पडद्यावरून वराच्या डोक्यावर फेकण्यास सांगते. नंतर वराची बहीण त्या दोऱ्यास एक अंगठी बांधते आणि ती अंगठी व थोडे तांदूळ वराच्या हातात देऊन पडद्यावरून वधूच्या अंगावर फेकण्यास सांगते. अंगठी तीन वेळा इकडून तिकडे फेकतात. ह्या वेळी लग्नगीते म्हणतात. नंतर मोलकरीण वरास अंतरपाट दूर करण्यास सांगते. यानंतर वधूवरांना शेजारी बसवतात. ती मोलकरीण त्यांची थट्टमस्करी करते. वराची आई किंवा बहीण तिला, वराला वधूचा चेहरा दाखव असे म्हणते तेव्हा ती 'वधूचा चेहरा चंद्रापेक्षाही सुंदर आहे, त्याने तिच्याकडे एक कटाक्ष टाकला तरी बिचारा वेडा होईल' असे प्रत्युत्तर देते.

दक्षिण हिंदुस्थानमध्ये वराला स्त्रियांच्या खोलीत सूर्योदयाच्या वेळी बोलावतात. त्यापूर्वी वधूचा साजशृंगार झालेला असतो. तिच्या डोक्याला, लग्न लावल्यानंतर मुद्दाम वाजतगाजत वराच्या घरून आणलेला, सेहरा बांधतात. वर जेव्हा स्त्रियांच्या खोलीत जातो तेव्हा त्याला वधूशिवाय कोणत्याही स्त्रिच्या मुखावर ओढणी दिसत नाही. कारण स्त्रियांना राजा किंवा वर यांच्यासमोर तोंडावर बुरखा घेण्याची गरज नसते. वधूवरांना, मध्ये लाल कपड्याचा अंतरपाट धरून पलंगावर बसवितात, परस्परांच्या अंगावर तांदूळ व लाल दोरा फेकण्यास सांगतात. त्यानंतर वर अंतरपाट दूर सारतो. यावेळी त्याला प्रथम वधूचे आरशात, प्रतिबिंब दाखवतात. तिचे प्रतिबिंब दृष्टीला पडताच वर, उघड्या असलेल्या कुराणामधील ज्या ओळींवर त्याची

दृष्टी पडते, त्या ओळी वाचतो. थोड्या वेळाने त्याला वधूचा चेहरा दाखवतात. त्याआधी अनुक्रमे वधूच्या डोक्यावर, खांद्यावर, गुडघ्यावर व पायावर खडीसाखरेचा खडा ठेवून तो वराला तोंडाने उचलण्यास सांगतात. शेवटच्या वेळी वर तो खडा डाव्या हाताने उचलण्याचा प्रयत्न करतो, पण डाव्या हाताने उचलू देत नाहीत. कारण डावा हात अपवित्र असतो असे मानतात. वराची आई, बहीण त्याला वाटेल तसा उचलू द्या असा आग्रह धरतात. तेव्हा त्याला उजव्या हाताने उचलू देतात. यानंतर वराला दुधाचा प्याला देतात. वर थोडे दूध पितो व प्याला वधूच्या तोंडाला लावतो. दक्षिणेमध्ये वधूवर अंगठी शोधण्याचाही खेळ खेळतात. एका भांड्यात पाणी घेऊन त्यात अंगठी टाकतात व वधूवरांना शोधण्यास सांगतात. ज्याला ती प्रथम सापडेल त्याची घरात सत्ता चालेल असे मानतात. अंगठी शोधण्याच्या कामी वधूच्या मैत्रिणी तिला मदत करतात. सामान्यपणे या खेळात वधूला जिंकण्याची संधी देतात. या खेळाप्रमाणेच इतरही खेळ आहेत. उपस्थित स्त्रिया वराला खोटे खोटे मारतात. यामागे बहुधा अनिष्ट शक्तींना पिटाळून लावण्याचा हेतू असावा. यानंतर वधूवरांना स्वयंपाकघरात नेऊन वधूला पोळी लाटण्यास व वराला ती भाजण्यास सांगतात. यावेळी इतर स्त्रिया त्याची थट्टा करतात. पुन्हा सर्वजण स्त्रियांच्या खोलीत परत येतात व ज्या पुरुष नातलगांनी तिला पाहण्यास हरकत नसते अशांना वधूचा चेहरा दाखवतात. ते तिला आशीर्वाद व भेटवस्तू देतात. नंतर वधूची आई वराच्या हातात वधूचा हात देऊन 'आतापर्यंत हिची प्रतिष्ठा आमच्या हातात होती, आता आम्ही ती तुमच्या स्वाधीन करतो' असे म्हणते. यावर वर आपण तिची काळजी घेऊ असे वधूच्या आईला आश्वासन देतो. यानंतर तो वधूपक्षाच्या नातलग स्त्रियांना नमस्कार (तसलीम) करतो, त्या त्याला भेटवस्तू देतात.

वधूला सासरी नेताना तिला मेण्यात बसवतात. वर घोड्यावर बसतो. गृहप्रवेश करताना वधुचा उंबरठ्याला स्पर्श होऊ नये म्हणून वर तिला उचलून नेतो. तो दरवाजातून प्रवेश करताना वराची बहीण त्याला तुझी पहिली मुलगी माझ्या मुलाला दे, असे म्हणते. यावर वर प्रथम तिची थोडी थट्टा करतो पण तिने अधिक आग्रह केल्यावर होकार देतो. वधूवरांच्या नावे कोंबडा किंवा बकरी बळी देतात. व ते मांस गरिबांना वाटून टाकतात. यानंतर वधूवरांना परस्परांना आलिंगन देण्यास सांगतात. व दोन प्रणिपातांच्या प्रार्थना म्हणण्यास सांगतात. हे झाल्यावर वधू वराचे व नंतर वर वधूचे पाय चंदन व पाण्याने धुतो. नंतर वधूवरांना शयनगृहात पाठवतात. पण शयनगृहात जाण्याचा उत्तम वेळ म्हणजे मध्यरात्रीनंतर व सूर्योदयापूर्वी हा असतो असे मानतात. सिंधमध्ये, फलशोभनापूर्वी वराला वधूचे पाय धुऊन ते पाणी शयनगृहाच्या चार कोपऱ्यांत शिंपडण्यास सांगतात, यामुळे भुतेखते पळून जातात व वधूवरांना सौख्य प्राप्त होते अशी समजूत आहे. शयनगृहात प्रवेश केल्यावर वर वधूचे केस आपल्या हातात धरून पुढील प्रार्थना म्हणतो, "हे परमेश्वरा! मी आणि माझी पत्नी यांना आशीर्वाद दे, आम्हांला उदरनिर्वाहासाठी भाकरी दे. हे परमेश्वरा! आमच्या पोटी प्रामाणिक व खऱ्या मुसलमानाला जन्म दे, आमच्या पोटी दुष्ट मुलाला जन्म देऊ नकोस." सूर्योदयाच्या वेळी वधूची आई दार वाजवून वधूवरांना जागे होण्याची व स्नान करण्याची सूचना देते.

ब्राहूई जमातीत, वधूवरांनी शयनगृहात प्रवेश केल्यावर त्यांच्या माता व इतर नातलग स्त्रिया दाराशी मुद्दाम लक्ष देऊन उभ्या असतात. कारण मीलनास अकारण उशीर लागला तर वर त्यांना पुजाऱ्याकडून मंतरलेले पाणी आणण्यास सांगतो. सेमेटिक वंशातील मुसलमानांमध्ये वधूच्या कौमार्याची खात्री पटवून घेण्यासाठी वधूवरांच्या बिछान्यावरील चादर तपासण्याची पद्धत आहे. ही बाब फक्त स्त्रियांतल्या स्त्रियांतच घरगुती स्वरूपाची असते. ती इतरांना क्वचितच सांगतात. आणि वधूच्या विरोधी निर्णय गेल्यास तर तो

कोणालाच कळू देत नाहीत. परंतु बलुची समाजातील माता आपल्या मुलीच्या कौमार्याचा पुरावा इतरांना मोठ्या अभिमानाने दाखविते.

लग्नाच्या वरातीच्या दिवशी वधूवरांच्या हातात बांधलेले 'काकण' लग्नानंतर तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशी सोडतात. 'काकण' सोडण्याचा विधी तिसऱ्या दिवशी केल्यास त्यास 'बहोरा' व चौथ्या दिवशी केल्यास त्यास 'चौथी' असे म्हणतात. या विधीसाठी नातलगांना बोलावण्यात येते. या विधीसाठी मुद्दाम वधूचा भाऊ व भावजय तिच्या सासरी येतात. या विधीसाठी स्त्रीपुरुष लाल किंवा पिवळ्या रंगाचा पोशाख करून येतात व एकमेकांच्या अंगावर रंग उडवतात. यानंतर निमंत्रितांना मेजवानी देतात. त्यानंतर वधूवरांना विवाह मंडपात बसवतात. एका मोठ्या लोखंडी किंवा अन्य धातूच्या सपाट पत्र्यावर पाण्याने भरलेले भांडे, पुष्कळसा भाजीपाला, चंदनलेप व लिंब ठेवतात. मोलकरीण वधूवराच्या हातांतील 'काकणे' काढते व या वस्तूंमध्ये टाकते आणि त्यांना ती शोधून काढा असे सांगते. काकणे शोधण्यासाठी वधूला मोलकरीण किंवा दुसरी एखादी स्त्री मदत करते. वराने प्रथम 'काकणे' शोधल्यास वधूची बहीण त्याचा गालगुच्चा घेते, त्याचे कान पिरगाळते व वधू त्याला 'मी तुमची पत्नी व दास आहे' असे म्हणते. वधूने शोधल्यास वर तिला असेच म्हणतो. 'काकणे' तीन वेळा शोधून काढावयाची असतात. हे झाल्यावर वधूची वेणी घालतात व वराला ती एका हाताने सोडण्यास सांगतात. त्याने दोन्ही हातांनी सोडण्याचा प्रयत्न केला तर वधूची बहीण त्याला मारते. हा विधी वधूगृही झाला तर वरपक्षाला मानाचा पोशाख (खिलत) देतात. व वधूवरांना आपल्या घरी जाऊ देतात. हा विधी वराच्या घरी झाला तर या विधीसाठी आलेल्या वधूच्या भावाला शाल व भावजयीला साडी, चोळी, काकण यांचा आहेर करतात. या विधीच्या वेळी पैशाच्या स्वरुपात आहेर करण्याची पद्धत नाही. आणि केल्यास कोणी स्वीकारीत नाहीत. सिंधमध्ये वर लग्नानंतर सात दिवस व सात रात्री आपल्या सासरी राहतो. ब्राहूई जमातीत वर वधूला घेऊन आपल्या घरी आला की उंबरठ्यावर एक बकरी बळी देतात आणि तेथे सांडलेल्या रक्तावरून वधूला अशा पद्धतीने चालण्यास सांगतात की, तिच्या पायांतील चपलेपैकी एकीच्या टाचेला थोडे रक्त लागावे. थोडे रक्त एका कपातही घेतात आणि वधूची आई वधूला तिने उंबरठ्यावर पाय ठेवल्यावर त्या रक्ताचा टिळा लावते. हे कपातील रक्त व दूर्वा वाहत्या पाण्यात फेकून देतात आणि वाहते पाणी नसल्यास हे रक्त हिरव्या झाडाखाली पुरतात व त्यावर दूर्वा ठेवतात. परंतु अलीकडील काळात, धर्माच्या विविध बाबींचे ज्ञान झालेले सुशिक्षित लोक वधूच्या कपाळाला रक्ताचा टिळा लावीत नाहीत. त्याऐवजी वधूची आई एका कपात दूध व दूर्वा घेते व वधूला त्यात बोट बुडविण्यास सांगते. नंतर हे दूध व दूर्वा वाहत्या पाण्यात फेकून देतात किंवा हिरव्या झाडाखाली पुरतात.

दक्षिण हिंदुस्थानमध्ये 'काकण' सोडल्यानंतर तिसऱ्या चौथ्या दिवशी 'हात बर्ताना' नावाचा विधी करतात. हा विधी होईपर्यंत वधूवरांना कोणतेही काम करू देत नाहीत. हा विधी म्हणजे वधूवरांना विवाहानंतरच्या नियमितपणे कामाची सुरुवात. काही ठिकाणी हा विधी काही वेळा मधुचंद्राच्या पाचव्या किंवा शेवटच्या शुक्रवारी करतात (जुमागी). या विधीच्या वेळी वधूचे नातलग व इतर पाहुण्यांना निमंत्रित करतात. उपचार म्हणून वधूवरांना पुऱ्या करणे, शिंके हलविणे, भाजीपाला निवडणे यांसारखी कमी श्रमाची कामे करायला लावतात. पुऱ्या करण्यापूर्वी वराला पोळ्यांभोवती गुंडाळलेला दोरा उकलण्यास सांगतात. यानंतर वधूवरांना लाडू फोडावयास सांगतात. वधूवर एकमेकांच्या हातातील लाडूचा घास घेतात व उरलेले लाडू उपस्थित स्त्रियांना वाटून टाकतात. यानंतर मेजवानी होते. मेजवानीच्या वेळी वरपक्षातर्फे वधूच्या

आईवडिलांना कपड्यांचा आहेर करतात. या विधीच्या वेळी वधूपक्षाकडूनही अंगठी, विडे यांसारख्या वस्तू आणतात.

मधुचंद्राच्या पाच शुक्रवारी (जुमागी) मेजवान्या देतात. यांपैकी पहिले मेजवानी वधूच्या माहेरी, नंतरच्या तीन वधूच्या माहेरी किंवा जवळच्या नातलगांच्या घरी आणि शेवटची मेजवानी वराच्या घरी देण्यात येते. सगळ्या ठिकाणी हीच पद्धत असते असे मात्र नाही. गुजरातमध्ये विवाहानंतरच्या चार शुक्रवारी वधूचे आईवडील मिष्टान्नाचे भोजन देतात. या शुक्रवारच्या जेवणांना फार महत्त्व देतात. वधूच्या आईवडिलांनी त्याला ही जेवणे न दिली तर तो सासुरवाडीला क्वचितच जातो. उत्तर हिंदुस्थानमध्ये मधुचंद्र झाल्यानंतर वधू वर्षभर आपल्या घरी अधूनमधून येते म्हणजे तिला माहेरपणासाठी आणतात. शाबान, मोहरम, सफर आणि काही वेळा रबिलावल व शव्वाल या महिन्यांत प्रत्येकी पंधरा दिवस वधूला माहेरी नेतात. त्याचप्रमाणे मोहरम व शबेबरात या मुस्लीम आणि होळी व दिवाळी या हिंदु सणांच्या वेळी वधूला माहेरी नेतात. बकरी ईदचा सण ती अर्धा माहेरी व अर्धा सासरी साजरा करते. हे नियम फक्त वैवाहिक जीवनाच्या पहिल्या वर्षालाच लागू आहेत. माहेरी असताना वधू वडीलधाऱ्या पुरुषांसमोर घुंघट घेते. लग्न झाल्यावर दोन-तीन वर्षेपर्यंत तिने घरातील वडीलधाऱ्यामंडळींच्या देखत आपल्या पतीला न बोलले पाहिजे.

प्रेषितांच्या हुकुमान्वये कुराण आणि हदीसनुसार मुसलमानांना चार बायका करता येतात. ‘एक पत्नी असेल तर ती तुमच्याशी भांडते, दोन असल्यास तुम्ही भांडणात गोवले जाता, तीन असल्यास जिच्यावर तुमचे प्रेम अधिक आहे तिच्या विरुद्ध उरलेल्या दोघी फितुरी करतात आणि चार असल्यास त्या आपसात गुण्यागोविंदाने वागतात व त्यामुळे पतीला शांती मिळते.’ बायका चार प्रकारच्या असाव्या- ‘शय्यासोबतीण, संसारोपयोगी, आनंदशोधिका, पट्टराणी. शेवटची मात्र शंभरातून एखादी असते.’ ‘पुरषाने संभाषणासाठी इराणी, घरकामासाठी खुरसानी, मुलांच्या संगोपनासाठी हिंदू आणि तिघींवर जरब ठेवण्यासाठी मावरा उन्नहर किंवा ट्रान्सोक्षिआना यांमधून एक अशा चार बायका कराव्या.’ तथापि बहुसंख्य पुरुषांना एकच बायको असते, थोड्यांना दोन किंवा तीन असतात आणि चार बायका असणारा क्वचितच एखादा असतो. श्रीमंतांचा अपवाद सोडल्यास मुसलमान पहिल्या बायकोला मूल होत नसेल किंवा ती असाध्य रोगाने पीडित असेल तरच दुसरी बायको करतात असे प्रत्यक्षात पाहताना आढळते. देशाच्या इतर भागापेक्षा पंजाबमधील श्रीमंत मुसलमानांत बहुपत्निकत्वाची चाल आहे.

घटस्फोटाचे तीन प्रकार आहेत. ते पुढीलप्रमाणे : (१) रद्द करता येण्याजोगा (तलाक-इ-बैन). पती पत्नीला फक्त एकदाच ‘मी तुला घटस्फोट दिला आहे’ असे म्हणून या प्रकाराचा घटस्फोट घेतो. (२) परत लग्न समारंभ लावल्याशिवाय रद्द न करता येण्याजोगा (तलाक-इ-रजाई). ‘मी तुला घटस्फोट दिला आहे’, असे दोन वेळा म्हणून पत्नीला घटस्फोट देतो. (३) कायम स्वरूपाचा (तलाक-इ-मुतलक) ‘मी तुला घटस्फोट दिला आहे’, असे पती तीन वेळा म्हणतो. पहिल्या प्रकारे पतीने पत्नीला घटस्फोट दिला असेल तर त्यानंतर तिच्या तीन मासिक पाळ्या उलटण्याच्या आतच तो तिचा पुनर्स्वीकार करू शकतो. पण पत्नीची जर त्याच्याबरोबर राहण्याची इच्छाच नसेल तर तिने मेहरचा $\frac{१}{४}$ भाग सोडून उरलेला स्वीकारावा लागतो. दुसऱ्या प्रकारचा घटस्फोट असल्यास पतीपत्नी दोघेही राजी झाल्यास एकत्र राहू शकतात. पण दोघांपैकी कोणी राजी नसल्यास पत्नीला मेहरची पूर्ण रक्कम द्यावी लागते. घटस्फोट जर तिसऱ्या प्रकारचा असेल तर, त्या स्त्रीने

दुसऱ्या पुरुषाशी लग्न करून त्याच्यापासून घटस्फोट घेतल्याशिवाय तिच्याशी समागम करणे विधीबाह्य असते. अशा दुसऱ्या पुरुषास की ज्याच्याशी तिने लग्न केले व घटस्फोट घेतला, ‘मुस्तहल’ म्हणतात. पण ही पद्धत निंद्य आहे असे मानतात. एखाद्या स्त्रीने आपल्या पतीजवळ घटस्फोटाची मागणी केली तर तो प्रथम नकार देतो व शेवटी मेहरवरचा हक्क सोडण्यास तुझी तयारी असेल तरच मी घटस्फोट देईन असे म्हणतो. अशा वेळी तिला दुसरा पर्याय नसल्यामुळे ती मेहरवरचा हक्क सोडते. तलाक-इ-रजाईनंतर पुरुषाने दोन महिनेपर्यंत गुलाम स्त्रीशी रत होऊ नये असे म्हणतात. पत्नीला घटस्फोट देताना पतीने तिची मासिक पाळी होईपर्यंत थांबले पाहिजे व त्यानंतर तिला स्पर्श न करता घटस्फोट दिला पाहिजे. ती गरोदर असल्यास पतीने ती बाळंत होईपर्यंत घटस्फोट देऊ नये. त्यानंतर त्याची इच्छा असल्यास तिने दोन वर्षे मुलाचे संगोपन केले पाहिजे. लग्न लागल्यानंतर पण फलशोभन होण्याआधी एखाद्या पुरुषास आपल्या पत्नीपासून घटस्फोट घ्यावयाचा असेल तर त्याला मेहरची अर्धी रक्कम तरी द्यावीच लागते, पण सगळी रक्कम देणे अधिक उचित होय असे म्हणतात. दक्षिण हिंदुस्थानातील सुन्नी मुसलमानात ही पद्धत रूढ आहे. परंतु घटस्फोटाची ही पद्धत वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळी असल्याचे दिसते. शिया जमातीत सुन्नींपेक्षा घटस्फोटाचा कायदा अधिक कडक आहे. त्यांच्यात घटस्फोट देणारा पुरुष प्रौढ असला पाहिजे आणि त्याने घटस्फोटाचे शब्द अरबीमध्ये दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत उच्चारले पाहिजेत असे मानतात. कुराणनुसार घटस्फोटानंतर स्त्रीने तीन महिन्यापर्यंत पुनर्विवाह करू नये, विधवा स्त्रीने पुनर्विवाह करावयाचा असल्यास पतीच्या निधनाला चार महिने दहा दिवसांचा काळ उलटू द्यावा असे म्हणतात. पण बहुतेक विधवा स्त्रिया विधवेचे जीवन अधिक पसंत करतात असे दिसते. कारण त्यांनी जरी लग्न केले तरी त्यांना दुय्यम दर्जाच्या पत्नीचे स्थान मिळते (डोल). त्यांच्या पुनर्विवाहात फक्त लग्न लावण्याचा विधी होतो. पण कुमारिकांच्या लग्नासारखे थाटामाटाने लग्न होत नाही. बलुची लोकांत एक दगड तीन किंवा सात वेळा जमिनीवर फेकून पत्नीला घटस्फोट देण्याची पद्धत आहे. अफगाण लोकांत एका पाठोपाठ तीन दगड जमिनीवर फेकतात व प्रत्येक वेळी ‘घटस्फोट’ हा शब्द उच्चारून घटस्फोट देतात. शिरन्नी पठाणांच्यामध्ये घटस्फोट म्हणजे आईवडिलांनी आपल्या घटस्फोटित मुलीला पुन्हा विकत घेणे असते. याचा अर्थ असा की, एखाद्या पुरुषास आपल्या पत्नीला घटस्फोट द्यावयाचा असेल तर तो तिच्या बापाकडून, नियम म्हणून, त्याने दिलेल्या रकमेपैकी अर्ध्या रकमेची मागणी करतो. ही रक्कम दिली तरच बापाला तिचा स्वीकार करता येतो. आणि त्याने ही रक्कम तिच्या पतीस देण्यास नकार दिला तर पती तिला घराबाहेर हाकलून देतो. याचा अर्थ तिला जमातीच्या बाहेर काढले असा आहे. एखाद्याला अशा जमातीबाहेर काढलेल्या स्त्रीशी लग्न करावयाचे असेल तर तिच्या बापाला किंवा पालकास भरपाई द्यावी लागते. त्याचप्रमाणे तिच्या बापाने तिचा स्वीकार केला असता तर तिच्या पतीला जितके पैसे द्यावे लागले असते तितके पैसे तिच्या पहिल्या पतीलाही द्यावे लागतात. हा घटस्फोट त्या स्त्रीच्या मागे तीन ढेकळे फेकून घेता येतो.

दक्षिण हिंदुस्थानात वरिष्ठ वर्गाचे लोक विवाहविधी वर्षभर चालू ठेवतात. त्यांच्यात हळद लावण्याचा विधी सहा महिने चालू असतो या काळात दररोज वाजंत्री लावतात व मेजवानी देतात. उरलेले विधी दर महिन्याला किंवा पंधरा दिवसाला एक याप्रमाणे करतात. म्हणजे अशा रीतीने विवाह पूर्ण करण्यास त्यांना एका वर्षाचा काळ लागतो. मध्यमवर्गीय लोक हे विवाहविधी पुढीलप्रमाणे अकरा दिवसांत पूर्ण करतात-पहिले तीन दिवस वधूवरांना हळद लावणे, चौथ्या दिवशी वराकडून वधूकडून मेंदी पाठवणे, पाचव्या दिवशी वधूकडून वराकडे मेंदी पाठवणे, सहाव्या दिवशी वधूच्या व सातव्या दिवशी वराच्या विवाह पोशाखाचे माप घेणे, आठव्या दिवशी कळसाचे माठ ठेवणे व भेटी पाठवणे आणि अकराव्या दिवशी लग्नविधी व वरास आणि वराच्या नातलग

—स्त्रियांस वधूमुखदर्शन. लग्न लागल्याच्या दुसरे तिसरे दिवशी ‘काकण’ सोडण्याचा विधी व पाचव्या जुमागीला वधूवरांनी काम करण्यास पुन्हा प्रारंभ करण्याचा विधी करतात. गरीब लोक तीन दिवसांत विवाहविधी आटोपतात. ते पहिल्या दिवशी वधूवरांना हळद लावणे व त्यांच्या पोशाखाचे माप घेणे, दुसऱ्या दिवशी भेटवस्तू पाठवणे आणि तिसऱ्या दिवशी लग्नविधी व वधूमुखदर्शन याप्रमाणे सर्व विधी पूर्ण करतात पण इतके दिवस लग्नासाठी वेळ मिळणे कठीण असेल तर ते प्रत्येक तासानंतर एक विधी याप्रमाणे सर्व विधी पूर्ण करून एकाच दिवशी लग्नसोहळा आटोपतात. उत्तर हिंदुस्थानमध्ये सामान्यत्वे विवाह समारंभ तीन दिवस चालतो. म्हणजे पहिल्या दिवशी मिरवणुकीने भेटवस्तू नेणे, दुसऱ्या दिवशी हळद आणि तिसऱ्या दिवशी वराने मिरवणुकीने लग्नासाठी वधूगृही येणे व लग्न याप्रमाणे विवाहसोहळा चालतो. गुजरातमध्ये लग्नविधी उत्तर हिंदुस्थानातल्यापेक्षा अधिक दिवस पण दक्षिण हिंदुस्थानातील विधींपेक्षा किती तरी कमी काळ चालतात.

अनुक्रमणिका

**प्रकरण नववे**

# मृत्यू

[मुसलमानांमधील मृतोत्तर विधींचा वृत्तांत ईआरई. ४·५०० तळटीपांमध्ये पहा.]

आजारी माणूस मृत्यूपूर्वी सामान्यत्वे चार पाच दिवस अगोदर लेखी करार (वसिका) किंवा मृत्युपत्र (वसियतनामा) करतो. या मृत्युपत्रात तो आपली मालमत्ता कोणाला कशी वाटावी हे नोंदवितो आणि त्यासाठी एक व्यवस्थापक (वसीह) नियुक्त करतो. मृत्युपत्र लेखीच असले पाहिजे असे नाही, पण ते दोन पुरुष किंवा एक पुरुष व दोन स्त्री साक्षीदारांनी प्रमाणित केले पाहिजे. [मृत्युपत्रांच्या कायद्यांसाठी आयबीड ७·८७७; बेली (Baillie), ६३ तळटीपा.]

मरण घटका जवळ आली आहे असे दिसताच कुराण वाचणाऱ्या विद्वानाला बोलावतात व त्याला कुराणातील 'यासीन' नावाचे छत्तिसावे प्रकरण आजारी माणसाजवळ मोठ्याने वाचण्यास सांगतात. या प्रकरणाला प्रेषित 'कुराणाचे हृदय' (कलब-उल-कुराण) असे म्हणत असत. माणसाच्या शरीरातील सर्व चैतन्य त्याच्या डोक्यात केंद्रित झाले म्हणजे त्याला मृत्यू येतो व हे सूरे यासिनच्या श्रवणामुळे होते असा मुसलमानांचा विश्वास आहे. त्यामुळे त्याचे मृत्यूपूर्वी वाचन करतात. याबाबत असे सांगतात की, जेव्हा परमेश्वराने आत्म्याला आदमच्या शरीरात प्रवेश करण्याची आज्ञा दिली तेव्हा आत्म्याने त्याच्या शरीरात एकदा डोकावून पाहिले व तो म्हणाला, 'ही जागा वाईट, अंधारी आहे, माझ्या योग्य नाही म्हणून मी तीत वास्तव्य करीत नाही.' नंतर न्याय्यी व पवित्र परमेश्वराने आदमचे शरीर तेजस्वी केले आणि आत्म्याला त्यात प्रवेश करण्याची आज्ञा केली. दुसऱ्या वेळेस आत्मा तेथे गेला आणि आपले वास्तव्यस्थान पाहून म्हणाला, 'या ठिकाणी मला ऐकण्यासाठी मधुर ध्वनी नाही.' पौर्वात्य गूढवादी म्हणतात की याच कारणामुळे परमेश्वराने संगीत निर्माण केले. हे संगीत ऐकून आत्म्याला प्रसन्नता वाटली आणि त्याने आदमच्या शरीरात प्रवेश केला. कुराणचे भाष्यकार, हदीसचे टीकाकार आणि श्रेष्ठ सत्पुरूष असे सांगतात की, परमेश्वराने निर्माण केलेल्या संगीताची गोडी सुरे यासिनच्या सदृश होती आणि म्हणूनच आत्म्याला शांती मिळावी यासाठी मृत्यूपूर्वी या प्रकरणाचे वाचन करतात. या प्रसंगी उपस्थित असणारांसाठीही 'समाधानाचे शब्द' (कलमा तु तैयिब) व 'खातरजमेचे शब्द' (कलमातु शहादत) मोठ्याने म्हणतात. आजारी माणसाला तो सामान्यत्वे बेशुद्धावस्थेत असल्यामुळे कलमाचे शब्द म्हणायला लावीत नाहीत. पण पवित्र माणसांना अखेरपर्यंत शुद्ध असते व ते बोलू शकतात. एखाद्याने आजारी माणसाला कलमाचे शब्द उच्चारण्यास सांगितले आणि ते शब्द उच्चारण्याच्या आतच आजारी माणूस मरण पावला तर त्याची धर्मनिष्ठा शंकास्पद होती असे मानतात. पण याबद्दल त्याला दोषी न धरता त्याला असे प्रवृत्त करणाऱ्यावर ठपका ठेवतात. म्हणून यावेळी उपस्थित असणारी माणसे आजारी माणसाला कलमा म्हणायला लावीत नाहीत. ते या आशेने कलमाचे शब्द उच्चरतात की, मरण पंथाला लागलेला माणूस त्यांचे शब्द ऐकून त्यांना मोठ्या आवाजात मनातल्या मनात प्रतिसाद देईल. मरणाऱ्या माणसाच्या तोंडात, आत्म्याचा शरीराबाहेर जाण्याचा मार्ग सुलभ व्हावा म्हणून, शरबताचे थेंब घालतात. [फ्रेझर, जी. बी. टॅबू अँड पेरिल्स ऑफ दि सोल, २५२. मृत्यूच्या वेळी कवटीतील ब्रह्मरंध्रातून आत्मा निघून जातो असा हिंदूंचा समज आहे. (मोनियर विलियम्स, ब्राह्मणीझम अँड हिंदूइझम, ४ थी आवृत्ती २९१.)] पण क्वचितच का होईना काही लोक शरबताऐवजी झमझम या पवित्र विहिरीतील पाणी तोंडात घालतात. लबाड सैतान मृत्यूच्या वेळी तहानेल्या आत्म्याला भूल व चकवा देण्याचा शेवटचा प्रयत्न करतो. सुखाचा कलश घेऊन, शरीराबाहेर आत्म्याला सैतान भेटतो. अशा वेळी जर आत्मा या

भुलावणीत सापडला तर सुखाचा कलश सांडून रिकामा होतो आणि मग सैतान अदृश्य होतो. माणसाने आयुष्यभरात दर दिवशी केलेल्या बऱ्यावाईट कृत्यांची नोंद आयुष्य वृक्षावरील त्या माणसाच्या पानावर देवदूतांनी केलेली असते. या नोंदी करणारे दोन देवदूत (किराम-उल-कातिबिन) दर दिवशी माणूस झोपला की, त्याच्या उशाशी बसून या नोंदी करतात व स्वर्गात जाऊन आयुष्य वृक्षावरील (तूबा) पानावर त्या लिहून टाकतात. मृत्यू समीप आला असता हे पान त्या झाडावरून खाली पडते. ते खाली पडल्यावर देवदूत ते घेऊन यमाकडे येतात. यम त्यांना व आणखी एका देवदूताला पृथ्वीवर पाठवतो व मरणाऱ्या माणसाला त्याच्या आयुष्यातील बऱ्या वाईट कृत्यांचा हिशेब दाखवा असे सांगतो. तो वाचून झाल्यावर त्या माणसास त्याच्या जमाखर्चानुसार सुखाचे किंवा दु:खाचे मरण येते.

माणूस मरण पावताच त्याचे तोंड, ते विद्रूप दिसू नये म्हणून बंद करतात. डोळेही कपड्याने झाकतात. दोन्ही पाय परस्परांपासून विलग राहू नयेत म्हणून कपड्याच्या पट्टीने पायाचे अंगठे एकत्र बांधतात. उत्तर हिंदुस्थानमध्ये मृताच्या तोंडात मध घालतात किंवा डाळिंबाचा दाणा घालतात. गुजरातमध्ये एका पवित्र झाडाची पाने मृताच्या चेहऱ्यावर चोळतात व शेजारी उदबत्त्या लावतात.

मृत्यू झाला हे दर्शविण्यासाठी काही मृदू पर्यायांचा उपयोग करतात. अशाच रीतीने आपण सम्राट बाबरबद्दल वाचतो की ते 'या क्षणभंगुर जगातून आपल्या स्वर्गातील शाश्वत निवासात निघून गेले.' मृत्यू पावण्यास 'इंत्तिकाल करना, फरमाना', 'रहलत करना', 'मरहूम होना' असे म्हणतात.

मृत्यू सायंकाळी झाल्यास मध्यरात्रीपूर्वी दफन करतात. मृत्यू जर रात्री उशिरा झाला आणि मर्तिकासाठी लागणाऱ्या वस्तू लवकर उपलब्ध होण्यासारख्या नसतील तर सकाळी दफन करतात. सेमेटिक वंशातील मुसलमानांत मृताला ताबडतोब दफन केले पाहिजे असा नियम आहे. हदीसमध्ये प्रेषितांनी म्हटले आहे 'मृत माणूस सद्गृहस्थ असेल तर ताबडतोब तिरडी तयार करून त्याला विनाविलंब दफनभूमीपर्यंत खांदा द्या आणि जर तो वाईट असेल तर त्याला खांदा देऊ नका; 'मृताला त्वरित दफनभूमीकडे न्या.' चांगल्या माणसाला जितक्या लवकर दफन केले तितक्या लवकर तो स्वर्गात जातो असा सर्वसामान्य मुस्लिमांचा समज आहे. तो वाईट असला तरीही त्याला लवकर दफन करतात. नाही तर त्याचे दुर्दैव इतरांच्या मागे लागेल असे मानतात. मृताच्या नातलगांनी अति शोक करू नये, उपाशी राहू नये असे म्हणतात.

दफन करण्यापूर्वी मृताला स्नान घालतात. मृताला स्नान घालणारे धंदेवाईक लोक असतात. त्यांना 'घासिल', 'मुरदाशू' म्हणतात. काही वेळा मृताचे नातलग स्नान घालतात. मृताला स्नान घातलेल्या पाण्यात पाय पडणे फार वाईट असते असे मानतात. त्यामुळे ते पाणी साचण्यासाठी जमिनीत एक खड्डा खणतात. सुन्नी लोक या स्नानासाठी बोरीची पाने टाकून तापवलेले पाणी वापरतात. पण हदीसनुसार मृताला 'सिद्र' झाडाची पाने टाकलेल्या शुद्ध पाण्याने स्नान घातले पाहिजे. स्नान घातल्यावर मृताच्या अंगाला कापूर चोळतात. मृताला स्नान घालणारा माणूस हाताला कापडाची पिशवी गुंडाळून मातीने त्याचे शरीर घासतो व नंतर त्यावर पाणी टाकून ते स्वच्छ करतो. तो प्रथम त्याचे पोट चार पाच वेळा मातीने घासतो व त्यावर पाणी टाकतो. नंतर ते साबण, शिकेकाई, रिठा यांनी घासतो. यानंतर उरलेले शरीर तो हळूहळू धुतो, कारण प्राण गेला असला तरी शरीर गरम असते. त्यामुळे घाईने स्नान घातल्यास मृताला त्रास होतो, अशी समजूत आहे. तोंड, नाकपुड्या

स्वच्छ करण्यासाठी गरम पाण्याऐवजी कापसाचा बोळा वापरतात. तोंड व नाकातून द्रव्य गळू नये म्हणून त्यात कापसाचे बोळे बसवितात. आणि चेहरा पुसुन काढतात. केस व दाढी पुसण्यासाठी मुलतानी माती वापरतात. या मातीला सिंधमध्ये 'मेत' व फारशीमध्ये 'जिल-इ-सर-शूही' असे म्हणतात.

मृताला स्नान घालताना, एका मोठ्या नव्या भांड्यात पाणी घेऊन त्यात बोरीची पाने घालतात. या पाण्याने खुजाने प्रथम मृताच्या डोक्यापासून पायापर्यंत नंतर उजव्या खांद्यापासून पायापर्यंत व शेवटी डाव्या खांद्यापासून पायापर्यंत असे तीन वेळा पाणी टाकतात. प्रत्येक वेळी पाणी टाकताना स्नान घालणारा माणूस अगर अन्य कोणी 'खातरजमेचे शब्द' (कलमातु शहादत) म्हणतो. ते पुढीलप्रमाणे आहेतः 'मी साक्ष देतो की, परमेश्वर एकच आहे. त्याच्या बरोबरीचा कोणीही नाही. मी साक्ष देतो की मुहंमद त्याचा सेवक व प्रेषित आहे.' स्नान घातल्यानंतर कोऱ्या कपड्याने शरीर पुसतात. लखनौमधील शिया समाजातील लोक मृताला कबरीच्या जागेजवळच एखाद्या पडद्याआड स्नान घालतात किंवा ज्या ठिकाणी पाणी सहज उपलब्ध होईल तेथे स्नान घालतात व नंतर त्याच्या हात, पाय, कपाळावर कापूर चोळतात. जुन्या काळी ब्राहूई जमातीत मृत स्त्रियांना दफन करण्यापूर्वी त्यांच्या हातापायांना नववधू सारखी मेंदी लावीत असत. ही रूढी आता फक्त श्रीमंत लोकांतच आढळत असून ती अस्तंगत होण्याच्या मार्गावर आहे. ब्राहूई समाजात मृताचे पोट फुगू नये म्हणून त्यावर लोखंडी कांबही ठेवतात आणि मृताला स्नान घालण्याचा मोबदला म्हणून मृताच्या उशाशी तांदूळ किंवा इतर धान्य एका मडक्यात ठेवतात. दक्षिण हिंदुस्थानमध्ये गरीब लोक स्नान घालणाऱ्यास चार आणे देतात तर श्रीमंत लोक ५० ते १०० रुपये किंवा मौल्यवान वस्तू म्हणजे शालजोडी इ. देतात. काही श्रीमंत पण अडाणी लोकांना प्रेताचा धसका बसतो इतका की, ते मृताने वापरलेले कपडे, फर्निचर इ. यांना आयुष्यात स्पर्शही करू इच्छित नाहीत. त्यामुळे याही वस्तू स्नान घालणाऱ्यास मिळतात.

पुरुषांच्या कफनासाठी विजार, शर्ट व डोक्यापासून पायापर्यंतचा भाग झाकला जाईल अशी चादर अशी तीन वस्त्रे असतात. स्त्रियांसाठी याशिवाय चोळी व ओढणी ही दोन वस्त्रे म्हणजे एकूण पाच वस्त्रे असतात. [दक्षिणेतील सातारा येथे पुरुषासाठी कफनाचे कापड ७५ फूट लांब व स्त्रीसाठी ९० फूट लांब असते (बीजी. २९·१३३). तळटीप] चादरीला (लिफाफा) कफनाचा मुख्य कपडा म्हणतात आणि तिच्या छाती झाकली जाईल अशा भागावर मक्केतील मातीने धार्मिक वचने लिहितात. मृताच्या शरीरावर गुलाबपाणी, अत्तर, अबीर शिंपडून मग चादर पांघरतात. चादरीची टोके तिरडीला बांधून टाकतात. शेवटी चादरीवर आणखी एखादे वस्त्र झाकतात. तिरडीच्या उशाकडील भागास कुराण ठेवतात. अशा रीतीने दफन करण्याची तयारी पूर्ण होते. कुटुंबाच्या ऐपतीनुसार यात अर्थातच बदल करतात. पण कफनासाठी नवेच वस्त्र लागते कारण तसे न आणल्यास दुसऱ्या कुणाचा मृत्यू होतो अशी समजूत आहे. पूर्वी मक्केला जाणारे यात्रेकरू आपल्या कफनासाठी लागणारे कापड तेथील झमझम या विहिरीतील पाण्यात बुडवून आणीत. पण ही पद्धत आता मात्र फक्त सुदानी, हिंदुस्थानी व काही अल्जिरियन मुसलमान यात्रेकरूंतच रूढ आहे.

दक्षिणेत, हे कफनाचे कपडे नव्या चटईवर आधी चादर, त्यावर विजार व विजारीवर शर्ट या क्रमाने एकावर एक ठेवतात. स्त्रियांच्या बाबतीत ओढणी हे वस्त्र बाजूला ठेवतात व नंतर बांधतात. या नव्या चटईवर ठेवलेल्या वस्त्रांना उदाचा धूर देतात व त्यावर अत्तर, गुलाबपाणी, अबीर शिंपडतात. कागदाच्या पुटोळीच्या टोकाने, अंगठी किंवा तांब्याच्या नाण्याने त्याच्या डोळ्यांत सुरमा घालतात. तसेच कपाळ, नाक, दोन्ही हातांचे

तळवे, गुडघे आणि पायाचे अंगठे यावर कापूर चोळतात. नंतर त्याला ज्या क्रमाने कपडे ठेवलेले होते त्या क्रमाने कपडे घालतात. कफनासाठी पांढऱ्या रंगाचेच कापड असावे लागते. तिरडी (जनाजा, ताबूत) किंवा शवपेटिकेवर टाकावयाचे कापड रंगीत असले तरी चालते. हे शवपेटिकेवर टाकलेले कापड दफन केल्याच्या चाळिसाव्या दिवशी स्मशानातील फकिरास देऊन टाकतात. मृत व्यक्ती पुरुष असेल तर बहुधा त्याचा पटका तिरडी किंवा शवपेटिकेवर टाकतात. शवपेटिकेतून दफन करण्यासाठी नेले असेल तर दफनानंतर शवपेटिका परत आणतात. श्रीमंत लोकांत केव्हा केव्हा शवपेटिका वापरीत नाहीत. पुरुषांच्या बाबतीत, त्याचा पटका नेहमी शवपेटिकेवर टाकतात.

मृताला कफनाची वस्त्रे घातल्यावर त्याचे तोंड, पाय व छातीवर चार पाच बोटे रुंदीच्या पट्ट्या बांधतात. मृत व्यक्ती पुरुष असेल व त्याची पत्नी हयात असेल तर तोंडावरची पट्टी सोडून तिला त्याचा चेहरा दाखवतात व मेहर माफ कर असे सांगतात. परंतु तिने पती जिवंत असतानाच मेहर माफ करणे अधिक चांगले असे मानतात. मृत्यूसमयी त्याची पत्नी हजर नसेल तर तिने पतीच्या मृत्यूची वार्ता कळताच मेहर माफ करावा. मृताची आई मृत्यूसमयी जिवंत असेल तर ती 'ज्या दुधावर मी तुला वाढविले ते मी तुला मोकळेपणाने अर्पण करते' असे म्हणते. असे करण्याचे कारण म्हणजे प्रत्येकावर आईचे ऋण असते, या ऋणातून ती हे शब्द उच्चारून त्याची मुक्तता करते; त्याशिवाय तो तिच्या ऋणातून मुक्त होत नाही असे मानतात. परंतु ही रूढी फक्त हिंदुस्थानातच आहे; इस्लामच्या कायद्याने सांगितलेली नाही. गुजरातमध्ये मृताची पत्नी हिंदु रूढीप्रमाणे आपल्या हातातील काकणे फोडून टाकते. परंतु मोची जमातीतील स्त्री लाल हातरुमाल वापरणे चालू ठेवते. नंतर मृताच्या शरीरावर फुले, सुगंधी द्रव्ये टाकतात. त्यानंतर फातिहासह कुराणातील ११२, ११३, ११४ ही प्रकरणे म्हणतात. त्यात पुढील आशय आहे: "म्हणा, परमेश्वर एक आहे; म्हणा, मला प्रातःकालच्या मालकाचे संरक्षण पाहिजे; म्हणा, मला माणसांच्या मालकाचे संरक्षण पाहिजे." या प्रकरणांचे पुण्य या वाचनामुळे मृताला मिळते अशी समजूत आहे. यानंतर त्याला, ज्या चटईवर अगोदर ठेवले होते तीसहीत बांबूची तिरडी किंवा शवपेटिकेमध्ये ठेवतात व दफनभूमीकडे नेण्यास तयार होतात. संयुक्त प्रांतात शिया जमातीचे लोक शवपेटिकेवर कपडा झाकतात व तीवर चांदवा धरतात आणि दफनानंतर शवपेटी सामान्यत्वे फेकून देतात. गुजरातमध्ये मृत व्यक्ती पुरुष असेल तर सम्राट अकबर व शहाजहान यांच्या मृत्यूच्या वेळी केले होते त्याप्रमाणे तिरडीवर हिरव्या रंगाची व स्त्री असेल तर लाल रंगांची शाल टाकतात. ही सर्वसामान्य अशी रूढी असून तिचा हेतू मृतांची भूते परत येऊ नयेत व त्यांचे लक्ष विचलित व्हावे हा आहे.

मृताचे चार पाच नातलग किंवा मित्र तिरडी खांद्यावर घेऊन दफनभूमीकडे निघतात. इतरही माणसे अधूनमधून खांदा देतात. काहीजण तिरडीला हात लावून धर्मावरील निष्ठेची वचने म्हणतात. दफनाच्या अगोदर मृतावर भुताखेतांचा हल्ला होण्याची शक्यता असते अशी समजूत असल्यामुळे प्रेतयात्रा वेगाने निघते. तिरडीमागून जाणे, त्यातही पायी चालत जाणे चांगले असते असे मानतात. कारण ते आदेशात्मक कर्तव्य आहे (फर्ज किफाई). पण उपस्थितांपैकी आठ दहा जणांतून एकाने हे केले तरी पुरेसे आहे असे मानतात. प्रेतयात्रा दिसल्याबरोबर लोकांनी उठून उभे राहिले पाहिजे आणि निदान चाळीस गज इतके अंतर प्रेतयात्रेबरोबर गेले पाहिजे. तिरडीच्या पुढे कोणी चालू नये कारण तिरडीपुढे देवदूत चालतात अशी समजूत आहे. दफनभूमी ही मशिदीच्या मानाने अधिक अपवित्र असे मानतात. त्यामुळे मृताला सामान्यत्वे मशिदीत दफन करतात. उत्तर क्रियेचे शब्द मृताचा नातेवाईक उच्चारतो. तो उपस्थित नसेल किंवा अशिक्षित असेल तर नातलगांच्या

विनंतीवरून उपस्थितांपैकी कोणी तरी हे काम करतो. निराधार गरिबांचा दफनविधी काझी किंवा त्याचा सहाय्यक करतो.

दफनविधी पुढीलप्रमाणे करतात: प्रथम एकजण 'मृतासाठी येथे प्रार्थना सुरू होत आहेत (अस्‌सलातुल-जनाझ)' असे म्हणतो. हे शब्द ज्या माणसांना ऐकू जातात ते त्या ठिकाणी जातात. या ठिकाणी जमलेले लोक तीन रांगात उभे राहतात. मृत व्यक्ती पुरुष असेल तर इमाम मृताच्या डोक्याच्या विरुद्ध दिशेला सर्वांत पुढे आणि स्त्री असेल तर तिच्या कंबरेच्या रेषेत उभा राहतो. तकबीर म्हणजे 'परमेश्वर फार श्रेष्ठ आहे', दुरुद म्हणजे परमेश्वराची नम्र प्रार्थना, दुवा म्हणजे क्षमायाचनेची प्रार्थना चार वेळा म्हणतात. यानंतर आपण दफनविधीला सुरुवात करीत आहोत (नियत) असे म्हणतो. तो आपल्या कानांच्या पाळ्यांवर अंगठे ठेवून 'परमेश्वर श्रेष्ठ आहे' असे म्हणतो. नंतर तो आपला उजवा हात डाव्या हातावर ठेवून व दोन्ही हात बेंबीच्या किंचित खालच्या भागावर धरून उभा राहतो. उपस्थित असणारा समुदायही इमामाचे अनुकरण करतो. इमाम नंतर याच अवस्थेत उभा राहून क्षमायाचनेची प्रार्थना, आशीर्वचन आणि धर्मावरची दुसरी, तिसरी, चौथी निष्ठा उच्चारतो. यानंतर तो पुन्हा 'परमेश्वर श्रेष्ठ आहे' असे म्हणतो आणि उपस्थित लोकांना आपला चेहरा दिसावा म्हणून तो आपले तोंड उजव्या दिशेकडे वळवतो व 'तुम्हांला शांती आणि परमेश्वराची कृपा प्राप्त होवो' असे म्हणतो. उपस्थित लोक धर्मावरची निष्ठा व्यक्त करतात आणि इमामला अभिवादन करतात. यानंतर प्रेताचा मालक 'रूक्सत-इ-आम' म्हणजे निकटचे आप्त सोडून इतरांना जाण्याची परवानगी आहे असे म्हणतो.

मृतासाठी पुन्हा एकदा फातिहा म्हणतात आणि ज्या ठिकाणी दफन करावयाचे त्या ठिकाणी तिरडी आणतात. जमिनीत खड्डा खणलेला असतो. त्यात मृताला ठेवण्यासाठी एक किंवा दोन आप्त किंवा इतर उतरतात. दोघेजण मृतावर पांघरलेली चादर काढून, ती गुंडाळून, मृताच्या कंबरेखाली ठेवतात. नंतर त्याला डोक्याकडून व पायाकडून प्रत्येक दोघे तिघेजण धरून उचलतात आणि खड्यात उतरलेल्या लोकांच्या हाती देतात. ते त्याला डोके उत्तरेकडे, पाय दक्षिणेकडे व तोंड पश्चिमेकडे या पद्धतीने पाठीवर ठेवतात. काहीजण सबंध उजवे अडंग, अर्थात डोक्यासहित पश्चिमेकडे म्हणजे मक्का, किबलाच्या दिशेने वळतात. नंतर उपस्थितांपैकी प्रत्येकजण आपल्या हातात थोडी माती घेऊन पुढील शब्द मनातल्या मनात किंवा अस्फुट आवाजात उच्चारतो: "म्हणा, परमेश्वर एक आहे, अनादी आहे, तो कुणाचा जन्मदाता पिता नाही, तो जन्माला आलेला नाही आणि त्याच्यासारखा अन्य कुणीही नाही," किंवा पुढील श्लोक म्हणतो, : "आम्ही तुला त्यापासून (मातीतून) निर्माण केले, तेथेच तुला परत नेऊ आणि तेथूनच तुला दुसऱ्या वेळी बाहेर आणू [कुराण ९·१२; २०·५७] ". यानंतर खड्ड्यात हळुवारपणे माती लोटून खड्डा बुजवतात.

क्वचित मृताला दफन केल्यावर त्याच्या शेजारी संदेश किंवा लिखित स्वरूपात प्रार्थना ठेवण्याचीही पद्धत आढळते. बोहरा जमातीत दफन करताना मृताच्या हातात जॅब्रियल या देवदूताला त्याच्यावर कृपा करावी म्हणून केलेली प्रार्थना एका कागदावर लिहून ती ठेवतात. दिल्लीच्या फेरोजशहाने असे लिहून ठेवले आहे 'ईश्वराच्या मार्गदर्शनानुसार माझ्या मालकाला पै. मुहंमद शहाला-दफन करीत असताना, मी माझ्या मालकाच्या कारकिर्दीत ज्यांना देहांत शासन झाले त्यांच्या वारसाकडून व ज्यांना अवयव विच्छेदनाच्या शिक्षा झाल्या त्यांच्याकडून शहाबद्दल आमच्या मनात किल्मिष नाही अशी साक्षीदारांच्या साक्षीने करारपत्रे लिहून

घेतली व ती एका पेटीत ठेवून ती पेटी सुलतानाच्या कबरीच्या उशाशी दारुल-अमानमध्ये ठेवली, यामागे माझा असा हेतू होता की दयाळू परमेश्वराने सुलतान मुहंमद शहावर दया दाखववी'.

मृताला दफन करण्यापूर्वी, ज्या ठिकाणी दफन करावयाचे तेथे ६ चौरस फूट खड्डा करतात, त्यात मध्यभागी मृताच्या शरीराच्या आकाराइतके भोक ठेवतात. क्वचित, दफनासाठी लागेल इतक्या जागेवर चोहो बाजूंनी माती किंवा विटांची दीड फूट उंचीची भिंत बांधतात व आत मृताला ठेवून हा भाग लाकडी फळ्यांनी झाकून घेतात. यामागे मृताच्या अंगावर माती पडू नये हा हेतू असतो. फळ्या झाकल्यावर त्यावर माती टाकतात. काहीजण मृताला खड्ड्यात ठेवल्यावर त्यावरून तिरकस फळ्या ठेवतात व नंतर त्यावर चटया झाकून खड्डा मातीने बुजवतात. असे करण्यामागेही मृताच्या शरीरावर माती पडू नये असाच उद्देश असतो.

काही लोक आपण हयात असताना आपल्या कबरीसाठी ठराविक जागा निवडतात आणि तीवर चुना विटांची कबर बांधून घेतात, पण हा प्रेषिताच्या आज्ञेचा भंग आहे. ग्रीक व रोमन लोकांप्रमाणे कबर सामान्यत्वे रस्त्याच्या कडेला बांधतात. कारण मृत व्यक्तीची गजबजलेल्या मानवी जीवनाच्या सन्निध असण्याची इच्छा असते असे मानतात. काहीजण तर आपल्या मृत्यूनंतर आपल्या कबरीवर मकबरा बांधावा अशी इच्छा व्यक्त करतात. तर काहीजणांची आपल्या कबरीभोवती भिंत बांधावी अशी इच्छा असते. मृताला खावयास काही अन्न असावे या हेतूने काहीजण कबर भरीत असताना तीत गहू, तांदूळ टाकतात. दक्षिणेत असणारी ही प्रथा आहे; उत्तरेत ती आढळत नाही. कुटुंबातील मुख्य पुरुष मरण पावल्यावर त्याच्या कबरीवर चौरस दगडांचे बांधकाम करतात.

दफनाचा खड्डा स्त्रीसाठी छातीइतका व पुरुषासाठी कंबरेइतका खोल असावा असा नियम आहे. स्त्रीसाठी खणण्यात यावयाचा खड्डा खोल असावा याचे ब्राहूई लोकांच्या मते असे कारण आहे की, स्त्रिया स्वभावतःच गप्प न बसणाऱ्या असतात. त्यामुळे त्यांना खोल पुरल्याशिवाय त्या गप्प बसणार नाहीत. दफनासाठी खड्डा खोदणारे लोक सर्वसामान्यपणे सहा फूट लांब व अडीच फूट रूंद असा खड्डा खोदतात. मृत व्यक्ती फार उंच असेल तरच तिच्या शरीराचे माप घेऊन खड्डा खणतात. मृताला खड्ड्यात ठेवताना खड्ड्याची लांबी अपुरी पडते असे दिसल्यास अडाणी लोक मृत व्यक्ती फार पापी होती अशी समजूत करून घेतात. यदाकदाचित असा प्रसंग उद्‌भवल्यास तो अशुभ आहे असे मानतात. दफन केल्यावर खड्डा बुजविण्याचे काम खोदणारा करतो. त्याला या सर्व कामासाठी कुटुंबाच्या ऐपतीनुसार आठ आण्यापासून पाच रुपये देतात. स्मशानात राहणारा फकीर निराधारांचा अपवाद सोडल्यास, दफनचा खड्डा खोदण्यापूर्वी मृताच्या नातेवाईकाकडून १ रुपयापासून १०० रुपये घेतो; त्याशिवाय खड्डा खोदण्याची परवानगी देत नाही. कारण तेच त्याच्या उदरनिर्वाहाचे एकमेव साधन असते. तिरडीवर टाकलेला कपडा तो फकीर चाळीस दिवस कबरीवर टाकतो; पण यानंतर मात्र तो स्वतःच्या वापरासाठी काढून घेतो. काही लोक कबरीवर नेहमीसाठी झाकण्याकरिता दुसरा एखादा रंगीत कपडा वापरतात. गरीब लोकांची, कबरीचे तोंड बांधून काढण्याची ऐपत नसल्यामुळे ते सपाटच ठेवतात, उत्तर हिंदुस्थानात [जेथे ही रूढी प्रचलित आहे त्या उत्तर हिंदुस्थानचा भाग लेखक सांगीत नाही.], ते मातीची कबर एका टोकाला अरुंद व दुसऱ्या टोकाला रुंद अशा आकाराची करतात आणि आणि तीवर लांबीच्या दिशेने तीन रेषेत पाणी टाकतात. कबरीवर अशा पद्धतीने पाणी टाकल्यानंतर तिचा आकार काहीसा पुढीलप्रमाणे होतो:

अनुक्रमणिका

कबरीवर पाणी टाकताना पायापासून सुरुवात करून डोक्याकडील भागाच्या तिथे शेवट करतात. डोक्याकडील भागाजवळ मडके उपडे घालतात व जमिनीत डाळिंबाच्या झाडाची फांदी रोवतात. अरबस्तान किंवा अन्य मुस्लीम देशांवर कबरीवर पाणी टाकण्याची प्रथा नाही पण वादळ सुटल्यास मात्र कबरीवरील माती उडून जाऊ नये यासाठी तीवर पाणी टाकतात. बलुची लोक कोल्हे वगैरे प्राण्यांनी कबर उकरू नये म्हणून तीवर झाडीझुडपे टाकतात. सहा महिन्यांचा काळ लोटल्यावर ही झाडीझुडपे काढून कबरीवर खुणेसाठी पांढरे दगड ठेवतात.

दफन केल्यावर मृताच्या नावे फातिहा म्हणतात. घरी परतताना कबरीपासून चाळीस पावले इतक्या अंतरावर आल्यावर आतापर्यंत स्मशानात दफन करण्यात आलेल्या सर्वांच्या नावाने संयुक्त फातिहा म्हणतात. याला 'दाइरा' फातिहा म्हणतात. या निर्वाणाच्या वेळी मुनकर व नकीर या नावाचे देवदूत दफन केलेल्या व्यक्तीची परीक्षा घेतात. त्याला तुझा ईश्वर, प्रेषित, धर्म कोणता याबद्दल प्रश्न विचारतात. मृत व्यक्ती सज्जन असेल तर ती या सर्व प्रश्नांची उत्तरे देते पण दुर्जन असेल तर संतापते व गप्प बसते किंवा असंबद्ध अशी उत्तरे देते. मृत व्यक्ती दुर्जन असल्यास देवदूत तिला गुर्झसारख्या टोकदार शस्त्राने मारतात. या दिवशी काफिरांच्या कबरीला मुनकर व नकीर आणि इस्लामनिष्ठांच्या कबरीला बशीर (बातमी आणणारा) व मुबशिर (चांगली बातमी देणारा) हे देवदूत भेट देतात, असे काही मुसलमानांचे म्हणणे आहे. या विचारपुशीत मृत व्यक्ती काफीर, ढोंगी असल्याचे आढळून आल्यास तिच्यावर नव्याण्णव सर्प हल्ला करतात व तिला कबरीतील छिद्रातून नरकाचे दर्शन घडते असे म्हणतात. यानंतरची शिक्षा म्हणजे मृताच्या शरीरावर कबरीचा भार पडतो (फशार-इ-कबर). शेवटी मृताच्या शरीरातून आत्मा (रूहा) काढून घेऊन देवदूत त्याला चांडाळासाठी राखून ठेवण्यात आलेल्या अंधार कोठडीत (सिज्न) टाकून देतात. सत्पुरुषांना मरण येत नाही, ते केवळ गाढ झोपलेले असतात आणि सामान्य पाप्यांप्रमाणे त्यांचे शरीर कुजत नाही असे म्हणतात. मृत माणूस सद्‌गृहस्थ असेल तर त्याच्या कबरीच्या उशाशी यमाचा इस्रायल नावाचा दूत बसतो. आणि त्याला 'परमेश्वराचे सौख्य मिळविण्यासाठी हे पवित्र आत्म्या, बाहेर ये' असे म्हणतो असे मानतात. मृताला दफन केल्यावर त्याचे कुटुंबीय आपल्या ऐपतीनुसार गरिबांना, फकिरांना, धान्य, पैसा इत्यादि दान करतात. दफनविधीसाठी अखेरपर्यंत थांबलेले लोक मृताच्या घरी जातात. तेथे गेल्यावर त्या कुटुंबाच्या कल्याणासाठी व कुटुंबाच्या नावे 'सद्‌हेतूची प्रार्थना' (फातिहा नीयते खैर) म्हणतात व नंतर आपापल्या घरी जातात. मृत व्यक्तीच्या घरी तीन दिवस काहीही अन्न शिजवीत नाहीत. त्यामुळे त्या कुटुंबाचे आप्त आपल्या घरून अन्न पाठवतात.

कबरी सामान्यत्वे माती, दगड किंवा विटांनी बांधतात. क्वचित एखादी कबर अखंड अशा घडवलेल्या दगडांची असते. पुरुषाच्या कबरीवर दीड फूट उंचीचा व रुंदीचा उंटाच्या पाठीवरील पोकासारखा आकार असणारा भाग बांधून काढतात. शाही कबरी अर्थातच अधिक चांगल्या रीतीने बांधलेल्या असतात. उदा. अकबराची कबर, स्त्रीची कबर पुरुषाच्या कबरीच्या मानाने उंचीला कमी असते व ती सपाट असते. मुलगा व मुलीच्या कबरी पुरुष व स्त्री सारख्याच पण आकाराने लहान असतात. उत्तर हिंदुस्थानात पुरुषांच्या कबरीवर लंबवर्तुळाकार भाग असतो, याला 'कलमदान' म्हणतात. तर स्त्रियांच्या कबरी सपाट असतात. काही लोक

अनुक्रमणिका

कबरीवर दिवा लावण्यासाठी कोनाडा ठेवतात व त्यात दर गुरुवारी व शुक्रवारी दिवा लावून ठेवतात. पुष्कळ दगडी कबरींचा टोकाचा भाग लांबोळका व पोकळ असतो, तो मातीने भरून टाकतात. स्त्रीसंताच्या कबरीवरील पोकळ भाग भक्तमंडळी चंदनाचा भुसा टाकून भरतात. शहाजहानची मुलगी व संत मियाँ मीर यांची शिष्या जहाँआरा बेगमची (१६४५-८०) दिल्ली येथे कबर असून त्या कबरीच्या वरील संगमरवरी भागात हिरवळ लावण्यासाठी एक जागा राखून ठेवण्यात आली आहे व त्या जागेवर 'ही हिरवळ माझी कबर झाको; हिरवळ हे नम्र असलेल्या लोकांच्या कबरी झाकण्याचे उत्तम साधन आहे', अशा काव्यमय ओळी कोरलेल्या आहेत. विजापूर येथील इब्राहीम रौझातील पुरुषांच्या कबरीस चिंचोळ्या दगडाच्या कमानी आहेत. या 'कलमदान' सूचित करतात. त्यावरून ती कबर सतराव्या शतकातील पुरुषाची आहे हे ओळखता येते. दक्षिण हिंदुस्थानातील शिया समाजातील स्त्रीपुरुषांच्या कबरी सुन्नी समाजातील स्त्रीपुरुषांच्या कबरीपेक्षा आकाराने नेमक्या उलट्या असतात. फक्त एकच फरक दिसतो. तो म्हणजे स्त्रियांच्या कबरीवर मध्यभागी थोडी पोकळी ठेवलेली असते. काहीजण एका दगडावर मृत्यूची तारीख, वर्ष, महिना, दिवस कोरून तो दगड कबरीजवळ रोवतात. क्वचित मृताच्या नावाबरोबर त्याच्या वडिलांचेही नाव कोरलेले असते. काहीजण या नोंदी काव्यात कबरीच्या चारही भिंतीवर कोरतात. तर थोडे लोक या नोंदी कोरलेला दगड कबरीच्या प्रवेशद्वारावर लावतात. अफगाणिस्तानात शिया समाजातील लोक मृताच्या कबरीवर त्याचा व्यवसाय सूचित करणारी शस्त्रे कोरतात, कुर्दिस्तानमध्ये लाकडी फळ्यावर योद्ध्याचे चित्र रंगवून तो फळा तेथे लावतात. वायव्य सरहद्दीवरील ओराकझई नावाची पठाण जमात मृताच्या कबरीवर कुटुंबाच्या ऐपतीनुसार स्मारकशिला ठेवतात. पुरुषाची कबर असल्यास तीवर डोके व गुडघ्याच्या भागाच्या ठिकाणी दोन स्मारकशिला ठेवतात. मुल्लाची कबर असेल तर तीवर पांढरे निशाण व मध्यभागी पाण्याचा खुजा ठेवलेला असतो. हुतात्म्याची कबर असेल तर तीवर फक्त पांढरे निशाण असते. भारतीय मुस्लीम आपल्या स्मशानभूमीची नीटपणे काळजी घेऊ शकत नाहीत त्यामुळे इतर धर्मियांचे आक्रमण व गुरेढोरे यांच्या उपसर्गामुळे त्या उध्वस्त होण्याच्या मार्गावर असल्याचे दिसते.

एका स्त्रीने कबरीजवळ शोक केला म्हणून प्रेषितांनी तिची खरडपट्टी काढली होती आणि यांनी, विशेषतः स्त्रियांना कबरींच्या दर्शनाला जाण्याची मनाई केली होती तर दुसऱ्या एका वेळी परवानगी दिली होती. दिल्लीच्या शिकंदर लोदीने (१४८९ ते १५१७) स्त्रियांना गावाबाहेर जाण्यास व कबरींच्या दर्शनास मनाई केली होती. औरंगजेबाने कबरीवर छत असलेल्या इमारती बांधू नयेत, त्यांना चुना देऊ नये आणि स्त्रियांनी स्मशानात जाऊन कबरींचे दर्शन घेऊ नये असे फर्मान काढले होते. स्त्रियांच्या कबरींच्या दर्शनाला जाण्यामुळे अनैतिकता वाढीस लागण्याची शक्यता असल्याचे कारण सांगून फिरोजशहाने त्यांना कबरीच्या दर्शनाची मनाई केली होती. परंतु आपल्या नातलगांच्या कबरींचे दर्शन घ्यावे अशी उपजत भावना माणसात असते त्यामुळे हिंदुस्थानात तरी ही प्रथा आहे. काही लोकांचा असा समज आहे की, मृताचे भूत कबरीच्या जवळ असते व त्यांच्या इच्छेप्रमाणे त्याला कोठेही जाण्याचे स्वातंत्र्य असते. या श्रद्धेला प्रेषितांच्या वचनाचा आधार आहे. प्रेषित कबरींना अभिवादन करीत असत आणि मृत आपली अभिवादने स्वीकारीत असतात असे ते म्हणत. त्यामुळेच मुसलमानांमध्ये आपल्या आप्तांच्या कबरींच्या दर्शनाला जाण्याची प्रथा पडली आहे.

दफनानंतर तिसऱ्या दिवशी—या विधींना 'तीजा', दर्शन (जिरायत) म्हणतात-फुले अर्पण करण्याचा विधी होतो. दुसरे दिवशी ज्या जागी माणसाला मृत्यू आला त्या जागेवर अन्नपदार्थ, मिठाई, फुले, सुगंधी द्रव्ये ठेवतात, उदबत्ती लावतात. तिसऱ्या दिवशी मृताचे पुरुष नातलग व मुल्ला सकाळी लवकर या वस्तू कबरीजवळ

ठेवतात आणि त्याला समाधान लाभावे म्हणून मुल्ला सबंध कुराण (खत्म-इ-कुराण) एकदा, दोनदा किंवा सतत वाचतो. काही वेळा कुराणवाचन लवकरच संपावे म्हणून तीसपैकी ४/५ विभाग वेगवेगळी माणसे वाटून घेतात [इराणमध्ये कुराणचे पठन लवकर व्हावे म्हणून त्याची पाने वाटून देण्यात येतात (मोरिअर, हज-इ-बाबा, ३०३).]. श्रीमंत लोक या कामासाठी पन्नास मुल्लांची योजना करतात. कुराण पठण झाल्यावर कबरीवर चादर झाकतात व तीवर फुलांची चादर झाकतात, उदबत्त्या लावतात किंवा ऊद जाळतात. उपस्थित असणारा प्रत्येकजण सुगंधी पाण्यात काही फुले टाकतो आणि मृताच्या आत्म्याला पापातून मुक्ती मिळावी म्हणून प्रार्थना म्हणतो. तसेच मृताचे डोके व छातीचा भाग ज्या ठिकाणी असेल त्या जागेवर सुगंधी द्रव्य चोळतो. फातिहा म्हटल्यानंतर हाफिज, मुल्ला, फकीर व गरीब यांना अन्न वाटतात. धान्य, मीठ व पैसेही दान म्हणून वाटून टाकतात. यानंतर स्मशानात दफन करण्यास आलेल्या सर्वांसाठी प्रार्थना (दाईरा फातिहा) म्हणतात व त्यानंतर घरी जातात. गुजरातमध्ये मृताच्या पापविमोचनासाठी प्रार्थना करण्यास मृताचे आप्त मशिदीत जातात आणि प्रत्येकजण लहान पुस्तकातून कुराणाचे एक प्रकरण वाचतात आणि त्या प्रकरणाचे पुण्य मृताला लाभो अशी प्रार्थना करतात. नंतर मौलवी नीत्युपदेश करतो (वझ). यानंतर फुले, सुगंधी द्रव्य व तेलाचे भांडे ठेवलेले एक तबक प्रत्येक पाहुण्यासमोर धरण्यात येते. प्रत्येकजण तबकातील फूल तेलात बुडवतो व ते फूल कबरीवर टाकतो. मशिदीतून जाण्यापूर्वी व मृताच्या घरी आल्यावर पुन्हा त्याच्या आत्म्यासाठी प्रार्थना म्हणतात; त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन करण्यासाठी त्याच्या घरी जातात (अझा).

बहुतेक लोक मृत्यूनंतर नऊ दिवसपर्यंत मृत व्यक्तीच्या घरचे अन्नपाणी घेत नाहीत तसेच आपल्या घरी त्याच्या कुटुंबियांना जेवणाला बोलावीत नाहीत. ब्राहूई जमातीत विधवा पत्नी आपल्या पतीच्या मृत्यूनंतर पंधरा दिवस स्नान किंवा इतर कोणतेही काम करीत नाही. पंधरा दिवस लोटल्यावर इतर स्त्रिया तिला सुगंधी पाने देतात. ती विधवा त्या पानांनी आपले डोके धुते. यानंतर दुखवटा संपवतात. मुस्लीम लोक दुखवट्याच्या काळात मांस, मासे किंवा खमंग पदार्थ खात नाहीत. पण ही स्थानिक रूढी आहे; इस्लामच्या धर्मशास्त्राने पुरस्कारिलेली नाही. मृत्यूनंतर नवव्या दिवशी गोड पदार्थ करतात, त्यावर फातिहा म्हणतात व त्यापैकी काही कुटुंबीय खातात व काही शेजाऱ्यांना देतात. त्या दिवशी संध्याकाळी जेवण देण्यात येते. त्यातील काही भाग स्मशानातील फकीर व इतर फकीर यांना देतात. काही अडाणी लोक या जेवणात सहभागी होतात पण मृताच्या घरी शिजवलेले अन्न कधीही न खाण्याची किंवा त्याचा भाग आपल्या घरातही येऊ न देण्याची रूढी पाळतात. त्यांच्या मते असे केल्याने वाचा जाते. जफर शरीफ म्हणतो की-मृताबद्दल दिलेल्या जेवणात सहभागी होऊनही ही रूढी पाळणे केवळ अडाणीपणाचे आहे. मृत्यूच्या दहाव्या, एकोणविसाव्या दिवशीही कबरीच्या दर्शनाला जातात. यावेळी अन्नपदार्थ शिजवतात, इतरांना वाटतात. एकोणविसाव्या दिवशी तर फातिहा म्हणून फुलांची चादर घेऊन कबरीवर झाकतात व तीवर चंदन घासतात. उत्तर हिंदुस्थानातील शिया समाजात असेच विधी, तिसऱ्या, दहाव्या, विसाव्या व तिसाव्या दिवशी करतात.

दुखवट्याच्या काळात गर्द निळ्या रंगाचे कपडे वापरतात. तर अब्बासी खलिफासाठी पाळण्यात येणाऱ्या दुखवट्याच्या काळात काळ्या रंगाचे कपडे वापरतात पण दुखवट्याच्या काळात असा पोशाख करावा याला धर्मशास्त्राची अनुकूलता नाही. असा पोशाख वापरलाच तर स्त्रिया वापरतात; पुरुष वापरीत नाहीत. विधवा स्त्रिया पतीच्या मृत्यूनंतर चार महिने दहा दिवस एकांतवासाचा काळ (इद्दत) पाळतात. या काळात त्या घराबाहेर कोठे जात नाहीत अगर करमणुकीच्या कार्यक्रमात भाग घेत नाहीत. गुजरातमध्ये मुसलमान स्त्री

पतीच्या मृत्यूनंतर आपली काकणे फोडून टाकते. या किंवा इतर रूढी अर्थातच हिंदूकडून उचललेल्या आहेत. विधवा स्त्री अपत्यवती असेल तर तिला काकणे वापरता येतात पण ती सोन्याची किंवा चांदीची असावी लागतात. विधवा स्त्रीने पुनर्विवाह केला तरी तिला काकणे व नथ घालण्याची मोकळीक नसते. नुकत्याच विधवा झालेल्या स्त्रीला जेव्हा दुसरी एखादी स्त्री प्रथमतःच भेटते तेव्हा ती विधवेबद्दल शोक करते, विधवाही रडते. याला 'मूँह ढाकना' म्हणतात.

सर्व ठिकाणी मृतासाठी प्रार्थना म्हणण्यात येतात असे नाही. पण या पद्धतीला प्रेषितांची मान्यता होती असे म्हणतात. या प्रार्थना म्हटल्या तरी वाकून (सिज्दा घालून) म्हणत नाहीत. परंतु कुराणाचे पारायण मात्र करतात. मृतासाठी प्रार्थना म्हणण्याला वहाबी संप्रदायाचा कडवा विरोध आहे.

मृत्यूनंतर एकोणचाळिसाव्या दिवशी मृत व्यक्तीला जे पदार्थ खाण्याची सवय होती ते पदार्थ शिजवून ज्या जागी मृत्यू झाला त्या जागेवर ठेवतात. तसेच सुगंधी द्रव्य, सुरमा, काजळ व मृतांचे अलंकारही ठेवतात. त्यावर फुलाचा लोंबता हार बांधतात. या विधीला 'लाड भरना' असे म्हणतात. काही अडाणी स्त्रियांचा असा समज आहे की, मृत व्यक्तीचे भूत चाळिसाव्या दिवशी घर सोडून जाते. ते जर अगोदर गेले असेल तर या दिवशी परत येते आणि ठेवलेल्या वस्तू पाहून त्यातील त्याच्या लहरीला येतील त्या खाते, हाराला झोका देते, चंदनाचा वास घेते आणि परत जाते. या दिवशी रात्रभर जागरण करतात, शोकगीते म्हणतात. परंतु आत्मा परत येतो या कल्पना इस्लामच्या धर्मशास्त्राच्या विरोधी आहेत. तरीही मृत्यूनंतरच्या चाळीस दिवसपर्यंत मृत्यू झालेल्या ठिकाणी अन्न व पाण्याचा माठ ठेवतात. सकाळी माठातील पाणी हिरव्या झाडाच्या बुंध्याशी घालतात. अन्न व माठ एखाद्या फकिरांला देतात. मृताला ज्या जागी स्नान घातले त्या जागी व मृत्यू आला त्या जागेवर दिवा लावतात. कधी कधी तीन, दहा किंवा चाळीस रात्री कबरीवर दिवा लावतात. ही मुळात हिंदूंची रूढी आहे. तसेच दर दिवशी संध्याकाळी मशिदीत अन्न पाठवतात. कुणी तरी मृताच्या नावे फातिहा म्हणून ते अन्न स्वीकारतो. चाळिसाव्या दिवशी सकाळी कबरीला भेट देतात. सिंधमध्ये वरिष्ठवर्गीय लोक कबरीजवळ चाळीस दिवसपर्यंत कुराण पठण करण्याची व्यवस्था करतात. गरीब लोकही आठ पंधरा दिवस तरी कबरीजवळ कुराणाचे पठण व्हावे या दृष्टीने प्रयत्न करतात. सुशिक्षित लोकांत, एखाद्याच्या आजारात त्याला कुराण ऐकवण्याचा प्रघात सर्वसामान्य असा आहे.

मृत्यूनंतर तिसऱ्या, सहाव्या, नवव्या आणि बाराव्या महिन्यांच्या शेवटच्या दिवशी अन्न शिजवतात, त्यावर फातिहा म्हणून खातात व उरलेले वाटून टाकतात. स्त्रिया सामान्यत्वे हे विधी या काळाच्या समाप्तीच्या थोडे दिवस अगोदर करतात. सुखवस्तु लोक यावेळी पैसे, कपडे दान म्हणून देतात आणि कबरीवर फुलांची चादर झाकतात. कधी कधी स्त्रियाही कबरीच्या दर्शनाला जातात. बहुसंख्य लोक गुरुवारी कबरीजवळ फातिहा म्हणतात पण पुरुषांनी शुक्रवारी फातिहा म्हणणे चांगले असते असे म्हणतात. मृत्यूला एक वर्षाचा काळ लोटल्यावर मृत व्यक्तीची कुटुंबाच्या संत माणसात गणना होते. शबेबरात, बकरी ईदच्या समारंभात संतांच्या बरोबर मृत व्यक्तीच्या नावाने फातिहा म्हणतात. इजिप्तमध्ये ईद-उल-फितरच्या वेळी कबरीच्या दर्शनाला जातात आणि तीवर ताडाच्या झाडाच्या फांद्या ठेवतात.

अनुक्रमणिका

धार्मिक किंवा सामाजिक विधी समान्यतः पुढील वेळी करतात-हे विधी पार पाडण्यासाठी मुस्लीम शिपायांना रजा देण्यात येते-हे विधी पुढीलप्रमाणे आहेत-(अ) कौटुंबिक विधी—जन्माचा सहावा दिवस (छटी), चाळीसावा दिवस (चिल्ला), भात खाऊ घालणे (अकीका), मुंडन, वाढदिवस, धर्मदीक्षा, सुन्ता, कुराणाचा पाठ, वयात येणे, जहाज की नझ्र, मुरीदा होना. या विधींसाठी एक किंवा दीड दिवसापेक्षा जास्त रजा मिळत नाही. जुमागीसाठी एक दिवस, आप्ताच्या मृत्यूसाठी तीन दिवस रजा मिळते. लग्नासाठी सामान्यत्वे दहा दिवस पण आणीबाणीच्या वेळेस पाच दिवस रजा मिळते. (ब) धार्मिक विधी-मोहरमसाठी तेरा दिवस, हे शक्य नसल्यास दहा दिवस; आखिरी चार शम्बासाठी दीड दिवस, बारह वफातसाठी दीड दिवस, दस्तगीर, जिंदा शाह मदार, कादिर, मौला अली, बंदा नवाज इत्यादी साधुसंतांच्या उरूसासाठी एक ते दीड दिवस; शब्बान ईदसाठी अडीच दिवस; बकरी ईदसाठी दोन दिवस; शव्वाल महिन्यातील रमजान ईदसाठी प्रायः रजेची गरज नसते.

अनुक्रमणिका

**प्रकरण दहावे**

# इस्लामची मूलतत्त्वे

इस्लाम म्हणजे 'परमेश्वरी इच्छेला पूर्ण शरणागती'. या धर्माची शिकवण प्रेषित मुहंमद यांनी दिली. या धर्मावर निष्ठा ठेवणाऱ्याला पुढील मूलभूत बाबी पाळाव्या लागतात. (इबादत)— (१) फक्त एकच परमेश्वर आहे असे मानणे (कलमा म्हणणे); (२) परमेश्वराच्या सन्मानार्थ प्रार्थना दररोज म्हणणे (नमाज); (३) धार्मिक दान करणे (जकात); (४) रमजानचा उपवास करणे (रोजा); (५) आयुष्यात एकदा तरी पवित्र स्थळाची यात्रा करणे (हज). [छोटी धार्मिक यात्रा (उमरा) व मोठी धार्मिक यात्रा (हज) यात तफावत आहे. छोटी धार्मिक यात्रा ही मक्का येथील विधींपुरतीच मर्यादित आहे; हे विधी स्तुत्य आहेत पण हजच्या बरोबरीचे नाहीत. हजचा अर्थ 'उत्सव दरग्याला भेट' असा आहे (ईआरई १·६६८).] इराणमध्ये प्रत्येक इस्लामनिष्ठावर पुढील सहा जबाबदाऱ्या असतात असे कळते-प्रार्थना (सलाम), उपवास (साइम), यात्रा (हज), अक्षरशः पाचवा हिस्सा (खम्स), दान (जकात), आणि विशिष्ट परिस्थितीत काफिराबरोबर युद्ध करणे (जिहाद). प्रत्येक इस्लाम अनुयायाची सहा तत्त्वांवर श्रद्धा (इमान) असावी लागते. ती तत्त्वे म्हणजे परमेश्वर, त्याचा प्रेषित, त्याचे दूत, त्याचे पवित्र ग्रंथ, अखेरच्या निर्याणाचा दिवस आणि परमेश्वराने पूर्वनियोजित केलेले प्रत्येकाचे भवितव्य ही होत. प्रत्येकाला पुढीलप्रमाणे आचारधर्म पाळावा लागतो. (अमल)-कलमा म्हणणे, निर्देशित पाच वेळी दिवसातून प्रार्थना म्हणणे, रमजानचा उपवास करणे, धार्मिक यात्रा व धार्मिक दान करणे. एका भारतीय मुस्लीम लेखकाच्या मते इस्लामची मुख्य कलमे म्हणजे: परमेश्वराचे एकत्व, त्याचे दूत, त्याचे ग्रंथ (यात मुसलमानाबरोबर ख्रिश्चन व ज्यूंच्या धर्मग्रंथांचा समावेश आहे. ख्रिश्चन व ज्यू धर्मांच्या अनुयायांना 'अहलूल किताब' म्हणजे धर्मपुस्तकावर श्रद्धा ठेवणारे असे म्हणतात), त्याचे प्रेषित, त्याचे विश्वावरचे अधिपत्य, त्याने दिलेली चांगली वाईट फळे, अखेरच्या निर्याणाचा दिवस यांवरील विश्वास ही होत [बीजी ९, भाग २·१२६; साल, कुराण, प्रिलिमिनरी डिसकोर्स ५० तळटीप.]. इस्लामला 'दीन' असेही एक नाव आहे. त्याचा अर्थ व्यापक आहे पण थोडक्यात सांगायचा तर 'आचारधर्म' असा आहे.

इस्लामची प्रार्थना (कलमातु-शहादत) पुढीलप्रमाणे आहे-ला इलाह इल्लूलाह महंमद-उर-रसुलल्लाह. याचा अर्थ 'सर्वस्तुतिपात्र तो एकच अल्ला आहे आणि महंमद त्याचा प्रेषित आहे' असा आहे.

सुन्नी शाखेचे मुसलमान सामान्यपणे मशिदीत व मिळत असेल तर बहुधा इमामच्या [इमाम हा खलिफा असतो किंवा प्रेषित किंवा अलीच्या बदली असतो.] मार्गदर्शनाखाली प्रार्थना म्हणतात. शिया लोक सामान्यपणे एकट्याने प्रार्थना म्हणतात, यावेळी विद्वान माणसाची उपस्थिती असली तर फारच चांगले असते पण नसेल तर एकट्याने प्रार्थना म्हणतात.

ज्या करबलाच्या—अल इराकमधील शहर—भूमीवर हुसेनला हौतात्म्य प्राप्त झाले त्या ठिकाणच्या मातीचे ढेकूळ (खाक-इ-करबला) बहुधा प्रत्येक शिया मुसलमान आपल्याजवळ बाळगतो आणि प्रार्थनेच्या वेळी त्याच्यावर आपले कपाळ ठेवतो.

अनुक्रमणिका

शिया मुसलमान सूर्यादयापूर्वी फर्ज, दुपारी झुहर व अस्त्र, आणि सूर्यास्ताच्या वेळी मगरीब व ईशा अशा तीन वेळा प्रार्थना म्हणतात. त्यांच्यापैकी काहीजण मध्यरात्रीचीही प्रार्थना (तहज्जूद) म्हणतात. 'बोहरा मुसलमानांत आधी मुल्ला मोठ्याने प्रार्थना म्हणतो व नंतर इतर लोक त्याच्यामागून प्रार्थना म्हणतात' परंतु प्रार्थनेच्या वेळी त्यांच्या प्रणिपातात शिया किंवा सुन्नी मुसलमानाप्रमाणे नियमितपणा नसतो. बोहरांच्या प्रार्थनेच्या वेळाही सुन्नींच्यापेक्षा पाच मिनिटांनी उशिरा असतात. माध्यान्ह व सूर्यास्ताच्या आशीर्वचनाच्या प्रार्थना केल्यानंतर ते थोडा वेळ जाऊ देतात. त्यानंतर दुपारच्या व सायंकाळच्या प्रार्थना म्हणतात. दरम्यानच्या काळात ते मशिदीतच राहतात. अशा रीतीने एकदा मशिदीत गेल्यावर चारही प्रार्थना ते करतात'. [जनगणना अहवाल, बेरार, १८८१, पृष्ठ ७०, तळटीप]. वैयक्तिक आशीर्वाद मागणे (दुवा) व मशिदीत म्हणावयाची धर्मोक्त प्रार्थना (सलात) यात स्पष्टपणे फरक असतो. काही धर्मज्ञांच्या मते स्नानगृहात प्रार्थना म्हणू नये कारण त्या ठिकाणी जीनचा निवास असतो. गरम पाण्याने स्नान केल्यावर 'रुक्तैन' म्हणजे दोन प्रणिपातांची प्रार्थना म्हणण्याची प्रथा आहे. पण ही प्रार्थना म्हणणे निषिद्ध नसली तरी अयोग्य (मकरुह) आहे असे हनाफी शाखेचे मुसलमान म्हणतात. फर्ज, म्हणजे आवश्यक प्रार्थना कोणत्याही ठिकाणी ते अपवित्र असले तरी म्हणता येतात. परंतु सुन्नत म्हणजे परंपरेची प्रार्थना व नफी म्हणजे सक्तीची नसलेली जास्तीची प्रार्थना, काही ठराविक ठिकाणी म्हटल्यास धर्मशास्त्रदृष्ट्या निषिद्ध नसल्या तरी अयोग्य असते. कर्तव्याला पुढील संज्ञा आहे—वर्ज्य (हराम), बंधन (फर्ज), शिफारस (मुस्तहब), उदासीन (मुबाह) व अयोग्य (मकरुह).

सुन्नी मुसलमान खाली वर्णन केल्याप्रमाणे नेमलेल्या प्रार्थना म्हणतात. प्रार्थनेच्या वेळा पुढीलप्रमाणे आहेत-फज्र की नमाज, सलातुल फज्र म्हणजे सकाळची प्रार्थना. ही प्रार्थना पहाटे पाच वाजल्यापासून सुर्योदयापर्यंत म्हणतात. काही अपरिहार्य कारणामुळे यावेळी ही प्रार्थना करता येणे शक्य झाले नाही तर दुसऱ्या एखाद्या सोयीस्कर वेळी केली पाहिजे. दुसऱ्या वेळी ही प्रार्थना केल्यामुळे, योग्य वेळी ती केली असती तर जे पुण्य लाभले असते ते लाभत नसले तरी ती केलीच पाहिजे, ती टाळू नये. (२) झुहर की नमाज, सलातुझुहर, नमाज-इ-पेशीन अथवा माध्यान्हीची प्रार्थना. ही दुपारी १ ते ३ वाजताच्या दरम्यान करावयाची असते. (३) अस्त्र की नमाज, सलातुल अस्त्र, नमाज-इ-दीगर म्हणजे दुपारनंतरची प्रार्थना ४ ते ४.३० वाजेपर्यंत किंवा सूर्यास्तापर्यंत करावयाची असते. (४) मगरिब की नमाज, सलात-उल-मगरीब, नमाज-इ-शाम म्हणजे सूर्यास्ताची प्रार्थना. ही संध्याकाळी ६ वाजता किंवा सूर्यास्तानंतर लगेच करावयाची असते. ही प्रार्थना विशेष महत्त्वाची असल्यामुळे तिला या वेळेपेक्षा विलंब करू नये असे म्हणतात. (५) इशाकी नमाज, सलात-उल-इशा, नमाज-इ-खुफ्तान म्हणजे रात्र झाल्यावर म्हणावयाची प्रार्थना. ही प्रार्थना झोपी जाण्याच्या वेळी रात्री ८ ते मध्यरात्र या दरम्यान करावयाची असते. एखाद्या माणसाला काही अपरिहार्य कारणामुळे मध्यरात्रीनंतरही जागे राहावे लागल्यास त्याने ती सूर्योदयापूर्वी केव्हाही म्हणावी. हनाफी शाखेचे लोक ही प्रार्थना सूर्याची प्रभा अस्तंगत झाली की म्हणतात, तर इतर धर्मश्रद्ध माणसे पूर्ण अंधार पडल्याशिवाय ही प्रार्थना म्हणत नाहीत.

प्रार्थनेच्या वरील वेळा बंधनकारक आहेत (फर्ज). ह्याशिवाय 'सुन्नत' व 'नफ्ल' प्रार्थना आहेत. पण या प्रार्थना विशेष धर्मनिष्ठ असलेले लोकच करतात. त्यांच्या वेळा पुढीलप्रमाणे आहेत:- सलात-उल-इशराक, नमाज-इ-इशराक, इशराक की नमाज सकाळी ७.३० वाजता; सलात-उल-झुहा, नमाज-इ-चश्त, झुहाकी नमाज सकाळी ९ ते ११ च्या दरम्यान किंवा यावेळी वेळ न मिळाल्यास सूर्योदयापूर्वी केव्हाही. सलात-उल-तहज्जुद, नमाज-इ- तहज्जुद, तहज्जुद की नमाज मध्यरात्री किंवा पहाटेपूर्वी केव्हाही; नमाज-इ-तरावीह म्हणजे

विश्रांतीच्या प्रार्थना. सकाळी आठ वाजता म्हणावयाच्या प्रार्थनेला नमाज-इ-तरावीह ही संज्ञा काही वेळा लावतात. परंतु रमजान महिन्यात रात्रीच्या वेळी वीस प्रणिपाताच्या प्रार्थनेला हे नाव विशेषकरून लावले जाते. या प्रार्थनेला विश्रांतीच्या प्रार्थना म्हणण्याचे कारण असे की जमलेला समुदाय प्रार्थनेची चार कडवी म्हटल्यानंतर व दर दोन प्रणिपातांनंतर खाली बसतो व विश्रांती घेतो.

रमजानचा उपवास करणाऱ्या लोकांवर परमेश्वर पुष्कळ कृपा करतो असे म्हणतात. प्रेषित महंमद मुस्तफाने असे म्हटले आहे की, अखेरच्या न्यायदानाच्या दिवशी हा उपवास करणाऱ्याला स्वर्गाच्या आठ दरवाजांपैकी रैयान (तृष्णातृप्ती) या दरवाजातून प्रवेश मिळतो आणि त्याच्या मुखातून पाझरणारा मुखरस परमेश्वराला गुलाब, कस्तुरी यांच्यापेक्षाही चांगला वाटतो. उपवास काळात खाणेपिणे, समागम वर्ज्य असतो. इतकेच नव्हे तर पान, तंबाखू, नस हेही वर्ज्य असतात. अनवधानाने एखाद्या गोष्टीकडे दुर्लक्ष झाले तरी उपवासाचे पुण्य मिळते पण हेतूतः उपवास मोडला तर पुरुष-गुलामाला दास्यमुक्त करून प्रायश्चित्त घेतले पाहिजे असे म्हणतात. ब्रिटिश भारतात गुलाम बाळगण्याची पद्धत रद्द केली असल्यामुळे हा नियम सध्या अस्तित्वात दिसत नाही [कायद्याने प्रस्थापित झालेली गुलामगिरी हिंदुस्थानमध्ये १८४३च्या ॲक्ट ५ ने रद्द करण्यात आली. पण शेवटचा धक्का १ जानेवारी १८६२ ला देण्यात आला जेव्हा यासंबंधीचे इंडियन पीनल कोडातील सेक्शन्स कार्यवाहीत आले. (स्लीमन, रॅम्बल्स, २८२, बाल्फोर, सायक्लोपिडिया ऑफ इंडिया, ३·६७२ तळटीप.] हे शक्य नसेल तर साठ भिकाऱ्यांना जेवण द्यावे आणि हेही शक्य नसेल तर एक दिवस उपवास मोडल्याबद्दल पुढे केव्हां तरी साठ दिवस उपवास केला पाहिजे. तेव्हा आणि तेव्हाच फक्त उपवासाचे पुण्य मिळते.

जे लोक रमजानचा उपवास करतात ते प्रातःकाली २ ते ४ वाजण्याच्या दरम्यान आणि सायंकाळी ६ वाजल्यानंतर प्रार्थना म्हणून जेवण करतात. प्रातःकालच्या जेवणाला सहर, सहरगाही म्हणतात या उपवासासाठी नेमून दिलेल्या वेळांत मशिदीत ठरलेल्या वेळी नगारा वाजवून आणि मोठ्या शहरात नौबत वाजवून, झोपेतून उठा, जेवणाची वेळ झाली अशी सूचना देतात. या वेळात फकीर घरोघर जाऊन भिक्षा मागतात, प्रार्थना म्हणतात आणि लोकांना झोपेतून उठा असा उपदेश करतात. लोक झोपेतून उठल्यानंतर फकिरांना अन्न देतात आणि शुक्रवारचा खुतबा ऐकल्यानंतर आपापल्या ऐपतीनुसार फकिरांना पैसे व कपडे देतात. शव्वाल महिन्याच्या पहिल्या तारखेला रमजान ईद असते. यावेळी प्रार्थनास्थळी ‘ईदगाह’ जाण्यापूर्वी उपवास करणाऱ्याने फकिरांना पाच पौंड गहू किंवा इतर धान्य, फळे, खारका इत्यादी दिले पाहिजे (रोजा की फितरत). कारण असे दान करीपर्यंत त्याला उपवासाचे पुण्य मिळत नाही असे म्हणतात. हे दान कुटुंबप्रमुखाने आपणा स्वतःसाठी व कुटुंबातील न कमवत्या कुटुंबियांसाठी दिले पाहिजे. पण पत्नीसाठी दान करण्याची गरज नाही. तिने ते आपल्या मेहरमधून केले पाहिजे. तसेच कमावत्या मुलांनी आपल्या मिळकतीतून दिले पाहिजे. गुलामासाठी दान करण्याची गरज नसते. वर्षातून एकदा पैसे, गुरे, धान्य, व्यापारी माल, फळे या पाच वस्तूंचे दान देणे (जकात) चांगले असते असे मानतात. पण या वस्तू दान करणाऱ्याच्या वर्षभर मालकीच्या असल्या पाहिजेत. एखाद्या माणसावर त्याच्या संपत्तीइतकेच किंवा संपत्तीपेक्षा जास्त कर्जाचा बोजा असेल तर दान देणे त्याच्यावर बंधनकारक नाही. घर, कपडे, फर्निचर, दैनंदिन उपयोगाची गुरे, नोकर म्हणून ठेवलेले गुलाम, शस्त्रे, शास्त्राची व धार्मिक पुस्तके किंवा कामगाराच्या वापराची अवजारे या आवश्यक वस्तूवर दान करण्याची गरज असते.

अनुक्रमणिका

या जकातीचे दर पुढीलप्रमाणे आहेत—संपत्तीवर शेकडा, $२\frac{१}{२}$ ज्या माणसाजवळ ४० पेक्षा अधिक पण १२० पेक्षा कमी शेळ्या, मेंढ्या असतील त्याने एक शेळी आणि १२१ ते २०० अशी त्यांची संख्या असल्यास दोन शेळ्या दान दिल्या पाहिजेत. एखाद्या माणसाजवळ ५ ते २५ उंट असतील तर त्याने एक शेळी किंवा मेंढी, २६ ते ३५ उंट असतील तर एक वर्ष वयाची सांडणी, ३६ ते ४५ वर्षे वयाची सांडणी, ४६ ते ६० तीन वर्षे वयाची सांडणी, ६१ ते ७५ चार वर्षे वयाची सांडणी, ७६ ते ९० दोन वर्षे वयाची सांडणी, ९१ ते १२० तीन वर्षांची सांडणी, आणि १२१ पेक्षा अधिक उंट असतील तर प्रत्येक ४० संख्येसाठी दोन वर्षांची व ५० संख्येसाठी तीन वर्षांची सांडणी दान केली पाहिजे. एखाद्याजवळ गायीबैल असतील तर त्याने ३० गायी असल्यास ६ महिन्यांचे व ४० असतील तर १ वर्षाचे आणि यापुढील प्रत्येक १० संख्येसाठी १ वर्षांचे वासरू दान केले पाहिजे. एखाद्याजवळ हजार गायी असतील तर ज्यांच्या वयाची संख्या शभर होईल इतक्या गायी दान केल्या पाहिजेत. म्हशी व रेडे आणि घोडे यांच्यावरची जकात अनुक्रमे शेळ्या आणि उंट यांच्याप्रमाणे दिली पाहिजे. किंवा हदीसनुसार एखादा दिनार जकात द्यावी. ओझी वाहण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जनावरावर जकात देण्याची आवश्यकता नसते. फक्त निसर्गाच्या पाण्यावरील शेतीतील उत्पन्नाचा दहावा, विहीर किंवा तलावातील पाण्याने केलेल्या शेतीतील उत्पन्नाचा विसावा हिस्सा द्यावा लागतो. व्यापारीमालावर शेकडा $२\frac{१}{२}$ जकात द्यावी लागते. सोने, चांदीवरही जकात द्यावी लागते. व्यापारात झालेल्या नफ्यावरही जकात द्यावी लागते.

धार्मिक दान पुढील व्यक्तींने द्यावे—प्रवासखर्च करण्याची ऐपत नसणारे यात्रेकरू; फकीर व भिकारी; कर्ज फेडण्यास असमर्थ असणारे कर्जदार, धर्मप्रसाराचे कार्य करणारे; उपाशी प्रवासी; इस्लामचा स्वीकार करणारे. हे दान या वर्गातील अतिशय गरिबांनाच स्वीकारता येते. भिक्षेवरच जगणारे धार्मिक या प्रकारचे दान कधीही स्वीकारीत नाहीत. सय्यद लोकांनी आपणाला मदतीची गरज आहे असे म्हटल्याशिवाय त्यांना दान देऊ नये, त्याचप्रमाणे श्रीमंतांना, आप्तांना व गुलामांना दान देऊ नये. प्रेषितांचे वंशज असलेल्या सय्यद मुसलमानांनी दान मागणे हे त्यांना लांच्छनास्पद आहे असे मानतात; पण तरीही गुजरातमध्ये सय्यद भिकाऱ्यांचा एक वर्ग अस्तित्वात आहे!

सुन्नी स्त्रीपुरुषांनी आपल्या हयातीत एकदा तरी मक्का व अरफात या पर्वताची यात्रा केली पाहिजे. त्याचप्रमाणे शिया स्त्री पुरुषांनी करबला आणि मशार-इ-शरीफ या अफगाण तुर्कस्तानमधील अलीच्या कबरीच्या दर्शनाला गेले पाहिजे. ज्यांच्यामध्ये या यात्रा करण्याची व आपल्या अनुपस्थितीत कुटुंबाचा चरितार्थ चालविण्याची ऐपत आहे त्यांच्यावरच या धार्मिक यात्रा करण्याचे बंधन आहे. जो माणूस ही यात्रा करतो, जो फटकळपणे बोलत नाही तसेच दुष्टत्वाने वागत नाही त्याची सर्व पापातून मुक्तता होते असे मानतात. एखाद्या हनाफी शाखेच्या मुसलमानाला ही यात्रा करण्याची इच्छा आहे पण आजार किंवा शत्रूच्या भयामुळे अडथळा येणार असेल तर त्याला या यात्रेसाठी आपल्यासाठी एखादा माणूस नियुक्त करता येतो. एखाद्या श्रीमंत माणसाने किंवा राजपुत्राने कोणतेही कारण न देता आपल्यासाठी यात्रेला दुसरा माणूस पाठवला तर त्याला यात्रेचे पुण्य मिळते असे म्हणतात. एखाद्या स्त्रीने ही यात्रा करताना आपले वडील, भाऊ, पती किंवा मुलगा व आप्त यांपैकी कोणी तरी एकजण पालक (महरम) म्हणून बरोबर घेतला पाहिजे. गरीब लोकांना आर्थिक परिस्थितीमुळे या यात्रेचे भाग्य लाभत नाही. पण अशांपैकी काहीजण उदार मंडळींनी प्रवासाची मोफत सोय केलेल्या जहाजाने धार्मिक स्थळांच्या यात्रा करतात. (फैज-इ-बिलाह). गेल्या काही वर्षांत ब्रिटिश सरकारने

या धार्मिक यात्रेकरूंच्यासाठी पुष्कळ सोयी केल्या आहेत, त्यांच्यासाठी विश्रामगृहे, दवाखाने बांधले आहेत, प्रवाशांना मदत करणारे मदतनीसही नेमले आहेत.

मक्केजवळ आल्यावर प्रवासी (हाजी) यात्रिकाचा पोशाख घालतो. हा पोशाख म्हणजे ६ फूट लांब व ३ फूट रूंदीचे दोन नवे सुती कपडे असतात. या कपड्यावर लाल रंगाच्या अरुंद पट्ट्या असतात. या कपड्यांपैकी एक (रिदा) पाठीवर टाकतात व उजव्या भागाला त्याची गाठ बांधतात. दुसरा कपडा कमरेभोवती गुंडाळतात. तो गुडघ्यापर्यंतच पुरणारा असतो (इजार). अकबराला ही धार्मिक यात्रा कधीच करता आली नाही. त्याने सुलतान ख्वाजाला आपल्यासाठी यात्रा करावयास प्रमुख यात्रिक म्हणून (मीर हाजी) नियुक्त केले आणि आपण स्वतः प्रवासात सहभागी आहोत हे दर्शविण्यासाठी त्याने 'इहराम' पोशाख घातला आणि यात्रेसाठी जाणाऱ्या ख्वाजाबरोबर तो काही पावले चालत गेला. प्रेषितांच्या काळी यात्रेकरू काबाची प्रदक्षिणा नग्नावस्थेत अगर मक्का शहरातील एखाद्या धार्मिक जमातीकडून उसने आणलेले कपडे घालून करीत असत. या भूमीवर विशिष्ट पोशाख वापरण्याचे कारण काय, याचे स्पष्टीकरण देताना मुसलमान म्हणतात की अंगावरचे कपडे पापाने मलीन झाले असल्यामुळे तेच घालून हा विधी करता येत नाही; पण खरे कारण वेगळेच आहे. ते असे की या पवित्र स्थळाच्या संपर्काने यात्रेकरूचे स्वतःचे कपडे निषिद्ध होतात, त्याला ते पुन्हा वापरता येत नाहीत. पण त्याला ते पवित्र ठिकाणच्या प्रवेश द्वारावर ठेवण्याची मुभा देण्यात येते म्हणून इहराम, मूळ शब्द हराम, म्हणजे 'पवित्र' किंवा 'वर्ज्य' असा त्याचा अर्थ आहे. ज्या दिवशी हा पोशाख करावयाचा असतो त्या दिवशी यात्रेकरू स्नान करतो, न शिवलेले हे दोन कपडे गुंडाळातो, दोन प्रणिपातांच्या प्रार्थना म्हणतो; डोक्यावर मात्र काहीच घालत नाही. तो खडावा घालू शकतो. हा पोशाख त्याला मीना येथे बळी दिल्याशिवाय, हजामत व स्नान केल्याशिवाय उतरून ठेवता येत नाही.

यात्रेकरूला काही गोष्टी वर्ज्य कराव्या लागतात. त्याने भांडण, अनैतिक कृत्य, अपशब्द उच्चारणे टाळले पाहिजे; त्याने शिकार करू नये, त्याने पक्षाला हुसकून लावू नये, इतकेच नव्हे तर दुसऱ्याचे त्याच्या विनाशाकडे लक्ष वेधू नये; त्याने आपले शरीर नखाने खाजवू नये, हाताच्या तळव्याने वाटल्यास घासावे पण जीवजंतू मरणार नाहीत याची दक्षता घ्यावी, नखाने खाजविल्यास एखादा केस उपटण्याची शक्यता असते; त्याने झाडाची आणि गवताची काडीही मोडू नये, तेल, सुगंधी द्रव्य वापरू नये, केस रंगवू अथवा काढू नये, शिवलेले कपडे, बूट वापरू नये. सावलीत बसावे पण डोके मात्र अनाच्छादित ठेवावे. अर्थात त्याने घार, कावळा, विंचू पिसाळलेला कुत्रा इत्यादी त्रासदायक प्राण्यांना मारण्यास हरकत नाही. वरील नियमांपैकी प्रत्येक नियमाचे यात्रेकरूच्या हातून उल्लंघन झाल्यास त्यासाठी प्रत्येकी एक मेंढी बळी दिली पाहिजे. यात्रेकरूने समागम केला तर किंबहुना आपल्या पत्नीचे चुंबन घेतले तर त्याच्या यात्रेचे सर्व पुण्य संपते. यात्रेकरूने पुढील मार्गावरून जाताना हाजीचा पोशाख घातला पाहिजे-मदिना मार्ग, जू-उल-हलीफा; इराक मार्ग, झातुअर्क; सिरियन मार्ग, हुज्फा, नज्द मार्ग, कर्न; येमेन मार्ग, यलमलम. काही यात्रेकरू आपण भौतिक सुखाचा त्याग केला हे दर्शविण्यासाठी मक्केला पोचण्यापूर्वी पंधरा दिवस अगोदर हाजीचा पोशाख घालतात तर काहीजण आपल्या भौतिक सुखाचा त्याग करण्याच्या कुवतीप्रमाणे मक्केला पोचण्यापूर्वी एक दोन दिवस अगोदर किंवा अखेरच्या दिवशी हा पोशाख घालतात.

मक्केत आल्यावर यात्रेकरू लगेच, 'वुजू' आणि मसजिद-उल-हराम (पवित्र मशीद) मध्ये जातात आणि तेथील हजर-उल-आस्वादचे (काळा दगड) चुंबन घेतात. हा दगड उल्का पाषाण आहे असे म्हणतात. नंतर काबाला, या पवित्र इमारतीकडे डावा खांदा करून एकूण सात प्रदक्षिणा घालतात, यांपैकी पहिल्या तीन जलद (हरवला) व चार फारच हळू जणू काही खोल रेतीतून चालत आहोत या पद्धतीने खांदे हलवीत (तरम्मुल) प्रदक्षिणा घालतात. काबा ही चौरस इमारत असून ती बैतुल्लाह म्हणजे ईश्वरी निवासाच्या मध्यभागी वसलेली आहे. तिच्या छतावर पडलेले पावसाचे पाणी कृपेच्या पन्हाळाने (मिजाब-उर-रहम) इस्त्रायलच्या कबरीवर पडते. ते पाणी घेण्यासाठी यात्रेकरूंची धडपड चालू असते. काबाच्या एका कोपऱ्यात 'रुक्न-उल-यमनी' दगड आहे. या दगडाला आलिंगन देऊन यात्रेकरू आपल्या पापाबद्दल क्षमायाचना करतात. नंतर इब्राहीमच्या पावलांचा ठसा असलेल्या जागी जातात (कदम-इ-इब्राहीम) आणि प्रार्थना करतात व परत जाताना त्या दगडाचे चुंबन घेतात. हा दगड मुळात पांढरा होता, यात्रेकरूंच्या सतत स्पर्शामुळे तो काळा झाला आहे असे म्हणतात. तो चांदीत बसवलेला असून काबाच्या भिंतीत बसवलेला आहे. तो पाण्यावर तरंगतो आणि त्याचे चुंबन घेणाऱ्याची पुष्कळ पापे झडून जातात अशी समजूत आहे. यात्रेच्या नवव्या दिवशी यात्रेकरू सफा व मरवा या टेकड्यांवर या टेकडीवरून त्या टेकडीवर सात वेळा पळतात. प्रत्येक टेकडीच्या टोकावर गेल्यावर थोडा वेळ स्वर्गाच्या दिशेने वर हात करून उभे राहतात आणि परमेश्वराला आपल्या मनोकामना पूर्ण करण्याविषयी प्रार्थना करतात. कारण यावेळी यात्रेकरूंनी केलेल्या प्रार्थना परमेश्वर ऐकतो आणि त्यांच्या इच्छा पूर्ण करतो असे मानतात.

या टेकड्यांच्यामध्ये पळण्याच्या रूढीचे मूळ पुढीलप्रमाणे आहे—एकदा हजर बिबी आपल्या इस्त्रायल या मुलाला घेऊन मक्का या ओसाड ठिकाणी आली तेव्हा तेथे घर नव्हते, पाणी नव्हते. तिने मुलाला एके ठिकाणी ठेवले आणि पाण्याच्या शोधार्थ ती या टेकडीवरून त्या टेकडीवर अशी सारखी पळत होती. मधूनच ती मुलाला लांडग्याने किंवा कुत्र्याने खाऊ नये म्हणून त्याच्याजवळ वारंवार येत होती. ती अशी पळत असताना मूल रडायला लागले आणि त्याची टाच जमिनीला जोराने लागली त्याबरोबर वाळूतून पाणी वर आले. हजर बिबीने एक प्रकारची विहीर केली आणि त्या पाण्याने आपणास व मुलास शुद्ध करवून घेतले. या विहिरीला झमझमची पवित्र विहीर असे म्हणतात. अरबी भाषेत बीर-इ-झमझम व फारसीमध्ये छाह-इ-झमझम असे तिला म्हणतात. झमझम या शब्दाचा अर्थ 'पाण्याचा गोंधळून टाकणारा आवाज' असा आहे. प्रवासातून परत येताना यात्रेकरू या विहिरीचे पाणी तांबे, बाटली यात भरून घेतात. रमजानचा उपवास सोडल्यावर यातील थोडे पाणी ते पितात किंवा सगळ्यांनी वापरावयाच्या पाण्यात त्याचे काही थेंब टाकतात. असे करण्यामागे सर्वांची पापे नाहीशी व्हावीत असा हेतू असतो. काहीजण हे पाणी दृष्टी सुधारावी म्हणून डोळ्यांनाही लावतात. हे पाणी यात्रेकरू भूषण म्हणून इतर वेळीही पितात. पाणी थोडे असल्यास ते इतर पाण्यात मिसळून पितात. तसेच मरणोन्मुख माणसाला हे पाणी शुद्ध स्वरूपात किंवा शरबतात मिसळून पाजतात. एखाद्या व्यक्तीला अरबी भाषा उच्चारता येत नसेल तर त्याने हे पाणी घोटभर पिल्यास त्याला ती ताबडतोब उच्चारता येते अशी समजूत आहे. मदिना येथील एका विहिरीलाही झमझम असे नाव आहे तिला 'बीर-इ-नबी' असे म्हणतात. सफा व मरवा या टेकड्यांवर पळून जाण्याचे एक असेही कारण सांगतात की एकदा एका जोडप्याने मशिदीत समागम केला त्यामुळे त्यांचे दगडात रूपांतर झाले. कुरेश टोळीतील लोकांनी त्यापैकी एक दगड सफा व दुसरा मरवा या टेकडीवर ठेवला व ते त्या दगडांची उपासना करू लागले. प्रेषिताला ही पद्धत मान्य नसल्यामुळे त्याने मनाई केली. परंतु लोक आपली आज्ञा ऐकत नाहीत असे आढळून आल्यावर त्यांनी या लोकांना या टेकड्यांचे दर्शन

घेण्याची अनुज्ञा दिली. त्यांची अपेक्षा अशी होती की उदाहरणावरून अशा प्रकारचा गुन्हा केल्यास परमेश्वर किती कठोर शासन करतो हे लोकांना कळेल आणि ते या प्रकारचे कृत्य करणार नाहीत.

मुस्लीम वर्षाच्या जिल्हेज [‘यात्रांचा मालक’, ‘तरविया’ म्हणूनसुद्धा ओळखला जातो, ‘तृष्णेचे समाधान’; जिल्कद, अकरावा महिना म्हणजे ‘तहाचा मालक’,. युद्धाची परवानगी नसते. (एनसायक्लोपिडिया इस्लाम, १·९५९)] या अखेरच्या महिन्याच्या आठव्या दिवशी यात्रेकरू मिना येथे जमतात, प्रार्थना म्हणतात व रात्र तेथेच घालवतात. याच महिन्याच्या नवव्या दिवशी म्हणजे बकरी ईदच्या दिवशी ते इमामबरोबर ‘अरफात’ पर्वतावर प्रार्थना म्हणण्यासाठी जातात. पण त्यापूर्वी आपल्या मृत अगर जिवंत आप्तावर दया करण्याची परमेश्वराला प्रार्थना करतात; वडिलांसाठी प्रार्थना म्हणत नाहीत. कारण आपला पिता कोण याबद्दल खात्रीपूर्वक कोणी सांगू शकत नाही. या दिवशी ते सकाळची प्रार्थना म्हटल्यावर मक्केच्या पूर्वेला बारा मैलांवर असलेल्या जवळूल अरफात येथे घाईने जातात. तेथे इमामबरोबर प्रार्थना म्हणतात, खुतबा ऐकतात आणि सूर्यास्तापर्यंत तेथेच थांबतात. त्यानंतर लगेच अल-मजदलिफा येथे परततात, सायंकाळची प्रार्थना म्हणतात आणि रात्र तेथेच घालवतात.

दुसऱ्या दिवशी सकाळी म्हणजे दहाव्या दिवशी ते मिनाकडे जाण्यासाठी निघतात. तेथे आल्यावर मशर-अल-हराम या धार्मिक विधी करावयाच्या ठिकाणी थांबतात आणि परमेश्वराची क्षमायाचना करतात. सूर्यास्तापूर्वी ते बात-उल-मुहस्सारच्या मार्गाने लवकर जमरत-अल-अकबा या ठिकाणी येतात. जमरा म्हणजे मारण्याचे ठिकाण किंवा शैतान-इ-कबीर, येथे येतात. शैतान-इ-कबीर हे एका खांबाचे नाव आहे. इतर ठिकाणे-वस्ता ‘मध्यवर्ती ठिकाण’ व अल-औला ‘पहिले ठिकाण’ अशी दगड फेकण्याची ठिकाणे आहेत. या तीन खांबापैकी प्रत्येकाजवळ आल्यावर यात्रेकरू सात खडे घेतात, प्रार्थना म्हणतात व खड्ड्यांवर फुंकर मारून ते खडे खांबाला मारतात. या विधीला रम-उल-जिमार असे म्हणतात. खडे फेकताना ते ‘मी हे परमेश्वराच्या नावाने आणि सैतानाबद्दलच्या तिरस्काराने करतो’ असे म्हणतात.

या खडे फेकण्याच्या विधीचे मूळ पुढीलप्रमाणे आहे—एकदा प्रेषित इब्राहिम आपला मुलगा इस्माईल याला बळी देण्यासाठी मक्केला नेत होता. [जरी कुराणमध्ये (३७·१०१) असा पुरावा आहे की अब्राहम, इसाकला, इस्माईलला नव्हे, बळी देऊ इच्छित होता तरी सुन्नी व शिया असे मानतात की बळी म्हणून इस्माईल निवडला होता. कुराणातील वरील उताऱ्यावरची टीप पहा; ह्युजेस २१६; हस्टिंग्स, डिक्शनरी बायबल, ३·४३७; एनसायक्लोपिडिया बिब्लीका ३·३२०० तळटीप).] वाटेत मानवीरूपात सैतान इस्माईलपुढे येऊन त्याला म्हणाला, ‘हे मुला, तुझा बाप तुला मूर्तीपुढे बळी देण्यासाठी नेत आहे, या गोष्टीला तू मान्यता देऊ नकोस’. इस्माईलने लगेच ही गोष्ट आपल्या बापाला सांगितली. त्यावर इब्राहीम त्याला म्हणाला, ‘हे माझ्या मुला, हा शापित सैतानाशिवाय दुसरा कोणी नाही, तो तुला फसविण्यासाठी आला आहे; तू “अल्लाशिवाय कोणीही श्रेष्ठ नाही, हे अल्ला, माझे रक्षण कर” असे म्हण व त्या सैतानावर दगड फेक. यानंतर सैतान तीन ठिकाणी इस्माईलच्या समोर आला आणि प्रत्येक वेळी इस्माईलने ईश्वराचे नाव घेऊन त्याच्या अंगावर खडे फेकले. यावरूनच यात्रिकांनी या ठिकाणी आल्यावर ईश्वराची प्रार्थना म्हणून खडे फेकण्याची प्रथा पडली.

वरील तीन ठिकाणी खडे फेकल्यानंतर यात्रेकरू मिना येथे बळी देण्याचा विधी करण्यासाठी जातात. ज्या लोकांना जकात द्यावी लागते म्हणजे जे श्रीमंत आहेत त्यांनी हा विधी करणे अपेक्षित असते. त्यांनी आपल्या कुटुंबातील प्रत्येक लहान मोठ्या व्यक्तीसाठी एक बकरा किंवा प्रत्येक सातजणांसाठी एक गाय किंवा

उंट बळी दिला पाहिजे. बळी देण्यात आलेल्या प्राण्याच्या मांसाचे तीन भाग करतात. एक भाग यजमानाच्या आप्तासाठी, एक फकिरांना देण्यासाठी व एक स्वतः यजमानासाठी असतो.

या बळी देण्याच्या रूढीचे मूळ पुढीलप्रमाणे असल्याचे सांगतात—जेव्हा इब्राहीमने मक्का वसविली तेव्हा परमेश्वराने त्याला, 'तू मला जेवण दे', असे सांगितले. यावर खलिलुल्ला (परमेश्वराचा मित्र) इब्राहीमने 'आपणाला काय पाहिजे' असे परमेश्वराला विचारले. परमेश्वर म्हणाला, 'तुझा मुलगा इस्माईल बळी दे'. परमेश्वराच्या आज्ञेवरून इब्राहीमने इस्माईलला काबा येथे नेले व तेथे त्याला निजवून त्याला ठार मारण्याचे निष्फळ प्रयत्न केले. तेव्हा इस्माईल आपल्या वडिलांना म्हणाला, 'तुमचे डोळे उघडे असल्यामुळे तुमच्या मनात माझ्याबद्दल करुणा उत्पन्न होते व त्यामुळे तुम्हाला माझ्या गळ्यावर वार करावासा वाटत नाही, तुम्ही पटक्याने आपले डोळे बांधा व मग माझ्यावर वार करा'. इब्राहीमला मुलाच्या शहाणपणाचे आश्चर्य वाटले, त्याने त्याला आशीर्वाद दिला आणि त्याला त्याच्या सांगण्याप्रमाणे स्वतःचे डोळे बांधले. इब्राहीमने परमेश्वराचे नाव घेऊन मुलावर वार करण्यासाठी तलवार उपसली. दरम्यानच्या वेळात जॅब्रियल या देवदूताने इस्माईलला उचलून त्याच्या जागी एक मेंढी ठेवली. इब्राहीमने वार केल्यावर डोळे उघडून पाहिले तो त्याला कापली गेलेली मेंढी दिसली व मुलगा बाजूला उभा असल्याचे आढळून आले. नंतर इब्राहीम व इस्माईल यांनी परमेश्वराला त्याच्या दयाळूपणाबद्दल धन्यवाद दिले आणि त्याची प्रार्थना म्हटली. ही प्रार्थना मक्केला जाणाऱ्या प्रत्येक यात्रेकरूला म्हणावीच लागते. ही दोन प्रणिपातांची प्रार्थना आहे.

बळी देण्याचा विधी झाल्यानंतर यात्रेकरू आपली हजामत करवून घेतात, नखे काढून टाकतात. कापलेले केस नखे जमिनीत पुरतात. ते स्नान करतात, यात्रिकाचा पोशाख उतरून ठेवतात आणि त्यानंतर यात्रा संपली असे समजतात. श्रीमंत लोक गरीब यात्रेकरूंना त्यांच्या हजामती व स्नानासाठी दया म्हणून पैसे देतात. मिना येथे हजामतीसाठी न्हावी व स्नानासाठी पाणी मिळण्याची मारामार असते. त्यामुळे या गोष्टी करण्यास फार यातायात करावी लागते. सगळी हजामत करण्याची गरज नसते, वस्तऱ्याच्या एक दोन फटकाऱ्यांत जितके केस कापले जातील तितकेही पुरेसे असतात. त्याचप्रमाणे स्नानासाठी डोक्यावर एखादा तांब्या पाणी घेतले तरीही पुरेसे आणि पाणी न मिळाल्यास धूळ व वाळूने शुद्धीकरण केले तरी पुरेसे ठरते.

मिना येथील बाजारात मोठ्या प्रमाणावर वस्तूंची विक्री होते. यात्रेकरू असे सांगतात की, व्यापारी व्यापारात इतके गढून गेलेले असतात की त्यांना ईश्वरभक्तीसाठी वेळच मिळत नाही. आपल्या वस्तूंचे रक्षण करण्यासाठी ते दुकानातच राहतात व धार्मिक विधी करीत नाहीत. बळी देण्याचा विधी झाल्याच्या दुसरे दिवशी यात्रेकरू मिना येथे राहतात म्हणून त्या दिवसाला 'विश्रांतीचा दिवस' (अयाम-उल-कर्र) असे म्हणतात. काही यात्रेकरू तर या महिन्याच्या ११, १२ व १३ व्या दिवशी तेथे थांबतात. या दिवसांना 'सख्यसंबंधाचे दिवस' (तशरिक) असे म्हणतात. यात्रेवरून परतताना ते काबाला अखेरचा निरोप घेण्यासाठी पुन्हा एकदा भेट देतात. त्यांच्या मार्गावर ते, पूर्वी सांगितलेल्या खांबाजवळून जाताना त्या खांबावर दगड फेकतात आणि अखेरची प्रदक्षिणा पूर्ण करतात. काबाला प्रदक्षिणा घातल्यानंतर मदिना येथे जाऊन महंमद मुस्तफाच्या कबरीचे दर्शन घेणे आवश्यक असते. इस्लामी परंपरेला ज्ञात नसलेली या कबरीबद्दलची ख्रिस्ती लेखक अशी दंतकथा सांगतात की, ही कबर लोहचुंबकाच्या साहाय्याने तरंगती ठेवली आहे. कबरीच्या लोकांमध्ये प्रसृत असलेल्या

कोरीव प्रतिकृतीतील चुकीच्या ‘पर्स्पेक्टिव्ह’ मुळे त्यांना असे वाटत असावे. काबाची प्रदक्षिणा करणारा पण मदिनाला भेट न देणारा जो यात्रेकरू असतो त्याची यात्रा विफल होते.

जफर शरीफ असे म्हणतो की, मौलवी, मशाईक आणि हाफीजपैकी माझे काही आदरणीय मित्र सांगतात की, हिंदुस्थानातून यात्रेला जाणारे लोक इथपर्यंत जातात की ते प्रेषिताच्या कबरीसमोर सिज्दा घालतात आणि तिला वंदन करतात. अरब सेवकांना (खादिम) हे पसंत नाही. ते यात्रेकरूंना सांगतात की ज्याअर्थी प्रेषितांनी आपल्यासमोर कोणी प्रणिपात करावा असे सांगितलेले नाही आणि प्रणिपात करून फक्त परमेश्वराचीच प्रार्थना करणे योग्य होईल त्याअर्थी यात्रिकांनी असे करणे योग्य नव्हे. काही अज्ञानी लोक मोहरमच्या वेळी संतांच्या कबरींना जसा प्रणिपात करतात तसा ताबूत आणि निशाणांनाही करतात. यावरून त्यांचे अज्ञान व मूर्खपणा दिसतो. कारण की प्रेषितांना प्रणिपात करणे अयोग्य असेल तर त्यांच्यापेक्षा कमी दर्जाच्या लोकांच्या कबरींना प्रणिपात करणे तितकेच अयोग्य आहे हे स्पष्ट आहे. अर्थात मशाईक, मुर्शद, गुलाम, प्रजाजन यांनी अनुक्रमे प्रेषित, आईवडील, मालक, राजा यांना सिज्दा घालून नमस्कार करणे त्यांचे कर्तव्यच आहे. हा प्रणिपात जमिनीवर गुडघे व हात टेकून आणि डोके खाली वाकवून करावयाचा असतो. या अवस्थेत त्यांनी बसल्यानंतर वरिष्ठांनी पुढे केलेल्या पायाच्या अंगठ्याचे चुंबन घ्यावयाचे असते.

फारच थोडे शिया मुसलमान या ठिकाणची यात्रा करतात. त्यांची कारणे दोन. एक म्हणजे खुतबा ऐकल्यावर आणि परमेश्वराची प्रार्थना व प्रेषितांची स्तुती केल्यावर ते अरफात या पर्वतावर अबुबकर, उमर, उस्मान या अनुक्रमे पहिला, दुसरा व तिसरा खलिफा यांची आणि शेवटी अली-उल-मूर्तजाची स्तुतिस्तोत्रे गातात. शियांना हे नापसंत असल्यामुळे त्यांच्यापैकी काहीजण तर यात्रेला जाण्यालाही नकार देतात. त्यांना अलीची स्तुती आधी झाली पाहिजे असे वाटते, दुसरे म्हणजे तुल्हा, सईद, सद, अबुउबेद, झुबेर आणि अब्दुर्रहमान बिन औफ या सहा सहकाऱ्यांना ते मान्यता देत नाहीत. या शेवटच्या सहा सहकाऱ्यांची नावे उच्चारणेही त्यांना खपत नाही. कारण ती उच्चारली तर त्यांच्या कबरीवर फातिहा म्हणण्याचे त्यांच्यावर बंधन पडते. हे सहा व पूर्वीचे चार मिळून प्रेषितांचे दहा सहकारी होते. देवदूत जब्रियलच्या इच्छेवरून प्रेषितांनी प्रार्थना करताना आपले तोंड जेरूसलेमपासून मक्केकडे वळवले तेव्हा प्रेषिताच्या वरील सहकाऱ्यांनी त्यांचे अनुकरण केले. त्यांच्या अशा करण्यामुळे त्यांनी स्वर्गात आपल्या जागा निश्चित करून घेतल्या असे प्रेषितांनी जाहीर केले. ह्या सहकाऱ्यांना सहबाये कराम म्हणतात. दुसरे म्हणजे काबात प्रवेश करताना प्रत्येकाला तुझा पंथ (जमात) कोणता असे विचारतात कारण तेथे सुन्नीशिवाय इतर शाखेच्या मुसलमानांना प्रवेश मिळत नाही. तरीही काही शिया आपण सुन्नी आहोत असे सांगून तेथे प्रवेश मिळवतात. पण ते मदिनाच्या जवळ जात नाहीत कारण तेथे महंमद मुस्ताफाच्या कबरीजवळ अबुबकर आणि उमर यांच्या कबरी आहेत.

कधी काळी आपणाला काबाची प्रदक्षिणा करण्याचे भाग्य लाभेल या आनंदात पुष्कळ मुसलमान जगतात; इतकेच नव्हे तर, त्यांच्यापैकी पुष्कळजण हा विचार सतत मनात बाळगतात. यात्रेकरूंना लाभणाऱ्या पुण्याबद्दल बरेच सांगितले गेले आहे. इतर गोष्टींबरोबर एक अशीही सांगतात की, काबाच्या दिशेने टाकलेल्या प्रत्येक पावलागणिक एक एक पाप नष्ट होते आणि यानंतरच्या जगात त्याला सन्मान प्राप्त होतो. मक्केच्या

अनुक्रमणिका

वाटेवर एखाद्या यात्रेकरूला मृत्यू आला तर तो हुतात्मा होतो आणि त्याच्या यात्रेच्या पुण्याची लगेच देवदूतांच्या पुस्तकात नोंद होते.

हुतात्म्यांचे आत्मे अखेरच्या न्यायदानाच्या दिवसापर्यंत हिरव्या पक्षांच्या शेतात ठेवले जातात, ते स्वर्गातील फळे खात व पाणी पित राहतात. पुढीलप्रमाणे मृत्यू आल्यास माणूस हुतात्मा होतो—कुराण वाचताना, प्रार्थना करताना, उपवास करताना, मक्केची यात्रा करताना, शुक्रवारच्या सबातच्या वेळी, धर्माचे रक्षण करताना, धार्मिक चिंतनात मग्न असताना, सत्य बोलताना मृत्युदंड दिल्यास, शांतपणे जुलमी राजाच्या हातून मृत्यू आल्यास, माणूस हुतात्मा होतो. एखादी स्त्री काम करताना अगर बाळंतपणात मृत्यू पावली तर तिला हौतात्म्य प्राप्त होते. पुरुषाला लुटारू, घोड्याची टाच, विजेचा धक्का, भाजून, बुडून, भिंतीच्या ढिगाऱ्याखाली गाडला जाऊन, कोरड्या विहिरीत पडून अगर उष्माघातामुळे मृत्यू आल्यास तो हुतात्मा होतो.

अनुक्रमणिका

## प्रकरण अकरावे

# प्रार्थना

प्रार्थनेपूर्वी, शरीर अपवित्र झाले असल्यास स्नान केले पाहिजे, तशी गरज नसल्यास प्रत्येक प्रार्थनेच्या वेळी निदान 'वुजू' तरी केले पाहिजे, अशी प्रेषितांची आज्ञा आहे. असे केल्यामुळे माणूस शुचिर्भूत होतो. हा नियम प्रेषितांनी बहुधा मक्का येथे सांगितला. परंतु ते काहीही असो, तो उघडपणे ज्यू लोकांकडून उचललेला दिसतो. समारंभप्रसंगी अपवित्र राहू नये म्हणून व स्नानाबाबत प्रेषितांनी दिलेल्या आज्ञा यांचे ज्यू धर्माच्या शिकवणुकीशी फारच साम्य आहे.

वुजू करताना प्रेषित आपले दोन्ही हात मनगटापर्यंत दोन वेळा धूत असत; गुळणा करीत नाकपुड्यात पाणी टाकून तीन वेळा नाक शिंकरीत असत; नंतर दोन्ही हात कोपरापर्यंत धूत असत. त्यानंतर अजून ओलसर असलेले हात कपाळापासून डोक्याच्या मागील भागापर्यंत व तेथून पुन्हा कपाळापर्यंत फिरवीत असत. सध्याची वुजू करण्याची पद्धतही या परंपरागत नियमानुसारच आहे. दोन्ही हात मनगटापर्यंत तीन वेळा धुतल्यावर, तीन वेळा गुळणा केल्यावर, नाकपुड्यात तीन वेळा पाणी टाकतात आणि त्या डाव्या हाताच्या करंगळीने साफ करतात. डावा हात या व इतर शरीर स्वच्छतेच्या कामी वापरण्यात येत असल्यामुळे त्या हाताने जेवू नये असा नियम आहे. नंतर दोन्ही हातांत पाणी घेऊन चेहरा तीन वेळा धुतात. यानंतर प्रथम उजवा व त्यानंतर डावा हात कोपरापर्यंत धुतात. नंतर ओंजळीत पाणी घेऊन कोपरापासून हातावर तीन वेळा टाकतात. फक्त पुसण्याची सोडून प्रत्येक कृती तीन वेळा करतात हे लक्षात घेतले पाहिजे. पुसण्याची कृती एकदाच व पुढीलप्रमाणे करतात. थोडासा ओलसर असलेला उजवा हात डोक्यावरून फिरवतात. लांब दाढी असल्यास तिला पुन्हा पाणी लावतात व ती उजव्या हाताच्या बोटांनी विंचरतात. नंतर हाताच्या तर्जनीने कानातील भाग साफ करतात व अंगठ्याने कानाचा मागील भाग पुसतात. एका हाताने दुसरा असे दोन्ही हात कोपरापर्यंत पुसतात. नंतर प्रथम उजवा, त्यानंतर डावा पाय व पायाचे घोटे धुतात. एवढे झाले म्हणजे वुजू करणे संपते. वुजूसाठी आवश्यक तेवढेच पाणी भांड्यात घेतात पण कदाचित थोडे उरले तर ते मक्केकडे तोंड करून पितात. असे करणे चांगले असते असे म्हणतात. वुजूबरोबर पवित्र मिश्कतमध्ये सविस्तर दिलेल्या प्रार्थनाही म्हणतात. पण त्या फार लांब असल्यामुळे येथे वगळण्यात येतात.

वुजूला फार महत्त्व असते. कारण प्रेषितांनी असे सांगितले आहे की, जो प्रार्थनेपूर्वी वुजू करतो त्याचे हातपायादिक अवयव न्यायदानाच्या दिवशी पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे चकाकतात. त्यामुळे तो गर्दीमधूनही उठून दिसतो व त्याला स्वर्गाकडे बोलावण्यात येते. म्हणून वुजू करावा असे त्यांनी म्हटले आहे. शाफाई तत्त्वानुसार वाहत्या पाण्यात हात, पाय, चेहरा धुतला किंवा आंघोळ केली तरच ती धर्मशास्त्र संमत असते. म्हणून तर वाहते पाणी पुरविण्यासाठी शहाजहानच्या काळात सियालकोट येथे कालवा खोदण्यात आला होता. प्रार्थनेपूर्वी दरवेळी स्नान करणे आवश्यक नसते. पण पुढीलपैकी एखाद्या गोष्टीमुळे शरीर अपवित्र झाले असेल तर प्रार्थनेपूर्वी स्नान करावे लागते—बहिर्विधी, शरीरातून रक्तस्राव, वांती, झोप, ग्लानी, प्रार्थना चालू असताना मोठ्याने किंवा असभ्यपणे हसणे आणि समागम यांपैकी एखादी गोष्टही घडली तर माणूस अपवित्र होतो आणि म्हणून त्यानंतर प्रार्थनेपूर्वी स्नान केले पाहिजे.

अनुक्रमणिका

आजारामुळे एखाद्या माणसाला स्नान किंवा वुजूसाठी पाणी वापरता येत नसेल तर त्याला आपल्या शरीरशुद्धीसाठी माती वापरता येते (तयम्मूम). पाणी दूर अंतरावरच्या विहिरीत असेल व ते काढण्यासाठी साधन नसेल किंवा जीवाला धोका असेल अथवा पाण्याचे दुर्भिक्ष असेल आणि शेजारी तहानेने मरत असेल तर आपल्याजवळील पाणी त्या तहानलेल्या माणसाला न देता ते स्नानासाठी वापरले तर परमेश्वराचा कोप होतो. पाण्याची वरीलसारखी अडचण असेल तर शरीरशुद्धीसाठी मातीही वापरता येते. पण पाणी असल्यास मातीचा वापर करणे बरोबर नसते. मातीने पुढीप्रमाणे शरीरशुद्धी करतात. प्रथम तो माणूस अरबी भाषेत पुढील प्रतिज्ञा घेतो: ‘मी प्रतिज्ञा करतो की मी स्नान अथवा वुजूसाठी पाण्याऐवजी मातीचा वापर करतो आणि प्रार्थनेसाठी माझ्या शरीराचे मालिन्य जावे म्हणून मी ते स्वच्छ करतो.’ नंतर तो हातात माती किंवा वाळू घेतो व ती झटकून टाकतो व हातांनी तोंड पुसतो. यानंतर पुन्हा मातीला हात लावून डाव्या हाताने उजवा व उजव्या हाताने डावा हात पुसतो. कुराणात ही पद्धत अधिकृत म्हणून सांगितली आहे. ‘आणि तुम्ही अशुची असाल तर शुचिर्भूत व्हा; तुम्ही आजारी किंवा प्रवासात असाल, शयनगृहातून आले असाल अथवा तुम्ही स्त्रीसंग केला असेल आणि पाणी नसेल तर स्वच्छ वाळू घेऊन तिने तुम्ही तुमचा चेहरा व हात घासा.’ [कुराण ५:९]

परमेश्वराचे भक्त असणाऱ्या लोकांना इशारा म्हणून आणि मुक्तीसाठी पळत या असा कळकळीचा उपदेश म्हणून प्रार्थनेला पाच वेळी हाक (अझाॅं, बांग) दिली पाहिजे अशी प्रेषितांची आज्ञा होती. ही हाक प्रत्येकाने अत्यादरपूर्वक ऐकली पाहिजे. ही हाक कानी पडताच एखादा माणूस चालत असेल तर त्याने जेथल्या तेथेच थांबावे, निजला असेल तर उठून बसावे आणि हाक देणाऱ्याला योग्य शब्दांत, उदाहरणार्थ, मी परमेश्वराच्या नियंत्रणाची वाट पाहात आहे असे प्रत्युत्तर द्यावे.

प्रार्थनेसाठी बोलावणे आरंभी अगदी साधे म्हणजे, ‘सार्वजनिक प्रार्थनेस या’ असे होते. जेरूसलेमहून मक्केला किबला बदलण्यात आल्यावर प्रार्थनेसाठी अधिक औपचारिक बोलावणे असावे असे मुहंमदाला वाटले. तेव्हा काही जणांनी ज्यूंची तुतारी तर काहींनी ख्रिस्ती घंटा सुचविली. पण यांपैकी एकाचाही आवाज प्रेषितांच्या कानाला गोड वाटला नाही. यानंतर अझाॅं अस्तित्वात आला. याचे मूळ दैवी आहे असा हदीसचा दावा आहे- त्यानुसार प्रार्थनेसाठी बोलावणे कसे असावे याची चर्चा चालू असताना एका माणसाला असे स्वप्न पडले की, हिरवे कपडे घातलेला एक माणूस हातात घंटा घेऊन जात आहे. प्रार्थनेवर निष्ठा असणाऱ्यांना जमविण्यासाठी ती उपयोगी पडेल असे त्या माणसाला सांगून त्याने ती विकत घेण्याचे ठरविले. तो अपरिचित माणूस त्याला म्हणाला की, मी तुला यापेक्षा चांगला मार्ग दाखवतो. तो मार्ग असा की एखाद्या माणसाला पुढीलप्रमाणे मोठ्याने बोलण्यास सांगावे-’परमेश्वर श्रेष्ठ आहे, परमेश्वराशिवाय दुसरा कोणी देव नाही, प्रेषित महंमद हा ईश्वराचा प्रेषित याची मी ग्वाही देतो, प्रार्थनेला या, मुक्तीसाठी या, परमेश्वर श्रेष्ठ आहे.’ झोपेतून जागा झाल्यावर तो माणूस सरळ महंमदाकडे गेला आणि त्याने आपणाला पडलेले स्वप्न सांगितले. प्रेषितांना ती परमेश्वराची आज्ञा वाटली म्हणून त्यांनी आपला निग्रो सेवक बिलाल याला ती परमेश्वराची आज्ञा आमलात आणण्याचा हुकूम केला. अंधार असताना तो मशिदीशेजारच्या एका भव्य घराच्या छतावर चढला आणि पहाट होण्याची वाट पाहू लागला. प्रकाशाचा पहिला किरण दिसताच बिलालने आपल्या पहाडी आवाजाने परमेश्वरी आज्ञेला जोडून ‘प्रार्थना ही झोपेपेक्षा चांगली आहे’ हे शब्द दोनदा म्हणून लोकांना झोपेतून जागे केले. हे स्वप्न अब्दुल्ला बिन झैद अन्सारी या युवकाने पाहिले असे हदीस मानते आणि सांगते की, याच वेळेस अमीरुल मोमीनीन

‘निष्ठावंताचा नेता’ उमर उठला आणि म्हणाला ‘हे प्रेषिता! मी ही माझ्या स्वप्नात असेच पाहिले, मी आपणाला हे सांगणारच होतो परंतु अब्दुल्ला बिन झैदने हे आधीच सांगितल्याचे मला आढळून आले’.

प्रार्थनेसाठी हाक देण्याची पद्धत पुढीलप्रमाणे आहे. प्रार्थनेच्या ठरलेल्या वेळी जो माणूस सर्वप्रथम मशिदीत येतो तो किंवा मुअज्ज़ीन (पश्चिम हिंदुस्थानात बांगी) या नावाने ओळखला जाणारा माणूस मशिदीसमोरच्या उंच चबुतऱ्यावर किंवा मिनारवर कानात बोटे घालून मक्केकडे तोंड करून उभा राहतो आणि लागोपाठ चार वेळा ‘परमेश्वर श्रेष्ठ आहे’ (अल्लाहूअकबर), दोनदा ‘परमेश्वराशिवाय दुसरा ईश्वर नाही याची मी ग्वाही देतो’ (अश्शदू अन ला इलाह इलल्लाह) असे म्हणतो. तसेच ‘महंमद हे ईश्वराचे प्रेषित आहेत याची मी ग्वाही देतो’ असे म्हणतो. नंतर उजव्या हाताकडे वळून तो दोन वेळेस ‘प्रार्थनेसाठी या’ (हय्या अल-सलाती) आणि डाव्या हाताकडे वळून दोन वेळेस ‘मुक्तीसाठी या’ (हय्या अल फलाह) असे म्हणतो. आणि नंतर दोन वेळेस ‘परमेश्वर श्रेष्ठ आहे’ असे म्हणून तो हे बोलावणे संपवतो. शेवटी एकदा तो ‘परमेश्वराशिवाय दुसरा ईश्वर नाही’ (ला इलाह इलल्लाह) म्हणतो. प्रातःकालच्या प्रार्थनेसाठी हाक देताना ‘मुक्तीसाठी या’ या शब्दानंतर ‘प्रार्थना झोपेपेक्षा चांगली आहे’ (अस्-सलातु खैरू मिना-त्नौमी) असे अधिक शब्द उच्चारतात. शिया ‘शुभकार्यास या’ (हय्या अल-खैरी-ल-अमली) असे शब्द अधिक जोडून यात किरकोळ बदल करतात, तसेच ‘परमेश्वराशिवाय दुसरा ईश्वर नाही’ हे शेवटचे वाक्य ते सुन्नीप्रमाणे एकदा उच्चारण्याऐवजी दोनदा उच्चारतात. तो मुअज्ज़ीन क्षमायाचना म्हटल्यानंतर आपले हात चेहऱ्यावर फिरवतो. हे झाले म्हणजे त्याचे प्रार्थनेसाठी हाक देण्याचे कार्य संपते. अशुची, दारुड्या, वेडा माणूस व स्त्री यांनी प्रार्थनेसाठी हाक देणे अवैध आहे. काही ठिकाणी तर बांगी म्हणून आंधळा माणूस अधिक पसंत करतात. कारण तो मिनारच्या शिखरावरून शेजारच्या घरातील स्त्रियांच्या खोल्यांत डोकावून पाहू शकत नाही.

प्रार्थना (सलात, नमाज) हे इस्लामचे दुसरे मूलतत्त्व आहे. परमेश्वराने पाच वेळा प्रार्थना म्हणण्याचा आदेश दिला आहे आणि तो वुजू करून ठरलेल्या वेळी प्रार्थना म्हणतो, त्यांचे नियम तंतोतंत पाळतो, त्याला न्यायदानाच्या दिवशी क्षमा केली जाईल असे आश्वासन दिले आहे.

प्रार्थना करताना दोन्ही हातांचे तळवे गुडघ्यांवर ठेवतात व डोके खाली झुकवतात. प्रार्थनाकाल व त्यावेळी आवश्यक असे प्रणिपात खाली दिले आहेत: (१) पहाटेपासून सूर्योदयापर्यंत – चार प्रणिपात. पैकी सुन्नतप्रमाणे दोन वेळा व दोन वेळा आवश्यक म्हणून. (२) माध्यान्हाहून सूर्य कलल्यानंतर—बारा प्रणिपात, पैकी चार सुन्नत म्हणून, चार फर्ज व दोन ऐच्छिक. (३) दुपारची प्रार्थना—आठ प्रणिपात. चार सुन्नत म्हणून व चार फर्ज म्हणून. पण सुन्नतच्या चार फार थोडेजण म्हणतात. बहुसंख्य लोक आवश्यक अशा प्रार्थना म्हणतात. (४) सूर्यास्तानंतर—सात प्रणिपात. पैकी तीन फर्ज, दोन सुन्नत व दोन ऐच्छिक. (५) रात्रीची प्रार्थना—सतरा प्रणिपात. यांपैकी चार बहुसंख्य लोक वगळतात. सर्वसामान्यपणे चार फर्ज म्हणून, दोन सुन्नत म्हणून, दोन ऐच्छिक म्हणून, तीन विशेष म्हणून (वाजिबुलवतर) आणि दोन दुःखपरिहार (तशफ्फलवतर) म्हणून, असे तेरा प्रणिपात करून प्रार्थना म्हणतात.

प्रार्थनेचा विधी पुढीलप्रमाणे असतो: — प्रार्थना करणारा माणूस प्रार्थनेच्या चटईवर (मसल्ला, जा-इ-नमाज, सज्जादा) किबला किंवा मक्केकडे [मूळ किबला जेरुसलेम होता. तो मक्केला बदलला. यासाठी पहा, मूईर, लाइफ. १८४] तोंड

करून उभा राहतो. क्षमायाचनेची प्रार्थना (इस्तिफगर) आणि दोन फर्ज प्रार्थना म्हणतो. आपला उद्देश (नियत) जाहीर करतो: 'मक्केकडे तोंड करून अंतःकरणपूर्वक फक्त परमेश्वराच्या, या सकाळी (अथवा जी वेळ असेल ती) दोन प्रणिपाताच्या (अथवा जितक्या असतील तितक्या) फर्ज, सुन्नत अथवा ऐच्छिक प्रार्थना करावयाचा माझा हेतू आहे.' अल्ला हो अकबर म्हणजे परमेश्वर श्रेष्ठ आहे हे शब्द उच्चारल्यावर तो बेंबीच्या खालच्या भागावर डाव्या हातावर उजवा हात ठेवून उभा राहतो. हे झाल्यावर तो आपली दृष्टी प्रणिपाताच्या (सिज्दा) अवस्थेत ज्या ठिकाणाला स्पर्श करावयाचा त्याच्यावर खिळवून उभा राहतो, त्याला इकडे तिकडे पाहता येत नाही; उभे असताना त्याने आपण जणू काही एका सम्राटापुढे आहोत त्याप्रमाणे अत्यादराने व दीनवाणेपणे उभे राहिले पाहिजे. नंतर तो 'मी शापित सॅटनपासून परमेश्वराचा आश्रय घेतो' (तव्वूझ); 'परमेश्वरांची नावे' (तस्मिया) : 'दयाळू कृपाळू परमेश्वराच्या नावे' म्हणतो. नंतर सुरतुल फातिहा, सुरतुल हम्द या कुराणातील पहिल्या प्रकरणाचे व त्यानंतर दुसऱ्या एखाद्या प्रकरणाचे बिस्मिल्ला न म्हणता पठण करतो. नंतर प्रार्थनेला उभे राहण्याच्या अवस्थेत 'मी परमेश्वराच्या पावित्र्याची स्तुती करतो' असे म्हणतो (रुक की तस्वीह), पुन्हा ताठ उभे राहून 'हे परमेश्वरा, तू माझा आधार आहेस' असे म्हणतो. नंतर तो प्रणिपाताच्या अवस्थेत राहून (सिज्दा) तीन-चार वेळा 'तू पवित्र व दयाळू रक्षणकर्ता आहेस' असे म्हणतो व थोडा वेळ बसतो आणि पुन्हा सिज्दा घालून पूर्वीसारखीच तस्वीह म्हणतो. इतके केले म्हणजे पहिल्या प्रणिपाताची प्रार्थना पूर्ण होते. शरीराच्या प्रत्येक नव्या अवस्थेत उभे राहिल्यानंतर 'परमेश्वर श्रेष्ठ आहे' असे म्हणणे आवश्यक आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. प्रणिपाताच्या अवस्थेतून तो सरळ उभा राहतो (कयाम) व बिस्मिल्लाह कुराणचे पहिले प्रकरण व बिस्मिल्लाहसह दुसरे एखादे प्रकरण म्हणतो, थोडासा वाकतो, नंतर खाली बसून प्रार्थनांच्या समारोपाचा भाग (अताहियात) आशीर्वच (दुरूद) म्हणून संपवतो. नंतर प्रथम उजवीकडे व त्यानंतर डावीकडे वळून 'तुम्हा सर्वांना परमेश्वराची दया प्राप्त होवो' म्हणतो. मुसलमान लोक प्रार्थनेच्या समारोपानंतर 'आमीन' म्हणत नाहीत. पण फातिहा म्हटल्यानंतर ते न चुकता तसे म्हणतात. तसेच क्षमायाचनेच्या प्रार्थनेनंतर जमाव 'आमीन' असे म्हणतो. प्रार्थनेच्या समारोपानंतर तो क्षमायाचनेची प्रार्थना (मुनाजात) करतो. ही प्रार्थना करण्याची पद्धत पुढीलप्रमाणे आहे—दोन्ही हात मनगटापासून जोडून, पुढे धरून अर्धमिटल्या डोळ्यांनी आपल्या पापांची कबुली देऊन तो क्षमायाचना करतो. तसेच आपणाला नरकाच्या त्रासाचे भय वाटते, सैतानाच्या त्रासापासून आपले रक्षण कर अशी परमेश्वराला विनंती करतात. ही विनंती किंवा मागण्यासाठी किंवा मान्यता पावलेल्या प्रार्थनेतील सदर प्रसंगाला अनुरूपे असे वाक्य उच्चारतात किंवा आपणाला येत असलेल्या भाषेतील शब्दांचा वापर करून आपले मागणे मागतात. नंतर आपल्या चेहऱ्यावर हात फिरवून दुसरी प्रार्थना पूर्ण करतात.

चार प्रणिपातांच्या प्रार्थना करण्याचे कबूल केले असेल तर त्या किरकोळ बदलाने पुढीलप्रमाणे करतात. आधी वर्णन केल्याप्रमाणे पहिल्या दोन प्रार्थना करण्यात येतात. फक्त फरक इतकाच की 'अताहियात' दुसऱ्या प्रार्थनेत अर्धीच म्हणण्यात येते. नंतर थोडा वेळ थांबून 'दुरुद' व 'सलाम' न म्हणता तिसरी प्रार्थना म्हणतात. ही पहिलीची नक्कल असते पण तिची सुरुवात 'तस्मिया'पासून करतात व 'सुन्ना' व 'तव्वूज' वगळतात. पहिली प्रार्थना सोडून नंतरच्या प्रार्थनांत 'सुन्ना' व 'तव्वूज' वगळतात. तिसरी व चौथी प्रार्थना पहिल्या दोनप्रमाणेच करतात पण यावेळी समारोपाची 'अताहियात' सगळी प्रार्थना म्हणतात. वरील चार प्रणिपातांना सुन्नतचे प्रणिपात म्हणतात.

अनुक्रमणिका

फर्जच्या तीन प्रणिपातांच्या प्रार्थनेत पहिल्या दोन आधीच्या सारख्याच असतात. फक्त अलहम्दनंतरचे प्रकरण वगळतात. तिसऱ्या प्रणिपातात सगळी ‘अताहियात’ म्हणतात आणि ‘सलाम’ म्हणून प्रार्थना संपवतात.

फर्जच्या चार प्रणिपातांच्या प्रार्थनेत थोडा फरक आहे. तो असा की पहिल्या दोन प्रणिपातांच्या वेळी कुराणचे पहिले प्रकरण पठण केल्यावर एखादे दुसरेही प्रकरण मागील प्रकाराप्रमाणेच म्हणावे लागते. तिसऱ्या व चौथ्या वेळी ते वगळतात आणि शिवाय त्या सुरू करण्यापूर्वी लागोपाठ चार वेळा कलमा म्हणतात.

रात्रीच्या प्रार्थनेच्या (इशा), ‘विशेष’ किंवा ‘ऐच्छिक’ प्रार्थनेच्या तिसऱ्या प्रणिपातात कुराणचे पहिले व दुसरे एखादे प्रकरण म्हटल्यानंतर, वाकून उभे राहिल्यावर अंगठ्यांनी कानाच्या पाळ्यांना स्पर्श करून ‘परमेश्वर श्रेष्ठ आहे’ असे मोठ्याने म्हणतात. नंतर दोन्ही हात बेंबीवर ठेवून ‘अत्यादराची प्रार्थना’ (दुवा-अल-कनूत) म्हणतात. नंतर सिज्दा घालून आशीर्वच म्हणत प्रार्थना संपवतात.

वयात आलेल्या आणि सारासार विवेक असलेल्या प्रत्येक स्त्रीपुरुषाने नेमलेल्या पाच वेळा प्रार्थना म्हटल्या पाहिजेत अशी ईश्वरी आज्ञा आहे. प्रार्थनेच्या वेळी स्वच्छ ठिकाणी प्रार्थनेची चटई अंथरून पश्चिमेकडे तोंड करून प्रार्थना केली पाहिजे. प्रार्थना स्थळासमोर रस्ता असेल किंवा येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या गर्दीमुळे प्रार्थनेत अडथळा येण्याची शक्यता असेल तर प्रार्थनेतून आपले लक्ष विचलित होऊ नये म्हणून दोन फूट लांबीची काठी, तलवार इत्यादी जमिनीत ‘संरक्षणाची खूण’ (सत्र) म्हणून पुरावी अथवा चटईसमोर ठेवावी. प्रार्थनेकडे कधीही दुर्लक्ष करू नये. एखाद्या आजारी माणसाला उभे राहून प्रार्थना करणे शक्य नसेल तर त्याने ती पडल्या पडल्या म्हणावी. तसेच एखाद्या आजारी माणसाला शब्द उच्चारण्याचाही त्रास होत असेल तर त्याने मनातल्या मनात प्रार्थना म्हणावी. अर्थात पवित्र व धर्मनिष्ठ लोकच हे नियम पाळतात. हे नियम तंतोतंत पाळणारा माणूस क्वचितच आढळतो. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आज्ञा पाळाव्या लागत असल्यामुळे एखाद्याला ठरलेल्या वेळी प्रार्थना म्हणता येत नसेल तर इतर सोयीस्कर वेळी ती म्हणावी पण तिच्याकडे दुर्लक्ष करू नये. प्रवाशालासुद्धा त्याची इच्छा असेल तर फर्जच्या चार प्रणिपातांच्या प्रार्थना दोनच म्हणून तो कमी करू शकतो पण सुन्नतच्या प्रणिपातांच्या प्रार्थना कमी करता येत नाहीत. पण दोन किंवा तीन प्रणिपातांच्या प्रार्थना मात्र त्याने टाळू नये. तीन दिवस व तीन रात्रींच्या प्रवासावर असलेल्या प्रवाशालाच ‘प्रवासी’ ही संज्ञा प्राप्त होते.

‘मुनाजात’ म्हटल्यानंतर काहीजण परमेश्वराची स्तुती (तस्बीह) करतात. ती पुढीलप्रमाणे:- ‘मी जी जी स्तुती करतो ती परमेश्वर ऐकतो, हे माझ्या रक्षणकर्त्या, मी तुझा आभारी आहे.’ असे करणे चांगले असते म्हणजे फायद्याचे असते (मुस्ताहब) पण न केल्यास पाप लागत नाही. जपमाळेच्या साह्याने (तस्बीह) प्रार्थना करणे चांगले असते. पण ही अलीकडील काळातील नूतन पद्धत आहे. ही काही विशिष्ट संतांनी सुरू केलेली आहे; प्रेषित किंवा त्यांच्या सहकाऱ्यांनी सांगितलेली नव्हे. ते सत्पुरुष कलमा किंवा दुरुद म्हणताना एकदा, दोनदा अथवा शंभर वेळाही जपमाळेचा वापर करतात.

## प्रकरण बारावे

# नवस व देवोपहारः काही भारतीय मुस्लीम संत

नवस करणे, देवोपहार आणि अर्पण करणे यांचे विविध प्रकार आहेत. (नझ्र ओ नियाज) शिया व सुन्नी या दोन्ही शाखांच्या स्त्रीपुरुषांचा अशा गोष्टीवर विश्वास असतो. आपली इच्छा फलद्रूप झाल्यास आपण परमेश्वर, प्रेषित, त्यांचे सहकारी अथवा वली किंवा संत यांच्या नावाने भेट वस्तू, उपहार देऊ असा नवस बोलतात. उदाहरणार्थ, एखाद्याचा आजार बरा झाला, हरवलेली मेंढी सापडली, नोकरी मिळाली, मूल झाले, शत्रूचे नुकसान किंवा मृत्यू झाला, धनी प्रसन्न झाला किंवा बढती मिळाली तर अशा वेळी विशेष प्रकारे नवसाची पूर्ती करतात आणि खास मेजवानी देतात. त्याची काही उदाहरणे खाली दिली आहेत.

नझ्र-ए-अल्ला म्हणजे परमेश्वरासाठी उपहार देणे. यात मित्र, गरीब लोकांस अन्न देणे, धान्य देणे, मेंढी बळी देणे आणि पैसे दान करणे या बाबी समाविष्ट आहेत. काही स्त्रिया गोड पदार्थ तयार करतात, त्यावर फातिहा म्हणतात व ते वाटून टाकतात; परमेश्वराच्या नावे फातिहा म्हणणे आवश्यक नसते. फक्त नवस बोलताना तो परमेश्वराच्या नावे आहे असे म्हणणे पुरेसे असते. फक्त अडाणी लोकच फातिहा म्हटल्याशिवाय हे अन्न खात नाहीत. अशा गोड पदार्थांना 'दयाळू परमेश्वरासाठी उपहार' (अल्लाह रहम की पिंडीयाँ) किंवा नुसते 'दया' (रहम) असे म्हणतात. पुष्कळ लोक असे गोड पदार्थ तयार करतात व रात्रभर नृत्य, गायन करून जागरण करतात.

काही स्त्रिया लग्नाच्या वेळी पीर शिताब संताच्या नावे अन्न शिजवतात. यासाठी एक सुहासिनी किंवा विधवा स्त्रीला न्हावू घालून, चांगले कपडे लेववून, नऊ, अकरा किंवा एकोणीस गाठी पाडलेला दोरा तिच्या हाती देऊन तिला कुटुंबाचे मित्र आणि सर्व आप्तांच्या घरी भिक्षा मागण्यास पाठवतात. प्रत्येक घरी आल्यावर ती "मी पीर शिताब यांच्या गाठी सोडणार आहे" असे मोठ्याने म्हणते, नंतर त्या घरची माणसे तिच्या ओटीत थोडे तांदूळ टाकतात आणि त्यानंतर ती एक गाठ सोडते. अशा रीतीने सगळ्या गाठी सोडून झाल्यावर ती यजमानिणीला गोळा झालेले तांदूळ देते. यजमानीण ते शिजवून त्याचे गोळे करते आणि ज्यांनी तांदूळ वाढले त्यांच्या घरी प्रत्येकी एक गोळा पाठविते. काही स्त्रिया पिर मिलाओच्या नावे गहू आणि डाळीच्या पोळ्या (मोठी) करून त्यावर फातिहा म्हणून घरातल्या माणसांनाच देतात; बाहेरच्यांना वाटीत नाहीत. काही एका खोलीच्या कोपऱ्यात कुंड खोदतात, त्यात खुजाने हातावर पाणी टाकून हात धुतात. नंतर ते अन्न व जेवणीचा उरलेला भाग त्यात टाकून मातीने बुजवतात. किंवा पीर दिदार या संताच्या नावे एका मडक्यात दहीभात भरतात. काहीजण कठ बाबा साहिब यांच्या नावाने कोंबडा शिजवतात, भाकरी करतात. त्यावर फातिहा म्हणून ते अर्पण करतात व मग लोकांना वाटून टाकतात.

काही स्त्रिया आपल्या मुलाच्या डोक्यावरील केसाच्या एक ते पाच बटा (चोंटी) न कापता एखाद्या संत किंवा वलीच्या नावाने तशाच ठेवतात. त्या बटा ठेवताना पुढील शब्द म्हणतात—"मी ह्या अमक्या अमक्याला अर्पण करते, मूल अमुक वयाचे झाल्यावर मी अन्न शिजवीन, त्यावर फातिहा म्हणून मगच न्हाव्याकडून ते केस कापून घेईन."

अनुक्रमणिका

दक्षिणेतील काही मुस्लीम स्त्रिया, त्यांनी बोललेला नवस पूर्ण झाल्यावर पुढे ख्वाजा खिजरच्या विधीत वर्णन केल्याप्रमाणे, पाण्यात लहान नावा सोडतात. किंवा कणिक वा मातीचे दिवे करून त्यात तुपात भिजलेल्या वाती ठेवून ते मातीच्या किंवा पितळेच्या ताटात पेटवून ठेवतात. त्या ताटात शंख, पैसेही ठेवतात. यानंतर ही ताटे घेऊन समुद्र, नदी किंवा विहिरीवर जातात आणि त्यावर फातिहा म्हणून त्या वस्तू तेथेच ठेवतात. या स्त्रिया रस्त्याने जात असताना दुकानदार, रस्त्यावरील लोक त्या ताटात कवड्या टाकतात. फातिहा म्हणून त्या वस्तू तेथे ठेवल्यावर पैसे मिळविण्यासाठी मुलांची धडपड चालते. स्त्रियांनी ज्या पितळी ताटात त्या वस्तू नेलेल्या असतात ती ताटे त्या घरी परत आणतात. गुजरातमध्ये अशा विधीसाठी पाणेरी (भिस्ती) लावतात.

गुजरातमध्ये स्त्रिया "बवहलीम" नावाचा नवस बोलतात. हा नवस लग्न, गर्भारपण व मुलांना धर्मदीक्षा यांच्या विधींच्या आधी फेडावयाचा असतो. यात पाच पौंड कोळशाच्या इंगळावर चालावयाचे असते. हा विधी दैवी शक्ती असणाऱ्या माणसाच्या म्हणजे फडालीच्या देखरेखीखाली करतात. अंगात आलेली एखादी स्त्री आपल्या हातात इंगळ घेऊन चिरडते व नंतर अग्निकुंडातील इंगळावरून चालते. तिला काही इजा झाल्यास या विधीसाठी शिजवलेल्या अन्नात शुद्धता व स्वच्छता यांचे नियम न पाळल्यामुळे किंवा ज्या जागी हा विधी करावयाचा ती जागा स्वच्छ न केल्यामुळे असे झाले असे मानतात. [बहलीम हे नाव संयुक्त प्रांतात बंजारा, न्हावी आणि तेली या जमातींना लावण्यात येते. परंतु गुजरातमध्ये या विधीला हे नाव कसे पडले ते ज्ञात नाही.]

काही लोक दर गुरुवारी एका द्रोणात फुले व साखर ठेवून तो ख्वाजा खिजर यांच्या नावाने पाण्यात सोडतात, तसेच काही कवड्याही पाण्यात फेकतात. तराफा सोडण्याचा सण (बेरा) मुस्लीम वर्षाच्या शेवटच्या गुरुवारी केला पाहिजे. पण पूर्व बंगालमधील मुसलमान तो भाद्रपद या हिंदूंच्या महिन्याच्या शेवटच्या गुरुवारी करतात. तराफा सामान्यतः कागदाचा करतात. त्यावर बेगड लावतात. त्याचा तोंडाकडील भाग स्त्रीच्या चेहऱ्यासारखा असतो. तुरा आणि पोटाचा भाग मोरासारखा असतो. ही प्रतिमा म्हणजे सणाच्या वेळी गंगा नदीत सोडण्यात येणाऱ्या मोरपंखी बोटीचे अनुकरण असते. ही प्रतिमा केळीच्या पानांच्या तराफ्यावर ठेवून सूर्यास्ताच्या वेळी पाण्यावर सोडतात. हा उत्सव मुर्शिदाबाद येथील भागीरथी नदीवर विशेष प्रमाणात आढळतो. हा तराफा सोडणारी व्यक्ती नदीच्या काठावर आल्याचे तुकडे, तांदूळ, केळी ठेवते. या वस्तू सामान्यत्वे भिकारी पळवतात. काही ठिकाणी गरीब लोक मातीच्या थाळीत शंभर विड्याच्या पानांचे दोन जुडगे त्यात प्रत्येकी पोफळीच्या पाच सुपाऱ्या, केळीच्या पानात गुंडाळून थोडी साखर, तुपाने भरलेले दोन दिवे, पाच, नऊ किंवा एकवीस कवड्या ठेवलेले पाण्याचे रिकामे भांडे ठेवतात व नदीकिनाऱ्यावर जातात. तेथे गेल्यावर दिवे प्रज्वलित करतात आणि मुल्लाला ख्वाजा खिजरच्या नावे फातिहा म्हणायला लावतात. त्याला दक्षिणा म्हणून त्या कवड्या देतात. पाण्यात ताट सोडल्यावर त्यातील वस्तू मिळविण्यासाठी लहान मुले धडपडतात. शेवटी नवस फेडणारी व्यक्ती रिकाम्या पाण्याचे भांडे पाण्याने भरून घरी नेते आणि त्यातील पाणी पिऊन आपला उपवास सोडते. संत किंवा इतर सत्पुरुषांच्या नावे मुलाच्या अंगावर अलंकार घालताना असेच करतात.

एखादी व्यक्ती प्रवासाला निघणार असेल अथवा तिच्यावर संकट आले तर एका फडक्यात तांब्याचे नाणे किंवा धातूची अंगठी बांधून ते फडके इमाम जामीनच्या नावे हळदीत बुडवतात व डाव्या दंडावर बांधतात. ही सर्वसामान्य अशी रूढी आहे. प्रवासी जेव्हा आपल्या मक्कामाला पोचतो किंवा त्याच्यावरचे संकट दूर होते

तेव्हा तो ते नाणे काढून टाकतो आणि त्यात काही पैसे मिसळून मिठाई विकत घेतो व या संताच्या नावे फातिहा म्हणतो. विद्वान माणसे परमेश्वर, प्रेषित यांच्यासाठी भेटी देतात किंवा हजरत शाह, अली, संत, पीर, दस्तगीर यांच्या नावाने फातिहा म्हणतात. पण इतर उपहार, जसे रधुलीच्या संत अब्दुल हकच्या नावे 'प्रवासातील तरतूद' (तोशा) देतात. ते गोड पदार्थ करतात. विशेष धर्मनिष्ठ लोक तर हे पदार्थ स्वतःच तयार करतात व खातात; तंबाखू ओढणारे पुरुष आणि स्त्रिया यांना हे पदार्थ कधीही देत नाहीत. याचप्रमाणे शाह शरफ बू अली कलंदर, शाह शरफुद्दीन याह्या मुनारी, अहमदखान व मुबारीजखान या संतांच्या नावे अन्न शिजवतात व वाटतात.

'गुहेतील साथीदार'—सात निद्रिस्त (अशाबुल काफ) यांच्या नावेसुद्धा भेटी (तोशा) देतात. असे म्हणतात की, अलीख, मक्सलीमत, तब्यनस, कशफुतात, अदरगत, युनूस आणि युआनूस ही इस्रायलची सात सद्‌गुणी मुले होती. त्यांचे परस्परांवर निःसीम प्रेम होते, त्यांच्याजवळ कितमीर या नावाचा एक प्रेमळ कुत्रा होता. मुसलमान, या सातजणांच्या नावे सात ताटांत अन्न घेतात, त्यावर फातिहा म्हणतात आणि त्यातील थोडे खाऊन उरलेले वाटून टाकतात. कुत्र्यासाठी एक ताट राखून ठेवतात. ते ताट या ताटांबरोबर ठेवीत नाहीत तर एखाद्या कुत्र्यापुढे ठेवतात.

शिया मुसलमान निशाणधारक (अलंबरदार) अब्बास अली या हुसेनच्या सावत्र भावाच्या नावाने न्याहरीचे अन्न (हाजिरी) शिजवतात व वाटतात. पण हे अन्न शिया मुसलमानाशिवाय कोणाला देत नाहीत. खरे म्हणजे ते फातिहा म्हटल्यावर अन्न खाण्यापूर्वी प्रेषितांच्या 'सहकाऱ्यांना' शिवीगाळ करतात. बहुसंख्य स्त्रिया इमाम जफर-अस-सादिक या सहाव्या इमामच्या नावे अन्न वाटतात. काही स्त्रिया बिबी फातिमा यांच्यासाठी अन्न शिजवतात (कंदुरी) हे अन्न गुपचूपपणे शिजवतात. याचे कारण हे स्त्रीचे अन्न असल्यामुळे ते पुरुषांनी पाहू नये हे आहे. हे अन्न पवित्र अशा स्त्रियांनाच देतात. या अन्नावर फातिहाही पडद्याआडच म्हणतात. काही वेळा स्त्रिया मागे लग्नविधीत वर्णन केल्याप्रमाणे 'बिबी की सहनक', 'बिबीका बासन' या नावाचा विधीसुद्धा करतात. काही स्त्रिया संत दावलशाहच्या [शाह दावल ही अब्दुल लतिफची उपाधी होती. तो गुजरातच्या महंमद बेगडाच्या(१४५९-१५११) एका सरदाराचा मुलगा होता. त्याची उपाधी दौरुल मुल्क, 'राज्याचा अधिपती' ही दावल शाहमध्ये बदलण्यात आली . तो शाह आलम बुखारीचा शिष्य झाला आणि १४७४ मध्ये मारला गेला. त्याने धर्मयुद्धात (जिहाद) भाग घेतला आणि गुजरात व दख्खनमधील मुसलमान व हिंदू दोन्ही त्याला अतिशय मानतात. या ठिकाणी त्याचे अनुयायी पुष्कळ हिंदू रूढी पाळतात.] नावे अन्न देतात. यातील काही भाग भिक्षा मागून गोळा केलेला असतो; तर काही स्त्रिया त्यांच्या सन्मानार्थ बकरी बळी देतात.

काही लोक, त्यांच्यावर संकट आल्यास आपल्या बायकामुलांसह निळ्या रंगाचे कपडे घालून भिक्षा मागतात व भिक्षेच्या अन्नावरच राहतात. त्यांच्यावरची संकटे नाहिशी झाल्यावर ते घरी जातात आपल्या ऐपतीनुसार नवस फेडतात.

काही अधार्मिक (देवनिंदक) स्त्रिया एक ठराविक दिवस निश्चित करतात, पुरुषाचे कपडे घालून रात्रीची बैठक करतात. या बैठकीत डोंब जातीच्या स्त्रियांना पखवाज किंवा ढोलक वाजविण्यासाठी बोलावतात. त्या यावेळी फुले, सुगंधी द्रव्ये, मिठाई इत्यादी वस्तू जमवतात. नंतर एखाद्या स्त्रीच्या अंगात शेख सद्‌दू [शेख सद्‌दू-ज्याचे खरे नाव मोहियुद्दीन होते-हे एक अपवित्र व्यक्तित्व होते. त्याचे शेवटी जिनकडून तुकडे करण्यात आले. तो स्त्रियांचा आवडता संत आहे. (श्रीमती मीर हसन अली, ३७५ तळटीप; क्रूक, पॉप्युलर रिलिजन, १·२१७; डबिस्तान् ३·२३४; इंडियन ॲंटिक्वेरी, ३४·१२५ तळटीपा;

रोझ, १:६३८).] संचरतो व ती झुलू लागते. ज्या स्त्रियांना मागणे मागावयाचे असते त्या, अंगात आलेल्या स्त्रीला ते कसे प्राप्त करून घ्यावे असे विचारतात. उदाहरणार्थ, अशी एखादी स्त्री म्हणते, 'मियाँ, मला मूल व्हावे म्हणून मी स्वतःला तुला अर्पण करते'. अंगात आलेली स्त्री तिची मर्जी असेल त्या मागणी करणाऱ्या स्त्रीला आपला उष्टावलेला विडा (उगल) व थोडी मिठाई देते. यावर ती स्त्री पूर्ण श्रद्धा ठेवून खाऊन टाकते. खरे म्हणजे परमेश्वर सगळ्यांचा मालक आहे, एखाद्या स्त्रीला मूल होणे, न होणे त्याच्या मर्जीवरच अवलंबून असते पण या अडाणी स्त्रियांना ते समजत नाही. योगायोगाने अशा रीतीने मूल झाल्यास या स्त्रियांचा या जादूटोण्यावर विश्वास बसतो आणि त्या पूर्णपणे परमेश्वराबद्दल अश्रद्ध बनतात. मूल न झाल्यास शेख सद्दू आपणावर रुष्ट झाला असे त्या मानतात आणि अधिक भोळेपणाने हा विधी पुन्हा करतात. शेख सद्दूवर विचारी लोकांचा विश्वास नाही. ते त्याला दैत्य मानातात. त्याची कबर, खरे म्हणजे तो ज्या जागी अदृश्य झाला ती जागा, मुरादाबाद जिल्ह्यातील अमरोहा येथे आहे, तेथे सदैव गोंगाट असतो.

याशिवाय इतर काही गोष्टींवर श्रद्धा ठेवणारे लोक आहेत. दक्षिण हिंदुस्थानातील मुसलमानांचा दुष्ट भुते, पऱ्या, देवी यांच्यावर विश्वास असतो; कारण, त्यांच्यापैकी बहुसंख्य हिंदुधर्मातून इस्लाममध्ये आलले असतात. परमेश्वर अशा लोकांचे तोंड काळे करो! शिवाय काहीजण आपल्या इच्छा पूर्ण व्हाव्या म्हणून सम्राट शिकंदरची भक्ती करतात, त्याला जू-उल-कारनैन म्हणजे दोन शिंगांचा असे एक नाव आहे. आणि आपल्या इच्छा पूर्ण झाल्यावर त्याच्या नावे घोडे अर्पण करू असा नवस बोलतात. त्यांचा नवस फलद्रूप झाल्यास ते मातीच्या खेळण्यातील घोडे घेऊन मोठ्या थाटामाटाने त्याच्या कबरीजवळ जातात व अर्पण करतात. अशा ठिकाणी खेळण्यातील घोड्यांचे ढीग पडलेले दिसतात. काहीजण तर असे घोडे आपल्या घराच्या दरवाजावर लावतात. हिंदू व मुस्लीम धर्मातील लोकांना या श्रेष्ठ व्यक्तींबद्दल अत्यादर आहे. त्यामुळे हे व अशी ठिकाणे हिंदूंची समाधी किंवा मुसलमानांची कबर आहे हे ओळखणे कठीण जाते.

अगोदर सांगितलेल्या श्रेष्ठ व्यक्तींच्या कबरीजवळ, विशेषतः त्यांच्या उरुसाच्या वेळी भेटी देतात. अशा पुष्कळ ठिकाणी मुस्लीमांप्रमाणे हिंदूही भेटी देतात. अशा विशेष प्रसिद्ध असलेल्या व्यक्तींपैकी काही खालीलप्रमाणे आहेत.

बाबा बुदन हा फकीर होता. त्याने चौदाव्या शतकात म्हैसूरला कॉफी परिचित करून दिली. हयात कलंदर व हयातुलबहर या नावानेही तो ओळखला जातो. ज्या टेकड्यांमध्ये त्याची कबर आहे त्यांना त्याच्या नावावरूनच बाबा बुदन टेकड्या हे नाव पडले आहे.

बाबा घोर हा हबशी संत होता. गुजरातमधील हबशी सिद्दींना त्याच्याबद्दल विशेष आदर आहे.

बाबा लाल या नावाचे अनेक संत होऊन गेले. पण या सगळ्यात औरंगजेबाचा भाऊ दारा शुको याचा हिंदु गुरू विशेष प्रसिद्ध आहे.

बहाउद्दिन झिकारिया हा उत्तर हिंदुस्थानातील प्रसिद्ध संतांपैकी एक आहे. त्याचा जन्म मुलतानमधील कोटकरोड येथे इ.स. ११७० मध्ये झाला. तो बगदादला गेला आणि शेख शहाबुद्दीन सुरवर्दीचा शिष्य झाला.

त्याचा मृत्यू इ.स. १२६६ मध्ये मुलतान येथे झाला असून तेथील किल्ल्यात त्याची कबर आहे. तो शेख फरिरूद्दीन शकरगंज नावाच्या संताचा जिवलग मित्र होता.

दुला किंवा दौला शाह याचा जन्म इ.स. १५६७ च्या सुमारास झाला. तो सम्राट हुमायूनला भेटला होता अशी जी आख्यायिका आहे तीत कालगणनेची चूक आहे. कारण हुमायून इ.स. १५५६ मध्ये मृत्यू पावला. त्याची कबर पंजाबमधील गुजरात या ठिकाणी असून तेथे विद्रूप, वेडसर मुलांचा जमाव असतो, त्या मुलांना या संताचे 'उंदीर' म्हणतात.

फरिरुद्दीन शकरगंज याला शकरगंज असे नाव पडण्याचे कारण तो धूळ किंवा मिठाचे साखरेत रूपांतर करीत होता, असे म्हणतात. तो ख्वाजा कुतुबुद्दीन बख्त्यार काकीचा शिष्य होता. त्याचा जन्म ११७३ व मृत्यू १२६५ मध्ये झाला. त्याची कबर पंजाबच्या मॉंटगोमरी जिल्ह्यातील अजोदन किंवा पाकपट्टन येथे असून त्याच्या मोहरममधील उत्सवांसाठी अफगाणिस्तान व मध्य आशियातून मोठ्या प्रमाणावर भाविक येतात. जुन्या दिल्लीतील कुतुबमिनाराचे नाव त्याच्या नावावरूनच पडले.

संत सय्यद मुहंमद सुदारुद्दीन मुहंमद हुसेनी याला त्याच्या लांब केसामुळे 'गेसू दराज' असे म्हणत असत. त्याचा जन्म दिल्ली येथे इ.स. १३२१ मध्ये झाला. तो दक्षिणेत बहमनी राज्यात राहिला आणि गुलबर्गा येथे मरण पावला. त्याची कबर गुलबर्गा येथे असून तिच्या दर्शनाला त्याचे असंख्य अनुयायी जातात.

गाझी मियॉं ही सालार मसूदची उपाधी आहे. तो मुहंमद गझनीचा पुतण्या होता. त्याने अवधवर स्वारी केली होती. तो वयाच्या एकोणिसाव्या वर्षी १०३३ मध्ये बहराछ येथे युद्धात मारला गेला. मुसलमान लोक त्याला हुतात्मा म्हणून मान देतात. तर हिंदुलोकही त्याला तरुण वीरांपैकी एक म्हणून आदरणीय मानतात.

जलाल जहानिआन जहॉंगस्त (जगभर फिरलेला) हा बहावलपूर राज्यातील उछ या ठिकाणी आदरणीय मानला जातो. त्याने मक्केहून प्रेषितांच्या पावलाचा ठसा आणला आणि तो सुलतान तुगलगचा (१५३१-९०) गुरू झाला. मलंग व जलालीया फकिरांच्या परंपरांचा तो संस्थापक होय.

लाल शाहबाज हा सिंधचा प्रसिद्ध संत होता. तो कलंदर व नैष्ठिक ब्रह्मचारी होता. सेहवान येथे १२७४ मध्ये तो मरण पावला. त्याच्या कबरीला अतिशय मान असून दरवर्षी खोनवती जातीतील एका मुलीचे त्याच्या कबरीशी लग्न लावतात आणि मग तिला खरे लग्न करण्याची कधीही मोकळीक नसते.

मुंबईचा प्रसिद्ध संत मकदूम फकी हा अरबी वंशाचा होता. तो चौदाव्या शतकात होऊन गेला. ठाणे जिल्ह्यातील माहीम या ठिकाणच्या मुसलमानांचा तो काझी होता. त्याची कबर समूद्र किनाऱ्यावर असून उरुसच्या वेळी तिच्या दर्शनासाठी पुष्कळ लोक येतात. तेथे करावयाच्या विधींपैकी एक मुख्य विधी म्हणजे त्याच्या कबरीवरून ओवाळलेले पाणी पिणे व अंगारा खाणे हा होय. त्याच्या कृपाप्रसादामुळे फेफरे व पिशाचबाधा दूर होते, अशी त्याची ख्याती आहे.

मियाँ मीर शेख मुहंमद हा इ.स. १५५० ते १६३५ च्या दरम्यान लाहोर येथे भरभराटीस आला. त्याचा शिष्य मुल्ला मीर हा औरंगजेबाचा भाऊ दारा शुको याचा गुरू होता. लाहोरजवळील मियाँ मीर या लष्करी छावणीचे नाव त्याच्यावरूनच पडले.

मिराँ साहेब हा सुमारे चारशे वर्षांपूर्वी होऊन गेला. त्याने आपल्या हयातीत अनेक चमत्कार करून दाखवले असे म्हणतात. मद्रास राज्याच्या तंजोर जिल्ह्यातील नागोर येथे त्याची कबर आहे. त्याच्या उरुसाच्या नवव्या दिवशी सायंकाळी त्याच्या दरग्यात एक फकीर छत्तीस तास अचलावस्थेत बसून राहतो.

खाजा मोइनुद्दीन हसन चिस्तीचा जन्म सीस्तान येथे ११४२ मध्ये व मृत्यू अजमेर येथे १२३६ मध्ये झाला. त्याचा दरगा हे उत्तर हिंदुस्थानमधील महत्त्वाचे यात्रास्थान आहे. त्याच्या यात्रेसाठी अकबर पायी जात असे.

निजामुद्दीन अवलिया हा सुल्तान-उल-मशाइक ‘पवित्र पुरुषांचा प्रमुख’ म्हणून ओळखला जातो. तो शेख फरिरुद्दीनच्या श्रेष्ठ शिष्यांपैकी एक होता. त्याचा जन्म १२३६ मध्ये बुदाऊन येथे व मृत्यू १३२५ मध्ये दिल्ली येथे झाला. दिल्ली येथे त्याच्या स्मृतीप्रीत्यर्थ सुंदर दरगा बांधण्यात आला होता.

पंज पीर (पाच संतांचा गट) यांच्यावरूनच पाच पिरीया नावाचा पंथ उदयाला आला. त्याच्यात हिंदू व मुसलमान यांच्या संतकथांचे मिश्रण आढळते.

कुतुबुद्दीन बख्त्यार काकी हा इराणमधील उश् येथून भारतात आला व इ.स. १२३५ मध्ये दिल्ली येथे मृत्यू पावला. तो लोकप्रिय अफगाण संत आहे. दिल्लीजवळील महरोली या ठिकाणी असलेल्या त्याच्या दरग्याच्या दर्शनाला अनेक यात्रिक जातात.

शमसुद्दीन मुहंमद तबरिजी हा प्रसिद्ध सुफी हुतात्मा होता. त्याच्या अंगावरील कातडी सोलण्यात आली तेव्हा तो आपली कातडी घेऊन चालत गेला असे म्हणतात. जेव्हा त्याच्या मदतीला कोणी आले नाही तेव्हा आपले मांस भाजण्यासाठी त्याने सूर्याची प्रार्थना केली. या कामासाठी जेव्हा सूर्य खाली उतरला तेव्हा जग विनाशाच्या काठावर आले असे पाहून त्याने सूर्याला स्वर्गात परतण्याची आज्ञा केली. त्याच्या अनुयायांना शम्सी (सूर्योपासक) म्हणतात. या अनुयायांच्या त्यांच्या धर्मश्रद्धेत हिंदुधर्म व इस्लाम या दोन्हींचे मिश्रण आढळते. पंजाबच्या शहापूर जिल्ह्यात शम्सपूर येथे त्याची कबर असून अनेक लोक आपले रक्त सांडण्यासाठी तेथे जातात. त्या जागी रक्ताचा वास येतो.

सुल्तान साकी सरवर हा इ.स. १२२० मध्ये सियालकोट येथे स्थायिक झाला. याच नावाच्या डेरा गाजीखान जिल्ह्यातील गावी त्याची कबर आहे. हे ठिकाण हिंदू व मुसलमान भिक्षुकांचे आश्रयस्थान आहे. त्याच्या भक्तांना सुलतानी, फिराई अथवा पिराही म्हणतात. त्याचे सेवक (मुजाविर) जमिनीवर झोपतात.

अनुक्रमणिका

## प्रकरण तेरावे

# धार्मिक इमारती व भक्तीची इतर साधने

इस्लामच्या भारतातील धार्मिक इमारती कलाकौशल्यपूर्ण आहेत. पण येथे त्यांचा विचार कलाकौशल्याच्या दृष्टीने न करता केवळ त्यांच्या धार्मिक हेतूंच्या दृष्टीने करावयाचा आहे.

दरगा (इराणी दर, 'दरवाजा', गाह, 'जागा') ही बहुधा प्रसिद्ध संताची कबर असते. या ठिकाणी त्या संताच्या उरुसाच्या वेळी यात्रिक येतात. दक्षिण हिंदूस्थानमध्ये मद्रास राज्यातील दक्षिण कनरा जिल्ह्यात मंगलोरजवळ दोन प्रसिद्ध दरगे आहेत. एक शेख फरीदचा दरगा म्हणून ओळखला जातो. हा दरगा म्हणजे सरळ उभ्या लॅटराइट खडकाची गुहा आहे. ती हैद्राबादपर्यंत म्हणजे ४५ मैल लांब आहे असे म्हणतात. ती गुहा अतिशय अंधारी असून तिच्यात शिरण्यास कोणीही धजत नाही. तसेच तिचा विस्तार किती आहे हेही ठाऊक नाही. या गुहेचे तोंड एकाच माणसाला सरपटत जाता येईल एवढेच आहे. तेथपर्यंतही दगडी पायऱ्यांवरून जावे लागते. परंपरा असे सांगते की, पीर शेख फरीद यांनी, सुमारे दोनशे वर्षांपूर्वी, एकाच जागेवर बसून चाळीस दिवसपर्यंत तपश्चर्या केली. या काळात ते काहीही खात, पीत अगर बोलत नसत. अशीच तपश्चर्या ते फक्त फरीद बुटी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वनस्पतीची पाने खाऊन कादिरी या ठिकाणीही करत असत. हे ठिकाणी मद्रास राज्याच्या कुडाप्पा जिल्ह्यात आहे. बारा वर्षांच्या शेवटी ते अदृश्य झाले. ते जमिनीखालून मक्केला गेले असे म्हणतात. असंख्य मुसलमान त्यांच्या कबरीचे दर्शन घेण्यासाठी जातात. शुक्रवारच्या सबातला अन्न शिजवून त्यावर फातिहा म्हणतात व ते अन्न नंतर फकिरांना वाटून टाकतात. हे न जमल्यास मिठाई वाटतात. या दरग्याचा रक्षक म्हणून एका पवित्र व तळमळीच्या व्यक्तीची नेमणूक करतात. ही नेमणूक कायम निवासी फकीर व त्यांचे शिष्य यांची समिती असते. टिपू सुलतानच्या काळात (१७८२-९९) येथील रक्षक मंगलोर बंदरात येणाऱ्या प्रत्येक जहाजाबद्दल एक रुपया वसूल करीत असे. पण हा त्याचा हक्क ब्रिटिशांनी रद्द केला. मंगलोर येथील दुसरा दरगा लोह लंगर शाह यांचा आहे. आपला आजार अगर दुर्दैव दूर व्हावे म्हणून हिंदू व मुसलमान त्याच्या दर्शनाला जातात. दर रात्री तेथे दिवे लावतात, अन्न वाटतात आणि नर्तिका आपल्या नृत्याने दरग्याच्या दर्शनाला येणाऱ्यांची करमणूक करतात. हा दरगा आकाराने मोठा व लांब असून त्याच्या प्रत्येक टोकाला मिनार आहेत. श्रीमंत लोक दरग्याच्या दर्शनाला वर्षातून एखादे वेळी तर गरीब आठवड्यातून अगर महिन्यातून एकदा जातात. दक्षिण हिंदुस्थान अगर उत्तर हिंदुस्थानमध्ये पुष्कळ प्रसिद्ध दरगे अथवा संतांच्या कबरी आहेत. त्यांपैकी काही पुढीलप्रमाणे आहेत—संयुक्त प्रांतात अयोध्या येथे नोआ, सेठ आणि जोब यांच्या कबरी आहेत. तसेच शाह कासिम सुलेमानी, शेख सलीम चिस्ती व कबीर यांच्या कबरी अनुक्रमे छुनार, फत्तेपूर सिक्री व मघर येथे आहेत. अजमेर येथे मोईनुद्दीन चिस्ती यांची, दिल्ली येथे शाह निझामुद्दीन अवलीया यांची, हसन अब्दाल येथे बाबावली कंधारीची, कर्नाल येथे बू अली कलंदर यांची कबर आहे. बहावलपूर राज्यात ऊछ येथे अनेक प्रसिद्ध कबरी आहेत. मध्यप्रांतात गिरार येथे ख्वाजा शेख फरीद यांची, आणि दक्षिण हिंदुस्थानात मद्रास राज्यात अट्टीगुंडी येथे बाबा बुदन यांची कबर आहे.

ज्या ठिकाणी ईद या सणाचे विधी पार पडतात त्या ठिकाणीला ईदगाह अथवा नमाजगाह (प्रार्थनास्थान) असे म्हणतात. ईदगाह सामान्यतः गावाच्या बाहेर असते. फक्त सुन्नी मुसलमानच तेथे जातात.

जमिनीवर तीन चार फूट उंच अशा दगडी चौथऱ्यावर, चौथऱ्याच्या पश्चिम बाजूने एक भिंत असते. या भिंतीच्या दोन्ही टोकांना मिनार असतात. भिंतीच्या मध्यभागी दगडी चौथाऱ्यांवर तीन चार शिला रचून एक व्यासपीठ केलेले असते. (मिम्बर) याच व्यासपीठाहून रमजान आणि बकरी ईद सणाच्या वेळी खुतबा सांगण्यात येतो. त्याच्याजवळ भिंतीत एक कोनाडा (मिहराब) असतो, तो मक्केची दिशा दाखवतो. याच्यासमोर उभे राहून प्रार्थना करतात. प्रार्थनेचा कोनाडा व मिनार हे हिंदुधर्मातून उचलेले आहेत तर मशिदीचा घुमट हा असिरियन देवळावरून उचललेला आहे असे काहीजणांचे म्हणणे आहे. [बर्टन, पिलीग्रीमेज, १·३६१; दबिस्तॉ, १·४९; एम.जस्टाव्ह, सिव्हिलीजेशन ऑफ बॅबिलोनिया अँड असिरिया, ३७९. विजापूर येथील जामी मशिदीतील मिहरबचा वृत्तांत पहा (कौसेन्स, विजापूर, ५९).] जमावाला उद्देशून उपदेश करताना प्रेषित या व्यासपीठाच्या सगळ्यात वरच्या पायरीवर उभे राहत असत तर अबुबकर दुसऱ्या व उमर तिसऱ्या पायरीवर उभे राहत असत, असे सांगतात. परंतु उस्मान यांनी मधल्या पायरीवर उभे राहूनच खुतबा सांगितला पाहिजे असे ठरविले व म्हणून तेव्हापासून हाच नियम पाळतात. 'खुतबा' सांगताना थकवा आल्यास प्रेषित आरंभी खांबाला टेकत असत. व्यासपीठाचा (मिम्बर) शोध मदिनेतील बानू नज्जार नावाच्या माणसाने लावला. त्याने शोधून काढलेले व्यासपीठ म्हणजे तीन फूट लांब व एक फूट रुंद अशी लाकडी चौकट असून तिला नऊ इंच जाडीच्या तीन पायऱ्या होत्या. प्रेषितांना खुतबा सांगताना विश्रांतीची गरज पडल्यास ते सगळ्यात वरच्या पायरीवर बसत असत. व्यासपीठाचा सध्याचा असलेला आकार हा इ.स. ७०८ मध्ये अल वलीदच्या कौशल्यपूर्ण राजवटीत प्राप्त झाला. (इ.स. ७०५ ते १४). [बर्टन, पिलीग्रीमेज, १·३६२ प्राचीन अरबियामध्ये मिम्बर ही न्यायाधीशाची खुर्ची होती. (ईआरई, १·८७५).] ईदगाहला खास असे काही पावित्र्य नाही.

इमामबारा ही विशेषतः शिया मुसलमानांची धार्मिक इमारत आहे. या इमारतीत हसन व हुसेन या हुतात्म्यांबद्दलची शोकगीते म्हणतात; तसेच तिच्यात ताबूत ठेवलेले असतात. सगळ्यात प्रसिद्ध इमामबारा लखनौ येथे असून त्याची लांबी १६२ फूट व रूंदी ५४ फूट आहे. या इमारतीचा घुमट कॉंक्रीटचा आहे. ही इमारत नवाब असफुददौलाने (इ.स.१७७५ ते ९७) बांधली.

मशीद ही अर्थातच पवित्र इमारत असते. मशीद भ्रष्ट करण्याचे जेव्हा प्रयत्न झाले तेव्हा उग्र दंगली झाल्या आहेत. परंतु अकबराने 'दीनईलाही' या धर्माची स्थापना केली तेव्हा त्याने मशिदी आणि प्रार्थनेच्या खोल्या यांचे कोठीच्या खोल्यांमध्ये रूपांतर केले, किंवा त्यांच्यावर हिंदू रखवालदार नेमले, यावरून परंपरागत इस्लामविषयीच्या त्याच्या भावना कशा होत्या हे लक्षात येते. खेड्यातील मशिदींचा अपवाद सोडल्यास, मशीद ही दगड किंवा विटांनी बांधलेली असते. तिचा आकार चौरस असतो. खेड्यातील मशिदी मात्र मातीने बांधलेल्या असतात. या इमारतीत पश्चिमेस प्रार्थना करण्याची जागा असते. मोकळ्या अंगणात मध्यभागी पाण्याचा हौद असतो. त्याचा वापर 'वुजू' करण्यासाठी करतात तर स्नानासाठी खास प्रक्षालन स्थान असते. मोकळ्या अंगणात सदैव बैरागी असतात. इमारतीच्या आच्छादित भागात पूर्वेला किंवा मक्केकडे तोंड असलेल्या भिंतीत एक कोनाडा असतो. त्याच्याजवळ व्यासपीठ असते. त्याच्या बाजूला एक काठी (आस) असते. या काठीवर धर्मोपदेशक जुन्या रूढीप्रमाणे ओणवा होतो अथवा ती हातात धरतो. साध्यात साध्या आकाराची मशीद ही जुन्या सेमेटीक देवळासारखी असते. पण बलुचिस्तानमधल्याप्रमाणे सरहद्दीवरील प्रदेशातील मशिदी म्हणजे वर्तुळाकारी ठेवलेले दगड असतात. त्यांचे तोंड पूर्वेकडे असून पश्चिमेकडील भागात एक कमान असते. हा कदाचित इस्लामपूर्व काळातील अवशेष असावा. [जनगणना अहवाल, १९११, पृष्ठ ६१. मशिदीच्या शिल्पशास्त्राबाबत पहा-ईबी. २· ४२४ तळटीप]

मशिदीच्या सर्व भिंतींना चुना दिलेला असतो. छतावर अनेक घुमट असतात. मशिदीत फक्त अल्लाची नावे अरबी अक्षरांत कोरलेली असतात, याशिवाय दुसरी कोणतीही सजावट करण्यास परवानगी नसते.

मशिदीच्या छताला दिव्याची झुंबरे लटकावलेली असतात, त्याच प्रकारे शहामृगाच्या अंड्यासारख्या चित्ताकर्षक वस्तूही लोंबत्या सोडलेल्या असतात. चित्रांचा वापरास मात्र मनाई असते. याला हिंदुस्थानच्या पलीकडील इराणसारख्या काही ठिकाणांचा अपवाद आहे. त्या ठिकाणच्या शिया राजांनी मुसा व कुराण यांनी केलेल्या मनाईला किंमत दिली नाही. अशा रीतीने कलेचा संप्रदाय स्थापन झाला व तो अकबराच्या आश्रयाने हिंदुस्थानात वाढला. पुरुष व जनावरांची चित्रे काढण्यास प्रेषितांनी शाप दिला होता. म्हणून ही मनाई अकबर व इतर मोगल सम्राटांनी मानली. सुलतान महंमदाच्या (इ.स. १६२६-५६) विजापूर येथील कबरीत-गोल घुमट—त्याच्या अमदानीत पडलेला उल्कापाषाण लटकावला होता असे म्हणतात. पण १७८९ मध्ये जेव्हा तो काढण्यात आला तेव्हा तो पाण्याने झिजलेला काचमण्याचा दगड आहे असे आढळून आले. प्रेषितांचे अत्यंत खात्रीलायक अवशेष म्हणजे त्यांच्या दोन जपमाळा, अंगरखा, काजळ ठेवण्याचे भांडे आणि लोकरी चादर हे होत. परंतु हिंदुस्थानमध्ये त्यांचे इतर अवशेष दाखवण्यात येतात. उदाहरणार्थ, विजापूर येथे केस, दिल्लीच्या जामा मशिदीत केस व वहाणा. वैशिष्ट्यपूर्ण आकाराची मशीद म्हणजे मलबारमधील मोपला लोकांची होय. ती शैवांच्या देवळासारखी असते.

स्त्रियांना मशिदीत प्रार्थना करण्यास प्रेषितांनी मनाई केली नव्हती. पण स्त्रियांनी मशिदीत प्रार्थना करण्याऐवजी खाजगीत करणे चांगले असे मानतात. कैरोमध्ये सध्या स्त्रिया व लहान मुले यांना मशिदीत प्रार्थनेत सहभागी होण्यास अगर त्यावेळी हजर राहण्यास परवानगी देत नाहीत; पूर्वी स्त्रियांना परवानगी देत असत, पण त्यांना पुरुषांच्यापासून वेगळे बसावे लागे. आग्रा येथील मोती मशीद व अहमदनगर येथील मशीद यांसारख्या हिंदुस्थानातील काही मशिदीत स्त्रियांसाठी प्रार्थनेचे सज्जे आहेत. आग्रा येथे तर खास स्त्रियांसाठीच नगिना नावाची मशीद आहे. अशा सज्जांना संगमरवरी जाळी असते त्यामुळे सज्जातील स्त्रिया दिसत नाहीत. ही जाळी म्हणजे भारतीय-मुस्लीम कलेचा अत्यंत सुंदर नमुना आहे.

मशिदीला एक किंवा अनेक मिनार असतात. काही वेळा मिनार मुख्य इमारतीपासून पृथकही असतात. या प्रकारचे सर्वोत्कृष्ट उदाहरण म्हणजे जुन्या दिल्लीतील कुतुबमिनार हे आहे मशिदीला जोडूनच मुशाफिरखाना आणि शाळाही असते. मुशाफिरखान्यात मुशाफिराला सतत तीन दिवसपर्यंत राहता येते. शाळेत मुलांना कुराण व इतर धार्मिक ग्रंथ शिकवितात. त्याशिवाय मशिदाला लागून मशिदीच्या मालकीची दुकानेही बांधलेली असतात. त्या दुकानांचा किराया मशिदीच्या खर्चासाठी वापरतात. मशिदीत कुराण ठेवण्यासाठी घडीचा स्टँड (राहील) असतो. ज्याने मशीद बांधली त्याच्या कबरीवर केव्हा केव्हा मखमल किंवा सॅटीनचे हिरवे कापड झाकतात, दिवे लावतात व तेथे कुराणचे पाठ म्हणतात. भाविक लोक मशिदीत प्रवेश करण्यापूर्वी स्वाभाविकपणे आपल्या वहाणा काढून ठेवतात. प्रार्थनेला उभे राहण्यासाठी विशिष्ट रांगांत चटया टाकतात; मोठ्या मशिदीत फरशीचे दगड यासाठी वापरले जातात. भाविक, त्यांच्यासाठी प्रार्थनेला बसण्याच्या नेमलेल्या चौरसात (मुसल्ला) प्रवेश करताना प्रथम उजवा पाय ठेवतो. मशिदीतून जाताना तो प्रथम डाव्या व नंतर उजव्या

पायात वहाणा घालतो. काही जुन्या मशिदी उदाहरणार्थ, जुन्या दिल्लीतील कुतुबमिनारजवळची ‘कुतुबुल-इस्लाम’ व अजमेर येथील ‘अढाई दिन का झोपडा’, ह्या जैन व हिंदु देवळांच्या साहित्याने बांधलेल्या आहेत.

मशिदीच्या देखभालीचा खर्च भागविण्यासाठी कधी कधी इनाम जमिनी असतात. या जमिनीच्या उत्पन्नातून आलेला पैसा हा खर्च भागविण्यासाठी वापरतात, त्याला ‘वक्फ’ (देणगी) म्हणतात. मशिदीशी कमीअधिक प्रमाणात संबंधित असलेला स्थानिक अधिकारीवर्ग पुढीलप्रमाणे असतो—काजी, पूर्वी त्याच्याकडे धर्मनिर्णयाचा अधिकार होता, पण आता त्याचा तो अधिकार समाप्त झाला आहे; खातिब (धर्मोपदेशक), क्वचित प्रसंगी तो प्रार्थनेला बोलावण्याचे व उत्तरक्रिया करण्याचे काम करतो; इमाम, प्रार्थनेचे नेतृत्व करणारा; मुजाविर किंवा फराश, मशिदीची झाडलोट करणारा; घुसाल, मृताला स्नान घालणारा; दौराबहाद्दर किंवा प्यादा, दूत व सेवक म्हणून काम करणारा. लहान मशिदीत एक माणूस नेहमी यांपैकी पुष्कळशा जबाबदाऱ्या पार पाडतो. मशिदीचा कारभार पाहण्यासाठी एक समिती असते, तिचा प्रमुख हा मशिदीचा व्यवस्थापक (मुतवली) असतो.

मुसलमान लोक वापरीत असलेली जपमाळ (तस्बीह, सुभा) [जपमाळेच्या पूर्ण वृत्तांतासाठी पहा-आयबीड. १०·८४७ तळटीपा; ह्युजेस ५४६.] शंभर मण्यांची असते. ते देवाची ‘अल्ला’ आणि इतर नव्याण्णव नावे उच्चारण्यासाठीच फक्त जपमाळेचा वापर करतात. सुरुवातीच्या काळात या कामासाठी लहान खडे वापरीत किंवा ही नावे बोटावर मोजीत असत असे म्हणतात. म्हणूनच काही वहाबी संप्रदायाचे लोक प्रेषित जपमाळ वापरीत नसत असा युक्तिवाद करतात. असे म्हणतात की, जमपाळेचा वापर मुसलमानांनी बौद्धांकडून आणि खिश्चनांनी मुसलमानांकडून उचलला; पण ख्रिस्ती लोक धर्मयुद्धांच्या किती तरी पूर्वीपासून जपमाळेचा वापर करीत आहेत. जपमाळेचे मणी टेंभुर्णी, व्रजबट्टच्या बिया, प्रवाळ, खारकेच्या आंठोळ्या, मोती, शिवधातू, फकीर व सुशिक्षित माणसे वापरीत असलेले दगडी मणी, आलीव्ह दगड (झैतुन) यापासून बनविलेले असतात. [पूर्ण तपशील वॅट यांनी दिले आहेत (इकॉन. डिक्ट. १·४२६) तळटीपा]

प्रार्थनेची चटई (जानमाज) पुढीलप्रमाणे असली पाहिजे. या चटईचा पार्श्वभूमीचा भाग हिरवा – प्रेषितांचा रंग – असला पाहिजे आणि तीवर लाल रंगासारख्या विसंगत रंगात घुमट, मिनार असलेली मशिदीची प्रतिकृती विणलेली असली पाहिजे, म्हणजे सगळे मिळून मक्का येथील काबाचे चित्र व्हावे.

## प्रकरण चौदावे

# मोहरमचा सण

मोहरम या शब्दाचा अर्थ 'निषिद्ध' व म्हणून 'पवित्र' असा आहे. मोहरम हा मुसलमानांच्या वर्षातील पहिला महिना आहे. [असे म्हटले जाते की, प्रेषितांनी मोहरमचा दहावा दिवस (आशूरा) हा उपवासाचा म्हणून निश्चित केला, परंतु नंतर तो रमजानमध्ये बदलण्यात आला. मुळात मोहरम हा पिकांच्या हंगामाची मेजवानी होती असे दिसते (ईआरई ३·१२६ ५·८८२). या महिन्याच्या प्राचीन पावित्र्याची चर्चा साल यांनी केली आहे (कुराण, प्रिलिमिनरी डिसकोर्स, ८१).] लेखकाच्या मते, या महिन्यातील याच नावाचा सण प्रेषितांच्या काळी अस्तित्वात होता आणि त्यांच्या पूर्वीचे प्रेषित तो सण साजरा करीत असत. परंतु प्रेषित महंमद यांनी आपल्या अनुयायांना दहाव्या दिवशी (आशूरा) स्नान करणे, नेहमीपेक्षा उत्तम कपडे घालणे, डोळ्यांत सुरमा घालणे, उपवास करणे, प्रार्थना म्हणणे, नेहमीपेक्षा अधिक अन्न शिजविणे, शत्रूशी मैत्री करणे, सत्पुरुषांच्या सहवासात राहणे, निराधारावर दया व दानधर्म करणे या आणखी रूढी पाळण्याचा आदेश दिला. हुतात्म्यांच्या सन्मानार्थ होणाऱ्या सणामुळे मोहरम या महिन्याला विशेष असे महत्त्व आहे.

काही ऐतिहासिक व पारंपरिक ग्रंथांमध्ये मोहमरच्या दहाव्या दिवशी खालील घटना घडल्याचे नमूद करण्यात आले आहे—प्रथम पर्जन्यवृष्टी, आदम व ईव्हचे पृथ्वीवर आगमन व मानववंशाचा प्रसार, नवव्या स्वर्गाची निर्मिती. (कुराणमध्ये परमेश्वराच्या सिंहासनाला 'अर्श' ही संज्ञा वापरली आहे), दहा हजार प्रेषितांच्या आत्म्यावर सोपविण्यात आलेले ईश्वरी प्रसाराचे कार्य, आठव्या तर काहींच्या मते नवव्या स्फटिक गोलाची निर्मिती, परमेश्वराचे न्यायासन (कुर्सी), नंदनवन (बेहश्त), सात स्वर्ग, नरक (दोझक), ईश्वरी निवाडे लिहिलेल्या पाट्या (अल-हौला-ल-महफूज) ज्या लेखण्यांनी हे निवाडे लिहिले त्या लेखण्या (कलम), दैव (तकबीर), जीवन (हयात), मृत्यू (मौत). ही सर्व निर्मिती सर्वशक्तिमान परमेश्वराने आपल्या असीम शहाणपणाने मोहरमच्या दहावे दिवशी केली.

मुसलमान सात स्वर्ग मानतात; ते उघडच टॉलेमीच्या खगोलशास्त्रावर आधारित असे आहेत—(१) दारुल जलाल (वैभवाचे घर), मोत्यांचा बनविलेला; (२) दारुल सलाम (शांतीचे घर), माणिकांचा; (३) जन्नातुल मावा (हवेल्यांचा बगीचा), हिरव्या क्रिसो लाइटचा; (४) जन्नातुल खुल्द (शाश्वताचा बगीचा), हिरव्या पोवळ्यांचा; (५) जन्नातुल नईम (आनंदाचा बगीचा, पण इंद्रिय सुखाचा स्वर्ग नव्हे), चांदीचा; (६) जन्नातुल फिरदौस (नंदनवन), लाल सुवर्णाचा; (७) जन्नातुल अदन अथवा अलकरार (शाश्वत घर), यालाच काहीजण आठवा असे म्हणतात, लाल मोती किंवा शुद्ध कस्तुरीचा; (८) जन्नातुल इल्यून (अतिभव्य).

मुसलमान सात नरकही मानतात— (१) जहन्नुम (पापक्षालनाचा नरक), ही कल्पना ज्यू व मॅजिअन लोकांकडून (हिब्रू जेहन्ना) कदाचित उचलली असावी; (२) लझा (भडकता अग्नी), ख्रिश्चनासाठी; (३) हुतमा ज्यसाठी; (४) सईर, सबियान लोकांसाठी व निराधारांची अन्यायाने संपत्ती घेणाऱ्यांसाठी; (५) सक्र (होरपळून टाकणारी उष्णता), मॅजिअन व गब्र किंवा अग्नीच्या उपासकांसाठी; (६) जहिमा (प्रखर अग्नी), पगन व मूर्तिपूजकांसाठी; (७) हाविया (तळ नसलेला, अंधारी खड्डा), ढोंगी लोकांसाठी.

अनुक्रमणिका

मुसलमान पृथ्वी आणि आकाश यांचे प्रत्येकी सात भाग आहेत असेही मानतात. पृथ्वीचे भाग असे—(१) रक्षा, (२) स्फटिक, (३) सोने, (४) कासे, (५) पाचू, (६) लोखंड, (७) मोती. यापैकी पहिला रक्षेचा भाग पुरुष, जिन व प्राणी यांनी व्यापलेला आहे; दुसरा गुदमरून टाकणाऱ्या वाऱ्याने व्यापला असून या वाऱ्याने 'आद' नावाच्या काफिरांच्या टोळीचा विनाश केला; तिसरा भाग नरकातील दगडांनी; चौथा नरकातील गंधकाने; पाचवा नरकातील सर्पांनी, सहावा नरकातील विंचवांनी आणि सातवा भाग सैतान व त्याच्या दूतांनी व्यापलेला आहे. आकाशाचे सात भाग पुढीलप्रमाणे आहेत—(१) हवेचा प्रदेश, आदमचे घर, विशुद्ध चांदीचे बनलेले; (२) इनाक व जॉन द बॅप्टिस्टचे घर, सोन्याचे; (३) जोसेफचे घर, मोत्यांचे; (४) येसूचे घर, शुद्ध पांढऱ्या सोन्याचे; (५) आरोंचे घर, शुद्ध चांदीचे; (६) मुसाचे घर, माणिक आणि लाल रत्नांचे; (७) इब्राहीमचे घर, स्फटिकाचे.

इमाम हसन व हुसेन यांना हौतात्म्य कसे प्राप्त झाले याविषयी विविध इतिवृत्ते आहेत; पण हे यझीदच्या चिथावणीमुळे झाले. यावर सर्वांचे एकमत आहे. यझीद हा ईश्वरी दया गमावलेला सर्वस्वी दुष्ट होता. तोच या कटाचा सूत्रधार होता. दुसऱ्यांचे शत्रूत्व, जुलूम, हुकूम केवळ यांनी एखाद्याचे जीवन संपुष्टात यावे हे कसे शक्य आहे? परंतु मुन्शी म्हणजे स्वर्गातील चित्रगुप्ताने माणसाच्या दैवात जसे लिहिले असेल तसे घडतेच. म्हणजे मृत्यू अथवा जीवन यात उघडपणे परमेश्वराचा हात दिसला नसला तरी या गोष्टी घडविणारा तोच असतो.

अबू सुफियनचा मुलगा मुआविया याला इ.स. ६३९ मध्ये खलिफा उमर यांनी सिरीयाचा कारभार पाहण्यास सांगितले. तसेच मुआवियाच्यानंतर त्याच्या मुलाकडे सुभेदारीची वारसदारी येईल असेही सांगितले. इ.स. ६४४ मध्ये उमय्याद घराण्याची स्थापना झाली. त्याचा मुलगा यझीद हा ६७६ मध्ये त्याचा नियोजित वारस म्हणून जाहीर करण्यात आला. या गोष्टीला, हुसेनच्या नेतृत्त्वाखालील मदिनेच्या विरोधी पंडितांची संमती मिळविण्याच्या हेतूने मुआविया मक्केला गेला. इ.स. ६८० मध्ये मुआविया मृत्यू पावल्यावर यझीद हा सिरीयाचा सुभेदार झाला. यझीदचे प्रजाजन हसनबद्दल तो केवळ पोर आहे, फकिराचा मुलगा आहे, दरिद्री आहे असे म्हणत तर यझीद हा अगणित संपत्ती असलेला सामर्थ्यशाली राजा आहे असे वर्णन करीत; आणि त्याने मदिनेच्या माणसाच्या अंकित राहावे हे आश्चर्य आहे, असे म्हणत. प्रजाजनांच्या स्तुतिपाठामुळे यझीद उन्मत्त झाला आणि त्याने हसनकडून मुजऱ्याची मागणी केली. त्याने हसनला असे पत्र लिहिले की, माझ्या राज्याचा प्रजाजन हो, मी स्वतः तुला मक्का व मदिनेचा राजा करीन, इतकेच नाही तर अगणित संपत्तीही देईन. हसनने त्याला उत्तर दिले, 'ही आश्चर्याची गोष्ट आहे; मुजरा करण्याचे कर्तव्य कोणाचे? ताबेदारी व सार्वभौमत्व याची अवस्था कोठून अस्तित्वात आली, या बाबीचा शांतपणे विचार कर; ऐहिक संपत्तीवर विसंबून राहू नकोस, परमेश्वरासमोर उद्या तुला याचा जाब द्यावा लागेल.' या उत्तराने यझीदचा द्वेषाग्नी आणखी भडकला.

यानंतर अजून एक प्रकरण घडले. यझीदला असे समजले की , त्याच्या चाकरीत असलेल्या, मक्केचा रहिवासी अब्दुल्ला-इब्न-झुबेरची [हा माणूस खलिफांच्या मोठेपणावर हक्क सांगणारा प्रतिस्पर्धी होता. त्याला अब्दुल मलीकचा सेनापती हज्जाज याने मक्का येथे वेढा घातला आणि तो ६९२ मध्ये युद्धात मारला गेला. (मुईर,cit; chapt. 50).] बायको फारच सुंदर आहे. यझीद चारित्र्यभ्रष्ट असल्यामुळे, कोणत्या तरी मार्गाने तिला आपलीशी करण्याचे त्याने ठरविले. एका प्रसंगी तो अब्दुल्लाला म्हणाला की, माझी एक लग्नाची बहीण आहे, ती विचारी व सुशील आहे; तुझी इच्छा असल्यास मी तुझ्याबरोबर तिचे लग्न लावून देतो. अब्दुल्लाला त्याच्या कपटाची काहीच कल्पना नसल्यामुळे त्याने या

गोष्टीला आनंदाने संमती दिली. यझीदने नंतर त्याला आपल्या घरी नेले. यझीद बहिणीला विचारण्याच्या निमित्ताने घरात गेला व थोड्या वेळाने बैठकीत येऊन त्याने अब्दुल्लाला सांगितले की, माझ्या बहिणीला तू विवाहित असल्याचे माहीत आहे, आणि तू आपल्या बायकोला घटस्फोट दिल्याशिवाय तुझ्याशी लग्न करण्यास तिची संमती नाही. हे ऐकताक्षणीच अब्दुल्लाने आपल्या बायकोला 'बिनशर्त' घटस्फोट दिला (तलाक-इ-मुतालका). यझीद पुन्हा घरात गेला व थोड्या वेळाने बाहेर येऊन म्हणाला की, माझ्या बहिणीची लग्नाला संमती आहे, पण तिला मेहर अगोदर हवा आहे. यावर अब्दुल्ला म्हणाला की, मी गरीब माणूस, मेहरची रक्कम अर्थातच मोठी असेल; मी ती कोठून आणू? यझीदने त्याला दूरच्या प्रांताची सुभेदारी देऊन त्याचे समाधान केले आणि तेथे पाठवले. दरम्यानच्या काळात यझीदने त्या प्रांताच्या सुभेदाराला कोणत्या तरी मार्गाने अब्दुल्लाचा वध कर असे कळविले. त्यानुसार त्याने अब्दुल्लाचा वध केला.

नंतर यझीदने मुसा अशरीला आपला दूत म्हणून अब्दुल्लाच्या बायकोकडे पाठविले. त्याने त्याच्याबरोबर असा निरोप पाठविला की, तुझ्या नवऱ्याने केवळ द्रव्यलोभाने तुला घटस्फोट दिला आहे; आता तू माझी होण्यास संमती दिलीस तर मी तुला राणी करीन. हा निरोप घेऊन चालला असताना अशरीची हसनशी गाठ पडली. त्याने अशरीला तू कोठून आलास व कोठे चाललास असे विचारले. अशरी म्हणाला की, सिरीयाच्या राजाच्या वतीने मरहूम अब्दुल्लाच्या बायकोला त्याच्याशी लग्न करण्याबद्दल विचारण्यास चाललो आहे. हे ऐकल्यानंतर हसन मुसा अशरीला म्हणाला, 'तिने यझीदच्या योजनेला संमती न दिल्यास, माझ्यातर्फे तिला असाच निरोप सांग.' अशरीने अब्दुल्लाच्या बायकोच्या घरी आल्यावर तिला यझीदचा निरोप सांगितला. त्यावर तिने 'ठीक, अजून काही?' असे विचारले. त्यावर अशरी तिला म्हणाला, 'इमाम हसननेही तुला अशीच मागणी घातली आहे.' ती म्हणाली, 'आणखी काही?' यावर अशरी तिला म्हणाला, 'तुला पौरुष व सौंदर्य हवे असल्यास मी आहे की! तिने त्याच्याकडे पडद्यातून पाहिले व तो वृद्ध आहे हे लक्षात आल्यावर त्याला म्हणाली, 'हे अशरी, तू माझा बाप शोभशील इतका वृद्ध आहेस. आणि तुझ्या सौंदर्याबाबत म्हणत असशील तर तुझे सौंदर्य माझ्यापेक्षा अधिक नाही. यझीदबद्दल सांगावयाचे तर त्याच्या क्षणभंगुर संपत्तीवर कोणी विसंबून रहावे? हसनची संपत्ती अखेरच्या न्यायदानाच्या दिवसापर्यंत टिकणारी आहे, त्याची योग्यता व औदार्य फार थोर आहे, म्हणून हसनची मागणी स्वीकारणे चांगले आहे असे मला वाटते.'

अशरीने तिचा कौल हसनला सांगितला व पुढे असे म्हटले की, मुस्लीम रूढीनुसार त्याचे तिच्याशी तिच्या घरी लग्न होईल. अशरी हसनला घेऊन तिच्या घरी गेला व त्याने त्यांचे लग्न लावले. यानंतर हसनने तिला आपल्या घरी आणले. अशरी यझीदकडे आल्यावर त्याने त्याला घडलेला वृत्तांत सांगितला. आपला बेत फसला हे यझीद पाहून अशरीवर संतापला व हसनचा कडवा वैरी बनला. त्याने आपल्या प्रजाजनांना हसनचा वध करण्याबद्दल हुकुमावर हुकूम दिले आणि हसनचा वध करणाऱ्यास वजिरी दिली जाईल असे आश्वासनही दिले. कुफाच्या लोकांनीही हसनकडे यझीदच्या वर्तनाबद्दल तक्रार केली आणि त्याने आपणाला येऊन मिळावे असे निमंत्रण दिले. हसनचा त्यांच्या आश्वासनावर विश्वास बसला व तो कुफाकडे निघाला. यझीदने आपला मुन्शी मरवां याला हसनच्या वधाच्या कामगिरीवर पाठविले. यापूर्वी कुफाच्या मार्गावर असताना हसन ज्याच्या घरी उतरला होता त्याने हसनवर दोनदा विषप्रयोग करण्याचा प्रयत्न केला होता. त्याला अजून प्रयत्न कर, काम फत्ते झाल्यावर वजिरी देतो असे यझीदने आश्वासन दिले. हसनला हे कळल्यावर तो ते ठिकाण सोडून पुढे निघाला. पुढे रस्त्यावर आंधळ्याचे ढोंग करणाऱ्या एका माणसाने हसनच्या मांडीत विषारी भाला खुपसला; या

जखमेचा हसनला दीर्घकाळ त्रास झाला. नंतर हसन मदिनेला गेला. तेथे मरवांने जदा नावाच्या स्त्रीकरवी हसनच्या पिण्याच्या पाण्यात विष मिसळले. हे पाणी पिल्यावर हसन मरण पावला. त्याला मदिनेतील जन्नतुल बाकी अथवा बाकी-उल-गारकद 'मूळांची बाग' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या स्मशानात दफन करण्यात आले. [हसन हा १७ मार्च ६६९-७० ला विषाने मरण पावला. त्याला विष देण्यासाठी त्याच्या बायकोला लाच देण्यात आली ही गोष्ट असंभवनीय आहे. आणि त्याचा मृत्यू बहुधा त्याच्या जनानखान्यातील मत्सरामुळे झाला (मुईर, ॲनल्स, ४२२) ]

हुसेनला आपल्या भावाच्या मृत्यूचे फार दुःख झाले. कुफाच्या माणसांनी त्याला कुफाला येण्याचे निमंत्रण दिले. त्याने आपला चुलत भाऊ मुस्लीम-इब्न-उकेल याला पाठविले. इब्न-उकेल याने हुसेनला यझीदचा बदला घेण्याची विनंती केली. म्हणून इ.स. ६८० मध्ये हुसेन कुफाला गेला. हल्ल्याच्या भीतीमुळे मुस्लीम हानी नावाच्या माणसाच्या घरात लपून बसला. अब्दुल्ला नावाच्या नव्या सुभेदाराने हानीस मुस्लीमला आपल्या स्वाधीन करण्याचा हुकूम दिला. त्याने नकार दिल्यावर त्याला मरेपर्यंत चाबकाचे फटके दिले. मुस्लीमलाही ठार मारण्यात आले. मुस्लीमची दोन मुले यांनीही त्यांनी ज्याच्या घराचा आसरा घेतला होता त्या हारिस नावाच्या माणसाने ठार मारले. या घटना हुसेनला समजल्यावर तो अधिक दुःखी झाला. तशातच हुसेनला ठार करा अशी यझीदची आज्ञा निघाली. यझीदच्या सैन्याचा तळ फुरा अथवा युफ्राटीस नदीच्या किनाऱ्यावर तर हुसेनच्या सैन्याचा तळ मारिया अथवा दस्तबला करबला या ठिकाणी पडला. या लढाईत शेवटी हुसेन व त्याचे कुटुंबीय यांना करबलाच्या मैदानावर हौतात्म्य प्राप्त झाले. असे म्हणतात की, परींचा राजा जफरने हुसेनला शेवटच्या क्षणी मदत देऊ केली होती पण हुसेनने ती नाकारली.

हुतात्म्यांच्या शरीरावर प्रेतसंस्कार प्रार्थना (नमाझ-इ-जनाझा) म्हणण्यात आली. त्यांची डोकी व हुसेनचे कुटुंबीय यांना सिरीयाला पाठवण्यात आले. मृताबद्दल शोक करणाऱ्या सास्सानिअन घराण्याचा शेवटचा पुरुष याझदीगर्द याची मुलगी सहरबानू ही होती. अशा तऱ्हेने सास्सान घराणे व प्रेषितांचे घराणे यांच्यात ऐक्य निर्माण झाले. आपला जुना धर्म सोडण्यास भाग पडलेल्या इराणी लोकांनी ज्या उत्साहाने अली आणि त्यांच्या वंशजांची बाजू उचलून धरली त्यास काही प्रमाणात हे ऐक्य जबाबदार आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर मुसलमानांच्यामधील शियांच्या गटाचे व ज्यांनी त्यांचे सक्तीने धर्मांतर करविले—ज्यांना सुन्नी खलिफा म्हणून गौरवितात—त्यांच्यातील हे ऐक्य होय.

हुसेनचा मुलगा झैनुल अबिदीन याच्या विरोधाला न जुमानता हुतात्म्यांची डोकी जेव्हा यझीदच्या आज्ञेवरून सिरीयाला नेण्यात आली तेव्हा अनेक चमत्कार घडले. तेथून ती झैनुल आबदिनीच्या देखरेखीखाली मदिनेला नेण्यात आली. असे म्हणतात की, ती तेथून करबलाला परत नेण्यात आली. तर काहींच्या मते हुसेनचे शिर कैरो येथे दफन करण्यात आले. इराणी मुसलमान सफर महिन्याचा विसावा दिवस हा हुसेनचे शिर करबला येथे दफन केल्याच्या स्मृतीप्रीत्यर्थ म्हणून पाळतात. त्यांचे म्हणणे असे की हुसेनचे शिर मुआविचाने प्रथम दमास्कसला व तेथून करबला येथे हलविले आणि मुआविआच्या मृत्यूनंतर चाळीस दिवसांनी करबला येथे दफन करण्यात आले. परंतु मुआविया इ.स. ६८० च्या एप्रिलमध्ये मरण पावला आणि हुसेन तर ६८० च्या दहा ऑक्टोबरला मारला गेला.

मोहरमच्या सणाची सुरुवात बीजेच्या चंद्रदर्शनापासून होते. पण मुस्लीम पंचांगानुसार दुसरे दिवशी सकाळपासून तो सुरू होतो. इजिप्तमध्ये असा समज आहे की दहा दिवसांच्या या शोककाळात रात्रीच्या वेळी

अनुक्रमणिका

लोकांना जिन भेटतात. कबरीचे दर्शन धरून (झिरायत) मोहरमचा सण बाराव्या दिवसांपर्यंत असतो असे म्हणता येईल. पण खरे म्हणजे तो दहा दिवसच चालतो. त्याला 'आशूरा' म्हणतात. खास इमारतीत निशाण (आलम), हुतात्म्यांचे ताबूत, शाही तख्त व प्रेषित ज्या घोड्यावर बसून जेरुसलेम व स्वर्गाला गेले त्या बुराक घोड्याची प्रतिमा ठेवतात. क्वचित या इमारती काळे अभ्रक व इतर चकाकदार वस्तूंचे पडदे लावून सुशोभित करतात. या इमारतींना आशूरखाना म्हणजे 'दहा दिवसांची घरे', ताबुताची घरे (ताबूतखाना) किंवा फकिरांचा निवास (आस्ताना) असे म्हणतात. अपरिचित माणसांना या इमारतीत जाऊ देत नाहीत कारण त्या प्रार्थनेसाठी शुद्ध ठेवल्या पाहिजेत असे म्हणतात.

चंद्रदर्शन झाल्याबरोबर 'कुडाली मारना' नावाचा विधी करतात. म्हणजे हुतात्म्यांच्या नावे साखरेवर फातिहा म्हणतात व कुंडासाठी निवडलेल्या जागेवर (अलावा) जातात. त्या जागेवरचे गवत काढून टाकून एक दोन दिवसांनी खड्डा खोदतात. त्याचा व्यास सव्वा दोन ते सव्वा सहा फूट असतो. त्याच्या सभोवती कमी उंचीची एक भिंत बांधतात; हा खड्डा नेहमी त्याच जागेवर खोदतात. हे कुंड तयार केल्यावर त्यात सणाच्या काळात दरदिवशी अग्नी पेटवतात. अडाणी मुसलमान—तरुण व वृद्धही या कुंडाभोवती काठ्या किंवा तलवारी ठेवतात, किंवा त्याच्या भोवती 'या अली! या अली! शाह हसन! शाह हसन! दुल्हा! दुल्हा! हाये दोस्त! राहियो! राहिओ! ओ अली! शाह हसन, हुसेन! दुल्हा! अरेरे! दोस्त! थांब, थांब! असे म्हणून फेऱ्या मारतात. काहीजण नवस पार पाडताना जळत्या निखाऱ्यात व तेथून बाहेर उड्या मारतात तर काहीजण मूठमूठ विस्तव इकडे तिकडे फेकतात. स्त्रियाही एक कुंड करतात, शोकगीते (मर्सिया) म्हणतात आणि छाती पिटतात. गुजरातमध्ये हे कुंड एक फूट रुंद व एक फूट खोल असते. तेथे ज्याने दुल्हा होण्याची प्रतिज्ञा केली असेल तो कुंडाभोवती सात किंवा अकरा फेऱ्या मारतो. त्याच्या अंगात दुल्हा येत असल्याचे दिसताच ऊद जाळतात व त्याला चवरीने वारा घालतात आणि दूला! दूला! दूला! असे म्हणतात. यावेळी दुल्हा अंगात यावा अशी इच्छा असलेला तो माणूस प्रथम हळू व नंतर वेगाने झुलू लागतो. जेव्हा 'हाल'ची शक्ती या भक्तात शिरते म्हणजे जेव्हा त्याच्या डोळ्याच्या बाहुल्या बदलतात, दृष्टी एकाच अवस्थेत खिळते व त्याचे शरीर थंड पडते तेव्हा त्याचे तोंड खाली वाकवून ते मोरपंखांनी झाकतात. थोड्याच वेळात दुल्हा त्याचा ताबा घेतो व यानंतर मात्र तो पाणी, अग्नी कशाचीही पर्वा न करता चालू लागतो. त्याच्या हातात सवारीची काठी देतात आणि तो निघताना एक जण त्याला पाठीमागून धरतो, आधार देतो. तो दुलाच्या ध्येयहीन आवेशांना आखाडा म्हणजे इतर दुलांचे ठिकाण किंवा ताबूतखान्याचा मार्ग दाखवतो. तो तेथे गेल्यावर त्याच्या तोंडासमोर धूप पेटवतात. तो रस्त्याने जात असताना अनेक स्त्रिया त्याची आपल्या मुलाला आशीर्वाद दे, शत्रूंचा नायनाट कर, जिन आदींना काढून टाक, अशी प्रार्थना करतात. तो दुल्हा पुत्रप्राप्ती होण्यासाठी त्या स्त्रीला त्याच्या सवारीच्या काठीवर असलेल्या फुलांपैकी एक दोन फुले तोडून घेण्यास सांगतो. ही सवारीची काठी चांदी किंवा लोखंडाची असून तिचा टोकाचा आकार चंद्रकोर किंवा घोड्याच्या नालासारखा असतो व ती मोरपंखांनी झाकलेली असते. दुल्हा स्वतःच्या आखाडा येथे आल्यावर तो निश्चेष्ट पडतो; तास, दोन तासांनी तो माणूस शुद्धीवर येतो. ज्यांनी दुल्हा होण्याची प्रतिज्ञा केलेली असते फक्त त्यांच्याच अंगात दुला येतो; काही वेळा तर त्यांच्याही अंगात येत नाही, मात्र दुल्हा कोणत्याही स्त्रीच्या अंगात येत नाही. सुरतमध्ये गुजरातच्या इतर भागांपेक्षा अधिक प्रमाणावर विधी करण्यात येतात. येथे सणाच्या आठव्या दिवशी सायंकाळी लहान मुलांना हिरवे कपडे घालतात, वाङ्निश्चय झालेल्या नातेवाईकांच्या घरी कपडे पाठवितात. वाघासारखे पोशाख घालतात. परस्परांच्या हातात हात

अनुक्रमणिका

घालून मुले, पुरुष, हिंदू गोसावी अथवा अर्धहिंदू-अर्ध मुसलमान अशा हुसेनानी ब्राह्मण भिक्षूप्रमाणे पोशाख करून मोहरमची शोकगीते गात फिरतात.

स्त्रिया छाती पिटून शोक व्यक्त करतात. ही अर्थात शियापंथीय मुस्लिमांची पद्धत आहे. सुन्नींना ती वर्ज्य आहे. स्त्रिया मोठ्याने ओरडून म्हणतात. "हाये! हाये! शाह जवान! तिनो! तिनो! लोहू में डुबे! डुबे! गिरे! गिरे! मरे! मरे! या अली !" त्या, पाठ असल्यास काही शोकगीत म्हणतात व छाती पिटतात. काही स्त्रिया लाकडी उखळावर किंवा पालथ्या मडक्यावर दिवा ठेवून विलाप करतात.

दक्षिण हिंदुस्थानातील 'आशूरखान्याची' जागा उत्तर हिंदुस्थानमध्ये इमामबारा घेतो. चंद्रदर्शनानंतर पहिल्या, तिसऱ्या अगर चौथ्या दिवशी ही इमारत सुशोभित करतात व तीत निशाणे (अलम, शद्दा, पंजा, इमामजादा, पीरां, साहिबान, इमामेन) ठेवतात. ज्या निशाणांची दहाव्या दिवसापूर्वी मिरवणूक काढण्यात येते त्यांना 'सवारी' असे म्हणतात. ही निशाणे त्यांच्यावर लोंबत सोडलेल्या लिंबामुळे स्पष्ट ओळखू येतात. प्रत्येक शिया मुसलमानाच्या घरात माशाचे निशाण (माही) असते. ते निशाण म्हणजे सोने किंवा चांदीचे माशाचे डोके असते. काही निशाणे सन्मानाची असतात. उदाहरणार्थ अलीचा पंजा (हात), फातिमा, अब्बास, कासीम, बारा इमाम, संरक्षक इमाम म्हणजे इमाम जामीनचे पंजे; 'ढालसाहिब,' करबला येथील युद्धात हुसेन ज्या घोड्यावर बसला होता त्याचा नाल (नालसाहिब)—हा नाल एका यात्रेकरूला सापडला. तो विजापुरात आणला व तेथून विजापूरचा पाडाव झाल्यावर हैद्राबादला आणला असे म्हणतात; प्रेषितांनी दिलेली दुधारी तलवार (बर्झाकी, कुदरती, जू-उल-फकर) इत्यादी, ही निशाणे सामान्यपणे तांबे. पितळ किंवा पोलादाची केलेली असून त्यावर जडावकाम केलेले आहे. अथवा ही निशाणे कागद व लाकडाची केलेली असतात. धातूची नवी अगर उजळलेली जुनी निशाणे वाजत गाजत अशूरखान्यात आणतात. प्रत्येक अशूरखान्यात अशी चांदी किंवा लाकडी चौकटीत बसविलेली व रंगीत कापडाने सजविलेली चार ते सात निशाणे असतात. चंद्रदर्शनानंतर पहिल्या, चौथ्या अगर पाचव्या दिवशी ही निशाणे जमिनीत रोवतात, त्यांच्यासमोर दिवे लावतात व ऊद पेटवण्याचे धूपाचे भांडे, लाकडी खेळणी, इत्यादी वस्तू ठेवतात. क्वचित एका बाजूला प्रेषितांचे पदचिन्ह (कदम-इ-रसूल) ठेवतात, धूप पेटवतात आणि अन्न व शरबतावर हुतात्म्याच्या नावे फातिहा म्हणून ते वाटून टाकतात. दर दिवशी सायंकाळी फातिहा म्हणतात व कुराणाचे पठण करतात. सकाळी फक्त कुराणाचे पठण करतात, रात्री रौजातु-श-शुहादा (हुतात्म्यांचा बगीचा), शोक गीते (मर्सिया) म्हणतात व छाती पिटून विलाप करतात. ज्यावर फातिहा म्हटलेला असतो ते अन्न गरिबांना वाटून टाकतात.

दर रात्री, शोकगीते गाण्यास शिकलेली मुले शोकगीते म्हणतात व काही माणसे जागरण करतात (शब बेदारी). दक्षिण गुजराथमध्ये चौथ्या दिवसापासून शोकगीते गातात; त्यानंतरच्या दिवसात मौज आणि चित्रविचित्र पोशाख घालून नाच करतात आणि दहाव्या दिवसापर्यंत रस्त्यावरून जाणाऱ्या मुलांना व प्रवाशांना शरबत वाटणे एवढाच कार्यक्रम असतो. चित्रविचित्र पोशाख घालून नाच करण्याचे कारण शोकाचा ताण अंशतः कमी करणे अंशतः हिंदूंच्या होळीसारख्या सणाचे अनुकरण करणे असावे असे वाटते. हैद्राबादमध्ये पहिल्या सात दिवसांत फातिहा आणि आशीवर्चन (दुरुद), कुराणचे वाचन, शोकगीते म्हणणे, अन्न व शरबत वाटणे याशिवाय काहीही करीत नाहीत. चंद्रदर्शनाच्या सातव्या दिवशी (अडाणी माणसे मोहरम महिन्याच्या सातव्या दिवशी) हुतात्मा कासीमच्या निशाणाची मिरवणूक काढतात. कासीमला पवित्र दुल्हापैकी एक मानतात. कारण

वयाच्या दहाव्या वर्षी त्याचा हुसेनची मुलगी फातिमा हिच्याशी वाङ्‌निश्चय झाला होता पण तो युद्धात मारला गेला. लखनौमध्ये त्याच्या निशाणाच्या मिरवणुकीला छोट्या नवरदेवाच्या लग्नाची वरात (मेंहदी) म्हणतात. एक माणूस त्याचे निशाण घेऊन घोड्यावर बसतो, त्यामागे नर्तिका छाती पिटीत शोकगीते म्हणतात. काही वेळा त्याचे निशाण, पायी चालणारा माणूस घेतो व तो वेड्यासारखा झोकांड्या देत 'दुल्हा, दुल्हा' असे म्हणतो. रस्त्यावरील एखाद्या अशूरखान्यासमोरून जात असताना तो तेथील निशाणांना प्रणाम करतो व उदाच्या धुरावर फातिहा म्हणतो. यानंतर त्याला त्याच्या आशूरखान्यात नेतात, मेजावर निजवतात, तो मृत हुतात्मा आहे असे मानतात, त्याच्या अंगावर कफनीचे कापड झाकतात व विलाप करतात, शरबत वाटतात. या शरबताला 'युद्धाचे शरबत' असे म्हणतात (रन का शरबत).

सातव्या दिवशी टोकावर लिंबू खुपसलेला व कापडाने झाकलेल्या भाल्याची (नेझा) मिरवणूक काढतात. हा भाला, ज्या भाल्यावर हुसेनचे शिर नेले त्याचे बोधचिन्हासारखा असतो. हा भाला एक माणूस धरतो व बाकीची माणसे त्याच्या सोबत असतात. या भाल्याची मिरवणूक रस्त्यावरून जाताना अनेक मुसलमान त्या भालाधारकाच्या पायावर पाण्याने भरलेल्या घागरी ओततात व त्याला पैसे किंवा धान्य देतात. प्रत्येक आशूरखान्यावर आल्यावर तेथील व्यवस्थापक त्याला अंगारा देतो. हा अंगारा तो भालाधारक भक्तिपूर्वक देतो, आपल्या व आपल्या मुलांच्या डोळ्यांवर चोळतो तसेच हा अंगारा तो थोडा खातो व मुलांना खाण्यास सांगतो. याच दिवशी सायंकाळी बिबी फातिमा व हुसेन यांची निशाणे, नालसाहिब आणि अलीची तलवार यांची मिरवणूक काढतात, शोकगीते म्हणतात, विलाप करतात.

पवित्र नालसाहिब हा सोने किंवा इतर धातूचा, लाकडाचा किंवा चंदनलेप फासलेल्या कागदाचा बनवतात. त्याचा आकार सर्वसाधारण नालापेक्षा मोठा असतो. ही निशाणी नेणारी माणसे गर्दीतून धावतात व त्यामुळे दुर्बल पुरुष, स्त्रिया, मुले इतरांच्या अंगावर कोसळतात आणि याने पाहणाऱ्यांची करमणूक होते.

काही लोक धर्माच्या अज्ञानामुळे मानवी आकृतीसारखी आकृती तयार करून तीवर शिर म्हणून घोड्याचा नाल ठेवून त्याची मिरवणूक काढतात. इतर मुसलमान अफताबगीर म्हणजे कागदाची पिंपळपानासारखी छत्री करून तिची मिरवणूक काढतात. ही अफताबगीर ज्या खांबावर असते तो खांब एक माणूस आपल्या कंबरेवर धरून नेतो, इतर लोक तो खांब पडू नये म्हणून त्याला बांधलेल्या दोऱ्या धरतात. अफताबगिरीचा खांब धरणारा माणूस जेव्हा जेव्हा थांबतो तेव्हा अफताबगीर थोडी खाली करून फिरवितात. परंतु पुष्कळदा उत्साहाच्या भरात या छत्र्यांची त्या एकमेकींना हानीत असल्यामुळे, मोडतोड होते. असे पुष्कळजण नवसपूर्तीसाठी करतात. एखादी स्त्री 'नालसाहिब' निशाणाला असा नवस बोलते की, तुझ्या कृपेमुळे मला मुलगा झाल्यास मी त्याला अफताबगीर घेऊन तुझ्या मिरवणुकीत पळायला लावीन. तिला मुलगा झाल्यास पुढे त्याला ती तसे करायला लावते. श्रीमंत लोक आपल्या मुलांना अफताबगीर घेऊन थोडे अंतर पळू देतात व त्यानंतर मुलाच्या ऐवजी नोकराला पळायला लावतात. याचप्रमाणे आठव्या दिवशी सायंकाळी बर्कझी निशाणाची मिरवणूक काढतात. लखनौमध्ये नवव्या दिवशी रात्री अब्बास व हुसेन यांच्या निशाणांची मिरवणूक काढतात. रस्त्यावर दोन मिरवणुकींची गाठ पडल्यास निशाणांची एकमेकांना भेट म्हणजे आलिंगन घडवितात, फातिहा म्हणतात, धूप जाळतात व मग जातात. अजमेरमधील इंदर कोट मोहल्ल्यातील मुसलमान एक चित्तथरारक गोष्ट करतात, ती म्हणजे काही जण हातात तलवारी घेऊन नाचतात व त्या तलवारी आवेशात

इतस्त फेकतातः दुल्हाचा आत्मा नालसाहिबमध्ये वास करतो आणि म्हणून त्याच्यामुळे रोग आश्चर्यकारकरित्या बरे होतात असे मानतात. ही स्फूर्ती प्राप्त करून घेण्यासाठी चांदी किंवा लोखंडाच्या सळईला नालासारखा आकार देऊन तिच्यावर सर्व बाजूंनी मोरपंख झाकतात व तिच्याजवळ धूप जाळतात. दक्षिणेत, विशेषतः हैद्राबादमध्ये प्रत्येक मोहरम सणानंतर एका टोकाला नालाचा आकार असलेल्या सळ्या विहिरीत टाकतात. दुसरे वर्षी मोहरमच्या सुरुवातीस, ज्यांनी विहिरीत सळ्या टाकल्या ती माणसे विहिरीत जाऊन हुतात्म्याच्या कृपेची वाट पाहत थांबतात. कारण हुतात्मा जो माणूस आपला दुल्हा व्हावा असे इच्छितो त्या माणसाची सळई पाण्याच्या पृष्ठभागावर आणतो. गुजराथमध्ये हा चमत्कार घडतो असे मानीत नाहीत. मोहरमच्या दहावे दिवशी हैद्राबादमध्ये कासीमची सोडून इतर सर्व निशाणे व ताबूत माणसे खांद्यावरून नेतात. ही भव्य मिरवणूक रात्री काढतात. मिरवणुकीत फकीर असतात. खालच्या परंपरेतील फकीर संध्याकाळी तर उच्च परंपरेतील फकीर मध्यरात्री ही मिरवणूक काढतात. या रात्री रस्त्यांवर रोशनाई करतात, मॅजिक लँटर्नच्या सहाय्याने करबला येथील युद्धाची दृश्ये पडद्यावर दाखवितात. त्यामुळे ती पाहण्यासाठी पुष्कळजण येतात. या रात्री शहरातील जवळपास सगळे मुसलमान जागे राहतात. त्यामुळे जिकडे तिकडे सतत आवाज व गोंधळ असतो.

ताबुताचा साध्यातला साधा प्रकार म्हणजे ब्राहूई व बलुची स्त्रिया करतात तो होय. त्या स्त्रिया हुसेनच्या कापडी प्रतिमा करून त्यांच्यासमोर छाती पिटतात. इराणमध्ये दगडीपेटीसारखी एक डोली आठ जण खांद्यावरून नेत असत. त्या डोलीला 'प्रेषितांची कबर' (कबर-इ-पैगंबर) असे म्हणत. या डोलीच्या समोरच्या भागावर मौल्यवान रत्नांनी बनविलेला अंडाकृती दागिना आणि थोडेसे पुढे आलेल्या भागावर मेणबत्तीच्या घरात दोन रत्नजडित मेणबत्त्या असत. अंडाकृती दागिन्याच्या वरच्या भागात हिऱ्याचा तारा असे. डोलीचा वरचा भाग व बाजू काश्मिरी शालींनी झाकलेल्या असत. आणि प्रेषित आपल्या डोक्याला जो पटका बांधीत असत त्याचे चिन्ह म्हणून शिखरावर पटका ठेवीत असत. डोलीच्या प्रत्येक बाजूने मुहंमदाच्या हाताच्या रत्नजडित प्रतिमा असलेले व शालींनी झाकलेले खांब घेऊन दोन माणसे चालत असत. याचा कदाचित मोहरमशी काही संबंध नसेल पण भारतीय मुसलमान ज्या ताबुताच्या मिरवणुकी काढतात त्या ताबुताशी याचे अंशतः साम्य आहे. हिंदुस्थानमध्ये ताबूत हा बांबूची चौकट असते ही चौकट करबलाच्या मैदानावर हुसेनच्या अवशेषांवर उभारलेल्या कबरीसारखी असते. या बांबूच्या चौकटीवर सामान्यपणे सुंदर अशी कोरीव कागदी जाळी लावतात. क्वचित तिच्या मागच्या बाजूला अभ्रकाच्या पट्ट्या लावतात. ही चौकट बेगडी झालरी लावून सजवतात. तिच्यावर एक घुमट असतो. वाऱ्याच्या लहानशा झुळकीने तो फिरेल अशा युक्तीने तो बसवतात. हा ताबूत आतून व बाहेरून जेव्हा प्रकाशित करतात तेव्हा त्याचे खरे सौंदर्य दिसते. ताबुताचा आकार चौकोनी असतो. ताबुतात काही निशाणे, काही लहान कबरीच्या प्रतिमाही, इतर हुतात्म्यांच्या म्हणून ठेवतात. काहीजण ताबुताला जाळी लावण्याऐवजी कागदी फुले व बांगड्यांच्या माळा लावतात. अशा ताबूताला दक्षिणेत 'बांगड्यांचा ताबूत' म्हणतात. शिवाय काहीजण कागदी जाळीऐवजी मेणाची फुले, पाने लावतात. रात्रीच्या मिरवणुकीच्या वेळी पेट्रोमॅक्सच्या उष्णतेने मेण वितळू नये म्हणून त्यावर पाणी शिंपडतात. हा ताबूत फुलांच्या बगीच्यासारखा दिसतो. याला 'मेणाचा ताबूत' म्हणतात. काहीजण प्रेषिताच्या मदिना येथील कबरीच्या आकाराचा ताबूत करून तो सोने, मिना यांनी सजवितात. हा ताबूत पाहण्यासाठी प्रेक्षकांची फार गर्दी लोटते. काहीजण तर ताबुताला जाळी लावण्याऐवजी कापडाने झाकतात व कापडावर माती टाकून मोहरीचे बी रुजवतात. त्यामुळे रात्रीच्या वेळी मोहरीची रोपे पाचूसारखी शोभिवंत दिसतात. हे ताबूत काढण्याची पद्धत ज्याने १३९८ मध्ये हिंदुस्थानवर स्वारी केली त्या अमीर तीमूरच्या काळापासून सुरू झाली असे म्हणतात.

अनुक्रमणिका

करबलाच्या यात्रेहून परत आल्यावर त्याने हुसेनची लहानशी कबर तयार केली (ताबूत) व तिचा मोहरमच्या शोकप्रदर्शनात समावेश केला.

हैद्राबादमध्ये काही मुसलमान ताबुताच्या ऐवजी ‘शाही आसन’ (शाहनिशीन) किंवा ‘न्याय महाल’ (दाद महल) उभारतात. ते ताबुताप्रमाणेच बांबू, कागद किंवा बेगडाचे केलेले असतात व आशुरखान्याच्या भिंतींना टेकून ठेवतात; त्यात निशाणे ठेवतात. ते दिव्याच्या काचेसारखे पारदर्शक असतात. त्यांचे हे पारदर्शक आवरण थोड्याशा वाऱ्यानेही हलते. त्याला ‘फिरते आवरण’ (चरखी फानूस) किंवा ‘काल्पनिक आवरण’ (फानूस की खयाल) म्हणतात. फानूस की खयाल कंदिलासारखा असतो. व त्याचे आवरण आत ठेवलेल्या मेणबत्त्यांच्या उष्णतेमुळे फिरते. त्याच्या बाह्य भागावर उंटादी प्राण्यांची चित्रे असतात. क्वचित ही आवरणे स्वतंत्रपणेही तयार करतात व ती ‘शाही आसनासमोर’ ठेवतात. काहीजण अभ्रक व पारा यांचे ‘पडदे’ (तट्टी) तयार करतात, ते आरशासारखे असतात. हे ‘पडदे’ तयार करण्यासाठी खूप पैसा खर्च करतात. विशेषतः हैद्राबाद शहरात याचा प्रघात मोठ्या प्रमाणावर आहे. काहीजण आंबा, सीताफळ, आदींची कृत्रिम झाडे करतात, त्यावर फळे खात असलेल्या पक्ष्यांची चित्रे ठेवतात. ही झाडे अशूरखान्यामध्ये ठेवण्यात येतात. ती फुलाफळांनी लगडलेल्या खऱ्या झाडांसारखी दिसतात. क्वचित, प्रार्थना करण्याच्या विविध अवस्थेत उभ्या असलेल्या किंवा खांद्यावर बंदूक घेतलेल्या माणसाची चित्रे काढतात. त्यांच्याजवळ पक्षी, प्राणी यांची चित्रे, खेळणी ठेवतात. पिंजऱ्यातून उडत असलेले कृत्रिम कबूतरही तयार करतात. या सगळ्या गोष्टी प्रेषितांच्या कल्पनेच्या विरोधी आहेत. कारण त्यांनी पुरुष, प्राणी यांची चित्रे काढू नयेत असा आदेश दिला होता, काढणाऱ्यांना शाप दिला होता. म्हणूनच कोणीही मुस्लीम राज्यकर्त्याच्या नाण्यावर त्यांचे चित्र नसते.

काही वेळा आशूरखान्याजवळ किंवा कुंडाजवळ (अलावा) एका चबुतऱ्यावर दळण दळणाऱ्या स्त्रीची प्रतिमा ठेवतात. क्वचित काकडी, खरबूज, केळी याला वजनदार दगड बांधतात. आश्चर्याची गोष्ट अशी की या केळ्यादी वस्तू सुरीने कापण्याचा प्रयत्न केला असताही कापल्या जात नाहीत.

मोहरमच्या सातव्या दिवशी ‘बुराक’ची लाकडी प्रतिकृती रंगवून नाक, पुढचे पाय, यावर मुस्लीम-अलंकार घालून रंगाऱ्याच्या दुकानातून वाजत गाजत आणतात व ती निशाणांच्याकडे तोंड करून ठेवतात. बुराक हा घोडा देवदूत जॅब्रियलने प्रेषित महंमद यांना नेण्यासाठी स्वर्गातून पाठविला होता. या बुराकचे तोंड व डोके माणसाचे असते, कान लांब, चंद्राप्रमाणे चकाकणारे विशाल कपाळ, डोळे हरणासारखे काळे व ताऱ्यांप्रमाणे तेजस्वी असतात. त्याची मान व छाती हंसासारखी, कंबर सिंहासारखी, शेपूट व पंख मोरासारखे, आकार सामान्यतः हिंदूंची कामधेनू किंवा खेचराएवढा असतो. त्याचा वेग विजेसारखा (बर्क) होता. त्यावरून त्याचे नाव बुराक.

पुष्कळ हिंदूंची हे ताबूत, निशाणे व बुराक यांवर एवढी श्रद्धा असते की, ते स्वतः या वस्तू तयार करतात व मोहरमच्या काळात फकीर होतात. गुजरातमध्ये ताबुताची मिरवणूक निघाल्यावर गरीब हिंदू-मुस्लीम स्त्री-पुरुष रस्त्यावर त्यांचे समोर लोटांगण घालतात, तर काहीजण आपल्या गळ्यात लाल सुती दोरा बांधतात, कपाळाला भस्म लावतात व मोहरमच्या काळात भिक्षा मागून जगतात. हे असे नवस फेडण्यासाठी करतात. त्याचप्रमाणे गुजरातमधील हिंदु स्त्रिया मोहरमच्या नवव्या दिवशी कुटुंबातील एखाद्या व्यक्तीच्या

मृत्यूनंतर करावयाच्या स्नानाचे प्रतीक म्हणून ओले कपडे घालतात, अंगावर जिवंत निखारे टाकतात, दिवसभर उपवास करतात आणि संध्याकाळी शीलपरीक्षा म्हणून चुन्यात बुडविलेले बोट चाटतात व त्यानंतर साखरभात खाऊन उपवास सोडतात. दहाव्या दिवशी हे ताबूत नदीवर नेत असताना कनिष्ठ जातीचे हिंदू आपल्या मुलांचे कल्याण व्हावे, आजार बरा व्हावा म्हणून ताबुतांना कोंबडा, बकरी, म्हैस यांचे मांस, लाल दोरे, कापड इत्यादी वस्तू वाहतात व हातात नारळ घेऊन ताबुताच्या समोर लोळतात.

दुसऱ्या बाजूने पाहिल्यास, चांद्र-सौरगणनेनुसार मोहरम व हिंदूंचे रामनवमी, दसरा यांसारखे सण एकदाच आल्यावर हिंदु-मुसलमानांच्या मिरवणुकींची मशीद किंवा देवळासमोर गाठ पडली तेव्हा किंवा ताबुतांच्या मिरवणुकीत हिंदूकडून रस्त्यात पवित्र अंजिराच्या फांद्या टाकण्याचा प्रयत्न झाला तेव्हा उग्र स्वरूपाच्या दंगली झाल्या आहेत. अशा प्रकारच्या दंगली मद्रासमधील कुडाप्पा येथे १८२१ मध्ये व ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथे १८३७ मध्ये झाल्या होत्या. हैद्राबादमध्ये अशा प्रकारचे अडथळे उत्पन्न झाल्यास मोहरमचे फकीर झालेले हिंदु लोक कधी कधी आपल्या धर्मबांधवांच्या विरुद्ध मुसलमानांची बाजू घेतात असे म्हणतात. हे मोहरमचे हिंदु फकीर या काळात मुस्लीम धर्मविधीप्रमाणे कापलेल्या (जुबाह केलेल्या) जनावरांच्या मांसाखेरीज इतर मांस खात नाहीत.

मोहरमच्या तेरा दिवसांत मुसलमानांनी आपले कपडे आणि घरे स्वच्छ व आपले शरीर शुची ठेवावे अशी अपेक्षा असते. या काळात मुसलमान पुरुष स्त्री संग करीत नाहीत. त्यांच्यापैकी काहीजण पहिल्या दिवसापासून तर इतर चौथ्या ते सातव्या दिवसापासून अखेरच्या दिवसापर्यंत मांस, मासे, विड्याचे पान खात नाहीत, बाजेवर झोपत नाहीत व झोपल्यास उलट्या बाजेवर झोपतात कारण त्यांचे इमाम जमिनीवर उभे असताना त्यांनी असे करणे इमामासाठी अपमानकारक होईल. काही मुसलमान या गोष्टींचा दहाव्या दिवशी उपभोग घेतात तर काही मुसलमान दहा ते तेरावा दिवस या काळात निषिद्ध मानतात. विवाहित स्त्रियांनी लग्नानंतरच्या पहिल्या मोहरमच्या सणाच्या दहा दिवसांत आपल्या पतीला तोंड दाखवू नये असे म्हणतात. म्हणून त्या या काळात वेगळ्या राहतात. सफर महिन्याच्या पहिल्या तेरा दिवसांत—जो तेरह तेजी (प्रेषितांचा आजार) म्हणून ओळखला जातो आणि बाराह वफातच्या काळात पहिल्या दिवसापासून ते प्रेषितांच्या उरुसापर्यंत त्या पतीपासून वेगळ्या राहतात. कारण हा काळ शोकाचा असतो, त्यात कोणताही विलास करू नये असे म्हणतात.

मोहरमच्या पाचव्या दिवशी प्रत्येक आशुरखान्याजवळ, श्रीमंत लोक आपल्या दिवाणखान्यासमोर, व्यापारी आपल्या घराच्या आवारात 'पाणपोयी' (आबादरखाना) सुरू करतात. तेथे येणाऱ्या सर्वांना दूध, शरबत, सुगंधमिश्रित थंड पाणी वाटतात. या जागी रात्रीच्या वेळी रोशनाई करतात. हैद्राबादमध्ये या दिवशी आबालवृद्ध स्त्री-पुरुष, विशेषतः अविवाहित आपल्या गळ्यात सुती, रेशमी किंवा केसांची केलेली, फकीर घालीत असलेली, दोरी घालतात आणि मनगटाला गजरा बांधतात. शहाणी माणसे असे करीत नाहीत. कारण हे धर्मशास्त्राच्या विरुद्ध आहे. परंतु हिंदुस्थानमध्ये बंधनकारक (फर्ज) विधींपेक्षा किती तरी अधिक विधी पाळतात. उदा. मुलांच्या तोंडाला अबीर लावणे, स्वतः व लहान मुलांना हिरव्या रंगाचे कपडे घालणे इत्यादी. उच्च वर्गातील व मध्यम वर्गातील काही सन्माननीय मुसलमान फक्त गळ्यात दोरी व मनगटाला फुलांचा गजरा बांधतात.

अनुक्रमणिका

मोहरमच्या काळात पुष्कळ मुसलमान फकिरासारखा पोशाख करून त्यांच्यासारखे जीवन जगतात. काहीजण हा पोशाख पाचव्या दिवसापासून, काही थोडे दुसऱ्या दिवसापासून तर काही अगदीच थोडे सहाव्या किंवा सातव्या दिवशी घालतात.

दक्षिण हिंदुस्थानात या वर्गांपैकी काही खालीलप्रमाणे आहेत : —

ज्यांना अडाणीपणे सुहेलीवाला (सुहेल-सहज साध्य) म्हणतात, पण खरे म्हणजे सेलीवाला फकीर; ते आपल्या गळ्यात रंगीत दोऱ्याचा हार घालतात. आझाद ऊर्फ बेनवा नावाचे फकीरही असेच करतात. ते हुतात्म्यांच्या वाट्याला जे दुर्दैव आले त्यामुळे फकीर झालेले असतात. सेलीवाला फकीर सामान्यत्वे गळ्यात केसाळी घालतात. पण मोहरमच्या काळात हिरव्या किंवा लाल रंगाच्या दोऱ्याचा हार घालतात. विषप्रयोगामुळे मृत्यूनंतर हसनच्या प्रेताचा जो रंग दिसला त्याचे हिरवा रंग हे प्रतीक आहे, तर लाल रंग हे युद्धभूमीवर हुसेनचे जे रक्त सांडले त्याचे प्रतीक आहे. हे हार, अत्तर बनविणारे (अत्तार) किंवा फती, झालरी बनविणारे (पटवा) तयार करतात. ते रंगीत दोऱ्याची सोने किंवा चांदीचा वर्ख लावलेली ‘काकणे’ ही तयार करतात. या ‘काकणांना’ ‘स्मरण’ किंवा ‘गजरा’ असे म्हणतात. हे घालण्यापूर्वी एका तबकात मिठाई, फळे, उन्हात सुकविलेला भात (चुरवा) व चिरागी म्हणजे दिवाबत्तीसाठी पैसे ठेवतात, त्यावर फातिहा म्हणतात. एखाद्या निशाणाला प्रथम गजरा किंवा हार बांधतात आणि त्यानंतर गळ्यात हार घालतात व मनगटाला गजरा बांधतात. एकच काकण बांधावयाचे असेल तर ते फक्त उजव्या दंडाला बांधतात आणि गजरा उजव्या मनगटाला बांधतात. फकिरासारखा पोशाख घालतात. फातिहा म्हटल्यानंतर मुजाविर म्हणजे कबर व्यवस्थापक चिरागी व थोडी फळे घेऊन उरलेल्या वस्तू परत करतो. याशिवाय मोहरमचे फकीर आपल्या दोन्ही दंडावर हिरव्या कापडाच्या पट्ट्या बांधतात तर काही चेहऱ्यावर अबीर फासतात व हातात उदबत्त्या घेऊन भिक्षा मागीत फिरतात.

बेनवा (भौतिक संपत्ती नसलेले) फकिरांना ‘आझाद’ असेही म्हणतात. किंवा ते आपल्या कपाळावर व नाकावर अरबी ‘अलिफ’ या अक्षरासारखी काळी रेष ओढतात त्यामुळे त्यांना ‘अलिफशाही’ असे म्हणतात. ते डोक्यावर इराणी टोपी, शाल किंवा पटका बांधतात. अंगात कफनी घालतात. कफनीवर अरबी अलिफ हे अक्षर लिहिलेले असते, त्यामुळे कफनीला अल्फा असेही म्हणतात. हे फकीर गळ्यात दोऱ्याचा हार (सेली) तसेच जपमाळ घालतात. हातात कडे, कमरेला लुंगी, उजव्या पायात डाल नावाचा अलंकारही घालतात. केव्हा ‘डाल’ ऐवजी ते तोडा घालतात. परंतु या फकिरांपैकी काहीजण पायात कोणताही अलंकार घालीत नाहीत, तोंडाला अबीर फासतात व हातात पंखा, छडी, तलवार किंवा लोखंडी भाला (संग) घेतात.

या वर्गाच्या फकिरांची एक टोळी (गुरोह) असते. टोळीच्या प्रमुखाला मुर्शीद म्हणतात. त्याचे म्हणणे सगळेजण मान्य करतात. मुर्शीदच्या म्हणजे टोळीप्रमुखाच्या (सरगुरोह) हाताखालील पहिला म्हणजे खलिफा असतो. खलिफाचा अधिकार, सरगुरोहच्या खालोखाल म्हणजे राजाच्या खालोखाल जसा वजीर असतो तसा असतो. दुसरा म्हणजे भंडारी शाह (गृहव्यवस्थापक). टोळीतील फकिरांना गोळा करून आज्ञा कळविणारा इजनीशहा हा तिसरा, हालचाली कशा कराव्यात याचे मार्गदर्शन करणारा चौथा, शिस्त ठेवणारा ‘कोतवाल’

पाचवा, मित्र (दोस्त) सहावा, सेनापती (अल हुक्म इलाही) सातवा, ईश्वराचा अधिकार, ‘अम्रइलिल्लाह’ आठवा, नकीब-उल-फुकरा, जो टोळीच्या अग्रभागी राहून इतर फकिरांना उदाहरण म्हणून ईश्वराची विशेषणे उच्चारतो तो ‘फकिरांचा नेता’ नववा असे त्यांचे अधिकार असतात.

या फकिरांची टोळी आशुरखान्यात आल्यावर, हे फकिर आशुरखान्यासमोर दोन तीन रांगा करून उभे राहतात. ‘दोस्त’ आपली उपाधी मोठ्याने सांगतो. कोतवाल ‘जे परमेश्वराला आवडते’ असे म्हणतो. नंतर अल-हुक्म-इलाही उजवीकडून आपले नाव दोनदा सांगतो व त्याचा सहकारी अम्रइलिल्लाह आपले नाव दोनदा सांगतो. यानंतर अदालतशाह स्वतः फातिहाची सुरुवात करतो व शेवटी ‘फातिहा’ असे मोठ्याने म्हणतो. त्यावर सगळे फकीर एकदा फातिहा, तीन वेळा परमेश्वर एकच आहे हे सांगणारी कुराणची सुरा, नंतर आशीर्वचन (दुरूद) असे क्रमाने म्हणतात व शेवटी आपले हात तोंडावर फिरवितात. नंतर अदालतशाह धर्मकायद्याचे महत्त्व विशद करतो. त्यावर सगळेजण, अलीला आवाहन, ‘एक नारा-इ-हैदरी’ असा प्रतिसाद देतात. मग सगळेजण ‘याहू’ (हे परमेश्वरा) असा प्रतिसाद देतात. पुन्हा तो महंमद, अली, फातिमा, हसन, हुसेन या पवित्र पाचांना आवाहन करतो: एक नारा पंजतन, ते ‘याहू’ असे उत्तर देतात, पुन्हा तो अबुबकर, उमर, उस्मान व अली या चारांना आवाहन करतो, यावरही सगळेजण ‘याहू’ म्हणतात. करबलाच्या मैदानावर हुतात्मे झालेल्यांना त्याने शेवटी आवाहन केल्यावर बाकीचे फकीर पूर्वीसारखेच उत्तर देतात.

नंतर अदालतशाह ‘हे परमेश्वरा, तूच खरा परमेश्वर आहेस, आणि तुझ्याशिवाय दुसरा कोणीही ईश्वर नाही’ असे मोठ्याने सांगतो. यावर बाकीचे फकीर ‘परमेश्वर एकच आहे त्याच्याशिवाय दुसरा ईश्वर नाही; महंमद त्याचा धर्मप्रचारक आहे’ असे म्हणतात. नंतर तो म्हणतो, ‘हे परमेश्वरा, मला तुझी पायधूळ दे’; बाकीचे ‘माझ्या डोळ्यांसाठी काजळ म्हणून’ असे म्हणतात. आशूरखान्यातून जेव्हा ते जाण्यासाठी निघतात तेव्हा नकीब-उल-फुकरा ‘तुमच्या श्वासावर पहारा ठेवा’ असे म्हणतो. याचा अर्थ तोंडाने नेहमी ईश्वराचे नाव घ्या; चालताना पायावर नजर ठेवा म्हणजे सतत कलमा म्हणा; आपल्या मायभूमीचा प्रवास करा म्हणजे परमेश्वर व त्याच्या ग्रंथांचे मनन करा, असे म्हणतो. तसेच ‘गर्दीमध्ये असतानाही ईश्वराचे अवधान सोडू नका’, ‘पवित्र पाचांच्या कृपेने, हे अली, मला मदत कर’ असे अदालतशाह म्हणतो.

या फकिरांची टोळी एखाद्या आशूरखान्यात थांबल्यास आशूरखान्याचा व्यवस्थापक त्यांना हुक्का, शरबत व शक्य झाल्यास वरणभाताचे जेवण देतो. या फकिरांना दसमासी ‘दहा महिन्यांचे’ म्हणजे मोहरममधील दहा दिवसांचे फकीर म्हणतात. बारमासी फकीर यापेक्षा वेगळे असतात. ते वर्षभर कायम फकीर असतात. परस्परांना ते ‘या हादी अल्ला’, ‘हे मुर्शीद अल्ला’, ‘हे हुसेन’, ‘हे इमाम’ असे संबोधतात. एखाद्या माणसास हाक मारायची झाल्यास ते बावा, दाता, दुनियादार असे म्हणून हाक मारतात. पैसा हा ‘क्षुल्लक’ आहे असे ते म्हणतात. ते संबूल खातात व संबूल विकत घेण्यासाठी लोकांकडून पैसे मागतात. एखाद्याने भीक घालण्याचे नाकारल्यास, ‘उदार लोक मरण पावले आहेत व फक्त चिक्कूच मागे राहिले आहेत, लोक देत घेत काहीच नाहीत, इतकेच नव्हे तर आमच्याशी भांडायला उठतात’ असे ते म्हणतात. जाण्यासाठी निघताना फकिरांचा नेता म्हणतो, ‘ जग वाऱ्याने भरले तरी ते सत्याचा प्रकाश विझवू शकणार नाही’, ‘देणाऱ्याला साखर न देणाऱ्याला ठोसा’. यावर ते ‘आम्ही स्वर्गाच्या मार्गावर आहोत व प्रेषितावर आमची श्रद्धा आहे असे म्हणतात.

अनुक्रमणिका

या फकिरांचा दुसरा वर्ग ‘मजनू’ हा आहे. मजनू म्हणजे ‘जिनची बाधा झालेला वेडा.’ ते विदुषकासारखी टोपी घालतात. ही टोपी कागदाची असून तिला रस्त्यावर लोळेल इतका लांब कागद लावलेला असतो. तसेच ती सुवर्णपानाने (बेगडाने) सजविलेली असते. काही वेळा ही टोपी कंदिलाच्या आकाराची काचेच्या भिंगाची असते व तिला बाहेरून लाल कागदाच्या जाळीच्या पट्ट्या लावलेल्या असतात. रात्रीच्या वेळी फिरताना या टोपीच्या आतून ते मेणबत्ती ठेवतात. ते क्वचित टोपीऐवजी शाल, लाल चादर वापरतात. तर काहीजण डोक्याला पिकलेल्या लिंबाची माळ बांधतात. ते आपल्या गळ्याभोवती लाल, पिवळा किंवा पांढऱ्या रंगाचा गळपट्टा गुंडाळतात किंवा रुमालात कड्या घालून तो रुमाल गळ्याला बांधतात. ते आपल्या अंगाला चंदन आणि ‘खरी’ (चिलीम तयार करण्याची माती) फासतात. प्रत्येक दंडावर दोन तीन रुमाल किंवा क्वचित बाजूबंद बांधतात; चोळणा घालतात. तसेच चाबूक, कट्यार, मारू नावाचे सारंगाच्या शिंगापासून बनविलेले शस्त्र, सांग अथवा छडी बाळगतात. पायात घुंगरू बांधतात. काहीजण पायाच्या अंगठ्यात बिचवा घालून त्याच्या टोकावर लिंबे खुपसतात व प्रत्येक दंडाला लिंबू बांधतात. अशा प्रकारे सज्ज होऊन ते आशूरखान्यात जाऊन डफाच्या तालावर, नाचातील चार आकृतीबंध ते फेर धरून नाचतात व ‘अली! अली! अली! भूम’, असे म्हणतात.

लैला नावाचे फकीर यांनी आपले हे नाव इराणी कवी, विशेषतः निजामी यांच्या लैला-मजनूच्या प्रसिद्ध बेद्दुइँ प्रेमकथेवरून घेतले आहे. लैलाची भूमिका करणारा माणूस आपल्या सर्वांगास रुई चिकटवितो. त्याच्या हातात प्याला, क्वचित चंदनचूर्ण किंवा शरबताने भरलेला असतो किंवा नरोटी, मानवी कवटी आणि पंखा असतो. त्याच्या डोक्यावर कागदाची त्रिकोणी टोपी असते.

भरंग (मूर्ख बडबड्या) नावाचा मोहरममधील फकीर आपल्या सर्वांगाला गेरू फासतो. त्याच्या डोक्यावर शाल, हातरुमाल किंवा रंगीत कापड असून त्यात लहान झेंडा असतो. तो मजनूप्रमाणे खांद्यापर्यंत असणारा पट्टा (हामेल) वापरतो. तो विजार घालतो, पायाला घुंगरू बांधतो आणि नाचत असताना ‘अली! अली! अली! जंग!’ व स्वतःच्या ढुंगणावर आपल्या टाचा मारतो.

मलंग नावाचा फकीर जिंदा शाह मदारचा शिष्य जमन्जती याचे शिष्य आहेत असे म्हणतात. अतिरिक्त प्रमाणात गांजा ओढणाऱ्या, फक्त कमरेला लुंगी असणाऱ्या, नेहमी विस्तव जवळ बाळगणाऱ्या, लांब केस राखून त्यांची मागे गाठ पाडणाऱ्या, कोणत्याही संघटित पंथात न बसणाऱ्या भिक्षूस ‘मलंग’ ही संज्ञा लावतात. मलंग फकीर हे धर्माने अर्धे हिंदू, अर्धे मुसलमान असतात. हैद्राबादमध्ये मोहरममध्ये मलंग फकिराची बतावणी करणारे जे असतात ते केसात लोखंडी कडी घालून केसाची गाठ पाडतात आणि तिच्या भोवती लाल दोरा, सोनेरी अथवा रुपेरी किनारा व अरुंद पट्टी बांधतात. ते प्रत्येक हातात दोन तीन लोखंडी कडे घालतात. हातरुमाल (गुलुबंद) एका काखेतून घेऊन त्याची दोन्ही टोके विरुद्ध बाजूच्या खांद्याला बांधतात. ते गळ्यात मण्यांची माळ किंवा जपमाळ घालतात. कंबरेला पट्टा बांधतात (कमरबंद). उजव्या पायात पैजण घालतात (डाल). ही माणसे भटकत असताना आशूरखान्याला भेट देतात. ते आपली पैंजणे वाजवून, ‘शाह मदाराचा जय असो, त्याला नमस्कार’ असे ओरडत फिरतात. नंतर एकजण लोकांना उद्देशून ‘तुमच्याजवळ जे असेल ते परमेश्वराकडे जाणाऱ्या मार्गात खर्च करा, दान केल्याशिवाय कल्याण होणार नाही’ असे म्हणतो.

अंगीठी शाह नावाचा मोहरममधील फकीर डोक्याला काही घालीत नाही किंवा फक्त लाल किंवा हिरव्या रंगाचा दोरा डोक्याभोवती बांधतो. तो लुंगी घालतो व कंबरेला लोखंडी साखळी बांधतो. तो आपल्या शरीराला 'खरी' किंवा विभूत फासतो. तो तळहातावर खापराचा कटोरा (अंगीठी) घेतो. या कटोऱ्यात तो पेटलेले कोळसे ठेवतो. त्याच्या हातात एक चिमटा (दस्तपनाह) असतो. आशूरखान्यात आल्यावर तो लोखंडी साखळीचे तापलेले एक टोक तेलात बुडवितो त्यामुळे तिचा तापलेला भाग चटकन पेट घेतो. पाहणाऱ्यांना याचे आश्चर्य वाटते की, त्याच्याजवळ विस्तव असूनही त्याला चटका कसा बसत नाही. पण खरे म्हणजे तो कटोऱ्याच्या तळाशी कोरफडीचा गर व शेण ठेवून त्यावर पेटलेले कोळसे ठेवतो. या वस्तू थंड असल्यामुळे कटोरा त्याच्या हाताला पोळत नाही.

सिद्दी किंवा सय्यादी नावाचा मोहरमचा फकीर हा अफ्रिकन निग्रोसारखा असतो; दहाबाराजण आपले शरीर तेल व काजळाचे मिश्रण लावून काळे करतात. ते डोक्यावर बकऱ्याच्या कातड्याची किंवा घोंगडीची टोपी घालतात, कमरेला घोंगडी किंवा पोत्याची लुंगी बांधतात. त्याच्या डाव्या हातात बांबूचे धनुष्य व उजव्या हातात नारळ बांधलेली लहान काठी असते. क्वचित नारळावर घुंगरू लावलेले कापड झाकतात. ते काठी हलवितात व घुंगराच्या आवाजावर नाचतात. काही वेळा ते डाव्या हातात मुसळ घेऊन त्याला उजव्या हातातील काठी हाणतात, वेडेवाकडे हातवारे करून निग्रोच्या हेंगाड्या बोलण्याची नक्कल करतात किंवा त्यांच्यापैकी एकजण निग्रो स्त्रीसारखा पोशाख करतो, चेहरा पुरुषासारखा काळा करतो. तो स्त्री आहे हे लोंबत्या स्तनामुळे कळते. निग्रो स्त्रीची नक्कल करणारा पुरुष जमिनीवर मुसळ आदळतो व बाकीचे 'तिच्या' भोवती नाचतात आणि 'तिची' थट्टा करतात.

बगळा किंवा बगुळा नावाच्या फकिरांपैकी सारख्या उंचीचे दहाबाराजण आपल्या अंगाला राख फासतात, डोक्यावर पांढऱ्या कागदी टोप्या घालतात व कंबरेला लुंगी बांधतात. ते एकमेकांच्या कमरेला धरून बगळ्याच्या आवाजाची नक्कल करीत फिरतात. त्यांच्यापैकी एकजण स्वतःला बहरीशाह (बहिरी ससाणा) म्हणवतो व बाकीच्यांना पकडण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा ते गर्दीत लपून बसतात. क्वचित ते एखाद्याला पकडतात व तो निसटून जाऊ नये म्हणून त्याच्या भोवती फेर धरून नाचतात.

कौआ शाह (कावळा) नावाचे फकीर शरीराला 'खरी' फासतात, घोंगडीचा कोट घालतात. डोक्याला व गळ्याभोवती दोऱ्या गुंडाळतात. ते थट्टामस्करी करीत, हातात कावळा किंवा बेडूक किंवा झाडाच्या फांदीला पायाने बांधलेला कावळा घेऊन फिरतात.

हातकटोरेवाला नावाचे मोहरमचे फकीर आपल्या डोक्याला शाल, दोऱ्या किंवा कपडा बांधतात; गळ्यात लाल, हिरव्या किंवा पिवळ्या रंगाचा रुमाल बांधतात, तोंडाला चंदनलेप लावतात. ते हातात कटोरा घेऊन मोहरमची शोकगीते, युद्धकथा किंवा थोर पुरुषांची स्तुतिगीते गात भीक मागीत फिरतात. भीक मागताना ते 'हे बाबू, भाई, अल्ला आम्हांला पैसे द्या, त्याला, जो दुधाचे भांडे देतो, असे म्हणतात.

जलाली अथवा खाकी या नावाचा फकिरांचा एक पंथ आहे. हा पंथ सय्यद जलालुद्दीनने स्थापन केला. तो मुलतानचा प्रसिद्ध सुऱ्हावर्दी संत बहावल हकचा शिष्य होता आणि त्याची कबर बहावलपूर राज्यातील उछ

या ठिकाणी आहे. खाकी म्हणजे ‘धुळीने माखलेला’. जलाली फकिरांचा ठराविक असा पोशाख नसतो. पण ते आपल्या डोक्यावर विविध आकाराच्या चित्रविचित्र टोप्या घालतात. पटके (कातडे किंवा हातरीचे बनविलेले) बांधतात. गळ्यात जपमाळा किंवा फळांच्या माळा घालतात. त्यांच्यापैकी काहीजण आपले चेहरे अर्धवट काळे करतात. शरीराला ‘खरी’ फासतात. गळ्यात फुलांचे हार घालतात, आपल्या अंगावर वाळलेले कोहळे लोंबते सोडतात. यांच्या टोळीपैकी एकजण हातात बाहुली घेतो, ती कुरूप स्त्रीची प्रतिमा असते. व तो पाहणाऱ्यापैकी एखाद्याला तुझी ही आजी आहे असे म्हणतो. काहीजण चामड्याची बनविलेली गदा हातात घेऊन त्यांच्या मार्गात येणाऱ्या कोणाही गरीब स्त्रीपुरुषाला ती मारतात.

नक्षबंदी हे ख्वाजा पीर मुहंमद नक्षबंद यांचे अनुयायी आहेत. नक्षबंद या शब्दाचा अर्थ सुती कापडावर नक्षी काढणारा असा आहे, अफगाण लोक या फकिरांना विशेष मान देतात. ते स्थिर व शांत बसून डोके खाली वाकलेले व दृष्टी जमिनीवर खिळलेली अशा अवस्थेत उपासना करतात. त्यांचा पोशाख पूर्वी वर्णन केलेल्या बनावाप्रमाणेच असतो. पण त्यांच्यापैक्षा सदरा (कुर्ता) अधिक असतो. त्यांचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या हातात पेटलेला कंदील असतो व ते फक्त रात्रीच्या वेळी भीक मागत फिरतात. त्या कंदिलाला दोन खाने असतात. एक तेलाचा व दुसरा मिळालेली भिक्षा ठेवण्याचा. ते बाजारातून परमेश्वराची स्तुती व प्रकाशाचे सद् गुण गात हिंडतात. ‘तुम्ही लक्षावधी रुपये खर्चून महाल बांधला व त्यात दमडी किंमतीचा दिवा नसेल तर तो निरर्थक आहे’ असे ते म्हणतात. पुरुष, स्त्रिया, लहान मुले त्यांच्या मागोमाग जातात. एखाद्याने त्यांच्याकडे मूल आणल्यास ते त्याच्या चेहऱ्यावर वातीचा गुल चोळतात. त्यामुळे मूल किरकिरे व दुष्ट स्वभावाचे होत नाही, असे मानतात.

हाजी अहमक ‘मूर्ख यात्रेकरू’ नावाचे मोहरमचे फकीर लांब टोपी, सदरा, कोट व गळ्यात हार घालतात. त्यांच्यापैकी प्रत्येकाजवळ मोठी जपमाळ, लाकडी परात व लांब काठी असते. त्यांना कमरेपर्यंत येतील इतक्या लांब दाढीमिशा असतात. अंबाडीची बनविलेली केसाळ टोपी व खूप मोठे कृत्रिम पोट असते. आशूरखान्यासमोर येऊन उथळ प्रकारचा थट्टा-विनोद करतात.

दोन पुरुष म्हातारा व म्हातारीचे सोंग करतात. त्यांपैकी एकजण म्हाताऱ्याचा मुखवटा घालतो तर दुसरा म्हातारीचा मुखवटा व मोठी नथ घालतो. ते रंगमंचावर येऊन उथळ प्रकारचा थट्टा-विनोद करतात.

वाघ नावाचा मोहरमचा फकीर वाघाचे सोंग करतो. तो आपल्या तोंडात मांसाचा तुकडा धरतो व मुलांच्या दिशेने उड्या मारतो.

मटकी शाह नावाचे फकीर यांचे सोंग काही जलाली फकीर करतात. ते एका मडक्यात हरबरे घेऊन ते मडके हलवितात. त्यामुळे हरबऱ्यांचा नाद होतो. या हरबऱ्यांपैकी थोडे ते लोकांना देतात व नंतर आपल्या तोंडात कोंबतात व हास्योत्पादक गाणी म्हणतात.

चटणी शाह नावाचा मोहरमचा फकीर जलाली फकिरासारखा पोशाख करतो व 'मी काजी, कोतवाल, सुभेदार यांच्यासाठी चटणी तयार करीत आहे.' असे म्हणून उखळीमध्ये चटणी कुटतो. काही वेळा तो चटणीत मादक पदार्थ मिसळतो व ती लोकांना खाण्यास प्रवृत्त करतो.

हकीम 'वैद्य' नावाचा फकीर बेनवासारखा पोशाख करतो व जडीबुटीच्या पिशव्या घेऊन घोड्यावर बसतो व हास्योत्पादक भाषणे करीत फिरतो. एखाद्याने त्याला आपली नाडी दाखवली तर तो त्याच्या हाताला खाज सुटणारी वनस्पती लावतो.

मुसाफीर शाह (प्रवासी) हा बेनवासारखा पोशाख करतो. आपण प्रवासी असल्याची बतावणी करतो, स्वतःच स्वयंपाक करतो आणि शिजवलेले अन्न वाटून टाकतो.

मुगल नावाच्या फकिराजवळ जपमाळ व काठी असते. त्याच्याबरोबर सेवक असतात. त्या प्रत्येकाची बेग, गाजर, शलगम, मिरची, बैंगन अशी नावे असतात. तो त्यांच्याबरोबर थट्टामस्करी करतो.

ब्याजखोर हा विनोद करतो, आपला जमाखर्चाचा हिशेब देण्याची बतावणी करतो व पैसे मागतो.

मुर्दफिरोश हा प्रेताची प्रतिमा घेऊन हिंडतो. त्याने ती दूर न्यावी यासाठी लोक त्याला पैसे देतात. एखाद्याने त्याला पैसे देण्याचे नाकारले तर तो 'केस, मिरच्या व इतर दुर्गंधी वस्तू एका थाळीत जाळतो व मृत्यूनंतर तुमच्या आत्म्यांना असा वास येईल' असे म्हणतो.

झाडशाह हा जलाली फकिरासारखा पोशाख करतो. तो हातात लहान झाड घेतो, त्यावर विविध प्रकारची फळे लटकवतो व एका फांदीला कावळा बांधतो व 'काळजी घ्या! वाकून उभे राहा! काळ्या घुबडाने फळांच्या राजाचा नाश केला आहे! दूर व्हा!' असे ओरडतो.

जोगी हा हिंदू संन्याशांचा एक पंथ आहे. त्यांच्यासारखे पोशाख केलेले काही मुसलमान पुरुष गितार, डफ, ढोलकी वाजवीत, गाणी व शोकगीते गात आशूरखान्यात येतात.

बकाल हा हिंदु व्यापाऱ्याप्रमाणे असतो. अरबी व फारसी भाषेत त्याला भाजीविक्या म्हणतात. तो पटका बांधतो. कपाळावर भस्म व गंध लावतो. कानात हिंदुंसारखी भीकबाळी घालतो. हातात कडे, सोने, चांदीच्या अंगठ्या घालतो. किल्ल्यांचा जुडगा बांधलेला करगोटा व कंबरेभोवती कापड गुंडाळतो. त्याच्या हातात लोखंडी पत्रा व ताडाच्या पानांचा जुडगा असतो, या पानांवर तो आपले हिशेब लिहितो. त्याच्याबरोबर एक शिपाई जातो. तो शिपाई त्याला 'हे मूर्खा, तू मला जास्त भाव लावला' अशी धमकी देतो. आपल्याला जणू काही समजलेच नाही असे ढोंग करून तो उलट त्याला शिव्या देतो.

लग्नाच्या वेळी नवरदेवाची भुताखेताच्या दृष्टीपासून सुटका करण्यासाठी जो मुलगा त्याचे प्रतिनिधित्व करतो त्याला शाहबाला म्हणतात. शाहबाला हा मुलीसारखे कपडे व दागिने घालून स्टेजवर येऊन बसतो.

समोर बसलेले लोक त्याला चिडवतात व हसविण्याचा प्रयत्न करतात. त्याच्या चेहऱ्यावर स्मिताचे चिन्ह दिसल्यावर स्टेजचा पडदा टाकण्यात येतो व तो पुन्हा शांतगंभीर झाल्यावर पडदा उघडण्यात येतो.

एक माणूस मोहरममध्ये 'सर बेतन' म्हणजे शरीरविरहित डोके व 'तन बेसर' म्हणजे डोकेविरहित शरीर दाखविण्याची युक्ती करतो. तो एका भोकात किंवा बिछान्याखाली आपले डोके लपवितो व शरीर दिसू देतो तर दुसरा एकजण आपले डोकेच फक्त जमिनीच्या वर राहील अशा रीतीने जमिनीत स्वतःला गाडून घेतो. त्याच्याजवळ रक्ताने माखलेली तलवार ठेवतात व ती जमीन रक्ताचे डाग पडल्यासारखी लाल करतात. किंवा दोन पुरुष लुटारूंचे व एकजण स्त्रीचे सोंग करतो. स्त्रीचे सोंग करणारा पुरुष, 'या लुटारूंनी माझ्या नवऱ्याला (किंवा भावाला)ठार मारले, त्याच्या उत्तरक्रियेसाठी मला काही तरी द्या' असे म्हणतो. 'डोकेविरहित शरीर' हे दृश्य उत्तर हिंदुस्थानमधील जत्रांमध्ये दिसणारे नेहमीचे दृश्य आहे.

नकली शाह 'गोष्ट सांगणारा' हा जलाली फकिरासारखा पोशाख करतो. तो आपल्याबरोबर कुत्रा, मांजर, उंदीर, कावळा आणि गाढव आणतो व गंमतीच्या गोष्टी सांगतो.

कंबलशाह नावाचे मोहरमचे फकीर दोघे-तिघेजण एका घोंगडीला भोक पाडून त्यातून डोकावत व पुढीलसारखी वाक्ये म्हणतात— 'माझ्या लग्नाच्या वेळी एक कोंबडा कापला आणि अच्छेर तांदूळ हजार लोकांना वाटला. सगळयांना एक पैसा दिला, पण हिशेब तपासला तेव्हा पाउण पैसा शिल्लक राहिला' किंवा 'माझ्या आईने प्रेमळपणे माझे पालनपोषण केले. तिने मला घोंगडी पांघरली व घराबाहेर घालविले.

खोगीरशाह हा जलाली फकिरासारखा पोशाख करतो. आपल्या मानेवर खोगीर घालतो व डोक्याला लाल, पांढऱ्या पट्ट्या बांधतो आणि मुलांचा पाठलाग करण्याचा अभिनय करतो. किंवा तो म्हणतो, 'प्रत्येक गल्लीत मला मिठाईचे ढीग दिसले व नाकात नथ घातलेली एक स्त्री त्या ढिगांकडे आधाशीपणे पाहत होती.'

शराबी हा जलालीसारखा पोशाख करतो. त्याच्या कपाळावर अरबी अलिफसारखे अक्षर काढलेले असते. तो हातात शरबत व पाण्याने भरलेला प्याला घेऊन दारूची प्रशंसा करणारी आणि कुराणातल्या श्लोकांसारखी नकली गीते गातो आणि मोकळेपणाने प्याल्यातून शरबत पितो. तो व दुसरा एखादा मोहरमचा फकीर मिळून दारू व डुकराचे मांस यांच्या वापराबद्दल बरीच चर्चा करतात. क्वचित 'शराबी' च्या गळ्यात हिंदु ब्राह्मणासारखे परंतु कातड्याचे जानवेही असते.

काजी-इ-लइन, काजी-बे-दीन 'शापित व अधार्मिक काजी' हा बिनबाह्यांचा सदरा घालतो. त्याच्या दाढीमिशा तागाच्या बनविलेल्या असतात आणि जपमाळेचे मणी मोजीत इस्लामच्या कायद्याविरुद्ध असलेल्या अनेक विसंगत गोष्टींचा उपदेश करतो.

नव्वाब हा आपल्या सर्वांगाभोवती पेंढा गुंडाळतो, याचाच मोठा पटका किंवा टोपी घालतो, तागाच्या बनविलेल्या दाढीमिशा लावतो. तो बरोबर सेवक घेऊन घोड्यावर बसून हिंडतो. त्याच्या सेवकांच्या हातात

विचित्र प्रकारचा हुक्का असतो. तो आपल्या सेवकांना नेहमी हुकूम देतो आणि घोड्यावर स्वार होताना बहुधा तो दुसऱ्या बाजूने खाली पडतो.

मेख शाह हा जलालीसारखा पोशाख करतो व तंबूच्या खुंट्या एका दोराने आपल्या कंबरेला बांधून ओढीत नेतो. जो आपल्याकडे पाहण्याचे अगर आपणाला बोलण्याचे धाडस करील त्याला आपण हातोड्याने खुंटी ठोकू अशी तो धमकी देतो.

खोदँ-गाडूँ, 'खोदणे, पुरणे' हा डोक्यावर पेंढ्याची टोपी किंवा पटका बांधतो, त्याच्यासभोवती दोरा गुंडाळतो. गळ्यात चटई घालतो, तीमुळे त्याचे सर्वांग झाकते. तो कमरेला दोऱ्या गुंडाळतो. त्याच्या खांद्यावर कुदळ व पाठीचा पडदा असतो. तो पुढील गाणे म्हणत भटकतो—'मला वाटेल त्याला मी खाली पाडतो व पुरतो. लहान कबर तयार करण्यास मी शंभर रुपये व मोठ्या कबरीसाठी पाच रुपये घेतो.' नंतर तो एखाद्या गावढळ माणसाला पकडून त्याला पुरण्याचे सोंग करतो.

हुनर हुसेनचे फकीर, दोघेजण बेनबासारखा पोशाख करतात. मात्र त्यांचे सदरे लाल गेरूने रंगवलेले असतात. ते कानावर नैसर्गिक किंवा कृत्रिम केसांची झुलपं ठेवतात. एका सुपात गवऱ्या ठेवून ते सुंदर हातरुमालाने झाकतात. त्यावर फुले ठेवतात. एका हातात हे सूप व दुसऱ्या हातात चवरी घेऊन पुढील वाक्ये म्हणत फिरतात—'चमत्कारी सत्पुरुषांचे अवशेष येथे झाकून ठेवले आहेत. जो कोणी त्याच्या कबरीला प्रदक्षिणा (तवाफ) घालील त्याला नरकातील अग्नीचे दुःख जाणवणार नाही. म्हणून त्या सत्पुरुषाला आपल्या इच्छा सांगा.' एखाद्या माणसाने ते अवशेष दाखवा असे म्हटल्यास ते त्याला सुपातील गवऱ्या दाखवतात, त्यामुळे पाहणारा लज्जीत होऊन परततो.

नानकशाही किंवा नानकपंथी हे शिख संत नामक (इ.स. १४६६-१५३९) यांचे अनुयायी असतात. चार पाच पुरुष हा पोशाख करतात. त्यांच्या गळ्याभोवती रंगीत दोऱ्या गुंडाळलेल्या असतात, कपाळावर मध्यभागी काळा ठिपका असतो, चेहऱ्यावर चंदनलेप असतो. तावीज म्हणून असलेली कुराणची एक लहान प्रत गुंडाळून ठेवलेला रुमाल ते गळ्याला बांधतात. त्यांच्या गळ्यात राजे लोक वापरतात तसा शंखूंचा हार असतो आणि कमरेभोवती दोन रंगीत वस्त्रे असतात. ते हातात एक दोन गदा बाळगतात व आशूरखान्यात जातात आणि तेथे गेल्यावर एका गदेला दुसरी गदा हाणीत हुसेनच्या मोठेपणाची गाणी म्हणतात.

घागरीवाला या मोहरमच्या फकिरांना असे म्हणण्याचे कारण म्हणजे ते आपल्या हाताच्या अंगठ्यात घुंगरू असलेल्या पितळी अंगठ्या (घागरी) घालतात. त्यांचा पोशाख पांढऱ्या किंवा लाल रंगाचा असतो. ते आपल्या तोंडावर व अंगावर राख फासतात, डोक्यावर झालर लावलेले कापड गुंडाळतात; कानावर पंखाचा तुरा लावतात. प्रत्येक हाताला मजनूसारखे हातरुमाल बांधतात व कडे (बाजूबंद) घालतात. ते कमरेला लुंगी बांधतात, पायात तोडा घालतात. त्यांच्यापैकी एकजण हातात तोडा घेऊन सगळ्यात पुढे चालतो. दोघेजण हातात पांढऱ्या, हिरव्या किंवा लाल रंगाची निशाणं घेतात. अदालतशहा सोडून त्यांच्यापैकी सगळेजण उजव्या हाताच्या अंगठ्यात 'घागरी' घालतात. हुतात्म्यांचे पोवाडे आणि हुसेनची स्तुतिगीते गाताना ते 'घागरी' वाजवितात. त्यांच्यापुढे एक दोन रमनिया म्हणजे नर्तक मुले हातात रंगवलेले व आत वाळू ठेवलेले मडके

घेऊन किंवा चवरी घेऊन नृत्य करतात. ते प्रत्येक शोकगीत संपल्यावर बसून किंवा वाकून नृत्य करतात. घागरीवालांपैकी नेते मिरवणुकीच्या दोन्ही अंगांनी चालतात. मिरवणुकीच्या अग्रभागी दोघेजण भाले किंवा रंगीत कागद गुंडाळलेले बांबू घेऊन चालतात. घोडेस्वार थांबले म्हणजे मिरवणूक थांबली की ते आपले भाले एकमेकांना तिरपे बांधतात व तेथे उभे राहतात. हेतू हा की इतर घोडेस्वारांनी दूर व्हावे. ते आपल्या भाल्यांच्या गौरवाची गीतेही म्हणतात.

गारूडीशाह हे जलाली फकिरासारखा पोशाख करतात. त्यांच्यापैकी प्रत्येकाच्या पटक्यात पंखाचा तुरा असतो व प्रत्येकापाशी गारुड्याजवळ असते तशी एक पुंगी असते. अशा प्रकारे फिरत असताना ते जेव्हा एखाद्या ठिकाणी थांबतात तेव्हा ते काही करामती करून दाखवितात.

चिंधीशाह हा गळा ते पायापर्यंतच्या शरीराला चिंध्या गुंडाळतो व एकही शब्द न बोलता बाजारातून हिंडतो.

खंदरशाह हा गुडघ्यापर्यंत पोचेल असा चोळणा घालतो व अंगावर चिंध्या, फाटकी रजई (खंदरी) टाकतो. ते परस्परांना फाटक्या हातरुमालांनी मारतात व आशूरखान्यात आल्यावर तेथे जमिनीवर गडबडा लोळतात.

गलीझ शाह, 'अस्वच्छ', याच्या कपाळावर काळा ठिपका, गळ्याभोवती चामड्याचा पट्टा व कमरेला लुंगी असते. आपल्या अंगावर माशा बसाव्या म्हणून तो आपल्या अंगाला मध लावतो व हास्यास्पद व उपरोधिक गाणी म्हणत फिरतो.

रीछ शाह, 'अस्वल', हा बकरीच्या केसाळ कातड्याचा पोशाख घालतो व त्याचे दोघे तिघे सहकारी घोंगडी पांघरतात आणि अस्वलासारखा आवाज काढून स्त्रिया व मुले यांना भेडसावतात.

बुडबुडगा शाह हे सामान्यत्वे दक्षिणेतील चुडबुडकेवाले यांच्यासारखे किंवा भिकाऱ्यासारखे दिसतात. हैद्राबादमध्ये बुडबुडगा शाह हे विविधरंगी पटके बांधतात. त्यांच्यापैकी प्रत्येकाजवळ चुडबुडके असते. एखादा माणूस येताना दिसला की ते त्याला, "मी आज शुभ-शकुन पाहिला की तुम्हांला संपत्ती प्राप्त होईल, पालखी, हत्ती व घोडा मिळेल" असे म्हणतात. त्यांना भेटणाऱ्यांना ते आशीर्वाद देतात व चुडबुडके वाजवितात.

मारवाडी नावाचे मोहरमचे फकीर मारवाडी लोकांसारखा पोशाख करतात. त्यांच्या हातात हिशेबाच्या वह्या, कानावर लेखणी असते. खापरांच्या तुकड्यांनी भरलेल्या पिशव्या ते पैशाने भरलेल्या आहेत असे भासवीत जवळ बाळगतात. ते रस्त्याने मोठ्या डौलाने चालत जातात व म्हणतात की, 'आपण जरी चाललो आहोत म्हणून आपला हिशेब चुकता करून घेऊ या'. त्यांना खरेखुरे भेटले तर त्यांना त्रास देण्यासाठी हे फकीर हलक्या प्रकारचे विनोद करतात.

उंटशाह कागदाने आच्छादिलेला बांबूचा उंट करतात व त्यात मध्यभागी असणाऱ्या छिद्रात एकजण उभा राहतो व मदारीचे काम करतो.

मुसलमान स्त्री-पुरुष असा एक नवस बोलतात की, आपणाला मूल झाल्यास तीन, बारा वर्षे किंवा मुलाच्या हयातभर दरवर्षी मोहरममध्ये आपण लंगर काढू (लंगर निकालना). ते मोहरमच्या चौथ्या किंवा सहाव्या दिवशी लंगर काढतात. म्हणजे मुलाच्या गळ्यात फुलांचा हार घालतात किंवा तुळशीची पाने बांधलेली दोरी बांधतात. क्वचित त्या दोरीला जमिनीवर लोळेल अशी लांब लोखंडी साखळी लंगर म्हणून बांधतात. मुलाच्या हातात उदबत्त्या व निशाण देतात. इतर मुले नारळाची पाने किंवा लहान ध्वजांचा चांदवा त्या मुलाच्या डोक्यावर धरतात. ते मिरवणुकीने आशूरखान्यात जातात. शरबताने भरलेले भांडे घेऊन काही मजूर मिरवणुकीबरोबर घेतलेले असतात. ही मिरवणूक रात्रीच्या वेळी काढली तर दारूकाम उडवितात. रस्त्याने जाताना ते मोठ्याने ‘शाह हुसेन! या इमाम! या अली!’ असे म्हणत जातात. आशूरखान्यात आल्यावर कुंडाभोवती (अलावा) तीन फेऱ्या मारतात व त्यात लाकडे टाकतात. आशूरखान्याचा व्यवस्थापक अन्नावर फातिहा म्हणतो. त्या कुंडात त्यानंतर थोडे शरबत टाकतात व सेवकांना जेऊ घालतात. इतर लोक, मुसलमान तसेच हिंदूही, आपणाला मूल झाल्यास आपण निशाण, शरबत, चिरागी, सुगंधी द्रव्ये, फुले वाहू असा नवस बोलतात. श्रीमंत लोक लंगर काढताना हत्तीवर बसून काढतात. मिरवणुकीत वाजंत्री, नर्तिका असतात आणि त्या शोकगीते म्हणतात. कधी कधी वाहावयाच्या वस्तूवर चांदवा धरलेला असतो व या वस्तू वाहणारी व्यक्ती अंबारीत किंवा हत्तीवर बसलेली असते.

मुस्लीम स्त्रिया अनेकदा मोहरमच्या वेळी फेडावयाचे नवस बोलतात. माझा मनोरथ पूर्ण झाला तर मी आशूरखान्याजवळची जमीन माझ्या ओल्या केसांना झाडीन किंवा अग्नीने माझे डोके धुईन असा नवस एखादी स्त्री बोलते. दुसऱ्या प्रकारचा नवस फेडण्यासाठी आशूरखान्याचा व्यवस्थापक तिच्या डोक्यावर चादर टाकतो व त्यावर झाऱ्याने थोडा विस्तव टाकतो व नंतर तो विस्तव लगेच झटकून टाकतो. किंवा एखादी स्त्री , माझी मनोकामना पूर्ण झाली तर मी उपवास करीन व तो भिक्षेचे अन्न खाऊनच सोडीन असा नवस बोलते. किंवा एखादी स्त्री, मी तुपाचा दिवा लावीन, अन्नावर फातिहा म्हणवून घेईन किंवा एखाद्या निशाणावर फूल (गेंदगवारा) लावीन असे म्हणते. या स्त्रिया मोहरमच्या वेळी आपले नवस फेडतात. काही स्त्रिया, काही घरी भिक्षा मागतात व त्यात आपल्याजवळचे थोडे पैसे टाकून सोन्याची बाळी तयार करून घेतात व ती मोहरमच्या दहाव्या दिवशी सोनाराच्या हाताने मुलाच्या कानात घालतात; मुलगी असेल तर तिच्या नाकात कडी (कुडी) घालतात. इराणमधील शिया लोक, मुलगी जीवघेण्या आजाराने पीडीत असल्यास, तिचा आजार गेला तर तिचे सय्यदबरोबर लग्न लावून देऊ असा नवस बोलतात; मूल होत नसेल तेव्हासुद्धा ते असाच नवस बोलतात. पंजाबमध्ये अपत्यविहीन मुस्लीम स्त्रिया आपणाला मूल झाले तर संताच्या कबरीवर कापड झाकू, तेथे दिवाबत्ती करू, मुलाचे तेथे केस कापू, मुलाच्या गळ्यात गळसरी घालू व त्या गळसरीत दहा बारा वर्षेपर्यंत दरवर्षी एक नाणे वाढवीत जाऊ आणि नंतर ते सर्व गरिबांना वाटून टाकू, आठवड्यातून एकदा मुलाची अर्धीच हजामत करवू असे नवस बोलतात. बडोद्यात मुस्लीम संत, मोहरमचे ताबूत व दैवी शक्तींना असे तीन प्रकारचे नवस बोलतात. मध्यप्रांतात धीमार नावाचे हिंदू कोळी मूल व्हावे म्हणून भिक्षा मागतात व ती भिक्षा फकिराकडे घेऊन जातात. फकीर ती भिक्षा ताबुतांना वाहून त्यांना परत देतो. ते फक्त याच वेळी मुसलमानांच्या हाताचा स्पर्श झालेले अन्न खातात.

मोहरमच्या दहाव्या दिवशी – याला शहादत का रोज म्हणजे हौतात्म्य दिन असे म्हणतात—सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत आशूरखान्यातील सगळी निशाणे समुद्र, तलाव किंवा नदीकाठच्या मोकळ्या मैदानात नेतात. या मैदानाला 'करबला का मैदान' म्हणतात. तेथे गेल्यावर प्रथम कुंडात अग्नी पेटवतात, त्याभोवती तीन फेऱ्या मारतात व मक्केकडे तोंड करून फातिहा म्हणतात. नंतर एका मडक्यात पैसे, दूध, शरबत टाकून ते मडके झाकतात व ते कुंडात पुरतात. पुढचे वर्षी ते मडके उकरून काढल्यावर काही स्त्रिया आशूरखान्याच्या प्रमुखाकडून त्या मडक्यातील नाणी पैसे देऊन मागून घेतात व त्यांना छिद्रे पाडून ती मुलांच्या गळ्यात बांधतात. यामागे मुलांना भुताखेताची बाधा होऊ नये असा हेतू असतो. काही मुसलमान ते कुंड बुजविल्यावर त्यावर खऱ्याखुऱ्या कबरीप्रमाणे तीन चार दिवस दिवा लावतात. ही निशाणे नेत असताना त्यावर काही दुकानदार आपला नवस फेडण्यासाठी म्हणून मिठाई व कवड्या फेकतात. या कवड्या काहीजण मुलांसाठी ताईत म्हणून उचलतात. ज्यांनी आपला नवस पूर्ण झाल्यावर आपण निशाणांसमोर 'करबलाच्या मैदाना'पर्यंत जमिनीवर लोळत जाऊ असा नवस बोललेला असतो ते पुरुष यावेळी फक्त लुंगी नेसून जमिनीवर लोळत जातात; त्यांचे मित्र रस्त्यातील दगड व इतर वस्तू, अडथळा होऊ नये म्हणून बाजूला उचलून टाकतात. आणि त्यांना गार वाटावे म्हणून स्त्रिया त्यांच्या अंगावर थंड पाणी ओततात.

'करबलाच्या मैदानात' ही निशाणे व ताबूत आणतात तेव्हा तेथे खूप गर्दी असते. तेथे मिठाई व खाद्यपदार्थ विक्रीची दुकाने असतात. डोंबाऱ्याचे खेळ चालतात. आकाशपाळणे असतात. तहानलेल्या लोकांना पाणी व शरबत अल्प किंमतीत किंवा फुकट वाटणाऱ्या पाणपोया असतात. निशाण व ताबूत पाण्याच्या काठावर आल्यावर हुतात्म्यांच्या नावे अन्न व मिठाईवर फातिहा म्हणतात. यापैकी थोडे अन्न व मिठाई ते पवित्र असते म्हणून घरी आणतात आणि थोडे तेथेच वाटून टाकतात. नंतर ताबुतावरील कलाबूत, निशाणाचे कापड काढून घेतात व सांगाडे पाण्यात बुडवितात. यापैकी काही पाण्यात फेकून देतात व इतर पुढील वर्षासाठी राखून ठेवतात. मुसलमान तसेच हिंदु पुरुष, मुले निशाण व ताबुतावरून खाली पडणारे पाणी आपली दृष्टी सुधारावी म्हणून डोळ्यांना चोळतात. बराक व नालसाहिब मात्र न बुडविता परत नेतात; बुराकला दरवर्षी नव्याने रंगवतात व नालसाहिबला चंदनलेप लावतात, त्यांच्यावर ध्वज ओवाळतात, धूप जाळतात आणि परत आणतात. आशूरखान्यात परत आल्यावर त्या सर्वांवर विलाप करतात आणि अन्न वाटतात. मोहरमचे फकीर झालेले मुसलमान आपले फकिराचे वेष काढून टाकतात व आंघोळ करतात. पण हे फकीर हे वेष उतरून ठेवण्यापूर्वी मिठाईवर फातिहा म्हणतात व त्यापैकी थोडी मिठाई आपल्या प्रमुख फकिराला देऊन उरलेली स्वतः खातात. काही फकीर यानंतरही तीन दिवसपर्यंत आपले वेष बदलीत नाहीत. 'हौतात्म्य दिनी' मुसलमान आपापल्या घरी अन्न शिजवतात, त्यावर मौला (पैगंबर), अली व हुतात्मे यांच्या नावे फातिहा म्हणून ते मित्रांना देतात किंवा दान करतात. अकराव्या दिवसापासून किंवा कधी कधी बाराव्या तेराव्या दिवसापासून पुन्हा मांस खाणे सुरू करतात.

हौतात्म्य दिनी काही लोक, बहात्तर हुतात्म्यांची शिरे ज्या शवपेटिकांमधून नेण्यात आली होती त्यांचे प्रतीक म्हणून एका शवपेटीची 'युद्ध ताबूत' (रन का डोला, रन की ताबूत) मिरवणूक काढतात. कधी कधी बंगालमधल्यासारखी बहात्तर 'युद्ध ताबुतां'ची मिरवणूक काढतात. हे ताबूत बांबूच्या कमट्याचे करून त्यावर कापड झाकलेले असते. ही मिरवणूक इतर ताबूताप्रमाणे 'करबलाच्या मैदानात' नेतात. तेथून परत येताना

काही लोक त्यांच्या बाजूंनी पळत दीन! दीन! म्हणतात, रस्त्यावर अधूनमधून थांबून शोकगीते म्हणतात, व छाती पिटतात. ह्या पेट्या परत आणून तीन दिवसपर्यंत तशाच ठेवतात. त्यानंतर त्या मोडून ते तुकडे पुढील वर्षासाठी राखून ठेवतात.

तिसऱ्या दिवशी निशाणांची पहाणी करतात; तिजा (तिसरा दिवस) व पहाणी म्हणजे ‘जियारत’ या संज्ञा मृत्यूनंतर करावयाच्या विधींसाठी लावण्यात येतात. बाराव्या दिवशी पुन्हा, रात्रभर शोकगीते म्हणतात, कुराणचे वाचन करतात आणि हुसेनची स्तुतिस्तोत्रे गातात. तेराव्या दिवशी प्रातःकाली मुसलमान हुतात्म्यांच्या नावे अन्न शिजवतात व त्यापैकी काही स्वतः खावून उरलेले इतरांना वाटून टाकतात. त्या रात्री फळे, फुले व इतर वस्तू निशाणाजवळ ठेवतात आणि फातिहा म्हटल्यानंतर ‘मृताचे अन्न’ वाटतात. त्यानंतर आशूरखान्यासमोर उभारण्यात आलेला मंडप काढून टाकतात आणि निशाणं साठवून ठेवतात. दुसऱ्याकडून उसने आणलेले कपडे परत करतात. पण त्यापैकी शोभिवंत केलेले कपडे पुढचे वर्षीसाठी राखून ठेवतात. एखाद्याला एखाद्या कामासाठी राखून ठेवलेल्या कापडापैकी कापड हवे असेल तर ते पैसे घेऊन देतात. काही लोक आपले नवस पूर्ण करण्यासाठी या कपड्यातील थोडेसे कापड नेऊन आपल्या मुलाच्या गळ्यात बांधतात. यामागे जिनची दृष्टी मुलावर पडू नये असा हेतू असतो. काहीजण त्याचप्रमाणे दहावा, बारावा आणि चाळिसावा दिवस शोकदिन म्हणून पाळतात. व त्या दिवशी अन्न वाटतात. पुढील महिन्याच्या म्हणजे सफरच्या दहाव्या दिवशी हुतात्म्यांच्या आत्म्यांना शांती लाभावी म्हणून शोकगीते म्हणतात व प्रार्थना करतात आणि चौदाव्या दिवशी ज्या दिवशी सफरची वीस तारीख येते त्या दिवशी करबला येथील कबरीत हुतात्म्यांच्या शिरांचे व शरीरांचे जे ऐक्य झाले त्याच्या स्मरणार्थ स्मरणोत्सव पाळतात. चाळिसावा दिवस हा ‘वादळी बैठकी’चा दिवस म्हणून ओळखला जातो. या दिवशी यजमान शोकगीते म्हणणाऱ्या गायकांना कॉफी, विडे, मिठाई देतो.

एवढे झाले म्हणजे त्या वर्षापुरता मोहरमचा विलाप संपतो. मोहरमच्या सणाच्या दहा दिवसांत मुसलमानांनी काम करू नये, स्त्रीसंग करू नये, दारू पिऊ नये किंवा विवाह करू नये. या काळात एखादा मृत्यू झाल्यास उत्तरक्रिया केली पाहिजे, पण याच कामाला परवानगी आहे. अर्थातच हे सार्वजनिक सेवा किंवा इतर आवश्यक कामे करण्याला लागू नाही. दक्षिण हिंदुस्थानात पाळण्यात येणाऱ्या विधींचा वर मुख्यतः वृत्तान्त आहे. त्यामध्ये आणि उत्तरेतील शोकामध्ये खूपच तफावत आहे. उत्तरेत मोहरम-फकिरासारखी थट्टामस्करी नसते. या प्रकारची थट्टामस्करी मुंबईतील सुन्नी मुसलमानही करतात. पण शिया मुसलमान यास खऱ्या विलापाचा काळ मानतात. हिंदूंकडून उचललेल्या भुताखेतावरील विश्वास आणि भुतांना घाबरविणे यावर हे मोठ्या प्रमाणावर आधारलेले आहे असे म्हणतात. देशाच्या ज्या भागातील मुसलमान हिंदूधर्मातून इस्लाममध्ये आलेले आहेत त्या त्या भागात या रूढी विशेष करून आढळू येणार हे स्वाभाविक आहे.

अनुक्रमणिका

## प्रकरण पंधरावे

# तेरह तेजी व आखरी चहारशम्बा सण

प्रेषित महंमद हे १२ रविउलअव्वल ११ हिजरीमध्ये म्हणजे ८ जून ६३२ ला मृत्यू पावले. मृत्यूपूर्वी ते तेरा दिवस आजारी होते. म्हणून सफर महिन्याच्या पहिल्या तेरा दिवसांना 'तापाचे तेरा दिवस' (तेरह तेजी) म्हणतात. हे दिवस अशुभ मानतात. कारण या काळात प्रेषित अतिशय आजारी होते; तेराव्या दिवशी त्यांची प्रकृती सुधारण्याची लक्षणे दिसत होती असे म्हणतात. या काळात मुसलमान लोक विवाह झालाच तर वधूवरांच्या मीलनाला संमती देत नाहीत. तसेच एखादे शुभ कार्य हाती घेऊ नये असे समजतात. तेराव्या दिवशी किंवा खरे तर बाराव्या दिवशी संध्याकाळी चंद्रदर्शनानंतर सगळे मुसलमान स्नान करतात. ते एका तबकात डाळ, गहू, तीळ मिसळून ठेवतात तसेच तेलाने भरलेला पेला ठेवतात; तेलात तीन वेळा आपला चेहरा पाहतात व प्रत्येक वेळी तबकातील थोडे धान्यकण तेलात टाकतात. तबकात काही अंडी व पैसेही ठेवतात. या वस्तू नंतर फकीर व हलालखोर म्हणजे बहिष्कृत यांना देऊन टाकतात. ते स्वतः त्या दिवशी वरणभात, मेंढीचे मांस खातात व त्यापैकी थोडे आप्तांना पाठवतात. काही मुसलमान हरबरे, गहू यात साखर, खोबरे मिसळतात, त्यावर फातिहा म्हणतात व त्यापैकी थोडे घराच्या छपरावर फेकतात, थोडे स्वतः खातात व बाकीचे दुसऱ्यांना वाटून टाकतात. मुसलमान स्त्रिया या दिवशी समारंभपूर्वक स्नान करतात, पण, यामागे कोणतेही धार्मिक कारण नसून ती एक नव्याने सुरू करण्यात आलेली रूढी आहे.

मुस्लीम पंचांगातील सफर या दुसऱ्या महिन्याच्या शेवटच्या बुधवारला आखरी चहार शंबा किंवा चहार शंबा असे म्हणतात. ज्या आजाराने पुढील महिन्याच्या बारा तारखेला प्रेषित मृत्यू पावले त्याने पीडित असताना या दिवशी प्रेषितांच्या प्रकृतीत सुधारणा दिसून आली होती. म्हणून या दिवशी प्रत्येक मुसलमान केशराने, शाईने किंवा गुलाबपाण्याने आंब्याच्या किंवा पवित्र पिंपळाच्या पानावर सात 'सलाम' (शुभेच्छा) लिहितो किंवा दुसऱ्याकडून लिहून घेतो. कुराणच्या संदर्भात हे सात सलाम पुढीलप्रमाणे आहेत— 'शांती! हा दयाळू परमेश्वराचा शब्द आहे' (३६.५८); 'नोआला नेहमी शांती लाभो' (३७.७७) ; 'अब्राहमला शांती लाभो' (३७.१०९) ; 'मुसा व आरॉला शांती लाभो' (३७.१२०) ; 'इलियासला शांती लाभो' (३७.१३०) ; 'तुम्हा सत्पुरुषांचे स्वागत असो; (स्वर्गात) कायम वास्तव्यासाठी प्रवेश करा' (३७.७३); 'आणि प्रातःकालपर्यंत सर्व शांती आहे' (६७.५). नंतर हे लेखन पाण्याने धुऊन ते पाणी पितात. [मंत्र लिहिले, पाण्यात धुतले आणि पिऊन टाकले यासाठी पहा-फ्रेझर, फोकलोअर इन ओटी, ३·४१२ तळटीपा; क्रॉले, ११६; थर्स्टन, कास्ट्स, ५·४८९; इथनॉग्राफिक नोट्स, ३५७; लेन, एमई, १·३२०. ज्यावर मंत्र कोरण्यात आले आहेत अशी लक्षणीय भांडी, ज्यातून बॅबिलोनियात घोट पिण्यात आले, यासाठी पहा-ए. एच. लेअर्ड, नाइनव्हेंर अँड बॅबिलोन, ५०९ तळटीपा.] यामागे आपले दुःख नाहीसे होऊन शांती व आनंद लाभेल असा उद्देश असतो. ही सुन्नी मुसलमानांची पद्धत आहे. परंतु शिया मुसलमान हा दिवस अशुभ मानतात. ते या दिवसाला चहार-शंबा-इ-सुरी 'तुतारीचा बुधवार' म्हणजे अखेरचा न्यायदानाचा दिवस म्हणतात. हैद्राबादमध्येही सध्या असाच समज आहे म्हणून सामान्यपणे आदल्या दिवशी स्नान करतात. [बिलग्रामी-विलमॉट, स्केच ऑफ निझाम्स डोमिनियन्स, १·३६४] हे 'सलाम' मौलवी व शिक्षक लिहून देतात. या दिवशी स्नान करणे, नवे कपडे घालणे, अत्तर लावणे, तुपातील गोड पदार्थ करणे उचित आहे असे मानतात. म्हणून हे पदार्थ तयार करून त्यावर फातिहा म्हणतात. आणि त्यातील थोडे आपण खाऊन बाकीचे इतरांना वाटून टाकतात, बागेमध्ये फिरतात आणि प्रार्थना म्हणतात. खालच्या दर्जाचे काही मुसलमान आपल्या घरी किंवा बागत नर्तिकांचे नृत्य, गाणे करवितात व स्वतः ताडी किंवा दारू पितात.

अनुक्रमणिका

ह्या दिवशी शाळा मास्तर विद्यार्थ्यांना रंगीत कागदावर ‘सणांच्या भेटी’ (ईदी) लिहून देतात, कागदावर खाली त्या मुलाचे नाव लिहितात व त्या कविता आपल्या आईवडिलांना वाचून दाखवा असे सांगतात. मुलांचे पालक याच्या मोबदल्यात शिक्षकाला एखाददुसरा रुपया पाठवितात.

अनुक्रमणिका

## प्रकरण सोळावे

# बारह वफात ; नवे वर्ष आणि वसंतोत्सव

प्रेषित महंमद हे मुस्लीम वर्षानुसार तिसऱ्या असलेल्या रबिउलअव्वल या महिन्याच्या बारा तारखेला मृत्यू पावले. त्यामुळे या महिन्याला सर्वसामान्यपणे ज्या आजाराचा शेवट मृत्यूमध्ये झाला त्या बारा दिवसांच्या आजाराचा (बारह वफात) महिना असे म्हणतात. सर्व ठिकाणच्या मुसलमानांनी अरब व परदेशीय दोघांनी या दिवशी त्याबरहुकूम खालील फातिहा पाळलाच पाहिजे. कारण याचे मोल मोहरम व दुसऱ्या सर्व फातिहापेक्षा जास्त आहे असे म्हणतात. हा दिवस, मोहरम व शब-इ-कद्र हे मुस्लिमांच्या दृष्टीने शोकाचे तीन दिवस असतात. त्यापैकी या दिवशी सुन्नी मुसलमान विलाप करतात. नोकरीत असलेल्यांनी अकराव्या दिवशी व बाराव्या दिवशी अनुक्रमे संदल व उरुस साजरा करण्यासाठी रजा घेतली पाहिजे. मुस्लीम पंडित पहिले बारा दिवस मशिदीत किंवा घरी बसून हदीसमध्ये ग्रंथित असलेली महंमद मुस्तफांची स्तुती पुनः वाचतात आणि खालच्या वर्गातील मुसलमानांना ती आपल्या भाषेत समजावून सांगतात. काही मुसलमान दर दिवशी सकाळ व सायंकाळी आपल्या घरी किंवा मशिदीत जमा होतात, कुराणचे वाचन करतात व वरणभात, दुधात शिजविलेला भात (शीर बिरिंज) व मासाचे पदार्थ (कलिया) तयार करतात. प्रत्येकाचा हिस्सा कापडावर (दस्तरख्वॉन) वेगळा ठेवलेला असतो. ऊद जाळतात व सर्वजण जेवणापूर्वी व जेवणानंतर दोन्ही वेळा प्रेषितांच्या नावे फातिहा म्हणतात. त्यामुळे कुराणचे फायदे आपल्या आत्म्यावर प्रभाव टाकू शकतील असे त्यांना वाटते.

माणसांना पुढील प्रकारचे तीन आत्मे असतात असे मुसलमान मानतात. कनिष्ठ किंवा प्राण्याचा आत्मा (रुह-उस्-सुपली); भटकता आत्मा (रुह-उल्-जारी) जो झोपेत शरीराला सोडून जातो व स्वप्न पाडतो; भव्य आत्मा (रुह-उल्-उल्वी) जो मृत्यूनंतरही शरीराला सोडून जात नाही.

काही लोक आपल्या घरात उंची वस्त्रांनी झाकलेल्या एका पेटीत प्रेषितांच्या पावलांचे ठसे असलेला दगड (कदम-इ-रसूल) ठेवतात. या दिवशी एका ताटात जरीचे कापड टाकून त्यात हे 'शुभ पाऊल' (कदम-इ-मुबारक) ठेवतात किंवा ताबुतात ठेवतात व त्यावर चवरीने वारा घालतात. मोहरमप्रमाणे घरात रोशनाई करतात, ऊद जाळतात, वाजंत्री लावतात. पाच सहाजण शोकगीतासारखे प्रेषितांचे जन्मवर्णन, आशीर्वच (दुरुद), चमत्कार (मुजिजत) व मृत्यूचा वृत्तांत (वफातनामा) म्हणतात. मृत्यूचा हा वृत्तांत लोकांना कळावा व त्यांना प्रेषिताबद्दल सहानुभूती व दुःख वाटावे म्हणून हिंदुस्थानीमध्ये सांगतात. मोहरममध्ये ज्याप्रमाणे रात्री मिरवणुका काढतात त्याप्रमाणे अकराव्या व बाराव्या दिवशी रात्री मिरवणुका काढतात.

अकराव्या दिवशी सायंकाळी किंवा सूर्यास्तापूर्वी थोडावेळ अगोदर काही लोक प्रेषितांचा संदल काढतात. म्हणजे ते एका तबकात किंवा ताबुतात बुराकची प्रतिमा ठेवून तीवर सुगंधी द्रव्याने किंवा चंदन लेपाने भरलेले एक किंवा अधिक प्याले ठेवतात व त्यावर फुलांची चादर झाकतात नंतर याची मिरवणूक काढतात. मिरवणुकीबरोबर मलिद्याने भरलेली ताटे, वाजंत्री असतात, अधूनमधून दारूकाम उडवितात. तसेच आशीर्वच व जन्मवर्णन म्हणतात. अशा प्रकारे ते ज्या ठिकाणी प्रेषितांच्या पावलाचा ठसा ठेवलेला असेल त्या ठिकाणी येतात. तेथे आल्यावर फातिहा म्हणतात व त्यानंतर प्रत्येकजण चंदनलेप किंवा सुगंधी द्रव्यात बोट

अनुक्रमणिका

बुडवून तो लेप किंवा द्रव्य पावलाच्या ठशावर चोळतो. नंतर त्यावर फुलांची चादर झाकतात व उपस्थितांना मलिदा वाटतात. चंदनलेप बुराकच्या प्रतिमेवर ठेवून नेण्यात येतो. याचे कारण बुराक हा प्रेषितांचा घोडा होता हे आहे. खरे म्हणजे मोहरमच्या वेळी बुराकची मिरवणूक न काढता यावेळीच काढली पाहिजे म्हणजे त्यामुळे लोकांना महंमद मुस्तफा हे याच बुराकवर बसून स्वर्गाची सफर करावयास गेले हे कळेल. परंतु धर्मकायद्यानुसार (शरियत) घरात अशा प्रतिमा तसेच चित्रे ठेवणे गैर आहे! तेराव्या दिवसापर्यंत बुराकची प्रतिमा पावलाच्या ठशाजवळ ठेवतात. पद्धत अशी आहे की 'पावलाच्या ठशाचा' व्यवस्थापक हा बुराकची प्रतिमा तयार करून त्यावर चंदनलेप नेतो आणि लोक आपले नवस फेडण्याच्या निमित्ताने 'पावलाच्या ठशाला' भेटवस्तू वाहतात.

बाराव्या म्हणजे उरुसच्या दिवशी —ज्या दिवशी संताचा आत्मा परमेश्वरात विलीन झाला—लोक कुराण व इतर पवित्र ग्रंथांचे रात्रभर वाचन करीत बसतात. या दिवशी मलिदा करून वाटतात. स्त्रिया, अन्न ऊद व दिवाबत्तीसाठी पैसे घेऊन 'पावलाच्या ठशाजवळ जातात' ऊद जाळतात, फातिहा म्हणतात, तेथील दिव्यात तूप टाकतात, तेथील व्यवस्थापकाला थोडी मिठाई देतात व बाकीची घरी परत आणतात. या स्त्रिया दिव्याला लागते त्यापेक्षा अधिक तूप देतात. व्यवस्थापक उरलेले तूप आपल्या घरगुती वापरासाठी ठेवून देतो. या महिन्याचे पहिले बारा दिवसपर्यंत 'पावलाच्या ठशाजवळ' दररोज उदबत्त्या लावण्यात येतात. प्रेषितासाठी म्हणून जे अन्न ठेवण्यात येते ते बहुधा दुधात शिजवलेला भात हे असते; कारण हे प्रेषिताच्या आवडीचे अन्न होते. प्रेषित याला 'सगळ्यात श्रेष्ठ अन्न' (सय्यिदु-तमाम) असे म्हणत असत. हे अन्न वाहिल्यावर विधी पूर्ण झाला असे म्हणतात. काही लोक प्रेषिताचा पवित्र अवशेष उदाहरणार्थ, त्यांच्या दाढी किंवा मिशीचा केस (अशर-इ-शरीफ, असर-इ-मुबारक) चांदीच्या नळीमध्ये ठेवून त्या नळीभोवती अबीर ठेवतात आणि तो 'पावलाच्या ठशा' पेक्षासुद्धा जास्त श्रेष्ठ आहे, असे मानतात. त्याच्यापुढे अन्न ठेवतात, आशीर्वच म्हणतात, तेथे रोशनाई करतात, वाजंत्री लावतात. परंतु अशा केसांपैकी बहुतेक केस बनावट असतात! दिल्लीतील जामीमशिदीमध्ये प्रेषितांचे केस दाखविण्यात येतात. तसेच सिंधमधील बोहरी या ठिकाणच्या जामीमशिदीत प्रेषितांच्या दाढीचा केस (मू-इ-मुबारक) असून तेथे तो प्रसिद्ध गूढवादी अब्दूल कादीर जिलानी यांनी ठेवलेला आहे.

नौराज म्हणजे नूतन वर्ष दिन. हा इराणी लोकांनी दक्षिणायनातून उत्तरायणात बदलला. दक्षिणायनातील नूतन वर्ष दिनाला मिहीरजान उत्सव असे म्हणतात. हा स्पष्टपणे शिया मुसलमानांचा आहे. म्हणून तो कट्टर सुन्नी असलेल्या औरंगजेबाने रद्द करून टाकला आणि रमजान महिन्यात होणाऱ्या आपल्या राज्यारोहण उत्सवाच्या वेळी बदलला. [जदूनाथ सरकार, लाइफ ऑफ औरंगजेब, (२·२९९; ३·९३)] 'हा उत्सव, सूर्य जेव्हा उत्तरायणात जातो (२१ मार्च) तेव्हा सुरू होतो व इराणी वर्षाचा पहिला महिना असलेल्या फरवर्दिनच्या १९ तारखेपर्यंत चालतो. या काळातील दोन दिवस मोठ्या उत्सवाचे असतात, जेव्हा पैसे व विविध वस्तू भेटी म्हणून देतात [जैन, १·१८३, २७६] इराणमध्ये हा सण सूर्य उत्तरायणात गेलेल्या दिवसापासून पुढे तीन दिवस चालतो आणि तो अजून जुन्या पद्धतीने साजरा करतात, त्यात व जुन्या इराणी उत्सवात अवधी आणि धार्मिक आचाराबाबत फरक आहे. मिरवणुका काढीत नाहीत, मृतांच्या नावे अन्न देत नाहीत. फक्त सगळे लोक परस्परांना भेटल्यावर 'ईद मुबारक' म्हणतात आणि गरिबांना दान देतात. या दिवशी सगळेजण उत्तम कपडे घालून विविध प्रकारच्या मनोरंजनाच्या कार्यक्रमात भाग घेतात. औरंगजेबाच्या काळात 'यावेळी शहाजहानच्या आज्ञेने मयूरसिंहासनाबरोबरच बनविण्यात आलेल्या मौल्यवान वस्तूंनी राजप्रासाद आंतर्बाह्य सुशोभित करीत

असत. तसेच जुन्या रूढीनुसार शाही रक्ताच्या व्यक्तींची सोने, रूपे, मौल्यवान वस्त्रे यांनी तुला करीत असत. प्रत्येकाची तुला किती झाली याची सदर प्रसंगाची स्मृती म्हणून नोंद करण्यात येत असे आणि या वस्तू दान म्हणून देण्यात येत असत'. औरंगजेबाने स्वतःच्या बाबतीत तुला करण्याची पद्धत नष्ट केली होती. परंतु आपल्या मुलांना ते आजारातून बरे झाल्यावर त्याने तुला करण्यास संमती दिली होती; पण त्यासाठी तुला करण्यात आलेल्या वस्तू दान करून टाकाव्या अशी त्याने अट घातली होती. अलीकडील काळात हा उत्सव इतरांना भेटवस्तू देऊन साजरा करतात. उत्तरायण दिवसा लागणारा असल्यास मुस्लीम स्त्रिया गुलाबाचे फूल फूल पाण्याच्या कुंडात उलटे टाकतात. सूर्याने उत्तरायणात प्रवेश केला की ते फूल आपोआप सुलटे होते असे मानतात. अवधचे मुसलमान राजे साधारणतः ३१ मार्च रोजी येणाऱ्या हिंदूंच्या वसंतपंचमीच्या स्वरूपाचा सण पाळीत असत. [आयबीड, १५४.]

अनुक्रमणिका

**प्रकरण सतरावे**

## पीर-इ-दस्तगीर यांचा उत्सव

संत पीर-इ-दस्तगीर यांचा उत्सव रबि-उल-सानी या चौथ्या महिन्याच्या अकरा तारखेला साजरा केला जातो. ते जवळपास नव्याण्णव वेगवेगळ्या नावांनी ओळखले जात असून त्यापैकी काही विशेष प्रसिद्ध असलेली नावे पुढीलप्रमाणे आहेतः- पीरॉ-इ-पीर (संतांचा प्रमुख), गौसुलआजम (संतश्रेष्ठ), गौसुलसमदानी (सनातन संत), महबूब-इ-सुभानी (प्रिय, सत्पुरुष), मिराने मोहियुद्दीन (धर्माला चेतना आणणारा), सय्यद किंवा शेख अब्दुल कादिर जिलानी, हसनी उल हुसेनी, कादरिया पंथाचे संस्थापक, त्यांचे जिलानी हे नाव पश्चिम इराणमध्ये असलेल्या त्यांच्या जिलान (खरे म्हणजे किल-ओ-किलान) या जन्मग्रामावरून पडले. त्यांचा जन्म १०७८ मध्ये व मृत्यू बगदाद येथे २२ फेब्रुवारी ११६६ रोजी झाला. त्यांची तेथे असलेली कबर भक्त अजूनही आदरणीय मानतात. त्यांना प्रमुख वली मानतात. ते आपल्या शिष्यांना अधूनमधून दिसतात व सूचना देतात, असे मानतात. ते सर्वत्र वंदनीय आहेत. विशेष म्हणजे पंजाबमधील हिजड्यांच्या वर्गाला त्यांच्याबद्दल नितांत आदर आहे. [रोझ, २·३३१.] लेखक जफीर शरीफ स्वानुभवावरून असे म्हणतो की, जेव्हा मी इच्छित गोष्टीबद्दल काळजीत असे तेव्हा मी त्यांची नव्याण्णव नावे उच्चारून परमेश्वराला असा नवस बोलत असे की, हे देवा, तू पीर-इ-दस्तगीरच्या आत्म्याच्या मार्फत मदत कर. जफीर शरीफचे पुढे असे म्हणणे आहे की, ईश्वर कृपेने मला गौसुलआजमने स्वप्नात दर्शन देऊन माझ्या मनातील चिंता दूर केली व माझ्या इच्छा पूर्ण केल्या; माझ्या धर्मबांधवांनी त्यांना हवे तर माझ्या प्रतिपादनावर अविश्वास दाखववावा, हा माझा पिराचे महत्त्व वाढविण्याचा प्रयत्न आहे असे म्हणावे किंवा मी स्वतः चा प्रचार करतो असेही म्हणावे, पण हे सत्य सिद्ध झाले तर यावर अविश्वास दाखविणाऱ्यांवर परमेश्वराचा प्रकोप होईल, त्यांचा धर्म व त्यांची उपजीविकेची साधने नष्ट होतील! सुन्नी मुसलमान पीर-इ-दस्तगीर यांना सत्पुरुष मानतात व त्यांच्यावर अतीव श्रद्धा ठेवतात. परंतु काही शिया मुसलमान त्यांनी इमाम जाफरला शिशाचा रस पाजून मारले अशी त्यांची निंदानालस्ती करतात. हा आरोप केवळ मत्सरावर आधारलेला असून संपूर्ण असत्य आहे. कारण या दोघात सुमारे २५० वर्षांचे अंतर आहे. इमाम जफर सादिक (सहावे इमाम) हे इ.स. ७०२-६३ मध्ये होऊन गेले तर महबूब (पीर-इ-दस्तगीर) यांचा काळ इ.स. १०७८-११६६ असा आहे. [जफाद सादिक 'सत्यवचनी' यांना असे नाव त्यांच्या स्वच्छ चारित्र्यावरून पडले. ते सहावे इमाम होते.]

रबि-उस्-सानी या महिन्याच्या दहा तारखेला लोक पीर-इ-दस्तगीर यांचा संदल काढतात आणि अकरा तारखेला त्यांचा दीपोत्सव करतात. दहा तारखेला सांयकाळी लोक पंजाचे चिन्ह असलेला व चंदन लेप लावलेले निशाण घेऊन व सोबत मलिदा, फुले, साखर घेऊन, पेट्रोमॅक्स लावून वाजत गाजत गावभर फिरतात आणि ठरलेल्या ठिकाणी जाऊन हे निशाण लावतात, पिराच्या नावाने फातिहा अर्पण करतात, निशाणावर फुले, चंदन वाहतात व मलिदा वाटतात. अकराव्या दिवशी अन्न शिजवतात, पिराचे जन्मवर्णन व आशीर्वच म्हणतात, संपूर्ण कुराणचे पठण करतात, आणि पीर-इ-दस्तगीर यांची नव्याण्णव नावे उच्चारतात. गुजराथमधील गरीब मुसलमान या दिवशी अकरा किंवा बावीस दिवे लावतात. तर श्रीमंत आपल्या घरात पर्णहीन झाडावर किंवा हिरव्या रंगाच्या काशिदा काढलेल्या कापडांनी सुशोभित केलेल्या लाकडी दीपमाळेवर अकरा दिवे लावतात आणि मुलांना अन्न, मिठाई वाटतात, रात्री मलिदा खातात.

कॉलरा किंवा इतर साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास लोक पीर-इ-दस्तगीर यांच्या निशाणाची मिरवणूक काढतात आणि वारंवार थांबवून नमाजसाठी जसा आवाज देतात तसा आवाज देतात. हिंदू व मुसलमान या दोन्ही धर्मांचे लोक यावेळी ऊद जाळण्याच्या पात्रात काही पैसे टाकतात. कधीकधी मिठाई व साखरेवर फातिहा म्हणतात. नंतर निशाण परत आणून त्याच्या पूर्वीच्या जागी ठेवतात. त्या महिन्यातील पहिल्या, तिसऱ्या व पाचव्या गुरुवारी लागोपाठ असे करतात. पुष्कळ लोक तर या रोगांपासून आपला बचाव व्हावा म्हणून आपल्या घराच्या दरवाजावर या संताच्या नावे लहान ध्वज तयार करून ते लावतात. सामान्यत्वे या साधनांनी साथ टळते असे म्हणतात.

या संताच्या कृपेने आपणाला मूल झाले तर आपण त्याला संताचा गुलाम करू असा नवस काही लोक बोलतात. नवस फळाला आल्यावर ते रबी-उस्-सानी या महिन्याच्या दहाव्या किंवा अकराव्या दिवशी मुलाच्या उजव्या पायात कडे घालतात व दरवर्षी त्यात एक लहान कडी वाढवितात, तसेच यावेळी मलिदा करतात. त्यावर पिठाचे केलेले अकरा दिवे ठेवतात, दिव्यात तुपात बुडविलेल्या लाल दोऱ्याच्या वाती पेटवतात, ऊद जाळतात, काही लोक मुलाच्या पायात कडे किंवा गळ्यात गळसरी घालण्याऐवजी मुलाच्या कंबरेला चांदीची साखळी किंवा कातड्याचा पट्टा बांधतात. बहुसंख्य लोक थोड्याशा अन्नावर फातिहा म्हणतात, तर थोडे लोक या वेळी मित्र व फकिरांना निमंत्रण देतात. या फातिहाला या संताच्या मृत्यूची ग्यारहवीं (अकरावा दिवस) म्हणतात. वस्तुतः पिर-इ-दस्तगीर हे रबि-उस्-सानी या महिन्याच्या १७ व्या दिवशी मृत्यू पावले, पण त्यांना प्रत्येक महिन्यातील अकरा दिवस प्रेषितांच्या नावे फातिहा म्हणण्याची सवय होती. म्हणून अकरावा दिवस त्यांच्या नावे फातिहा म्हणण्यासाठी ठरविला. परंतु काही मुसलमान हा फातिहा म्हणण्याचा विधी या महिन्यातील कोणत्याही दिवशी करतात. काही लोक हिरव्या रंगाच्या कागदाचा किंवा हिरवा रंग दिलेल्या लाकडाचा ताबूत करतात, त्यावर बेगड लावतात आणि संताच्या उरुसाच्या दिवशी त्यावर फुले, फळे, सेहरा टाकून तो सजवतात. काही लोक एका मडक्याचे फडक्याने तोंड बांधतात, त्या फडक्याला मध्यभागी छिद्र करतात आणि हे मडके घेऊन गावात औपचारिक मिरवणूक काढतात. लोक त्या मडक्यात पैसे, धान्य, कवड्या टाकतात. संताच्या उरुसाच्या दिवशी मडक्यातील जमा झालेल्या पैशातून उरूस साजरा करतात.

पीर-इ-दस्तगीर यांच्या बहिणीच्या मुलाचे नाव सय्यद अहमद कबीर रफाई असे होते. त्याच्यापासून रफाई, गुर्झमार, मुँहफोडा, मुहचिरा या नावाने ओळखला जाणारा फकिरांचा वर्ग निर्माण झाला. या वर्गाचे फकीर गुर्झने आपल्या तोंडावर किंवा शरीरावर जखमा करून घेतात म्हणून त्यांना गुर्झमार इत्यादी म्हणतात. दुसऱ्या एका वृत्तान्तानुसार अहमद-अर-रिफाआ याने वरील फकिरांच्या वर्गाची स्थापना बगदादमध्ये ८७६ हिजरी म्हणजे इ.स. १४७१ मध्ये केली असे कळते. [मॅक्डोनाल्ड, २६७; रोझ, २·३२१ तळटीप.]

अनुक्रमणिका

## प्रकरण अठरावे

# संत जिंदा शाह मदार यांचा उत्सव

एका वृत्तान्तानुसार सन्माननीय शाह बदिऊद्दीन अथवा जिंदा शाह मदार, गाझी मियाॅं हे मूळचे ज्यू धर्मीय असून त्यांचा जन्म इ.स. १०५० मध्ये अलेप्पो येथे व मृत्यू कानपूरपासून चाळीस मैलांवर असलेल्या मकनपूर येथे झाला. प्रेषितानी त्यांना श्वासोच्छ्वासाशिवाय जिवंत राहण्याची शक्ती दिली होती त्यामुळे ते अजून जिवंत आहेत असा समज आहे; म्हणूनच त्यांना जिंदा म्हणजे जिवंत असे म्हणतात. ते काळ्या रंगाचे कपडे घालीत असत. त्यांनी आजन्म ब्रह्मचर्य पाळले. त्यांच्या कबरीच्या दर्शनासाठी हिंदू व मुसलमान या दोन्ही जमातींचे लोक जातात. स्त्रियांना मात्र त्यांच्या कबरीच्या दर्शनाला जाऊ देत नाहीत. कारण एखादी स्त्री तेथे गेल्यास तिच्या सर्वांगाचा दाह होतो असे मानतात. लोक पीर-इ-दस्तगीरप्रमाणेच त्यांनाही नवस बोलतात आणि नवस फळाला आल्यावर आपल्या मुलांच्या गळ्यात त्यांच्या नावाने सोने-चांदीची साखळी घालतात. त्यांचा मृत्यू जमादिलावल या पाचव्या महिन्याच्या सतराव्या दिवशी झाला असा समज आहे. लोक या दिवशी गव्हाच्या पिठाचे पदार्थ, सतरी (मांसाचे पदार्थ) तयार करतात. त्यावर सतरा दिवे लावतात व नंतर मुलाच्या गळ्यात साखळी घालतात. [पहा—श्रीमती मीर हसन अली, ३७४; दबिस्ताॅ, २·२२४; रोझ, २·१६० तळटीपा; जनगणना अहवाल, पंजाब १८९१, १·१९६ तळटीप; वाईज, नोटस्, १३ तळटीपा]

काहीजण या संताच्या नावे आगीतून चालण्याचा विधी करतात. या विधीला ‘धम्माल कूदना’ असे नाव आहे. धम्माल म्हणजे सद्‌वर्तनाचे स्थळ (धर्म) व कूदना म्हणजे उडी मारणे. या विधीसाठी मोठा अग्नी पेटवतात व तबकाती या पंथाच्या फकिरांना बोलावतात, त्यांना इनाम देतात. फकीर फातिहा म्हणून अग्नीमध्ये चंदन शिंपडतात. नंतर या गटाचा प्रमुख प्रथम ‘दम मदार!’’दम मदार!’ (मदारचा श्वास) असे म्हणत आगीत उडी मारतो. ‘दम मदार’ म्हटल्याने अग्निज्वाळा, सर्प किंवा विंचू यांच्या दंशापासून रक्षण होते असा इराण्यांच्यामधल्याप्रमाणे समज आहे. [मोरियर, जर्नी, १०१.] नंतर बाकीचे फकीरही असेच म्हणत आगीतून चालतात. त्यानंतर त्यांचे पाय दूध व पाणी यांनी धुतात पण त्यांच्या पायाला काहीही इजा झालेली आढळत नाही.

या संताचा जन्म १७ जमादिलावलला झाला असावा असा समज आहे. त्यांच्या जन्मदिनी गाय बळी देण्याचा विधी (गाय लूटाना) करतात. त्यांच्या नावे गाय मुस्लीम धर्मविधीनुसार कापण्यात येते (झब्ह) हा विधी एखाद्याच्या घरी किंवा या वर्गाच्या फकिरांच्या निवासस्थानी (आस्ताना) करण्यात येतो, व मांस फकिरांमध्ये वाटून टाकतात. काही ठिकाणी या फकिराच्या धर्मशाळेपैकी एखाद्या ठिकाणी संताचे निशाण उभारतात, त्याला काळा ध्वज बांधतात. संताच्या उरुसाच्या दिवशी रोशनाई करतात, त्यांची स्तुतिस्तोत्रे गात रात्रभर जागरण करतात किंवा दुसऱ्या दिवशी त्यांचा संदल काढतात. याही दिवशी त्यांची स्तुतिस्तोत्रे गात रात्रभर गात रात्रभर जागरण करतात. त्यांचे निशाण ज्या ठिकाणी लावले त्या ठिकाणीच ते वर्षभर ठेवतात; ते तेथून हलवीत नाहीत.

अनुक्रमणिका

**प्रकरण एकोणिसावे**

## संत कादिरवलीसाहेब यांचा उत्सव

संत कादिरवलीसाहेब यांची कबर तंजोर जिल्ह्यातील नागपट्टम या शहराच्या नागोर नावाच्या उपनगरात आहे. या ठिकाणी मरियन नावाच्या मुस्लीम व्यापारीवर्गाचे प्रभुत्व आहे. हे व्यापारी, शाफीई पंथाचे लबाई व मोपला हे अनुयायी कादिरवलीसाहेब यांचे प्रमुख भक्त आहेत. काही विद्वान ते आणि अजमेरचे प्रसिद्ध संत मोइनुद्दिन चिस्ती हे एकच आहेत असे म्हणतात. पण कादिरवलीसाहेब हे इकडचेच संत आहेत असे दिसते. जमादिउलाखर या महिन्याच्या नवव्या दिवशी त्यांचा संदल काढतात आणि दहाव्या दिवशी त्यांचा उरूस साजरा करतात. उरुसाच्या दिवशी अन्न शिजवितात, प्रेषितांचे जन्मवर्णन (मौलूद) वाचतात आणि रात्रभर जागरण करतात. यावेळी रोशनाई करतात. त्यांच्या उरुसासाठी जवळपास दहा हजार रुपये खर्च करण्यात येतो. अकराव्या दिवशी 'दूधभाताचे भांडे फोडण्याचा विधी' करतात. म्हणजे प्रतिपदेच्या चंद्रदर्शनानंतर किंवा त्यानंतरच्या दुसऱ्या किंवा चौथ्या दिवशी कादिरवलीसाहेबाचा अनुयायी असलेल्या एखाद्या सिलसिलेचा नेता (सरगुरोह) किंवा मलंग परंपरेचा एखादा फकीर अकराव्या दिवसापर्यंत एकाच ठिकाणी चटई किंवा घोंगडीवर न खाता, पिता, बोलता एकांतात बसून परमेश्वर चिंतन करीत राहतो; तो नैसर्गिक विधींसाठीसुद्धा जात नाही. अकराव्या दिवशी जेव्हा सेवक (मुजाविर) दूधभाताचे भांडे घेऊन त्याच्याजवळ जातात तेव्हा तो त्या अन्नावर फातिहा म्हणून त्यातील थोडेसे खातो व एकांतवास सोडून आपल्या परंपरेच्या फकिरांत मिसळतो. त्यानंतर हे दूधभाताचे भांडे मिरवणुकीने समुद्रकिनारी नेतात व त्याचे आपटून तुकडे तुकडे करतात. यावेळी उपस्थित असणारे लोक आपणाला त्यापैकी थोडा तरी दूधभात मिळावा यासाठी इतकी झटापट करतात की ज्या जागी हे भांडे फोडण्यात येते त्या ठिकाणी वाळूत मोठा खड्डा पडतो. याचा अर्थ असा की लोक त्या ठिकाणची वाळू थोडे तरी अन्नकण मिळावे म्हणून घेतात. पण आश्चर्याची गोष्ट अशी की या झटापटीत कोणालाही दुखापत होत नाही. त्याच्या उरुसानंतर काही दिवसांनी फकिरांचे जथ्थे येथे जमतात व प्रत्येक टोळीतील फकीर आपल्या नेत्यासह याप्रमाणे वेगवेगळे बसतात. (चौक में बैठे हैं). एखाद्या फकिराच्या हातून शिस्तभंग घडला असेल तर त्याचा नेता या सभेच्या ठिकाणी त्याला सगळ्या फकिरांचे बिछाने डोक्यावर वाहून नेण्याची शिक्षा देतो. किंवा त्याला पश्चाताप व्यक्त करण्यास आणि यापुढे चांगले वागू अशी लेखी हमी देण्यास सांगतो. त्याने असे केल्यास त्याला पुन्हा सदस्यत्व देतात. परंतु त्याच्यावर असलेला आरोप गंभीर असेल व तो सिद्ध झाला तर त्याच्या कंबरेच्या पट्ट्याचे दोन तुकडे करतात व सर्वजण त्याला वाळीत टाकतात. ताबर-इ-आलम, बाबा बुदन, बाबा फकरुद्दीन किंवा इतर संतांच्या उरुसाच्या वेळीही याच पद्धतीचा अवलंब करतात. वरील संताच्या अनुयायी असलेल्या फकिरांपैकी एखादा फकीर किंवा त्यांचा नेता उरुसाला एकदाही हजर न राहिला तर तो आपल्या परंपरेचा सदस्य म्हणून राहण्यास नालायक समजला जातो. उरुसाच्या वेळी काही फकीर सेवकाकडून पैसे स्वीकारतात व परस्परांत वाटून घेतात. जहाज समुद्रप्रवासात संकटात सापडले तर जहाजाचे मुस्लीम कप्तान व खलाशी कादिरवलीसाहेबांना नवस बोलतात की आमचे जहाज सुखरूप किनाऱ्यास पोहचले तर आम्ही ठराविक रक्कम त्यांचे नावे फातिहा म्हणण्यासाठी खर्च करू. त्यांचा नवस पूर्ण झाल्यास कादिरवलीसाहेबांच्या नावे जमादिउलाखर महिन्यात चंद्रदर्शनानंतर 'गोम' नावाचे निशाण लावतात, हे निशाण ८/९ फूट लांब असून त्याचा आकार गोमीसारखा असतो. इतर ठिकाणीही त्यांचे भक्त दरवर्षी त्यांचे नावे 'गोम' निशाण लावतात व फातिहा अर्पण करतात. परंतु काहीजण मात्र त्यांच्या

सन्मानार्थ मलिद्यावर केवळ फातिहा म्हणतात. मुसलमान व हिंदू या दोन्ही धर्मांचे लोक त्यांची भक्ती करतात. इतकेच नव्हे तर या दोन्ही जमातींचे लोक त्यांच्यावर आपला हक्क सांगतात. याचे कारण त्यांनी दोन्ही धर्मांचे लोकांना उपदेश केला होता असे सांगण्यात येते. एका हिंदू राजाने त्यांना असा नवस बोलला होता की, मला तुमच्या कृपेने मुलगा झाल्यास मी तुमच्या कबरीजवळील मशीद अधिक मोठी व सुंदर करीन. तंजोरचे हिंदु राजघराणे व कादिरवलीसाहेब यांचा घनिष्ठ संबंध होता. [साल, २६२ तळटीप.]

कादिरवलीसाहेबांनी केलेल्या चमत्काराच्या अनेक कथा सांगण्यात येतात. त्यांपैकी प्रसिद्ध असलेल्या कथा पुढीलप्रमाणे आहेत. एकदा एक जहाज समुद्राप्रवासात असताना त्याला भोक पडले तेव्हा त्या जहाजाचा कप्तान कादिरवलीसाहेबांना असा नवस बोलला की तुम्ही हे भोक बुजविले तर जहाज किनाऱ्याला लागल्यावर मी जहाजातील मालावरचा नफा तसेच सोने-चांदीच्या जहाजाच्या प्रतिकृती तुम्हांला अर्पण करीन. जहाजाचा कप्तान जेव्हा हा नवस बोलला त्यावेळी कादिरवलीसाहेब हजामत करवीत होते. त्यांना लगेच जहाजावर येणाऱ्या संकटाचे ज्ञान झाले व त्यांनी न्हाव्याच्या हातातील आरसा फेकला. तो आरसा ईश्वरी आज्ञेने हवेतून जहाजावर गेला आणि जेथे जहाजाला भोक पडले होते तेथे चिकटला व भोक बंद झाले. जहाज सुखरूपपणे किनाऱ्याला लागल्यावर तो कप्तान नवस फेडण्यासाठी कादिरवलीसाहेबांकडे सोने-चांदीच्या जहाजाच्या प्रतिकृती घेऊन गेला तेव्हा त्यांनी त्याला न्हाव्याचा आरसा परत करण्यास सांगितले. कप्तानाने आश्चर्याने कोणता आरसा असे विचारल्यावर त्यांनी, ज्यामुळे जहाजाला पडलेले भोक बुजले तो आरसा असे सांगितले. कप्तानाला तो खरेच तेथे आढळला व त्याने तो परत केला.

कादिरवलीसाहेब नेहमी जंगलात राहत असत व त्यांनी कधीही स्त्री पाहिली नव्हती असे सांगतात. एकदा ते तळ्यात स्नान करीत असताना त्यांना विशाल स्तन असलेली एक स्त्री दिसली. (हिंदुस्थानच्या या भागातील स्त्रिया आपल्या शरीराच्या वरच्या अंगावर कोणतेही वस्त्र घालीत नाहीत) तेव्हा त्यांना त्या स्त्रीला गळूचा त्रास आहे असे वाटले म्हणून तिची दया येऊन त्यांनी 'हे परमेश्वरा, हे गळू नाहीसे कर' अशी प्रार्थना केली. त्याबरोबर त्या स्त्रीचे स्तन नाहीसे झाले. तिने रडत रडत आपल्या मैत्रिणींना सांगितले की एका फकिराने मला पाहिले आणि त्याने काही शब्द उच्चारून माझे स्तन नाहीसे केले. त्या मैत्रिणी कादिरवलीसाहेबाकडे गेल्या आणि त्यांना म्हणाल्या की या स्त्रीला काही तरी रोग झाल्याची तुमची समजूत झालेली दिसते, पण तसे काही नाही. कादिरवलीसाहेबांना जेव्हा सत्य परिस्थिती लक्षात आली तेव्हा त्यांनी परमेश्वर ते स्तन पूर्ववत करील असे शब्द उच्चारले, आणि त्याबरोबर त्या स्त्रीला पुन्हा स्तन प्राप्त झाले. कादिरवलीसाहेबांच्या कबरीजवळ नारळांची बाग आहे. एकदा कर वसूल करणारा अधिकारी तेथे येऊन नारळाच्या बागेच्या मालकाकडे कर मागू लागला, त्यावर मालकाने सांगितले की ही झाडे संतांची आहेत व त्यावर अजूनपर्यंत कोणी कर लावला नाही. तो अधिकारी कर दिलाच पाहिजे असे म्हणू लागला. शिवाय तो पुढे म्हणाला की नारळांना काही शिंगे नाहीत त्यामुळे मला त्यांची भीती वाटत नाही. आश्चर्याची गोष्ट अशी की त्याबरोबर नारळावर शिंगे उगवली. त्यांच्या कबरीजवळील नारळांच्या झाडावरील नारळांना अजून शिंगे दिसतात. त्या दिवसापासून आजपावेतो कोणीही बागेची करवसुली केली नाही. जफर शरीफचे म्हणणे असे की या गोष्टीची सत्यासत्यता परमेश्वरालाच ठाऊक, मी फक्त जे ऐकले तेच सांगितले. हे खोटे असेल तर त्याचा दोष त्या सांगणाऱ्याला लागो !

अनुक्रमणिका

## प्रकरण विसावे

# संत रजब सालार व संत सय्यद जलालुद्दीन, प्रेषितांचे स्वर्गारोहण; गूगा

संत रजब सालार हे सय्यद मसूद गाजी, गाजीमियॉं म्हणून ओळखले जातात. ते महंमद गझनीचे पुतणे होते व अवध प्रांतातील बहराइच या ठिकाणी हिदबरोबर झालेल्या युद्धात ते १५ जन १०३३ किंवा १०३४ मध्ये मारले गेले असे म्हणतात. या ठिकाणी त्यांची कबर असून तीवर त्यांच्या मृत्यूनंतर दोनशे वर्षांनी सूर्यमंदिराच्या जागेवर घुमट असलेली इमारत बांधण्यात आली. फिरोज तुगलगने (इ.स. १३५१-८८) तेथे विहिर व इतर इमारती बांधल्या. त्यांचा उत्सव हा रजब महिन्यातील कोणत्याही गुरुवारी किंवा शुक्रवारी साजरा करतात. त्यांचा उत्सव हा ‘कंदुरी’ म्हणून ओळखला जातो. त्यांच्या सन्मानार्थ करण्यात येणारा विधी पुढीलप्रमाणे असतो. प्रथम, गेल्या उत्सवाच्या वेळी खोदलेला व उरलेले अन्न त्यात टाकून बुजविलेला खड्डा (अलावा) कंदुरीकी फातिहासाठी उघडतात—कंदुरी म्हणजे लहान टॉवेल, —परंतु काही लोक असा खड्डा करीत नाहीत. फक्त धर्मभोळ्या स्त्रिया पवित्र अन्नावर उजेड पडू नये म्हणजे ते उघड्यावर राहू नये म्हणून त्या कुंड खोदून त्यात उरलेले अन्न पुरतात. त्यांच्या उत्सवाच्या दिवशी मासे व अंडी सोडून उरलेले मांसाचे पदार्थ, पोळ्या, भाज्या हे अन्न शिजवतात व हे अन्न प्रत्येक माणसासाठी वेगळे या पद्धतीने दस्तरखानवर ठेवतात, तेथे धूप जाळतात, अन्नावर संताच्या नावे फातिहा म्हणतात व मग ते अन्न खातात. काहीजण यावेळी गव्हाच्या पिठाचे ‘घोडे’ करतात, ते पाकात शिजवतात आणि इतर अन्न खाण्यापूर्वी थोडे ‘घोडे’ घरातच खातात. कधी कधी या ‘घोड्यांना’ ‘मोकळे घोडे’ असे म्हणतात. असे ‘घोडे’ त्यावर फातिहा म्हटल्यावर घराबाहेर खातात. काही लोक विशेषतः पायाच्या व्याधीने पीडित असलेले लोक आपला आजार बरा झाल्यास आपण ‘मोकळे घोडे’ करून त्यांवर या संताच्या नावे फातिहा म्हणून असा नवस बोलतात.

काही लोक रजब महिन्यातील एखाद्या गुरुवारी किंवा शुक्रवारी एका भांड्यात काठोकाठ फळे व अन्न भरतात व त्यावर सय्यद जलालुद्दीन बोखारा यांच्या नावे फातिहा म्हणतात व त्यानंतर हे अन्न खातात. तर काही मुसलमान, विशेषतः शिया मुसलमान हे या अन्नावर प्रेषितांचे जावई मौलाअलीच्या नावे फातिहा म्हणतात, ही धर्मात न सांगितलेली पण हिंदुस्थानमध्ये प्रचलित असलेली पद्धत आहे. या विधीला ‘हजारी’ सुद्धा म्हणतात असे सांगतात. [गार्से द तासी, op cit. 59.]

रजब महिन्याच्या पंधरा-सोळाव्या दिवशी किंवा काही पंडितांच्या मते सत्ताविसाव्या दिवशी देवदूत जॅब्रियलने प्रेषित महंमदांना बुराकवर बसवून स्वर्गात नेले. म्हणून ही रात्र पवित्र मानतात. यावेळी त्यांच्या स्वर्गारोहणाचा वृत्तांन्त वाचीत रात्रभर जागरण करतात आणि दुसऱ्या दिवशी उपवास करतात. अर्थात श्रद्धाळू व धर्मज्ञ लोकच ही रूढी पाळतात; सर्वसामान्य मुसलमान ती पाळीतही नाहीत व त्यांना ती माहीतही नाही.

संत गूगा अथवा जाहीर पीर ह्यांचा संप्रदाय पंजाब आणि संयुक्त प्रांत व राजस्थानच्या लगतच्या जिल्ह्यांतून आढळतो. परंतु ते चौहान घराण्यातील रजपूत होते असे सामान्यपणे म्हटले जाते. ते महंमद गझनी बरोबरच्या युद्धात मारले गेले असे म्हणतात. दुसऱ्या एका दंतकथेनुसार त्यांचे नाव जाहीर पीर नसून जहरिया ‘विषारी’ असे होते कारण त्यांनी एकदा सापाचे विष त्याच्या तोंडातून चोखून घेतले होते. त्यांच्या संप्रदायाचा

सर्पपूजेशी अगदी निकटचा संबंध आहे. हिंदु लोक त्याला नागराजाचा अवतार मानतात. [सी. जे. इबेस्टन, पंजाब इथनॉग्राफी, ११५ तळटीप; रोझ, १·१७२ तळटीपा; जनगणना अहवाल, पंजाब, १९११, १·१२० तळटीप; जे टॉड, ॲनल्स ऑफ राजस्थान, १९२०, २·८०७, ८४३, १०२७, ३·१४५२.]

अनुक्रमणिका

**प्रकरण एकविसावे**

## शब-इ-बरातचा सण

शब-इ-बरातला बराअत किंवा लैलातुलबरात अशी नावे आहेत (बरातचा अर्थ, संरक्षणाची लेखी हमी असा आहे). या सणाला असे नाव पडण्याचे कारण म्हणजे या दिवशी मानवी प्राण्यांच्या पुढील वर्षीच्या आयुष्याची व भविष्यांची नोंद स्वर्गात करण्यात येते ही समजूत, हे आहे. तिचा रमजान महिन्यातील गूढ रात्रीशी 'लैलातुलकद्र'शी नेहमी घोळ घातला जातो. 'लैलातुलकद्र'च्या रात्री सबंध प्राणिसृष्टी व वनस्पतिसृष्टी आदराने वाकून परमेश्वराला वंदन करते आणि तिची खरी तारीख फक्त प्रेषित व त्यांचे काहीही थोडे साथीदार यांनाच ज्ञात होती असे म्हणतात. पण वस्तुतः या दोन सणांचा परस्परांशी काही संबंध नाही. इजिप्तमध्ये शब-इ-बरातचा सण शबान या मुस्लीम वर्षाच्या आठव्या महिन्याच्या मध्यावर साजरा करतात. त्यामुळे तेथे या सणाला 'लैलातुलनिस्फमीं शबाना' असे म्हणतात. [लेन, एमई. १·२०१.] मौलाना फजलुल्ला बिन झिया-उल-अब्बासीने लिहिलेल्या 'खजान-जवाहीर-जलालियात'या ग्रंथात असा उल्लेख आहे की कुराणमध्ये परमेश्वराने या महिन्याला 'बरात', 'लैलातुल मुबारक', 'रहमत' व 'कारैका' अशी चार नावे दिली आहेत.

शब-इ-बरात आणि बकर-ईद या दोन सणांच्या वेळीच खरे म्हणजे रात्री जागरण करून हे सण साजरे करतात. शब-इ-बरातचा अरफ म्हणजे जागरण पुढीलप्रमाणे करतात—तेरा शबानला दिवसा किंवा सायंकाळी मुसलमान लोक आपापल्या घरी त्यांना आठवतील तितक्या दिवंगत आप्तांच्या नावे मलिदा, आमटी, मिठाई हे पदार्थ तयार करतात. यापैकी काही पदार्थ वेगवेगळ्या ताटांत ठेवून व त्यावर फातिहा म्हणून ते आपण ज्यांचे ऋणाईत आहोत त्यांना व ज्यांनी आपल्यावर मेहरनजर करावी असे वाटते त्यांना पाठविण्यात येतात. मुस्लीम पंडित मंडळी या अन्नावर फातिहा कधीच म्हणत नाहीत. याचे कारण प्रेषितांनी असे कधीच केले नव्हते असेही कदाचित असू शकेल. गुजरातमधील सुन्नी मुसलमान यावेळी दिवंगत आप्तांच्या शांतीसाठी प्रार्थना करतात, आप्तांना मिठाई, मलिदा, इत्यादी पाठवितात, किंवा ज्यांच्या घरी मुलाचा किंवा मुलीचा वाङ्‌निश्चय झालेला असतो विशेषतः अशा कुटुंबांकडे पाठवितात, [बीजी. ९ भाग २, १४०.] तसेच दारूकाम उडवितात.

शब-इ-बरातचा मुख्य सण चौदाव्या दिवशी साजरा करतात. ज्यांनी आदल्या दिवशीचे विधी पार पाडलेले नसतात ते लोक या दिवशी विशेष आवडीचे पदार्थ तयार करतात. व त्यावर प्रेषित आणि पूर्वजांच्या नावे फातिहा म्हणतात, तसेच दारूकाम उडवितात. या सणाच्या दोन-तीन दिवस अगोदर मुले रोज टिमकी, ताशा वाजवीत गावभर फिरतात. ज्यांना नवससायासाने मुलगा किंवा मुलगी झाली असेल असे लोक आपल्या मुलासाठी मातीचे हत्ती व मुलगी असेल तर मातीचे दिवे तयार करतात व त्यात वाती पेटवतात. तसेच या हत्ती-दिव्यांच्या प्रतिकृतीसमोर फळे, मिठाई ठेवतात आणि 'हत्ती'वर प्रेषितांच्या नावे-परंतु काहीजण अली मूर्तजाच्या नावे-आणि 'दिव्या'वर बिबी फातिमाच्या नावे फातिहा म्हणतात. या 'हत्ती-दिव्यांसमोर' बांबूची कमान करतात, तीवर रोषणाई करतात आणि दारूकाम उडवितात. फातिहा म्हटल्यानंतर आप्तस्त्रिया या दिव्यात पैसे टाकतात. दुसऱ्या दिवशी सकाळी ज्याने नवस केलेला असतो तो माणूस मुलामुलींच्या हस्ते ही फळे व मिठाई मित्रांच्या घरी पाठवितो. या मुलामुलींना ते मित्र त्या मोबदल्यात काही पैसे भेट म्हणून देतात. हे पैसे व आदल्या रात्री दिव्यात टाकलेले पैसे चकोली नावाचा मांसाचा पदार्थ तयार करण्यासाठी वापरतात, तसेच हा पदार्थ मित्रांना

वाटतात. एवढे झाल्यावर हे ‘हत्ती-दिवे’ घराच्या दरवाजावर किंवा अंगणाच्या भिंतीवर ठेवतात. प्रेषितांच्या आज्ञेवरून, रात्री एकशेदोन प्रणिपातांच्या प्रार्थना, कुराणचे व दुरुदचे पठण करीत जागरण करतात आणि दुसरे दिवशी उपवास करतात. याशिवाय करण्यात येणारे सगळे समारंभ आधुनिक असून ते अनावश्यक व उधळपट्टीचे आहेत. आदल्या दिवशी करण्यात येणारे समारंभ हे आधुनिक असले तरी ते करणे स्तुत्य आहे (बिदत्-इ-हुस्न), पंधराव्या दिवशी रात्री मोठ्या प्रमाणावर दारूकाम उडविण्यात येते. खरे म्हणजे यावेळी इतर कोणत्याही सणाच्या वेळी उडविण्यात येणाऱ्या दारुकामापेक्षा जास्त दारूकाम उडविले जाते, तसेच मित्रांनाही दिल्या जाणाऱ्या भेटवस्तू दारूकामाच्या स्वरूपातीलच असतात. कधीकधी ते एकमेकांच्या अंगावर दारूकाम उडवून खोटीखोटी लढाई खेळतात. यामुळे पुष्कळदा कपडे पेटणे, माणसे जखमी होणे व मरण पावणे असे प्रकार घडतात. शब-इ-बरातच्या वेळीसुद्धा शाळामास्तर मुलांच्या पालकांकडून भेटवस्तू मिळावी या अपेक्षेने मुलाजवळ कागदावर पवित्र वचने (ईदी) लिहून देतात.

अनुक्रमणिका

## प्रकरण बाविसावे

# रमजानचा सण

रमजान 'प्रखर उष्णतेचा महिना' हा मुस्लीम पंचांगानुसार आठवा महिना आहे. या महिन्यात करण्यात येणारा उपवास काही पंडितांच्या मते मुसलमानांनी ख्रिश्चनांकडून उचललेला आहे. परंतु तो सबीअन आणि मानिचाइअन यांच्याकडून उचललेला आहे हेच अधिक संभाव्य दिसते. [ह्युजेस, ५३४; वेस्टरमार्क, ओरिजन अँन्ड डेव्हलपमेंट ऑफ द मॉरल आयडियाज्, २·३१२. तरीही तो जुन्या अरबी धर्मावरून निघाला असू शकेल (मार्गोलियाथ, महंमद, २४८ असे म्हणतो की, तो ज्यूंच्या डे ऑफ अटोनमेंटच्या बदली घेतला). याचे मूळ काहीही असो, हा स्पष्टपणे सैनिकी व्यायाम आहे. याचा हेतू सैनिकांना सहनशीलता आणि रात्री काम यासाठी प्रशिक्षत करणे हा आहे. (ईआरई. ८·८७५).] रमजानच्या उपवासाची सुरुवात, रमजान महिन्यात प्रथम चंद्रदर्शन झाल्याच्या संध्याकाळनंतर उजाडणाऱ्या सकाळपासून होते. रमजानच्या काळात उपवास सोडण्याची वेळ सकाळी २ ते ४ अशी असते. रमजान महिन्यातच कुराण स्वर्गातून पृथ्वीवर अवतरले. उपवास करणाऱ्या माणसाने उपवासाला आरंभ करताना आणि उपवास सोडताना आपल्या उपवासाचा हेतू (नीयत) स्पष्ट केला पाहिजे ही ईश्वरी आज्ञा आहे. उपवासाच्या काळात काहीही खाणे अगर पिणे तसेच स्त्रीसंग करणे धर्मशास्त्राच्या दृष्टीने वर्ज्य आहे. मुसलमान लोक सूर्यास्ताची प्रार्थना (मगरिब) म्हणण्याच्या थोडा वेळ अगोदर शक्य तर खारीक खाऊन, नसता थोडे पाणी पिऊन हा उपवास सोडतात. रमजानच्या काळात मुसलमानांनी आपला वेळ अष्टौप्रहर ईशचिंतनातच घालविला पाहिजे असे म्हणतात. लहान मुले व वेडसर व्यक्ती यांना उपवास न करण्याची सूट असते. आजारी व्यक्ती आणि प्रवासी व्यक्ती आपला उपवास दुसऱ्या आणि सोयीस्कर वेळापर्यंत लांबणीवर टाकू शकतात. 'पण जो आजारी किंवा प्रवासात आहे त्याने तितके दुसरे दिवस उपवास करावा. परमेश्वर तुमचे कल्याणच इच्छितो; अकल्याण नव्हे. परमेश्वराने तुम्हांला जे सुयोग्य मार्गदर्शन केले त्याबद्दल त्याचे आभार माना.' [२ कुराण, २·१८१; श्रीमती मीर हसन अली, १०३ तळटीप.]

रमजानच्या काळात विशेष प्रार्थना म्हणतात. या प्रार्थना तेवीस किंवा काहींच्या मते बावीस प्रणिपाताच्या असतात. या प्रार्थनांना 'विश्रांती' (तरावीह) असे म्हणतात. कारण प्रार्थना करणारा समुदाय प्रत्येक दुसऱ्या प्रणिपातानंतर प्रेषिताला 'सलाम' म्हणतात. व प्रत्येक चार प्रणिपात पूर्ण झाल्यावर थोडा वेळ विश्रांती घेतात व त्यानंतर पुन्हा प्रार्थना सुरू करतात. या प्रार्थनांना जवळपास एक तासाचा कालावधी लागतो. प्रेषितांनी अशी आज्ञा केली होती की, या प्रार्थना नमाज-इ-इशानंतर म्हटल्या पाहिजेत. या प्रार्थना कुराणाच्या पठणाला जितके दिवस लागतील तितके दिवसच म्हणतात; त्या नंतर बंद करतात. हाफीजच्या नेतृत्त्वाखाली या म्हटल्या तर त्या एक दोन दिवसांतच पूर्ण करणे शक्य होते, कारण त्याला सर्व कुराण पाठ असते. ही कामगिरी पार पाडणाऱ्या इमाम किंवा हाफीजला पैसे अगर कापडाच्या स्वरूपात भेटवस्तू देतात. काही लोक कुराणचे एकदा पठन झाल्यावरही विश्रांती प्रार्थना व कुराणाच्या १०५ व्या म्हणजे सुरात-उल-फील प्रकरणापासून किंवा त्यानंतरच्या एखाद्या प्रकरणापासून कुराणचे वाचन महिन्याच्या शेवटापर्यंत चालू ठेवतात. हाफीज नसेल तर या प्रार्थना तीसही दिवस म्हणणे आवश्यक असते. प्रत्येक चौथ्या प्रणिपातानंतर विश्रांती घेण्यापूर्वी इमाम सर्वांसाठी परमेश्वराला आपले दोन्ही हात वर करून प्रार्थना करतो. त्यानंतर समुदाय त्याला आमेन, आमेन असे म्हणून प्रतिसाद देतो. शिया मुसलमान या प्रार्थना म्हणत नाहीत. त्याचे कारण असे की प्रत्येक चौथ्या प्रणिपातानंतर इमाम व समुदाय प्रेषितांच्या चार सहकाऱ्यांचीही स्तुती गात असतो; त्यांना ती ऐकणे असह्य होते.

अनुक्रमणिका

शुक्रवार हा मुसलमानांसाठी सब्बातचा दिवस, म्हणजे या दिवशी पिता आदमची माती गोळा करण्यात आली होती. या दिवशी अखेरचे न्यायदान होत असते असे मानतात. तसेच ह्या दिवशी शेवटच्या तीन तासांपैकी एक तास असा असतो की ज्या वेळेस परमेश्वराला केलेल्या सर्व विनंत्या मान्य होतात असेही मानतात. या दिवशी खातिब, मुआज्ञीन, काजी आणि मुसलमान मशिदीत जमा होतात. मुआज्ञिन उपस्थित असेल तर तो अगोदर प्रार्थनेला हाक देतो व हजर असणारे आपणाला जे आठवले ते म्हणतात. यानंतर इमाम 'खुतबा' म्हणतो—यात प्रार्थना, ताकीद व उपदेश असतो. परंतु महिन्याच्या शेवटच्या शुक्रवारी इमाम समुदायाबरोबर प्रथम अरबी व त्यानंतर फार्सी व हिंदुस्थानीमध्ये रमजान व या रात्रीच्या गुणांवर भाषण देतो. हे भाषण इतके भावपूर्ण असते की पंडित व संभावित भक्तांच्या डोळ्यात अश्रू उभे राहतात.

पुष्कळसे शिया मुसलमान रमजान महिन्याच्या एकवीस किंवा विसाव्या दिवशी रात्री अलीच्या कबरीची, मोहरमच्या ताबुतांपैकी एखाद्यासारखी प्रतिकृती (झरीह) तयार करून तिची गावभर मिरवणूक काढतात व शोक करतात. तसेच अलीच्या नावे अन्नावर फातिहा म्हणून ते अन्न वाटून टाकतात. या दिवसांपैकी कोणत्या तरी-कोणता हे निश्चित नाही-दिवशी अली मरण पावला, म्हणून ते असे करतात. [अली हा १७ रमजान ४० हिजरी (जानेवारी २२, ६६१) ला मशिदीत एका मारेकऱ्याकडून जखमी झाला आणि तो जानेवारी २५ ला मरण पावला (मुईर, द खलिफत, २९९).] सुन्नी मुसलमानही यावेळी अन्न शिजवतात, त्यावर फातिहा म्हणतात, पण ते अलीच्या कबरीच्या प्रतिकृतीची मिरवणूक काढीत नाहीत.

पुष्कळ मुसलमान या महिन्यात महिनाभर, काहीजण पंधरा दिवस, काहीजण अखेरच्या दिवशी तर काहीजण तीन दिवस तीन रात्री मशिदीच्या एखाद्या कोपऱ्यात पडदा लावून एकांतवासात बसतात. या एकांतवासाच्या काळात ते आवश्यक कारणाशिवाय आणि वुजू आदिसाठी शिवाय ते आपली जागा सोडीत नाहीत. या काळात ते कोणाबरोबरही इहलौकिक बाबींवर बोलत नाहीत. ते सदैव कुराणचे पठण व परमेश्वराची स्तुतिस्तोत्रे म्हणत राहतात.

हे कुराणचे पठन मोठ्याने करणे चांगले असते असे म्हणतात. या शिस्तीमुळे अनेकांना थोरवी व कुशाग्र बुद्धी प्राप्त झालेली आहे; अशांचे आशिर्वाद व शाप तीक्ष्ण तलवारीसारखे परिणामकारक असतात. व्यवसायामुळे जे लोक हा दिर्घकाळाचा एकांतवास पाळू शकत नाहीत त्यांनी एक दिवस एकरात्र एकांतवास पाळला तरी पुरेसा ठरतो. हा एकांतवास हे एक आदेशात्मक कर्तव्य आहे (सुन्नत-अल-मुअक्कद, फर्जकिफाई) म्हणजे गावातील एखाद्या माणसाने किंवा समुदायापैकी एकाने जरी हे कर्तव्य पार पाडले तरी ते सर्वांनी पाळल्यासारखे होते. त्याचप्रमाणे गावातील एखाद्या माणसाने एकांतवासात बसून चिंतन केल्याने त्याला जे पुण्य लाभते ते जणू काही गावातील सर्व मुसलमानांनी केल्यासारखे होते.

अरबी आणि इराणी मुस्लीम पंडितांनी 'लैलातुल कद्र' अथवा 'शब-इ-कद्र' ही रमजानच्या २७ व्या दिवशींची रात्र आहे असे ठरविले आहे. या दिवशी रात्री मुसलमान ऊद उदबत्त्या पेटवतात, ऐच्छिक प्रार्थना म्हणतात, कुराणचे पठन करतात. प्रार्थनेसाठी वारंवार इतरांना हाक देतात. या रात्री जे लोक रात्रभर जागे राहतात त्यांच्यावर स्वर्गातून देवदूत शांती, ईश्वराचे आशीर्वाद यांचा वर्षाव करतात. या रात्रीचे असे असंख्य गुण आहेत. फक्त प्रेषित सोडून, इतरांना ज्ञात नसलेल्या दोन गूढ गोष्टी आहेत. त्यापैकी एक म्हणजे 'लैलातुल

कद्र'ची रात्र; या रात्री सर्व प्राणिसृष्टी व वनस्पतिसृष्टी ईश्वराला वाकून आदरपूर्वक वंदन करते. दुसरी गोष्ट म्हणजे इस्म-उल-आजम (परमेश्वराचे थोर नाव) या नावात असे सामर्थ्य असल्याचे सांगतात की, ज्या कोणाला ते ज्ञात असते तो, जे इच्छील ते घडवू शकतो, जिवंत असलेल्यांना मारू शकतो आणि मृतास पुन्हा जिवंत करू शकतो व आपणास हवे तेथे वाहून नेऊ शकतो.

गैर-इ-माहदी नावाची मुसलमानांची छोटी जमात आहे. या जमातीचा असा विश्वास आहे की, इमाम माहदी पुन्हा दिसणार नाही. ते शहरातील आपल्या भागात एक जमाअतखाना उभारतात व तेथे 'लैलातुल कद्र'च्या रात्री जमतात. ते प्रथम माहदीच्या नावे दोन प्रणिपातांची प्रार्थना म्हणतात व नंतर 'परमेश्वर सर्वशक्तिमान आहे. महंमद हा आमचा प्रेषित आहे आणि कुराण व माहदी न्यायी व सत्य आहेत' असे तीन वेळा मोठ्याने म्हणतात. शेवटी ते 'इमाम माहदी आला व गेला; जो कोणी यावर अविश्वास दाखवील तो काफीर आहे' असे म्हणतात. हे ऐकल्यावर सुन्नी मुसलमानांना इतका राग येतो की ते प्रथम मुलांना, त्यांना दगड मारा असे सांगतात व नंतर आपण तलवारी घेऊन त्यांच्यावर चालून जातात. गैर-इ-माहदींना या रात्री आपणाला मृत्यू आल्यास ते हौतात्म्य होय असे वाटते. या दोन जमातींमध्ये कायम शत्रुत्व असते. व दरवर्षी या प्रसंगीच्या संघर्षात अनेकजण प्राणास मुकतात. जफर शरीफ म्हणतो, "अशा प्रकारचे संघर्ष मी एक दोन वेळा पाहिले पण एकदाही त्यात गैर-इ-माहदींचा विजय झाला नाही. तसेच यासंबंधीच्या अहवालावरून मला असे आढळले की मृत व्यक्ती पालथ्या अवस्थेत पडलेल्या होत्या. मृत व्यक्ती पालथ्या पडण्याचे कारण त्यांची अश्रद्धा आहे असा आरोप त्यांच्यावर केल्यास ते म्हणतात की असे नाही. आमची प्रेते भक्तीने प्रणिपात करीत आहेत. " या वैराचे खरे मूळ असे की शिया व सुन्नींची इमाम माहदी पुन्हा दिसतील अशी समजूत आहे, इराणमधील मुसलमानांना ते अजून जिवंत आहेत व येशू ख्रिस्ताच्या पुन्हा येण्याच्या वेळी ते इलियास या प्रेषिताबरोबर दिसतील असे वाटते. गैर-इ-माहदींना तसे वाटत नाही. गैर-इ-माहदी हे धर्मांतरित हिंदू व परदेशी मुसलमान आहेत. ते महंमद माहदीचे अनुयायी आहेत. महंमद माहदी हा प्रेषितांचा नातू, हुसेनचा वंशज होता. त्याचा जन्म जोनपूर येथे १४४३ मध्ये झाला. त्याने अनेक चमत्कार करून दाखवले. तो इ.स. १५०५ मध्ये कुर्दिस्तानमधील कारा येथे मरण पावला, त्याचा प्रेषिताइतका आदर राखतात. जो कोणी त्याला मानीत नाही तो निश्चितपणे नरकात जाणार असे म्हणतात. गैर-इ-माहदी हे स्वतःला महंमदाचे अनुयायी किंवा दाईरेवाला असे म्हणवतात. कारण त्यांच्या प्रार्थनागृहाभोवती गोलाकार भिंत असते. ते इतरांना काफीर किंवा दस्तगीरवाला म्हणतात. कारण संत पीर-इ-दस्तगीरवर त्यांचा विश्वास नाही. त्यांची संख्या सुन्नी व शियांच्या तुलनेत इतकी कमी आहे की आपण त्यांना 'कणिकीतील मिठाप्रमाणे ' ही म्हण लावू शकतो.

अनुक्रमणिका

### प्रकरण तेविसावे

## बंदा नवाज,

[बंदा नवाज, बंदा-परवर म्हणजे ‘आपल्या सेवकांची प्रेमाने काळजी घेणारा, पोशिंदा’.]

## गेसू दराजचा दीपोत्सव

हा उत्सव मुस्लीम पंचांगातील शेवटचा महिना जिल्कदच्या सोळाव्या दिवशी पाळतात, या महिन्याला बंदा नवाजचा महिना असेही म्हणतात. बंदा नवाज, सय्यद महंमद गेसू दराज हे थोर वली होते. फिरोजशहा बहमनीच्या काळात ते इ.स. १४१३ मध्ये गुलबर्गा येथे आले व याच ठिकाणी इ.स. १४३२ मध्ये मृत्यू पावले. एकदा ईशचिंतनाच्या तंद्रीमध्ये असताना त्यांना असे अंतर्ज्ञान झाले की, ज्या लोकांना आपल्या हयातीत योग्य कारणामुळे मक्केची यात्रा करणे जमत नसेल त्यांनी बंदा नवाज यांच्या कबरीचे दर्शन घ्यावे म्हणजे त्यांना हजचे पुण्य मिळेल. सोळा तारखेला त्यांचा संदल काढतात व सतरा तारखेच्या किंवा मुस्लीम गणनेप्रमाणे अठरा तारखेच्या संध्याकाळी त्यांचा उरूस साजरा करतात. त्यांचा उरूस कादिरवलीसाहेबांच्या उत्सवाप्रमाणे किंवा त्याहीपेक्षा अधिक थाटामाटाने साजरा करतात. देशाच्या इतर भागात पंधराव्या व सोळाव्या दिवशी त्यांच्या नावे रोशनाई करतात, मलिदा करतात व त्यावर फातिहा म्हणतात. यापैकी काही स्वतः खातात, काही आप्तांकडे पाठवितात व इतर लोकांमध्ये वाटून टाकतात. सोळा तारखेच्या किंवा मुस्लीम हिशेबाप्रमाणे सतरा तारखेच्या रात्री काही मुसलमान तुपाचे सोळा दिवे बंदा नवाजच्या नावे लावतात तसेच मलिदा करतात व त्यावर फातिहा म्हणतात.

अनुक्रमणिका

**प्रकरण चोविसावे**

# ईद-उल-फितर उत्सव

ईद-उल-फितर उत्सव म्हणजे उपवास सोडणे. यास ईद-उल-सगीर म्हणजे छोटी मेजवानी असेही म्हणतात. तुर्की मुसलमान याला रमजान बैराम [लेन, एमई. २·२१०.] असे म्हणतात. हा सण शव्वाल या दहाव्या महिन्याच्या पहिल्या दिवशी साजरा केला जातो. या महिन्याला हिंदुस्थानमध्ये 'दुधाचा महिना' असेही म्हणतात. कारण या सणाच्या दिवशी मुसलमान लोक दुधात शेवया शिजवतात. तसेच या महिन्याला 'रिकामा महिना' म्हणतात कारण फक्त हाच असा महिना आहे की ज्यात कोणताही सण नसतो आणि ज्याचे वर्णन करावयाचे आहे तो सण पूर्वीच्या महिन्याशी, रमजानशी संबंधित आहे असे मानतात, म्हणून त्याला रमजान की ईद म्हणतात आणि म्हणून त्याचा त्यात समावेश करण्यात आला कारण तो रमजान उत्सवाची समाप्ती दर्शवितो. ज्याप्रमाणे अब्राहमने इस्माईलचा बळी दिल्याच्या स्मृतीसाठी करण्यात येणार खाटकांचा, जसा शब-इ-बरात कंगीगर म्हणजे फण्या बनविणारांचा किंवा मोहरम जसा सय्यदांचा विशेष सण असतो तसा पंजाबमध्ये ईद-उल-फितर हा जुलाह विणकरांचा विशेष सण आहे.

रमजानच्या ताणानंतर येणारा हा आनंदाचा सण आहे. दुःखानंतर चैन ही सेमिटिक वंशातील उपासकांमध्ये आढळून येणारी सामान्य अशी पद्धत आहे. [आर. स्मिथ, रिलिजन ऑफ सेमिटिज, २६२.] दक्षिण हिंदुस्थानातील आबालवृद्ध मुस्लीम स्त्रीपुरुष ईद-उल-फितरच्या प्रार्थना म्हणण्यापूर्वी स्नान करतात, डोळ्यांना सुरमा लावतात आणि नवे कपडे घालतात. उत्तर हिंदुस्थानमध्ये बायका मृत सवतीच्या प्रतिमेला कपडे अर्पण करतात. याला 'पहिल्या पत्नीचा मुकुट' (सौकन मौरा) असे म्हणतात. आपल्या मृत सवतीस आपल्याबद्दल वाटणारी असूया कमी व्हावी हा असे करण्यामागचा हेतू असतो. प्रार्थनास्थानी जाण्यापूर्वी, धर्मशास्त्रात सांगितलेले दान (सदका, फितर) फकीर व इतर गरिबांना वाटतात. अडीच शेर गहू किंवा कोणतेही अन्नधान्य, खारका, द्राक्षे यांचा या दानात समावेश आहे. हे दान केल्यानंतर प्रार्थनेस हजर राहण्याची अनुमती दिली जाते. सकाळी ८ ते १२ च्या दरम्यान काजी किंवा त्या दर्जाच्या एखाद्या विद्वानाला ते मिरवणुकीने प्रार्थनास्थळी नेतात. बहुतेकजण या मिरवणुकीने जाते वेळी मनातल्या मनात ईश्वराची थोरवी गातात. तेथे गेल्यावर प्रार्थना म्हणतात व काजी उच्चासनावर उभा राहून प्रेषिताप्रमाणे हातात काठी घेऊन अरबीत नीत्युपदेश करतो. या प्रार्थना व नीत्युपदेशाला साधारणतः दीड तास लागतो. हे संपल्यावर काजीला त्याच्या घरी मिरवणुकीने पोचवतात आणि उरलेल्या दिवसभरात मेजवानी करतात, भेटवस्तू देतात, परस्परांच्या गाठीभेटी घेतात. पुरुष जेव्हा घरी येतात तेव्हा घरात पाऊल ठेवण्यापूर्वी त्यांच्या आई किंवा बहिणी त्यांच्या अंगावरून लाल किंवा पिवळ्या रंगाचे पाणी ओवाळून फेकून देतात. यामागे इडापिडा टळो हा हेतू असतो. पण पुष्कळजण असे करीत नाहीत. उपवास करणाऱ्यांनी दान (फितर), उपवास, विश्रांती प्रार्थना, रमजानमधील करावयाचा एकांतवास याकडे दुर्लक्ष केल्यास ते पृथ्वी व स्वर्ग यामध्ये लोंबकळत राहतील असे म्हणतात.

आज्ञा, प्रार्थना किंवा धर्मोपदेश, 'खुतबा'मध्ये, ज्या राजाच्या शिक्क्याचे नाणे राज्यात चालू असेल त्या राजाच्या नावे प्रार्थना म्हणण्यात येतात. 'हिंदुस्थानमध्ये खुतबा म्हणण्याच्या वेळी प्रत्येक मुसलमानाला

आठवड्यातून किमान एकदा आपण दारुल हर्ब म्हणजे "शत्रूभूमीमध्ये" आहोत याचे स्मरण होते'. तरीही मुस्लीम सत्ता नसलेल्या देशात आपण खुतबा म्हणू शकतो याचा अर्थ आपण दारुल अमान म्हणजे 'आपल्या संरक्षण असलेल्या भूमीमध्ये' [ह्यूजेस, २७७.] आहोत या वस्तुस्थितीची त्याला जाणीव होत असली पाहिजे. दिल्लीच्या फिरोजशहाने (१३५१-८८) आपल्या नावाअगोदर पूर्वीच्या सगळ्या राजांच्या नावांचा समावेश करावा अशी आज्ञा काढली होती. [इलियट हाऊसन, ३·२९२.] या खुतब्याच्या वेळी एखादा नवाब किंवा श्रेष्ठी राजाचा प्रतिनिधी म्हणून उपस्थित असेल तर तो काजीला मानाचा पोशाख देतो किंवा एखादा स्थानिक अधिकारी असला तर तो काजीला मलमलचे कापड देतो. यावेळी काही लोक काजीच्या डोक्यावर सोन्या-चांदीची फुले उधळतात. ती फुले काजीचे सेवक गोळा करून काजीला देतात. यानंतर काजी व्यासपीठाच्या मधल्या पायरीवर उभा राहतो व जास्तीच्या अशा उत्स्फूर्त प्रार्थना (मुनाजात) म्हणतो. म्हणजे तो इस्लामधर्मीयांचे कल्याण व्हावे, मुसलमानांचे पापक्षालन व्हावे, सर्व यात्रिक व इतर प्रवासी यांना सुरक्षितता लाभावी, आजाऱ्यांचा आजार दूर व्हावा, वेळेवर पाऊस पडावा, दुर्दैव दूर व्हावे म्हणून ईश्वराची प्रार्थना करतो. नंतर तो व्यासपीठावरून खाली उतरतो व प्रार्थनेच्या चटईवर गुडघे टेकलेल्या अवस्थेत बसून सर्व समुदायाच्या वतीने परमेश्वराची करुणा भाकतो. उपस्थित असणारे लोक दर वेळी उभे राहतात आणि 'दीन' (धर्म) म्हणतात. यानंतर मित्र परस्परांना आलिंगन देतात. अपरिचित लोक एक दुसऱ्यांशी हस्तांदोलन करतात व मेजवानीच्या प्रसंगी परस्परांना 'आरोग्य लाभो' अशी शुभेच्छा व्यक्त करतात. आणि दुरुद म्हटल्यानंतर सर्वजण काजीच्या हाताचे चुंबन घेतात (दस्त बोझी). या खुतब्याच्या वेळी फकीर व भिकाऱ्यांचा वर्ग बऱ्याच मोठ्या प्रमाणावर जमा होतो. खुतब्याच्या वेळी एखाद्याला आपल्या मित्राला भेटण्याची संधी न मिळाल्यास तो त्याच्या घरी भेट देतो. तेथे त्याचे चंदन, विडा, गुलाबपाणी देऊन स्वागत केले जाते आणि कधी कधी जेवणही दिले जाते.

अनुक्रमणिका

**प्रकरण पंचविसावे**

## बकर-ईद

बकर-ईद याचा अर्थ 'गायीचा सण' असा आहे. यालाच 'ईद-उल-जोहा', 'ईद-उल-अझा', 'ईद-उल-कुरबान,' यौम-उल-नहर 'बळीचा उत्सव' असे म्हणतात. हा उत्सव जिल्हेज महिन्याच्या नवव्या दिवशी दिवसा किंवा रात्री साजरा करतात. मक्केजवळील मिनाच्या दरीत यात्रेकरू जे बलिदान करतात त्याच्या बदली हा बळी दिला जातो असे सामान्यपणे हिंदुस्थानात मानतात. या सणाच्या दिवशी मलिदा, मिठाई करतात, त्यावर दिवंगत आप्तांच्या नावे फातिहा म्हणतात. काही मुसलमान या दिवशी उपवास 'नहर्' करतात. हा उपवास सकाळी ६ ते ९-४५ पर्यंत म्हणजे पावणेचार तासांचा असतो.दहाव्या दिवशी सकाळी मुसलमान रमजान व ईद-उल-फितरप्रमाणे धर्मघोष (तकबीर) करीत ईदगाहला जातात.

श्रीमंत मुसलमान प्रार्थना म्हटल्यानंतर बकरी बळी देतात. हे बलिदान अब्राहमने आपला मुलगा इस्माईल यास परमेश्वरी इच्छेनुसार बळी देण्याची जी तयारी दाखविली होती त्याच्या स्मरणाप्रीत्यर्थ असते. पुरुष, स्त्रिया व मुले असे सातजण मिळून यावेळी गाय किंवा उंट बळी देतात. हे प्राणी बळी देणाऱ्या लोकांना पूल-इ-सिरात म्हणजे मृत्यूच्या पुलावरून घोड्याच्या वेगाने घेऊन जातात अशी समजूत आहे. हा पूल स्वर्ग व नरक यांच्यामध्ये असून तो केसापेक्षा सूक्ष्म व तलवारीच्या पात्यासारखा तीक्ष्ण आहे आणि अखेरच्या न्यायदानाच्या दिवशी सर्व मनुष्यप्राण्यांना या पुलावरूनच जावे लागते. पुण्यवान लोक हा पूल घोडा किंवा विजेच्या चपळाईने पार करतात. तर दुराचारी लोक या पुलावरून पाय घसरून सरळ नरकात पडतात व नरकाग्नी त्यांना गिळंकृत करतो. [तौलनिक धर्मात 'मृत्यूच्या पुला'साठी पहा – (सर) ई. बी. टेलर, प्रिमिटिव्ह कल्चर, ति. आ. २·९४; रिसर्चेस इनटू द अर्ली हिस्ट्री ऑफ मॅनकाइंड, ३४९ तळटीपा. -मुसलमानांनी ही श्रद्धा इराणी चिनव्हटपेरुतुपासून उचलली (ईआरई, २·८५२).]

उत्तर हिंदुस्थानमध्ये बळी देण्याची पद्धत खाली वर्णन केल्याप्रमाणे आहे.

चाळीस रुपयांपेक्षा कमी संपत्ती असलेले लोक सोडून उरलेल्या सर्व मुसलमानांना हे बलिदान करणे बंधनकारक आहे. हे बलिदान जिल्हेज महिन्याच्या दहा, अकरा किंवा बाराव्या दिवशी करावे, बळी देताना धर्मघोष करावा. बळी देण्याचा विधी करणारा मुसलमान स्वतः किंवा त्याच्या अनुज्ञेने दुसरा मुसलमान हातात सुरा धरतो. बळी द्यावयाचा प्राणी मैदानात आणून त्याला मक्केकडे तोंड करून उभे करतात. नंतर तो माणूस हातातील सुऱ्याने त्या प्राण्याचा गळा कापतो नंतर तो प्राणी साफ करण्यासाठी खाटकाकडे देण्यात येतो. प्राण्याच्या मांसाचे तीन हिस्से करण्यात येतात. यापैकी एक हिस्सा दानधर्म म्हणून देतात. उरलेल्या दोनपैकी एक हिस्सा ज्याने तो प्राणी बळी दिला तो ठेवून घेतो व एक आप्त व मित्र यांच्यात वाटून टाकतो. या प्राण्याची कातडी किंवा तितक्या किंमतीइतके पैसेही दान करून टाकतात. हे दान कोणाही व्यक्तीस न देता मशीद किंवा शाळा बांधण्यासाठी द्यावे, पण ते बांगी किंवा गरीब विद्यार्थी यांस दिले तर हरकत नसते. फक्त चतुष्पाद व त्यातही ज्यांचे मांस खाणे धर्मशास्त्रसंमत असते असेच प्राणी बळी दिले पाहिजेत. असा प्राणी बळी देताना तो एक वर्षापेक्षा जास्त वयाचा व सर्व अवयवांची नीट वाढ झालेला आहे याची खात्री करून घेतली पाहिजे. प्राणी बळी दिल्यावर त्याचे रक्त पुरतात, ते कोणत्याही वस्तूवर पडू देत नाहीत, सहज मृत प्राण्याचे रक्त मांस किंवा

कोणताही भाग पवित्र असतो. औरंगजेबाच्या काळात बळी देण्याच्या वेळी काजी आपल्यामागे हातात नंगी तलवार घेतलेला गुलाम उभा करून औरंगजेबाचे स्वागत करीत असे. त्यानंतर प्रथम त्यांच्या वंशातील सम्राटांची नावे उच्चारून शेवटी औरंगजेबाची स्तुती करीत असे. समुदाय मशिदीतून गेल्यानंतर बळी द्यावयाच्या उंटाला पायरीशी उभे करण्यात येत असे. सम्राट घोड्यावर बसून सदर उंटाच्या मानेत भाला खुपसित असे. किंवा आपल्या मुलांपैकी एखाद्याला असे करण्यास सांगीत असे. विशेषतः जेव्हा त्याचा मुलगा शाह आलम हा दरबारात हजर असे तेव्हा त्याच्यावर हे काम सोपवीत असे. 'यानंतर गुलाम उंटाचे मांस वाटून घेण्यासाठी धडपडत असत.' [मनुची २·३४९ तळटीप.] त्यांना हे मांस जणू काही संताच्या पवित्र अवशेषासारखे वाटत असे. तेहरान येथे बळी द्यावयाच्या उंटाला झूल घालून निगारिस्तानजवळच्या चौकात नेण्यात येत असे आणि शुभ क्षणी शाहच्या नातलगांपैकी एकजण उंटाच्या मानेत भाला खुपसीत असे. त्यानंतर लगेच शंभर जण उंटाच्या शरीरात सुरे खुपसित असत आणि बळी दिलेल्या उंटाचे मांस मिळविण्यासाठी शहरातील प्रत्येक भागाचे लोक धडपडत असत. हे मांस मिळाले तर येते वर्ष सुखाचे जाते असा त्यांचा समज होता.

ईद-उल-फितर व बकर-ईद हेच खरे म्हणजे मुसलमानांचे मोठे सण आहेत. हे दोन्ही सण सुशिक्षित व अशिक्षित मुसलमान मोठ्या प्रमाणावर साजरे करतात. याशिवाय आखरी चहार शंबा, आशूरा, शब-इ-बरात इत्यादी सणही मुसलमान सामान्यत्वे साजरे करतात. पण खरे म्हणजे ते मेजवानीचे सण नव्हेत. पुष्कळ शहरांत संतांच्या नावे फातिहा, संदल, उरूस असे कार्यक्रम वर्षभर चालू असतात. उदाहरणार्थ, हैद्राबाद येथे रजब महिन्याच्या सोळाव्या दिवशी मौला अलीचा संदल काढतात, सतराव्या दिवशी त्यांचा उरूस साजरा करतात. हा ऊरूस सिकंदराबादच्या लष्करी छावणीच्या जवळपास पाच मैल उत्तरेस असलेल्या एका टेकडीवर साजरा करतात. या टेकडीला मौला अलीची टेकडी म्हणतात. येथे हे दोन दिवस किंवा त्या आधीही एक-दोन दिवस लोकांचे प्रचंड समुदाय जमतात. खरे म्हणजे आशुरापेक्षाही तेथे जास्त करमणूक असते.

जिल्हेज महिन्याच्या अठरा तारखेला शिया लोक ईद-इ-गदीर नावाचा सण साजरा करतात. हा नजफ अल अशरफ येथे मोठ्या वैभवात साजरा केला जातो. येथे करबलाला भेट देऊन येणाऱ्यांच्या गर्दीने यात्रेकरूंची संख्या अधिकच वाढते. याचे वर्णन ' बारहमासा' मध्ये एक गंभीर प्रसंग म्हणून करण्यात आले आहे. मानवी आत्म्यास त्याचे मनन करण्यास आवडते आणि याचा उल्लेख मोठ्या आनंदाने ऐकला जातो. हा लेखक म्हणतो की या सणाच्या गुणोत्कर्षाची वाखाणणी करताना सर्वजण फक्त एकाच प्रकारची भाषा वापरतात, जेव्हा प्रेषितांनी, ईश्वरी आदेशानुसार अलीला, अमीरुल मुमीनीन 'निष्ठावंताचा नेता' आणि संतांचा राजा आपला वारस म्हणून नेमले. ही घोषणा गदीरखूम येथे करण्यात आली असे म्हणतात. गदीर म्हणजे जेथे पावसानंतर पाणी वाहून न जाता थांबते असे ठिकाण, हे काफिल्याचे थांबण्याचे ठिकाण. ते मक्का आणि मदिनेच्या मध्यावर आहे. जो कोणी हा उत्सव पाळील त्याला स्वर्गाच्या साम्राज्यात प्रवेश करण्याचा हक्क पोचेल, असे म्हटले जाते. दुसरी एक ईद-उल-उमर नावाची ईद आहे. ही सफर महिन्यात, बारह वफातपूर्वी, तिसऱ्या दिवशी साजरी केली जाते. लुलू या घरगुती नावाने ओळखल्या जाणाऱ्या फिरोझ नावाच्या इराणी गुलामाने इ.स. ६४४ मध्ये दुसरे खलिफा उमर इब्न अल खत्ताब यांचा जो वध केला त्याच्या स्मरणार्थ ही साजरी केली जाते. उमर हा अलीचा शत्रू होता. म्हणून हा दिवस शियांमध्ये आनंदाचा व सुन्नींमध्ये शोकाचा असतो. [मुईर, ॲनल्स, २७८ तळटीपा; रोझ, १·५७६.]

अनुक्रमणिका

## प्रकरण सव्विसावे

# जादू

सिमीया म्हणजे इंद्रजाल किंवा मंत्र विद्या. ही विद्या अध्यात्मशास्त्राचीच एक शाखा आहे. या विद्येचे दोन भाग पडतात. उच्च विभागाला 'रहमानी' किंवा 'उल्वी' विद्या असे म्हणतात. हिचा संबंध ईश्वराशी असतो. दुसरा विभाग राक्षसी म्हणजे 'सिफ्ला' किंवा 'सैतानी' असून त्याचा चेटूक, जादूटोणा यांच्याशी संबंध आहे. मुसलमानांचे पुष्कळसे इंद्रजाल किंवा त्यांची जादूविद्या बाबिलोनियाशी संबंधित अशी आहे. बाबिलोनिया हे या विद्येचे माहेरघर मानण्यात येते. धर्मशास्त्राने अधिकृतरीत्या जादूविद्येचा निषेध केला आहे. जो थोडेबहुत फलज्योतिषशास्त्राचे ज्ञान मिळवितो तो जादूच्या एका शाखेचे ज्ञान मिळवितो. 'जो जादूगाराकडे जाऊन गूढ गोष्टींचे रहस्य विचारतो आणि जादूगार सांगतो त्यावर विश्वास ठेवतो त्याला महंमद आणि त्याचा धर्म आवडत नाही हेच खरे'. 'पण परमेश्वराशी इतर कशाचाही संबंध जोडीत नाहीत असे मंत्र करायला काही भीती नाही.' 'तुम्ही इस्लामवर श्रद्धा ठेवलेली आहे म्हणून जादूवर श्रद्धा ठेवू नये.' [कुराण, २·९६; मिश्कत, २·३७५; ३८५; १·२०६; २·२९७. परंतु कुराणातील दोन सुरे (६३, ६४) ही जादूची सूत्रे आहेत. दोन्हींनी प्रेषितांची अगदी आरंभीची शिकवण उघड केली.]

मुसलमानांच्या जादूविद्येचा मुख्य भाग भुताखेतांना आणि पिशाच्चांना आवाहन करणे हा आहे. हे आवाहन (दावत) पुढील उद्देशासाठी असते:— जिन आणि भुते यांच्यावर प्रभुत्व ठेवून गरजेनुसार त्यांच्याकडून काही गोष्टी घडवून आणणे, दोन व्यक्तींच्यामध्ये मित्रता अगर शत्रुत्व निर्माण करणे, शत्रूंचा मृत्यू घडवून आणणे, संपत्ती वाढविणे, मोफत किंवा गुप्तपणे द्रव्य मिळविणे, इहलौकिक अगर पारलौकिक इच्छांची पूर्ती करणे.

या जादूविद्येत जादूगाराला हवी असणारी साधने, त्यांनी पाळावयाचे नियम, जपावयाचे मंत्र, दानधर्म, भुते काढून टाकणे इत्यादी बाबींशी संबंध येतो. मांत्रिक जादूगाराने त्याचे ज्ञान त्या विषयातील विद्वान तज्ज्ञ गुरूकडूनच मिळविले पाहिजे. या गुरूला मुर्शीद म्हणतात. ज्याला ईश्वराची सर्वश्रेष्ठ नावे ज्ञात आहेत (इस्मे आझम) तोच गुरू होऊ शकतो. ईश्वराची नावे म्हणजे त्याची विशेषणे आहेत. परंतु ईश्वराची श्रेष्ठ नावे जादूचे मंत्र म्हणून वापरली जातात. काही नावे भीतिदायक आहेत. त्यांना 'इस्मे जलालिया' असे म्हणतात. तर काही नावे मायाळू, प्रेमळ आहेत त्यांना 'जमाली' असे म्हणतात. ही सर्व ईश्वराची नावे परिचित करून घेऊन ज्याने पिशाचांना प्रसन्न केले आहे तोच गुरू होऊ शकतो. मात्र मंत्रविद्येतील कोणत्याही तज्ज्ञाने स्वतःच्या सामर्थ्याचा गर्व बाळगू नये, या सामर्थ्याचा निष्कारण प्रयोग करू नये. स्वतःच्या श्रेष्ठतेविषयी आढ्यतेने बोलू नये, असे नियम आहेत.

या शास्त्रातील काहीजण शास्त्रशून्य असतात पण ज्ञानी असल्याचे ढोंग करतात. त्यांची शिकवण निरुपयोगी असते. उलट अशा अडाण्याच्या हाताखाली शिकणारा विद्यार्थी आपले जीवन धोक्यात आणतो. अशा भोंदू गुरूच्या नादी लागून अनेकजण आपले जीवन उद्ध्वस्त करून घेतात, काही वेडे होतात, काही घाणीत लोळतात आणि रानावनातून भटकतात. पण गुरू खरा ज्ञानी असला म्हणजे धोका नसतो. जफर शरीफ म्हणतो की, मीही एके काळी या शास्त्रात अवगाहन करण्याची इच्छा बाळगली होती. श्रेष्ठ संत, मांत्रिक,

अरबी प्रवासी यांच्याकडून पुष्कळसे ज्ञान मी मिळविले होते. पण माझे ज्ञान पहाड कोरून उंदीर काढल्याइतके क्षुल्लक आहे. माझ्या मते या क्षेत्रात अधिकारी म्हणजे महंमद गौस ग्वाल्हेरी यांचा 'जवाहीर-इ-खम्सा' हा ग्रंथ होय. परमेश्वर त्यांच्यावर कृपा ठेवो.

या शास्त्रात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्याने नितांत शुद्धता पाळली पाहिजे. कुत्रे, मांजर, अपरिचित व्यक्ती यांना घरात येऊ देऊ नये. उदासारख्या सुगंधी वस्तूचा धूप घरात दरवळत असावा. घराबाहेर जाताना विशिष्ट टोपी आणि लुंगी घालून बाहेर जावे. घरात प्रवेश करताना नेहमी हात धुवावे म्हणजे वुजू करावा. रात्री अगर दिवसा वीर्यस्खलन झाल्यास ताबडतोब स्नान करावे. चिल्लाच्या चाळीस दिवसांत चटईवर झोपावे. काही लोक या काळात उपवास करतात. झोप व बोलणे थोडे असावे. ज्या ईश्वरी नावांचा जप चालू आहे त्यानुसार आहार पाहिजे. जलाली नावांचा जप चालू असेल तर मांस, मासे, अंडी, मध, कस्तुरी, कळीचा चुना आणि स्त्री समागम वर्ज्य करावे. जमाली नावांचा जप असेल तर लोणी, दही, आंबट पदार्थ, मीठ निषिद्ध आहेत. ईश्वरी नामजप करताना लसूण, कांदा वर्ज्य असतात. ऊसुद्धा मारावयाची नाही. या कालखंडात धर्मसंमत म्हणजे हलाल वस्तूंचेच सेवन करावे; हराम वस्तू खाऊ नयेत आणि फक्त सत्य बोलावे. जलाली नावे जपावयाची असतील तर जप शनिवारी आरंभ करावा. जमाली नावासाठी जपारंभ सोमवारी असावा. दोन्ही प्रकारची नावे असल्यास रविवारी जप आरंभावा. मंत्रजपाचा हेतू मित्रता असल्यास नवचंद्रदर्शनानंतर आरंभ करावा. जपापूर्वी तीन दिवस उपवास करावा. स्वयंपाक करणाऱ्यानेही मालकाच्यासारखा संयम पाळला पाहिजे नाही तर मालकाने स्वतःचे अन्न स्वतः शिजविले पाहिजे.

एखाद्या व्यक्तीसंबंधी नावे उच्चारण्यास आरंभ करण्यापूर्वी अरबी मुळाक्षराप्रमाणे त्या व्यक्तीच्या नावाच्या आद्याक्षराची माहिती करून घेतली पाहिजे. या आद्याक्षरास 'हुरूफ-इ-तहज्जी' असे म्हणतात. पौर्वात्य भाषांतील सर्वत्र आढळणारी सात अक्षरे अरबीत नाहीत. त्यांच्याऐवजी इतर सात अक्षरे पर्याय म्हणून आहेत. अरबी मुळाक्षरे २८ असून त्यांचा संबंध बारा राशिचक्र (बुरूज), सात ग्रह (सितारे) आणि चार मूलद्रव्ये (उन्सार) यांच्याशी आहे. कोणत्या ग्रहाबरोबर कोणता सुगंध असावा या विषयीचे नियम आहेत. तारीख मोजण्याची एक अरबी पद्धती आहे. तिला अब्जाद असे म्हणतात. या पद्धतीप्रमाणे प्रत्येक अक्षराला संख्येचे मूल्य आहे. हे मूल्य अलिफ १, बे २, जिम ३, या क्रमाने १० पर्यंत वाढते. यानंतर हे मूल्य दहा दहाने वाढते. उदाहरणार्थ काफ २०, लाम ३०, मीम ४०. हा प्रकार टिंबात्मक काफ=१०० येथपर्यंत चालतो. नंतर क्रमाने शंभराने मूल्य वाढते. उदाहरणार्थ गैनचे मूल्य १००० आहे. याबाबत प्रत्येक वाक्याची संख्या असते. उदाहरणार्थ ताज सुल्तान अहल-इ-जन्नत यातील क्रमाने अक्षरांची किंमत काढल्यास १०४५ हिजरी म्हणजे इ.स. १६३३ येते.

आता समजा अहमद नावाच्या माणसाला जादूच्या साह्याने रबया नावाच्या स्त्रीशी मैत्री करावयाची असेल तर त्याबाबत पुढीलप्रमाणे विचार केला पाहिजे. अहमदचे आद्याक्षर अलिफ, त्याचे महाभूत अग्नी, त्याचा ग्रह शनी, राशिचक्र मेष, सिंह, धनू असे आहे. रबयाचे आद्याक्षर रे आहे, त्याचे महाभूत पाणी आहे, ग्रह शुक्र, राशीचक्राचे चिन्ह कर्क, वृश्चिक, मीन आहे. ही महाभूते परस्पर विरोधी आहेत. अहमदचा ग्रह शनी व रबयाचा ग्रह शुक्र असल्यामुळे हा पुरुष व ही स्त्री आनंदाने एकत्र राहू शकतील. या दृष्टीने पुढील तक्ता विचारात घेतला पाहिजे:

अनुक्रमणिका

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शुक्र व शनि | शुक्र व चंद्र | गुरु व शुक्र | गुरु व चंद्र | सूर्य व चंद्र | गुरु व चंद्र | सूर्य व शुक्र | मैत्री |
| चंद्र व बुध | शनि व बुध | गुरु व बुध | मंगळ व बुध | शुक्र व बुध | मंगळ व शुक्र | सूर्य व बुध | उदासीन |
| शनि व सूर्य | शनि व चंद्र | मंगळ व चंद्र | मंगळ व सूर्य | शनि व मंगळ | गुरु व मंगळ | गुरु व शनि | शत्रुत्व |

अशी अनेक प्रकारची कोष्टके तयार केलेली आहेत. उदाहरणार्थ अलिफ, बे, जीम, दाल ही आद्याक्षरे असली म्हणजे त्या व्यक्तीचा ग्रह शनी असतो. जर अलीफ हे, तोय, मीम, शीन, जाल, फे अशी आद्याक्षरे असली तर या व्यक्तीचे महाभूत अग्नी असते आणि त्यांची रास मेष, सिंह धनु यापैकी एक असते. प्रत्येक ग्रहाचे परिणाम आणि त्यासाठी लागणारी सुगंधी द्रव्ये यांचीही कोष्टके आहेत. व्यक्तीच्या प्रत्येक नावासाठी ईश्वराची विशेषणे किती वेळा उच्चारावीत हे ठरलेले असते. त्याने दाने कोणती करावीत, मंत्रोच्चार कसा करावा याबाबतचेही नियम ठरले आहेत. उदाहरणार्थ अहमद नाव जर घेतले तर त्यासाठी ईश्वरी नाव ४५०० वेळेला जपले पाहिजे. अशा प्रकारे मंत्र जपाच्या विषयी विविध नियम आहेत. प्रत्येक व्यक्तीला असणाऱ्या पिशाचांची नावे आहेत. उदाहरणार्थ अहमद या नावासाठी हुमारियाल व हमबाकील ही पिशाचे असून शतकिंस्त हे जिन आहे. या जिनचे आवाहन करावे लागते. प्रत्येक जिनच्या आवाहनाची एक स्वतंत्र पद्धत आहे. म्हणजे प्रत्येक व्यक्तीसाठी मैत्रीचे मंत्र निराळे, शत्रुत्वाचे मंत्र निराळे. ठराविक राक्षस, पिशाच आणि भुते, मंत्रांची ठराविक संख्या असे सगळे आखन दिले गेलेले आहे.

ईश्वराची श्रेष्ठ विशेषणे जपल्यानंतर मांत्रिक जिन अगर पिशाचाला आवाहान करण्यासाठी जपाचा आरंभ करतो. चाळीस दिवसांत हे नाव एक लक्ष सदतीस हजार सहाशे तेरा वेळा जपले पाहिजे. वर दिलेल्या नावाची अक्षरात किंमत ४५ आहे. त्याच्या तिप्पट हजार म्हणजे एक लक्ष पस्तीस हजार होतात. त्यात जप करण्याच्या नावाची अक्षरी किंमत २६१३ मिळून वरील जप होतो. हा जप जितक्या दिवसांत करावयाचा तितक्या दिवसांनी भागून दररोज पूर्ण केला जातो या मंत्रजपाच्या योगाने जप करणाऱ्यांचे मन कित्येकदा तूर्यावस्थेत जाते. त्याला जागृतीत व स्वप्नात नवे अनुभव येऊ लागतात. जीन व पिशाच आपणास उच्च स्वर्गात अगर पृथ्वीच्या तळापर्यंत विहार करवितात असे वाटू लागते. जिन त्याच्यावर प्रसन्न होतात, ते इच्छा पूर्ण करतात. त्याप्रमाणेच मानव जातीवर प्रभुत्व गाजविण्याचे सामर्थ्य देतात.

ईश्वराची नावे अस्मा-उल-हुस्ना म्हणजे वैभवशाली विशेषणे मानली जातात. या विशेषणांचे ज्ञान माझ्या पैगंबरवासी वडिलांनी मला दिले. हा अतिशय गुप्तपणे चालत आलेला वारसाच आहे. या नामाच्यामध्ये अरबी मुळाक्षराशी प्रत्येकांशी संबंधित असणारी दोन दोन नावे आहेत उदाहरणार्थ या अल्लाहू, करकाइलू ही नावे अलिफशी निगडित आहेत तर या रहमान, अमवाकिलू ही नावे बेशी निगडित आहेत. एखाद्याला आपली अपेक्षित इच्छा पूर्ण व्हावी असे वाटत असेल तर त्याने इस्मेजलाली याच्याबरोबर इस्मे हुस्नाचाही जप करावा.

याही जपाची प्रत्येक वेळी एक स्वतंत्र पद्धत आहे. समजा बुऱ्हाण नावाचा माणूस याचे मन जिंकावयाचे आहे तर त्याच्या नावातील अक्षरांची किंमत, मग प्रत्येक अक्षराशी संबंधित ईश्वरी विशेषणे, पिशाचांची व भुतांची नावे यावरून एकूण जपाची पद्धत ठरत असते. कोणत्याही जपाच्या वेळी आरंभाला दोनदा असे म्हटले पाहिजे की, हे अल्ला, तू महंमदावर, त्याच्या वंशजावर कृपेचा वर्षाव कर. अब्राहम व त्याचे वंशज यांच्यावर कृपेचा वर्षाव कर. हे प्रभू बुऱ्हाणच्या मनात माझ्याविषयी इतकी आत्मीयता निर्माण कर की, त्याला रात्रंदिवस माझ्याशिवाय काही सुचूच नये. असेच दोन वेळेला जप संपतानाही म्हटले पाहिजे.

जिन किंवा पिशाच यांना प्रसन्न करून त्यांचे आवाहन करणे याला तश्किरे जिन असे म्हटले जाते. एखाद्या मांत्रिकाला जर हा पिशाचावरचा ताबा सिद्ध झाला तर तो त्याच्या मदतीने वाटेल ते करू शकेल. अन्न, पैसा त्याला कमी पडणार नाही. पिशाचसिद्धी करणाऱ्या मांत्रिकाने स्वतःला घरात कोंडून घेतले पाहिजे. घराला लाल गेरुचा रंग दिला पाहिजे, प्रार्थनेची चटईसुद्धा शक्यतो लाल असावी. त्याने चाळीस दिवसपर्यंत जप केला पाहिजे, संयम पाळला पाहिजे, शरीराची शुद्धता सांभाळली पाहिजे. अशा जपासाठी समुद्राजवळ, गुहेत, शहराबाहेर एकांत स्थळीची जागा अधिक योग्य असते. जपाला आरंभ झाल्यावर एखाद्या आठवड्यात काही चमत्कार दिसू लागतात आणि शेवटच्या आठवड्यात भुते आपल्या फौजेसहित उपस्थित होतात. त्यांना घाबरू नये. त्यांना बोट हलवून बसण्यास सांगावे. आलेल्या भुतांना ईश्वराची व सालोमनची शपथ घालून परत जाण्यास सांगावे. आयुष्यभर अशा मांत्रिकाला व्यभिचारापासून दूर राहावे लागते. नवशिक्याने निष्णात गुरूच्या मार्गदर्शनाशिवाय अशी कार्ये करू नयेत. कारण त्यात चूक झाली तर प्राणाला मुकावे लागते.

जवाहीर-इ-खम्सामध्ये प्रार्थनेची काही सामर्थ्ये सांगितलेली आहेत. जेव्हा कुणी माणूस, राजा, सरदार किंवा आपला धनी याच्या भेटीला जातो तेव्हा त्याने स्वर्गाच्या दिशेने हात पसरून परमेश्वराचे सतरा वेळा स्तवन करावे व आपल्या ओंजळीत फुंकर मारून आपला चेहरा हातांनी कुरवाळावा. श्रेष्ठांच्या भेटीस गेले म्हणजे या माणसाकडे लक्ष जाताच लगेच राजा असो, सरदार असो, धनी असो तो प्रसन्न होईल. सकाळ संध्याकाळ नमाजनंतर चाळीस वेळा किंवा सत्तर वेळा अल्लाचे स्तवन करावे. त्याचे मन निर्मळ आणि उन्नत होते. त्याला स्वप्नात भविष्य कळते. रविवारी सकाळी सूर्योदयापूर्वी ईश्वराचे चोवीस वेळा स्तवन करावे, त्याच्या इच्छा पूर्ण होतात. बुधवारी आंघोळ करून नवे कपडे घालावे, धूप जाळावा, अन्नावर अगर पेयावर १११ वेळा स्तवन करून फुंकर मारावी. हे अन्न अगर पेय ज्या व्यक्तीला दिले जाईल ती वश होईल. सकाळ संध्याकाळ ४१ वेळा प्रभुस्तवन करावे, कडवे शत्रू मित्र बनतील. चांदीची चौकोनी मुद्रा असलेली अंगठी करावी, त्यावर प्रार्थनेची अक्षरे लिहावी, ज्यांची किंमत २६१३ होते. ही अंगठी मंत्रून सिद्ध करावी. पाच हजार वेळा प्रभुस्तवन करून अंगठीवर फुंकर मारावी व ती आपल्या करंगळीत घालावी. पिशाच्चावर ताबा मिळण्यास हे सोयीचे होते, राजे व सरदार आज्ञाधारक होतात. अशा प्रकारचे सामर्थ्य मिळविले म्हणजे माणूस वली म्हणजे संत होतो.

याखेरीज कुराणमधील पुष्कळशी वचने आहेत त्यांचाही मंत्राप्रमाणे उपयोग होतो. पण याबाबत या क्षेत्रातील एखाद्या तज्ज्ञालाच शरण गेले पाहिजे. अशा प्रकारची काही वचने जफर शरीफला ज्ञात आहेत. पण ती गुप्त ठेवण्याची शपथ असल्यामुळे ती सांगता येत नाहीत. एक मात्र सर्व प्रसिद्ध असल्यामुळे सांगता येते. कुराणमधील आयतुलफतह जर एखाद्याने सतत म्हणण्याचा परिपाठ ठेवला तर ईश्वर त्याच्या इच्छा पूर्ण करतो. पाच वेळच्या नमाजनंतर सतत दरवेळी चाळीस वेळा जर या आयतचा जप केला तर संपत्ती मिळते. या

आयतमध्ये असे म्हटलेले आहे, “सृष्टीतील रहस्याच्या किल्ल्या त्या प्रभूजवळ आहेत. ही रहस्ये त्याच्याखेरीज कुणाला ज्ञात नाहीत. जमिनीवर अगर समुद्रावर जे जे काही घडते ते सारे त्याला कळते. त्याला कळल्याशिवाय झाडाचे पानही गळत नाही. त्याला अज्ञात असा कणही नाही. हिरवी अगर वाळलेली अशी कोणतीही वस्तू त्याने जाणली नाही असे नाही”.

अबु हुरैरा याला मांजरे फार आवडत. म्हणून महंमदाने त्याला अबु हुरैरा म्हणजे मांजराच्या पिलांचा बाप असे टोपण नाव दिले होते. तो सांगतो की पाणी व पृथ्वी यांचा चिखल होतो. चिखलापासून आदम बनवला गेला. धूरविरहीत अग्नीपासून भुते व पिशाचे बनवली गेली. माणसे घट्ट चिखलाला आकार देऊन बनवली गेली. संतांचे असे म्हणणे आहे की, पिशाचांना शरीर असते, पण ते अदृश्य असते. इब्लीस किंवा सैतान हा भुतांचा बाप आणि मारिया ही त्याची आई, असे म्हणतात. पिशाचांपैकी सुष्टांना जिन म्हणतात, दुष्टांना सैतान म्हणतात. मंत्रसामर्थ्यामुळे जिन एखाद्याच्या मृत्यूला कारणीभूत होतीलही, पण तो त्यांचा स्वभाव नव्हे. तफसीर-इ-बैजवी आणि तवारीख-इ-रौजतुसफा या कुराणवरच्या भाष्यग्रंथात असे म्हटले आहे की सैतान हे जिनचे अपत्य होते. परमेश्वराने त्याला अजाजीत म्हणजे शापित देवदूत असे नाव दिले. इमाम जाहीद म्हणतो, सैतानाने प्रभुआज्ञेचा भंग केला. त्याने आदमला नमन करणे नाकारले. आदम आणि इव्ह यांना गहू खाण्याची भुरळ घातली त्यामुळे त्याला इब्लीस म्हणजे ‘परमेश्वराच्या दयेचा आशाभंग करणारा’ असे नाव मिळाले. आज्ञाभंगाबद्दल जेव्हा आदमला सिलोन आणि इव्हला मक्केच्या परिसरात हद्दपार करण्यात आले तेव्हा त्याला सैतान हे नाव मिळाले. जॉनचा मुलगा सुमास, त्याचा मुलगा तारनुस, त्याचा मुलगा हुलियानस याचा मुलगा सैतान होता असेही सांगितले जाते. सैतानाचे चार खलिफा आहेत. अलिकचा मुलगा मलीक, जानसचा मुलगा हामूस, बलबलतचा मुलगा मब्लूत, यासीफचा मुलगा युसूफ हे ते चार खलिफा होत. सैतानाच्या पत्नीचे नाव अव्वा व त्याचे अडनाव अबुलमर्रत (दुष्टपणाचा पिता) असे आहे. आदमचे आडनाव अबुलबशर म्हणजे मानव जातीचा पिता असे आहे. आदमला ज्याप्रमाणे हाबील, काबील, कैन आणि सेत अशी चार मुले होती तशी सैतानाला नऊ मुले आहेत. सैतानाची ही मुले आदमच्या वंशाचे शत्रू आहेत. ते त्यांना चांगली कृत्ये करू देत नाहीतच. उलट त्यांना पापकर्मे करण्यास प्रवृत्त करतात. मनुष्याच्या कुटुंबात एकाची वाढ झाली की सैतानाच्या कुटुंबात नऊ मुलांची भर पडते.

अब्दुल्ला अन्सारीचा मुलगा जाबिर याने ‘शर-इ-बुखारी’ मध्ये असे लिहिले आहे की परमेश्वराने सर्व प्राणिमात्रांची देवदूत, सैतान, जिन व मनुष्यप्राणी या चार वर्गांत विभागणी केली आहे. परंतु प्रेषितांचा साथी असलेल्या अबूदरदाने वेगळीच माहिती दिली आहे. तो म्हणतो की प्रथम सर्प व विंचू आणि त्यानंतर क्रमाने कीटक, भुते, आदमची मुले, सर्व चतुष्पाद प्राणी, पक्षी व तत्सम प्राणी आले.

मलीक गशतान हा सर्व जिनचा राजा असून त्याचे काफ नावाच्या पर्वतावर वास्तव्य असते. हा पर्वत सखरात नावाच्या पाचूच्या दगडावर आधारित असून त्या पाचूपासून आकाशाला निळा रंग प्राप्त झाला आहे. या पर्वताच्या पूर्वेकडील प्रदेशात मलीक गशतानचे तीन लक्ष सेवक असून पश्चिमेकडील प्रदेशात त्याचा जावई अब्दुल रहमान हा आपल्या तीस हजार सेवकांसहित राहतो. या दोघांना आदरणीय महंमद मुस्तफा यांनी ही मुस्लीम नावे दिलेली आहेत. मुस्लीम जिनचे राजे यांच्या नावाच्या शेवटी ‘नूस’ ही अक्षरे असतात. उदा. तारनूस, हुलियानूस, डाखियानूस. तरसाचे राजे आतिशपरस्त म्हणजे अग्नीचे उपासक असतात. त्यांच्या

नावाच्या शेवटी 'नास' ही अक्षरे असतात. उदा. जातूनास, हिंदु जिनच्या राजांच्या शेवटी 'तास' हे अक्षर असते. उदा. नकतास, हा नकतास जेव्हा प्रेषित शीसच्या सेवेत आला तेव्हा त्याने इस्लामचा स्वीकार केला. प्रत्येक जिनच्या खऱ्या रूपाबद्दल बोलावयाचे झाल्यास, ते $\frac{९}{१०}$ चैतन्य आणि वायू तर $\frac{१}{१०}$ शरीर असे असतात.

जफर शरीफ म्हणतो, माझा तरुणपणापासून भुते काढणे, जादूचे मंत्रतंत्रयुक्त ताईत लिहिणे, कुंडली पाहणे, भविष्य सांगणे यांचा अभ्यास आहे. पुष्कळ वेळा गरजू लोकांच्यावर माझ्याकडून योग्य इलाज झाले आहेत, त्यांचा फायदाही झाला आहे. मी नेहमीच स्वतःला असे विचारीत असे, हे परमेश्वरा, माणूस आणि जिन यांचा असा काय संबंध असावा की जिनचे माणसावर इतके प्रभुत्व असावे व मंत्र म्हणून त्यांना हाकलून लावता यावे? भूतबाधेने जे लोक पछाडलेले असतात त्यांपैकी काहींची वाचा बसते, काही डोळे हलवितात, काही वेडे होतात व नागवे फिरतात. ते सुस्त होऊन लोळतात, नित्याचे काम करावेसे वाटत नाही. अशा वेळी मांत्रिकाला बोलावून रोगी दुरुस्त करावा लागतो.

भुतांना ताब्यात आणण्यासाठी जादूच्या वर्तुळाचा उपयोग हा भारतात तांत्रिक ज्या पद्धती वापरतात त्यांच्याशी किंवा मद्रास प्रांतातील यंत्राम यांच्याशी खूप मिळता जुळता आहे. मंत्रविद्येसाठी आवश्यक असणारी आकृती म्हणजे वर्तुळ किंवा चौरस जमिनीवर अगर फळीवर काढतात. त्यासाठी राख, कोळसा, विभूत, रंगीत पावडर, चंदन यांचा वापर करतात. बाधा झालेल्या माणसाला या आकृतीच्या मध्यभागी बसवतात व अफसून (मंत्र) म्हणतात. आकृत्यांच्या भोवती फळे, फुले, विडे, मिठाई व कित्येकदा मद्य ठेवण्यात येते. बकरी बळी देतात. वर्तुळाभोवती रक्त शिंपडतात. मंत्र टाकलेला दिवा त्यावर ठेवतात किंवा कोंबडा बळी देतात. भूत काढण्यासाठी राख, पाच प्रकारचे धान्य यांच्यावर मंत्र टाकतात आणि मंतरलेले पदार्थ बाधा पीडिताच्या अंगावर टाकतात. त्याच्यासमोर ऊद, अबीर यांसारखी सुगंधी द्रव्ये जाळतात. भूतग्रस्ताला डोळे मिटण्यास सांगतात आणि मांत्रिक म्हणतो, हे भुता तू जर पुरुष असशील तर डोके उजवीकडे, स्त्री असशील तर डावीकडे आणि नपुसक असशील तर समोर झुकव. मंत्र म्हणणे संपल्यावर मांत्रिक रोग्याला काही प्रश्नही विचारतात. मंत्रांच्यामध्ये फतना, हबिबेका, आलमीन, सकीका, कहलान, महलान, सदीदान, नबियान, इत्यादींना आवाहन असते. दाविदचा मुलगा सुलेमान याच्या मुद्रेने त्यांना येण्यास आवाहन असते. भुताने रोग्याला पकडण्याची कल्पना ही मूर्खपणाची आहे, ती सामान्य माणसांच्या कल्पनाशक्तीतून निघालेली आहे.

एखाद्या माणसाला भूत लागावे म्हणून म्हणावयाचे मंत्र पुष्कळ आहेत. पण मी ते वगळतो. भुताने एखाद्या माणसाचा ताबा घेतल्यानंतर दोन तीन आठवडे, कित्येकदा दोन तीन महिने सोडीत नाही. काही भुते पळू नयेत म्हणून बाधा झालेल्या व्यक्तीच्या केसाला मंत्रपूर्वक गाठ मारून त्यावर फुंकर घालतात. कित्येकदा मंतरलेले सुंगधी तेल रोग्याच्या कानात घालून एका अगर दोन्ही कानांत फुंकर मारतात व मंत्र म्हणतात. "हे सर्वज्ञ प्रभू तुझ्या कानाने तू सर्व ऐकतोस आणि सारे काही ऐकता येणे हेच तुझ्या कानाचे सामर्थ्य आहे." भूतबाधा झालेला माणूस कित्येकदा मोठ्याने ओरडतो, कोंबडे पकडून त्याला चावतो. पेटलेली वात तोंडात ठेवून इतरत्र पळत जातो. अशा वेळी मांत्रिक भूतबाधा झालेल्या माणसाला मंतरलेल्या छडीने मारतो. भूत मोठ्याने ओरडू लागते. भूत शरण आल्यावर त्याला खाण्यापिण्यासाठी काय हवे हे विचारतात. ज्वारी, तांदूळ, दहीभात, मासे, कोंबडे, अंडी, बकरी, दारू, मिठाई, फळे इत्यादी वस्तू भूत मागते. या वस्तू बाधा झालेल्या माणसावरून ओवाळतात. नंतर नदीकाठी किंवा झाडाच्या बुडाशी ठेवल्या जातात. भूतबाधा झालेला माणूस

दोन दोन तीन तीन माणसास उचलणार नाही एवढा मोठा दगड घेऊन कित्येकदा पळतो. मांत्रिक त्याला केस धरून लोळवितो. कुराणमधील आयतुल कुर्सी म्हणण्यात येतात. ती आयत अशी आहे, “परमेश्वराखेरीज शाश्वत, जिवंत व जागृत कुणीच नाही. झोप त्याचा ताबा घेऊ शकत नाही. स्वर्गात अगर पृथ्वीवर जे जे आहे ते ते त्याचे आहे. त्याच्या परवानगीशिवाय त्याच्यापुढे मध्यस्थी कुणी करू शकत नाही. तो प्रभू भूत-भविष्याचा ज्ञाता आहे. त्याचे सिंहासन सर्वोच्च व श्रेष्ठ आहे, त्याच्याशिवाय दुसरा कुणी प्रभू नाही,” हे म्हणताना मांत्रिक लोखंडाचा खिळा किंवा लाकडी खुंटी जमिनीत ठोकून त्यावर मंत्र फुंकतो. बाधा झालेल्या माणसाचे एकदोन केस उपटून एका बाटलीत घालून बूच लावतात व ही बाटली पुरून टाकतात. काही मांत्रिक, ज्यांना स्याने किंवा शहाणे म्हणतात ते मेणाच्या बाहुल्या करून बाटलीत धूर भरून त्या बाटलीत बाहुली ठेवतात व सामान्य लोकांना तेच भूत म्हणून दाखवितात आणि लोकांकडून पैसे मिळवितात.

भूतबाधा झालेला माणूस भूत निघून जाताच शुद्धीवर येतो. त्यांच्या तोंडावर कुराणचे मंत्र म्हणून पाणी शिंपडतात. “ला होल वला कुवता इल्ला बिल्लाही आलीइल आझिम” असे म्हणण्यास सांगतात. अल्लाशिवाय कुणी श्रेष्ठ नाही. कुणी स्तुतिपात्र नाही असा अर्थ आहे. या रोग्याला पुन्हा भूतबाधा होऊ नये म्हणून मांत्रिक विशिष्ट प्रकारचे ताईत त्याच्या गळ्यात किंवा दंडावर बांधतात.

एखादा माणूस फार दिवस आजारी असला तर या आजारीपणाचे कारण भूतबाधा आहे काय याची खात्री करून घेण्यासाठी खालील प्रकारची एक आकृती काढतात:

| | |
|---|---|
| भुते | पऱ्या |
| रोग | जादूटोणा करणारे |

| |
|---|
| जिन |

आजारी माणसाच्या हातात फुले देतात. मग मांत्रिक आपल्या हातात फुले घेतो व फुंकर मारून रोग्याच्या हातावर टाकतो. रोग्याचे हात कोणत्या दिशेने वळतात हे पाहून त्या रोग्याच्या रोगाचे कारण हुडकतात. काही भुते झोपेतच एखाद्याला पछाडतात. त्यांना हाकून लावण्यासाठी एक अभिमंत्रित वात तयार करण्यात येते. ही वात लावलेली असल्यास भुते तेथून निघून जातात.

काही लबाड मांत्रिक पैसे मिळविण्यासाठी मुद्दामच असे करतात. एखाद्या भित्र्या श्रीमंतांच्या घरात दगड व हाडके फेकतात. घरमालक घाबरला म्हणजे मांत्रिक येतो. भुताचे वर्णन सांगतो, घरमालकाला घाबरवितो. मग त्याच्यापासून खूप पैसे उकळून भूतबाधा नीट केली जाते. जफर शरीफ म्हणतो, अशा लबाड्या मी पाहिल्या आहेत.

काही वेळा जिन घरात शिरून अन्न चोरतात, घरात राहणाऱ्यांना नेहमी आजारी पाडतात आणि त्रास देतात. अशा वेळी सकाळ संध्याकाळ तीन दिवस पाण्यावर फुंकर टाकून एकवीस वेळा मंत्र म्हणतात व ते पाणी घरात चौफेर शिंपडतात. लोखंडी खुंट्यावर मंत्र टाकतात आणि त्या खुंट्या घराच्या चारही कोपऱ्यांत जमिनीत पुरतात. हा मंत्र पुढीलप्रमाणे आहे.—ते माझ्या – विरुद्ध कट रचतात, मी त्यांच्याविरुद्ध कट रचीन

म्हणून तू अश्रद्धांशी शांतपणे वाग, त्यांना एकटे सोड, त्यांचा विचार मी करीन. काही जण अशाबुलकाफ म्हणजे प्रेषिताचे गुहेतील साथीदार यांची त्यांच्या कुत्र्यासहित नावे लिहितात व घराच्या भिंतीवर लावतात. अशा प्रकारे घरात शिरण्यापासून भुतांना परावृत्त केले जाते.

काही मंत्र धुराचे आहेत. पऱ्या, भीती, भुते, तीन दिवसांनी येणारा ताप, स्वप्ने इत्यादींच्या साठी हे धुराचे मंत्र म्हणतात. हे मंत्र म्हणून अग्नीवर ऊद टाकतात व रोग्याला हा मंतरलेला धूर देतात. ताप नाहीसा करण्यासाठी झाडाची पाने घेतात. शनिवारी एका पानावर, नरक भुकेला आहे, दुसऱ्यावर नरक तान्हेला आहे, तिसऱ्यावर नरक ताजातवाना झाला आहे असे लिहितात. ही तीन पाने एका फडक्यात गुंडाळतात व रोग्याच्या डाव्या दंडावर बांधतात. एका कागदावर हात न उचलता परस्परांना छेदणारे दोन त्रिकोण काढतात व ते एका छोट्या कापडाच्या पिशवीत शिवून रोग्याच्या गळ्यात बांधतात. ताप उतरल्यावर हे सगळे नदीत किंवा विहिरीत टाकतात.

मुसलमानांच्यामध्ये वशीकरणही पुष्कळ आहे. नवरे जेव्हा आपल्या बायकांच्याकडे दुर्लक्ष करतात किंवा इतर स्त्रियांच्याकडे आकर्षित होतात तेव्हा स्त्रिया सामान्यपणे मोहिनी किंवा वशीकरण यांचा वापर करतात. अशा प्रकारच्या वशीकरणाला अनेकदा विड्याची पाने किंवा सुपारी देतात. म्हणून एखादा पुरुष जर एखाद्या स्त्रीच्या प्रभावाखाली येऊन तिच्या दुर्वर्तनाकडे दुर्लक्ष करीत असेल तर तिने त्याला सुपारी दिली असेल असे म्हणतात. सरड्याचे मांस आणि जंगली वनस्पतीची मुळे यांचासुद्धा वशीकरणासाठी वापर होतो. घुबडाचे मांस हे वशीकरणाचे एक प्रभावी साधन आहे. जार स्त्रिया आपल्या नवऱ्याला हे खाऊ घालतात. हे मांस खाल्ल्यावर माणूस मूर्ख होतो. त्याची स्मरणशक्ती नाहीशी होते. स्त्रिया आपल्या दुर्वर्तनाकडे पतीचे दुर्लक्ष व्हावे म्हणून हा उद्योग करतात. काही स्त्रिया हिंदूंच्या स्मशनात जाऊन चितेतील राख मिळवतात व ती मंत्रून पुरुषाच्या अंथरुणावर टाकतात. यामुळे मोहिनी होते. पंजाबमध्ये दरोडेखोर अशी राख आपल्याजवळ ठेवतात आणि घरातील माणसांच्या अंगावर शिंपडतात त्यामुळे ती माणसे जागी होत नाहीत. अजून एक प्रसिद्ध मोहिनी म्हणजे मोहिनी काजळ आहे. हे काजळ भुवयांना घासतात, डोळ्यांत घालतात. थोडेसे आपल्या पतीच्या केसाला व पायाला लावतात म्हणजे पती एकनिष्ठ राहतो. जफर शरीफ म्हणतो, अधूनमधून कुराणची एखादी आयत म्हणावी, ती पाणी पिण्यापूर्वी, जेवणापूर्वी म्हणावी म्हणजे त्या स्त्रीचे कल्याण होते. तिचा पती पापनिवृत्त होतो. हा मोहिनीचा एक फार चांगला वापर आहे. सिंधमध्ये एखाद्या स्त्रीला वश करण्यासाठी पुरुष महिन्याच्या सतराव्या तारखेर सात मोठ्या लवंगा घेतो. या लवंगांवर मंत्र टाकतो व युक्तीने या लवंगा बाईला खाऊ घालतो. मंत्र असा आहे. “लवंग! लवंग! तुम्ही खरी चांगली आहात, लवंगांनी बांधली ती माझ्यापासून दूर जाऊ शकत नाही, उठत पडत ती माझ्याकडे येईल!” मी ती स्त्री या लवंगा खाईल अशी व्यवस्था करतो. किंवा मिठावर महिन्याच्या एका तारखेला मंत्र म्हणतात “मीठ! मीठ! सप्तसमुद्राच्या अर्का!” पुढे त्या अपेक्षित स्त्रीचे नाव घेऊन म्हणतात “माझे मीठ खा आणि माझ्या पायाचे चुंबन घे”. मोहिनी करणारा माणूस हे मीठ पाण्यात टाकून पिऊन टाकतो. त्याची प्रेयसी उत्कटपणे त्याच्या प्रेमात पडते. अजून वाङ्‌निश्चय झालेला नाही अशा मुलीने पिंजलेल्या कापसाचे सात किंवा नऊ दोरे एकत्र करून त्याला सात गाठी पाडतात. नंतर संबंधित स्त्रीला परिणामाची सूचना देतात. तिने ऐकले नाही तर एक गाठ सोडतात आणि त्याबरोबरच तिच्या विजारीचा नाडा तुटतो. या मंत्राला ‘विजार-नाडा-तोड’ मंत्र असे म्हणतात.

जर एखाद्या जातीच्या पंचायतीसमोर निर्णयासाठी एखादी केस आली तर पंचायतीचा निर्णय आपल्याला अनुकल लागावा म्हणून पुष्कळदा मंत्रतंत्र वापरतात. काहीजण कड्यावर मंत्र कोरतात किंवा अभिमंत्रित ताईत आपल्या मनगटात किंवा दंडात घालतात. काहीजण कागदावर मंत्र लिहितात आणि तो कागद जरीच्या अगर रेशमी कपड्यात बांधून गळ्यात घालतात किंवा पटक्यात घालतात. काहीजण यासाठी विविध प्रकारच्या वनस्पतींच्या मुळ्या वापरतात. या मुळ्या ठराविक विधीनुसार आणाव्या लागतात. वनस्पतींची पूजा करून, वनस्पतींना कोंबडी, फळे व दारू अर्पण करतात, कोंबडी बळी देतात, नंतर वनस्पती घेतात. या शास्त्राचे ज्ञान हिंदु संन्यासी व बैरागी यांना चांगले असते. खरे म्हणजे यापैकी पुष्कळसे मंत्र हिंदूंच्याकडून उचलले आहेत.

दोन व्यक्तींच्यामध्ये वैर निर्माण करण्यासाठी कुराणच्या १०५ व्या फील म्हणजे हत्ती या प्रकरणाचे वाचन करणे ही सामान्य प्रथा आहे. दुपारच्या वेळी कबरीवरील मातीवर ४१ वेळा मंत्र म्हणावा आणि ज्यांच्यात वैर व्हावे अशी इच्छा आहे त्या मंडळींच्या घराकडे जाण्या-येण्याच्या रस्त्यावर ती माती टाकावी. किंवा चाळीस मिरे घ्यावे, एक आठवडाभर तो मंत्र सकाळ संध्याकाळ जपून मिरे जाळून टाकावे किंवा स्मशानात अगर मशिदीत बोडख्याने जावे. दुपारच्या वेळी ४१ दिवस आपल्या शत्रूच्या घराकडे तोंड करून ४१ वेळा मंत्र म्हणावा म्हणजे निश्चितपणे वैर निर्माण होते. हा मंत्र असा आहे.—’तुझ्या परमेश्वराने हत्तीच्या सैन्याचा प्रतिकार कसा केला हे तू पाहिले नाहीस का? त्याने त्यांची योजना उधळून लावली नाही काय? परमेश्वराने त्या हबशांच्यावर पक्ष्यांच्या झुंडी पाठविल्या, त्याने त्यांच्यावर मातीची ढेकळे टाकली आणि त्यांना रोपट्यांच्या कापून उरलेल्या खुंटांप्रमाणे केले नाही काय?’ या मंत्राच्या शेवटी ‘हे प्रबळा, हे सर्वशक्तिमान, हे मृत्यूच्या देवदूता आम्ही त्याच्यामध्ये तिरस्कार व मत्सर निर्माण केला आणि हा तिरस्कार पुनरुत्थानाच्या दिवसापर्यंत टिकेल’ असा मंत्रही जोडतात. एखाद्या माणसाला आपल्या प्रबळ शत्रूचा बदला घ्यायचा असेल तर पुढील पद्धती अवलंबितात. परंतु प्रत्येकालाच यामध्ये यश मिळेल असे नाही. आणि संकटग्रस्ताच्या सुटकेसाठीच जाणकार हा मंत्र वापरतात. खऱ्या दुःखी माणसाच्या बाबतीत परमेश्वर त्याची प्रार्थना ऐकतो. प्रबळ शत्रूच्या प्रतिकारासाठी तबत अबुलाहब किंवा १११ वे प्रकरण उलटीकडून म्हणजे शेवटाकडून आरंभाकडे म्हणावे. याला ‘माकूस’ असे म्हणतात. किंवा कुराणचे ५० वे चिहालकाफ हे प्रकरण दररोज सकाळ संध्याकाळ ४१ वेळा ४१ दिवस म्हणावे. किंवा एक नऊ इंचांची हिंदु स्मशानातली राखेची किंवा कबरीवरील मातीची बाहुली करावी. कुराणच्या १०५ व्या अगर १११ व्या प्रकरणाचा ‘माकूस’ जप करावा. २१ लहान लाकडी खुंट्यांवर प्रत्येकीवर तीन वेळा मंत्र म्हणून या खुंट्या बाहुलीच्या शरीराच्या वेगवेगळ्या भांगांत ठोकाव्यात. प्रेतावर आच्छादितात तसे बाहुलीवर कफन घालावे. शत्रूचे नाव घेऊन ही बाहुली पुरावी म्हणजे शत्रू लवकरच मरून जातो, असा विश्वास बाळगतात. अजून एक पद्धत म्हणजे जमिनीवर कच्च्या विटेवर एक मानवी आकृती काढतात. त्यावर पुढील मंत्र म्हणतात.—’हे सर्वशक्तिमान, तू भयंकर रागीट आहेस, तुझा सूड आणि क्रोध कुणीही सहन करू शकत नाही.’ यामुळे प्रबळही शक्तीचा प्रतिकार होतो असे मानतात.

अनुक्रमणिका



आकृती नं. १



आकृती नं. २

अनुक्रमणिका

## प्रकरण सत्ताविसावे

# ताईत आणि मंत्रतंत्र

मंत्रसिद्ध ताईत मंत्राने सिद्ध करावयाच्या चौकोनावर आधारित असतात. त्यांना जादूचे चौकोन असे म्हणतात. यातील काही चौकोन इतके मोठे असतात की, त्यांना एकेका ओळीत शंभर शंभर घरे असतात. या चौकोनांना विविध प्रकारची नावे आहेत. काहींना दुपाया म्हणतात, त्यांच्यात शेवटी दोन पाय दिसतात. पण वर तीन घरे असतात. चौकोनात खालची तीन घरे वापरली तर त्या चौकोनाला सुल्सी असे म्हणतात. चार घरे एका ओळीत असणाऱ्या चौकोनांना रुबाई किंवा मुरब्बा म्हणतात. अशा प्रकारे चौकोनांची संख्या वाढत असते. त्यातील नमुन्यादाखल काही चौकोन दिले आहेत :

| | | |
|---|---|---|
| ३ | ८ | १ |
| २ | ४ | ६ |
| ७ | | ५ |

| | | |
|---|---|---|
| १९५ | ५२६ | ६५ |
| १३० | २६० | ३९६ |
| ४६१ | | ३२५ |

वर दिलेल्या चौकोनांना दुपाया असे म्हणतात. शेवटच्या ओळीत दोन घरे असल्यामुळे दोन पाय फुटल्यासारखे दिसतात म्हणून त्याला दुपाया म्हणायचे. डावीकडील चौकोनात प्रत्येक घराचा अनुक्रम दिलेला आहे. त्या अनुक्रमानुसार तो चौकोन भरावयाचा आहे. समजा बिस्मिल्लाह हा शब्द घेतला तर या शब्दाची अक्षरी किंमत ७८६ आहे. याला बाराने भागायचे म्हणजे ६५ येतात आणि ६ उरतात. आता जादूचा चौकोन भरावयाचा आहे. क्रमांक १ च्या घरात ६५ × १ = ६५ ही संख्या लिहायची. क्रमांक २ च्या घरात ६५ × २ = १३० ही संख्या लिहायची. अशा रीतीने सर्व घरांतील संख्या लिहावयाच्या. मात्र शिल्लक ६ उरलेले आहेत म्हणून सहाव्या क्रमांकाच्या घरात ६५ × ६ + ६ = ३९६ ही संख्या लिहावयाची. अशा रीतीने हा चौकोन सिद्ध झाला. सुल्सी चौकोन म्हणजे प्रत्येक ओळीत तीन अशी नऊही घरे असणारा चौकोन. त्यातील घरांचा अनुक्रम अशा प्रकारे असतो :

| | | |
|---|---|---|
| ४ | ९ | २ |
| ३ | ५ | ७ |
| ८ | १ | ६ |

हे सुल्सी चौकोन हव्वा म्हणजे इव्हचे चौकोन ओळखले जातात. चार महाभूतांच्यासाठी हे चौकोन पुढीलप्रमाणे भरले जातात—चौकोन अशा रीतीने भरावयाचे की त्यांची उभी आडवी कशीही बेरीज केली तरी ती तितकीच असली पाहिजे. ही बेरीज इव्हच्या चौकोनात १२ येत असते. इव्हची अरबी पद्धतीप्रमाणे अक्षरी किंमत

१५ येते. तिरपी बेरीज केली तर अक्षरी किंमत १५ सर्व वेळी आली पाहिजे. हे चौकोन खालीलप्रमाणे तयार केले जातात :

वायू

| | | |
|---|---|---|
| २ | ७ | ६ |
| ९ | ५ | १ |
| ४ | ३ | ८ |

तेज

| | | |
|---|---|---|
| ४ | ९ | २ |
| ३ | ५ | ७ |
| ८ | १ | ६ |

पृथ्वी

| | | |
|---|---|---|
| ६ | ७ | २ |
| १ | ५ | ९ |
| ८ | ३ | ४ |

आप

| | | |
|---|---|---|
| ६ | १ | ८ |
| ७ | ५ | ३ |
| २ | ९ | ४ |

अशाच प्रकारे एक चार घरांचा चौकोन आहे. हा मरियनचा चौकोन म्हणजे मेरीचा चौकोन मानला जातो. मरियनची अक्षरी किंमत २९० आहे. हा चौकोन अशा प्रकारे भरला जातो:

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | ११ | २७० | १ |
| २६९ | २ | ७ | १२ |
| ३ | २७२ | ९ | ६ |
| १० | ५ | ४ | २७१ |

हे जादूचे चौकोन वाटेल तितके मोठे म्हणजे एका ओळीत शंभर घरांपर्यंत असतात. हे चौकोन कशावर लिहावे, कशाने लिहावे, कोणत्या मंत्राचा जप करावा, किती करावा या प्रत्येकाच्या विषयी ठरलेले नियम आहेत. वशीकरण, वैर निर्माण करणे, वैर संपविणे, स्वप्ने पाडणे, स्वप्ने दूर करणे, भूतबाधा टाळणे, विविध रोग दूर करणे, स्त्रीचे दूध वाढविणे अशा अनेक कामासाठी यांचा वापर होतो. वशीकरणासाठी वापर करताना

द्वितीयेच्या दिवशी शुक्रवार, सोमवार, बुधवार, आणि गुरुवार हा दिवस पाहून हे मंत्र चिनी मातीच्या बशीवर अगर कागदावर लिहितात. व ते धुवून त्याचे पाणी पितात. गुजरातमध्ये मेमनलोक भूतबाधा झाल्यास चिनी मातीच्या ताटात केशराने मंत्र लिहितात आणि कुराणचे ११३ वे प्रकरण लिहितात व धुवून ते पाणी रोगग्रस्ताला देतात. कागदावर हे मंत्र लिहून ते उदाबरोबर जाळतात व त्याचा धूर रोग्याला देतात. अंगठीवर मंत्र कोरतात. भूर्जपत्रावर मंत्र लिहितात, त्याची गुंडाळी करून धातूच्या पेटीत बंद करतात व तो ताईत गळ्यात, दंडावर, कमरेला किंवा पटक्यात बांधतात.

याखेरीज कुराणमधील वचने कोरलेला दगड म्हणजे ‘नाद-इ-अली’, ‘अलीला आवाहन’, [अल्ला ही पुरुष देवता होती, जिला अल्लात नावाची स्त्री सहकारिणी होती. ही अल्लात देवता कुरेश टोळीची उपास्य देवता होती (मार्गोलियाथ, महंमद, १०९ आणि पहा-ईआरई १·६६४)] चांदीमध्ये बसविलेली वाघनखे यांचेही ताईत तयार करतात. काही लोक रविवारी अमावस्या आली म्हणजे त्या दिवशी मॉंहांडूळ मारतात व त्याच्यावर मंत्र टाकून मडक्यात ठेवतात आणि मडके जमिनीत पुरतात. मांस झडून जाते, हाडे शिल्लक राहतात. ती काढून त्यांच्या माळा तयार करतात. या माळा गंडमाळा हा रोग बरा करण्यासाठी उपयोगी पडतात. विविध प्राणी आणि पक्षी यांचे पंख, केस, हाडे इत्यादींचा भूतबाधा निवारण करण्यासाठी वापर करतात.

अबु हुरैरा सांगतो की प्रेषित महंमद म्हणाला “परमेश्वराची ९९ नावे आहेत. जो ही नावे जपतो त्याला स्वर्गात प्रवेश मिळेल.” सम्राट हुमायूनला ईश्वरी नावांच्या विषयी इतका आदर होता की त्याने मीर अब्दुल हे या नावाच्या माणसाला बोलावताना फक्त अब्दुल या नावाने बोलावले. कारण आंघोळ केल्याशिवाय तो फक्त अब्दुल म्हणजे गुलाम असतो. अब्दुल हे म्हणजे ईश्वराचा दास नसतो. परमेश्वराच्या नावाचा जप करण्यासाठी खालीलप्रमाणे माहिती दिली जाते. या यादीत ही नावे, त्यांचा अर्थ, त्यांच्या अक्षरांचे संख्यात्मक मूल्य आणि त्यांचा उपयोग यांचा समावेश आहे :

अल्ला—’सर्वश्रेष्ठ’, ६६, सकलकामनाप्रीत्यर्थ, अर्‌रहमान, ‘दयाळू’, २५८, मन उदात्त करण्यासाठी. अर्‌रहीम ‘दयाळू’ २५८, प्रतिष्ठा वाढण्यासाठी. अलकुद्रुस, ‘पवित्र’, १७०, भीती घालविण्यासाठी. अस्‌सलाम, ‘शांती’, १३१, आरोग्यासाठी. अल मोमीन ‘निष्ठावंत’, १३६, शत्रू निवारण्यासाठी, अल्‌मोहमीन, ‘रक्षक’, १४५, स्वसंरक्षणासाठी. ‘अल्‌अजीज,’ ‘शक्तिमान’ ९४, मानसन्मानासाठी. अल्‌जब्बार. ‘सर्वज्ञ’, २०६ राजपुत्रापासून अभय, अल्‌मूत कबीर ‘श्रेष्ठ’, ६६२, संपत्ती मिळविण्यासाठी. अलखालीब, ‘निर्माता’, ७३१, काम सुलभ मिळण्यासाठी अल् मुसब्बीर ‘निर्माता’, ३३६, कर्जनिवारणासाठी, अल्‌गफ्फार ‘क्षमाशील’, १२८१, पापमुक्तीसाठी. अल् कहहार, ‘वर्चस्व गाजविणारा’, ३०६, दुःखापासून अभय. अल् वाहब, ‘अर्पण करणारा’, १४, हरवलेली वस्तू मिळण्यासाठी. अल् रज्झाक, ‘जगविणारा’, ३०८, उपजीविकेच्या साधनासाठी. अल् फतह, ‘विजयी’, ४८९, विजयासाठी. अल् आलीम, ‘ज्ञाता’, ४८९, ज्ञान प्राप्तीसाठी. अल् काबीज, ‘सार्वभौम,’ ९०५, शत्रूविनाशासाठी. अल् बासित, ‘अन्नदाता’, ७२, उपजीविकेसाठी. अल् खाफीज, ‘कमी करणारा’, १४८१, शत्रूजयासाठी. अल् राफी, ‘वाढविणारा, ३५१, प्रतिष्ठेसाठी. अल् मुईज, ‘सन्मान करणारा’, ११७, प्रतिष्ठेसाठी. अल्‌मुजीर, ‘संहार करणारा’, ७७०, शत्रू नाशासाठी. अल्‌सामी, ‘श्रोत्रा’, १८०, कानाचे रोग घालविण्यासाठी. अल् बशीर ‘द्रष्टा’, ३०२, इतरांचे रहस्य जाणण्यासाठी. अल् हकीम, ‘शास्ता’, ६८, सार्वभौमत्वासाठी. अल आदिल, ‘न्यायी’, १०४, न्यायासाठी. अल् लतीफ, ‘सूक्ष्मदर्शी’, १२९, सुदैवासाठी. अल् खुबीर, ‘मर्मज्ञ’, ८१२, रहस्य जाणण्यासाठी. अल हलीम, ‘दीर्घ दुःख सहन करणारा’, ८८ दुःखमुक्तीसाठी. अल् अजीम, ‘श्रेष्ठ’,

१०२०, मोठेपण मिळविण्यासाठी. अलगफूर, 'क्षमाशील', १२८६, पापमुक्तीसाठी. अल् शकूर, 'बक्षीस देणारा', ५२६, दुःखमुक्तीसाठी. अल् कबीर, 'श्रेष्ठ' २३२, इच्छापूर्तीसाठी. अल् हाफीज, 'पालक' ९९८, भीती दूर करण्यासाठी अल् मुकीद, 'शक्तिदाता' ५५०, यशासाठी. अल् हसीब, 'हिशेब करणारा', ८०, कैदेतून सुटण्यासाठी. अल् जलील, 'वैभवशाली', ७३, शत्रूला भिववण्यासाठी. अल् करीम, 'उदार' २७०, संसारेच्छा पूर्तीसाठी. अल् रकीब, 'पालक', ३१२, संरक्षणासाठी. अल् मुजीब, 'प्रार्थनेला धावून येणारा', ५५, इच्छापूर्तीसाठी. अलवासी, 'उदार', १३७, व्यापारात लाभ होण्यासाठी. अलबदूद, 'प्रेमळ', २०, प्रेमपूर्तीसाठी. अलमजीद, 'वैभवशाली', ५७, रोग मुक्तीसाठी, अल् बाईस, 'उत्थानासाठी', ५७३, मृतांना मोक्ष. अल् शाहीद, 'साक्षीदार', ३१९, मुले आज्ञाधारक होण्यासाठी. अलहक, 'सत्य', १०८, ज्ञान प्राप्तीसाठी. अल्‌वकील 'बाजू मांडणारा', ६६, अग्नीपासून संरक्षण. अल कवी, 'सशक्त', ११६, शत्रूजयासाठी. अल् मतीन, 'दृढ' ५००, आईचे दूध वाढविण्यासाठी. अल् वली, 'मालक', ४६, धन्याची मर्जी राखण्यासाठी. अल हमीद, 'स्तविलेला', ६२, असभ्य भाषा निवारणासाठी. अल्‌मुहसी, 'मोजदाद करणारा' १४८. स्मृती बळकट करण्यासाठी, अल्‌मुबदी, 'सृष्टिनिर्माता', ५६, श्रम सुलभ करण्यासाठी, अल् मुईद, 'ज्ञानरक्षक', १२४, रहस्य समजण्यासाठी. अल्‌मुमीत 'संहारक', ४९०, शत्रूनाश. अल् मुहई, 'गतिमान', ६०, भूतबाधा टाळण्यासाठी. अल् है, 'चैतन्य', ६२, कीटकांचा नाश करण्यासाठी. अल् कय्यूम, 'निर्वाह करणारा', १५६, दीर्घायुष्यासाठी. अल् वाजिद, 'शोधक', १४, हरवलेल्या संपत्तीचा शोध घेण्यासाठी. अल् मजीद, 'वैभवशाली', ४८, संपत्तीसाठी. अल् वाईद, 'एकमेव', १९, साहित्य ज्ञानासाठी. अल् समद, 'शाश्वत', १३४, दारिद्र्य नाश. अल् कादिर, 'सत्ताधीश', ३०५, दुःख मुक्तीसाठी. अल् मुक्तदीर, 'सर्वसत्ताधीश', ७४४, धन व मानासाठी. अल् मुकदीम, 'मान्यता देणारा', १८४, दुःख मुक्तीसाठी. अल् मवख्खीर, 'पूर्ण स्वतंत्र', ८८६, इच्छापूर्तीसाठी. अल् अव्वल, 'सर्व प्रथम', ३७, जयासाठी. अल् आखीर, 'अंतिम', ८०१, भीतिनाश. अल् जाहीर, 'स्पष्ट', ११०६, नेत्र रक्षणार्थ. अल् बातिम, 'अधिपती', ४७, कौटुंबिक दुःख नाहीसे करण्यासाठी. अल् मुताली, 'उदात्त', ५५१, इच्छापूर्तीसाठी. अल्‌बार, 'सत्यवादी', २०२, संकट मुक्तीसाठी. अल् तबाब, 'पश्चात्तापदग्ध यांचा त्राता', ४०९, क्षमेसाठी. अल् मुन्तकीम, 'पापाचा बदला घेणारा', ६३०, कबरीत विश्रांतीसाठी. अल् आफू, 'पापांना क्षमा करणारा', १५६, पाप मुक्तीसाठी. अल् शैफ् 'कृपाळू', २८६, पीडितांच्या मुक्तीसाठी. मालिक उल्-मुल्क, 'राज्याचा मालक', २१२, संपत्तीसाठी. जू-उल् जलाली-वल-इकराम, 'श्रेष्ठत्व व औदार्य संपन्न', ११००, इच्छापूर्तीसाठी. अल् मुक्सीन. 'न्यायी', २०९, वाईट विचार दाबण्यासाठी. अल् जामी, 'जमा करणारा', ११४, भाऊबंदांच्या ऐक्यासाठी. अल् गनी, 'समृद्ध', १०६०, वैभवासाठी. अल् मुग्नी, 'संपन्न करणारा', ११००, पुरुषावलंबनापासून मुक्तीसाठी. अल् भुती, 'दाता', १२९, दुष्कीर्तीपासून रक्षण. अल्‌मानी, 'रक्षक', १६१, शत्रूपासून रक्षण. अल्‌जार, 'विनाश करणारा', १००१, भूतबाधा निवारणासाठी. अज् नाफी, 'मिळकत देणारा', २०१, शेती व व्यापारात यश. अल् नूर, 'प्रकाश', २५६, मार्गदर्शनासाठी. अल्‌हादी, 'मार्गदर्शक', २०, संपत्तीसाठी. अल्‌बदी. 'अतुल', ८६, रहस्य जाणण्यासाठी. अल् बाकी 'शाश्वत', ११३, मान्यतेसाठी. अल् वारिस, 'सर्वांचा वारस', ७०७, मनःशांतीसाठी. अल् रशिद 'मार्गदर्शक', ५१४, इच्छापूर्तीसाठी. अल् सबूर, 'शांत', २९८, शत्रूपासून मुक्तता.

संकीर्ण मंत्राच्यामध्ये रात्रीच्या वेळी लघ्वी होऊ नये म्हणून असणारा एक मंत्र उल्लेखनीय आहे. हा मंत्र ताइतात घालून ताईत गळ्यात घालतात. मंत्राची रचना अशा प्रकारची आहे :

| | | |
|---|---|---|
| मरमुसल्लाह | ५ | |

| | | |
|---|---|---|
| १११ | मुसल्लाह<br>५१११ | ११ ५<br>३० |
| दाल, हे, हे, हे | दाल, नून, अलीफ<br>१११ रिजाजुल<br>गायब | यम-मार<br>११५ |

खालील जादूचा चौकोन भरावा. त्याच्या दोन तीन प्रती तयार कराव्या. वेळोवेळी हा मंत्र लिहिलेला कागद पाण्यात बुडवावा व ते पाणी प्यावे म्हणजे खरूज बरी होते :

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | ३५ | ९२ | ६ |
| वे, हे | वॉव, रे, जाल | वॉव, रे | वॉव, दाल,<br>अलिफ |
| अलिफ<br>अलिफ | १८ | २३ | ५ |
| २ | ८८ | २३ | ८ |
| ५ अलिफ | ३९ | ९ | २ |

मूळव्याध बरी करण्यासाठी खालील मंत्र पाण्यावर म्हणावा, त्यावर फुंकर मारून ते पाणी रोग्याला पाजावे. मूळव्याध बरी होते. मंत्र असा आहे, "निघून जा, जा, जा, जा. वाहत्या पाण्या सुकून जा. संत जलाल जाहानियासाहेब जहाँगस्त यांची आज्ञा आहे. जा ताबडतोब निघून जा."

खालील चौकोन रोग्याच्या पाठीला बांधल्यास देवीचा आजार सौम्य होतो :

| | | | |
|---|---|---|---|
| ८८८८ | १२२२१ | १५५५४ | ११११ |
| १४४४३ | २२२२ | ७७७७ | १३३३२ |
| ३३३३ | १७७५६ | ९९९९ | ६६६६ |
| ११११० | ५५५५ | ४४४४ | १६६६५ |

जेव्हा एखादे घर भूतबाधेने झपाटले असेल त्यावेळी पुढील मंत्र कागदावर लिहून दरवाजावर टांगता ठेवावा, म्हणजे भूतबाधा संपते. उजव्या बाजूला, "हे महंमद! हे अल्ला! निष्ठावंतांचा रक्षणकर्ता! निष्ठावंतांना मान देतो. निष्ठावंताला परमेश्वर यश देतो. खरोखर, तो खरोखर विजयदाता आहे. तो श्रेष्ठ आणि खरा साहाय्यक आहे. तो प्रभूचा निवडलेला आहे. आमच्यासाठी सर्वांत चांगला आहे. सर्व मानव जातीसाठी चांगला आहे. मदत करणाऱ्यात, काळजी वाहाणाऱ्यात, तो सर्वश्रेष्ठ आहे" आणि डाव्या बाजूला असे लिहावे—"हे मिकाईल! हे अली! हे इज्राइल! हे जब्राइल! हे अली! हे इज्राइल! "घराच्या ऐवजी जर एखादी व्यक्ती भुताने झपाटली असेल तर मोठ्या अक्षरांत पुढील मंत्र लिहून अशा रीतीने जमिनीवर लावावा की रोगग्रस्ताची नजर पुन्हा पुन्हा त्याकडे जाईल. त्याने भूत गांगरून जाते. मंत्र असा—"सुलेमानच्या नावाने, दयाळू परमेश्वराच्या नावाने माझ्या विरुद्ध राहू नकोस. तर ये आणि मुसलमानांना शरण जा."

जन्मकुंडली हा एक कागद असतो. त्यावर जन्मनाव, जन्मवेळ, त्या वेळचे गृह, राशी इत्यादींची नोंद असते. त्यावरून आयुर्मयादा, सवयी, आवडी, मनाचा कल, भविष्य यांचे वर्णन असते. याला 'जायचा असे म्हणतात. मुसलमानांच्या कुंडल्या तपासताना रोग्याचे नाव, त्याच्या आईचे नाव यांची अरबी पद्धतीने किंमत काढतात व या बेरजेला बाराने भागतात. जर १ उरला तर रोग्याचे भवितव्य मेष चिन्हात असते, २ उरल्यास वृषभ, ३ उरल्यास मिथून, ४ उरल्यास कर्क, ५ राहिल्यास सिंह अशा रीतीने पाहतात. त्याआधारे रोग्याचे भविष्य सांगतात एकेका राशीला एकेक गंडांतर असते. हे गंडांतर टळल्यास आयुष्यभर भीती नसते. संपूर्ण आयुष्य १२५ वर्षांचे मानतात. जर गंडांतर असेल, मृत्युभय असेल तर ते मंत्रतंत्राने दूर करतात. हे भविष्य कळण्यासाठी रोग केव्हा उद्भवला हे कळणे आवश्यक असते. जर रोगाची तारीख कळणे अशक्य असेल तर रोगी व त्याची आई यांच्या नावाच्या किंमतीला ७ ने भागतात. भाग बरोबर तुटल्यास रोगाचा आरंभ शुक्रवारी, १ शिल्लक राहिल्यास शनिवारी, २ उरले तर रविवार अशा रीतीने मोजतात.

अशुभ भविष्यावर विजय मिळविण्याच्या काही शांती आहेत.त्या निमित्ताने सदका या नावाचे दान दिले जाते. या दानात पैसे, फळे, अन्न, प्राणी, कपडे असतात. हे रोग्यावरून ओवाळतात किंवा त्याला दाखवितात व फकिरांना देतात किंवा चौरस्त्यावर ठेवतात. कित्येकदा हातभर उंचीची मनुष्याची किंवा हनुमानची पिठाची प्रतिमा करतात. या प्रतिमेच्या तोंडात वीतभर लांबीची काठी ठेवतात. तिची दोन्ही टोके चिंध्यांनी गुंडाळून पेटवतात. तिच्या डोक्यावर पिठाचे दिवे ठेवतात व पेटवतात. ही प्रतिमा खापराच्या वेळणीत ठेवतात. तिला खिळ्याने टोचतात, प्रतिमेसमोर भाताचे काळ्या, पिवळ्या, लाल रंगांनी रंगविलेले गोळे याचप्रमाणे रंगविलेली अंडी, बकरीचे यकृत जे सामन्यपणे काट्याने टोचतात, बकरीचे रक्त, दोन तीन मासे ठेवतात. नंतर पिठाचा दिवा करून त्यात रोग्याने वापरलेल्या कपड्याच्या चार वाती पेटवितात. या वाती विविध प्रकारच्या तेलात भिजविलेल्या असतात. हे दिवे रक्तावर ठेवतात. जेव्हा सगळे दिवे पेटवण्यात येतात तेव्हा ती प्रतिमा स्वतः

अनुक्रमणिका

भुतासारखी ओंगळ दिसते. हे सगळे रोग्यावरून ओवाळून लांब ठेवून देतात. कुराणच्या मते स्त्रिया दोरीगाठीवर आपल्या नावडत्या माणसावर फुंकर घालून वाईट प्रयोग करतात.

उत्तर हिंदुस्तानात रात्री पायाच्या अंगठ्याला पाच रंगांचा दोरा तीन वेळा गुंडाळतात. असे पंधरा दिवस करतात. यामुळे मूळव्याध बरी होते. किकराच्या झाडाला सात वेळा दोऱ्याचे वेढे घालतात आणि आजारी माणसाला त्या झाडाला आलिंगन देण्यास सांगतात. मुदती ताप असेल तर तो यामुळे बरा होतो.

आठवड्यातील प्रत्येक दिवसाचे शुभाशुभ स्वरूप आहे. शनीचा दिवस शनिवार अशुभ असतो. त्या दिवशी एखादा माणूस आजारी पडल्यास त्याचे कारण रक्तातील उष्णता, भुताची दृष्टी हे असते आणि रोगाची लक्षणे अति तहान, निद्रानाश, नाकातून व मलाशयातून रक्त जाणे अशी असतात. हा आजार सात तास राहतो. रविवारी होणारा आजार हिरव्या मुखवर्णाच्या स्त्रीच्या वाईट नजरेमुळे होतो, जिच्या उपस्थितीत त्याने स्वादिष्ट अन्न खाल्लेले असते. तीव्र ताप, डोके दुखी, सांधे दुखी, डोळे लाल होणे, अशी लक्षणे असतात. हा आजार चौदा दिवस टिकतो. सोमवारचा आजार स्नानानंतरच्या थंडीमुळे होतो किंवा अति श्रमाने होतो. चकरा येणे, ओकारी होणे, ग्लानी येणे, कंबर दुखणे ही याची लक्षणे आहेत. हा आजार पंधरा दिवस टिकतो. मंगळवारचा आजार पऱ्या आणि भुते यांच्यामुळे होतो. विशेषतः बेंबीभोवती कळा येतात, पोट दुखते. हा आजार आठवडाभर राहतो. बुधवारचा आजार मृतासाठी केलेले नवस न फेडल्यामुळे होतो. हा आजार नऊ दिवस राहतो. या आजारात मनगटे, पाय व मान दुखत असते. गुरुवारचा आजार पऱ्यांची सावली पडल्यामुळे होतो. तो दहा दिवस टिकतो. आणि त्यात अन्नावरची वासना निघून जाते. शुक्रवारी होणारा आजार शारीरिक त्रासामुळे होतो आणि तो बारा दिवस टिकतो. ग्लानी आणि थकवा ही त्याची लक्षणे आहेत.

अनुक्रमणिका



आकृति नं. ३.

अनुक्रमणिका

### प्रकरण अट्ठाविसावे

## जादूच्या पद्धती

चोरीला गेलेल्या वस्तू शोधण्यासाठी, गुप्तधनाच्या शोधासाठी, रोग्याला भूतबाधा झालेली आहे काय हे पाहण्यासाठी मुलाच्या किंवा प्रौढ माणसाच्या हाताच्या तळव्याला अंजन लावतात व त्याकडे एकटक पाहण्यास सांगतात. पंजाबमधील मांत्रिक कागदावर मंत्र लिहितात, त्यावर शाईचा मोठा थेंब टाकतात. लहान मुलाच्या हातात फुले देतात व त्याला त्या शाईकडे पाहून 'चार रखवालदारांना आवाहन कर' असे सांगतात. मग त्या मुलाला प्रश्न विचारतात. त्या आधारे गुप्त धन शोधून काढतात. जफर शरीफ म्हणतो, गुप्त धन ज्या ठिकाणी आहे तेथे रात्रीच्या वेळी अग्नीच्या ठिणग्या दिसतात अशी एक काही मूर्ख लोकांची समजूत आहे.

अंजन पाच प्रकारचे असते. हरवलेल्या वस्तूंचा शोध घेण्यासाठी, भुते, चेटकीण, व भूतबाधा यांच्याबद्दल माहिती काढण्यासाठी, गुप्तधनाच्या शोधासाठी, सर्व प्रकारचे उद्देश साध्य करण्यासाठी, उपयोगी असलेल्या आणि एखाद्यास अदृश्य करण्यासाठी. पण अंजनाच्या या प्रकारावर व त्यांच्या सामर्थ्यावर जफर शरीफचा विश्वास नाही.

पहिल्या व दुसऱ्या प्रकारचे अंजन आघाड्याच्या मुळ्या किंवा ज्येष्ठमधाच्या मुळ्या यांच्यापासून करतात. या मुळ्या कुटून त्याचे चूर्ण करतात. त्यांचा लेप मडक्याला आतून लावतात आणि एरंडेलाच्या दिव्यावर मडक्यात काजळ धरतात. अशा रीतीने तयार केलेले अंजन पायाळू मुलाच्या हाताला लावतात व त्याला प्रश्न विचारून माहिती घेतात. तिसऱ्या प्रकारच्या अंजनासाठी एक कपडा घेतात, तो मांजराच्या अगर घुबडाच्या रक्तात बुडवतात, मारलेल्या प्राण्याचे डोळे, काळीज आणि पित्ताशय त्या कपड्यात गुंडाळतात. या कपड्याची वात करतात व एरंड तेलाच्या तेलात जाळून काजळ धरतात. हे अंजन हातावर घासले तर गुप्त धन दिसू लागते. चौथ्या प्रकारचे अंजन मूठभर द्विदल धान्य घेऊन करतात. हे धान्य मडक्यात काळे पडेस्तोवर भाजतात. हा कूट एरंडेल तेलात मिसळतात व त्याचे अंजन करतात. हे अंजन कोणत्याही माणसाच्या हाताला लावले तर चालते पण इतर अंजन मात्र पायाळू, कुत्रे न चावलेल्या, घाऱ्या डोळ्यांच्या माणसांनीच वापरावयाची असतात. पाचव्या प्रकारचे अंजन अदृश्य होण्यासाठी आहे.

भुताखेतावर ताबा मिळविण्यासाठी काही वेळेला पलिते वापरण्यात येतात. या पलितांच्यासाठी वेळणीसहित कोरे मडके घेतात, पाण्याने स्वच्छ धुतात. मडक्यावर चंदनाच्या लेपाचे पट्टे ओढतात. मडक्याच्या तोंडाला फुले बांधतात, वेळणीत सुगंधी तेल टाकतात, त्यात ठेवून वात पेटवितात. एखाद्या मुलास किंवा मुलीस स्नान करून नवे कपडे घालतात. फुलांनी सजवतात आणि ज्योतीकडे एकटक पाहण्यास सांगतात.

काहीजण आरशाच्या मागच्या भागास खालील आकृती चिकटवितात व मुलाला आरशात पाहण्यास सांगतात :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ९ | |
| १२ | द्रष्टा | ३ | सर्वसाक्षी | |
| | ४ | ११ | ५ | |
| | | ६ | | १० |
| | १३ | | | |

काही लोक जादुचा एक विशिष्ट चौकौन ताटात लिहितात व त्यात पाणी टाकून मुलाला पाण्यात काय दिसते हे विचारतात. काही लोक वरील उपायाव्यतिरिक्त मुलाच्या कपाळावर असा एक मंत्र लिहितात – ”आम्ही तुझ्या चेहऱ्यावरचे आवरण काढून टाकले आहे, आता तुला नवी दृष्टी प्राप्त झाली आहे, हे जफर! तय्यारच्या मुला जिन! वाऱ्यावरून उडत ये.” कित्येकदा मुलाच्या कपाळावर बिस्मिल्लाह रहिमान ओ रहीम असे लिहून त्या खाली जिनची नावे लिहितात—अतिस्तान, शतीतान, कबुशीन, शालीश, शिशीन, कुर्बताशीन.

जर एखादी व्यक्ती दीर्घ काळ आजारी असेल, लग्न होऊन दीर्घ काळ झाला तरी मूल झाले नसेल, कुमारी गर्भवती असेल, पुनःपुन्हा दुपवे जात असतील, कुणाची मुले वाचत नसतील, नोकरी मिळत नसेल किंवा पती-पत्नीचे पटत नसेल अशा सर्व वेळी स्त्रीपुरुष किंवा संबंधित व्यक्ती, पऱ्यांचे स्नान करते. याला ‘परी का नहान’ असे म्हणतात. हा स्नानविधी जाणत्या मांत्रिकाकडून, मुल्लाकडून किंवा परीवाली म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मंत्रविद्येतील निष्णात स्त्रीकडून करून घेतला जातो. सात विहिरी, नद्या किंवा समुद्राचे पाणी आणतात. विविध झाडांची पाने एका भांड्यात ठेवून त्यात हे पाणी ओततात. नंतर या भांड्यावर कुराणचे वाचन करून फुंकर मारतात. भूतप्रभाव नाहीसा करायचा असेल तर ३६ व्या किंवा ७३ व्या प्रकरणाचे वाचन करतात. दैव बदलावयाचे असेल तर कुराणचे ४८ वे प्रकरण वाचतात. डाळीच्या पिठाची व वितभर उंचीची अशी मनुष्याची किंवा हनुमानाची एक प्रतिमा करतात, तीन रंगांचा दोरा घेऊन त्याचे एक टोक रोग्याच्या मानेला व दुसरे प्रतिमेच्या मानेला बांधतात. प्रतिमेसमोर कोंबडा, बकरी यांचे बळी देतात. नऊ लिंबे घेतात त्यांवर कुराणमधील आयतुल कुर्सीचे वाचन करून फुंकर टाकतात. आजारी माणसावरून ही लिंबे ओवाळून टाकतात. मग या भांड्यांतील पाण्याने स्नान करतात. स्नानाचे पाणी खड्ड्यात साचवतात, खड्डा बुजवून टाकतात. हे स्नान कोणत्याही महिन्यात पहिले तीन शनिवार, रविवार, सोमवार, मंगळवार, बुधवार या दिवशी करतात. स्नान झाल्यावर रोग्याच्या शरीरावरून ओवाळून त्याच्यासमोर मडके फोडून टाकतात. लगेच गळ्यात व दंडावर ताईत बांधतात. स्त्रियांमध्ये हा विधी प्रसिद्ध आहे.

अनुक्रमणिका



आकृती न. ४

# अनुक्रमणिका

दुसरा प्रकार असा की शुक्रवारी खोलीच्या छताला चांदवा बांधतात. मांत्रिक स्त्री महागातला असा लाल किंवा पांढरा स्वच्छ पोशाख करते आणि मानेला चंदन व हाताला मेंदी लावते. काजळ, दातांना दारसिना लावून स्वतः फुलांनी सजते. भूतबाधा झालेल्या स्त्रीला असेच सजवून खोलीत आणतात. मांत्रिक स्त्रीच्यासमोर ही यक्षिणीची बाधा झालेली स्त्री बसवतात. समोर ताट ठेवतात. मग मांत्रिक स्त्रीच्या अंगात येते. ती घुमू लागते आणि केस मोकळे सोडते. बाधा झालेल्या स्त्रीला केस मारते. डोके गोल गोल फिरवते. रोगी स्त्रीही या घुमण्याचे अनुकरण करू लागते. मग मांत्रिक स्त्री किती तबके पाहिजेत हे विचारून घेते. ठराविक ठिकाणी ही ताटे पोचती केली जातात. अशा रीतीने रोगी-स्त्री रोगमुक्त होते. याला 'परीतबक विधी' म्हणतात. ते तबक दोन प्रकारचे असते. त्यात पांढरा कपडा असतो. त्यावर चंदन, ऊद, अबीर, विड्याची पाने, सुपाऱ्या वगैरे गोलाकार मांडतात. दुसऱ्या प्रकारच्या ताटाला फळाचे म्हणतात. हे एका चटईवर ताजी व सुकविलेली फळे, दूधभात, भाकरी असणारी सोळा ताटे, सरबताचे सोळा खुजे, रेशमी व सुती कपडे, बांगड्या असे सर्व ठेवतात. ही दोन प्रकारची ताटे म्हणजे त्यातील पदार्थ प्रामुख्याने दानासाठी असतात.

पऱ्यांचे एकूण चौदा समूह आहेत. प्रत्येक परीची पद्धत निराळी आहे. त्यानुसार मांत्रिक-स्त्रीला वागावे लागते. जर इंद्राची परी असली तर मांत्रिक-स्त्री पायांत घुंगरे बांधून नाचते, शिकंदर बादशहाची परी असली तर पुरुषाचे कपडे घालते, मिशीवरून हात फिरवते, रोगी-स्त्रीला जोराने विचारते, "हे नखरेल! हे मूर्खे! मला सोडून तू दुसरा शोधणार काय?" अशा प्रकारे प्रत्येक गटातील परीची पद्धत निराळी असते. मांत्रिक-स्त्रियांच्या बरोबर त्यांच्या नोकरणी असतात, त्या चवऱ्या ढाळीत असतात.

या मांत्रिक-स्त्रीच्या स्नानाचा एक विधी असतो. त्यासाठी सात किंवा नऊ कोरी मडकी घेतात त्यात सात किंवा नऊ विहिरींचे पाणी घालतात. या मडक्यात सात किंवा नऊ झाडांची पाने टाकतात. बाधा झालेल्या स्त्रीला चौरंगावर बसवतात. तिच्या डोक्यावर केशरी रंगाचा रुमाल चांदव्यासारखा धरतात. मांत्रिक-स्त्री लिंबे ओवाळून टाकते. मग मांत्रिक-स्त्रीच्या अंगात येते. बाजूच्या स्त्रिया मोठ्याने ओरडतात, "पकडा, पकडा, तिच्यावर पडलेल्या ओंगळ सावलीला पकडा. सावली बांधून तिला काफ पर्वतावर हद्दपार करा किंवा जाळून तिची राख करा." यानंतर रोगी-स्त्रीला स्नान घालतात. तिच्यावरून कोंबडी ओवाळून बळी देऊन टाकतात. रोगी-स्त्रीच्या गळ्यात एकवीस गाठीचा गंडा बांधतात.

या मांत्रिक म्हणविणाऱ्या स्त्रिया बहुधा अशिक्षित असतात. त्यांना ईश्वराची नावेही धड माहीत नसतात. म्हणून त्या दोऱ्याला, मंत्र न म्हणताच गाठी पाडतात. अशा या दोरी गंड्याचा उपयोग जुन्या काळापासून दिसतो. ज्यू लोकांनी लबबि नावाचा जादूगार आणि त्याच्या मुली यांना लाच देऊन वश केले होते आणि त्यांना महंमदावर चेटूक करण्यास सांगितले होते. या मंडळींनी महंमदाच्या दाढीचे काही केस मिळवले. खजुरीच्या पानावर अकरा गाठी दोऱ्याने बांधून हे केस बांधले आणि हे विहिरीत टाकून विहीर मोठ्या दगडांनी झाकून टाकली. त्यामुळे पैगंबराची अन्नावरची वासना उडाली. तो झुरू लागला. आपल्या बायकांच्याकडे त्याचे दुर्लक्ष होऊ लागले. देवदूत जब्राईलने हे रहस्य उलगडून दाखवले. विहीर उपसण्यात आली आणि गाठी सोडल्या. मग पैगंबराचा आजार बरा झाला.

हे विधी चालू असताना कित्येकदा मांत्रिक-स्त्री आपल्या हाती साधा अगर चांदीच्या पट्ट्यांनी सजविलेला बेत घेते. या बेताला उदाचा धूर देतात. अलीकडील काळात पुरुष मांत्रिकही आपल्या अंगात पऱ्या येतात असे सांगू लागले आहेत. जफर शरीफच्या मते हा पैसे मिळविण्याचा अप्रतिष्ठित मार्ग आहे. आपल्या अंगात पऱ्या येतात असे म्हणणारे पुरुष पुष्कळदा इतरांच्या बायका भ्रष्ट करण्याचा उद्योग करताना सापडलेले आहेत असे मी ऐकले आहे.

अनुक्रमणिका




आकृती नं. ५

# अनुक्रमणिका

## प्रकरण एकोणतिसावे

# जादूच्या साहाय्याने चोरांचा शोध

चोरलेल्या वस्तू परत करावयास भाग पाडण्यासाठी अनेक उत्तम मार्ग आहेत. ज्या माणसाच्या वस्तू चोरल्या गेल्या असतात तो मांत्रिकाला बोलावतो. त्याचा जर कोणावर संशय असेल तर तो काही शेजाऱ्यांना हजर राहण्यास सांगतो. मांत्रिक खोलीची जमीन पिवळ्या मातीने अगर लाल गेरूने सारवितो व जमिनीवर जादूची आकृती काढतो. या आकृतीवर जाते ठेवतात. जात्याला हिंग चोळतात. जात्याच्या मधल्या खुंटीला तागाचे कापड बांधतात. जात्याला फळाचा नैवेद्य दाखवतात. नंतर ऊद जाळतात. धातूच्या शिरस्त्राणात तेल टाकून दिवा लावतात व प्रत्येकाला जात्याला स्पर्श करण्यास सांगतात. अपराधी व्यक्तीचा हात जात्यात सापडेल असे सांगतात. घाबरलेली व्यक्ती जात्याला हातच लावीत नाही. मांत्रिक सर्वांच्या हाताचा वास घेतो. अर्थातच गुन्हेगार व्यक्तीच्या हाताला हिंगाचा वास येत नाही. या प्रकारे खरा गुन्हेगार हुडकला जातो. मांत्रिक त्याला वस्तू परत केल्यास नाव गुप्त ठेवण्याचे आश्वासन देतो. पुष्कळदा एकाऐवजी दोन धातूंची शिरस्त्राणे ठेवतात. एक पिठाची प्रतिमा करून तिच्या डोक्यावर दिवा ठेवतात. प्रतिमेत काड्या खुपसलेल्या असतात. मांत्रिक प्रत्येकाच्या हाती काडी देतो व चोराच्या हातातील काडी लांबीने वाढेल असे सांगतो. चोर वाढलेली लांबी दिसू नये म्हणून आपली काडी तोडून आखूड करतो व त्यामुळे पकडला जातो.

पुढीलप्रमाणे एक आकृती कागदावर काढतात. आकृतीवर प्रत्येकाचे नाव व बापाचे नाव लिहिलेले असते. मांत्रिक या कागदाच्या घड्या करतो, पिठाच्या गोळ्यात घालतो, पितळेच्या भांड्यात ताजे पाणी घेतो, त्यावर मंत्र टाकतो व सर्व गोळ्या पाण्यात टाकतो. चोरी करणाऱ्या माणसाची चिट्ठी पाण्यावर तरंगते. आकृती अशी असते :

| | | |
|---|---|---|
| अमुक अमुक | ४३ | ४३ |
| अमक्याचा मुलगा | ४३ | ४३ |

खालील प्रकारची आकृती एका अंड्यावर काढतात व ते अंडे कबरीत पुरतात. त्यामुळे चोराचे पोट फुगते आणि अंडे उकरून काढीपर्यंत चोराला पोटफुगीचा त्रास होतो. आकृती अशी आहे :




कुराणमधील खालील ओळी हिरव्या लिंबावर लिहितात. हे लिंबू जर जमिनीत पुरले अगर जाळले तर चोराचे नुकसान होते. ओळी अशा आहेत ‘परमेश्वराने माणसाला कोणत्या वस्तूपासून बनविले? ओलसर

अंकुरातून त्याने माणसाला निर्माण केले, घडवले, जन्माला घातले, मरण दिले, गर्भापासून मृत्यूपर्यंत त्याचा जीवनप्रवास सुखाचा केला. नंतर माणसाला मृत्यू आणि विश्रांती दिली. परमेश्वर पुन्हा प्राण देईल. पण अरेरे! माणसाने मात्र अजून परमेश्वराच्या आज्ञा पूर्ण केलेल्या नाहीत. हे माणसा! अन्नाचा तर विचार कर! त्या अल्लाने पाऊस पाडला, जमीन तापविली आणि धान्य वाढविले'. चोराने चोरलेल्या वस्तू परत केल्या तर त्याला याच वेगाने मंतरलेले पाणी पिण्यास देतात. म्हणजे त्याचा सगळा त्रास नाहीसा होईल. दुसरी पद्धत अशी आहे की, एका भांड्यावर संशयितांची नावे लिहितात. आणि कुराणचे ३६ वे प्रकरण वाचतात. विशेषतः या प्रकरणातील 'परंतु तो म्हणाला, परमेश्वराने माझ्यावर किती कृपा केली आणि मला महत्पदाला चढवले ते माझ्या लोकांना समजले असते तर किती बरे झाले असते'. या ओळीपर्यंत वाचन आले म्हणजे भांड्यावर लिहिलेली नावे वाचली जातात. गुन्हेगाराचे नाव आल्यास ते भांडे मागे हलू लागते.

अजून एक पद्धत अशी आहे—एका फुलपात्राच्या बुडाला काजळ लावतात. मुलांना गोळा करून त्यातील एकेकाला फुलपात्रावर हात ठेवण्यास सांगतात. फुलपात्र हलू लागले म्हणजे मांत्रिक म्हणतो, "फुलपात्राने चोराच्या दिशेने वळावे; जेथे संपत्ती लपवून ठेवली आहे तेथे फुलपात्राने जावे". जफर शरीफ म्हणतो, माझ्या बहिणीची नथ जेव्हा चोरली गेली तेव्हा याच पद्धतीने नथीचा शोध घेतला.

औरंगजेबाच्या काळात जादूगार पितळी पेल्यात मंत्र म्हणून थोडे तांदूळ व फुले टाकीत. नंतर त्याच धातूचा दुसरा पेला घेऊन त्यावर लहान काठीने ठोकीत. तेव्हा पहिला पेला आपोआप चोरल्या गेलेल्या वस्तूच्या दिशेने जाऊ लागतो. चोर घाबरतो आणि वस्तू टाकून पळून जातो.

अजून एक प्रकार असा आहे—कुराणचा ग्रंथ घेतात. त्यात एक किल्ली मूठ दिसेल अशा बेताने ठेवतात आणि ग्रंथाला दोरीने घट्ट बांधतात. दोन माणसे आपली तर्जनी आणि मूठ ग्रंथाच्या आधाराला देतात. प्रत्येक संशयितासाठी विशिष्ट ओळी म्हणतात. चोराचे नाव आल्यावर ग्रंथ स्वतःभोवती फिरतो आणि आधार देणाऱ्या माणसाच्या हातातून मूठ निसटून पडते. [बर्टन, सिंध, १८२. हा किल्ली आणि बायबलचा मंत्र ग्रेटब्रिटनमध्ये आचारात आहे. (ब्रँड ऑबझर्व्हेशन्स ऑन पॉप्युलर अँटिक्विटिज), ३·३५३ तळटीप.] अजून एक पद्धत अशी आहे की, मंत्र टाकलेले नवे तांदूळ संशयितांना देतात. खरा गुन्हेगार घाबरलेला असतो. त्याचे तोंड भीतीने कोरडे पडते. तो तांदूळ चावू किंवा गिळू शकत नाही आणि पकडला जातो.

अनुक्रमणिका

## प्रकरण तिसावे

# प्रवास : शुभाशुभ दिवस

प्रवासातील अडचणी व संकटे आणि खेड्यातील एकाकी जीवनामुळे हिंदूप्रमाणेच मुसलमान लोकही भोसळटपणे वागतात व कोणत्याही प्रवासाचे शुभाशुभ पाहतात. त्यांच्या मते हवेत अदृश्य भुते असतात. त्यांना रिजालुल गैब किंवा मर्दानुलगैब असे म्हणतात. ती पृथ्वीभोवती गोलाकार फिरतात. त्यांची ठिकाणे ठराविक दिवशी बदलतात. प्रत्येक चांद्रदिवसाच्या शेवटी शेवटचे साडेतीन तास त्यांचा विशेष प्रभाव असतो. म्हणून या काळात प्रवासाला निघणे अशुभ असते. प्रवासाला निघताना रिजालुल गैब समोरच्या दिशेला नसावे. ते मागे किंवा डाव्या बाजूला असावे, नाही तर प्रवास करणाऱ्यावर संकटे येतात. शुकर-इ-युल्दूज या नावाचा ग्रह तर इतका भयंकर आहे की तो समोर किंवा उजव्या बाजूला असला तर संकट हमखास असते. इ.स. १८०६ मध्ये इराणी राजदूत जेव्हा भारतात जाण्यासाठी निघाले तेव्हा फलज्योतिषांनी पुन्हा कित्येक महिन्यात येणार नाही असा ग्रहयोग पाहिला आणि राजदूतांना पाठविले. पण या योगावर घराच्या दरवाजातून अगर किल्ल्याच्या दरवाजातून निघायचे नसते. म्हणून समुद्रकिनाऱ्यापर्यंत जाण्यासाठी घराच्या भिंतीतून नवी वाट काढण्यात आली.

रिजालुल गैब महिन्यात कोणत्या दिवशी कुठे असतात याचे तक्ते तयार करण्यात आलेले आहेत. सामान्यत्वे असे मानतात की शनिवारी व सोमवारी पूर्व, शुक्रवारी व रविवारी पश्चिम, मंगळवारी व बुधवारी उत्तर आणि गुरुवारी दक्षिणेला असतात.

एखादा माणूस शनिवारी प्रवासाला निघाला तर त्याने मासे खाऊन निघावे. त्यामुळे इच्छा पूर्ण होतात. सोमवारी प्रवासाला निघायचे असेल तर आरसा पाहून निघावे त्यामुळे भरभराटी येईल. मंगळवारी धान्याचे बी खाऊन निघावे, सर्व इच्छा पूर्ण होतात. बुधवारी दही खाऊन निघावे म्हणजे प्रवास सुखरूप व लाभाचा होतो. गुरुवारी गूळ खाऊन निघावे, खूप लाभ होतो. शुक्रवारी स्वच्छ केलेले मांस खाऊन निघावे, प्रवासी मोती व मौल्यवान रत्ने घेऊन परत येईल.

प्रत्येक महिन्यात सात दिवस अशुभ असतात. त्या दिवशी चांगल्या कार्याचा आरंभ करू नये. ते दिवस म्हणजे ३, ५, १३, १६, २१, २४, आणि २५. काहीजण प्रत्येक महिन्यात दोन दिवस अशुभ मानतात. मोहरम ४ आणि १०, सफर १ आणि ८, रबिलावल १० आणि २०, रबी-उल-आखिर १ आणि ११, जमादौलअव्वल १० आणि ११, जमादौल-आखिर १ आणि ११, रजब ११ आणि १३, शबान ४ आणि ६, रमजान ३ आणि २०, जुल्कद ६ आणि २५, जूउलहिज्ज ६ आणि २५.

हादीसनुसार गुरुवार हा प्रवासाला निघण्यासाठी उत्तम दिवस आहे. सम्राट हुमायूनने याबाबत काळजीपूर्वक नियम केलेले होते. साहित्यिक आणि धार्मिक व्यक्तींची भेट घेण्यासाठी शनिवार आणि गुरुवार. कारण शनि हा धार्मिक व्यक्ती आणि कुलीन कुटुंबाचा संरक्षक आहे. आणि गुरुवार हा गुरुचा वार असल्यामुळे सय्यद, विद्वान आणि धर्मशास्त्र शिकविणारे यांचा संरक्षक आहे. रविवार आणि मंगळवार हे राज्याचे अधिकारी

आणि सरकारी कामकाजासाठी होते. कारण सूर्य हा राजकर्त्यांचा भाग्याचा स्वामी आहे आणि मंगळ हा वीरपुरुष व योद्धे यांचा आश्रयदाता आहे. सोमवार आणि बुधवार हे विलास आणि क्रीडा यासाठी होते. कारण या दिवशी चंद्राप्रमाणे सुंदर असलेल्या पुरुषांच्या सहवासात गाणे आणि संगीत, नृत्य, शिकार यांचा आस्वाद घेणे योग्य होते. शुक्रवारी ज्यूम या नावाप्रमाणे तो सर्वांना प्रार्थनेला बोलवीत असे आणि त्यांना जितका वेळ देता येईल तितका तो देत असे [इलियट—डाऊसन, ५·१२१.].

काही लोक करंगळीपासून तारखा मोजतात. करंगळी १, अनामिका २, मधले बोट ३, तर्जनी ४, अंगठा ५. यापैकी मधल्या बोटावर येणाऱ्या तारखा म्हणजे ३, ८, १३, १८, २३, २८ या अशुभ असतात.

आठवड्यातील दिवसांपैकी मंगळवार आणि शनिवार अशुभ असतात. याचा उल्लेख जन्म व मुलाची नावे ठेवणे या प्रकरणात आधीच आलेला आहे.

याबाबत असे दिसते की, अनेक नियम परस्पर विसंगत आहेत. उदाहरणार्थ, ईश्वराने मंगळवारी सर्व अप्रिय वस्तू बनविल्यामुळे तो दिवस फक्त फाशी देण्यासाठी वापरतात. या अशुभ दिवशी लग्ने होत नाहीत. शुक्रवार हा आदमला स्वर्गप्रवेश देणारा, सूर्याच्या निर्मितीचा आणि पुनरुज्जीवनाचा दिवस आहे. याच दिवशी पैगंबराने मदिनेत प्रवेश केला. हा सर्वांचा प्रार्थनेचा दिवस आहे. म्हणून हा सर्वांत शुभ दिवस मानावा. या दिवशी शेवटच्या तीन तासांत परमेश्वर सर्व प्रार्थना मान्य करतो म्हणून प्रवासाला निघण्यास हा दिवस चांगला आहे. शनिवारी पृथ्वीची निर्मिती झाली, रविवारी पर्वतांची, सोमवारी झाडांची, मंगळवारी अंधाराची, बुधवारी उजेडाची, गुरुवारी सर्व प्राण्यांची आणि शुक्रवारी पहिला माणूस आदम निर्मिला गेला. गुरुवार हा साधुसंतांचा दिवस, त्या दिवशी मध्यप्रदेशातील हिंदु कुणबी हजामत करीत नाहीत. नौरोज उत्सवात शिया प्रवासाला निघत नाहीत. लग्नानंतरच्या पहिल्या मोहरमची एक तारीख नवविवाहितांना अशुभ असते.

अनुक्रमणिका

## शुभ आणि अशुभ दिवस







अनुक्रमणिका

# शुभ आणि अशुभ दिवस







अनुक्रमणिका

# शुभ आणि अशुभ दिवस







अनुक्रमणिका


शुभ आणि अशुभ दिवस
नैऋत्य
उपजीविकेचे साधन
युध्द
पश्चिम
वायव्य
चांगली
दक्षिण
युध्द
गुरुवार
उत्तर
चांगली
आग्नेय
चांगली
पूर्व
अशुभ
ईशान्य
चांगली

अनुक्रमणिका

**प्रकरण एकतिसावे**

## सुफी पंथ व गुढवाद

सूफ या शब्दाचा मूळ अर्थ लोकर असा आहे. सुफी साधुसंत लोकरीचे कपडे वापरीत म्हणून या पंथाला हे नाव पडले आहे. सफा किंवा साफ म्हणजे शुद्ध, शुचिर्भुत यावरून सुफी हा शब्द आला असावा ही कल्पना आता बहुतेकांनी अमान्य केली आहे. सामान्यपणे संन्यास जीवनाचा स्वीकार करणारे स्त्रीपुरुष सुफी असतात. ही पद्धत इराणी मुसलमानांच्यामध्ये नवव्या शतकापासून अस्तित्वात आल्याचे मानतात. एकेश्वरीवाद आणि शिष्टाचारपालन याविषयी इस्लाममध्ये कठोर आग्रह आहे. त्याच्या विरुद्धची प्रतिक्रिया म्हणून सुफी पंथ अस्तित्वात आला.

या पंथात शिष्य करून घेण्यात एक विधी (बयात) आहे. ज्या कुणाला शिष्य व्हायचे असेल तो माणूस आपल्या परंपरेनुसार विशिष्ट गुरू (मूर्शाद) कडे जातो किंवा त्याला आपल्या घरी बोलावतो. वुजू केल्यांनतर पूर्वेकडे तोंड करून सायंकाळच्या जेवणापूर्वी शिष्यत्व ग्रहण केले जाते. गुरूचे तोंड पूर्वेकडे असले म्हणजे शिष्याचे तोंड पश्चिमेककडे म्हणजेच मक्केच्या दिशेला असते. उजव्या हाताच्या अंगठ्याला अंगठा टेकवून किंवा स्त्रीच्या बाबतीत तिने हातात धरलेल्या हातरुमालाचे दुसरे टोक धरून उपदेश देतात. पडदानशीन असलेल्या स्त्रिया पडद्याआडून उपदेश घेतात. कारण गुरू नात्यातील समजला जात नसतो. उपदेशप्रसंगी गुरूला खिलत म्हणजे पोशाख, पैसे गुरमुरे, मिठाई, चंदन, फुलझाडांच्या प्रतिकृती, पेटवलेल्या उदबत्त्या देतात. गुरू शिष्याला हजामत करण्यास सांगतो. स्नानविधी होतो. परंपरेच्या गुरूंची नावे सांगतो. शिष्यत्वाचा पोशाख देतो. नवे नाव ठेवतो. अभिवादनाची पद्धती सांगतो आणि शिष्याकडून शपथ घेववितो. खोटे बोलणार नाही, चोरी करणार नाही. भिकारी म्हणून राहीन, धर्मसंमत वस्तूचेच सेवन करीन अशी शपथ असते. त्यानंतर उपस्थितांना जेवण देतात. गुरू शिष्याकडून परमेश्वराकडे क्षमायाचनेची प्रार्थना करवून घेतो. हिला इश्तिगफार असे म्हणतात. नंतर कलमा म्हणतात. मग शिष्य. जाणता अजाणता घडलेल्या पापांची क्षमा मागतो. गुरूचा गुरू म्हणून स्वीकार करतो. आणि गुरूच्या हातावर हात देऊन शपथ घेतो. मग गुरू सरबताच्या पेल्यावर फुंकर टाकतो, दोन घोट घेतो. उरलेले सरबत शिष्य घेतो. नंतर आभाराच्या प्रार्थना म्हणतात. अशा रीतीने शिष्यत्व स्वीकारल्यानंतर शिष्य उपस्थितांना अभिवादन करतो काही मूर्ख लोक गुरूपरंपरेच्या नावांना कुराणापेक्षाही पवित्र मानतात आणि त्यांचे ताईत करून गळ्यात घालतात. मरण पावल्यावर हा ताईत प्रेतासह कबरीत ठेवतात. गुरू शिष्याच्या कानात ईश्वराची रहस्ये सांगतो. जन्मदाता पिता, अध्यापक, सासरा आणि आध्यात्मिक गुरू हे चार पवित्र पिते मानले जातात.

जेव्हा एखादा मुर्शाद एखाद्याला फकीर करू इच्छितो त्यावेळी विविध परंपरेच्या चाळीसपन्नास फकिरांना आमंत्रण देऊन बोलवतात. या आमंत्रणाला इज्नी म्हणतात नंतर सर्वांना जेवण देतात. फकिरांना चंदन, फुले, गांजा व तंबाखू देण्यात येतो. उमेदवार दाढी, मिशा, भुवया व डोक्यावरील केस अशी चेहऱ्याची चार भूषणे काढून टाकतो. पुष्कळदा संपूर्ण हजामतीच्या ऐवजी कात्रीने चारही ठिकाणीचे काही केस काढतात व नखे काढतात. हा विधी होताना कुराणच्या प्रार्थना म्हणतात. पण धर्मवाक्ये, कबुलीची दोन वाक्ये, परमेश्वराचे एकत्व, नास्तिक्याचा धिक्कार, प्रभूला क्षमाप्रार्थना, फकिरांच्यामधील आचार धर्म, आवश्यक ताकीद

असा उपदेश होतो. मग गुरू शिष्याच्या डोक्यावर ताज ठेवतो. एक पटका बांधतो. शिष्याला कफनीवजा पोशाख घालतात. अल्फा म्हणजे बिनबाह्यांचा सदरा, तसबीह म्हणजे जपमाळ, कातडी पट्टा म्हणजे तस्मा, लुंगी व कंबरपट्टा देतात, पायाला शिंपल्याची माळ बांधतात. समुद्रनारळाची नरोटी देतात. प्रत्येक वेळी कुराणच्या प्रार्थना चालूच असतात. नावे देताना बिस्मिल्लाशाह, अमरुल्लाशाह, गुल्जारशाह अशी नावे देतात. फकिरांच्या नावात शेवटी 'शाह' असतो. यानंतर सामान्य माणसाप्रमाणे सलाम अलेकुम म्हणण्याऐवजी ईशक अल्लाह व मुर्शाद अल्लाह, ईशक अल्लाजाम फुकरा अल्लाह असे म्हणतो, परमेश्वराने निवडलेल्या आध्यात्मिक गुरूला नमस्कार असो, परमेश्वराच्या सर्व आवडत्या फकिरांना नमस्कार असो असा याचा अर्थ आहे. फकिरांच्यामध्ये असणारे हे विधी शरियत किंवा हादीसप्रमाणे नाहीत. ते रूढीप्रमाणे हिंदुस्थानात निर्माण झालेले आहेत. अन्न वाटताना स्थायी सदस्यांना दुप्पट भाग मिळतो. त्यांना 'मकंदर' म्हणतात. भटक्या सदस्यांना निम्मा भाग मिळतो.

फकिरांनी नमाजची प्रार्थना ठराविक वेळी केली नाही तरी झोपताना ईश्वराला प्रणिपात केलाच पाहिजे. 'अल्ला हे बडा, बाबू खुश रहो' (परमेश्वर श्रेष्ठ आहे, साहेब आनंदी रहा), 'समा अली व नबी का रहे' (अली व प्रेषित यांची तुमच्यावर सावली असो), असे फकीर नेहमी म्हणतात. लोक अभिवादन करताना फकिरांना 'बंदगी है शाह, साहब' (महाराज मी तुम्हांला नमस्कार करतो, मी तुमचा सेवक आहे) असे म्हणतात. मुसलमान संतांची व फकिरांची एक संघटना असते. हिच्या प्रमुखाला गौस म्हणतात. यानंतर चार अवताद म्हणजे खुंट्या असतात. नंतर सात अखयार म्हणजे श्रेष्ठगुणसंपन्न असतात. चाळीस अब्दाल म्हणजे प्रभूचे सेवक असतात. सत्तर नुजबा म्हणजे उत्तम पुरुष असतात व तीनशे नुकबा म्हणजे पुढारी असतात. या सहा पायऱ्यांवर प्रत्येकाचे महत्त्वही अवलंबून आहे.

सर्व फकिरांचे मूळ गुरू चार. त्यांची चौदा घराणी आहेत. ती पुढीलप्रमाणे—प्रेषित महंमदाचा जावई अली याला हजरत मूर्तजाअली म्हणतात. हा पहिला पीर आहे. त्याने आपला खलिफा किंवा प्रतिनिधी म्हणून ख्वाजा हसन बसरी यांची नेमणूक केली. (मृत्यू ११ ऑक्टोबर ७२८), त्यांचे प्रतिनिधी ख्वाजा हबीब आजमी (मृत्यू २८ ऑगस्ट ७३८) आणि त्यांचे प्रतिनिधी आब्दूल बाहीद बिन जैद कूफी हे चार पीर मानले जातात. सर्व फकिरांना हे चार मान्य आहेत. तिसऱ्या पीरपासून नऊ घराणी अस्तित्वात आली : (१) ख्वाजा हबीब आजमीपासून हबिबीयां, (२) बायजीद बस्तामी तैफूर यांच्यापासून तैफुरियां, (३) शेख मरुफ कर्खीपासून कर्खियां (४) जुनेद बगदादीपासून जुनैदियां, (५) शिरी सख्तीपासून सख्तीयां, (६) अब्दुला हकिकी ऊर्फ हनीफ गाजरुनी यांच्यापासून गाजरुनियां, (७) अब्दुला फरा तुरतुसीपासून तारतुसियां, (८) शेख जियाऊद्दीन अबू नजीब सुऱ्हावर्दीपासून सुऱ्हावर्दीयां, (९) नजिमुद्दीन कुबडा फिरदोसीपासून फिर्दोसियां. चौथ्या पीरपासून पाच गट अस्तित्वात आले: (१) अब्दुल बाहीद बिन जैदपासून जैदियां, (२) फुजेल बिन आयाजपासून आयाजियां, (३) इब्राहीम अजाम बल्कीपासून आजामियां, (४) अमिनुद्दीन हुबैरतुल बस्रीपासून हुबैरियां, (५) शेख अब्दुल इशाक चिस्तीपासून चिस्तियां, असे हे चौदा प्रमुख गट आहेत.

भारतातील प्रमुख परंपरा अशा आहेत. सय्यद अब्दुल कादर अल जिलानी पीर दस्तगीर यांनी इ.स. ११६५ मध्ये कादरिया परंपरा आरंभ केली. या परंपरेचे फकीर कधी मौनी असतात, कधी बोलतात. त्यांनी

संगीताचा त्याग केलेला आहे. ते हिरवे पटके बांधतात. पोशाखात एक वस्त्र भगवे असते. सर रिचर्ड बर्टन हा या पंथाचा दीक्षित होता. मूळ सत्पुरुषाची कबर बगदादला आहे.

प्रेषिताचा जावई अली यांच्यापासून नववा इमाम अबू इशाक होता. तो खुर्सानमधील चिस्ती येथे स्थायिक झाला होता. त्याचा एक शिष्य ख्वाजा मोइनुद्दीन हा अजमेर येथे स्थायिक झाला होता. (इ.स. ११४२-१२३६) यांच्यापासून चिस्ती परंपरा सुरू होते. कुतुबुद्दीन बख्तीयार काकी, ज्याची कबर जुन्या दिल्लीत कुतुबमिनारजवळ आहे ते चिस्तीचे प्रमुख वारस. त्यांच्यानंतर पाकपट्टणचे बाबा फरिदोद्दीन शकरगंज हे वारस झाले. चिस्तींच्या अजमेरच्या दर्ग्याला सम्राट अकबर नेहमी जात असे. या परंपरेचे सदस्य संगीतोपासक आहेत. कारण त्यांच्या पिराने समाधी अवस्थेत संगीत हे आत्म्याचे अन्न व आधार आहे असे म्हटले होते. धर्मनिष्ठा व्यक्त करताना इल्ललाह हा शब्द ते जोराने म्हणतात. या पंथात मोठ्या आवाजात धार्मिक गाणी म्हणतात. मुख्यतः गेरुने रंगविलेली वस्त्रे वापरतात. दिल्ली येथील निजामुद्दीन अवलिया, अंबाला येथील मिराँभिक, पाकपट्टण येथील बाबा फरीद, डेरागाझिखान जिल्ह्यातील तौन्सा येथील हजरत सुलेमान यांच्या कबरी आणि अजमेरचा दर्गा ही यांची प्रमुख धार्मिक ठिकाणे आहेत. मोहरममधील कपडे ते आपल्या गळ्यात बांधतात. डोके अर्धे तासतात, अर्ध्या डोक्यावरील केस लांब वाढू देतात. सतत अलीचे नाव घेतात. अलीला प्रेषित आणि परमेश्वर यांच्या समतुल्य मानतात.

शहाबुद्दीन सुऱ्हावर्दी यांचे शिष्य अब्दुल्ला शत्तारी हे इराणमधून भारतात आले आणि इ.स. १४०६ मध्ये माळव्याला मरण पावले. त्यांच्यापासून शत्तारिया (किंवा छत्तारी) ही परंपरा निर्माण झाली. त्यांचा पोशाख कादरियांच्या सारखा असतो. चिस्ती, कादरिया आणि शत्तारिया यांना 'बेनवा' म्हणजे अकिंचन म्हटले जाते. यांच्यातील जे पूर्ण केस कापून घेतात त्यांना मूलहीदनुमा म्हणजे धर्मशास्त्र न मानणारे असे म्हणतात व त्यांना धर्म बहिष्कृत मानतात. काही फकीर फक्त उजव्या कानशिलावरील केस कापतात. त्यांना 'रसूलनुमा' म्हणजे प्रेषितासारखे दिसणारे म्हणतात.

मदारिया किंवा तबकातीया हे हजरत जिंदा शाह मदार यांचे अनुयायी असतात. ते सामान्यत्वे काळ्या रंगाचे कपडे वापरतात. पायाच्या घोट्यावर साखळी बांधतात. भिक्षा मागताना दमदाटी करतात. भिक्षा मिळेपर्यंत अभद्र शिवीगाळ करतात. काहीजण वाघ, अस्वल आणि माकडे पाळतात व शेवटच्या दोघांचे नाच करून दाखवतात. काहीजण आपल्या डोक्यावर बिनबुडाचे मडके ठेवतात. त्यात विस्तव घालतात. मडक्यावर तवा ठेवून भाकर भाजतात. फकिरांची ही प्रभावळ वाईट मानली जाते.

'मलंग' म्हणजे धडधाकट. हे जमनजती या जिंदाशाह मदारच्या शिष्याचे अनुयायी आहेत. पण ही संज्ञा सर्वसाधारण नेहमीच्या कोणत्याही परंपरेत नसलेल्या फकिराला लावण्यात येते. हे लोक भांग व गांजाचे अतिसेवन करतात. केस लांब वाढवतात. लंगोटीशिवाय कपडा वापरीत नाहीत व कधीकधी त्यांची नग्नता या लंगोटीमुळे फारशी झाकली जात नाही. हे धुनी पेटवतात, जंगलातून भटकतात, अंगाला राख लावतात, त्यांच्यात व गोसावी पंथांतल्या हिंदू संन्याशात बरेच साम्य आहे.

अनुक्रमणिका

इ. स. १९८० मध्ये अहमद-उर-रफाई याने रफाई किंवा रिफाई ही प्रभावळ बगदाद येथे स्थापन केली. तुर्कस्तानातील आणि इजिप्तमधील ओरडणाऱ्या दरवेशांशी यांचे पुष्कळ साम्य आहे. यांचे दुसरे नाव गुर्झमार आहे. ते स्वतःला आसुडांनी मारून घेतात. डोळे, छाती, डोके यात आसुडाच्या टोकात असलेला खिळा खुपसून घेतात. त्यांच्याविषयी अनेक चमत्कार सांगितले जातात. असे म्हणतात की, ते आपले डोके कापून लाळेने पुन्हा आपल्या मानेवर जोडू शकतात. सर्व जखमांना औषध म्हणून ते लाळ लावतात. कारण त्यांच्या गुरूने या औषधाने सर्व जखमा भरून येण्याचे आश्वासन दिले आहे. ते स्वतःच्या जिभेला तापलेल्या लोखंडाचे चटके देतात, जिवंत विंचू तोंडात ठेवतात, काचा खातात, विष खातात. यातील काही बाबी लबाडीच्या असल्या तरी ते निश्चितपणे स्वतःला शासन करवून घेतात. गुजरातमधील मस्तान (वेडे फकीर) हे रसूलशाही फकीर हेही असेच चमत्कार दाखवतात. उत्तर भारतातील छलबदार (म्हणजे झांजविणारे फकीर) जळत्या निखाऱ्यावरून चालतात.

बहावलपूर राज्यात ऊछ येथे सय्यद जलाल बुखारींनी (इ.स. १३०७-१३७४) जलालीया नावाची परंपरा सुरू केली. हे लुंगी किंवा लंगोटी घालतात. हातात काठी बाळगतात. गळ्यात विविधरंगी दोऱ्यांचा अगर लोकरीचा हार घालतात. दंडावर, शिक्षा घेताना पेटलेली वात पोळवून चटका देतात त्याचा व्रण असतो. भिक्षा न मिळाल्यास स्वतःला चटके देतात. गांजा ओढतात. सर्प, विंचू खातात. डोक्यावर उजव्या बाजूला थोडेसे केस सोडतात. बाकीच्या डोक्याचे केस, भुवया, दाढीमिशा काढून टाकतात. यांच्यातील एक पोटभाग चिहलतां म्हणून ओळखला जातो. एका दुर्दैवी स्त्रीने वशीकरणाच्या पेयाचे चाळीस पेले प्राशन केले त्यामुळे तिला चाळीस मुले झाली. त्यांचे हे वारस मानले जातात. यांचे मुख्य केंद्र पंजाबात आहे.

संत मूसा सोहागी हे पंधराव्या शतकाच्या शेवटी होऊन गेले. त्यांनी एकदा प्रार्थनेने पाऊस पाडून दुष्काळ टाळला. त्यांचे अनुयायी फकीर स्वतःला मुसा सोहागी म्हणवतात. अहमदाबादजवळ त्यांचे मुख्य केंद्र आहे. त्यांचे अनुयायी स्त्रीवेषधारी आहेत. ते तंबोरा, सारंगी वाजवीत भिक्षा मागतात. त्यांच्या गाण्यामुळे पाऊस पडतो आणि पर्वतही वितळतात अशी समजूत आहे.

ख्वाजा पीर महंमद नक्षबंद यांची कबर बुखारा येथे आहे. त्यांच्या अनुयायांना नक्षबंदी म्हणतात. मूळ पुरुषाचे वडील जरीचे भरत काम करीत त्यावरून हे नाव पडलेले आहे. अबू-बकरचा एक वंशज शेख अहमद सिरबांदी यांच्यामुळे भारतात ही परंपरा आली. मौन धारण करून ते ध्यानस्थ बसतात, प्रभुचिंतन करतात. परंपरागत इस्लाम धर्माचे काटेकोरपणे पालन करतात. गाणे आणि संगीत वर्ज्य मानतात. पेटलेला दिवा हाती घेऊन परमेश्वर व प्रेषित यांच्या सन्मानार्थ गाणी म्हणत फिरतात. सिंधमध्ये नवा भक्त स्नान व प्रार्थनेनंतर आनंददायक ईश्वर स्तोत्रे (जिकर) हजार वेळा म्हणतो. त्याचप्रमाणे तो 'इल-अल्लाह अल्लाहू' एकूण मिळून चार हजार वेळा म्हणतो, यात प्रत्येक शंभरानंतर 'महंमदन रसुल्लाह' म्हणतो. जेव्हा त्याच्या मनात क्षुद्र विचार येतात त्या वेळेला 'या फाईल' म्हणजे ईश्वर सत्यप्रतिनिधी आहे असे म्हणतो. यानंतर त्याला ध्यान (तस्सबूर) शिकवतात. दुसऱ्या टप्प्यात 'या अल्लाह' आणि 'याहू' हे शब्द चाळीस दिवस शिकवतात. तिसऱ्या टप्प्यात तो आपल्या गुरूचे चिंतन करतो, नाकाने श्वास घेताना 'अल्ला' आणि श्वास सोडताना 'हू' असे म्हणतो. या तीन टप्प्यांवर सिद्ध होत जाणारा जो उपासनाविधी त्याला शगल असे म्हणतात.

बाबा प्यारेचे फकीर लंगोटी आणि भगवी कफनी घालतात. कफनीवर पांढरे त्रिकोण चौकोन शिवलेले असतात. डोक्यावर टोपी, तीवर फेटा असतो. दोन हातात दोन काठ्या असतात. ‘अल्लाहू गनी’ म्हणजे स्वावलंबी फकीर असे पुकारून भिक्षा मागतात. दोघे तिघे असा गट करून फिरतात.

बहुतेक फकिरांच्याजवळ कपटी काठी, लोखंडी सूळ किंवा लाकडी हाताप्रमाणे असणारा पुश्तकार असतो. कोकराच्या कातड्याची पिशवी असते. झोळी व पंखा असतो. हिरवे पान म्हणजे गांजा हा फकिरांचा आनंद आहे असे ते मानतात.

फकिरांची दोन गटात विभागणी करता येते. ‘बशेर’ म्हणजे धर्मशास्त्राच्या मर्यादा पाळणारे. दुसरे ‘बेशर’ म्हणजे या मर्यादा न पाळणारे. बहुतेक फकीर दुसऱ्या गटात मोडतात. त्यांना अफू, गांजा, दारू यांचे व्यसन असते. ईशप्रार्थना, वासनाविकारावर ताबा या बाबतीत ते फारसे आग्रही नसतात. पण धर्मशास्त्र पाळणारे फकीर इस्लामचे सर्व नियम पाळतात. त्यांच्यात ‘सालीक’ म्हणजे मोक्ष मार्गाचे यात्रेकरू असतात. ते सांसारिक असतात. शेती, व्यापार करून किंवा भिक्षा मागून जगतात. मज्जूब हे विरक्त असतात. ते भिक्षेवरच जगतात. ईश्वराच्या गूढ प्रेमामुळे ते आशा व भीती यांच्यापलीकडे गेलेले असतात. खरा फकीर तुरळक असतो. तो धार्मिक असतो. बहुतेक सगळे धंदेवाईक, व्यभिचारी व ढोंगी असतात. कारण ढोंग सोपे असते. हे कुराणवर विश्वास ठेवीत नाहीत. काहीजण स्वतःला ईश्वराचे वेडे मानतात. वहादियतुल वुजूद म्हणजे सर्व अस्तित्व एक आहे अशी भूमिका घेतात. दक्षिणेतील भिकारी भिक्षा मिळाल्यास जेवतात. केरकचरा न पाहता कुठेही झोपतात. त्यांना घरदार नसते. बाजार हेच त्यांचे घर असते. पण ते चमत्कार करू शकतात असा त्यांच्याविषयी लोकांचा विश्वास असतो. तापलेल्या तव्यावर उभे राहणे, उकळत्या कढईत बसणे, निखाऱ्यावरून चालणे, दोन तीन तास पाण्याखाली राहणे इत्यादी बाबी या फकिरांच्यापैकी पुष्कळजण नेहमी करून दाखवतात.

फकिरांचा एक वर्ग ‘आजाद’ या नावाने ओळखला जातो. ते ब्रह्मचारी असतात. भिक्षा मागून जगतात. शरीरावरील सर्व केस काढून टाकतात. ‘अरेबियन नाईटस्’ मध्ये ज्यांना कलंदर म्हणून म्हटलेले आहे ती काही संतपरंपरा नाही. तो भिक्षा मागणाऱ्या फकिरांचा सामान्य गट आहे. काहीजण धर्मशास्त्राप्रमाणे वागतात, काही वागत नाहीत. काहींना बायका असतात. काहींना नसतात. फकिरांच्या आश्रयस्थानाला किंवा धर्मशाळेला ‘तकीया’ म्हणतात. कलंदर फकिरांची एक गुपित भाषा असते आणि ते आपले तंटे व्यवस्थितपणे आणि प्रतिष्ठेने सोडवितात. कलंदराचे पवित्र ठिकाण पानिपत येथील बू अली कलंदर हे आहे.

रसूलशाही फकीर चेहऱ्यावरील केस काढून टाकतात. ते टोपी, लंगोटी व एक चादर वापरतात, मध पितात, ब्रह्मचारी असतात आणि भिक्षेवर जगतात. इमामशाही फकीर चेहऱ्यावरील केस काढतात. कफनी घालतात, ब्रह्मचारी असतात. नाकाच्या टोकापासून कपाळापर्यंत भस्माची अरुंद रेषा असते. त्यांचा आशीर्वाद मिळविणे व शाप टाळणे चांगले समजतात.

निकलसेनी पंथ पंजाबातील आहे. इ.स. १८५७ च्या धामधुमीत दिल्लीला मारला गेलेला जॉन निकलसेन याची हे फकीर उपासना करतात. आपली उपासना करतात याबद्दलची चीड म्हणून निकलसेनने यांना चाबकाने फोडून काढले होते असा उल्लेख आहे. अलीकडच्या खानेसुमारीत ते आढळत नाहीत.

अनुक्रमणिका

आध्यात्मिक गुरूला मशाइक, पीर, मुर्शीद असे म्हणतात. त्यांच्यातील काही परंपरागत गुरू असतात. ज्यांच्या घराण्यात शिष्यांना दीक्षा (बयात) देण्याचे अधिकार आजोबांकडून आलेले असतात त्यांना ‘जद्दी’ म्हणतात. ज्यांच्या आईवडिलांचा व्यवसाय त्यांच्यापेक्षा भिन्न होता किंवा ज्यांनी गुरूकडून गुरुपद मिळविले त्यांना वारस ‘खलफाई’ म्हणतात. काहीजणांच्या मनगटाला ‘सुमरन’ नावाने ओळखला जाणारा दोरा असतो, ते आपल्या हातात छडी किंवा फकीर वापरीत असलेले हत्यार बाळगतात. त्यांना ‘बेशर’ म्हणतात. काहीजणांना श्रीमंत लोक, राजे, सरदार यांच्याकडून उत्पन्न मिळते. काहीजण भविष्य सांगून, मंत्र ताईत करून, औषधी व्यवसाय करून उपजीविका करतात. शिष्याकडून मिळणारी दक्षिणा हा उत्पन्नाचा एक भाग असतो. शिष्य करण्याप्रमाणेच खलिफा करण्याचाही विधी आहे. गुरू आपल्या एखाद्या शिष्याला ‘खलिफा’ प्रतिनिधी करतो. हा शिष्य जर श्रीमंत असेल तर मेजवानी मिळते.

वली किंवा संत यांची प्रतिष्ठा फक्त प्रेषितापेक्षा कमी असते, कारण ती न्यायदानाच्या दिवसापर्यंत टिकते. नवा प्रेषित येणे थांबले असले तरी वलींचे कार्य चालूच आहे. वलींना आपले गूढ अनुभव इतरांना सांगण्याची मनाई आहे हे अनुभव फक्त अधिकारी शिष्यालाच सांगितले जातात. ज्याला दीक्षा (शगल), ध्यान (जिकर), ज्ञानप्राप्ती ‘कस्ब’ यांना अभ्यास करावयाचा असेल त्याने शिस्त ‘रिसायत’, अभ्यास ‘औराद’, ज्ञानप्राप्ती ‘दीद’ आणि ध्यान ‘जिकर’ यांचे ज्ञान मिळविण्यास मुर्शीदकडे गेले पाहिजे. गुरूला विशेषतः दोन पथ्ये पाळली पाहिजेत. एक म्हणजे धर्मशास्त्रसंमत वस्तूंचे सेवन आणि दुसरे म्हणजे सत्यभाषण. याशिवाय चौकशीविना सूड घेणे, लोभ, गोड किंवा खमंग पदार्थ खाण्याची उत्कट इच्छा, खमंग पदार्थ खाण्याची अभिलाषा बाळगणे, कामक्षुधा यांचाही त्याग करावा लागतो.

या ध्यानाचे (जिकर) फायदे मिळविण्यासाठी चांगलेच वागावे, मत्सर व लोभ सोडून द्यावा, जग व नातलग यांची आसक्ती सोडावी, नास्तिकपणा सोडावा, परमेश्वरावर श्रद्धा ठेवावी, कुणाचे वाईट चिंतू नये, ईश्वराचा ध्यास करावा म्हणजे परमेश्वर सामान्य माणसाला वलीच्या पदवीला नेतो. या सगळ्याच बाबी सांगण्यास सोप्या पण जबाबदारीने पार पाडण्यास अतिशय कठीण आहेत.

अनुक्रमणिका

## प्रकरण बत्तिसावे

# पोषाख व शरीराची निगा

मुसलमानांनी रेशीम, सॅटिन व रेशीममिश्रित सुती कपडे वापरणे आणि खोगीरावर टाकावयाच्या लाल रंगाच्या कपड्यावर बसणे या बाबींना प्रेषितांनी मनाई केली होती. परंतु सध्या रेशीममिश्रित सुती कपड्याच्या वापराला मुभा आहे. हयातभर रेशमी कापड वापरले नसले तरी मुसलमानाच्या कफनासाठी ते वापरल्यास हरकत नाही.

देशभरच्या मुसलमानांत, त्यातही हिंदुधर्मांतरितांमध्ये पोशाखाच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. गुजरातमधील खालील वृत्तान्त उदाहरण म्हणून घेता येण्यासारखा आहे. तेथे श्रीमंत मुसलमान घरातल्या घरात मखमलीची अगर कशिदा काढलेल्या कापडाची टोपी घालतो. तसेच तो चांगल्या मलमलची पैरण व सुती किंवा रेशीममिश्रित सुती कापडाची विजार घालतो. हिवाळ्यात तो मखमलचे किंवा जाड्या भरड्या कापडाचे जाकीट (कबजा) घालतो. घरात वावरताना तो अनवाणीच वावरतो. पण विशेष सुखवस्तू लोक हिवाळ्यात पायमोजे घालतात. तेथे श्रीमंत मुसलमान घराबाहेर पडताना शेरवानी घालून व पटका बांधून जातो. त्याच्यावर उत्तर हिंदुस्तानी पोशाखाची छाप असल्यास तो कधीकधी दिल्लीहून येणारे लाल किंवा हिरव्या रंगाचे हलके कातडी जोडे वापरतो. समारंभप्रसंगी वापरण्यात येणारा पोशाख असाच पण उंची असतो. दिल्ली, लखनौ, हैद्राबाद यांसारख्या शहरातून सुरू होणाऱ्या आधुनिक पोशाखांच्या तऱ्हांमुळेही इतर ठिकाणच्या मुसलमानांच्या पोशाखांच्या तऱ्हाही बदलत असलेल्या आढळून येतात. शिवाय तरुणांमध्ये जुन्या पीढीतील लोकांच्या पोशाखांचा त्याग करण्याची आणि पाश्चात्त्य पोशाखाच्या स्वीकाराची प्रवृत्ती वाढीला लागल्याचे दिसत आहे.

मध्यमवर्गीय मुसलमानाचा पोशाख वरीलप्रमाणेच पण थोडा स्वस्त प्रतीचा असतो. मात्र समारंभ प्रसंगी वापरण्यासाठी एखादा उंची पोशाख त्याने शिवून घेतलेला असतो. उत्तर हिंदुस्थानमध्ये मुस्लीम शेतकरी आणि हिंदु शेतकरी यांच्या पोशाखात बरेच साम्य असते. फक्त एकच फरक असतो आणि तो म्हणजे हिंदूचे जाकीट (बारबंदी) उजव्या बाजूला तर मुसलमानाचे डाव्या बाजूला घट्ट बांधलेले असते. मध्य आशियातील मुस्लीम व बौद्ध यांच्यातील पोशाखाचा फरकही असाच आहे. पंजाबी व अफगाण मुसलमानांचे चोळणे नजरेत भरतील इतके मोठे असतात. त्यांच्या प्रमुखाने घातलेला एक चोळणा तर सहा वार रुंद होता.

श्रीमंत मुस्लीम स्त्रीचा पोशाख चोळी, झगा (पेशवाज), विजार व ओढणी असा असतो. उत्तर हिंदुस्तानमधील गरीब मुस्लीम स्त्रिया ज्या अरुंद व रंगीत कापडाच्या विजारी घालतात तो पोशाख कदाचित देशातील सर्वात अयोग्य असा आहे. श्रीमंत घराण्यातील कुमारिका आणि विवाहित स्त्रिया लाल किंवा फिक्कट रंगाचा घागरा घालतात. वृद्ध स्त्रिया पांढऱ्या किंवा गडद निळ्या रंगाचा घागरा घालतात आणि विधवा स्त्रियांचा काळ्या रंगाचा असतो. मुस्लीम स्त्रिया वापरीत असलेल्या विजारी सामान्यत्वे रंगीत व पुरुषांच्या मानाने अधिक अरुंद असतात. श्रीमंत स्त्रिया सहसा घराबाहेर पडत नाहीत. त्या पायात मात्र चपला घालतात. मुस्लीम स्त्रियांचा समारंभ प्रसंगीचा पोशाख नेहमीसारखाच पण अधिक उंची असतो. गुजरातमध्ये आधुनिक

अनुक्रमणिका

विचारसरणीचा प्रभाव पडलेला मुस्लिमांचा अपवाद सोडल्यास सामान्यत्वे युरोपियन पोशाखाच्या तऱ्हांचा फारसा प्रभाव पडलेला दिसत नाही. परंतु त्यांच्या पोशाखावर अर्धा तुर्की, अर्धा युरोपियन कमीज आणि अरबी व इराणी पोशाख यांचा थोडा प्रभाव दिसतो. तसेच इंग्रज लोकांसारखे बूट व पायमोजे यांचा वापर वाढतो आहे. परंतु सबंध हिंदुस्तानभर वेगवेगळ्या भागांत राहणाऱ्या मुस्लीम स्त्रीपुरुषांच्या पोशाखात इतके वैविध्य आहे की, स्थलाभावी त्याचे वर्णन करणे कठीण आहे.

मुसलमान लोक नवीन कपडे वापरणे ही अतिशय गंभीर बाब मानतात. त्याबाबत त्यांच्या पुढीलप्रमाणे समजुती आहेत. पुरुषाने खालील दिवशी नवीन कपडे शिवण्यास माप दिसल्यास त्याचे संभाव्य परिणाम पुढीलप्रमाणे होतात असे मानतातः रविवार-त्याला त्रास भोगावा लागतो, सोमवार-भरपूर अन्न मिळते, मंगळवार-कपडे जळून जातात, बुधवार-आनंद व शांती लाभते, गुरुवार-त्या कपड्याचा वापर शुभदायी असतो, शुक्रवार-त्या दिवशी शिवायला टाकलेले कपडे वापरणे चांगले असते, शनिवार-त्याच्यावर आपत्ती येतात. कपडे शिवायला टाकण्याच्या बाबतीत जशा समजुती आहेत तशा नवे कपडे वापरण्याच्या बाबतीतही आहेत. त्या पुढीलप्रमाणे : रविवार-आनंद व सौख्य लाभते; सोमवार-कपडे लवकर फाटतात; मंगळवार-तो पाण्यात उभा राहिला तरी त्याचे कपडे जळतात; बुधवार-नवा पोशाख सुलभपणे प्राप्त होतो; गुरुवार-पोशाख शोभून दिसतो; शुक्रवार-पोशाख नवा असेपर्यंत सौख्य मिळते; शनिवार-तो आजारी पडतो, त्याने नवे कपडे सकाळी घातल्यास तो सुदैवी ठरतो, दुपारी घातल्यास सुंदर दिसतो, सूर्यास्ताच्या वेळी घातल्यास दुर्दैवी व रात्री घातल्यास आजारी पडतो अशाही समजुती आहेत. स्वतः अकबरने फरवर्दीन महिन्यात शिवण्यात आलेल्या कपड्यांना, इतर वेळी शिवण्यात आलेल्या कपड्यांपेक्षा शाही पोशाख संग्रहात वरचा क्रम द्यावा अशी आज्ञा दिली होती. पायात जोडा घालताना प्रथम उजव्या पायात घालावा, तसेच काढताना प्रथम उजव्या पायातील काढावा अशीही समजूत आहे.

मुसलमानांनी चोळणा घालताना तो पायाच्या घोट्याच्या खाली न जाईल याची दक्षता घ्यावी. तसेच अंगरख्याची (जामा) लांबी चोळण्याच्या तळाच्या थोडीशी वर इतपत ठेवावी. त्यांनी पटका घट्ट बांधावा व त्याची टोके मागे लोंबकळती सोडावी. लाल रंग हा, कदाचित त्याचा बलिदानाशी संबंध असल्यामुळे, काफिराचा मानतात व तो मुस्लीम पुरुषांनी वापरू नये असे म्हणतात. अर्थात मुस्लीम स्त्रियांना मात्र लाल रंगाचे कपडे वापरण्यास मुभा आहे. मोगल सम्राटांचा जेथे तळ पडत असे तेथे त्यांच्या तंबूचे पडदे शेंदरी रंगाचे असत. दक्षिणेतील मुसलमान राजांच्या डोक्यावर धरण्यात येणारी छत्री शेंदरी रंगाची असे. राजाने लाल रंगाचा पोशाख वापरणे म्हणजे क्रोधाचे चिन्ह आहे असे मानीत असत. गुजरातचा बहादूरशहा एकदा रागात असताना एका भाटाने गायिलेल्या गाण्यामुळे त्याचा क्रोध कमी झाला व त्याने आपला लाल रंगाचा पोशाख उतरून ठेवून हिरव्या रंगाचा पोशाख घातला. उमय्याचे घराणे हिरव्या रंगाचा पोशाख वापरीत असे व त्याच्या विरुद्ध असलेले अब्बासी घराणे काळ्या रंगाचा पोशाख घालीत असे. सय्यद मुसलमान हिरव्या रंगाचा पोशाख वापरतात म्हणून त्यांना ‘सब्जपोश’ असेही म्हणतात. पोशाखाचा हा रंग त्यांनी प्राचीन नवाथीयन लोकांकडून उचलला.

धर्मपरंपरेनुसार मुसलमानांनी सर्वच केस वाढविले पाहिजेत अथवा डोक्याचे संपूर्ण मुंडन तरी केले पाहिजे. डोक्यावरची शेंडी ठेवण्याचे कधीकधी असे स्पष्टीकरण देतात की, त्या केसांचा उपयोग त्या माणसाला

स्वर्गात ओढण्यासाठी मूठ म्हणून होतो. तसेच शिरच्छेद झालेल्या मुसलमानाच्या तोंडाची अपवित्र हातामुळे होणारी अस्वच्छताही या केसामुळे टळते. परंतु खरे कारण वेगळेच असावे असे वाटते. ते म्हणजे वाळवंटात राहणारे अरब आपल्या डोक्याचे रक्षण व्हावे म्हणून असे केस राखत. कानाच्या बाजूचे केस राखणे ही आधुनिक अनिष्ट (मक्रूह) पद्धत आहे. परंतु ती विहित किंवा अविहित नाही, असे म्हणतात. मुलांचे केस काढताना डोक्यावर 'कावळा' ठेवतात. सरहद्दीवरील प्रदेशात राहणाऱ्या मुस्लीम जमाती आपले केस कुरळे कुरळे करतात. परंतु भारतीय मुसलमान असे करीत नाहीत. मुस्लीम स्त्रिया आपल्या केसांची वेणी घालतात अगर बुचडा बांधतात.

प्रेषित महंमद यांनी घालून दिलेल्या आदर्शानुसार दाढी हातभर लांब व दोन बोटे रुंद एवढी असावी, मिशा काढाव्यात अगर थोड्या ठेवाव्यात. दाढीमिशांबाबत हदीसमध्ये पुढील बाबी सांगितल्या आहेत : मुसलमानाने दाढी न राखल्यास अखेरच्या न्यायदानाच्या दिवशी त्याचा चेहरा डुकरासारखा काळा होईल. तसेच पाणी पिताना ओल्या होतील इतक्या लांब मिशा राखल्यास त्याला स्वर्गातील झऱ्याचे पाणी नाकारले जाईल, शिवाय अखेरच्या न्यायदानाच्या दिवशी ते केस शुळाप्रमाणे ताठ होतील व त्यामुळे प्राणिपात करता येणार नाही. यदाकदाचित त्याने डोके वाकविले तरी त्याचे कपाळ जमिनीला टेकणार नाही. मुसलमान लोक दाढी हे पौरुषाचे लक्षण मानतात. दुसऱ्या एखाद्याने दाढी धरून ओढल्यास तो आपला भयंकर अपमान आहे असे मानतात. परंतु गुजरातचा राजा महंमद शहा फारुकीची वेगळीच गोष्ट सांगतात. एकदा एका मुलाचा हात चुकून त्याच्या दाढीला लागला असता त्याने त्याला जीवदान दिले. इतकेच नव्हे तर त्याच्या चरितार्थाची सोयही लाबून दिली. मुसलमानांमध्ये 'दाढी खुदा का नूर' म्हणजे दाढी हा ईश्वराचा प्रकाश आहे अशी म्हण प्रचलित आहे. प्रेषितांनी मुसलमानांना 'काफीर करतात त्याच्या उलट करा, आपल्या दाढ्या लांब वाढवा,' अशी आज्ञा दिली होती.

अस्वच्छता टाळण्यासाठी ओठावरचे केस कमी करणे चांगले असे मानतात. इजिप्तमधील मुसलमान प्रेषितांचे अनुकरण म्हणून, ते ठेवीत त्याप्रमाणे दाढीमिशा ठेवतात. हिंदुस्थानातील सरहद्दीवरील प्रदेशात राहणाऱ्या बंगश पठाणासारख्या काही मुस्लीम जमातीचे लोक डोक्याचे, दाढीचे सगळ केस काढतात. फक्त मिशांची टोके लहान शिल्लक ठेवतात. स्थानिक मुसलमानांच्या मते असे मिशांचे काठ ठेवणे अयोग्य आहे. एकदा एका यात्रेकरूने अकबराला असे सांगितले की प्रेषितांनी एकदा दाढी काढून टाकलेला माणूस पाहिला तेव्हा त्यांना तो स्वर्गातील माणसासारखा दिसला, त्यावरून आणि कदाचित हिंदुपद्धतीचे अनुकरण म्हणून अकबराने सर्व मुसलमानांनी दाढ्या काढून टाकाव्या असे फर्मान काढले होते, परंतु ते लवकरच मागे घेण्यात आले. दोन्ही बगलेतील व बेंबीच्या खालचे केस कापणे, सुन्ता करणे, नखे काढणे याबाबत इब्राहीमने आदेश दिला होता. परंतु प्रेषितांनी याबाबत काही आज्ञा दिली नव्हती. सिंधमधील मुसलमान स्वच्छतेसाठी आणि उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून आपल्या डोक्याचे केस कापून घेतात. परंतु बलुची लोक लांब केस राखतात. कोणत्याही मुसलमानाने आपली दाढी काढू नये पण पुष्कळ पठाण सैनिकीपद्धतीच्या मिशा राखतात आणि दाढी काढून टाकतात. खोजा मुसलमानांनी याबाबत सामान्यपणे हिंदु रूढी तशाच ठेवल्या आहेत [ऐतकेन, गॅझेटर ऑफ सिंध, १९६ तळटीप; जनगणना अहवाल, बलुचिस्थान, १९०१, १·४० स्त्रीचे केस कापणे किंवा काढून टाकणे हे तिच्या नवऱ्याच्या आयुष्याच्या विरुद्ध असलेल्या शापाच्या बरोबरीचे आहे किंवा ती गुलाम असल्याचे ध्वनित करणारे आहे. 'वेणी कापलेली' (चोटी कट) या वाक्य प्रचाराचा अर्थ गुलाम असा आहे.]. हजामतीसाठी सोमवार, बुधवार, गुरुवार व शुक्रवार हे दिवस शुभ असून उरलेले अशुभ आहेत असे मानतात.

अनुक्रमणिका

मुस्लीम पुरुषांमध्ये दाढी रंगविण्याची पद्धत सामान्यपणे आढळते. हिंदुधर्मातून इस्लाममध्ये आलेल्या खेड्यातील पूर्वी हिंदू असलेल्या मुस्लीम स्त्रिया हिंदुस्त्रियांप्रमाणे आपल्या भांगात गुलाल भरतात पण सनातनी मुसलमानांनी या पद्धतीला मनाई केली आहे. मुस्लीम स्त्रिया डोके व भुवयाचे केस सोडून आपल्या शरीरावरील सर्व केस काढून टाकतात.

मुसलमान दात घासण्यासाठी वनस्पती काड्यांचा वापर करतात (मिसवाफ) उत्तर हिंदुस्थानमध्ये यासाठी निंबाच्या काड्या व दक्षिण हिंदुस्तानात पिलू नावाच्या झाडाच्या काड्यांचा वापर करतात. डुकराच्या केसाचे बनवलेले असण्याचा संभव असल्यामुळे टूथ-ब्रश वापरण्यास मात्र मनाई आहे. गरीब मुसलमान कोळसा कुटून त्याचाच मंजन म्हणून वापर करतात. मुस्लीम स्त्रिया दाताच्या मजबुतीसाठी दारसिना (मिसरी) धर्मसंमत म्हणून वापरतात. कारण प्रेषितांची मुलगी फातिमा ह्याही दारसिना वापरीत असत. परंतु सिंधमधील कुलीन मुस्लीम स्त्रिया दारसिना लावीत नाहीत.

आपली दृष्टी तीक्ष्ण व्हावी या हेतूने डोळ्यांत सुरमा घालतात. फार प्राचीन काळापासून हिंदुस्थान व पूर्वेकडील देश यांच्यात सुरम्याचा वापर होतो. पवित्र ग्रंथात सुरमा हा डोळ्यांच्याकरिता रंग असल्याचे म्हटले आहे. तो प्रखर उष्णतेपासून डोळ्यांचे रक्षण करतो व त्यामुळे नेत्र रोग होत नाही असे म्हणतात. सुरम्याबद्दल एक दंतकथा अशी आहे की परमेश्वराने मुसाला आपली मुखचर्या दाखविण्यासाठी सिनाई पर्वतावर चढण्यास सांगितले. ती त्याला सुईच्या नेढ्याएवढ्या मार्गातून दिसली. तिचे दर्शन झाल्याबरोबर मुसाची शुद्ध हरपली. जाग आल्यावर चालताना त्याला या पर्वताला आग लागल्याचे दिसले. त्या पर्वताने परमेश्वराला ‘तुम्ही मला आग का लावली? मी तर अगदी मामुली आहे,’ असे विचारले. नंतर परमेश्वराने मुसाला सांगितले की, यापुढे तू व तुझ्या पिढ्या या पर्वताची माती बारीक करून आपल्या डोळ्यांना लावा. म्हणून सुरमा अशा रीतीने निर्माण झालेला दैवी गुण असलेला पदार्थ आहे असे समजतात. पंजाबमध्ये सुरम्याबद्दल वेगळीच कथा प्रचलित आहे. ती अशी की, काश्मीरमधील एक फकीर झेलम जिल्ह्यातील करंगळी पर्वताजवळ आला व त्याने त्या पर्वताचे सोन्यात रूपांतर केले. तो पर्वत युद्धात लुटला जाईल अशी लोकांना भीती वाटल्यावरून सोन्याचे मंत्राने सुरम्यात रूपांतर करण्यात आले. तो सुरमा आता पावसाबरोबर पर्वतावरून वाहत येतो. तो आठ दिवसपर्यंत डोळ्यांत घातल्यास, एक जन्मजात अंधत्व सोडले तर आजार किंवा अपघातामुळे आलेले अंधत्व दूर होते. प्रेषितांनी सुरम्याची शिफारस केली होती. मुस्लीम स्त्रिया व लहान मुले काजळाचा वापर करतात. त्याचा हेतू सूर्यकिरणांचा त्रास व भूतबाधा यांच्यापासून रक्षण व्हावे हा असतो. नवरदेव लग्नासाठी जेव्हा वधूगृही जाण्यास निघतो तेव्हा त्याची भावजय त्याच्यावर भुताखेताची नजर पडू नये म्हणून त्याला काजळ लावते.

स्त्रिया आपल्या हाताच्या बोटाची टोके व पायाचे अंगठे रंगविण्यासाठी मेंदीचा वापर करतात. लग्नविधीत मेंदीचा खूप वापर करतात. मेंदीचा वापर हा स्त्रियांचा केवळ छंद नव्हे, कारण त्यामुळे हातापायांना घाम येणे थांबते व आरोग्यदायक असा थंडपणा लाभतो.

अनुक्रमणिका

कपडे रंगविण्यासाठी करडीच्या फुलापासून लाल रंग तयार करतात. गडद अगर फिक्कट असा रंग हवा असल्यास त्याप्रमाणे तो तयार करतात. कपड्यांना दिलेला हा रंग कायम टिकणारा असतो. या फुलांना गढ असा अर्थ आहे. या रंगाचे कपडे लग्नात व जादूच्या विधींमध्ये वापरतात.

मुस्लीम स्त्री पुरुष सुगंधी चूर्णाचा सामान्यत्वे वापर करतात. 'पुरुषांनी वापरावयाच्या चूर्णांना सुवास असावा पण रंग नसावा, तर स्त्रियांनी आपल्या अंगाला सुवास नसलेली पण रंग असलेली चूर्णे लावावी' असे म्हणतात. चिक्सा नावाचे सुंगधी चूर्ण विविध सुवासिक वस्तूंपासून बनवितात. स्त्रिया सामान्यत्वे चिक्सा तेलात मिसळून आपल्या अंगाला लावतात.

अबल फजलने चंदनाचे पांढरे, लाल व पिवळे असे तीन प्रकार सांगितले आहेत. मकस्सार नावाचा पिवळा व तेलकट असा प्रकार सर्वांत चांगला असतो. सदर पुस्तकात आलेले चंदनाचे संदर्भ फक्त चंदनाचे नसून चंदनकाष्ठ दगडावर उगाळून तयार केलेल्या सुगंधी लेपाबद्दलचे आहे. चंदन लावण्याचे काही ठराविक नियम आहेत. उजव्या हाताच्या बोटांनी चंदन प्रथम मानेच्या उजव्या बाजूला चार रेषा स्पष्ट दिसतील या प्रकारे लावावे. नंतर असेच मानेच्या डाव्या बाजूला लावावे. पोटावर नंतर फक्त चंदन लेपात बुडविलेल्या तर्जनीने लावावे. याचा अर्थ 'तुमच्या मुलाला आरोग्य लाभो' असा आहे. शेवटी पाठीवर असेच बोट लावावे. याचा अर्थ 'तुमचे आप्त सुखी राहोत' असा आहे. चंदनाचा वापर समारंभप्रसंगी उत्तर हिंदुस्तानपेक्षा दक्षिण हिंदुस्तानातील मुसलमान अधिक प्रमाणावर करतात.

उदाचा वापर धर्मग्रंथात वर्णिला आहे. त्याच्यापासून उदबत्त्याही तयार करतात. मुसलमान ऊद आणि उदबत्त्या या दोन्हींचाही वापर करतात.

चंदन, ऊद व एखादे सुंगधी तेल यांच्या मिश्रणाने अरगजा नावाचे सुगंधी चूर्ण करतात. त्याचा उपयोग अंगाला लावण्यासाठी करतात.

मुसलमान लोक गुलाबाचे अत्तर किंवा इतर अत्तरांचा वापर करतात. समारंभप्रसंगी पाहुण्यांना अत्तर देणे, त्यांच्या अंगावर गुलाबपाणी शिंपडणे या बाबी प्रमुखपणे आढळतात.

अबरी हे सुगंधी चूर्ण आहे. श्रेष्ठ प्रतीचा अबीर चंदनचूर्ण, गुलाबाची फुले आणि कापूर बारीक कुटून, गाळून तयार करतात. तो चेहऱ्याला, शरीराला चोळतात व कपड्यांवर शिंपडतात.

दक्षिण हिंदुस्थानमध्ये मेंदीच्या बियांना चुकून इस्पंद म्हणतात. खरे म्हणजे तो ऊद असतो. आजारी माणसाच्या बिछान्याजवळ ऊद जाळतात. त्याचा हेतू भुतेखेते पळून जावीत असा असतो. असे सुचविले गेले आहे की, तो जंतुनाशकासारखा परिणाम करील. उदाचा संबंध भुताखेताशी जोडण्यात येत असल्यामुळेच बहुधा उत्तर हिंदुस्थानात वरिष्ठ जातीचे हिंदु लोक त्याला हात लावीत नाहीत. ते काम झाडूवाल्यावर सोपवितात. अकबरही आपल्या घोड्यांचे भुताखेतापासून रक्षण व्हावे यासाठी खास सिंपदोज नावाचा अधिकारी नेमत होता. बाळंतिणीच्या बिछान्याजवळ चाळीस दिवस ऊद जाळतात. विशेषतः भेटीला आलेला माणूस परत

जाताना दरवाजाजवळ ऊद जाळतात. त्याचप्रमाणे बाळाला खोलीबाहेर स्नान घालण्यासाठी नेताना व परत आणल्यावर ऊद जाळतात. मुसलमानांत धार्मिक उपासनेत उदाचा वापर करीत नाहीत. पण प्रेताला धूर देणे, संताच्या कबरीजवळ तो जाळणे व जादूच्या काही विधींमध्ये त्याचा वापर करणे याला संमती आहे.

सदर पुस्तकात ज्या ज्या ठिकाणी फुलांचा उल्लेख आला आहे तेथे तो सामान्यत्वे फुलांच्या हाराचा, ओवलेल्या फुलांचा आहे; एक फुलाचा नाही. वधूवरांनी गळ्यात घालावयाच्या फुलांच्या हाराला 'बधी' म्हणतात. मनगटाला बांधण्यात येणाऱ्या ओवलेल्या फुलांना गजरा म्हणतात; नवस फेडताना वाहावयाच्या फुलांना 'गेंदगवारा' म्हणतात. स्त्रिया आपल्या डोक्याला जी फुलांची जाळी बांधतात व जीमुळे त्याचा चेहरा झाकला जातो त्या फुलाच्या जाळीला 'जाली-मू-इ-बंद' असे म्हणतात. घोड्याच्या डोके व अंगावर जी फुले टाकण्यात येतात त्यांना पाखर म्हणजे चिलखत म्हणतात. याशिवाय फुल की चादर, सरपोश (डोक्याभोवती बांधण्यात येणारी फुलांची दोरी), सेहरा म्हणजे वधुवरांच्या डोक्याला बाशिंगाप्रमाणे बांधलेली फुले असे ओवलेल्या फुलांचे इतर प्रकार आहेत.

अनुक्रमणिका

## प्रकरण तेहतिसावे

# अलंकार

मुस्लीम लोक विविध प्रकारचे अलंकार घालतात. परंतु विशेष ठळकपणे सांगावे असे खरोखरी काही नाही. हिंदू व मुस्लीम, विशेषतः हिंदु धर्मांतरित यांच्या अलंकारांत बरेच साम्य आढळते. परंतु ते आपल्या अलंकारात हिंदु देवतांच्या प्रतिमा व चिन्हे टाळीत असतात. अडचणीच्या काळात विकता यावेत या दृष्टीने मुसलमान आपली बचत दागिन्यात गुंतवितात असे दिसत नाही. हिंदुस्थानातील काही भागातील मुसलमानांत सोन्याचे दागिने घालू नयेत असा पूर्वग्रह आढळतो. काही जमातींचे मुसलमान आपल्या स्त्रियांना पायाच्या वरच्या अंगावर सोन्याशिवाय इतर धातूचे दागिने घालू देत नाहीत. पण जोडवे व तोरड्या यासाठी चांदीचा वापर करण्यास हरकत घेत नाहीत. प्रेषितांच्या काळी दैनंदिन जीवनात साधेपणा होता त्यामुळे त्या काळी सोन्याच्या अंगठ्या वापरण्यास मनाई होती. [१ मिश्कत, २·३४८, ३५३. फेरिश्तानुसार (३·२४४) अहमदनगरचा राजा हुसेन निजामशहा (इ.स. १५५३-६५) याला एका प्रसंगी आपल्या अंगावर सोन्याचा करगोटा असल्याचे प्रार्थनेनंतर लक्षात आले. त्याला असे आठवले की प्रार्थना करीत असताना तो वापरणे धर्मशास्त्राच्याविरोधी आहे म्हणून त्याने ते काढून टाकला आणि पुन्हा प्रार्थना म्हटल्या.] हिंदूंच्याप्रमाणे मुसलमान लोकही दागिन्यांचा वापर आभूषणे या हेतूने करीत नसून त्यामागे भुताखेतांपासून संरक्षण व्हावे असा, दृष्टिकोन असतो. म्हणूनच ज्या वस्तूंमध्ये भुताखेतांना नष्ट करण्याची शक्ती आहे असे मानतात त्या वस्तूंचा, उदाहरणार्थ विशिष्ट झाडाचे लाकूड किंवा पाने, वाघाचे केस, नखे इत्यादींचा ते उपयोग करतात. सामान्यतः मुस्लीम पुरुष ताइताशिवाय इतर अलंकार क्वचितच वापरतात. परंतु पश्चिम हिंदुस्थानातील बोहरा व मुमीन यांसारखे धनिक व्यापारीवर्गातील लोक सोन्याची कंठी, कडे, कर्णभूषणे, अंगठ्या, साखळ्या यांसारखे अलंकार वापरतात.

मुस्लीम स्त्रिया आपल्या कानांत कर्णभूषणे घालतात. याबाबतची इस्लामी परंपरेतील एक दंतकथा अशी आहे की, साराला जेव्हा हगरचा मत्सर वाटू लागला तेव्हा तिने सांगितले की, माझे दात हगरच्या रक्ताने माखल्याशिवाय मला चैन पडणार नाही. म्हणून अब्राहमने हगरच्या कानाला भोके पाडली, त्यातून निघालेल्या रक्तात साराला आपले हात माखता आले, यावरून कर्णभूषणांचा वापर सुरू झाला असे सांगतात. मुस्लीम स्त्रिया आपल्या कानांत चार ते अकरा कड्या घालतात. डाव्या कानातील कड्यांची संख्या उजव्यापेक्षा एकाने कमी असते. धर्मशास्त्र असे सांगते की, ‘ज्याला आपल्या मित्रांच्या कानांत किंवा नाकात नरकाग्नीची कडी घातली जावी असे वाटते त्याने त्याच्या कानात किंवा नाकात सोन्याची कडी घालावी म्हणूनच तुम्ही आपले दागिने चांदीचे करा.’ [मिश्कत, २·३५५.] परंतु धर्मशास्त्राचा हा कायदा सामान्यपणे कोणी पाळीत असल्याचे दिसत नाही, कारण पुष्कळ मुस्लीम स्त्रिया आपल्या डाव्या नाकपुडीत सोन्याची नथ व मधल्या पाळ्यांत बुलाक नावाची सोन्याची कडी घालतात. पुष्कळ मुस्लीम स्त्रिया आपल्या पळ्यात कुराणाची वचने मंत्र, एखाद्या प्राण्याचा केस इत्यादी ठेवलेले चांदीचे ताईत घालतात. पण ‘खरे म्हणजे मंत्र आणि मुलांच्या गळ्यात हिंस्र प्राण्यांच्या नखांचे ताईत घालणे, आपल्या पतीने आपल्या वर प्रेम करावे म्हणून स्त्रियांनी आपल्या गळ्यात दोरी घालणे या बाबी काफीर लोकांच्या आहेत.’ [जेआरएआय. ३८·१९४, थर्स्टन, कास्टस्, ६·११३. मुसलमानांच्या अलंकाराबाबत पहा, सर ई मॅक्लागन, मोनोग्राफ ऑन गोल्ड ॲन्ड सिल्व्हर वर्क इन द पंजाब; टी. सी. हेंडले, जनरल ऑफ इंडियन आर्टस १९०६-७; बी. एच्. बँडेन-पॉवेल, हँड बुक ऑफ द मॅन्युफॅक्चर्स ॲंड आर्टस ऑफ द पंजाब, १७५ तळटीपा; टी. एन. मुकर्जी, आर्ट मॅन्युफॅक्चर्स ऑफ इंडिया, ९७ तळटीपा.] दक्षिण हिंदुस्थानमधील मुस्लीम स्त्रिया आपल्या कानांच्या छिद्रात मोठा काकडे घालून ती मोठी करतात. काही मुसलमान अशा रीतीने मोठे केलेल्या कानाचे मांस झोंबाझोंबीत किंवा अपघाताने निघाल्यास त्या स्त्रीस भ्रष्ट

मानतात. तिने ठराविक प्रायश्चित घेतल्याशिवाय तिला शुचिर्भूत झाली असे मानीत नाहीत. उत्तर हिंदुस्थानात लहान मुलांच्या कंबरेला, भूतबाधा होऊ नये यासाठी ताईत बांधतात. दक्षिण हिंदुस्थानमध्ये ही भूतबाधा होऊ नये याच हेतूने लहान मुलींच्या कबरेस अंजिराच्या पानाच्या आकाराचा चांदीचा ताईत बांधतात तर बाकी उघडबंब असणाऱ्या मुलांच्या कंबरेस बांधण्यात येणारा ताईत निमुळता व लांबट आकाराचा असतो. या दोन्ही प्रकारच्या ताईतांना लैंगिक अर्थ असते.

अनुक्रमणिका

**प्रकरण चौतिसावे**

## अन्न व पेय

हिंदु लोकांवर जातीची अनेक बंधने असल्यामुळे ते काही पदार्थांचे सेवन करू शकत नाहीत. त्या मानाने मुसलमानांवर फार थोडे निर्बंध आहेत, परंतु हिंदु लोकांच्या सहवासामुळे ते काही पदार्थ निषिद्ध मानतात. मुसलमान वर्ज्य मानीत असलेल्या पदार्थांपैकी काहींचे मूळ परदेशी असून ते इस्लामच्या आरंभकाळापासून चालत आलेले आहेत. 'कनसूल-द-काइका' व 'शर-इ-वाकियात'च्या अनुसार काही प्राण्यांचे मांस खाणे वर्ज्य आहे तर इतर काही प्राण्यांचे मांस खाणे अविहित आहे. रवंथ करणाऱ्या व शिकारीवर न जगणाऱ्या प्राण्यांचे मांस खाण्यास अनुज्ञा आहे. असे प्राणी म्हणजे बकरी, मेंढी, हरिण, सारंग, ससे, गाय, बैल, म्हैस इत्यादी होत. सुळ्यासारखे दात असलेले म्हणजे डुक्कर, लांडगा, कोल्हा, वाघ इत्यादी प्राण्यांचे मांस धर्मशास्त्रानुसार वर्ज्य आहे. कुराणमध्ये असे सांगितले आहे की डुकराचे मांस व परमेश्वराव्यतिरिक्त अन्य कोणाच्या नावाने बळी दिलेल्या प्राण्यांचे मांस वर्ज्य आहे. एखाद्याला ते बळजबरीने खाऊ घातले अगर त्याने अजाणता खाल्ले तर त्याला पाप लागत नाही. कुफाचे इमामे आजम अबू हनिफा यांनी घोड्याचे मांस अविहित म्हणून सांगितले होते पण त्यांच्या शिष्यांना ते मान्य नाही. पैगंबर स्वतः काही पदार्थ वर्ज्य करीत पण इतरांना त्याबद्दल मनाई करीत नसत. प्रेषिताचा तो आधार समजून इमामे आजमचे शिष्य घोड्याचे मांस खातात. परंतु बहुसंख्य मुसलमान घोड्याचे मांस धर्मशास्त्रसंमत नाहीत असे मानतात. आपल्या भक्ष्याला पंजाने पकडून त्याला दातांनी फाडणारे प्राणी उदाहरणार्थ, कावळा, घार इत्यादी खाण्यास धर्मशास्त्राची मान्यता नाही. परंतु जे पक्षी आपले भक्ष पंजाऐवजी चोचीने पकडतात त्या प्राण्यांचे मांस खाण्यास धर्मशास्त्राची अनुमती आहे. असे पक्षी म्हणजे बगळा, बदक, मोर, कबुतर इत्यादी होत. टोळ खाण्यास हरकत नाही पण सरपटणारे सर्व प्राणी उदाहरणार्थ, विंचू, साप इत्यादी खाण्यास वर्ज्य आहेत. अंगावर खवले असणारे प्राणी सोडून पाण्यात राहणारे इतर प्राणी वर्ज्य आहेत. जे मासे वजनाने कमीत कमी १/१६ औस परंतु १२० पौंडांहून अधिक नाहीत ते खाण्यास धर्मशास्त्राची मनाई नाही. बाम (इल) व कतर्ना यासारखे हलक्या प्रतीचे प्राणी वर्ज्य असले तरी अविहित नाहीत. या अटी पूर्ण न करणारे पाण्यातील इतर प्राणी उदाहरणार्थ, बेडूक, खेकडे, कासव खाण्यास धर्मशास्त्राची संमती नाही. कोलंबी नावाचे मासे फक्त वर्ज्य आहेत पण खाल्ल्यास हरकत नाही. पाण्यात असतानाच मेलेले मासे अविहित आहेत. पण मासे पाण्याबाहेर काढल्यावर मेल्यास ते जुबाह केल्याच्या बरोबर आहेत असे मानतात.

धर्मशास्त्रानुसार दारू, अफू, गांजा व इतर गुंगी आणणारी पेये वर्ज्य आहेत. वर्ज्य असणाऱ्या पदार्थांचे सेवन, डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार आवश्यकच असेल तर त्याला धर्मशास्त्राची संमती आहे. अन्यथा अर्थातच नाही. झमझम या विहिरीचे पाणी, मिरवणुकीत असताना रस्त्यावर दिसलेले पाणी व वुजूसाठी वापरण्यात येणारे पाणी सोडून उभ्याने पाणी प्यावे.

मुसलमान, ज्यू व ख्रिश्चन यांना अहले किताब म्हणतात. ज्यू व ख्रिश्चन यांच्याबरोबर जेवण्यास हरकत काहीही नाही असे आता मुस्लीम पंडितांनी मान्य केले आहे. पण मागासलेल्या मुसलमानात वसत असलेली ही

अनुक्रमणिका

भावना मुख्यत्त्वे धर्मद्वेष व हिंदु लोकांकडून उचलेली बंधने यांच्यावर आधारित आहे. देशाच्या काही भागातील मुसलमानांत ही मान्यता आपोआप कमी होऊ लागली आहे.

प्राण्यांना अन्नासाठी ठार मारणे हे बळीच्या स्वरूपात असे. 'जुबाह' या संज्ञेत धार्मिक विधियुक्त हत्या ध्वनित आहे. अशीच भावना हिंदूंमध्येही आहे. [दख्खनमधील देशस्थ ब्राह्मण फक्त बळी दिलेल्या बोकडाचे मांस खातात. (बी. जी. १७·५१) आणि कलकत्त्यातील काली देवळाचे पुजारी बळी दिलेल्या प्राण्यांचे मांस हिंदूंना विकतात, त्या जागेचे पावित्र्य आणि विधी निषिद्धपणा घालवतो (वार्ड, द हिंदूज, २·१२७); मनू, कायदे ५·७. ही इराणच्या अकाईमेनियन राजांचीसुद्धा पद्धत होती (मासपेरो, पासिंग ऑफ द नेशन्स, ५९३ तळटीप).] एखाद्या प्राण्याच्या श्वासनलिका, अन्ननलिका व इतर एक नाडी या तीन सुरीने मुसलमान, ज्यू, ख्रिश्चन यांच्यापैकी कोणाही माणसाने कापल्यास त्या प्राण्याचे मांस खाणे धर्मशास्त्रसंमत आहे. यापैकी एखादी नाडी कापावयाची राहिल्यास त्या प्राण्याचे मांस खाणे धर्मशास्त्र संमत नसते (हराम). खालच्या जमातीचे मुसलमान या बाबतीत नेहमीच दक्ष असतात असे नाही. प्राणी कापताना 'बिस्मिल्लाही अल्लाही अकबर' (श्रेष्ठ परमेश्वराच्या नावे) असे शब्द म्हणतात.

गुजरातमधील श्रीमंत मुसलमान दिवसातून तीन वेळा जेवतो. तो सकाळी सात वाजता न्याहरी करतो. यावेळी तो चहा, कॉफी, मिठाई घेतो. दुपारच्या जेवणात तो पोळी, मांसाचे पदार्थ, भाज्या व कधीकधी भात घेतो. सायंकाळी सात वाजताचे जेवणात तो आंबट वरण आणि भात किंवा बिर्याणी, तूप, मासे, दही, लिंबू इत्यादी पदार्थ घेतो. मध्यमवर्गीय मुसलमान तीन वेळा जेवतात. पण त्यांचे जेवण श्रीमंतांच्या तुलनेने साधारण प्रतीचे असते. गरीब लोक सामान्यत्वे दोन वेळा जेवतात. एक म्हणजे सकाळी अकरा वाजता बाजरीची भाकरी खातात दुसरे म्हणजे सायंकाळी सात वाजता आमटीभात खातात.

अन्न शिजवणे व खाणे यासाठी मुसलमान हिंदू लोकांप्रमाणे पितळी किंवा इतर धातूची भांडी वापरीत नाहीत. ते फक्त यासाठी तांब्याची व तीही कल्हई केलेली भांडी वापरतात. तांब्याऐवजी ते बदना वापरतात.

गुजरातमध्ये श्रीमंत व मध्यमवर्गीय मुसलमानांत जेवणाची पद्धत सामान्यत्वे खालीलप्रमाणे आहे. जनाना हॉलमध्ये म्हणजे स्त्रियांच्या खोलीत कुटुंबातील सर्व स्त्री-पुरुष एकत्र बसून जेवतात, वाढण्याचे काम नोकर करतो. या जेवणास बाहेरचा माणूस तो आप्त किंवा जिवलग मित्र असेल तरच उपस्थित राहू शकतो. जेवणाच्या खोलीत सतरंजीवर वेलबुट्टी असलेली चादर अंथरतात (दस्तरखान). सर्वजण या दस्तरखानच्या चोहोभोवताल तक्क्यांना टेकून बसतात. दस्तरखानवर विविध खाद्य पदार्थ ठेवलेले असतात. कुटुंबप्रमुख दस्तरखानच्या मुख्य बाजूला बसतो. प्रथम नोकर हातात खोलगट भांडे व पाण्याने भरलेला खुजा घेऊन प्रत्येकाच्या जवळ जातो, प्रत्येकजण या भांड्यात हात धुतो. नंतर प्रत्येकजण आपणाला हवे ते खाद्य पदार्थ आपल्या हाताने आपल्या ताटात घेतो. प्रत्येकजण प्रत्येक घास घेताना 'बिस्मिल्ला' (परमेश्वराच्या नावे) असे म्हणतो किंवा त्याने तसे म्हणावे अशी अपेक्षा असते. कारण असे करणे धर्माच्या दृष्टीने चांगले असते असे मानतात. दस्तरखानच्या बाजूला ठेवलेल्या पाण्याच्या भांड्यातून प्रत्येकजण आपला पेला भरून घेतो. सगळ्यांचे जेवण झाल्यावर नोकर पुन्हा हातात भांडे व पाण्याचा खुजा घेऊन प्रत्येकाजवळ जातो. प्रत्येकजण या भांड्यात हात धुतो. जेवण संपल्यावर सामान्यत्वे मुले अगोदर बाहेर जातात, वडीलधारी माणसे विशेष काही काम नसल्यास तेथे बसून पान खातात, धूम्रपान करतात. गरीब मुसलमानांत घरी नोकर नसल्यामुळे गृहिणीलाच सगळी कामे करावी लागतात. त्यामुळे त्यांच्यात पुरुष अगोदर व स्त्रिया नंतर जेवतात.

अनुक्रमणिका

मुसलमानांचे नेहमीचे पदार्थ म्हणजे पुलाव, खिचडी व कबाब हे होत. पुलावचे यखनी, बाबूने कुर्मा, मुजफर शोला, दमपुख्त पुलाव, पुलाव मगजियात इत्यादी अनेक प्रकार आहेत. तसेच कबाबचे कोफ्ते कबाब, शामी कबाब, कलेजी का कबाब आदी प्रकार आहेत. याशिवाय त्यांच्या जेवणात भाकरी, पोळी, भाज्या, चटण्या, आंब्याचे लोणचे, दही यांचा समावेश असतो. गोड पदार्थांमध्ये पेयामध्ये शरबत प्रमुख आहे.

अनुक्रमणिका

## प्रकरण पस्तिसावे

# मादक व उत्तेजक पदार्थ

मुसलमान, विशेषतः शहरामधून राहणारे मुसलमान अफूच्या विविध प्रकारांचे सेवन करतात. अफू खाण्याची सवय असलेल्या माणसास अफीमची असे म्हणतात. अफू अशुद्ध असल्यास ती गाळून अगर तीत केशर मिसळून घेतात. केशर मिसळलेल्या द्रवरूप अफूला कुसुंबा असे म्हणतात. अफूचे सगळ्यात वाईट प्रकार म्हणजे छांडू व मदक हे होत. छांडू हुक्क्यात तर मदक चिलमीत ओढतात. प्राचीन प्रवासी अफूच्या ज्या प्रकाराचा उल्लेख करतात तो पोस्त किंवा कोकनार हा होय. राजपुत्र व वरिष्ठ अधिकाऱ्यांचा लोकापवाद न येऊ देता वध करण्यासाठी मोगल सम्राट हे द्रव्य देत असत.

अफूशिवाय भांग, गांजा, चरस याही मादक पदार्थांचे सेवन करतात. सिंधमध्ये शुद्ध स्वरूपात वापरीत असलेल्या चरसला माजूम असे म्हणतात. माजूमचा वापर क्वचितच करतात. रतीक्रिडेत उत्साह वाढावा म्हणून व एखाद्यास भ्रष्ट करण्यासाठी सामान्यत्वे माजूमचा वापर करतात.

रोपट्याच्या अमेरिकन नावावरून असलेल्या स्पॅनिश टोबॅकोचे तंबाखू हे भारतीय रूप आहे उत्तर हिंदुस्थानामध्ये त्याला तंबाखू म्हणतात. यावरून त्याचे मूळ परकीय आहे असे दिसते. [इ.स. १६०४-५ मध्ये उत्तर हिंदुस्थानमध्ये तंबाखूचा परिचय झाला. इतिहासकार असद बेग हा अकबराच्या दरबारातील त्याच्या पहिल्या प्रयोगाचा चमत्कारिक वृत्तान्त देतो. तथापि, सम्राटाला त्याचा वापर न करण्याचा सल्ला देण्यात आला होता. (इलियट-डाऊसन, ५·१६५ तळटीप; स्मिथ, अकबर, ४०७ तळटीपा. याच्या रोपट्याचे व गुणधर्मांचे ज्ञान हिंदुस्थान व चीन यांना परिचित करून देण्याचे श्रेय निश्चितपणे पोर्तुगीजांकडे जाते. (वॅट, इकॉन. प्रॉड. ७९६).] बहुसंख्य मुसलमान तंबाखू ओढतात, खातात किंवा त्याची नस ओढतात. मुस्लीम स्त्रियाही तंबाखू ओढतात व खातात. पंजाबमध्ये शिया जमातीचे मुसलमान चिलमीत तंबाखू ओढतात. परंतु सुन्नी पठाणांना त्यांचे मुल्ला तंबाखू ओढू नका तसेच चरसाचा वापर करू नका असे सांगतात. मुसलमान सामान्यत्वे तंबाखू ओढण्यासाठी हुक्क्याचा वापर करतात. जमातीचा हुक्का किंवा चिलीम ओढण्याच्या अधिकाराची फार काळजीपूर्वक जपणूक केली जाते. तो हुक्का ओढण्यास मना करणे हा सामाजिक बहिष्काराचाच एक प्रकार आहे.

मुस्लीम स्त्री-पुरुषांना पान खाण्याची सवय असते. पानाचा वापर तसा बराच पुरातन असून तो बहुधा जावामधून हिंदुस्थानात आला असावा. श्रीमंत मुसलमान तर पानात कात, चुना, सुपारी याशिवाय विलायची, कापूर व विविध मसाले टाकून खातात. आश्चर्याची गोष्ट अशी की, या मादक व उत्तेजक पदार्थांकडे वैद्यकीय विषयावरच्या लेखकांचे लक्ष गेलेले दिसत नाही. भारतात वास्तव्य करणाऱ्या कोणाही युरोपियन वैद्याने पौष्टिक, उत्तेजक व पोटदुखी दूर करणारे याद्दष्टीने पानावर प्रयोग केल्याचे दिसत नाही. पूर्वेकडील देशात असलेले पानाचे महत्त्व व त्याबाबतचा मार्कोपोलोचा अभिप्राय यावरून डच वनस्पती व शरीर शास्त्रज्ञांनी पानावर प्रयोग केले. आणि त्या देशातील दमट हवामानात पानाची आरोग्याला मदत होते या निर्णयावर ते आले. पान खाण्यामुळे स्त्रीचे सौंदर्य वाढते असा सर्वसाधारण समज आहे. समारंभप्रसंगी पाहुण्यांना पानसुपारी देणे हे कर्तव्य आहे असे मानतात. पान देण्याबाबत सामान्य समजूत अशी आहे की, ते हाताने दिल्यास देणाऱ्याचे वर्चस्व सूचित होते व तबकात दिल्यास समानता सूचित होते. पानाच्या उत्तेजकत्वामुळे त्याला

अनुक्रमणिका

धार्मिक संस्कारांमध्ये महत्त्व प्राप्त झाले आहे. रजपुतांच्यामध्ये पुरुष लढाईवर किंवा जीवाला धोका असणाऱ्या कामगिरीवर जात असताना त्याला विडा देत.

अनुक्रमणिका

## प्रकरण छत्तिसावे

## खेळ

बुद्धीबळ हा जगप्रसिद्ध खेळ आहे. मुसलमानांनी हा खेळ खेळण्यास धर्मशास्त्राची कोणतीही आडकाठी नाही असे मुस्लीम पंडितांचे मत आहे. हा खेळ खेळणाऱ्याच्या नशिबावर अवलंबून नसून त्याच्या कौशल्यावर अवलंबून असतो असे ते आपल्या मताचे समर्थन करतात. पण प्रेषित मात्र या खेळावर उघड उघड टीका करीत असत असे म्हणतात. [साल, कुराण, ८९·९३ नोट; मिश्कत, २·३७३. या खेळाच्या मूळाबद्दल बराच वाद आहे. (ई.बी. ५·१०० तळटीपा; एच.जे.आर. मरे, हिस्ट्री ऑफ चेस, ऑक्सफोर्ड १९१३).] सर रिचर्ड बर्टन यांनी युरोप व हिंदुस्थानमध्ये खेळल्या जाणाऱ्या बुद्धिबळात थोडा फरक असतो असे म्हटले आहे. बुद्धिबळाचे इराणी व हिंदू असे इतरही प्रकार आहेत. पण त्यांच्यात आणि इंग्लिश बुद्धिबळात खूपच फरक असतो. इराणी खेळाला झराफा व हिंदु खेळाला झोळीबाजी असे म्हणतात.

पच्चिसी हा हिंदूंचा सर्वात अधिक लोकप्रिय खेळ आहे. त्याचा उल्लेख अंजिठ्याच्या चित्रकलेत सापडतो. मुसलमान हा खेळ मोठ्या प्रमाणावर खेळतात. अकबर हा खेळ खेळत होता असे सांगतात. फत्तेपूर सिक्री व आग्र्याचा किल्ला येथे संगमरवरी दगडात कोरलेली घरे म्हणजे तो हा खेळ खेळत असलेला पट होय. नरदा म्हणून तो गुलाम मुली वापरीत असे असे म्हणतात.

इतर खेळांच्या मध्ये चौसर, द्यूत, गंजिफा इत्यादी खेळ आहेत. किरकोळ खेळांमध्ये कबुतरे उडविण्याचा व पतंगाचा खेळ हे मुख्य आहेत. कबुतरे उडविण्याच्या खेळाला अकबर इश्कबाजी म्हणजे प्रेमाचा खेळ असे म्हणत असत. दिल्लीचे आरंभीचे राजे चौगान म्हणजे पोलोसारखा खेळ खेळत असत. इ.स. १८६४ च्या सुमारास ब्रिटिशांनी या खेळात सुधारणा केली. शारीरिक खेळांच्यामध्ये कुस्ती, मुद्‌गल, दंड काढणे, इत्यादींचा समावेश आहे. कोंबड्यांची झुंज लावण्याचा खेळ पूर्वी खेळत असत. अजूनही काही ठिकाणी तो खेळला जात असला तरी हा खेळ खेळणे बरे नव्हे असे सामान्यतः मानतात. मुस्लीम मुले हिंदु मुलांप्रमाणे अगलझप, वाघशेळी, लपंडाव भोवरा, गोफण इत्यादी खेळ खेळतात.

अनुक्रमणिका

## समारोप

परमेश्वराच्या कृपेने आणि आशीर्वादाने 'कानून-इ-इस्लाम' हा ग्रंथ व्यासंग व चिकाटीने पूर्ण करण्यात आला आहे, आणि हे डॉ. हेरक्लॉट यांच्यासारख्या गुणांचा चाहता, उदारमतवादी माणसाच्या खास विनंतीवरून – त्यांचे सुदैव, आयुष्य व संपत्ती सदैव वाढो. आमेन! आमेन!,- सन्माननीय इंग्रज सद्‌गृहस्थांच्या फायद्यासाठी-त्यांचे साम्राज्य महत्पदास जावो.

हिंदुस्थानातील मुसलमानांच्या रूढींशी संबंधित असे काहीही लपविण्यात आल्याचे आढळून येणार नाही.

माझ्या वाचकांपासून आता अपेक्षावयाची गोष्ट केवळ ही की त्यांनी लेखक व भाषांतरकार यांचे भले इच्छावे, यासाठी त्यांच्यावर परमेश्वराची कृपा होईल आणि माणूसजात त्यांची आभारी राहील.

हीच एक अपेक्षा सर्व उदारांच्याकडून
क्षमा करावेत त्यांनी माझे सर्व दोष, त्यांना दिसलेले,
जे मत्सर आणि द्वेषाने टीका करतील,
ते समजावेत मंद बुद्धीचे व शहाणपणाचे विरोधक.

एल्लोर येथे पूर्ण केले.

अनुक्रमणिका

## संदर्भ ग्रंथांची यादी

या पुस्तकात तळटीपांमध्ये नोंदविण्यात आलेल्या ग्रंथांच्या काही संक्षिप्त नावांसह


आइन. अबूल फज्ल अलामी. द आइन-इ-अकबरी, एच. ब्लॉचमन आणि एच. एस. जेरेटकृत भाषांतरित व संपादित, ३ खंड, कलकत्ता, १८७३-९४

आइतकेन, ई.ए. द गॅझेटियर ऑफ सिंध, कराची, १९०७.

अल्बीरूनी क्रॉनॉलॉजी ऑफ द एन्शन्ट नेशन्स. भाषांतर. सी.ई. सचाऊ, लंडन, १८७९.

अनंत कृष्ण अय्यर, एल. के. कोचीन ट्राइबस् अँड कास्ट्स. २ खंड. मद्रास, १९०२-१२.

अर्नोल्ड, टी. डब्ल्यू. द प्रिचिंग ऑफ इस्लाम. वेस्ट मिनिस्टर, १८९६.

अटकिन्सन, ई.टी. द हिमालयन डिस्ट्रिक्स् ऑफ द नॉर्थ-वेस्ट प्रॉव्हीन्सेस ऑफ इंडिया. ३ खंड. अलाहाबाद, १८८२-८६.

अटकिन्सन, जे. कस्टम्स् अँड मॅनर्स ऑफ द विमेन ऑफ पर्सिया अँड देअर डोमेस्टिक सुपरस्टिशन्स, लंडन, १८३२.

बेली, एन.बी.ई. ए डायजेस्ट ऑफ मुहंमदान् लॉ. दुसरी आवृत्ती, लंडन, १८७५.

बल्फोर, ई. सायक्लोपिडिया ऑफ इंडिया. तिसरी आवृत्ती, ३ खंड, लंडन, १८८५.

बेन्जामिन, एस.जी.डब्ल्यू. पर्सिया अँड पर्सियन्स. लंडन, १८८७.

बर्नियर, एफ. ट्रॅव्हेल्स इन द मोगल एम्पायर. संपा. ए. कॉन्स्टेबल, व्ही. ए. स्मिथ, ऑक्सफोर्ड, १९१४.

बीजी. गॅझेटियर ऑफ द बॉम्बे प्रेसिडेन्सी. संपा. सर जे. कॅम्पबेल. २७ खंड. बॉम्बे, १८७४-१९०४.

बिलग्रामी, सय्यद होसेन, हिस्टॉरिकल अँड डिस्क्रिप्टिव्ह स्केच ऑफ एच. एच. द निझाम्स

विलमॉट, सी. डोमिनियन्स. २ खंड. बॉम्बे, १८८३.

ब्रॅन्ड, जे. ऑबझर्व्हेशन्स ऑन पॉप्युलर अँटिक्विटिज. ३ खंड. लंडन, १८४८.

ब्रे, डेनिस द लाइफ हिस्ट्री ऑफ ए ब्राहूई. लंडन, १९१३.

ब्राऊने, ई.जी. ए इअर अमाँगस्ट द पर्सियन्स. लंडन, १८९३.

बर्न्स, सर ए. काबूल, १८३६-८. लंडन, १८४२.

बर्टन, सर आर. ए. एन. द बुक ऑफ ए थाऊजंड नाइट्स अँड ए नाईट. १२ खंड. लंडन, १८९३.
सिंध अँड द रेसेस दॅट इनहॅबिट द व्हॅली ऑफ इंडस्. लंडन, १८५१.
सिंध रिव्हिजिटेड. २ खंड. लंडन, १८७७.
ए पर्सोनल नरेटिव्ह ऑफ ए पिलिग्रिमेज टू अलमदिना अँड मक्का. २ खंड. लंडन, १८९३.

चिव्हर्स, एन. मॅन्युअल ऑफ द मेडिकल ज्युरिसप्रुडन्स फॉर इंडिया. कलकत्ता, १८७०.

कौसेन्स, एच. बिजापूर अँड इट्स अँटिक्विटिज. बॉम्बे, १९१६.


अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| सी. आर. | सेन्सस रिपोर्ट्स; बलुचिस्तान, १९०१, १९११; बरोदा, १९०१, १९११; बेंगाल, १९०१, १९११; बेरार, १८८१; सेंट्रल प्रॉव्हिन्सेस, १९११; सेंट्रल इंडिया, १९०१; काश्मिर, १९११; पंजाब, १८८१, १९०१, १९११; युनायटेड प्रॉव्हिन्सेस, १९११. |
| क्रॉले, ई. | द मिस्टिक रोज, ए स्टडी ऑफ प्रिमिटिव्ह मॅरेज लंडन, १९०२. |
| क्रूक, डब्ल्यू. | ट्राइब्स अँड द कास्ट्स ऑफ द नॉर्थ-वेस्ट प्रॉव्हिन्सेस अँड अवध. ४ खंड. कलकत्ता, १८९६. |
| | पॉप्युलर रिलिजन अँड फोकलोअर ऑफ द मदर्न इंडिया. २ खंड. वेस्ट-मिनिस्टर, १८९६. |
| | थिंग्ज इंडियन, लंडन, १९०६. |
| डबिस्तां ऑर स्कूल ऑफ मॅनर्स | भाषा. डी. शेआ, ए. ट्रॉयर. ३ खंड. पॅरिस, १८४३. |
| ड्यूच, ई. | लिटररी रिमेन्स. लंडन, १८७४. |
| ईआरई | एनसायक्लोपिडिया ऑफ रिलिजन अँड एथिक्स. संपा. जे. हेस्टिंग्स. १० खंड एडिंबर्ग, १९०८-१८ (चालू). |
| इरमन, ई. | लाइफ इन एन्शन्ट इजिप्त, लंडन, १८९४. |
| फनशवे, एच. सी. | दिल्ली पास्ट अँड प्रेझेंट. लंडन, १९०२. |
| फार्नेल, एल. आर. | ग्रीस अँड बॅबिलोन, एडिंबर्ग, १९११. |
| फॉर्बिस, ए. | रासमाला, ऑर हिन्दू ॲनल्स ऑफ द प्रॉव्हिन्स ऑफ गुजरात. नवी आवृत्ती. लंडन, १८७८. |
| फ्रेजर, जी. बी., फ्रेजर सर जे. जी. | द गोल्डन बी. ३ री आवृत्ती. १२ खंड लंडन, १९०७-१२. |
| | लेक्चर्स ऑन द अर्ली हिस्ट्री ऑफ द किंगशिप. लंडन, १९०५. |
| | सायकीज टास्क. २ री आवृत्ती. लंडन, १९१३. |
| ग्रीव्हेन, आर. | द हिरोज फाइव्ह. अलाहाबाद, १८९८. |
| गुमेरी, एफ. बी. | जर्मनिक ओरिजिन्स, ए स्टडी इन प्रिमिटिव्ह कल्चर. न्यूयॉर्क, १८९२. |
| हार्टलँड, ई. एस. | प्रिमिटिव्ह पॅटर्निटी. २ खंड. लंडन, १९०९. |
| हॉग, ए. | एस्सेज ऑन द सेक्रेड लँग्वेज रायटिंग्ज अँड रिलिजन ऑफ द पारसिज. लंडन, १८७८. |
| होई, डब्ल्यू. | मोनोग्राफ ऑन द ट्रेड अँड मॅन्युफॅक्चरर्स ऑफ नदर्न इंडिया. लखनौ, १८८०. |
| ह्यूजेस, टी. पी. | ए डिक्शनरी ऑफ इस्लाम. लंडन, १८८५. |
| आय. जी. आय. | इंपिरियल गॅझेट ऑफ इंडिया. २६ खंड. ऑक्सफोर्ड, १९०८. |
| जॅस्ट्रो, एम. | द सिव्हिलीझेशन ऑफ बॅबिलोनिया अँड असिरिया. फिलाडेल्फीया, १९१५. |
| जे. आर. ए. आय. | जर्नल ऑफ द रॉयल अँथ्रॉपॉलॉजिकल इन्स्टिट्यूट. |

| | |
|---|---|
| कुराण | भाषां. जी. साल लंडन, १८४४, भाषां. जे. एम. रॉडवेल, एव्हरीमन्स लायब्ररी, लंडन. |
| लेन, ई. डब्ल्यू. | द थाऊजंड अँड वन नाइट्स. ३ खंड. लंडन, १८७७. |
| लेन, एम. ई. | ॲन अकाऊंट ऑफ द मॉडर्न इजिप्शीयन्स. ५ वी आवृत्ती, २ खंड, लंडन, १८७१. |
| लेआर्ड, सर ए. एच. | डिस्कव्हरीज इन द रूइन्स ऑफ निनेव्ह अँड बॅबिलोन. लंडन, १८५३. |
| लीडर, एस. एच. | व्हेलड् मिस्टरीज ऑफ इजिप्त अँड रिलिजन ऑफ इस्लाम. लंडन, १९१२. |
| लेनॉरमंट, डी. बी. | द डेव्हलपमेंट ऑफ मुस्लीम थिऑलॉजी, ज्युरिसप्रुडन्स अँड कॉन्स्टिट्यूशनल थिअरी. लंडन, १९१५. |
| माल्कम, सर जे. | द हिस्ट्री ऑफ पर्सिया फ्रॉम द मोस्ट अर्ली पिरियड टू द प्रेझेंट डे. २ री आवृत्ती. २ खंड. लंडन, १८२९. |
| मलिक मुहंमद दिन | द गॅझेटियर ऑफ द बहावलपूर स्टेट. लाहोर, १९०४. |
| मनुची, एन. | स्टोरिआ दो मेंगॉर, संपा. डब्ल्यू. आयर्व्हीन. ४ खंड. लंडन, १९०७-८. |
| मार्गोलियाथ, डी. एस. | महंमद अँड द राइज ऑफ इस्लाम. लंडन, १९०५. |
| (श्रीमती) मीर हसन अली | ऑबझर्व्हेशन्स ऑन द मुसलमान्स ऑफ इंडिया. दुसरी आवृत्ती, ऑक्सफोर्ड, १९१६. |
| मिश्कत | मिश्कत-उल-मसबिह. भाषां. ए. एन्. मॅथ्यूज. कलकत्ता, १८०९. |
| मोनियर-विलियम्स, सर एम. | ब्राह्मणीझम अँड हिंदूइझम. ४ थी आवृत्ती. लंडन, १८९१. |
| मोरियर, जे. | ए जर्नी थ्रू पर्सिया, आर्मेनिया अँड आशिया मायनर टू कॉन्स्टंटीनोपल बिटवीन द इअर्स १८०८ अँड १८०९ लंडन, १८१२. |
| | ए सेकंड जर्नी थ्रू पर्सिया, आर्मेनिया अँड आशिया मायनर बिटवीन द इअर्स १८१० अँड १८१६. लंडन, १८१८. |
| | हाजी बाबा. लंडन, १८३१ |
| मुईर, सर डब्ल्यू. | द खलीफत, इट्स राइज, डिक्लाइन अँड फॉल. लंडन, १८९१. |
| | ए लाइफ ऑफ महोम्मद. तिसरी आवृत्ती, लंडन, १८९४. |
| | ॲनल्स ऑफ द अर्ली खलीफत. लंडन, १८८३. |
| एन.आय.एन.क्यू. | नॉर्थ इंडिया नोट्स अँड क्वेरीज. अलाहाबाद, १८९१-६. |
| निकोल्सन, आर. ए. | ए लिटररी हिस्ट्री ऑफ द अरब्स. लंडन, १९०७. |
| ओसबोर्न, ए.डी. | इस्लाम अँड खलीफ्स ऑफ बगदाद. लंडन, १८७८. |
| पालग्रेव्ह, डब्ल्यू. जी. | ए पर्सोनल नरेटीव्ह ऑफ ए इअर्स जर्नी थ्रू सेंट्रल अँड इस्टर्न अरबिया. लंडन, १८७९. |
| पार्क्स, एफ. | वांडरिंग्ज ऑफ ए पिलग्रिम इन सर्च ऑफ द पिक्चरेस्क्यू. २ खंड. लंडन, १८५०. |
| पी. एन. क्यू. | पंजाब नोट्स अँड क्वेरीज. ५ खंड. अलाहाबाद, १८८३-७. |
| पेल्ली, सर एल. | द मिरॅकल प्ले ऑफ हसन अँड हुसेन. २ खंड. लंडन, १८७९. |
| रेडहाऊस, जे. डब्ल्यू. | द मेस्नेवी ऑफ जलालुद्दीन. लंडन, १८८१. |

| | |
|---|---|
| राइस, बी. एल. | ए गॅझेटियर ऑफ म्हैसूर. २ री आवृत्ती, २ खंड. लंडन, १८९७. |
| | म्हैसूर अँड कूर्ग फ्रॉम द इन्स्क्रीप्शन्स. लंडन, १९०९. |
| रिस्ले, एच. एच. | द कास्ट्स अँड ट्राइब्स ऑफ बेंगाल. २ खंड. कलकत्ता, १८९१. |
| रोज, एच. ए. | ए ग्लॉसरी ऑफ द ट्राइब्स अन्ड कास्ट्स ऑफ द पंजाब अँड नॉथ-वेस्ट फ्रॉंटियर प्रॉव्हीन्स. ३ खंड. लाहोर, १९११-१९. |
| रसेल, आर. व्ही. | द ट्राइब्स अँड कास्ट्स ऑफ द सेंट्रल प्रॉव्हीन्सेस. ४ खंड. लंडन, १९१६. |
| रिडबर्ग, ए. व्ही. | ट्यूटॉनिक मायथॉलॉजी. लंडन, १८९९. |
| साल, ई. | द फेथ ऑफ इस्लाम. मद्रास, १८८०. |
| स्किट, डब्ल्यू. डब्ल्यू. | मलाय मॅजिक. लंडन, १९०० |
| स्लीमन, सर डब्ल्यू. | रॅम्बल्स अँड रिकलेक्शन्स ऑफ ॲन इंडियन ऑफिशियल. संपा. व्ही. ए. स्मिथ, ऑक्सफोर्ड, १९१५. |
| स्मिथ, व्ही. ए. | द ऑक्सफोर्ड हिस्ट्री ऑफ इंडिया. ऑक्सफोर्ड, १९१९. |
| | अकबर, द ग्रेट मोगल. ऑक्सफोर्ड, १९१७. |
| स्मिथ, डब्ल्यू. रॉबर्टसन | लेक्चर्स ऑन द रिलीजन ऑफ द सेमिटीज. दुसरी आवृत्ती, लंडन, १८९४. |
| | किनशिप अँड मॅरेज इन अर्ली अरेबिया. केंब्रिज, १८८३. |
| सय्यद महंमद लतीफ | आग्रा हिस्टॉरिकल अँड डिस्क्रिप्टिव्ह. कलकत्ता, १८९६. |
| सायकीज, पी. एच्. | द ग्लोरी ऑफ द शिया वर्ल्ड. लंडन, १९१०. |
| टर्व्हेनियर, जे. बी. | ट्रॅव्हेल्स इन इंडिया. संपा. व्ही. बॉल. २ खंड, लंडन, १८८९. |
| टेंपल, सर आर. सी. | ए डेझर्टेशन ऑन द प्रॉपर नेम्स ऑफ पंजाबीज्. बॉम्बे, १८८३. |
| | द लिजंड्स ऑफ द पंजाब. ३ खंड. बॉम्बे १८८४-८६. |
| थॉर्बर्न, एस. एस. | बान्नू ऑर आवर अफगाण फ्रॉंटियर. लंडन, १८७६. |
| थर्स्टन, ई. | इथनॉग्राफिक नोट्स इन सदर्न इंडिया. मद्रास, १९०६. |
| | कास्ट्स अँड ट्राइब्स ऑफ सदर्न इंडिया. ७ खंड. मद्रास, १९०९. |
| टॉड, जे. | ॲनल्स अँड अँटिक्विटीज ऑफ राजस्तान. संपा. डब्ल्यू. क्रूक. ३ खंड. ऑक्सफोर्ड, १९२०. |
| टुपर, सी. एल. | पंजाब कस्टमरी लॉ. ३ खंड. कलकत्ता, १८८१. |
| वॅडेल, एल. ए. | द बुद्धीझम ऑफ तिबेट ऑर लामाइझम. लंडन, १८९५. |
| वार्ड, डब्ल्यू. | ए व्हिव ऑफ द हिस्ट्री, लिटरेचर अँड मायथॉलॉजी ऑफ द हिंदुज. दुसरी आवृत्ती, सेरामपोर, १८१८. |
| वॅटसन, सी. सी. | गॅझेटियर, अजमेर-मेरवार. अजमेर, १९०४. |
| वॅट, इकॉन डिक्ट. | वॅट, सर जी. ए डिक्शनरी ऑफ द इकॉनॉमिक प्रॉडक्ट्स ऑफ इंडिया. ६ खंड. कलकत्ता, १८८९-९३. |
| कॉम. प्रॉड. | द कमर्शियल प्रॉडक्टस ऑफ इंडिया. लंडन, १९०८. |
| वेस्टरमार्क, ई. | द हिस्ट्री ऑफ ह्युमन मॅरेज. लंडन, १८९५. |
| | ओरिजिनल डेव्हलपमेंट ऑफ द मॉरल आयडीयाज. २ खंड, लंडन, १९०६. |

# अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| | मॅरेज सेरिमनीज इन मोरोक्को. लंडन, १९१४. |
| विग्रॅम, डब्ल्यू. एल. अँड ई.टी.ए. | द क्रॅडल ऑफ मॅनकाइंड, इस्टर्न तुर्किस्तान. लंडन, १९१४ |
| विल्कीन्स, डब्ल्यू. जे. | हिंदू मायथॉलॉजी. कलकत्ता, १८८५. |
| विल्कस, एम. | हिस्टॉरिकल स्केचेस ऑफ द साऊथ ऑफ इंडिया. दुसरी आवृत्ती मद्रास, १८६९. |
| विल्स, सी. जे. | इन द लॅंड ऑफ द लॉयन अँड द सन ऑर मॉडर्न पर्सिया. लंडन, १८९१. |
| विल्सन, जे. | इंडियन कास्ट. २ खंड. बॉम्बे, १८७७. |
| वाईज, जे. | नोट्स ऑन द रेसेस, कास्ट्स अँड ट्रेड्स ऑफ इस्टर्न बेंगाल, लंडन १८८३. |
| यूल, सर एच., बर्नेल ए.सी., हॉब्सन-जॉन्सन | ए ग्लॉसरी ऑफ कलोक्वियल अँग्लो इंडियन वर्ड्स अँड फ्रेजेस. दुसरी आवृत्ती लंडन, १९०३. |
| झ्वेमेर, एस. एम. | अरेबिया, द क्रॅडल ऑफ इस्लाम. एडिंबर्ग, १९००. |


## अनुक्रमणिका

## सूची-शब्दसंग्रह

अकबर, सम्राट
अकिका, मुलाचे केस कापण्याचा विधी
अझाँ, प्रार्थनेला बोलावणे
अधामियाँ, फकिरांचे एक घराणे
अफताबगीर, मोहरम सणाच्या वेळी मिरवण्यात येणारी छत्री
अबदारखाना, पाणपोयी
अबु इशाक चिस्ती, एक संत
अबु फरा तुरतुसी
अबु बकर सिद्दीक, पहिले खलिफा
अबु हनीफ
अबु हुरैरा
अब्दुल कादिर जिलानी, एक संत
अब्दुल वहिद बिन झैद कूफी, एक संत
अब्दुल हक, एक संत
अब्दुल्ला हकिकी, हनीफ गाजरुनी, एक संत
अब्बास, महंमद पैगंबराचा चुलता
अमिरुद्दीन, हुबैरतुल बस्री, एक संत
अल औला, मक्केजवळील खडे फेकण्याचे एक ठिकाण
अल करार, सात स्वर्गांपैकी एक
अलाउद्दीन खलजी
अलामत, शाही उपाधी
अलावा, अग्निकुंड
अली, चौथे खलिफा, प्रेषितांचे जावई
अल्ला, परमेश्वर
अल्ला रहम की पिंडीयां, दयाळू परमेश्वरासाठी गोड पदार्थांची भेट
अहमद खान, एक संत
अहलूल किताब, ईश्वरी पुस्तक असलेले लोक
अहले हदीस, सुन्नत पाळणारे लोक
आगाखान
काबा, मक्का येथील मशीद
आझाद, स्वतंत्र, फकिरांचा एक वर्ग
आयशा, प्रेषितांची पत्नी
आलम, मोहरम व इतर समारंभाच्या वेळी ज्याची मिरवणूक काढण्यात येते असे एक निशाण
आशूरखाना, मोहरमची निशाणं ठेवण्याची जागा
आशूरा, मोहरम सणाचा दहावा किंवा दहा दिवस
आसार-उश-शरीफ,-इ मुबारक, प्रेषितांचे पवित्र अवशेष
इबादत, धार्मिक कर्तव्ये
इब्न हम्बल
इब्राहीम
इब्राहीम आधम बल्की, एक संत
इब्राहीम लोदी
इशा की नमाज, झोपण्याच्या वेळी प्रार्थना
इश्कबाजी, प्रेमाचा खेळ, कबुतरे उडविणे
इस्माईल
इहराम, यात्रिकाचा पोशाख
ईद, सण
उमर अल आदिल, दुसरे खलिफा
उरुस, संताची पुण्यतिथी
उस्मान गनी, तिसरे खलिफा
औरंगजेब, सम्राट
कदम-इ-रसूल, प्रेषितांचे पदचिन्ह
कफन, मृताला घालण्यात येणारे कपडे
कबीर, एक संत
करबला, हौतात्म्याचे युद्धस्थळ
कलमातु शहादत, खातरजमेचे शब्द
कलमा, धर्म
कादिरवलीसाहेब, एक संत
जियाउद्दीन अबू नजीब सुऱ्हावर्दी, एक संत

अनुक्रमणिका

कुराण
कुरेश, एक जमात
खिलत, मानाचा पोशाख
खुतबा, आज्ञा-प्रार्थना
खोजा, एक जमात
ख्वाजा खिजर, एक संत
गहवारा, पाळणा
गाझी मियाँ, एक संत
गिल-इ-सर-शूही, डोके धुण्याची माती
गुगा, एक संत
गुरोह, फकिरांची टोळी
गुर्झमार, फकिरांचा एक वर्ग
गेसू दराज, एक संत
गैर-इ-महादी, एक संप्रदाय
गौसुल आजम, एक संत
घासिल, प्रेताला आंघोळ घालणारा
चक्की नावारी, लग्नातील दळण्याचा विधी
चंगीझखान
चहार शम्बा आखिरी, एक सण
चहार शम्बा-इ-सुरी, अखेरचा न्यायदानाचा दिवस
चारयारी, सुन्नी लोकांची उपाधी
चिल्ला, मूल जन्मल्यानंतर चाळीस दिवस व्यवहारातून वेगळे राहणे
छटी, जन्मानंतर सहाव्या दिवशीचा विधी
जकात, धार्मिक दान
जफर शरीफ, सदर पुस्तकाचा मूळ लेखक
जॅब्रियल, देवदूत
जमरत-अल-अकबा, मक्केजवळील खडे फेकण्याचे एक ठिकाण
जलाल जहानियाँ जहाँगस्त, एक संत
जलालुद्दीन सय्यद बुखारी, एक संत
जहांगीर, सम्राट
जा-नमाज, प्रार्थनेची चटई
नवायत, एक जमात
नापाक होना, विटाळ येणे
जिहाद, काफिरांबरोबर युद्ध
जुनेद बगदादी, एक संत
जुबाह, प्राण्याची धार्मिक विधीयुक्त हत्या
जुलाह, विणकर जमात
जू-उल-कारनैन, दोन शिंगांचा, सम्राट शिकंदर
झैनुल अबिदिन
ढालीज खुंदलना, विवाहाच्या वेळी उंबरठा तुडविणे
तकबीर, दैव
तकल्लूस, टोपण नाव
तकिया, आत्मसंरक्षण
तबकाती, फकिरांचा एक वर्ग
तराबीह, विश्रांती प्रार्थना
तस्बीह, जपमाळ
तीनयारी, शियांची उपाधी
तोशा, प्रवासासाठी फराळाचे सामान
दम मदार, संत मदारचा श्वास
दरगा, संताची कबर
दस्तगीर, एक संत
दस्तबला करबला
दहेज, वधूकडून वराला देण्यात येणाऱ्या वस्तू
दाइरा फातिहा, स्मशानातील सर्व मृतांसाठी प्रार्थना
दाई, परिचारिका
दावल शाह, एक संत
दिदार पीर, एक संत
दोझक, नरक
दौला शाह, एक संत
धम्माल कूदना, अग्नीमधून उडी मारणे
नजिमुद्दीन कुबडा फिरदोसी, एक संत
नझ-ओ-नियाज, नवस
नमाज, प्रार्थना
बिस्मिल्ला, परमेश्वराच्या नावाचा उच्चार
बुराक, दैवी अश्व

निकलसन जॉन
निजामुद्दीन अवलिया, एक संत
पंजतन-इ-पाक, पाच पवित्र
पठाण, एक जमात
पीर-इ-दस्तगीर, एक संत
पीर महंमद नक्षबंद, एक संत
पीर मिलाओ. एक संत
पृथ्वीराज चौहान
फज्र की नमाज, सूर्योदयापूर्वीची प्रार्थना
फरिदुद्दीन शकरगंज, एक संत
फातिमा, प्रेषितांची मुलगी
फातिहा, कुराणातील पहिले प्रकरण
फितर, दान
फुजैल बिन आयाज, एक संत
फेरोजशहा तुगलक
बकर ईद, एक सण
बख्त्यार काकी कुतुबुद्दीन, एक संत
बदना, तोटी असलेले धातूचे पाण्याचे भांडे
बयात, शिष्य करून घेण्याचा विधी
बर्टन सर आर.
बलुची, एक जमात
बहलीम, नवसाचा एक प्रकार
बहाउद्दीन झिकारिया, एक संत
बहावल हक, एक संत
बाबर, सम्राट
बाबा घोर, एक संत
बाबा बुदन, एक संत
बाबा लाल, एक संत
बाबा वली कंधारी, एक संत
बायजीद बस्तामी तैफूर, एक संत
बारह वफात, एक सण
बालीग होना, वयात येणे
बिर-इ-झमझम, मक्का येथील पवित्र विहीर
मेत, एक प्रकारची माती
मोइनुद्दीन हसन चिस्ती, एक संत
मोगल, एक जमात
बू अली कलंदर, एक संत
बे-नमाजी आना, विटाळ येणे
बेहमाता, दैव हीच माता
बैतुल्ला, मक्का येथील ईश्वरी निवास
बैन, रद्द करता येण्याजोगा घटस्फोट
बोहरा, एक जमात
बंदा नवाज, एक संत
ब्याह, विवाह
ब्राहुई, एक जमात
मक्का
मगदूम फकी, एक संत
मगरीब की नमाज, सूर्यास्ताची प्रार्थना
मदिना
मरी, एक जमात
मरुफ करखीं शेख, एक संत
मर्सिया, मोहरमच्या वेळी म्हणण्यात येणारी शोकगीतं
मलंग, फकिरांचा एक वर्ग
मसूद गाजी, एक संत
महंमद गझनी
महंमद बेगडा
मालिक इमाम, 'मालिकी' या विचारधारेचा संस्थापक
मियॉं मीर, एक संत
मियॉं साहेब, एक संत
मुअज्जल, ताबडतोब देण्यात येणारा मेहर
मुआविया
मुवाज्जल, करार संपुष्टात आल्यावर द्यावयाची रक्कम
मुसा अशरी
मुसा सोहागी, एक संत
मुस्लीम इब्न उकेल
मुहंमद प्रेषित
सखी सरवार सुलतान, एक संत
सय्यद जलालुद्दीन बुखारी, एक संत
सहनक, कुंभविधी

मोपला, एक जमात
मोमना, एक जमात
मोलेसलाम, एक जमात
मोहरम, सण
यझीद
यासिन, कुराणचे छत्तीसावे प्रकरण
रमजान, सण
राफिजी, शियांना लावण्यात येणारी उपाधी
रुह, आत्मा
लबाई, एक जमात
वफातनामा, प्रेषितांच्या मृत्यूचा वृत्तान्त
वसिका, लेखी करार
शब-इ-बारात, एक सण
शरफुद्दीन याह्या मुनारी, एक संत
शहादत का रोज, हौतात्म्य दिन
मोहरमचा दहावा दिवस
शाह मदार, एक संत
शाह वसावा, एक संत
शिया, एक संप्रदाय
शेख आलम, एक संत
शेख सद्दू
सिफ्ला, सैतानी विद्या
सिमिया, मंत्रविद्या
सिरी सख्ती, एक संत
सुन्नी, एक संप्रदाय
हज, यात्रा
हजर
हजरत सुलेमान, एक संत
हदीस, प्रेषितांची शिकवण
हनीफ गाजरुनी, एक संत
हबीब आजमी, एक संत
हराम, वर्ज्य
हसन, प्रेषितांचे नातू
हाजी, यात्रेकरू
हात बर्ताना, लग्नानंतर काम करण्यास
सुरुवात करणे
हाफिज, कुराण मुखोद्‌गत असणारा
हुमायून, सम्राट
हुसेन, प्रेषितांचे नातू
हेरक्लॉट, जी. ए.
हेझ, विटाळ येणे

मुद्रणस्थळ : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

अनुक्रमणिका